# "धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास"

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत
सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील 'इतिहास' विषयाच्या पीएच.डी.
(Ph.D.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


* संशोधक *

**श्री. खोकले अविनाश कोंडीबा**

इतिहास विभाग,
बी.रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
परभणी ता.जि.परभणी

* मार्गदर्शक *

**प्रा.डॉ.अनिल सिंगारे**

एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
श्री.संत जनाबाई कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,गंगाखेड
ता.गंगाखेड जि.परभणी



**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी,**
**पुणे-४११०३७**
**२०१०**



Maharashtra Vidyapeeth Ph.D Section Pune

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, **"धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास"** या विषयावरील सदरचा शोधप्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत तसेच सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील 'इतिहास' विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी लिहिलेला आहे.

हा शोधप्रबंध मी स्वतः संशोधनपूर्वक लिहिला असून शोधप्रबंधातील सर्व मजकूर माझ्या संशोधनपर अभ्यासावर आधारलेला आहे. हा शोधप्रबंध मी अन्यत्र, कोठेही, कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

संशोधक

स्थळ : परभणी
दिनांक : / /२०१०

**श्री. खोकले अविनाश कोंडीबा**
इतिहास विभाग
बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी
जि. परभणी

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. खोकले अविनाश कोंडीबा** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील **'इतिहास'** विषयाच्या **पीएच.डी.** पदवीसाठी सादर केलेल्या **"धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास"** या शोधप्रबंधासाठी केलेले संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. शोधप्रबंध लेखनात ज्या संदर्भसाहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे. त्याचा आवश्यक तेथे यथोचित निर्देश केला आहे.

श्री. खोकले अविनाश कोंडीबा यांनी हा शोधप्रबंध स्वतंत्ररित्या लिहिला असून, तो इतर कोणत्याही विद्यापीठात कुठल्याही अन्य पदवी अथवा प्रमाणपत्रासाठी सादर केलेला नाही. सदर शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या 'इतिहास' विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

मार्गदर्शक

स्थळ : गंगाखेड जि. परभणी
दिनांक : / /२०१०

**प्रा.डॉ. अनिल सिंगारे**
एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
श्री संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, गंगाखेड
ता. गंगाखेड जि. परभणी

# ऋणनिर्देश

**"धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास"** या विषयात संशोधन करणे अत्यंत गरजेचे होते. कारण अशी दुर्मिळ ऐतिहासिक ठिकाणे भारतात म्हणावी तेवढी नाहीत. मग आपल्या प्राचीन संस्कृतीचा त्यांच्या अवशेषांचा किंवा इतिहासाचा अभ्यास करणे हे आपले नैतिक कर्तव्य समजून हा विषय निवडला गेला.

या विषयाच्या संशोधनासाठी माझे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्य प्रा.डॉ. अनिल सिंगारे सर यांचे या प्रबंधाच्या विषय निवडीपासून ते शोधप्रबंध पूर्ण होईपर्यंत अतिशय जिव्हाळ्याचे व आपुलकिचे मौलिक असे मार्गदर्शन लाभले. संशोधनाकरिता आवश्यक असणारी शिस्त, कठोर परिश्रम व चिकाटी यांचे संस्कार माझ्यावर करुन संशोधन क्षेत्रात आयुष्यभर पुरेल अशी ज्ञान शिदोरी मला दिली. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांची प्रेरणा आणि मार्गदर्शनामुळेच **"धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास"** हा प्रबंध मी पूर्ण करु शकलो. माझ्या भावी आयुष्याच्या वाटचालीत त्यांचे आशिर्वाद व मार्गदर्शन असेच लाभावे हीच इच्छा व्यक्त करतो.

या संशोधन कार्यासाठी अनेक ग्रंथालयांची मदत झाली. त्यामध्ये गणेश वाचनालय परभणी, ज्ञानोपासक महाविद्यालय ग्रंथालय परभणी, बी. रघुनाथ महाविद्यालय ग्रंथालय परभणी, शिवाजी महाविद्यालय ग्रंथालय परभणी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ग्रंथालय नांदेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, मराठवाडा कृषी विद्यापीठ ग्रंथालय परभणी, संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड, शासकीय मुद्रणालय व ग्रंथालय औरंगाबाद, एस.आर.टी. महाविद्यालय ग्रंथालय अंबाजोगाई, खोलेश्वर महाविद्यालय ग्रंथालय अंबाजोगाई, लोकमान्य वाचनालय खोकलेवाडी, शारदा महाविद्यालय ग्रंथालय परभणी, यशवंत महाविद्यालय ग्रंथालय नांदेड अशा अनेक ग्रंथालयांची मोलाची मदत या संशोधन कार्यासाठी झाली.

तसेच संशोधनाच्या दृष्टीने काही नामांकित विद्वानांचे ही मार्गदर्शन लाभले त्यामध्ये कै.प्रा.डॉ. दत्तात्रय जगदाळे, प्रा.डॉ. ए.डी. शिंदे (ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी), प्रा.डॉ.श्रध्दा कुंभोजकर, प्रा.डॉ. विजय कारेकर, प्रा.डॉ. दिपक देशपांडे, पीएच.डी. विभागाचे दानी सर, पाटील सर (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे), प्रा.डॉ. प्रभाकर देव नांदेड, किरण

देशमुख - अर्जापूर, प्रा.डॉ. अनिल कठारे (शिवाजी महाविद्यालय कंधार), डॉ.विठ्ठल घुले, डॉ. नितीन बावळे, डॉ.बी.जी. कुलकर्णी, आर्दीनी संशोधनाबाबतीत मार्गदर्शन केले.

तसेच डॉ. आघाव, डॉ. रोकडे, डॉ. कैलास पाटील, डॉ. तवार, प्रा.ए.पी. मुंडे, डहाळे, आमचे संस्थाध्यक्ष ॲड. अशोक सोनी व प्राचार्य डॉ. विलास सोनवणे यांचे प्रोत्साहन मिळाले. संशोधन साधनांसाठी प्रा. गव्हाणे, प्रा. हिंगमिरे, प्रा. दाभाडे, प्रा. डॉ. घुटे, प्रा. चव्हाण, प्रा.सौ. बारहाते, प्रा.सौ. शेख अलमास, प्रा. चांदजकर व माझे सहकारी विठ्ठल, भरत, गोविंद, राजेभाऊ, मुकेश त्याचबरोबर महाविद्यालयातील सहकारी प्रा. सोसे, प्रा.नामदास, प्रा.डॉ. दरेकर, प्रा. पाटील, प्रा. गांधले, प्रा. डॉ. पाळवदे, प्रा. डॉ. हैबतकर, प्रा. काळे, प्रा. शेंडगे, प्रा. लोणारकर, प्रा. कौसडीकर, प्रासौ. देशपांडे, अतुल पांडे, प्रा. वाणी, प्रा. ठाकूर, प्रा.डॉ. वैद्य, प्रा. भालेराव, प्रा. जाधव, प्रा.डॉ. म्हेत्रे, प्रा. उपाडे, प्रा. वायकोस, प्रा. खोले, प्रा. राठोड, प्रा. देशमुख, उपप्राचार्य प्रा. गणाचार्य, प्रा. खंदारे, प्रा.सौ. माखणे आर्दीनी प्रोत्साहन दिले.

टंकलेखन श्री. दिलीप मस्के यांनी केले तसेच प्रा. डॉ. कोल्हे, प्रा. इमडे, प्रा. निर्मळ, प्रा.डॉ. पिसे, प्रा. शिंदे इंद्रजित, प्रा.घोगरे जयपाल, प्रा. खोकले सचिन, प्रा. श्रीधर चाटे, प्रा. जयदीप फड, खोकले सखाहरी, प्रा.सोळंके, प्रा.डाके, प्रा. कापरे, प्रा. दराडे, आर्दीनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केली. या संशोधनासाठी परिवारातील सर्व सदस्यांनीही मदत केली. तसेच सरपंच शिवाजी खोकले (तात्या), गंगाधर खोकले (पो. पाटील), बाबुराव खोकले (मा. मुख्याध्यापक), आनंद खोकले, जयवंत खोकले, सुग्रीव खोकले, आंतेश्वर खोकले, मंचक आंधळे (महाराज), दगडू होळंबे (तात्या), सुदाम मुंडे (तात्या) तसेच भरत फड, गिरीष फड, बालाजी फड या मामा कंपनीचेही मार्गदर्शन लाभले. उध्दव खोकले, डॉ. प्रदीप खोकले, पंडीत केदार, चंद्रकांत कातकडे, संतोष इप्पर, माधव दहीफळे यांनी सदिच्छा व्यक्त केल्या. यांच्या व्यतिरिक्त कोणी राहिले असतील तर त्यांची माफी मागून सर्व हितचिंतकांचे आभार मानतो.

**श्री. खोकले अविनाश कोंडीबा**

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शीर्षक | पृ.क्र |
|---|---|---|
| | • प्रतिज्ञापत्र<br>• प्रमाणपत्र<br>• अर्पण पत्रिका<br>• ऋणनिर्देश<br>• अनुक्रणिका | |
| १ | प्रकरण पहिले - **पार्श्वभूमी** | १ |
| २ | प्रकरण दुसरे - **बीड आणि लातूर जिल्ह्यातील शिल्पकलेचा इतिहास** | ६६ |
| ३ | प्रकरण तिसरे - **शिल्पकलेचा कला आणि वास्तुशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास** | १२७ |
| ४ | प्रकरण चौथे - **धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास** | १७८ |
| ५ | प्रकरण पाचवे - **बांधकाम तंत्राचा किंवा शैलीचा अभ्यास** | २४१ |
| ६ | प्रकरण सहावे - **चालुक्यांच्या काळाचे इतिहासाला योगदान** | २९७ |
| ७ | प्रकरण सातवे - **निष्कर्ष व शिफारशी** | ३४९ |
| ८ | प्रकरण आठवे - **उपसंहार** | ३५८ |
| | परिशिष्ट्ये -<br>- वंशावळ<br>- नकाशे सूची<br>- कठिण शब्दांचा अर्थ<br>- संदर्भग्रंथ सूची<br>- छायाचित्रे | <br>३७१<br>३७३<br>३७७<br>३८८<br>४०६ |

# प्रकरण - १

# पार्श्वभूमी

प्रकरण पहिले

# पार्श्वभूमी

**संशोधन पध्दती :**

**प्रस्तावना :**

प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात आपणाला इतिहासाच्या विविध पैलूंवर संशोधनाच्या मदतीने प्रकाश टाकता येतो. अशा पैलूंमध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा घटकांचा अभ्यास होतो. सांस्कृतिकतेच्या क्षेत्रात महाराष्ट्रात मराठवाडा हा प्राचीन काळाप्रमाणे आजही तेवढाच अग्रेसर दिसतो. परंतु आपल्या संशोधनाच्या दृष्टिकोनातून प्राचीन मराठवाड्यातील बीड आणि लातूर जिल्ह्यातील अनुक्रमे धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी शिल्पकला आणि स्थापत्य कला ही प्राचीन काळात बहरास आलेली होती. या ठिकाणची शिल्पकला ही एक मराठवाड्यातील अविस्मरणीय ठेवा ठरली. त्यावर प्रामुख्याने चालुक्य राजांच्या काळाचा प्रभाव दिसून येतो. चालुक्य काळातील धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते.

"धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास" हाच आपल्या संशोधनाचा विषय असून या ठिकाणची अनेक मंदिरे व वास्तू इतिहासाची साक्ष म्हणून आजपर्यंत उण, वारा, पाऊस या नैसर्गिक घटकांना तोंड देत यांनी आपले अस्तित्व कायम ठेवलेले दिसून येते. धर्मापुरी या ठिकाणी केदारेश्वर मंदिर, मरळसिध्द मंदिर, रोकडोबाचे मंदिर, तुकाई देवीचे मंदिर, गणपती मंदिर तसेच पानगाव येथील विठ्ठल रुक्मिनी मंदिर, पन्नगेश्वराचे मंदिर आणि पंचकुंड महादेव मंदिर ही सर्व मंदिरे शिल्पकलेची उत्तम उदाहरणे आहेत. एवढेच नव्हे तर तेथील अनेक घटकांचा अभ्यास आपणाला आपल्या संशोधन कार्यात सविस्तरपणे घ्यावयाचा आहे.

## संशोधन विषयाचे महत्व :

संशोधन विषयाचे महत्व हे आपणाला पुढील घटकांवरुन लक्षात येते.

१. धर्मापुरी आणि पानगांव येथे ऐतिहासिक शिल्पकला आहे हे सिध्द करणे.

२. चालुक्य काळातील कलेचा आदर्श अभ्यासकांपुढे मांडणे.

३. इतर सुप्रसिध्द शिल्पकलेप्रमाणे येथील शिल्पकलेचा चिकित्सक अभ्यास करुन महत्व सांगणे.

४. येथील बांधकाम रचनेचा अभ्यास करुन याची माहिती संशोधकांना किंवा अभ्यासकांना देणे.

५. धर्मापुरी आणि पानगाव येथील शिल्पकलेचा इतिहास रेखाटणे.

६. मराठवाड्याच्या इतिहासापासून वंचित राहिलेल्या येथील कलाकेंद्रांना प्रकाशझोतात आणणे.

## तर्कशास्त्रीय / तार्किक बैठक

१. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी प्राचीन शिल्पकलेचे दालन आहे.

२. ही प्रगत असलेली शिल्पकला चालुक्य राजांच्या काळातील असावी.

३. येथील बांधकाम शैली नागर असून मंदिराच्या भिंतीवर अप्रतिम कोरीव काम केलेले आहे.

४. धर्मापुरी येथील मंदिराच्या गर्भगृहात शिवलिंग असून बाह्य भागावर शिव, विष्णू, नृसिंह, यांच्या पुष्कळ मूर्ती कोरलेल्या आहेत. यावरुन आपणाला शैव व वैष्णव पंथाचा प्रभाव जाणवतो.

५. पानगाव येथील मंदिरात विठ्ठल मूर्ती आहे पण बाहेरील नंदी मंडपावरुन हे मंदिर शिवाचे असावे असे म्हणता येईल.

६. येथील कलेच्या निर्मितीवरुन तत्कालीन चालुक्य राजांनी शिल्प कलाकारांना राजाश्रय दिला असावा.

**संशोधन करण्याची आवश्यकता :**

सदरील विषयावर म्हणावे तेवढे सखोल किंवा समाधानकारक संशोधन झालेले नाही. हे आपणाला अभ्यासाअंती समजून घेण्यास मदत होते. धर्मापुरी येथील आणि पानगाव येथील ऐतिहासिक स्मारकांचे म्हणावे तसे वस्तुनिष्ठ संशोधन झालेले नाही.

यासाठीच आपणाला येथील संशोधनाला पूर्णत्व येण्यासाठी किंवा प्राप्त होण्यासाठी शास्त्रीय, वस्तुनिष्ठ किंवा चिकित्सक अशी सखोल डोळस दृष्टी ठेवून अधिक संशोधन करण्याची आवश्यकता आहे. जेणे करुन मराठवाड्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात येथील शिल्पकलेचा इतिहास हा अजरामर झाल्याशिवाय राहणार नाही.

**ध्येय आणि उद्दिष्ट्ये :**

१. धर्मापुरी आणि पानगाव येथील शिल्पकला व स्थापत्य कला प्रकाशात आणणे.

२. या ऐतिहासिक स्थळांची ओळख इतिहासाच्या अभ्यासकांना करुन देणे.

३. येथील शिल्पकलेवर संशोधन करुन गतकाळातील धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन रेखाटणे.

४. या शिल्पकलेवर आधारित प्राथमिक आणि दुय्यम साधनांचे संकलन करुन त्याची सुलभतेने मांडणी करणे.

५. धर्मापुरी आणि पानगाव येथील शिल्पकलेची माहिती संशोधन कार्याच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहचविणे.

६. चालुक्य काळातील अप्रतिम शिल्पकलेचा हा ठेवा वस्तुनिष्ठपणे मांडून कलेच्या इतिहासात स्थान प्राप्त करणे.

**पध्दतीशास्त्र आणि रचनातंत्रे प्रणाली :**

इतिहासामध्ये भौतिक आणि वाङमयीन साधनांच्या आधारे प्रचलित ज्ञानात भर घालून एखाद्या प्रश्नावर प्रकाश टाकणे तसेच मूलभूत संशोधनात काहीतरी भर घालणे हा इतिहास संशोधनाचा मुख्य हेतू किंवा उद्देश असतो. असे आपणाला म्हणता येते.

तसे पाहिले तर संशोधनकर्ता हा अनेकदा आपल्या संशोधनात विषयाच्या आवश्यकतेनुसार एका पेक्षा जास्त तंत्रांचा उपयोग करत असतो. यालाच अनुसरुन किंवा त्या अनुषंगाने आपणाला या प्रकल्पकार्यासाठी सर्वेक्षण नावाच्या प्राथमिक तथ्य संकलनाच्या पध्दतीचा देखील अवलंब करावा लागत आहे. कारण त्या स्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील पाहणी करुन छायाचित्रांच्या साह्याने आपणाला या प्रकल्प कार्यासाठी मदत करावी लागते.

तसेच आपणाला या संशोधन कार्यासाठी संदर्भ पध्दतीमुळे आवश्यक ती तथ्ये गोळा करता येतात. याप्रमाणेच आपल्या संशोधन कार्यासाठी सर्वात उपयोगी ठरणारी प्राथमिक साधने आणि काही दुय्यम साधनाचाही आधार घ्यावा लागतो आहे. उदा. प्रकाशित केलेले शिलालेख, ताम्रपट, नाणी, किल्ला, वास्तु आणि मासिके संदर्भ साधने तसेच वृत्तपत्रातील लेख व काही प्रबंधाचाही आपणाला या कार्यासाठी वापर हा करावा लागतो आहे.

**निष्कर्ष आणि संभवनिय उपयुक्तता मूल्य :**

भूतकाळात अनेक घटना घडल्या त्याचा शोध घेणे व भूतकाळातील घटनांची सत्यता आणि त्याचा अर्थ शोधणे भूतकाळातील घटनांचा इतिहास वर्तमानकाळातील मानवासमोर मांडणे, सृजनशील समाजाची निर्मिती करणे इ. कार्य हे ऐतिहासिक संशोधनाद्वारे होत असते.

ज्याच्या ठिकाणी विचार करण्याची क्षमता आहे तो मानव त्याच्या बुध्दिवादाची प्रगती व वाढ करत असतो. भूतकाळातील घटनांचा किंवा तत्कालीन जीवनाचा आणि त्यामध्ये शिल्पकलेच्या ऐतिहासिक अभ्यासाचा अनुभव घेऊन वर्तमान व भविष्यकाळासाठी जास्तीत जास्त अचूक निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होते. आपल्या पूर्वजांचे वैभव किंवा प्रगतीचा आलेख समजण्यासाठी इतिहासाची मदत होत असते. त्यावरुन आपणाला प्रगतीच्या प्रमाणाची जाणीव होते. यावरुन संशोधनाचे महत्व किंवा संभवनिय उपयुक्तता मूल्य आपल्या लक्षात येते.

**पार्श्वभूमी :**

भारताचा इतिहास हा कलेने वैभवसंपन्न झालेला इतिहास आहे. प्राचीन शास्त्रांच्या अभ्यासावरुन भारतीय इतिहासात चौसष्ठ कलांची नोंद झालेली आहे. त्यामध्ये शिल्पकलेला ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेले दिसून येते. मानवाला ज्या भावनांचा अनुभव येतो त्या भावना रेखा, रंग, हावभाव, ध्वनी, शब्द इत्यादींच्या साह्याने बाहेर प्रगट करणे म्हणजे कला होय.

आर.जी. कॉलिंगवुड म्हणतो, "कलाकृती ही काही शरीर किंवा इंद्रियगोचर अशी गोष्ट नसते तर ती एक कलावंताची कृती असते ती कृती त्याच्या स्वतःची शारीरिक वा इंद्रिय प्रकृतीची नसते तर ती त्याच्या जाणीवेची कृती असते."[१] कला ही मानवाला चिरकाल आनंद देते. म्हणूनच आपण संशोधनासाठी समाजाभिमुख दृष्टिकोन समोर ठेवून "धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास" हा विषय निवडला आहे. प्रत्यक्ष विषयास हात न घालता आपणाला त्याची पार्श्वभूमी पाहावी लागले.

धर्मापुरी आणि पानगावच्या कलेचा अभ्यास करण्यासाठी किंवा भारतीय कलेचा अभ्यारा करण्यासाठी सर्वप्रथम आपणाला भारत काय आहे? येथील समाजरचना काय आहे? येथे किती प्रकारच्या संस्कृती नांदतात. अशा विविधतापूर्ण असलेल्या भारतामध्ये कलेचा अविष्कार कसा झाला ही बाब म्हणजे इतिहासकाराच्या किंवा संशोधकाच्या दृष्टिकोनातून एक कुतुहलजनक अशीच बाब आहे.

या अखंड भारतामध्ये अनेक जातिधर्माचे देश बांधव राहतात. प्रत्येक धर्माची सांस्कृतिक लक्षणे किंवा प्रतिके ही आपणाला वेगवेगळी आहेत असेच म्हणावे लागेल. कारण तिच वस्तुस्थिती आहे. हिंदू धर्माचा विचार केला तर चार वेद, सहा शास्त्र, अठरा पुराण व चौसष्ठ कलांना महत्व दिले जाते. तसेच जैनांच्या, बौध्दांच्या, शिखांच्या, ख्रिश्चनांच्या व मुस्लिम समाजाच्या दृष्टिकोनातूनही कलेला त्या-त्या प्रमाणात महत्व दिलेले आपणाला समजण्यास मोलाची मदत होते. बदलवा म्हणतात, "भारतीय संस्कृती विविध मूल्यांचा सागर

१. कॉलिंगवुड, आर.जी., कलेची मुलतत्वे, पृ.३४३.

आहे. भारतीय समाजात हिंदू, इस्लाम, ख्रिस्ती, वीरशैव, शीख, बौध्द, जैन व पारशी हे प्रमुख धार्मिक समुदाय आहेत. या प्रत्येक धर्माने राष्ट्राच्या ऐतिहासिक, धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, राजकीय व एकंदरीत सामाजिक जीवनात विशिष्ट भूमिका वठवलेली आहे."[२]

भारतीय संस्कृतीच्या जडण-घडणीत तसेच समृध्दतेत या सर्व धर्मांनी काही महत्वपूर्ण सामाजिक मूल्यांची किंवा तत्वांची भर घातली आहे. यापैकी काही मूल्य अशी मानवता, समता, बंधुता, प्रीती, सद्‌भावना, दया, सहिष्णुता, करुणा, अहिंसा, औदार्य, पावित्र्य, दीनोध्दार, परोपकार, सहकार्य, सत्य, सेवा, शुश्रुषा, विवेक, विश्वास, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, पापक्षमा, याचना, पश्चात्तापभावना, शांति, नम्रता, सौजन्य, सज्जनता, क्षमाशिलता, संयमशिलता, सहनशिलता, स्वधर्मनिष्ठा, धर्मग्रंथ निष्ठा, सदगुरुनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, प्रामणिकपणा, सर्वधर्मसमभाव, एकात्मता, विश्वबंधुत्व इत्यादी. यामुळे भारतीय समाज निटपणे समजावून घेताना भारतातील प्रमुख धर्मांचा अभ्यास आवश्यक ठरतो. या घटकांवरुन कितीतरी उदात्त मूल्यांना भारतीय संस्कृतीने जन्म दिलेला समजतो.

यु.म. पठाण म्हणतात, "विविध धर्माची वा धर्म संप्रदायांची निर्मिती का झाली असावी. या प्रश्नाचा विचार करीत असताना असे दिसून येते की, विश्वाच्या मागील अंतीम सत्याची प्रचिती झाल्यानंतर ही प्रचिती सर्वसामान्यांनाही व्हावी, यासाठी विविध धर्मांचे व संप्रदायांचे प्रवर्तक लोकाभिमुख होतात."[३] अस्मिततेची ठिणगी चेतवावी लागते जोवर अशी ठिणगी चेतवली जात नाही तोवर अंतरिक प्रक्रिया तेजाळतच नाही निष्ठा जेव्हा तेजाळतात तेव्हा नवा इतिहास घडतो. निष्ठा, श्रध्दा मानवतेचे पंचप्राण आहेत. श्रध्दाशुन्य जीवन तेजस्वी असूच शकत नाही आणि तेजाशिवाय मानवी जीवनाला आणि संस्कृतीला अर्थ उरत नाही. महान व्यक्तींच्या जीवन दर्शनाने हे तेजस्वी कार्य साधते. नवी स्फुर्ती लाभते, नव्या प्रेरणा

---

२. बदलवा बा.सी., प्राच्य सिध्दांत अर्थात भारतीय संस्कृतीचा शोध, पृ.क्र.३३८-३४०.

३. पठाण यू.म., संतसाहित्य चिंतन, पृ. ३५

उत्तेजीत होतात. संस्कृतीला नवे तेज चढते. नव्या तेजाने व नव्या जोमाने नवे महत्कार्य साध्य होते. नवा इतिहास निर्माण होतो. इतिहासाची अनेक प्रकारची स्मारके बनविली जातात.

अन्य स्मारके कालप्रवाहात नष्ट होतात परंतु देश आणि धर्माची नावे दीर्घकाळ टिकतात. ती संस्कृतीची बलवत्तर प्रतिके असतात. आपल्या देशाचे नावही अशाच एका थोर संस्कृतीचे प्रतिक आहे. नावात काय आहे? नावात नामधारकाचे अस्तित्व सामावलेले आहे. तथ्यांचा बोध होण्यास नाव हे प्रमुख साधन म्हणून उपयोगी पडते. जितके महत्व हे व्यक्तिच्या नावाला आहे त्यापेक्षा जास्त महत्व स्थान, देश, राष्ट्र यांच्या नावाला आहे. अशी नावे स्फुर्तीची व चेतनेची उगमस्थाने बनून राहतात. तेच स्फुर्ती व चैतन्याचे प्रेरणास्त्रोत आहेत तेच भावी पिढ्यांना चैतन्य प्रदान करतात. अशा नावांना ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व प्रदान होते तिला उजाळा देत राहणे हे सुसंस्कृतपणाचे एक महत्वाचे लक्षण आहे.

संशोधकही अशाच ऐतिहासिक व सांस्कृतिक मूल्यांना उजाळा देऊन अभ्यासत असतो. भारतामध्ये कलेला भिन्न भिन्न नावाने ओळखले जाते. कारण येथे अनेक वंशाची, भाषेची, गुणधर्माचे लोक राहतात. म्हणून भारतात कला ही वेगवेगळ्या परिसरात वेगवेगळ्या नावांनी ओळखली जाते. जसे मंदिर कलेच्या बाबतीत बोलायचे झाले तर उत्तर भारतात मंदिर बांधकाम शैलीला नागर शैली म्हणतात. मध्य भारतात मिश्रित शैली किंवा वेसर शैली या नावाने ओळखतात. तर दक्षिण भारतात द्रविड शैली म्हणतात म.श्री. माटे म्हणतात, "हिंदुस्थानच्या दक्षिण भागात म्हणजे सामान्यपणे तुंगभद्रा, कृष्णा आणि गोदावरी यांच्या दक्षिणेकडे असणाऱ्या प्रदेशात एका विशिष्ट घाटाची मंदिरे आढळतात."[४]

या विधानावरुन आपणाला भारताच्या काणाकोपऱ्यात असलेले कलेचे वेगळेपण ही लक्षात घेण्यास मदतच होते यावरुन भारतीय कलेचे वेगळेपण एक वैभवास पात्र ठरलेले आहे. यामुळे भारतीय संस्कृतीचा सांस्कृतिक इतिहास हा सोनेरी पान म्हणून वाचला जातो. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये कलेचा मानदंड हा फार मोठा आहे. कॉलिंगवुड म्हणतो,

---

४. माटे म.श्री., प्राचीन भारतीय कला, पृ.१०१

"सौंदर्यात्मक अनुभव किंवा कलात्मक क्रिया हा स्वतःच्या भावनाभिव्यक्तीचा अनुभव असतो आणि भावना जिच्याद्वारे अभिव्यक्त होतात, त्या समग्र कलात्मक क्रियेलाच निष्काळजीपणे भाषा किंवा कला असे संबोधिले जात असते. वस्तुतः खरी कला ती हीच (भावनाभिव्यक्तिचा अनुभव) होय."[५] असे जरी कॉलिंगवुड म्हणत असले तरी अनेक मते ही याबाबतीत उपलब्ध आहेत. कला म्हणजे काय, कला कशाला म्हणावे, कलेचा उद्देश काय असतो, कलेचा निर्मितीकाळ काय आहे, कलेचा उद्गाता कोण असेल, कला कोठे उगम पावली असावी आणि भारतीय संस्कृतीत कलेचे किती प्रकार मांडलेले आहेत या संबंध घटकांचाही आपणाला अभ्यास करावा लागतो. तर कला म्हणजे नेमके काय असेल तर कलेची नेमकी व निर्दोष अशी व्याख्या आपणाला करावी लागते पण म्हणावी तशी एकच व्याख्या कलेला असणे शक्य नाही. सौंदर्यशास्त्रामध्ये कला समिक्षकांनी कलेच्या अनेक व्याख्या सांगितलेल्या दिसून येतात. यामध्ये म. गांधीजी म्हणतात, "खरी कला आत्म्याची अभिव्यक्ती असते आणि तिच्या बाह्य रुपाला माणसाच्या आंतरिक चैतन्याच्या अभिव्यक्तिपर्यंतच मूल्य असते."[६]

तर अशा प्रकारे आपणाला साधारणतः कला म्हणजे काय आहे हे ढोबळ मानाने लक्षात घेता येते. कला एक आत्मा आविष्कार असतो कलेचा उद्देश मानवाला आनंद देणे असतो, कलाही आदिम काळातच निर्माण झाली कारण मानव हा आपल्या मनोरंजनासाठी गुहाचित्रे काढत होता. तेव्हाच कलेचा जन्मझाला असे म्हणावे लागेल आणि कलेचा निर्माता मानवच आहे. जसे चव्हाण उदाजीराव म्हणतात, "आर्यांना आलेल्या सौंदर्यानुभूतीचा अविष्कार, त्यांनी अनेक तऱ्हेने प्रगट केला. काव्य संगीताला बहर आला त्यामधूनच वेदांची निर्मिती झाली. आर्यांच्या भारतातील आगमनापूर्वी ही निग्राईड ऑस्ट्रिक्रक, किरात आणि द्रविड जमाती वास्तव्य करुन होत्या. त्यांचीही एक वेगळी संस्कृती होती. विशेषतः द्रविड संस्कृती आर्यांच्या बरोबरीची होती. किंबहुना काही बाबतीत ती सरसच होती. असे तज्ज्ञांचे मत आहे. या

५. कॉलिंगवुड आर.जी., पूर्वोक्त, पृ.३१५.
६. गोगटे एस तगवाले, मानव्यविद्या व ललित कलांचा परिचय, पृ.१५.

दोन्ही संस्कृतीच्या संयोगातून भारतीय संस्कृती जन्मली. कलेची नवीन परंपरा निर्माण झाली."[७]

कलेचे अनेक प्रकार पडतात पण मुख्य प्रकार हा आपणाला कोरीव मूर्तीशिल्पांचा आहे असे म्हणावे लागते. यातही धातुशिल्प, काष्टशिल्प आणि दगडी शिल्पांचा भेद किंवा फरक हा पाहता येईल. जोशी नि. पु. म्हणतात, "प्रतिमा निर्माण व लिंगाचार्य पध्दतीचा विचार करीत असताना लक्षण ग्रंथकारांनी अनेक माध्यमांची नावे दिली आहेत व त्यांच्या तत्सम भावाचा ही विचार केला आहे."[८] अशा अनेक माध्यमांच्या द्वारे कलेचा जन्म हा होत असतो आणि ती कला चिरकाल टिकावी म्हणून या माध्यमांचा वापर हा आवर्जून केला जातो. कलाही कलावंताच्या भावनांचे प्रगटीकरण असते. ती रंगरेषा ध्वनी म्हणजे आवाज, शब्द यासारख्या माध्यमातूनही साकारली जात असते तिचे प्रगटीकरण म्हणजे कलेचे प्रगटीकरण करण्यात कलाकाराला निर्हेतूक असा आनंद प्राप्त होत असतो. तसेच आस्वादकालाही यापासून आनंद प्राप्त होत असतो म्हणजे गायणाच्या कलेपासून कसा रसिकाला आनंद प्राप्त होतो या सर्व बाबी प्रत्येक कलेच्या अविष्कारात असतातच असे नाही उदा. कलेमध्ये भावना असतात हा नियम सर्वच कलांना लागू पडेल असेही नाही. म्हणून कला हा घटक वादग्रस्त घटकही ठरतो. या संकल्पनेच्या मर्यादा कायमच्या आखून ठेवलेल्या नसतात. तिच्यात आतापर्यंत पुष्कळ बदल झालेले आहेत व पुढेही होणार आहेत. म्हणून तिला खुली 'खुली संकल्पना' (open concept) म्हणता येते. या संकल्पनेच्या खुलेपणामुळेच तर ती वादग्रस्त ठरते.

मानवी जीवनामध्ये कला आणि कारागिरी परस्परपुरक अशी कामगिरी पार पाडत असतात. कलाकाराकडून उत्स्फुर्तपणे निर्माण झालेल्या ओबडधोबड सौंदर्यपूर्ण अभिव्यक्तीला आणखी सुंदर बनविण्यासाठी कारागिरिची खुप मदत होत असते. कवी सुध्दा काव्याच्या रचनेत बसण्यासाठी आपल्या रचनेवर अनेक वेळा संस्कार करीत असतो कला किंवा कारागिरी ही

---

७. चव्हाण उदाजीराव, खजुराहोची मंदिर शिल्पे, पृ.१-२
८. जोशी नी.पु., भारतीय मुर्तिशास्त्र, पृ.२४.

कोणत्याही प्रकारची असो जेव्हा ती आस्वादकासमोर येते तेव्हा ती त्यांच्यापासून दूर आलेली दिसते. निर्मात्याचा हेतू आस्वादकाला माहिती नसतो तरीही त्याच्या आस्वादन प्रक्रियेत फरक हा पडलेला आपणाला जाणवत नसतो.

आस्वादनामध्ये रस हा घटक प्रमुख असतो. प्रा. माढेकर म्हणतात, "भारतीय कला विचारांच्या परंपरेत काव्य व नाट्यच नाही तर चित्र, शिल्प, संगीत यांचाही विचार 'रस' हा मध्यवर्ती मुद्दा आहे. ह्या सिध्दांताच्या भोवती केवळ समिक्षकांची समिक्षाच फिरत राहिली नाही तर कलाकारांनी सुध्दा हा सिध्दांत स्वाभाविकरित्या स्वीकारुन अभिव्यक्त केलेली आहे."[९] कलाकाराने देखील याच घटकाला महत्व दिलेले आहे. या रसास्वादापासून पाहणाऱ्याला आनंद मिळतो. तरीही प्रत्येकाची आस्वादक क्षमता ही वेगळी असते जसे डॉ. गोगटे, तगवाले म्हणतात, "भिंतीवरील चित्र ही कलाकाराची निर्मिती आहे की कारागिराची करामत आहे हे माहित नसतानाही पाहणाऱ्याचे मात्र सारखेच मनोरंजन हे होत असते."[१०] कला आणि कारागिरी हा घटक आस्वादकाच्या दृष्टीने महत्वाचा घटक नसतो मात्र निर्माता आणि समिक्षक यांच्या दृष्टिने त्याला महत्व दिले जाते. हे सत्य नाकारता येत नाही. आपणाला कलेचे वेगवेगळ्या प्रकारांमध्ये सांस्कृतिक अंगामध्ये वर्गीकरण करता येते. कलेचा समाजजीवनाशी किती अतूट संबंध असतो ते आपण पाहिले. त्यामुळे कलेलाल केवळ कलात्मक निकष लावले जात नाहीत तर कलेला बाह्यनिकषही लावले जातात. कलाकार ज्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीतून वाढलेला असतो त्यांचा प्रभाव त्यांच्या कलेच्या आषयावर निश्चितपणे पडल्याशिवाय रहात नाही.

दुसरा घटक अस्वादकही त्याच प्रकारचे असतात तेही एका सामाजिक किंवा सांस्कृतिक परिस्थितीचे अपत्यअसतात. तेही कलेचा आस्वाद घेत असताना सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात कलेचे आकलन, वर्गवारी आणि मूल्यमापन हे करत असलेले दिसून

---

९. माढेकर रा.ब., गोदातटीचे कैलास लेणे, पृ.क्र. १०६-१०७.

१०. गोगटे, तगवाले, पूर्वोक्त, पृ.१६

येतात. यावरुन संस्कृती हा घटक कलेच्या पाठीमागे कशा प्रकारे चिकटलेला आहे हे आपल्या लक्षात घेता येते. तेवढ्याच प्रमाणात आपणाला समाजही कला अभिव्यक्त होण्यासाठी किंवा कला आस्वादनासाठी बहुतांशी कारणीभूत असलेला दिसून येतो.

कलेचा सखोल अभ्यास करावयाचा म्हटल्यावर अनेक अंगानी त्याचा अभ्यास करावा लागतो. म्हणून कलेचे निरनिराळ्या भागात वर्गीकरण करणे गरजेचे आहे. कलेचे घटक पाडताना अभिजात कला, जनप्रिय कला, लोककला आणि भक्तीकला असे करता येते. चिरकाल टिकणाऱ्या अभिजात कला असतात. सर्वसामान्य लोकांची गरज आवड-निवड अभिरुची लक्षात घेऊन निर्माण केलेली कला ही जनप्रिय कला असते. लोकांनी लोकांच्या भाषेत निर्माण केलेली लोकांसाठी असणारी कला म्हणजे लोककला होय आणि जी कला ईश्वराच्या श्रेष्ठ तत्वांच्या किंवा थोर एखाद्या व्यक्तीच्या भक्तीसाठी वापरली जाते तिला भक्तीकला म्हणतात. साधारणतः अशा प्रकारचे वर्गीकरण कलेचे आपणाला करता येते. डॉ.सिंगारे म्हणतात, "भक्तीच्याच माध्यामातून दक्षिण भारतामध्ये राष्ट्रकुट, चालुक्य, पल्लव, चोल, चेर, पांडय, काकतीय, होयसळ, शिलाहार, व यादव हे प्रमुख घराणे झाले. या सर्व राजघराण्यांनी आपल्या हिंदू धर्माची भव्य व दिव्य अशी मंदिर उभारणी मोठ्या प्रमाणात करण्यात पुढाकार घेतला. त्यातून मंदिर उभारण्याचे अनेक प्रकार प्रचलित झाले."[११] एवढेच नव्हे तर डॉ. देव म्हणतात, "प्राचीन वैभव संपदेत शिल्प-स्थापत्याला अनन्यसाधारण महत्व होते. चालुक्य, यादव, राष्ट्रकुट, काकतीय आणि होयसळ नृपतींनी शिल्प स्थापत्य कलेला राजाश्रय देऊन आपल्या उदात्त कलासक्तीचा अविष्कार घडविला होता. त्या नृवतीच्या दिव्य धर्म भक्तीच्या खाना-खुना साऱ्या महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकाच्या विस्तृत प्रदेशात मंदिर स्थापत्याच्या रुपाने ठायीठायी आढळतात."[१२] अशा प्रकारे या तज्ञांच्या लेखनाचा विचार केल्यास जो कलेचा उदय झालेला आहे तो या भक्तीच्याच माध्यमातून झालेला दिसतो. म्हणून

---

११. सिंगारे ए.जी., दक्षिण भारताचा इहितास, पृ.१९६.

१२. देव प्रभाकर, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक अंक, पृ.१०

आपल्या विषयाचा मुख्य घटकच भक्तीकला आहे या विधानाला पुष्टी मिळते. तत्पुर्वी आपण कलेचे वर्गीकरण करु व नंतर विषयाला सविस्तरपणे अभ्यासू.

## १.१ भारतीय कलेचे सांस्कृतिक विभाजन :

भारतीय कलेचा अभ्यास हा आपणाला सांस्कृतिक अंगानेच करणे गरजेचे आहे. कारण संस्कृतीचा आणि कलेचा संबंध हा फारच जवळचा आहे व महत्वपूर्ण आहे. म्हणून संस्कृती म्हणजे काय हे आपण पाहू. पंडित जपेशास्त्री म्हणतात, "'संस्कृती' हा शब्दप्रयोग भारतीय भाषांत व मराठीत शंभर वर्षाच्या अलिकडे येऊ लागला. प्राचीन वाङमयात या अर्थाने हा शब्द वापरलेला आढळत नाही. पाश्चिमात्यांकडून आलेली ही विचार करण्याची नवी दिशा आहे,असे म्हटल्यास वावगे होणार नाही. 'संस्कृती' शब्दाची उत्पत्ती करुन अर्थ केला असता सम उपसर्ग पूर्वक कृ धातू। बनलेले हे रुप आहे. (सम्+स+कृति) या धातूची याचप्रमाणे संस्कार, संस्करण, संस्कृती, तीनही लिंगात रुपे होतात. संस्कार हा शब्द भारतीय वाङमयात रुढ आहे. भारतातील वैदिक समाजात शोडष संस्कार प्रसिध्द आहेत."[१३]

असेच संस्कार हे कलाकारावर ही झालेले असतात आणि कलेचा उद्गमही कलावंताच्या मधूनच होत असतो. संस्कार शब्दाचा अर्थ दोष नष्ट करुन गुण निर्माण करण्याची क्रिया (गोषापाकरण पूर्वक गुणाधानम् संस्कारः) या अर्थाप्रमाणे आधुनिक 'संस्कृती' शब्दाचा अर्थही असाच होतो.

"भारतीय संस्कृतीला वैदिक संस्कृती, आर्य संस्कृती, आर्ष संस्कृती व अलिकडे हिंदू संस्कृती म्हणतात. वैदिक संस्कृती भारतात उत्पन्न झाली व विकास पावली. ह्या संस्कृतीचा उगमकाल निदान पाच हजार वर्षापूर्वीचा आहे. हे इतिहास तज्ञांनीही मान्य केले आहे. व त्याला अनेक पुरावे आहेत. त्या कालात भारत हा देश आज आपण समजतो एवढा नसून अफगाणिस्थान, बांगला देश, नेपाळ, भूतान, ब्रम्हदेश, सिलोन हे प्रदेश मिळून तो भूखंड होता त्याला भारत हे नाव होते. या देशात राहणाऱ्या मानव वंशास आर्यवंश म्हणतात. येथील आद्य

१३. प. जपेशास्त्री रंगनाथ, महाराष्ट्र संस्कृती आणि मराठी भाषा, पृ.२४२.

रहिवासी ऋषी, मुनी, राजे व इतर सर्व समाज आर्यवंशीय होय. आर्यांचे मूळ वसतीस्थान भारतच आहे. त्यांनी येथेच विद्या कलांचा विकास केला."[१४] आर्य आणि अनार्य संस्कृतीतूनच कलेचा जन्म झाला आणि ही कला कलाकाराच्या संवेदनेतूनच निर्माण झालेली आपणाला समजते. कलाकारावर या संस्कृतीची छाप किंवा प्रभाव पडलेला दिसतो. कलाकार हा वेगवेगळ्या संस्कृतीत जन्माला येत असतो. त्याला कोणतेच बंधन नसते मग त्याच्यावर आपली संस्कृती ही कशी का असेना मात्र तिचा प्रभाव हा खोलवर त्याच्या बालमनावरच पडलेला असतो व हाच प्रभाव त्याच्या कलेत अविष्कृत होत असतो. कोणतीही कला असो ती निर्माण होण्यामागे त्या कलाकारांची बौध्दिक क्रिया किंवा बौध्दिक पातळी ही नेहमीच कार्यरत असते.

भारतामध्ये अनेक प्रकारच्या कलांचा जन्म झाला. त्या चांगल्या प्रकारे वाढल्या आणि बहरास आल्या त्या कलांना प्राचीन असेल किंवा मध्ययुगीन भारतीय राजघराण्यांनी चांगल्या प्रकारे आश्रय दिलेला आपणाला दिसून येतो. "चंद्रगुप्त मौर्याचा नातू अशोक याने बौध्दधर्माचा स्वीकार करुन त्या धर्माच्या प्रसाराला हर प्रकारचे सहाय्यही केले. त्याच्या आश्रयाने या धर्मपंथीयाच्या हर तऱ्हेच्या वास्तु उभ्या राहिल्या."[१५] सम्राट अशोकाचे साम्राज्य हे त्याच्या काळातील भारतीय उपखंडातील सर्वात मोठे साम्राज्य होते. याच्या कालखंडात मोठ्या प्रमाणात कला व स्थापत्याची निर्मिती झाली. प्रा.डॉ. मोरवंचीकर म्हणतात, "कुशाण राजा कनिष्क बांधकामप्रेमी होता. आपल्या आयुष्यात त्याने अनेक स्तुप व विहार बांधले. पेशावर येथे ४०० फूट उंचीचा १३ मजली भव्य असा लाकडी स्तूप त्याने उभारला होता. पुढे अनेक शतके हा स्तूप अस्तित्वात होता. हर्षवर्धनाच्या काळात आलेल्या ह्यु-एन-त्संग या चीनी प्रवाशाने या स्तूपाचे मोठे वर्णन केले आहे. हा स्तूप पाहून त्याला आश्चर्य वाटले. कनिष्काच्या कालखंडात गांधार कलेला स्थैर्य प्राप्त झाले. ग्रीक व भारतीय कलांच्या संगमातून गांधार कला

---

१४. तत्रैव, पृ. २४३.

१५. बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, पृ.३८

उदयास आली होती.[१६] अशा प्रकारे कलेला मौर्य, कुशाण, गुप्त, सातवाहण, वाकटक, वर्धन, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव व मध्ययुगातील सुलतानशाही आणि मोगलांनीही कलेला सुंदर साज हा चढवला होता. यामुळे यांच्या स्मृती आज आजरामर झालेल्या दिसून येतात. राजाश्रयामुळे चांगल्या प्रकारे कलेला उत्तेजन मिळत गेले हजारो कलावंत या राजेलोकांच्या आश्रयाखाली काम करत असत. याचा परिणाम असा झाला की कलाकारांच्या कलांना चांगल्या प्रकारे वाव हा मिळत गेला. आणि जेव्हा कलेला वाव मिळत असतो तेव्हाच कलेच्या क्षेत्रात प्रगती ही होत असते.

सांस्कृतिक क्षेत्रासारखा कलेवर धर्माचाही प्रभाव पडला. डॉ. काटे म्हणतात, "धर्मामध्ये हिंदू, जैन, बौध्द या सर्वधर्माचा प्रभाव कलाकृतीवर झालेला आढळतो. या कलाकृतीमध्ये शिल्पे, वास्तु आणि चित्रकलेचा समावेश आढळतो. त्यापैकी शिल्पे आणि चित्रकला हे प्रकार अनेक ठिकाणी निदर्शनास येतात."[१७] भारताच्या कानाकोपऱ्यात या वरील तीन धर्माचा विशेष म्हणजे कलेच्या क्षेत्रामध्ये चांगला पगडा असलेला दिसतो. कलेचा विकास करण्यासाठी किंवा कलेला वाव देण्यासाठी धर्मकारणही तेवढेच पुढे सरसावलेले दिसून येते. यामुळे धर्माचाही चांगला अभ्यास हा संशोधकास होतो. बहुतांशी धर्मकारण हा घटक जरी कला निर्माण करण्यास कारणीभूत असला तरी भारतात अनेक दाखले असे मिळतात की, राजे ज्या धर्माचे आहेत त्यांनी त्याच धर्माला सोडून इतर धर्मालाही राजाश्रय दिलेला दिसतो.

डिसकळकर म्हणतात, "इ.सनाच्या सहाव्या शतकापासून कर्नाटकात कदंब व बदामीच्या चालुक्यांच्या काळात जैन धर्माचा प्रसार होऊ लागला होता. कदंब व चालुक्य राजे वैदिक धर्मानुयायी होते. परंतु त्यांनी जैन धर्माला आश्रय दिला होता. त्यांचे काही अधिकारी तर जैन धर्मीय होते. बदामीचा राजा पुलकेशी दुसरा याच्या 'रावकीर्ती' नावाच्या अधिकाऱ्याने 'तेहील' येथे सुंदर जैन मंदिर बांधले व त्याची सुंदर प्रशस्तीही त्यानेच रचिली महाराष्ट्र हा

---

१६. मोरवंचीकर, व्यास पी.सी., भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत) पृ.३१३
१७. काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, पृ.२०५

त्याच्या साम्राज्याचा भाग होता. तेव्हा त्याच वेळी जैन धर्माचाही प्रसार होऊ लागला. त्यावेळी महाराष्ट्रात कऱ्हाड भागात 'सामंतभद्र' नावाचा एक जैन महापंडित होता. त्या भागात पुढे जैनांच्या यापनीय संघाची स्थापना झाली."[१८] अशा तऱ्हेने अनेक वैदिक राजघराण्यांनी इतर धर्मातील समाजास राजाश्रय दिलेला दिसतो. पुढच्या उदाहरणात डिसकळकर म्हणतात, "राष्ट्रकुट सम्राट दंतीदुर्गाने वेरुळ लेण्यात 'इंद्रसभा' हे जैनांचे अतिसुंदर लेणे कोरविले. राष्ट्रकुट सम्राट अमोघवर्ष पहिला हा तर जैन धर्मीयच झाला होता."[१९] म्हणून कलेला काही सीमा नसतात. कलाही समाजाच्या अनेक अंगाना शिवत असते तरीही आपण कलेचे सांस्कृतिक वर्गीकरण ढोबळमानाने पुढील प्रमाणे करुया.

### १.१.१ अभिजात कला

चिरकाल टिकणाऱ्या कला, काळाच्या ओघात त्यांच्या स्वरुपात बदल न होणाऱ्या, नियमबध्दतेत सौंदर्यनिर्मिती होणाऱ्या शास्त्रशुध्द कलांना अभिजात कला म्हणता येईल. या कलेत मुख्यतः शास्त्रीय संगीत, शास्त्रीय नृत्य यांचा समावेश होतो. या कलेला देखील तत्कालीन राजेलोकांनी राजाश्रय दिलेला दिसून येतो. प्रा. अंजली मालकर म्हणतात, "मुख्यत्वे सातवाहन, राष्ट्रकुट आणि चालुक्य या राज्यकर्त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दित मराठवाड्याच्या सांगितीक चळवळीची पायाभरणी केली. निलंगा, धर्मापुरी, औंढा नागनाथ, होट्टल येथील देवालयांवरील वाद्य मंडीत सुरसुंदरी समाजात संगीताला असलेल्या प्रतिष्ठेचे दृश्य रुपाने चित्रीत केलेली उदाहरणे आहेत. देवालयांच्या रंगभोगासाठी नियुक्त केलेल्या गायक, वादक आणि नर्तक यांच्या उदरनिर्वाहाची आणि क्षेमकल्याणाची संपूर्ण जबाबदारी हे राजे घेत असत. अनेक दाखले शिलालेखांमधून आपल्याला पहावयास मिळतात."[२०]

यावरुन कलेमध्ये किंवा कोरीवकामामध्ये देखील अभिजात कलेला स्थान दिलेले समजते. अभिजात कला या काहीशा शास्त्र आणि तंत्राच्या सहाय्याने शिस्तबध्द व नियमबाह्य

---

१८. डिसकळकर द.बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, पृ.९९.

१९. तत्रैव, पृ.९९

२०. मालकर अंजली, संगीत साधना, पृ.१४३.

रितीने सादर केल्या जातात. अशा कलांमध्ये गुरुपरंपरा, संप्रदाय, घराणे यांना विशेष महत्व असते. संगीतात किराणा, आग्रा इत्यादी घराणे प्रसिध्द दिसतात. चित्रकलेत मोगल शैली, राजपुत शैली, राजस्थानी शैली व या शैलीशी संबंधीत संप्रदाय आहेत. नृत्यात कथ्थक, कथकली, भरतनाट्यम, कुचिपुडी, ओडीसी, मणिपुरी, मोहिनी अट्टम असे प्रकार आहेत. गोडीच्या किंवा अभिरुचीच्या दृष्टीने उच्च समजल्या जाणाऱ्या कलेचा आस्वादक हा जाणकार समजदार असावा लागतो. कलेच्या ज्ञानाबरोबर त्यात असणारी सुक्ष्मतेची जाण त्याच्याकडे असली पाहिजे. अभिजात कला प्रकारात कलेचे शास्त्र करुन आस्वाद घेतला जातो. अभिजात कलेतून अनेक उपशास्त्रीय कलांची निर्मिती होते.

कलेला 'अभिजात' हा शब्द काहीवेळा 'जातीवंत' 'अस्सल' या अर्थाने वापरला जातो. या अर्थाने अभिजातकला ही कलाकाराने आपल्या प्रतिभेसी प्रामाणिक राहून केलेली निर्मिती असते. त्या लोकांना किंवा लौकिकाला काय रुचते आणि पचते यांच्याकडे दुर्लक्ष केलेले दिसते.

अभिजात कलेमध्ये ज्या राजांचा उदा. चित्रकलेत मोगल शैली, राजपुत शैली, राजस्थानी शैली, या शैलीचा ज्या प्रकारे अभ्यास केला जातो व अभिजात कलेला वैभवसंपन्न करण्याचा प्रयत्न केला जात असतो. त्याच प्रमाणे "शिल्पकलेमध्ये भारतात पल्लव शैली चार भागात विभागली जाते. त्यामध्ये महेंद्र शैली, नरसिंहवर्मनची शैली, राजसिंह शैली, अपराजित शैली इ. चा पल्लव शैलीत अभ्यास केला जात असतो"[२१] यामध्ये अभिजात कलेप्रमाणे शिल्पकलाही महत्वपूर्ण मानली जाते. हे सत्य नाकारता येत नाही.

### १.१.२ जनप्रिय कला

जनप्रिय कलेमागे मात्र किंवा तिच्या निर्मितीमागे मात्र कलाकाराचा मुख्य उद्देश हा लोकांना काय आवडते, रुचते किंवा तेच पुरवणे हा दृष्टिकोन असतो. सर्वसामान्य लोकांची गरज, आवड-निवड, अभिरुची लक्षात घेऊन निर्मिलेली कला म्हणजे जनप्रिय कला होय.

---

२१. मोरवंचीकर, व्यास पी.सी., पूर्वोक्त, पृ.४३२.

आज आपण पहात असतो की, तमाशा, वगनाट्य, सिनेसंगीत, कथाकथन अशा कला ढोबळमानाने जनप्रिय स्वरुपात सादर होतात. या कलेचा आस्वादक वर्ग संख्येने फार मोठ्या प्रमाणात असतो. या कलेतील भाषा साधी सरळ सोपी असते. कलेचा विषय हा अवघड नसून समाजातील लहानमोठ्या प्रसंगावर आधारीत कला सादर केली जात असते. उपहास, व्यंग, विनोदांनी गजबजलेली भाषाशैली त्यामध्ये प्रदर्शीत होत असते.

जनप्रियकला ही लोकांच्या प्रतिसादाने दिलखुलास प्रेरणेने अधिक खुलत जाणारी कला आहे. मानव या कलेत स्वतःला झोकून देतो. आठवले सदाशिव म्हणतात, "सुसंस्कृत मानवाच्या जीवनात साहित्य आणि कला यांचे स्थान आता इतके पक्के आहे की, त्यांची जरुरीच काय असा प्रश्न उपस्थित करणे कुणालाही पटणार नाही. समाजाला त्या गोष्टी हव्या आहेत त्याच्याशिवाय आपले निभणार नाही असे समाजाला वाटते हीच त्यांची उपयुक्तता."[२२] मानव प्राणी यामध्ये एवढा एकाग्र होतो की, कलेसाठी कला आहे की मानवासाठी कला आहे की कलेसाठी मानव असे भेद सर्व विसरुन जातो. या कलेत मानवी मूल्यांचा विचार हा अभावानेच येतो. बदलत्या फॅशन प्रमाणे नवनवे कलाअविष्कार यामध्ये रंगवले जातात. यामध्ये आस्वादकाच्या मनातील कल्पना, भावना, सुप्त वासना व स्वप्नांची पूर्ती व्हावी अशी अपेक्षा या कलेतून आस्वादकाची असते.

गुप्त काळातही ही कला महत्वपूर्ण मानली जाते. डॉ. मोरवंचीकर म्हणतात, "गुप्तकालीन साहित्या व्यतिरिक्त शिलालेख व नाण्यांवरुन कला ही लोकप्रिय होती हे स्पष्ट होते. समुद्रगुप्ताचे विणाधारी नाणे हेच दर्शविते. मनोरंजनासाठी म्हणूनही संगीताचा उपयोग केला जाई."[२३] जनप्रिय कलेत ग्रामीण कला, दलित कला, भक्तीकला याच बरोबर परंपरागत लोककलांचाही अंतर्भाव होतो. या सर्वच प्रकारांचा येथे विचार करता येणार नाही. म्हणून लोककला व भक्तीकला यांचा थोड्याशा तपशीलाने आपण विचार करुयात.

---

२२. आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, पृ.१६०

२३. मोरवंचीकर, व्यास पी.सी., पूर्वोक्त, पृ.४०२

## १.१.३ लोककला

लोकांच्या 'भाषेत' 'लोकांनी' निर्माण केलेली कला, लोकांसाठी असणारी कला म्हणजेच लोककला होय. या ग्रामीण अविकसीत भागात निर्माण झालेल्या कला होत. यात चित्रकला, साहित्य, नृत्य आणि संगीत या कलांचा समावेश होतो. लोककलेचा निर्माता कोणी एक व्यक्ती नसून अनेकांच्या तोंडून ती चालत आलेली कला आहे. आहेर सोमनाथ म्हणतात, "दृष्ट लागावी असे या महाराष्ट्रातील गोदातटीच्या साम्राज्याच्या मुकुटात थोर संत महात्म्यांबरोबरच मराठमोळ्या विविध लोककलांच्या उत्पत्तीचा मागोवा घेतला असता बहुधा असे दिसून येते की, या लोककला अनादि कालापासून समाजात प्रचलित असाव्यात या कला सर्व समाजाच्या एक अभिन्न अंग होत्या. ऋणीचे कूळ व नदीचे मूळ विचारु नये म्हणतात तशातीलच गत लोककलांच्या बाबतीत आहे. प्रत्येक लोककलेला कमी अधिक प्रमाणात हजारो वर्षाची परंपरा तर नक्कीच आहे."[२४]

अशा प्रकारच्या कला या वैयक्तिकतेपेक्षा समुहाकडून त्या सादर केल्या जातात आणि आस्वादल्या जातात. या कलांचा अभ्यास हा प्रामुख्याने लोकसाहित्यात केला जातो. मार्डीकर म्हणतात, "इस्लाममध्ये संगीत, नृत्य आणि चित्रकला यांना त्याज्य ठरविण्यात आले असले तरी इस्लामशासीत प्रदेशातून या लोककला लुप्त होऊ शकल्या नाहीत. कारण मानवी भावना कलात्मकरित्या व्यक्त करण्यासाठी या कलांची फार मदत होते. अंतःकरणाच्या खोल गाभाऱ्यात दडलेल्या निरनिराळ्या भावना व्यक्तकरण्यासाठी कुणी शब्दांना संगीतबध्द करतात कुणी तालबध्द नृत्यातून अंगविक्षेप व चेहऱ्यावरील हावबावाचाही आधार घेतात."[२५] मौखिक परंपरेने चालत आलेली गीते, नृत्येही काहीसा बदल करुन पुढच्या पिढीत चालत जातात यात लिखीत स्वरुपातले साहित्य फारसे नसते. या कलेतून निसर्ग प्रेम, श्रध्दाळू मन, नातेसंबंध यांचे चित्रण दिसून येते. या कला, रुढी, परंपरा, धार्मिक सण, उत्सव यांच्याशी निगडीत किंवा

---

२४. आहेर सोमनाथ, गोदातटीची लोककला, पृ.९१.

२५. मार्डीकर एम.एम., भारताचा इतिहास (इ.स. ६५०-१५५०), पृ. ३१८

संबंधीत असतात, खडतर, कष्टमय जीवनात विरंगुळा हवा म्हणून त्या सादर केल्या जातात. या कलांची निर्मिती अशी किंवा अस्वाद पण जीवन पध्दतीचा एक भाग म्हणून याकडे पाहिले जात असते.

याविषयी आहेर सोमनाथ पुन्हा म्हणतात, "लोककलेविषयी आस्था व जाण असणारे थोर अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे व नाटककार, गीतकार अशोकजी परांजपे या जोडीने आपले सर्व आयुष्य खर्ची घातले आहे. डॉ. मांडे यांनी लोककला आणि कलावंत यांना शोधून शब्दरुपाने ऐतिहासिक ग्रंथ जन्माला घातले आहेत. तर अशोकजी परांजपे यांनी आपल्या या अस्सल बावनकशी सोनं असलेल्या लोककलेला परदेशात नेऊन आपल्या देशाची मान ताठ केली आहे. गोदातटीचे राजाराम बापू गोंधळी यांना परदेशात कला सादर करण्याची संधी परांजपेनीच दिली होती. संशोधक हे संशोधन करावयास कमी पडतील परंतु लोककलेचा व लोककलावंताचा अभ्यास पूर्ण होणार नाही एवढी लोककला गोदातट व महाराष्ट्राच्या नसानसांत भिनलेली आहे."[२६] यावरुन लोककलेचा संबंध हा मानवी मनाच्या कितीतरी जवळचा आहे.

आपल्या समाजाचे प्रतिबिंब हे देखील लोककलेत उमटत असते. घराच्या भिंतीवर देवळांच्या भितीवर काहीशा भडक आणि जोरदार रेशांचा वापर करुन चित्रे काढली जातात. तसेच तमाशा, लावणी, पोवाडा, सोंगी, भारुड, जागरण, गोंधळ, वासुदेव, रामलीला, दशावतार, दिंडी, वाघ्यामुरळी, लेजीम, उखाणे, लग्नप्रसंगी म्हटली जाणारी गाणी, जात्यावरीललोकगीते, मोटेवरील गाणे, असे कितीतरी लोकगीतांचे लोकसंगीतांचे, लोकनृत्यांचे, प्रकार या लोककलेत समाविष्ठ होतात. पण आता शहरीकरणाच्या आणि जागतीकरणाच्या प्रभावामुळे लोककलांचे मुळ स्वरुप हळूहळू लोप पावत चालले आहे. आधुनिक काळाच्या प्रभावामुळे लोककलांना मनोरंजनात म्हणावे तेवढे स्थान दिले जात नाही.

---

२६. आहेर सोमनाथ, पूर्वोक्त, पृ.९९

त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे लोककलेतील कलावंत लूप्त होत चालला आहे. त्यामुळे लोककला देखील नामशेष होत आहेत.

भारतीय कलेच्या सांस्कृतिक विभाजनात किंवा वर्गीकरणामध्ये आपल्या विषयाला अनुसरुन अत्यंत निकटचा व जवळचा असा घटक म्हणजे भक्तीकला होय. भक्तीमुळे कला ही कशी मोठ्या प्रमाणात उदय पावली याचा अभ्यास आपण पुढीलप्रमाणे करुयात.

### १.१.४ भक्तीकला

भक्तीकलेलाही एका कलेचे स्वरुप दिलेले आपल्या लक्षात येते जी कला ईश्वराच्या श्रेष्ठ तत्वाच्या किंवा एखाद्या थोर व्यक्तिच्या भक्तीसाठी वापरली जाते तिला भक्तिकला म्हणतात. अरुनचंद्र पाठक म्हणतात, "त्या काळातील धार्मिक अवस्थेमध्ये वेगवेगळ्या देवतांच्या पुजनाला फार महत्वाचे स्थान होते. पुराणामध्ये गौरव केलेल्या बहुतेक सर्व देवता लोकांमध्ये प्रिय झाल्या होत्या. भिन्न-भिन्न राजवंशाच्या कोरीव लेखांमध्ये आलेल्या निरनिराळ्या देवतांच्या उल्लेखावरुन असे दिसते की, या काळातील प्रमुख देवता विष्णू व शिव यांच्यापैकी शिवाच्या वेगवेगळ्या रुपांची पुजा फार प्रिय होती. मूर्तिपुजा पध्दतीमुळे निरनिराळ्या देवतेसाठी देवालये बांधण्यास प्रारंभ झाला. कालांतराने देवालये ही या काळात अस्तित्वात असलेल्या धार्मिक व्यवस्थेचा अविभाज्य अंग बनली. जरी बौध्द आणि जैन धर्मियांचा देवाच्या अस्तित्वावर विश्वास नसला तरी त्यांना अनुक्रमे बुध्द व तीर्थंकर यांचे पुजन व प्रार्थना करण्याकरिता सार्वजनिक पुजास्थानाची गरज भासू लागली. त्यामुळे त्यांनीही विहार, चैत्यालये आणि जिनालये बांधावयास प्रारंभ केला."[२७]

अशा पध्दतीने प्राचीन काळात धार्मिक आवड बळावत गेलेली दिसते. जैन असो, हिंदू असो की, बौध्द प्रत्येकाला आपली धार्मिक भूक भागवण्यासाठी श्रध्दास्थाने निर्माण करावी लागली अशा या श्रध्दा स्थानांमधूनच भक्तिकला ही विकास पावली. मार्डीकर म्हणतात,

---

२७. पाठक अरुणचंद्र (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड-१), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, पृ.६७९.

"भक्ती म्हणजे कोणतीही आपेक्षा न बाळगता ईश्वराप्रती समर्पित होणे होय."[२८] भक्ती कला ही इतर कलांहून वेगळी ठरते. कारण या कलेमध्ये ईश्वरावर तो कलावंत निष्काम असे प्रेम करतो. कर्म करत राहतो पण फळाची अपेक्षा न करताच. म्हणून भक्तीकला ही इतर कलेपेक्षा वेगळी ठरते. अशी ही कला प्राचीन काळातच भारतामध्ये विकास पावलेली दिसून येते. दक्षिण भारतातच प्रामुख्याने तामिळनाडूत अलवार आणि नयनाय यांच्या माध्यमातून या कलेचा जास्त विकास झाला. परंतु यांच्याही पूर्वीपासूनच कलावंत हा कला निर्माण करत होता.

आर्यांनी अल्वारांचा स्वीकार केला आणि द्रवीडांनी नयनारांचा स्वीकार केला. भक्तीबरोबर या कलेत आत्माविष्कार, ज्ञानप्रसार आणि प्रबोधन याही गोष्टींचा समावेश असतो. भक्तीकला या अतिप्राचीन काळापासून धर्माशी निगडीत राहिलेल्या कला आहेत. धर्माच्या आश्रयातच या विकसीत झाल्या. जसे की सम्राट अशोकाने इ.स.पू. २६१ ला कलिंग युध्दानंतर जगामध्ये शांतता नांदावी हा उद्देश समोर ठेऊन पुढे त्याने "बौध्द भिक्खू उपगुप्त यांच्याकडून बौध्द धर्माची दीक्षा घेतली. यानंतर सम्राट अशोकाने बौध्द धर्माच्या प्रसाराचे आणि विकासाचे काम हाती घेतले."[२९] सम्राट अशोकाने आपल्या धर्माच्या तत्वांचे मनन व चिंतन घडवून आणण्यासाठी पावसाळ्यातील निवासाची सोय होण्यासाठी गावापासून दूर अंतरावर असलेल्या मोठ मोठ्या डोंगरात लेणी खोदविण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे "बौध्द भिक्खू आणि भिक्खूणींना पावसाळ्यात राहण्यासाठी डोंगरात लेणी खोदविण्यात आल्या."[३०]

अशा लेण्यांपासून या भिक्खूंचे मोठे संरक्षण होऊ लागले. यामध्ये ते लोक आपल्या ईश्वराप्रती भक्तिभावाने स्वतःला समर्पित करु लागले. यामध्ये भक्ती हा घटक किती महत्वाचा दिसतो. भक्तीसाठीच अशा प्रकारची स्मारके निर्माण झाली. बरुआ म्हणतात, "अशा लोण्यांनाच पुढे विहार ही संज्ञा प्राप्त झाली."[३१] विहारात अर्थात लेणीत तिनही बाजुने भिंतीत

२८. मार्डीकर एम.एम., पूर्वोक्त, पृ.२९१
२९. Smith V.A., Rulers of India, Asoka, pp.40-41.
३०. Wauchope R.S., Buddhist Cave Temples of India, p.21.
३१. Barua D.K., Vihars in Anciant India, p.12.

बौध्द भिक्खू व भिक्खूणींच्या वास्तव्यासाठी लहान-लाहन खोल्या खोदलेल्या असत. विहाराच्या मध्यभागी सभागृह असे. कालांतराने विहाराच्या बरोबरच प्रार्थनागृहे खोदण्यात आली. या पार्थनागृहात खडकात कोरलेले स्तूप आढळतात. या संबंध घटकांमुळे भिक्खूंची भक्तीकला विकसीत होण्यास मदत झाली. भक्तीकलेचे उद्दिष्ट म्हणजे ईश्वराची स्तुती करणे, त्याला संतुष्ट करणे, त्याच्या कथा ग्रंथित करणे या कलाकाराचा कला निर्मिती हा दुय्यम घटक असतो.

मंदिर, मठ, आश्रम अशा ठिकाणी त्याने स्वतःला वाहून घेतलेले असते. हिंदू कलाप्रमाणेच, जैनकला, बौध्दकला यांच्या निर्मितीकडे पाहिल्यास याची प्रचिती येते. साधकाला किंवा कलाकाराला आपली निर्मिती ईश्वरचरणी किंवा उपासनेचा भाग म्हणून अर्पण करावयाची असते. त्यातून त्याला पैसा, प्रसिध्दी अशा लौकिक गोष्टींची गरज नसते. यामध्ये ज्या कलांचा समावेश होतो त्यांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे -

### १.१.४.१ शिल्पकला

"शिल्पकला" ही चिरकाल टिकावी म्हणून निर्माण केलेली कला आहे. भूवनेश्वर मंदिर, दक्षिण भारतातील मीनाक्षी मंदिराप्रमाणे अनेक मोठी मंदिरे त्यातील असंख्य लहान-मोठ्या मुर्त्या आणि गोपुरे, अजिंठा, वेरुळच्या लेण्या, बुध्द गुंफा, विहार, स्तंभ याप्रमाणे जैन ख्रिश्चन इत्यादी धर्मियांची शिल्पकला ही जगातील शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिध्द आहेत.

### १.१.४.२ चित्रकला

वरील सर्व ठिकाणी शिल्पाबरोबरच चित्राचीही निर्मिती केली आहे. त्यातून महापुरुषांची चरित्र्ये, पुराणकथेतील प्रसंग, ईश्वराचे आवतार, देवदेवतांची चित्रे, भक्ती भावनेचा प्रसार व्हावा या उद्देशाने त्यांची निर्मिती होते. देव शा.भा. म्हणतात, "भारतात चित्रकलेचा पुरावा फारसा उपलब्ध नाही. अलिकडे मध्यप्रदेशात भीमबेतका या ठिकाणी मध्याश्मयुगीन चित्रकलेचे नमुने सापडले आहेत. नवाश्मयुगीन कला प्रकारात प्रामुख्याने बैलांच्या मृण्मयमुर्ती सापडतात. नवाश्मयुगीन कला प्रकारात प्रामुख्याने बैलांच्या मृण्मयमुर्ती

सापडतात. नवाश्मयुगीन प्रस्तरचित्रकलेचे काही नमुने आंध्र प्रदेश व केरळ मध्ये उपलब्ध झाले आहेत. आंध्र मधील ग्रॅनाईट खडकावर रंगविलेली चित्रे लाल रंगातील आहेत. यांचा काळ इ.स.पू. २००० इतका आहे. व तो युरोप व पश्चिम आशियापेक्षा कमी प्राचीन हे उघड आहे."[३२] ही चित्रकला जरी प्राचीन असेल तर इतिहास काळामध्ये देखील अनेक मंदिरांवर लेण्यांवर चित्रकला अलिकडे मोठ्या प्रमाणात कोरली गेलेली आहे हे तेवढेच सत्य आहे आणि भक्तीकलेतून ती कोरली आहे.

### १.१.४.३ संगीत

संगीत किंवा नृत्य हा घटकही भक्तीकलेच्याच दालनात मोडणारा घटक आहे. अनेक ठिकाणच्या मंदिरातून नृत्यकला जोपासली गेली आहे. भजन, कीर्तन इत्यादी प्रकार भक्तीकलेचेच आहेत.

### १.१.४.४ साहित्य

ज्ञानेश्वरांच्या ओव्या, नामदेवांची पदे, एकनाथांची भारुडे, तुकारामांचे अभंग, मिराबाईची भजने, कबीराचे दोहे, तसेच तुलसीदास, सुरदास, नानक, पुरंदरदास, त्यागराज, नयनार, आलवार, चैतन्यप्रभू, जनाबाई, मुक्ताबाई यांच्या भक्तीसाहित्याची मौल्यवान परंपरा भारतात आहे. वरील अनेक कलांचा समावेश आपणाला भक्ती कलेत करता येतो.

## १.२ शिल्पकला : रचना व वाटचाल

शिल्प हा घटक इतिहासात संस्कृती दर्शन घडवितो. शिल्प म्हणजे एखाद्या घन द्रव्याला दिलेला घन अभासात्मक आकार होय. त्याची लांबी रुंदी, उंची याचाही अभ्यास करुन विशिष्ट दगडावर प्रक्रिया ही केली जाते. घन अभास याचा अर्थ शिल्पकाराने माती, धातू किंवा काष्ठाच्या द्रव्यातून निर्माण केलेला दृश्यानुभव असतो. शिल्प म्हणजे वास्तवाचा अभास करणारे प्रतिमाण असते. शिल्प हे सर्व बाजूंनी फिरुन, स्पर्श करुन, जवळ लांब उभे राहून पाहता येते. हे सर्वांगिण दर्शन हा शिल्पानुभवाचा खास विशेष म्हणावा लागेल. शिल्पकारही

---

३२. देव शा.भा., पुरातत्वविद्या, पृ.११८-१२०

म्हणजेच कलाकारही शिल्प घडविताना स्पर्शाने नजरेने, छाया भेदातून समजणाऱ्या उठावाच्या दर्शनाने, वेगवेगळया दिशांनी, अनेक मितींनी हा दृश्यानुभव शिल्पबध्द करीत असतो.

डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "शिल्प स्थापत्यकला ही प्राचीन भारतीय कलांपैकी सर्वात प्रभावीपणे अविष्कारीत होणारी कला होय. प्राचीन भारतीय वाङमयातून ६४ कलांचा उल्लेख असला तरी कलाकाराच्या प्रतिभेचा अप्रतिम अविष्कार घडलेला आढळतो. तो मात्र शिल्प स्थापत्य रुपात. दगडासारखे चिरस्थायी माध्यम या कलाअविष्कारासाठी वापरले गेले असल्यामुळे या कलावैभवाचा वारसा सातत्याने टिकून राहिला आणि कला अवशेषांच्या रुपाने तो आपल्यापर्यंत येऊन पोहचला. इ.स.पू. तिसऱ्या शतकात सुरु झालेली ही कला अविष्काराची परंपरा इ.स. १४ व्या शतकापर्यंत सातत्याने सुरु राहिली. दीड हजार वर्षांच्या या कला साधनेतून असंख्य अनामिक कलाकारांची कलास्वप्ने साकारली."[३३] यामुळे त्यांच्या भावना शिल्पाद्वारे या आपणापर्यंत पोहचू शकल्या. शिल्पकलेचा हा प्राचीन अविष्कार खरोखरच त्या कलाकाराचे प्रतिबिंबच म्हणावा लागेल.

भांडवलकर म्हणतात, "शिल्पकलेत वास्तुकला, मुर्तिकला व चित्रकलेचा समावेश होतो. ब्राम्हण ग्रंथात शिल्प हा शब्द कला, अद्भूत कृत्य, कौशल्य, कारागिरी व कलाकृती इ. अशा विविध अर्थाने वापरला आहे."[३४] शिल्प हे एक इतिहासाचे साधन म्हणूनही अभ्यासले जात असते कारण ते गतकाळात किंवा त्या-त्या भूतकाळाचा इतिहास दर्शवित असते. शिल्पकलेची माध्यमे मग कोणत्या प्रकारची असतात याचा अभ्यास आता आपण पुढे करुया.

### १.२.१ शिल्पकलेची माध्यमे

शिल्प घडविताना सामान्यतः मातीचा नमुना प्रथमच घडविला जात असतो किंवा लोखंडाच्या सांगाड्यावर माती किंवा अन्य द्रव्य थापून आकार निर्मिती ही केली जाते. साच्याच्या सहाय्याने ही लहान मोठी शिल्पे घडविली जातात. शिल्पकार साध्यासुध्या

---

३३. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, पृ.१०८.
३४. भाडंवलकर हनवते, मराठवाड्याचा इतिहास, पृ.१८०.

ठोकळ्यांना घनाकार देऊन त्रिमित रुप देतो. त्याला मॉडेलिंग (शिल्प) म्हणतात. दगडाला किंवा लाकडाला छिलून तयार करण्याच्या पध्दतीला उणे पध्दती असे म्हणतात. तर माती प्लॅस्टर यांच्यासारख्या मऊ माध्यमातून एकावर एक थर चिकटवून आकार निर्मिती करतात त्याला अधिक पध्दती म्हणतात.

मातीपासून छोटी शिल्पे व खेळणी केली जातात. लाकडाचा स्वाभाविक पोत व अंगभूत रेषात्मक वळणे याचा योग्य वापर करुन प्रमाणबध्द व रेखीव काष्ठ शिल्प केले जाते. या माध्यमात पाषाणापेक्षा अधिक उठावदार व नाजूक काम करता येते. काष्ठाच्या तूलनेत पाषाण अधिक कणखर असते. पाषाणाच्या पोताचा कठीणपणा व मऊपणा याचा शिल्पाच्या पोताशी संबंध असतो. संगमरवर, रेती मिश्रीत पाषाण, ग्रॅनाईट अशा दगडांच्या पोतानुसार शिल्पाकृती निर्माण होत असतात.

गोगटे/तगवाले म्हणतात, "भारतामध्ये ताजमहल हे संगमरवरी शिल्पाचे, मथुरेच्या गांधार कलेतील बौध्द मूर्ती ही तांबूस रेतीयुक्त पाषाण शिल्पाचे, आणि कठीण पाषाणाचे वेरुळचे कैलास लेणे ही पाषाणाच्या पोताची विविधता असलेली शिल्पे आढळतात."[३५] माती, काष्ठ, पाषाण या यांच्याप्रमाणेच तांबे, पितळ, कासे, ॲल्युमिनीयम, ब्रॉंझ या धातूंचाही शिल्प निर्मितीत वापर हा केला जात असतो. धातूत ओत काम करुन अशी शिल्पे तयार केली जातात. मोहेंजोंदडो येथील इ.स.पू. ३००० वर्षांची ब्रॉंझ घातूत घडविलेली नर्तकिची मुर्ती हे अशा प्रकारच्या शिल्पाचे प्राचीन उदाहरण आहे.

### १.२.२ शिल्पांचे प्रकार

माध्यमानुसार शिल्पाचे पुढील प्रकार पडतात. (अ) "प्लॅस्टर शिल्प" प्लास्टर ऑफ पॅरीसच्या ठोकळ्यावर कोरीवकाम तयार केलेल्या शिल्पाला प्लास्टर शिल्प म्हणतात हे शिल्प घडविताना हत्यारे व चाकूचा वापर करुन पृष्ठभागाचे लहानमोठे टक्के काढून खरबडीत पोत निर्माण केला जातो आणि घास कागदाच्या (पॉलिश पेपर) साह्याने प्लास्टरचा पृष्ठभाग

---

३५. गोगटे, तगवाले, पूर्वोक्त, पृ.६८.

गुळगुळीतही करता येतो. (ब) "काष्ठ शिल्प" लाकडाच्या ठोकळ्यावर तीक्ष्ण चाकू, पटाशी इत्यादी हत्यारांच्या साह्याने कोरीव काम करुन काष्ठ शिल्प निर्माण केले जाते. काष्ठ शिल्पात लाकडांच्या स्वाभाविक पोताच्या सौंदर्याचा आणि अंगभूत रेषीय वळणांचा सौंदर्य निर्मितीसाठी वापर केला जातो. (क) "तार शिल्प" लोखंडाच्या तारेपासून त्रिमीती स्वरुपाचा वेगवेगळ्या बाजूने टक-अनुभव देणाऱ्या रचनेला तार शिल्प म्हणतात. (ड) "स्थिर शिल्प" पाषाण लाकूड धातूच्या कोरीव कामातून उणे पध्दतीतून भक्कम स्वरुाचे (solid) विविध स्वरुपाच्या मांडणीतून स्थिर शिल्प निर्माण केले जाते. (इ) "गतिमान शिल्प" ज्या शिल्पातून प्रत्यक्ष गती निर्माण होते त्या शिल्पांना गतिमान शिल्प असे म्हणतात.

### १.२.३ शिल्पकलेची वाटचाल

दगड धातू किंवा काष्ठ यांना कोरुन किंवा आकार देऊन शिल्पाकृतीची निर्मिती केली जाते. पाषाण युगातील माणसे हेच कदाचित पहिले शिल्पकार असावेत. इजिप्सीयन संस्कृतीतील कलावंतांनी कोरीव कामकरुन अभिजात आकार घडविले आहेत. त्याच प्रमाणे स्त्री-पुरुष, प्राणी, पक्षी यांच्या शिल्पाकृती निर्माण केल्या या शिल्पाकृतीचे शिर मानवी आहे. तर धड पक्षी किंवा प्राणी यांचे आहे. ही शिल्पे स्थिर, स्तब्ध अशी उभारण्यात आली आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरुन किंवा इतर अवयवांवरुन कृतीशील होण्याची कुठलीही सूचना मिळत नाही.

शिल्पकलेच्या वाटचालीत स्थिर शिल्पाइतकाच गतिमान शिल्पाचाही ठसा आहे. अलेक्झांडर काल्डर (१८९८) हा गतिमान शिल्पपध्दतीचा जनक मानला जातो. स्थिर शिल्पाकृतीत जमीनीवर स्थिर राहणाऱ्या आकारांची लय व तोलदर्शक शिल्पाकृती असते. गतिमान शिल्पात हवेच्या झोताबरोबर हालचाल करणारी शिल्परचना असते. या दोन्ही पध्दतीत तार, पोलादी व लोखंडी सळ्या, विविध धातूंच्या पत्रांचे आकार यांचा वापर असतो. पण गतिमान शिल्पात यातील काही घटक हलतात, फिरतात व दर्शकाला संपूर्ण शिल्प हलत

असल्याचा भाव प्रत्ययाला येतो. वाऱ्याच्या थोड्याशा झुळकीने हलणारे शिल्प निर्माण करण्यात काल्डरला यश आले.

## १.३ भारतीय शिल्पकलेचा इतिहास

"भारतीय शिल्पकलेला प्राचीन परंपरा लाभलेली आहे. सामान्यतः २००० वर्षापूर्वी मौर्यकाळात शिल्पकला उदयास आली."[३६] असे मानले जाते. सिंधू संस्कृती नष्ट झाल्यामुळे त्यावेळच्या शिल्पकलेची परंपरा खंडीत झाली. साधारणतः इ.स.पू. तिसऱ्या शतकापासूनच्या काही शिल्पाकृती उपलब्ध आहेत. समकालीन जीवन, तत्वज्ञान, संस्कृती यांचा परिणाम कलानिर्मितीवर होत असतो. भारतीय संस्कृती ही धर्म ग्रंथांशी संबंधीत आहे. मग भारतात अशी कोणती संस्कृती प्राचीन काळात विकसीत पावली की तिचा परिणाम कलानिर्मितीवर झाला. प्राचीन भारतात कला निर्मितीची परंपरा अतिप्राचीन आहे. सिंधू संस्कृती ही भारतातील अतिप्राचीन संस्कृती समजली जाते. मार्शल जॉन, म्हणतात, "सिंधू संस्कृतीपासूनच भारताच्या इतिहासाचा व संस्कृतीचा प्रारंभ होतो. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात मातीच्या बनविलेल्या अनेक स्त्रीमुर्ती प्राप्त झालेल्या आहेत. मोहोजोंदडो येथील उत्खननात पाषाणात पुरुष मूर्ती मिळाली आहे. या पुरुषाच्या तोंडावर दाढी असून अंगावर शालीसारखे वस्त्र आहे. वस्त्रावर त्रिफुली अलंकरण आहे. असा अलंकरणाचा चार मिश्र, कीद व मेसोपोटामिया येथे होता. तेथे त्यांचा संबंध देवमूर्तीशी होता."[३७] यावरुन वरील पुरुष मूर्ती निश्चितपणे कोणत्या ना कोणत्या तरी धर्माशी संबंधीत असावी ही मूर्ती कोण्या अनामिक कोरक्याने कोरली असली तरी ती धर्माशीच संबंधीत असावी.

धर्मश्रध्दांच्या प्रगटीकरणाचे माध्यमम्हणूनही शिल्प निर्मिती झाल्याचे दिसते. सिंधू संस्कृतीच्या काळातच अनेकमूर्ती सापडल्या. त्यामध्ये बॅनर्जी जे एन. म्हणतात, "एका दुसऱ्या तुकड्यावर एक पुरुष मांडी घालून बसलेला आहे त्याच्या डोक्यावर नागाचा फणा असून

---

३६. गोगटे तगवाले, पूर्वोक्त, पृ.७०

३७. Marshall John, Mohenjodaro and Indus Civilization, p. 44

आजुबाजूला गुडघे टेकून बसलेले उपासक आहेत."[३८] यावरुन स्पष्ट होते की, सिंधू संस्कृतीपासूनच प्रतिमा निर्माण करण्यास प्रारंभ झाला असावा. याप्रमाणे याच काळापासून प्रतिमा पूजनही सुरु झाले. सर्व प्रथम कोणत्या धर्मात प्रतिमा (मूर्ती) तयार झाल्या हे सांगणे कठीण असले तरी सर्वप्रथम वैदिक, त्यांच्या नंतर जैन आणि त्यानंतर बौध्द धर्मामध्ये अनुक्रमे मूर्ती किंवा प्रतिमा या निर्माण झाल्या असाव्यात. गणेश हरी खरे म्हणतात, "सर्व प्रथम जैन, नंतर बौध्द आणि त्यानंतर वैदिक धर्मात मूर्ती तयार झाल्या असे म्हणतात."[३९]

कोणत्याही मूर्ती अगोदर निर्माण झाल्या असल्या तरी त्यांच्यामागे धर्म हा घटक महत्वाचा आहे. उदा. शैव, वैष्णव, बौध्द, जैन या धर्मपंथांनी आपल्या श्रध्दा मंदिरे निर्माण करुन व मूर्ती घडवून व्यक्त केल्या आहेत. प्रत्येकजन आपल्या धर्माच्या शिल्पांची किंवा मंदिरांची उभारणी हा करत असतो. डॉ. सिंगारे अनिल म्हणतात, "मंदिर उभारण्यामागे एक धार्मिक विचारप्रणाली आहे."[४०] तत्कालीन धर्म व त्यांची धार्मिक भावना, विचार हे याच्या निर्मिती मागे कार्यरत असतात.

चव्हाणउदाजीराव म्हणतात, "प्राचीन भारतात साहित्य, संगीत, नृत्य या बरोबरच शिल्प आणि स्थापत्य कलांचा विकास झाला. पुढेही वेद धर्माची पिछेहाट झाल्यानंतर सुध्दा कलेची प्रगती चालूच राहिली बुध्द आणि जैन कालखंडात अनेक स्तंभ, स्तूप, मंदिरे, गुहाशिल्पे यांची निर्मिती झाली. अजंठा-एलोरासाराख्या गुहाशिल्पांनी खडकातून काव्य निर्माण केले. नंतरच्या काळात हिंदू संस्कृतीची परत भरभराट झाली. त्यामुळे सर्व भारतात मंदिर उभारणी आणि शिल्पकलेला महत्व आले. अनेक सुंदर कलाकृती निर्माण झाल्या मात्र साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले ते खजुराहोच्या मंदिरांनी आणि त्यावरील शिल्पांनी विशेषतः मिथून शिल्पाबद्दल अनेक समज, अपसमज झाले आजही आहेत."[४१]

---

३८. Banerjea J.N., The Development of Hindu Icongraphy, p.176

३९. खरे ग.ह., संशोधकाचा मित्र, भाग पहिला, पृ.१७६

४०. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९६

४१. चव्हाण उदाजीराव, खजुराहोची मंदिर शिल्पे, पृ.२

आपल्या भारतात अनेक ढंगांनी शिल्पकलेची निर्मिती झालेली दिसून येते. नुसता धर्मच याला कारणीभूत नसून अनेक घटक कारणीभूत दिसतात. याच्याही पुढे जाऊन चव्हाण उदाजीराव म्हणतात, "आपले पूर्वज पराक्रमाबरोबरच सौंदर्य आणि प्रेमाचे पुजारी होते. स्त्री-सौंदर्याचे तर ते भोक्तेच होते. वेद वाङमयापासून ते रामायण महाभारतासारख्या महाकाव्यात किंवा महाकवी कालीदासांच्या "शाकुंतल" सारख्या संस्कृत साहित्यात स्त्री सौंदर्याची वर्णने मोठ्या रसिकतेने केलेली आढळतात. सौंदर्य हा परमेश्वराचाच अविष्कार आहे. अशी प्राचीन भारतीयांची श्रध्दा होती. म्हणूनच प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात कलेची नेहमीच धर्माशी सांगड घातली जाई मग ती कला कोणतीही असो, अगर कोणताही धर्म अगर धर्मपंथ असो."[४२] कलेमध्ये समाजातील अनेक घटक हे चितारलेले दिसून येतात. स्त्री सौंदर्याला देखील तत्कालीन कलाकारांनी शिल्पकलेत बंदिस्त केलेले दिसून येते व प्रेमाचे खरोखरच ते पुजारी दिसून येतात.

हिंदू, बौध्द अगर, जैन धर्मियांच्या कला किंवा त्यांनी निर्माण केलेले साहित्य, यांचा आस्वाद घेताना वा त्यांचा विचार करताना त्यांच्यात अनुस्थूत असलेला कला व धर्म यांतील अन्वय नीट बारकाईने लक्षात ठेवला नाही. तर त्या कलेचे मर्मच ध्यानी येणार नाही म्हणूनच तज्ञांच्या मते भारतीय कलेचे गुढ परकियांना उकलणे अवघड ठरते. स्थापत्यकलेच्या संबंधात चर्चा करताना पर्सी ब्राऊन यानी भारतीय कला ही धर्मावर अधिष्ठित आहे असे मत मांडले आहे. ते म्हणतात, प्रचलित धार्मिक भावनांना मूर्त स्वरुप देणे हा भारतीय शिल्प कलेचा हेतू होता.

प्रा. बाळकृष्ण दाभाडे यांनीही या मताला पुष्टी दिलेली आहे. ते म्हणतात, "भारतीय कलेच्या जीवन स्त्रोताच्या मुळाशी 'धर्म' आहे, याची जाणीव प्रथमतः होते. भारतीय लोकांची धर्म विषयक भावनाच आतापर्यंत कलेच्या निर्मितीस कारणीभूत झालेली आहे असेच

---

४२. तत्रैव, पृ.४

दिसून यईल"[४३] यावरुन भारतीय कलेचा आत्मा हा धार्मिक भावनेवर आधारलेला आहे असेच दिसून येते. त्या अनुषंगाने आपल्या संशोधन कार्याचा अभ्यास करणे जरुरीचे आहे.

भारतीय संस्कृती कोषात नमूद केल्याप्रमाणे भारतीय स्थापत्य आणि शिल्पकलेचे स्थूलमानाने आठ कालखंड पडतात ते असे "१)प्राचीन युग, २) सिंधू संस्कृती ३) जनपदयूग ४)मौर्य व शुन्ग युग ५) कुषाण युग ६) गुप्त काळ ७) पूर्व मध्यकाळ ८) उत्तर मध्यकाळ इ."[४४] यावरुन आपणाला एक-एका कालखंडाचे थोडक्यात विवेचन करावे लागेल.

### १.३.१ प्राचीन युग

"याची सुरुवात वैदिक काळापासून झाली. या काळात मानवी शिल्प आढळत नाही. देवी लक्ष्मी ही सौंदर्याची प्रतिमा समजली जात होती. स्वस्तीक, चक्र, पूर्ण कुंभ, कमळ इत्यादी लेण्यांचा उगम या काळातच झाला. वैदिक काळाच्या प्रारंभाबद्दल संदिग्धता असली तरी सर्व साधारणपणे आर्याचे भारतातील आगमन इ.स. पूर्व पंधराशेच्या दरम्यान धरले जाते. यावरुन वेदकालीन भारतीय कलेचा कालखंड इ.स. पूर्व पंधराशे ते आठशे हा धरण्यास हरकत नाही. पर्सी ब्राऊन यांनीही हाच कालखंड निश्चित केला आहे."[४५]

### १.३.२ सिंधू संस्कृती युग

"या संस्कृतीचा काळ वेदकाळापूर्वीचा आहे. म्हणजे साधारणपणे इ.स.पू. तीन हजार ते दोन हजारपर्यंतचा असावा. प्रामुख्याने मोहोंजोदडो आणि हडप्पा येथील अवशेषांवरुन या गाजलेल्या संस्कृतीवरुन प्रकाश पडला. या काळातील नगररचनाशास्त्र प्रगत असावे. इजिप्त आणि चीन प्रमाणे इथेही चित्रलिपीचा वापर केला जात असावा. असे तज्ञांचे मत आहे. या चित्रलिपीचा अर्थ न लावल्याने याकाळातील साहित्य आणि संस्कृतीवर प्रकाश पडला नव्हता. मात्र सप्टेंबर दोन १९८० च्या टाईम्स ऑफ इंडियाच्या अंकामध्ये आलेल्या बातमीनुसार

---

४३. दाभाडे बाळकृष्ण, कला-साधना, पृ.२३

४४. भारतीय संस्कृती कोष, खंड, दुसरा, पृ.१६०

४५. Brown, Peycy, Indian Architecture (Buddists and Hindu Periods) p.1

प्रा.के.एस. राव यांनी या लिपीचा अर्थ लावण्यात यश मिळविले आहे."[४६] येथे सापडलेल्या बैलांच्या मूर्ती सुबक आहेत. तसेच भाजलेल्या मातीपासून (Terra cota) बनवलेले शिक्के (seals) खळणी, भांडी यांच्यावर वनस्पती पशु, कीटक, यांची चित्रे कोरलेली आढळतात.

दीक्षित नी.सी. म्हणतात, "मोहोंजोदडोच्या उत्खननात एक ध्यानस्थ योग्याची डोक्यावर दोन शिंगे असलेली व सभोवताली पशुंची चित्रे असलेली एक मूर्ती सापडली ह्यावरुन पशुपतीची (शिव किंवा शंकर) पुजा केली जात होती अशी स्पष्ट चिन्हे आढळून येतात. हडप्पाला तर स्मशानभूमीही आढळली."[४७]

सिंधू सभ्यतेच्या काळातच मार्शल जॉन च्या म्हणण्यानुसार, "मोठ्या संख्येत मिळालेले लिंगाकार दगड यांचा सबंध लिंगपूजेशी लावतात. त्याचबरोबर मधोमध भोक असलेले गोल दगडही मिळालेले आहेत. ही योनिपीठे असावीत अशी कल्पना आहे."[४८] अशा प्रकारे सिंधू संस्कृती च्या काळापासून भारतीय शिल्पकलेचा इतिहास प्रकर्षाने समजतो.

### १.३.३ जनपदयुग

इ.स.पू. आठशे पासून ते मौर्य काळाच्या आरंभीच्या म्हणजे इ.स.पू. चारसे पर्यंतचा काळ हा महाजनपद म्हणून ओळखला जातो. याच काळात शिल्प या शब्दाला महत्व आले. सुतार, धोबी, माळी, बुरुड इत्यादींना शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. चौसष्ट कला याच काळात रुढ झाल्या. बाह्य अलंकार व सजावट यावर विशेष लक्ष दिले गेले या कालखंडात बांधकामावर भर दिला गेला. मौर्यांची राजधानी पाटलीपुत्र या शहराच्या उभारणीवरुन हे सिध्द होते असे तज्ञांचे मत आहे."[४९]

---

४६. Rao K.S., The Times of India, Indus Valley Script Deciphred.
४७. दीक्षित नी.सी. प्राचीन व मध्ययुगीन भारत, पृ.३
४८. Marshall John, op.cit, p.59
४९. चव्हाण उदाजीराव, खजुराहोची मंदिर शिल्पे, पृ.६

## १.३.४ मौर्य व शुंग काळ

स्थापत्य आणि शिल्प कलेची प्रगती झाली. चंद्रगुप्त मौर्याचा पाटलीपुत्र येथील राजवाडा हा एक बांधकामाचा उत्तम नमुना आहे. याच काळात अशोक स्तंभ आणि सांची येथील स्तूप सर्वत्र प्रसिध्दीला आले. डॉ. कठारे अनिल म्हणतात, "स्तूप म्हणजे एखाद्या महान व्यक्तीची स्मारक रुपाने बांधलेली समाधी होय. गौतम बुध्दाला महान समजत. त्यांच्या अस्थीच्या अवशेषांवर समाधीरुप वास्तू बांधण्यास मौर्य कालखंडात प्रारंभ झाला. याच कालखंडात प्रारंभ झाला. याच कालखंडात गौतम बुध्दाच्या जीवनात ज्या-ज्या ठिकाणी महत्वाचे प्रसंग घडले, त्या त्या ठिकाणी स्मारके उभारली ही स्मारके म्हणजे स्तूप होय. मौर्य काळात स्तूप बांधण्याची सुरुवात झालेली प्रथा गुप्तकाळातही कायम राहिली."[५०]

तसेच मौर्य आणि शुंग काळातील कला सारख्याच प्रकारच्या आहेत. शुंगकाळ इ.स.पू. दोनशे ते शंभर पर्यंतचा धरला जातो. या काळात अनेक देवतांच्या मूर्ती घडविल्या गेल्या. तसेच मंदिरांचीही निर्मिती होऊ लागली. बुध्द, बोधिसत्व, चोवीस तीर्थकर व त्यांचे पार्श्वचर तसेच शिव, विष्णू, ब्रम्हा, सूर्य, कार्तिकेय, दुर्गा इत्यादी मूर्ती याचकाळात तयार होऊ लागल्या. बॅनर्जी जे.एन., म्हणतात, "कौटिल्याच्या अर्थशास्त्रात या संबंधी वरील माहिती आहे. पण तिचा साकल्याने कोठे विचार झाल्याचे आपल्या ऐकिवात नाही. म्हणूनच तिचा थोडा जास्त आढावा घेत आहोत. मूर्तीशास्त्रासंबंधी ही माहिती गोळा करताना कौटिल्याची सुत्रे व त्यावरील इतर ग्रंथकारांच्या टीका हाताळाव्या लागतात"[५१] अशा प्रकारे मौर्य आणि शुंग काळात शिल्पकला विकास पावत गेलेली आहे.

## १.३.५ कुशाण कालखंड

इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत एका विशिष्ट कला शैलीचा विकास झाला. हिलाच 'गांधार शैली' म्हणून ओळखले जाते याच शैलीला इंडो-ग्रीक

---

५०. कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य (खंड दुसरा), पृ.४

५१. Banerjea J.N., op.cit, p.86.

शैली म्हणूनही ओळखले जाते. पी.जी. जोशी म्हणतात, "ग्रीकांच्या संपर्कामुळे व महायान पंथाच्या उदयामुळे त्याचप्रमाणे शैव-वैष्णव भक्तीपंथाचा उदय, त्यासाठी कारणीभूत ठरला. परिणामी भारतात मुर्तिशिल्पांचा जन्म झाला. लौकिक व देवतांच्या कलात्मक मूर्तींची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली. मात्र त्यातून मथुरा व गांधार शैलीचा जन्म झाला. प्रारंभी भारतीय स्वतंत्र मूर्ती शिल्प विकसीत झाले. त्याचे प्रमुख केंद्र मध्य भारतातील 'मथुरा' होते. म्हणून त्यास 'मथुरा शैली' असेही म्हणतात. प्रामुख्याने त्यात बुध्द मूर्तींची संख्या जास्त होती. ह्या बौध्द मूर्ती पदमासन घातलेल्या (बसलेल्या), भव्य शरीराच्या, मस्तकावर वस्त्रावरण नसलेल्या होत्या. 'अद्यात्मिक व अंतरीक' (त्याग, पावित्र्य, निष्ठा) भावाभिव्यक्ती हे मथुराशैलीचे उल्लेखणीय वैशिष्ट्ये होते. काही जैन मूर्ती व शृंगारीक यक्ष-यक्षीणीच्या मूर्तीही तयार करण्यात आल्या. स्त्री व यक्षमूर्ती उत्तान शृंगारिक (सिंहकटी, पुष्टस्तन व अनुराग) होत्या. मथुरा शैलीत भोगवादाचे व त्यागवादाचे दर्शन घडते. शिल्पाकृतीसाठी लाल रंगाचा दगड वापरलेला होता."[५२] अशा प्रकारे भारतीय व ग्रीक संगमातून ही मथुरा व गांधार कलेचा उगम झाला.

ग्रीक कलेचा प्रभाव असल्याने इंडो-ग्रीक कला म्हणतात. मौर्य कलेवर सुध्दा इराणी कलेचा प्रभाव आहे. म्हणून तिला इंडो-इराणीयन म्हणून ओळखले जात. कुषाण काळात आध्यात्मिक आषयावर भर न देता मूर्तीचे यथार्थचित्रण घडविण्यावर भर दिला गेला.

### १.३.६ गुप्तकाळ (इ.स. ३५०-६५०)

गुप्त काळ भारतीय कला आणि संस्कृतीचा सुवर्णकाळ समजला जातो. याच काळात चित्र, नृत्य, संगीत अशा ललितकलांना महत्व प्राप्त झाले. अजंठा, वेरुळ सारख्या जगप्रसिध्द लेण्यांची निर्मिती याच काळातील समजली जाते. या काळातील चित्रशैलीला अजंठा चित्रशैली म्हणून ओळखले जाते. डॉ. नी.पु. जोशींच्या मते, "गुप्तराजे ब्राम्हण धर्माचे अनुयायी होते व ते आपणाला 'परमभागवत' म्हणवून घेत असत. राजाश्रय मिळाल्याने गुप्तांच्या कारकीर्दित ब्राम्हण धर्माच्या मूर्तीचे वैविध्य वाढले. ह्या काळापर्यंत निरनिराळ्या शास्त्रांचा ही

---

५२. जोशी पी.जी., प्राचीन भारत, पृ.२७९

चंगलाच विकास झाला होता. मूर्तीशास्त्रही त्याला अपवाद नव्हते. या शास्त्राची कुषाण काळात मुहूर्तमेढ रोवली होती. आता तिच्यावर इमल्याने चांगलाच आकार घेतला."[५३]

### १.३.७ पूर्व मध्यकाळ

इसवी सनाच्या आठव्या व नवव्या शतकातील काल हा पूर्व मध्यकाळ म्हणून ओळखला जातो. या काळात उत्तरेला गुर्जर, प्रतिहार, दक्षिणेला राष्ट्रकुट, चालुक्य, पल्लव व पूर्वेला पाल अशी राज्ये होती. गुर्जर आणि प्रतिहार यांची बहुतेक कला नष्ट झाली. मात्र कांची येथील कैलासनाथ मंदिर आणि त्यामध्ये असलेल्या मूर्ती या काळातील कलेची उदाहरणे होत. या काळातील शिल्पांच्या मधून पौराणिक कथांचे चित्रण केलेले आढळते. तसेच शिव आणि विष्णू यादेवतांच्या लिलांचे चित्रण हे या काळातील शिल्पकलेचे वैशिष्ट्ये आहे. शिव तांडव नृत्याचे शिल्पही या काळातील सर्वोच्च कलाकृती होय.

### १.३.८ उत्तर मध्यकाळ

हा काळ इसवीसनाच्या दहाव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत धरला जातो. याच काळामध्ये डॉ. कठारे, नगराळे, म्हणतात, "धर्मापुरी हे गाव चालुक्यांच्या (कल्याणीच्या) काळातील इंद्रनगरी होती."[५४] याठिकाणीही फार मोठ्या प्रमाणात शिल्प वैभव निर्माण केले गेले. याच काळात उत्तरेत खजुराहो पश्चिमेस अबु, दक्षिणेस तंजावर व हळे बीड व पूर्वेस भुवनेश्वर व कोणार्क ही प्रमुख केंद्रे मानली जातात. या काळात स्त्रीला महत्व प्राप्त झाले. स्त्री-पुरुष लैंगिक संबंधातील भावनेला पुजा अर्चेत स्थान मिळाले. खजुराहोच्या मंदिरामधून आढळणारी शृंगार शिल्पे, काम शिल्पे आणि मिथुन शिल्पे याच काळातील. या काळाच्या नंतर डॉ. म.श्री. माटे म्हणतात, "इस्लामी आक्रमणानंतर उत्तरेत मंदिर उभारणी लांबली मात्र पुढील इ.स. तेराशे ते आठराशे या पाचशे वर्षाच्या काळात द्रविड शैलीतील मंदिरांची उभारणी चालूच राहिली. या शैलीतील महत्वाचीमंदिरे म्हणजे तिरुवेल्लूर, श्रीरंगम, रामेश्वर, मदुराई,

---

५३. जोशी नी.पु. भारतीय मूर्तिशास्त्र, पृ.४७-४८.

५४. कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, पृ.३७७

तिलवेल्ली, विजय नगर आणि ताडपत्री ही होत. या द्रविड शैलीतील मंदिरात तंजावर येथील बृहदीश्वर मंदिराचा देखील उल्लेख करावा लागेल."[५५] अशा प्रकारे उत्तर मध्यकाळात आणि त्यानंतरच्या काळात हिंदू स्थापत्य व मंदिरशिल्पांचा कसा विकास होत गेला याचा अभ्यास आपण पाहिला. याच्यानंतर आपण मंदिरामध्ये किंवा स्थापत्य कलेत विकास पावलेल्या शैलींचा अभ्यास करुया.

## १.४ भारतातील विविध मंदिर बांधकाम शैलींचा विकास

देवांचे पृथ्वीवरील निवासस्थान म्हणजे मंदिर साहजीकच ती एक पवित्र वास्तु मानली जाते. या ठिकाणी प्रत्यक्ष देवाचे वास्तव्य असते. म्हणूनच त्याला देवालय असेही म्हटले जाते. स्वर्ग लोकातील हे सारे देवादिक पृथ्वीवर कसे अवतरले याबद्दल काही कथा सांगितल्या जातात. चव्हाण उदाजीराव म्हणतात, "बृहत संहितेमध्ये एक कथा आहे ती अशी की, एकदा सत्वाने स्वर्ग आणि पृथ्वी यांचा मार्गच रोखला. देवांची मोठी पंचायत झाली. पण त्यांनी सत्वालाच पकडले त्याला पृथ्वीवर पालथ्या अवस्थेत पाडले त्याला अक्षरशः भूईसपाट केले. इतके करुन ते थांबले असते तर ठीक पण सारे देव त्या सत्वाच्या पाठीवर उभे राहिले. ब्रम्हदेवाला दया आली. त्यांनी सत्वाला वर दिला, की सर्व देवांचे वास्तव्य त्याच्या ठिकाणी राहील. सत्व हा वास्तुपुरुष म्हणून ओळखला जाईल. ब्रम्हदेवाने त्याला आपला पुत्र मानले."[५६]

या धार्मिक कथेतूनच वास्तुंचा उदय झाला असावा असे मत बृहदसंहितेत मांडले आहे. पाठक अरुणचंद्र म्हणतात, "धर्मशास्त्रकार किंवा मनु हे मंदिरांमध्ये स्थापन केलेल्या किंवा सार्वजनिक ठिकाणी स्थापलेल्या मुर्तिपुजा पध्दतीचा उल्लेख करीत नाहीत. परंतु या काळातील मंदिर पुजा हे हिंदूच्या धार्मिक जीवनात विशेष अंग झाले होते. सार्वजनिक पुजास्थान किंवा प्रार्थना स्थळ म्हणून देवालयांना राष्ट्रीय जीवनात फार महत्वाचे स्थान होते."[५७]

---

५५. माटे म.श्री., पूर्वोक्त, पृ.११०
५६. चव्हाण उदाजीराव, पूर्वोक्त, पृ.१९
५७. पाठक अरुणचंद्र, इतिहास प्राचीन काळ महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (खंड-१), पृ. ६८०.

संबंधित कालखंडामध्ये मोठ्या प्रमणावर मंदिरे बांधण्यात आली. वेगवेगळ्या राजवंशानी दिलेल्या कोरीव लेखांमध्ये मंदिरे व त्यामध्ये पुजल्या जाणाऱ्या देवतांचे उल्लेख मिळतात. देवालयांची स्थापना करणे व त्यांची पुजा करणे या उद्देशाने प्रारंभी देवालये बांधलीहोती. कालांतराने त्यांना धार्मिक आणि सामाजिक जीवनामध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झाले. लोकांचे सर्व कार्यक्रम या भोवती केंद्रित झाले. देवालये बांधणे, त्यामध्ये पूर्तीची स्थापना करणे व देवालयाला देणगी देणे ही पवित्र कृत्ये ठरली. वेगवेगळ्या प्रसंगी व वेगवेगळ्या उद्देशाने दाने दिली जात. "देवांची पुजा हा या देवालयांमध्ये केला जाणारा महत्वाचा विधी होता."[५८] दिवसातून तीन वेळा म्हणजे सकाळ, दुपार व रात्री पुजाविधी होत असे (त्रिकालपुजा) संबंधित देवतेच्या पुजनासाठी केली जात. पर्सी ब्राऊन म्हणतात, "भारतात सर्वप्रथम गुहामंदिरे (Rock temple) निर्माण केली गेली."[५९] तसेच पुढे म्हणतात, "सर्व प्रथम बौध्द त्यानंतर जैन आणि शेवटी हिंदू गुहा मंदिरे निर्माण केली गेली."[६०] पुढे गुहा मंदिरांप्रमाणेच वास्तु मंदिरेही निर्माण करण्यात आली. गावागावात वास्तु मंदिरे बांधण्यात आली मंदिर बांधकामासाठी दगड, माती, चुना आणि विटांचा उपयोग करण्यात आला. मंदिर स्थापत्याची ही परंपरा प्राचीन आहे.

डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "इ.स. पूर्व पहिल्या शतकापासून देवालयाचे उल्लेख शिलालेखातून आढळतात."[६१] अशा प्रकारे देवालयांची निर्मिती ही मोठ्या प्रमाणात भारतात होत गेली. त्याचप्रमाणे ती विकास पावली. दक्षिण भारतात सातव्या शतकापासून हिंदू राजघराण्यांची परंपरा निर्माण होते यात राष्ट्रकुट, चालुक्य, पल्लव, चोल, पांडय चेर, काकतीय, होयसळ, परमार आणि शिलाहार व यादव हे प्रमुख राजघराणे दक्षिणेत होऊन गेले. या सर्वच राजघराण्यांनी आपल्या हिंदू धर्माची भव्य व दिव्य अशी मंदिर उभारणी मोठ्या प्रमाणात करण्यास पुढाकार घेतला. त्यातून मंदिर उभारणीचे अनेक प्रकार हे प्रचलित झाले.

---

५८. तत्रैव
५९. Brown Percy, op.cit., pp. 19-30.
६०. Ibid.
६१. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११४

मंदिर उभारण्याच्या पाठीमागे एक धार्मिक विचारप्रणाली आहे. त्याचप्रमाणे मंदिराची रचना होत असे. डॉ. अनिल सिंगारे म्हणतात,"मंदिर म्हणजे देवतांचे केवळ निवासस्थान नव्हे तर त्या देवतेचे ते मंदिर म्हणजे शारीरिक स्वरुप मानले जाते."[६२] म्हणून त्या देवतेचे भावीक मंदिरात प्रवेश करीत असतांना त्या मंदिराच्या पायरीचे प्रथमतः दर्शन घेत असतात. मंदिराचे गर्भगृह नेहमी घनाकार असावे असे काही जे मोजमाप घालून दिलेले आहेत. त्यावरुन मंदिर म्हणजे पृथ्वीवरील स्वर्ग आहे. अशी रचना करुन त्याची कल्पना केली जाते. अशा तपशिलात जाण्यापूर्वी हिंदू मंदिररचनेतील प्रमुख प्रकार पाहू.

### १.४.१ नागर शैलीतील मंदिरांचा विकास

भारताच्या कानाकोपऱ्यात हिंदू, बौध्द व जैनांच्या अनेक मंदिरांची रचना ही झाली. त्यामध्ये भारतात फार मोठ्या प्रमाणात हिंदू मंदिरे बांधली गेली. या हिंदू मंदिरांचे अनेक प्रकार ही पडतात. त्यामध्ये प्रामुख्याने तीन प्रकार हे पडत असतात. नागरशैली, द्रविड शैली आणि वेसर शैली (मिश्रीत शैली) असेही म्हणतात. हिंदूची अनेक तीर्थक्षेत्र ही या शैलींच्या तंत्रात मोडतात. पण इतिहासाच्या अभ्यासकांना काही, वेळेस अशा मंदिरांना भेट देऊनही समजत नाही की आपण ज्या मंदिराला भेट देतोत ते मंदिर कोणत्या राजघराण्याच्या काळातील आहे त्या मंदिराची बांधकाम शैली कोणती आहे याच्यामागे आपणाला त्या अभ्यासकाला असलेला वास्तुशास्त्र आणि शिल्पकलेचा अभ्यासाचा अभाव दिसतो.

भारतात प्रामुख्याने उत्तर भारतात नागर शैलीचा विकास हा झालेला दिसतो. पूर्व भारतातही जगन्नाथपुरी, कोणार्क, भुवनेश्वर येथील मंदिरे ही नागर शैलीची उत्तम उदाहरणे आहेत.

### १.४.२ द्रविड शैलीतील देवळांचा विकास

पल्लव, चोल, पांड्य, विजयनगर, चेर यांच्या काळात या शैलीचा विकास झाला. चालुक्यांच्या काळातही ही पध्दती विकसीत झाली. मार्डीकर म्हणतात, "इ.स. ७ व्या

---

६२. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.क्र.१९६-१९८.

शतकाची सुरुवात ते इ.स. ९ व्या शतकाचा शेवट हा पल्लव शासकांचा काळ या काळात दक्षिण भारतात वास्तुकला किंवा द्रविड वास्तुकला चहुअंगाने विकसीत झाली."[६३] या शैलीचा विकास हा प्रारंभी खडकांमधून कोरुन काढून किंवा मंडप बांधकामाकडे होत गेला. स्तंभ, शिल्प, मंडप, शिखरे यांच्या रुपबंधात या शैलीने प्रवेश केला.

त्यामध्ये शिल्पकलेला प्राधान्य देण्यात येऊ लागले. शिल्पकलेच्या क्षेत्रात अनेक प्रकारची कोरीवशिल्पे कोरण्यात येऊ लागली. कला शैली कोणतीही असो त्यावर शिल्पे किंवा चित्रकला ही काढली जाऊ लागली. देवळांना किंवा मंदिरांना यामुळे मोठे धार्मिक महत्व प्राप्त झाले. कारण त्यावर आपआपल्या देवतांची कोरीव शिल्पे कोरली जाऊ लागली होती.

### १.४.३ वेसर शैलीचा विकास

डॉ. अनिल सिंगारे म्हणतात, "द्रविड व नागर शैलीच्या मिश्रणातून ही शैली उदयाला आलेली आहे. यामुळे हिला 'मिश्रीत शैली' असे ही म्हणतात."[६४] अशा या शैलीचा विकास नागर शैली आणि द्रविड शैली या दोन मंदिर बांधकामाच्या शैलीतून झालेला आहे. या शैलीचे सर्वात उठून दिसणारे वैगळेपण म्हणजे मुख्य सभामंडपाला लागून अनेक सभागृह असतात. ही शैली आपणाला बहुतांशी विचार केल्यास मध्य भारतात असलेली दिसून येते. अशा प्रकारचे मंदिर हे सोमनाथपूर या गावी आहे. बाकी सर्व ठिकाणी कधी नागर तर कधी द्रविड शैलीचा वापर करुन ही मंदिरे उभारलेली आपल्या निदर्शनास येत असतात.

कोणत्याही मंदिराची रचना करताना त्याची विशिष्ट अशीच काही ठेवन ही वास्तुशास्त्राने ठरवलेली आपणाला दिसते.

## १.५ महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे एक ऐतिहासिक किंवा कलात्मक अभ्यास

'शिल्प स्थापत्य कला' ही प्राचीन भारतीय कलापैकी सर्वात प्रभावीपणे अविष्कारीत होणारी कला होय. प्राचीन भारतीय वाङमयातून ६४ कलांचा उल्लेख असला तरी

---

६३. मार्डीकर मदन, प्राचीन भारताचा इतिहास (इ.स. १००० पर्यंत), पृ.३२७.
६४. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९७

कलाकाराच्या प्रतिभेचा अप्रतिम अविष्कार झालेला दिसतो. तो मात्र शिल्पस्थापत्य कलेच्या रुपात दगडासारखे चिरस्थायी माध्यम या कलाविष्कारासाठी वापरले गेले असल्यामुळे या कलावैभवाचा वारसा सातत्याने टिकून राहिला. आणि कला अवशेषांच्या रुपाने तो आपल्यापर्यंत येऊन पोहोचला.

डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "इ.स. पू. तिसऱ्या शतकात सुरु झालेली कलाविष्काराची ही परंपरा इ.स. १४ व्या शतकापर्यंत सातत्याने चालू राहिली. दीड हजार वर्षाच्या या कला साधनेतून असंख्य अनामिक कलाकारांची ही कला स्वप्ने साकारली या कलास्वप्नानीच पाषाणातील शब्द शिल्पांचे रुप घेतले. अशी असंख्य शब्दशिल्प रुप कलास्वप्ने आज भग्नावशेषांच्या रुपात इतरस्तः विखूरलेली आढळतात. मौर्य, शुंग-सातवाहन, गुप्त, वाकाटक, चालुक्य, होयसळ आणि यादव कला प्रेरणाचे मोहक इंद्रधनुष्याचे रंग घेऊन ही स्वप्ने साकार झाली. या कलास्वप्नांची मोहक उधळण सह्याद्रीच्या कड्या कपारीतील प्रचंड कातळातून सातत्याने होत राहिली. म्हणूनच भारतातील एकूण १२०० लेण्यांपैकी १००० लेणी महाराष्ट्रात कोरली गेली आणि शिल्प स्थापत्य परंपरेचा वैभवशाली वारसा या परिसरात निर्माण झाला."[६५] महाराष्ट्रातील कलेच्या प्रारंभाविषयी डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "महाराष्ट्रात शिल्पस्थापत्य परंपराचा प्रारंभ होतो इसवीसन पूर्व दुसऱ्या शतकात पुण्याजवळील भाजे लेणीसमुहाच्या रुपाने हे प्राचीनतम कलावैभव साकारले. येथील चैत्य आणि विहार लेणी वैशिष्ट्यपूर्ण ठरावीत. डोंगरातील प्रचंड कातळ कोरुन तयार केलेल्या या लेण्यांनी महाराष्ट्रातील लेणी स्थापत्य परंपरेचा प्रारंभ केला."[६६] वरील घटकांवरुन आपणाला महाराष्ट्र राज्याच्या ऐतिहासिक कलावैभवाचा प्रारंभ केला होता हे समजते. डॉ. जाधव एस.जी. म्हणतात, "महाराष्ट्राचे नाव घेताच अजिंठा-वेरुळ सारखी अजरामर लेणी तसेच पंढरपूर, शिर्डी, तुळजापूर सारखी धार्मिक तीर्थक्षेत्रे नजरेसमोर तरळतात."[६७] यासोबतच अनेक

---

६५. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.१०८.
६६. तत्रैव, पृ..१०८-१०९.
६७. जाधव एस.जी., आधुनिक महारष्ट्राचा इतिहास, पृ.५३५.

ऐतिहासिक ठिकाणे, मुंबई-पुणे, नागपूर सारखी महानगरे, थंड हवेची ठिकाणे, पशुपक्षांची अभयारण्य, वस्तुसंग्रहालये अशा अनेक ठिकाणाचा समावेश हा या यादीत होतो.

महाराष्ट्रातील सागर दर्शन आणि तीर्थक्षेत्र अशा समन्वीत सहलीही सुरु करण्यात आल्या आहेत. सांस्कृतिक पर्यटन धार्मिक पर्यटन आणि मनोरंजन अशा मार्गाने पर्यटनाचा विकास होत आहे. महाराष्ट्राचा इतिहास तसा फार जुना आहे. डॉ. रमेश अवलगांवकर म्हणतात, "सातवाहनापासून जी राजघराणी आपल्याला माहिती आहेत त्यातील महाराष्ट्राच्या बहुतेक प्रदेशावर राज्य करणारे शेवटचे राज्य म्हणजे यादव घराणे होय. महाराष्ट्राशिवाय गुजरात, कर्नाटक, तेलंगण या ठिकाणीही यादव राज्याचा विस्तार झाला होता. सातवाहनांपासून ते यादव घराण्यापर्यंत अनेकांनी या महाराष्ट्रावर राज्य केले. परंतु यादव घराण्याबद्दल जेवढी अपुलकी या मराठी माणसाला वाटली तेवढी इतर घरण्याबद्दल वाटली नाही. कदाचित हा मराठी भाषेचाही अनुबंध असू शकतो. तथापी या मायबोलीची भरभराट ही यादव काळातच झाली होती. याची साक्ष तत्कालीन निर्माण झालेले मराठी साहित्य आहे."[६८]

राज्यातील डोंगराळ भागामध्ये आणि समुद्रकिणारी असलेले किल्ले हा महाराष्ट्राच्या गौरवशाली ऐतिहासिक परंपरेचा एक अभिमानास्पद वारसा आहे. काही किल्ले तर सुमारे १००० वर्षापूर्वीही अस्तित्वात होती. याची नोंद आपल्याला ऐतिहासिक दस्तावजांमध्ये आढळलेली दिसते. राष्ट्रकुट, यादव, चालुक्य, मुस्लीम, मराठा काळात अनेक किल्ले निर्माण केले आहेत.

राष्ट्रकुट काळातला किल्ला कंधारला आतापर्यंत उभा असलेला दिसतो. देवगिरीला यादव काळाची साक्ष देणारा किल्ला पण आहे. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी जमिनीवर डोंगरात आणि समुद्रात अनेक किल्ले नव्याने बांधले. अनेक जुन्या किल्ल्यांची डागडुजी केली व ती नव्याने बांधली. किल्याच्या विषयी माहिती देताना भारतरत्न पा.वा. काणे म्हणतात, "राजाच्या निरनिराळ्या अंगामध्ये मनुने राजधानीला राष्ट्राच्याही आधीचे स्थान दिले

---

६८. अवलगावकर र.वा., महानुभाव साहित्यातील महाराष्ट्र, पृ.२२५

आहे. ह्या संबंधीचा खुलासा मेधातिथीने आणि कुल्लुकाने असा केला आहे की, राजधानी शत्रुच्या हाती जाण्याने राष्ट्राचा म्हणजे राज्याचा काही प्रदेश शत्रूच्या हाती जाण्यापेक्षा अधिक भयंकर संकट उत्पन्न होते कारण राजधानीमध्ये धान्याचे साठे ठेवलेले असतात उत्तर भारतातील भौगोलिक परिस्थितीमुळे आणि प्राचीन काळच्या युध्दाच्या प्रकारामुळे बहुधा राजधानी आणि दुर्ग ह्यांना मोठे महत्व आले असावे."[६९]

तसेच महाराष्ट्रात किल्याप्रमाणेच मंदिरे, वास्तुकला, शिल्पवैभव, लेण्या यांचा पण सांस्कृतिक अंगाने आपणाला अभ्यास करण्यासाठी मोलाची मदत होते. कैलास लेणे, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, त्र्यंबकेश्वर, भिमाशंकर, तसेच अजिंठा-वेरुळच्या लेण्या, पितळखोरे, एलीफंटा, कार्ले भाजे येथील लेण्या प्रसिध्द आहेत. अशा सर्वच लेण्या मंदिरे किंवा वास्तुवर वेगवेगळ्या प्रकारची कोरीव शिल्पे ही कोरलेली आहेत. तसेच चित्रकलाही आपणाला ह्यावर दिसून येते. या गोष्टी पर्यटकांचे आकर्षण ठरल्याने यांना ऐतिहासिक महत्व हे प्राप्त झालेले दिसून येते.

### १.५.१ महाराष्ट्रातील प्राचीन लेणी व शिल्पस्थाने

### अ) अजिंठा

जाधव एस.जी. म्हणतात, "सुमारे १००० वर्षांची बौध्द लेणी, कोरीव लेणी, रंगीत भित्तीचित्रे यांचे अप्रतिम नमुने ही अजिंठा येथे आपणाला पहावयास मिळतात."[७०] तसेच पुढे डॉ. गो.ब. देगलूरकर म्हणतात, "अजिंठा येथील ३० लेण्यांपैकी हीनयानांची लेणी वगळता बाकीची सर्व म्हणजे २५ लेणी महायान सांप्रदायिकांची आहेत आणि विशेष म्हणजे त्यातील १, २, १६, १७ लेणी महायानांच्या लेण्या सर्वात उत्कृष्ठ नि परिपूर्ण मानल्या जातात. त्याचप्रमाणे क्रमांक २१ आणि २६ ही चैत्यगृहेही परिष्कृत ठरतात. यातील काही लेणी अर्धवट आहेत. मात्र त्यामुळे शिल्पी आणि स्थापती यांच्या योजना आणि कार्यपध्दती या संबंधीचा अंदाज बांधता

६९. भारतरत्न पा.वा. काणे, धर्मशास्त्राचा इतिहास, पृ.४२८
७०. जाधव एस.जी., पूर्वोक्त, पृ.५४५

येतो. ही एका परीने फायद्याची गोष्ट ठरली. अजिंठे येथील लेणीचे आणखी एक वैशिष्ट्ये दाखविता येते. येथे अनेक अभिलेख उपलब्ध आहेत. त्यामुळे संशयाला व दुमताला वाव मिळत नाही. ही लेणी सुमारे ६०-७० वर्षापूर्वीपर्यंत गुप्त घराण्याच्या कारकिर्दीतील कलेतील विशेष म्हणून अभ्यासकांना माहिती होती. मात्र श्री. वा.वि. मिराशी यांनी केलेल्या वाकाटकांच्या अभिलेखांमुळे ती वाकाटकांची ठरली. हरिषेण, त्याचे अधिकारी ऋषीक (खानदेश) प्रदेशाचा त्याचा मांडलिक आणि बुध्द भद्रनामक भिक्षु यांनी येथेही काही लेणी खोदल्याचे आता स्पष्ट झाले आहे."[७१] अशा प्रकारे आपणाला अजिंठा येथील लेण्यांचे महत्व किंवा अभ्यास लक्षात घेता येतो.

**ब) वेरुळ**

हे स्थळ औरंगाबाद पासून जवळपास ३० कि.मी. अंतरावर आहे. येथील लेण्यांमध्ये जे शिल्पआहेत त्यामध्ये बौध्द, हिंदू आणि जैन शिल्पकलेतील संगम आहे. तेथील कैलास लेणे हे एक चमत्कारच समजले जाते. ते एक कलेचा अद्वितीय नमुना आहे. गो.बं. देगलूरकर म्हणतात, "वेरुळ येथील लेणींची अनेक वैशिष्ट्ये आहेत. येथे बौध्द, ब्राम्हणी व जैन लेणी एकत्रच आढळतात. पैकी बौध्द लेणीचा आढावा वर घेतलाच आहे येथे १७ ब्राम्हणी व ५ जैन लेणी आहेत. याशिवाय गणेश गट व जोगेश्वरी गट असे लेण्यांचे दोन वेगळे गट आहेतच. यापैकी काही लेणीत चित्रेही काढली होती. कैलास लेणे तर ३ ते ४ वेळा रंगवले होते. हे तेथील मुखमंडपातील चित्रावशेषांवरुन म्हणता येते. येथील या लेण्यांचे सगळ्यात महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे लयनस्थापत्याचे चारही टप्पे येथे प्रत्यक्षात आढळतात. लेणे क्र. १४, १५, १६, २१, २९ या लेण्या एकूण १७ लेण्यांमध्ये महत्वाच्या मानल्या जातात. पैकी १५ वे लेणे दुमजली आहे ते खरे, पण वरच्या मजल्यावरच मंडप आणि गर्भगृह कोरलेले आहे मूर्तीशिल्पाच्या दृष्टीने हे फार उत्कृष्ट मानले जाते."[७२]

---

७१. देगलूरकर गो.बं., गोदा खोऱ्यातील लेणी, पृ.४२

७२. तत्रैव, पृ.४९-५०.

अशा प्रकारचे उत्कृष्ट लेणी स्थापत्य हे वेरुळ या ठिकाणी साकारले १६ क्रमांकाची लेणी तर जगप्रसिध्दच मानली जाते. एका दगडामध्ये कोरलेले हे लेणे "देव, देऊळ परिवारु। की जे कोरुनी डोंगरु । ऐसा भक्तीचा व्यवहारु । का न व्हावा ।" या ज्ञानदेवांच्या ओवीवरुन अद्वैत तत्वज्ञान या लेणीत साकारलेले दिसून येते.

## क) कार्ले, भाजे व भेडसा

पुण्याच्या पश्चिमेस मुंबई मार्गावर या लेणी आहेत. सुमारे २००० वर्षापूर्वीची लेणी हे कार्ल्याचे वैशिष्ट्ये आहे. भाजे लेणी ही मळवली स्थानकावरुन दक्षिणेकडे सुमारे २ कि.मी. आहे. येथे बुध्द विहार आणि प्रार्थनास्थळे आहेत. भेडसा लेणीही सुमारे १००० वर्षापूर्वीच्या आहेत. येथील लेण्या ह्या फार जुन्या असल्या तरी यांनी सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली आहे. डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "हा कलाअविष्कारही एवढा समर्थ होता की सातवाहन काळातच तो ख्यातनाम झाला. कान्हेरी येथील सातवाहन काळातील शिलालेखात, पैठणपथातील राजतडागा जवळील या लेणीचा संदर्भ आलेला आहेच. राजतडागाची ही लेणी म्हणजेच औरंगाबाद लेणी समूह होय. पुण्याजवळील कार्ले आणि भेडसे, नाशिक जवळील पांडे लेणी, जुन्नर येथील तुळजालेणी, ठाण्याजवळील कान्हेरी आणि मुंबई जवळील हातीगुंफा हा साक्ष शिल्प-स्थापत्य अविष्कार सामान्यतः इसवीसन पूर्व २ ऱ्या शतकापासून ते इ.स. पहिल्या शतकापर्यंत २५०-३०० वर्षाच्या काळात घडलाय. कलाविष्काराची एक प्रचंड चळवळच जनू महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यातून उभी राहिली. अनामिक कलाकारांचे समूह या कला समाधीत रंगू लागले."[७३] यामुळे या कलाकारांना राजाश्रय हा मोठ्या प्रमाणात मिळत असलेला आपणाला दिसून येतो.

## ड) पितळखोरा लेणी

औरंगाबादहून ७८ कि.मी. अंतरावर या लेण्या आहेत. येथील सुंदर व मनोहर लेणी सुमारे बावीसशे वर्षाची जुनी आहेत. या लेण्या अजिंठ्यापेक्षाही जुन्या मानल्या जातात. वा.वि.

---

७३ देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११०.

मिराशी म्हणतात, "गिरी पर्वतात लेणी कोरण्याचा आरंभ अशोकाच्या काळातच झाला होता. अशोक व त्याचा नातू दशरथ यांनी गयेजवळ बराबर येथील टेकडीत आजीविक संन्याशांकरिता लेणी कोरविली होती. त्यांच्या नंतरची पश्चिम महाराष्ट्राची लेणी विस्तार, सौंदर्य, इत्यादिकांत त्यांच्याहून वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ती महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांत सह्याद्रीपर्वतात कोरली आहेत. त्या पर्वताचा मध्यभाग तशी लेणी कोरण्यास अनुकूल असल्यामुळे ती पुणे जिल्ह्यात भाजे, कुलाबा जिल्ह्यात कोंडाने, खाणदेश जिल्ह्यात पितळखोरे, औरंगाबाद जिल्ह्यात अजंठा, नाशिक जिल्ह्यात नाशिक, पुणे जिल्ह्यात दुन्नर व कार्ले, साष्टी जिल्ह्यात कान्हेरी वगैरे ठिकाणी कोरली आहेत."[७४] सह्याद्री पर्वतांच्या रांगामध्येच पितळखोरा या वैशिष्ट्यपूर्ण लेण्या कोरल्या आहेत.

**इ) खरोसा, अंबाजोगाई (लातूर, बीड)**

इ.स. ६ व्या शतकातील कोरीव लेणी आणि शैलगृह हे प्रसिध्द आहेत. लातूर-बिदर सडकेपासून ४ कि.मी. टेकडीवर ही शिल्पस्थाने आहेत. शिवाय राज्यात जुन्नर, दौलताबाद, अंबाजोगाई, नांदेड परिसरातही शिल्पस्थाने आहेत. देगलूरकर गो.बं. म्हणतात, "लातूर जिल्ह्यात औसा तालुक्यातील निलंगे या गावापासून जवळच हीलेणी आहे. ज्या दगडात कोरली आहे तो जांभ्या दगड ठिसूळ आणि सच्छिद्र स्वरुपाचा असल्यामुळे येथील वास्तुघटक आणि शिल्पे खूपच निसर्गदत्त झालेली आहेत. येथे दहा लेण्या बऱ्या म्हणाव्यात अशा आहेत. त्यातील क्रमांक ५ चे जैन लेणे वगळता बाकीची लेणी शैवनि, वैष्णव आहेत."[७५] लातूर जिल्ह्यातील खरोसा येथील लेण्यांप्रमाणेच बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई या ठिकाणी देखील प्राचीन लेण्या कोरलेल्या दिसून येतात.

देगलूरकर गो.बं. म्हणतात, "बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे एक प्रसिध्द शहर येथे जोगाई देवीचे ठाणे असल्यामुळे याला क्षेत्राचे महत्व प्राप्त झाले आहे. येथे ब्राम्हणी लेणीचे

---

७४. मिराशी वा.वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, पृ.२०३.
७५. देगलूरकर गो.ब., गोदा खोऱ्यातील लेणी, पृ.४८

(हत्ती लेणे) जवळच जैनांचे मोठे लेणे आहे. दगड फारसा चांगला नसल्याने येथील स्तंभ व मूर्ती ठिसूळ झाल्या आहेत. लेण्यांच्या प्रांगणात हत्ती आणि मंडपात तीर्थकर यांच्या प्रतिमा आहेत."[७६] अशा प्रकारे महाराष्ट्रात शिल्पांसाठी अनेक ठिकाणे प्रसिध्द आहेत. अंबाजोगाई, परळी, धर्मापुरी, पानगांव, होट्टल, औंढा नागनाथ, बीड, कवठा, नारंगवाडी, उमरगा, वेरुळ, अजिंठा, पितळखोरे, खरोसा, नेमगिरी, कंधार एवढेच नव्हे तर महाराष्ट्रात इतर अनेक ठिकाणे प्रसिध्द आहेत. या ठिकाणांचा अभ्यास किंवा संशोधन केल्यावर महाराष्ट्रातील ही प्राचीन भारताचे किंवा इतिहासाचे वैभव दाखविणारी किंवा साक्ष देणारी शिल्पस्थाने इतिहासाचा एक महत्वपूर्ण घटक बनलेली दिसून येतात.

## १.६ मराठवाड्याचे इतिहासाला सांस्कृतिक योगदान

भारताच्या स्वातंत्र्याने इतिहासाविषयी एक नवी जाणीव व जागृती केंद्र व राज्य पातळीवर निर्माण झाली. भारताचा इतिहास भारतीय दृष्टिकोनाने स्वतंत्रपणे पुन्हा लिहला जावा या हेतूने पूर्णतः व्हावी या दृष्टिने विविध प्रयत्न झाले. पूर्वीच्या हैद्राबाद राज्याचा एक भाग असलेला मराठवाडा हा महाराष्ट्रात विलिन झाल्यानंतर मराठवाड्यातील आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेले प्राचीन शिलालेख, ताम्रपट व वास्तूशिल्प, मंदिरे, मूर्ती व पुराण अवशेष इत्यादींच्या संशोधनाकडे केंद्रशासनाची व महाराष्ट्र शासनाची दृष्टी वळली. सु.ग. जोशी म्हणतात, "उठकमंडच्या एपिग्राफी खात्याने तर मराठवाड्यातील शिलालेख शोधून काढण्यासाठी १९५८-६० च्या सुमारास एक मोहिमच सुरु केली होती व महाराष्ट्र शासनाच्या पुरातन खात्याचेही या दिशेने प्रयत्न सुरु झाले होते."[७७]

मराठवाडा हा सांस्कृतिक इतिहासाने फार वैभवसंपन्न आहे. डॉ. मधुकर क्षीरसागर म्हणतात, "मराठवाड्यात असा एकही पार नाही की, ज्यावर भावार्थ रामायण या ग्रंथाचे पारायण झाले नाही. संत एकनाथांचा संस्कार साऱ्या गोदावरी खोऱ्यावर झालेला आहे. नाथाचा

---

७६. तत्रैव, पृ.५९.

७७. जोशी सु.ग. (संपा.), मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, पृ.१५

भागवत धर्म मराठवाड्यात रुजला प्रत्येक पारावर भजन होते. मराठवाड्यात वारकऱ्यांची संख्या सर्वात जास्त आहे. गोदावरी खोऱ्यातील कनखर माणसाच्या काळ्या मातीतील काळसर वर्णाच्या माणसांच्या मनात पंढरीच्या काळ्या सावळ्या विठूरायने म्हणूनच वेड लावले की काय? असाही संभ्रम निर्माण होतो एवढी जवळिकता, आध्यात्मिक उन्नती या प्रदेशाची झाली आहे. येथे मायेचे मैंद, भोंदू, ढोंगी, लटके असे वारकरी म्हणूनच आढळत नाहीत. निष्ठावंत, ज्ञानी, परोपकारी, वैराग्यशील, विवेकी वारकऱ्यांची फळीच निर्माण झाली व पुढेही ती होत राहील असा विश्वास वाटतो कारण ही गोदाभूमी निर्मितीक्षम आहे."[७८]

मराठवाडा धार्मिक, क्षेत्राइतकाच पुरातत्वीय क्षेत्रात अग्रेसर आहे. दादासाहेब पोहनेरकरांविषयी लोकमत दैनिकात त्यांनी मराठवाड्याविषयी मत मांडले. यु.म. पठाण म्हणतात, "मराठवाड्याचा चालता बोलता इतिहास, यातील सारी प्रकरणे वाचायची असतील तर जरा निवांत सवड काढून औरंगाबादला येऊन सन्मित्र कॉलनीत शिरा, पोहनेरकरांच्या लाकडी कपाटातील पोथ्या पाहूनच तुम्ही हरवून जाल."[७९] यावरुन मराठवाड्याच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

मराठवाड्यात किल्ले, वास्तू, शिल्पे, मंदिरे, मशिदी, लेण्या, दर्गे, तीर्थक्षेत्रे आहेत. यामुळे मराठवाड्याच्या इतिहासाला महत्व प्राप्त झाले आहे. अभिजित बेल्हेकर म्हणतात, "बीड, उस्मानाबाद, लातूर भागात कधी कोणी पर्यटनासाठी गेल्याचे ऐकायला मिळत नाही. खरे तर या भागातही बुलंद गडकोट, कोरीव लेणी, मंदिरे यांचे मोठे जाळे आहे. या ऐतिहासिक वास्तुंचा अभ्यास करत असताना सातवाहनांचे तेर आणि तिथल्या ऐतिहासिक संग्रहालयाचे कुतुहल कानी आले. मग एकदा असाच या गुढ भूमिचा शोध घेत तेरला गेलो आणि तिथल्या वास्तू व वस्तू पाहतांना जनू इतिहासाचे नव्याने उत्खनन सुरु झाले."[८०]

---

७८. क्षीरसागर मधुकर, दिंड्या आणि वाऱ्या, पृ.१११-११२.
७९. पठाण यु.म., मराठवाड्याचा मिटलेला इतिहास, पृ.४
८०. बल्हेकर अभिजित, सातवाहनाचे तेर, पृ.३

तेरचे नुसते संग्रहालय पाहिले तर पाहणाऱ्याच्या डोळ्यासमोर उत्खननाचे वेध लागतात. हेच मराठवाड्याचे मोठेपण आहे. मराठवाडा सांस्कृतिक दृष्टीने एवढा वैभवसंपन्न आहे की, त्यामध्ये हिंदू, जैन, बौध्दांची अनेक सांस्कृतिक क्षेत्रे आहेत. यामध्ये प्रथम हिंदू क्षेत्रे पाहू. तेर येथील वैष्णव मंदिर, अंबाजोगाईचे खोलेश्वर, निलंगा येथील निळकंठेश्वर, चारठाणा मंदिरे, वेरुळ येथील घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, पानगावचे विठ्ठल मंदिर, होट्टलचे सिध्देश्वर मंदिर, धर्मापुरीचे केदारेश्वर, माहूरचे रेणुका मंदिर, तुळजापूरचे मंदिर, हेलस मंदिर, अन्वा येथील महादेव मंदिर, धाराशिव मंदिर, परळी वैजनाथ, बीडचे मंदिर इत्यादी हिंदू मंदिरे ही प्रसिध्द आहेत. तसेच जैनांच्या नेमगिरी येथील, कुंथलगिरी येथील व वेरुळ च्या लेण्या प्रसिध्द आहेत.

बौध्दांची अजिंठा मंदिरे, वेरुळ मंदिरे आणि औरंगाबाद मंदिरे प्रसिध्द आहेत. शिखांचा गुरुद्वारा प्रसिध्द आहे. मुस्लिमांच्या औरंगाबाद येथील मशीद, बीबीका मकबरा, जामा मशिद, पैठणची जुम्मा मशिद, बिलोलीची मशिद, लातूरचा सुरतशहावलीचा दर्गा, परभणीचा दर्गा इ. तसेच मराठवाड्यात प्रसिध्द असे किल्ले आहेत. त्यामध्ये माहूरचा किल्ला, नळदुर्ग, देवगिरी, परांडा, कंधार, उदगिर, धर्मापुरी, इ. किल्ले हे उल्लेखनीय असे आहेत. मराठवाड्याला अतिप्राचीन काळापासूनचा इतिहास आहे. प्रा. सुनिल पुरी म्हणतात, "प्राचीन काळी किंवा कालखंडात मराठवाड्यात मूलक, अश्मक, भोगवर्धन आदी जनपदे अस्तित्वात होती."[८१] एवढेच नव्हे तर व्यापाराच्या दृष्टिकोनातून "भोकरदन, तेर, पैठण, जुन्नर या प्राचीन काळात प्रसिध्द बाजारपेठा होत्या."[८२] अशा प्रकारे मराठवाडा हा प्राचीन काळात चहू अंगाने विकसीत होता. मराठवाडा हा चहू अंगाने जरी विकसीत असला तरी त्यातल्यात्यात त्याचे कला स्थापत्याच्या दृष्टिकोनातून महत्वाचे योगदान दिसून येते. यामध्ये आपण पुढील प्रमाणे विचार करु.

---

८१. पुरी सुनिल, मराठवाड्याच्या इतिहासाच्या पाऊलखुणा, पृ.१६

८२ तत्रैव.

## १.६.१ मराठवाड्यातील हिंदू मंदिरे

इ.स.पूर्व पहिल्या शतकापासून देवतायनाचे उल्लेख शिलालेखातून आढळतात. परंतु प्रत्यक्ष देऊळ मात्र सापडते ते इ.स.च्या चौथ्या शतकात मराठवाड्यातील मंदिराचा आढावा खालील प्रमाणे घेता येतो.

मराठवाड्यातील तेरचे मंदिर हे सर्वात जुने मानले जाते. याविषयी सु.ग. जोशी म्हणतात, "हे मंदिर मुख्यतः गुप्त व चालुक्य काळातील आहे. त्रिविक्रमाचे हे मंदिर गावात असून त्यात गर्भगृह, विटांच्या भिंती व सपाट छपरांचा बंदिस्त मंडप ही दिसतो. मुलतः हे मंदिर बौध्द असून पुढे हिंदू झाले."[८३] डॉ. प्रभाकर देव म्हणतात, "महाराष्ट्रातील मंदिर शिल्प स्थापत्य परंपरेचा प्रारंभ तेर येथील या त्रिविक्रम मंदिरापासून होतो मंदिर स्थापत्य विकासाचे काही निर्णायक टप्पे दर्शविणारी मंदिरे ५ व्या, ६ व्या शतकात बांधलेली येथेच आढळतात."[८४] लातूर जिल्ह्यातील निलंगा येथील निळकंठेश्वराचे मंदिर प्रसिध्द आहे. याचे स्थापत्य प्रामुख्याने चालुक्य होयसळ पध्दतीचे आहे. मंदिराचा मंडप चौकोनी आकाराचा आहे. १६ खांब आहेत. खांबावर रामायण-महाभारतातील काही कथाप्रसंग शिल्पीत केलेले आहेत.

नांदेड जिल्ह्यातही अनेक ठिकाणी प्राचीन हिंदू मंदिरे आढळतात. त्यामध्ये कंधार, सगरोळी, माहूर, होट्टल आदि ठिकाणी मंदिरे ही आढळतात. यामध्ये होट्टल येथील "सिध्देश्वर मंदिरातील नंदीमंडपात उत्तर कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील राजा विक्रमादित्य सहावा याच्या कारकिर्दीतील एक संस्कृत शिलालेख इ.स. १९५९ मध्ये मिळाला. हा शिलालेख इ.स. ११२० मधील आहे. हा शिलालेख अश्वयुज अमावस्येच्या सूर्यग्रहणानिमित्त दिलेल्या दानाचा उल्लेख करतो या शिलालेखात सिध्दगी याने सिध्देश्वर मंदिर बांधल्याचा व कार्तिकी पोर्णिमेला लक्ष्मणाने सदरील लेख लिहिल्याचा उल्लेख आहे."[८५] हे मंदिर कल्याणीच्या चालुक्यांच्या

---

८३. जोशी सु.ग., पूर्वोक्त, पृ.२६

८४. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११४

८५. Epigraphia Indica, Vol. XXXVI, p.164.

काळातील नांदेड परिसरातील मांडलिक वन्हिकुल राजकुल होते यांनी बांधल्याचा उल्लेख आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातही अनेक मंदिरे आहेत यामध्ये अन्वा या ठिकाणी पंचमुखी महादेव मंदिर आहे. सुधीर कोर्टीकर म्हणतात, "शिल्पकलेचा अप्रतिम नमुना अस वर्णन करावे इतकं सुरेख असणार हे अन्वाच पंचमुखी महादेवाच मंदिर गाभाऱ्यात असणारी पंचमुखी महादेवाची ती सुरेख पिंड पाहूनच भक्तगन सुखावून जातात. महादेवाच्या त्या पिंडीचा आकारही अत्यंत कोरीव कातीव रेखीव असाच आहे. खेळणा नदीच्या तिरावर वसलेले, निसर्ग देवतेने आपला वरदहस्त ठेवलेले हे पंचमुखी महादेव मंदिर षटकोणी अशा आकाराचे आहे."[८६]

बीड जिल्ह्यातही अनेक मंदिरे आहेत त्यात सुधीर कोर्टीकर बीड येथील कंकालेश्वर मंदिराविषयी म्हणतात, "बीड मधील हे कंकालेश्वर मंदिर संपूर्णतया हेमाडपंथी बांधणीचा उत्तम नमुना आहे. अमृतसरचे सुवर्ण मंदिर तसेच खजुराहोचे महादेवाचे मंदिर या दोन्ही मंदिराचा सुरेख संगम मंदिराची रचना हेमाडपंथी, चारी बाजूना पाणी असून मंदिरात प्रवेश करण्यासाठी दगडी पुलाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. पावसाळ्याच्या वेळी हा छोटासा पुलही पाऊस वाढल्यास पाण्याखाली जातो. अशावेळी मात्र बरेच भक्तगन, पुजारी पोहत, पोहत मंदिरात जातात आणि नित्याची पुजा अर्चा करतात."[८७]

तसेच प्राचीन काळातील मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथे नागनाथाचे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मंदिर होय. मंदिर अत्यंत भव्य व प्रचंड आहे. त्याची पुनर्बांधणी तीन वेळा झालेली दिसते. याचे अधिष्ठाण कीर्तिमुख, गज, अश्व आणि नरथरांनी युक्त आहे. परळी तालुक्याच्या ठिकाणी वैजनाथाचे मंदिरही भव्य आहे. येथील पायऱ्या या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. रेणापूर तालुक्यातील पानगाव या ठिकाणी विठ्ठलाचे मंदिर अप्रतिम आहे. तसेच परळी तालुक्यातील धर्मापुरी या ठिकाणी केदारेश्वर व इतर मंदिरे अप्रतिम शिल्पांनी

---

८६. कोर्टीकर सुधीर, मराठवाड्यातील मंदिरे, पृ.७१
८७. तत्रैव, पृ.७३

नटलेली आहेत. अंबाजोगाई, वेरुळ, अजिंठा, पितळखोरे खरोसा आदि ठिकाणी मंदिरे आहेत. तसेच परभणी जिल्ह्यात चारठाणा गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगावचे मंदिर अशी अनेक ठिकाणी मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात ही मंदिरे असलेली आपल्याला अभ्यासाअंती समजण्यास ही मोलाची मदत होते.

### १.६.२ मराठवाड्यातील जैन व बौध्द मंदिरे

मराठवाड्यात परभणी जिल्ह्यात जिंतूर पासून ४ कि.मी. अंतरावर उत्तरेला नेमगिरी हे दिगंबर पंथीय जैनाच्या लेण्याचे ठिकाण आहे. नेमगिरी पहाडात २० फूट खोल जैनधर्मीय सात गुंफा आहेत. पहिल्या मुनिगुंफेत तीन फुट उंचीची महाविरांची मूर्ती असून त्यालगतच २४ तीर्थकारांच्या चोवीस मूर्तीचा समूह आहे. त्यास चोवीस मूर्ती म्हणतात येथील पारस महिमा नावाच्या पुस्तकात ऐतिहासिक पोवाड्यानुसार-

"जिंतूर नेमगिरी बसला जय नेमिनाथ जय बोला
परभणी नजिकचे स्थान श्री नेमगिरी जिंतूर
ऐश्वर्य-संपदायुक्त हे जैनांचे जिनपूर
येथील संपदा होती - जिनमंदिर जैनिफार"[८८]

अशा प्रकारच्या नेमिनाथाचा मोठा पोवाडा येथील संस्थानाने प्रकाशित केला आहे.

तसेच वेरुळलाही लेणी क्र. ३०-३४ अशा पाच लेण्या जैनांच्या आहेत. राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष पहिला हा जैन धर्माचा पुरस्कर्ता होता. त्याने जैन धर्माला आश्रय दिल्याने अनेक विद्वान नव कलाकार या परिसराकडे आकर्षित झाले. त्यांच्या काळात अनेक जैन लेण्या निर्माण झाल्या. श्री यशपाल जैन म्हणतात, "इतिहास तज्ञांचे असे अनुमान आहे की, साधारण आठव्या शतकातील प्रसिध्द 'एलाचार्य' यांनी येथील भूभागाला आपल्या पूनीत

---

८८. पारस महिना, श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र नेमगिरी संस्थान, जिंतूर, पृ.१०

विहाराने पवित्र केले होते. या आचार्याच्या नावामुळेच या गावाला 'एलापूर' असे नाव प्राप्त झाले असावे. 'एलाचार्य' हे भगवत जिनसेनाचार्याच्या गुरुंचे नाव होते."[८९]

जैन धर्माचा मराठवाड्यात प्रसार होण्यामागे येथील राजांनी राजाश्रय दिला होता. यांच्या अगोदरच प्राचीन काळात मोरवंचिकर म्हणतात, "चंद्रगुप्त व भद्रबाहू हे दोघेही श्रवणबेळगोळला जाताना पैठण या ठिकाणी काही काळ थांबले होते."[९०] याने जैन धर्माचा स्वीकार केला होता. चंद्रगुप्ताबद्दल माटे म.श्री. म्हणतात, "दक्षिण भारतामध्ये जैन धर्माचा प्रसार यानेच केला."[९१] चंद्रगुप्त मौर्या प्रमाणेच सातवाहन, राष्ट्रकुट,चालुक्य यांच्याही काळामध्ये जैन धर्मपीठांचा विकास झाला. वेरुळ, कंधार, जिंतूर, धर्मापुरी, कुंथलगिरी आदि ठिकाणी जैनांची ठिकाणे असल्याचा उल्लेख आहे. अरुण दळवे म्हणतात, "सातवाहन सम्राटांनी जैन धर्माला व जैन पंडितांना आश्रय दिल्याने जैन धर्माचा प्रसार होण्यास मदत झाली या काळात पैठण, तेर व धाराशिव ही प्रसिध्द जैनपिठे होती."[९२] या जैन पिठांमुळे मराठवाड्यातील जैन धर्माच्या प्रसाराला वेग आला अनेक लहान-मोठी ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी जैनांच्या वेगवेगळ्या मूर्ती मिळतात.

नांदेड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पार्श्वनाथाच्या मूर्ती मिळाल्या आहेत. पार्श्वनाथाला चौवीस तीर्थंकारामध्ये स्थान दिलेले आहे. ह.धी. सांकलीया म्हणतात, "पार्श्वनाथ हे जैन धर्मातील चोविसावे तीर्थंकर होते."[९३] पार्श्वनाथाच्या बहुतांशी नागफना असलेल्याच मूर्ती मिळाल्या आहेत. वा.श. अग्रवाल म्हणतात, "पार्श्वनाथाच्या डोक्यावर ५, ७ आणि ९ नागफण्या दाखविल्या जातात."[९४] जैनांच्या विविध प्रकारच्या मूर्ती या आपणाला वेगवेगळ्या अंगाने अभ्यासावयास मिळतात. मराठवाड्यातही त्यांच्या अनेक ठिकाणी मूर्ती सापडतात.

---

८९. जैन यशपाल, जयपूर-एलोरा येथील ऐतिहासिक लेण्या, पृ.१५
९०. Morwanchikar R.S., The city of the Saints Paithan through the ages, p.47
९१. माटे म.श्री., मध्ययुगीन महाराष्ट्र, पृ.३९
९२. दळवे अरुण, राष्ट्रकुट कालीन कंधार, पृ.१६९
९३. सांकलिया ह.धी., भारतीय पुरातत्व - एक समालोचन, पृ.४८
९४. अग्रवाल वा.श., भारतीय सर्वेक्षण, पृ.१२

डॉ. कठारे नगराळे म्हणतात, "जैन धर्माप्रमाणेच मराठवाड्यात बौध्द धर्माचा प्रसार झाला. मराठवाड्यात अनेक ठिकाणी मिळालेले बौध्द धर्मीय शिल्पावशेष व मंदिराचे अवशेष तसेच वेरुळ व अजिंठा तसेच उस्मानाबादमध्ये तेर येथेही मोठ्या प्रमाणात हे अवशेष मिळाले आहेत."[९५] अजिंठा येथील लेणी क्रमांक एक मधील सर्वोत्तम कलाकृती म्हणजे पदमपानी बोधीसत्वाची होय. लेणी क्र. १० लेणी क्र. १४, १७ यामध्ये गौतम बुध्दाच्या जीवनातील अनेक प्रसंग कलापूर्ण रेखाटले आहेत. तसेच वेरुळ येथील १ ते १२ क्रमांकाच्या लेण्यांचा गट बौध्द लेण्यांचा आहे. या सर्व लेण्या महायान पंथाच्या आहेत. १० व्या लेणीला 'विश्वकर्मा लेणी' असे म्हणतात ते एक चैत्य मंदिर आहे. याचे प्रवेशद्वार शिल्पाचा एक उत्तम नुमना आहे.

तसेच औरंगाबाद येथेही लेण्या क्र. १ ते ३ या बौध्द धर्मीय असून त्यात बोधीसत्व पद्मपानी वज्रपानी, नागराज, नागराणी इ. मूर्ती आहेत. लेणी क्र. २ च्या गाभाऱ्यात अभयमुद्रेत अडीच मिटर उंचीची बुध्द मूर्ती आहे. दाराच्या डाव्या बाजूला पदमपानी व उजव्या बाजूला वज्रपानी हे द्वारपाल आहेत. लेणी क्र. ४ मध्ये फक्त स्तूप व चैत्य आहे. त्यामुळे ही लेणी हीनयान पंथाची आहे. सातव्या क्रमांकाच्या लेणीमध्ये गौतम बुध्दाची मूर्ती मनमोहक असून त्याच्या दोन्ही बाजूला द्वाररक्षक आहेत.

अशा प्रकारे हिंदू, जैन आणि बौध्द मंदिरे ही मराठवाड्याच्या सांस्कृतिक इतिहासात किती महत्वपूर्ण भूमिका बजावतात हे आपल्या लक्षात येते.

### १.६.३ मराठवाड्यातील वास्तुकलेचे अभिन्न अंग म्हणजे किल्ले/दुर्ग

किल्ले बांधण्याची प्रथा प्राचीन काळातही रुढ होती. शत्रूपासून संरक्षण व भोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने किल्ल्यांना अतिशय महत्व होते. किल्ला आणि तत्कालिन क्षेत्रीय वर्ग यांचे नातेच काही वेगळे होते. देवगिरीच्या किल्ल्याविषयी नरहर शेषेराव पोहनेरकर म्हणतात, "एखाद्या निस्पृह कर्मयोग्याप्रमाणे दणकट मनगट आणि कणखर

---

९५. कठारे नगराळे, पूर्वोक्त, पृ.४१६

ध्येयनिष्ठा यांनी तो नेहमीच जसा हसला आहे. तसाच स्वार्थी अंगचोऱ्यांच्या फंदफितूरीकडे पाहून त्याने दुःखाश्रुही गाळलेले आहेत."[९६]

किल्याविषयी भारतरत्न पा.वा. काणे म्हणतात, "राजधानी आणि दुर्ग यांना राष्ट्रानंतरचे स्थान दिले आहे. देशाच्या भरभराटीचे प्रतिबिंब राजधानी मध्ये दिसून येत असे. आणि राजधानीच्या सभोवती चांगला कोट बांधलेला असला तर तिच्या योगाने देशाला देखील सुरक्षितता मिळत असे."[९७] यावरुन राजधानी आणि दुर्गाला मानवी जीवनात फारच अमूल्य असे स्थान प्राप्त झालेले दिसते. संरक्षण व्यवस्था पूर्णपणे या किल्यांच्याभोवती केंद्रीत होती असे आपणाला म्हणता येते.

मराठवाड्यात परांडा, उदगीर, दौलताबाद, माहूर, औसा, नळदुर्ग,जिंतूर, नांदेड, कंधार, धर्मापुरी, इ. ठिकाणी किल्ले आहेत. त्यापैकी बहुसंख्य भग्न अवस्थेत आहेत तर काही किल्ले दिमाखाने ऐतिहासिक वारसा जोपासत असलेली दिसून येतात. त्यामध्ये माहूरचा किल्ला हा किल्ला किनवट तालुक्यात आहे. आज तो किल्ला उध्वस्त अवस्थेत आणि प्रचंड वाढलेल्या वनराईशिवाय येथे फारसे काही शिल्लक दिसत नाही.

तसेच उस्मानाबाद पासून ४६ कि.मी. अंतरावर हा नळदुर्गचा किल्ला स्थित आहे. किल्याचे बांधकाम इ.स. १३०० मध्ये झाले आहे. बोरी नदीच्या किनाऱ्यावर किल्याचे भक्कम बांधकाम झालेले आहे. डॉ. के.डी. कावडकर म्हणतात, "किल्याच्या तिन्ही बाजूंनी भक्कम व सरळरेषेत खडकांनी व्यापलेला डोंगर आहे तरी देखील किल्याच्याभोवती संरक्षक खंदक आहे. किल्याच्या आत बऱ्याचशा उध्वस्त इमारती, कारंजी, पाण्याचे हौद आदी दिसून येतात. किल्याच्या एका अलिशान महालाच्या गच्चीवरुन पाण्याचा धबधबा खाली पडत असतानाचे दृश्य पावसाळ्यात पाहताना आगळावेगळा आनंद वाटतो. पर्यटकांसाठी 'जलमहाल' म्हणजे अद्‌भूत आकर्षण मानले जाते. नळदुर्ग किल्याच्या बुरुजावर तोफांची देखील अवस्था

---

९६. जोशी सु.ग., पूर्वोक्त, पृ.७
९७. भारतरत्न पा.वा. काणे, पूर्वोक्त, पृ.४२८

पाहावयास मिळते. या स्वरुपाची व्यवस्था काही निवडक किल्यांच्यावरच असल्याचे दिसून येते. नळदुर्ग किल्यास बराच जुना इतिहास आहे. चालुक्य काळात या किल्याचे महत्वपूर्ण स्थान होते. चालुक्याची राजधानी कल्याणीपासून नळदुर्ग चा किल्ला जवळच आहे. हा किल्ला इ.स. १३५१ ते १४८० या काळात बहामनी सम्राटांच्या ताब्यात होता."[९८] अशा प्रकारे हा किल्ला मराठवाड्याच्या राजकारणाचे एके काळी केंद्र होता. हाच किल्ला पुढे काही काळ विजापूरकरांकडे राहिला. आणि पुढे औरंगजेबाकडे १६८० च्या सुमारास गेला आणि शेवटच्या काळात निजामानेही या किल्यावरुन आपले प्रशासन केलेले दिसते. असा हा नळदुर्गचा किल्ला चालुक्यांपासून ते निजामापर्यंतच नव्हे तर आजही या किल्ल्याची बाह्यस्थिती भक्कम असलेली दिसून येते.

तसेच मराठवाड्यातील महत्वपूर्ण किल्यात परांडा किल्याचे स्थान महत्वाचे आहे. "उस्मानाबाद जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण असलेले परांडा, गावाच्या मध्यभागी परांडा भूईकोट किल्ला आहे. बहामनी काळात परांड्याचे महत्व खूप वाढले. बहामनी सम्राटाचा वजीर महंमद गावान याने इ.स. १४७७ मध्ये हा भव्य किल्ला बांधला किल्याभोवती प्रचंड खंदक आहे. किल्यास एकूण २६ बुरुज व अत्यंत मजबूत तट आहे. कवींद्र परमानंदाने आपल्या शिवभारतामध्ये किल्याचा उल्लेख प्रचंड पूर असा केला आहे."[९९] अशाच प्रकारे "नांदेड जिल्ह्यातील एक चांगला भूईकोट किल्ला म्हणजे कंधारचा किल्ला होय. गावाच्या मध्येच असलेल्या या किल्याभोवती ९० फुट रुंदीचा प्रचंड खंदक असून बाराही महिने खंदक पाण्याने भरलेला असतो. १५ फुट खोलीच्या या खंदकात अनेक जीवंत झरे असावेत या किल्याचे मुख्य बांधकाम राष्ट्रकुट नृपती कृष्ण तिसऱ्याच्या काळात झाले आहे. पुढे राष्ट्रकुट चालुक्य-यादव या काळात अनेक स्थित्यंतरे घडत गेली."[१००]

---

९८. कावडकर के.डी., मराठवाड्यातील किल्ले, पृ.६१-६२.
९९. तत्रैव, पृ.६४
१००. तत्रैव, पृ.६५

अशा प्रकारे मराठवाड्यात एकूण २५ किल्ल्यांचे संदर्भ पाहावयास मिळतात. त्यात औरंगाबाद जिल्ह्यात १०, बीड जिल्ह्यात ४, नांदेड जिल्ह्यात ३, उस्मानाबाद जिल्ह्यात २, लातूर जिल्ह्यात २, जालना जिल्ह्यात २, परभणी जिल्ह्यात २ अशी वर्गवारी आहे. वर आलेल्या किल्ल्यांचे संदर्भ सोडून औरंगाबाद जिल्ह्यात आभासगड, असई, बैतुलवाडी (वेताळवाडी), दुदमाळ,पंढरपूर, सौताडा, अंतूर, शहाबाद, भंडारगड, परभणी जिल्ह्यात जिंतूर, पाथरी, जालना जिल्ह्यात जालना, रोहिलागड, बीडमध्ये आडस, कडा आणि वडगाव इत्यादी किल्ल्यांचे संदर्भ पाहावयास मिळतात.

अशा रितीने मराठवाड्यातील किल्ल्यांनी प्राचीन काळापासून ते निजामी राजवटीपर्यंत लष्करी व संरक्षणदृष्ट्या हालचालीत बजावलेली भूमिका लक्षात येते.

## १.७ मराठवाड्याला लातूर आणि बीड जिल्ह्याचे योगदान

साऱ्या मराठवाड्याचे नव्हे तर महाराष्ट्राचे लक्ष आपणाकडे खेचून घेणारे जिल्हे म्हणून लातूर आणि बीड या जिल्ह्याचे महत्व आहे. या दोन्ही जिल्ह्यांना प्राचीन इतिहास तर आहेच पण चालू काळातही ही जिल्हे मागे नाहीत. म्हणून आपणाला इतिहास लेखनशास्त्राच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर या जिल्ह्यांनी भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचा दुवा साधलेला दिसून येतो.

या दोन्ही जिल्ह्यांचा इतिहास जसा मोठा आहे. तसाच येथील भूगोलही विशाल आहे. आणि प्राणी सृष्टीचा विकास होण्यासाठी त्या त्या परिसरातील भौगोलिक रचना फार महत्वाची मानली जाते. बीड जिल्ह्यातून वैनगंगा, गोदावरी तर लातूर मधून मांजरा व मन्याडसारख्या नद्या वाहतात. या नद्या महत्वाचे योगदान देतात. शास्त्री चित्राव महादेव म्हणतात, "देशातील बदलत्या हवामानाचा प्रभाव मानवी जीवनावर पडतो. त्यात प्रामुख्याने नद्यांचा उल्लेख करावा लागतो. मानवाच्या शरीर व्यवस्थेत ज्याप्रमाणे रक्तवाहिन्यांचे काम महत्वपूर्ण असते त्याच प्रमाणे मानवाच्या सांस्कृतिक वाटचालीचे अस्तित्व पर्यावरणावर

आधारित असते. असे म्हणावे लागेल."[१०१] एवढेच नव्हे तर मोरवंचीकर म्हणतात, "भारतीय संस्कृतीचा विचार केला असता या संस्कृतीत भारतीय नद्या लोकांना उपजिविकेची साधने उपलब्ध करुन देणाऱ्याच ठरल्या आहेत. त्याची साक्ष इतिहास देतो."[१०२] अशाच प्रकारे या जिल्ह्यांमध्ये आपले योगदान या नद्या देतात त्यामुळे संस्कृती जोपासण्यास मोलाची संधी मिळाली. ऐतिहासिक दृष्टिनेही या जिल्ह्यांचा फार जुना पुरावा मिळतो. डॉ. कठारे / नगराळे म्हणतात, "लत्तत्तूर (लातूर) नगराचाही राष्ट्रकुटांच्या ताम्र शिलासनात उल्लेख आढळतो." राष्ट्रकुटांच्या मूळ घराण्याविषयी फारच मोठ्या प्रमाणात विचार मंथन झाले. मुजूमदार आर.सी. म्हणतात, "त्यांचे मुळ घराणे 'लत्तलूरपूर' म्हणजे सध्याचे लातूरचे होते."[१०३] लातूर जिल्ह्याप्रमाणे बीड जिल्ह्याचाही इतिहास फार जुना असल्याचे समजते.

बीड जिल्ह्याच्या इतिहासाविषयी सांगावयाचे झाले तर महाराष्ट्र शासन गॅझ ेटिअरमध्ये "सध्याच्या बीड जिल्हा मुख्यालयाचे मूळ नाव 'विल' असावे या स्थल नामाचा सर्वात प्राचीन उल्लेख सातव्या शतकातील बदामीच्या चालुक्यांच्या ताम्रपटात आढळतो. पंढरपूरच्या चौऱ्यांशीच्या शिलासनात देशविभागाचे मुख्यालय म्हणून याचा उल्लेख आहे. बीड म्हणजे राजधानी किंवा तळ त्याचा असा अर्थ होतो. त्यावरुन सहाव्या/सातव्या शतकात बीड ही एखाद्या मांडलिक राजाची राजधानी असावी बीड नगरीच्या जुन्या नावाचा व संदर्भीत पौराणिक माहितीचा उल्लेख 'पद्मावती महात्म्य' यात आहे."[१०४] याच्याही पुढे जाऊन या नगरीचा विचार करावयाचा असेल तर "बीड हे महाभारतामध्ये दुर्गावती नगरी, सातवाहन काळात बिलीनी, चालुक्य काळात चंपावती, कलचुरी कालात बिज्जल बीड, चक्रधर काळात श्रीवर्धनपूर, चंपकपुरी, भीर इ. विविध नावांनी विविध काळात ओळखल्या जात होते."[१०५]

---

१०१. शास्त्री, चित्राव महादेव, प्राचीन भारतीय स्थलकोश, पृ.५१
१०२. मोरवंचीकर रा.श्री., दक्षिणकाशी पैठण, पृ.४
१०३. Mujumdar R.C. (Edi.), The Age of Imperial Kanouj, Bombay, p.1
१०४. महाराष्ट्र शासन, बीड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, पृ.६
१०५. तत्रैव.१२-१३

अशा अनेक नावांनी प्राचीन काळात बीड नगरीला ओळखले जाते. या बीड जिल्ह्याचा इतिहास फार प्राचीन आहे. तर तो कसा आहे याचा अभ्यास अनेक संशोधकांनी केला आहे.

डॉ. रा.श्री. मोरवंचीकर म्हणतात, "बीड हे सिंदफणाकाठी वसलेले असून, प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न हा जिल्हा करत आहे. सिंदफणेच्या काठी वसलेल्या बीड जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा आहे."[१०६] असा हा बीड जिल्हा राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अंगाने प्राचीन काळापासून मराठवाड्याला काहीतरी देणगी देत आलेला आहे. त्यामुळे या भागात अर्थातच लातूर असो किंवा बीड असो या दोन्ही जिल्ह्यामध्ये शिलालेख ताम्रपट मोठ्या प्रमाणावर मिळतात. यावरुनही आपणाला या जिल्ह्यांना ऐतिहासिक वारसा आहे. असे म्हणता येते. गणेशवाडी, धर्मापुरी, अंबाजोगाई अशा ठिकाणी शिलालेख सापडतात आणि ही इतिहासाची साधने आपला इतिहास मांडण्यात मोलाची मदत करतात. या जिल्हयांमध्ये धर्मापुरी, परळी, अंबाजोगाई, धारुर, केसापुरी, पाली, यळमघाट, पाटोदा, पुरुषोत्तमपुरी, शिरुर कासार, पानगाव, निलंगा, खरोसा, उदगीर, औसा, लातूर आणि बीड इ. ठिकाणी मराठवाड्याच्या इतिहासाला योगदान देणारी धागे-दोरे मोठ्या प्रमाणात सापडतात.

## १.८ मराठवाड्याला धर्मापुरी व पानगावची देणगी

ज्याप्रमाणे आपण आताच अभ्यास केला की लातूर आणि बीड या दोन जिल्ह्याचे ऐतिहासिक योगदान मराठवाड्याला कसे आहे त्याचप्रमाणे धर्मापुरी व पानगाव या दोन ठिकाणांचे योगदान किंवा देणगी मराठवाड्याला आहे. धर्मापुरी हे जसे ऐतिहासिक गाव आहे. तसेच पानगावही ऐतिहासिक गाव आहे. धर्मापुरी या गावात एकूण सहा शिलालेख प्राप्त झाले त्यामध्ये एक अवाचणीय चार कन्नड व एक देवनागरी लिपीत प्राप्त झाला. या ठिकाणचा संबंध इतिहास यामुळे अभ्यासकांपुढे आला. धर्मापुरीच्या बाबतीत डॉ. पी.व्ही. काटे म्हणतात, "चालुक्यांच्या काळात धर्मापुरीला प्रशासकीय व व्यापारी केंद्र म्हणून महत्व प्राप्त झालेले

१०६. मोरवंचीकर रा.श्री., बीडच्या ऐतिहासिक व्यक्तीमत्वाचे पैलू, पृ.३१

होते."[१०७] या ठिकाणी ऐतिहासिक वाटचालीबरोबरच व्यापार अर्थातच आर्थिक घटकालाही महत्व दिलेले दिसते. प्रशासकीय महत्वही दिलेले समजते.

चालुक्य राजा तिसरा सोमेश्वराचा शिलालेख या धर्मापुरी गावात मिळाला. यावरुन राजकीय व अनेक अंगांना स्पर्श करणारा इतिहास सापडतो. धर्मापुरी या ठिकाणी अनेक ऐतिहासिक अवशेष तेथे गेल्यानंतर आपल्या निदर्शनास येतात. जे की, इतिहासाची मुळाक्षरे म्हणून आपणाला इतिहास रचण्यास मदत करतात. या ठिकाणी चालुक्यांनी फार मोठ्या प्रमाणात विकास केलेला दिसून येतो. चालुक्य राजांच्या मुख्य दोन शाखा मानल्या जातात. बदामीचे चालुक्य व कल्याणीचे चालुक्य यामध्ये कल्याणीच्या चालुक्यांच्या कालखंडात या गावाचा विकास घडून आलेला दिसतो.

डॉ. कठारे व नगराळे या गावाचे वर्णन करताना म्हणतात, "बीड जिल्ह्यातील परळी या तालुक्यातील "धर्मापुरी" हे गाव असून ते अंबेजोगाई-अहमदपूर रस्त्यावर अंबेजोगाईपासून तीस कि.मी. अंतरावर आहे. हे गाव प्राचीन असून ती कल्याणीच्या चालुक्याच्या काळातील एक इंद्र नगरी होती."[१०८] अशा प्रकारे धर्मापुरी या गावाला धर्मपुरी किंवा इंद्रनगरी असेही म्हटले जाते. कारण प्राचीन काळामध्ये धर्मापुरी या ठिकाणी सर्वच क्षेत्रामध्ये प्रगती झालेली दिसून येते. त्यामुळेच कदाचित या गावाला इंद्रनगरीची उपमा ही मिळाली असावी. परंतु अनेक संशोधकांनी ही नगरी इंद्राच्या इंद्रनगरीशी स्पर्धा करणारी चालुक्यांची भूगोलावर अस्तित्वात असलेली नगरी असा उल्लेख केलेला आहे. याचे पुरावेही मिळालेले आहेत.

अशाच प्रकारचे दुसरे गाव म्हणजे लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील रेणापूर-धर्मापुरी मार्गावर पानगाव नावाचे गाव आहे. हे पण गाव प्राचीन असलेले तत्कालीन स्मारकांवरुन स्पष्ट होते. डॉ. कठारे, नगराळे म्हणतात, "पानगाव येथील जिल्हा परिषदेच्या

---

१०७. काटे पी.व्ही., पूर्वोक्त, पृ.७०

१०८. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.३७७

जवळच चालुक्य काळातील 'विठ्ठल मंदिर' आहे."[१०९] अशा प्रकारे चालुक्यांच्या काळातील येथील मंदिर स्मारकावरुन असे स्पष्ट करता येते की, पानगाव हे गाव देखील प्राचीन आहे.

अशा प्रकारची स्मारके ही फक्त पानगाव व धर्मापुरी येथेच आहेत का? तर के.डी. कावडकर म्हणतात, "हा सांस्कृतिक वारसा मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यात व्याप्त असून तो ऐतिहासिक किल्ले, लेणी, समाध्या, मशिदी, मकबरे, घुमट, दर्गे, इदगाह, बागा, महाल, राजवाडे, मंदिरे, बारादरी, गुरुद्वारा, तटबंदी व वेशी (दरवाजे) सराई, तळे-पुष्कर्णी, बारव, पवनचक्की, गरम पाण्याचे झरे, हमाम (स्नानगृहे), हत्तीखाना, दीपमाळ, विजयस्तंभ, मार्गदर्शक व अन्य शिलालेख, मूर्तिशिल्प; पुरातन कलाकृती, प्राचीन नाणी, हस्तलिखीत व पुरातत्वीय स्थळे इत्यादींच्या स्वरुपात अस्तित्वात आहेत."[११०]

अशा प्रकारे मराठवाड्याचा इतिहास संपन्न करणारे सांस्कृतिक कलावैभव हे मराठवाड्याला येथील स्मारकांवरुन आपणाला अभ्यासण्यास मदत होते. पानगाव या ठिकाणी विठ्ठल-रुक्मिनी मंदिर, पंचकुंड महादेव मंदिर, बालाजी मंदिराच्या शेजारचा बारव, हनुमान मंदिराच्या परिसरातील शिल्पकला, पन्नगेश्वर मंदिरातील महाकाय असे शिवलींग याची साक्ष दिल्याशिवाय रहात नाही. येथील विठ्ठल मंदिर तर मूर्तीशिल्पांनी अलंकृतच केले आहे की काय असा संशोधकाला भास झाल्याशिवाय रहात नाही. मग ही ठिकाणे मराठवाड्याला खरोखरच देणगी ठरलेली दिसून येतात.

---

१०९. तत्रैव, पृ..३७८

११०. कावडकर के.डी., ऐतिहासिक स्मारके अवशेष पुरातत्वीय स्थळांच्या रुपाने, पृ.४९-५०

**संदर्भ :**


१. कॉलिंगवुड, आर.जी., कलेची मुलतत्वे, (अनुवाद-मालशे स.गं., मालशे मि.स.) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ., डिसेंबर, २००४, पृ.३४३.

२. बदलवा बा.सी., प्राच्य सिध्दांत अर्थात भारतीय संस्कृतीचा शोध, विद्याभारती प्रकाशन गींताजली मार्केट जवळ, मेन रोड, लातूर, १९९४, पृ.क्र.३३८-३४०.

३. पठाण यू.म., संत साहित्य चिंतन, अलमास पठाण, आनंदनगर, घाटी औरंगाबाद, मार्च, १९८३, पृ. ३५

४. माटे म.श्री., प्राचीन भारतीय कला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्र.आ., डिसें. १९७४, पृ.१०१

५. कॉलिंगवुड आर.जी., पूर्वोक्त, पृ.३१५.

६. गोगटे एस. तगवाले, मानव्यविद्या व ललित कलांचा परिचय, डॉ. राजेंद्र वडनेरे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्र.आ., ऑक्टो. २०००, पृ.१५.

७. चव्हाण उदाजीराव, खजुराहोची मंदिर शिल्पे, सौ. नंदिनी तु. गवळी, नववडेमाळ प्रतिभा नगर, पिछाडीस सागरमाळ, कोल्हापूर, जून १९८२, पृ.१-२

८. जोशी नी.पु., भारतीय मुर्तिशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे, १९७९, पृ.२४.

९. माढेकर रा.ब., गोदातटीचे कैलास लेणे, (कै. नरहर कुरुंदकर स्मृतीग्रंथ), मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, इसामिया बाजार, हैद्राबाद, नोव्हें. १९८३, पृ.क्र. १०६-१०७.

१०. गोगटे, तगवाले, पूर्वोक्त, पृ.१६

११. सिंगारे ए.जी., दक्षिण भारताचा इहितास (इ.स.पू. २३०-१३८१), के.एस. अतकरे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, १९९७, पृ.१९६.

१२. देव प्रभाकर, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक अंक, वार्षिकांक, १९७५, पृ.१०

१३. प. जपेशास्त्री रंगनाथ, महाराष्ट्र संस्कृती आणि मराठी भाषा, (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन आनंदी स्वामीमार्ग, जालना, १९८८, पृ.२४२.

१४. तत्रैव, पृ. २४३.

१५. बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, २००४, पृ.३८

१६. मोरवंचीकर, व्यास पी.सी., भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत), रेणुका प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, २००३, पृ.३१३

१७. काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.२०५

१८. डिसकळकर द.बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती,पुणे विद्यापीठ, पुणे, १९६४, पृ.९९.

१९. तत्रैव, पृ.९९

२०. मालकर अंजली, संगीत साधना, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक - दिनकर व्यंकटेश कोरान्ने, औरंगाबाद, २००६, पृ.१४३.

२१. मोरवंचीकर, व्यास पी.सी., पूर्वोक्त, पृ.४३२.

२२. आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, १९६७, पृ.१६०

२३. मोरवंचीकर, व्यास पी.सी., पूर्वोक्त, पृ.४०२

२४. आहेर सोमनाथ, गोदातटीची लोककला, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक - दिनकर व्यंकटेश कोरान्ने, औरंगाबाद, २००६, पृ.९१.

२५. मार्डीकर एम.एम., भारताचा इतिहास (इ.स. ६५०-१५५०), विद्या बुक प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, २००२, पृ. ३१८

२६. आहेर सोमनाथ, पूर्वोक्त, पृ.९९

२७. पाठक अरुणचंद्र (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड-१), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, गोविंद स्वरुप अध्यक्ष, संपादक मंडळ, दर्शनिका, प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्र.आ. इंग्रजी १९६७, मराठी आवृत्ती २००२, पृ.६७९.

२८. मार्डीकर एम.एम., पूर्वोक्त, पृ.२९१

२९. Smith V.A., Rulers of India, Asoka, Delhi, S. Chand and Company, Third Reprint, 1970, pp.40-41.

३०. Wauchope R.S., Buddhist Cave Temples of India, Calcutta, 1933, p.21.

३१. Barua D.K., Vihars in Anciant India, Calcutta, 1969, p.12.

३२. देव शा.भा., पुरातत्त्वविद्या, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूरसाठी रत्नाकर अनंत कुलकर्णी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७६, पृ.११८-१२०

३३. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन आनंदी स्वामीमार्ग, प्र.आ., जालना, १९८८, पृ.१०८.

३४. भांडवलकर, हनवते, मराठवाड्याचा इतिहास, अभिजित प्रकाशन, लातूर, १९९९, पृ.१८०.

३५. गोगटे, तगवाले, पूर्वोक्त, पृ.६८.

३६. गोगटे, तगवाले, पूर्वोक्त, पृ.७०

37. Marshall John, Mohenjodaro and Indus Civilization, Vol.-I, London, 1931, p. 44

३८. Banerjea J.N., The Development of Hindu Iconography, Calcutta, 1956, p.176

३९. खरे ग.ह., संशोधकाचा मित्र, भाग पहिला, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९५१, पृ.१७६

४०. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९६

४१. चव्हाण उदाजीराव, पूर्वोक्त, पृ.२

४२. तत्रैव, पृ.४

४३. दाभाडे बाळकृष्ण, कला-साधना, पुणे, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६१, पृ.२३

४४. भारतीय संस्कृती कोष, खंड दुसरा, भारतीय संस्कृती कोष मंडळ, पुणे, १९६४, पृ.१६०

४५. Brown, Percy, Indian Architecture (Buddists and Hindu Periods), Bombay, Taraporwala, 1965, p.1

४६. Rao K.S., The Times of India, Indus Valley Script Deciphred, Sept. 2, 1980.

४७. दीक्षित नी.सी. प्राचीन व मध्ययुगीन भारत, नागपूर, पिंपळापूरे अँड कं., १९८७, पृ.३

४८. Marshall John, op.cit, p.59

४९. चव्हाण उदाजीराव, पूर्वोक्त, पृ.६

५०. कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य (खंड दुसरा), पुनम प्रकाशन, कंधार जि. नांदेड, २००६, पृ.४

५१. Banerjea J.N., op.cit, p.86.

५२. जोशी पी.जी., प्राचीन भारत, अभय प्रकाशन, नांदेड, १९९७, पृ.२७९

५३. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.४७-४८.

५४. कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, डी.एन. बंडाळे प्रकाशन, नांदेड, १९९९, पृ.३७७

५५. माटे म.श्री., पूर्वोक्त, पृ.११०

५६. चव्हाण उदाजीराव, पूर्वोक्त, पृ.१९

५७. पाठक अरुणचंद्र, पूर्वोक्त, पृ. ६८०.

५८. तत्रैव

५९. Brown Percy, op.cit., pp. 19-30.

६०. Ibid.

६१. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११४

६२. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.क्र.१९६-१९८.

६३. मार्डीकर मदन, प्राचीन भारताचा इतिहास (इ.स. १००० पर्यंत), विद्या बुक प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, १९९७, पृ.३२७.

६४. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९७

६५. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.१०८.

६६. तत्रैव, पृ. १०८-१०९.

६७. जाधव एस.जी., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती प्रकाशन, नांदेड, २००३, पृ.५३५.

६८. अवलगावकर र.वा., महानुभाव साहित्यातील महाराष्ट्र, (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन आनंदी स्वामीमार्ग, जालना, १९८८, पृ.२२५

६९. भारतरत्न पा.वा. काणे, धर्मशास्त्राचा इतिहास, (अनु. यशवंत भट्ट), सचीव महारष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई, द्वि.आ., १९८०, पृ.४२८

७०. जाधव एस.जी., पूर्वोक्त, पृ.५४५

७१. देगलूरकर गो.बं., गोदा खोऱ्यातील लेणी, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक - दिनकर व्यंकटेश कोरात्रे, औरंगाबाद, २००६, पृ.४२

७२. तत्रैव, पृ.४९-५०.

७३. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११०.

७४. मिराशी वा.वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, सचीव महारष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई, १९७९, पृ.२०३.

७५. देगलूरकर गो.ब., पूर्वोक्त, पृ.४८

७६. तत्रैव, पृ.५९.

७७. जोशी सु.ग. (संपा.), मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन मराठवाडा संशोधन मंडळाकरिता, शिरुर ताजबंद, १९७४, पृ.१५

७८. क्षीरसागर मधुकर, दिंड्या आणि वाऱ्या, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक - दिनकर व्यंकटेश कोरात्रे, औरंगाबाद, २००६, पृ.१११-११२.

७९. पठाण यु.म., मराठवाड्याचा मिटलेला इतिहास, (संपा. राजेंद्र दर्डा), दैनिक लोकमत, औरंगाबाद, २० सप्टें. २००८, पृ.४

८०. बल्हेकर अभिजित, सातवाहनाचे तेर, (संपा. केतकर कुमार) दै. लोकसत्ता मधील लोकरंग पुरवणी, पृ.३

८१. पुरी सुनिल, मराठवाड्याच्या इतिहासाच्या पाऊलखुना, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, २००२, पृ.१६

८२. तत्रैव.

८३. जोशी सु.ग., पूर्वोक्त, पृ.२६

८४. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११४

८५. Epigraphia Indica, Vol. XXXVI, p.164.

८६. कोर्टीकर सुधीर, मराठवाड्यातील मंदिरे, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, २००२, पृ.७१

८७. तत्रैव, पृ.७३

८८. पारस महिना, श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र नेमगिरी संस्थान, जिंतूर, २००४, पृ.१०

८९. जैन यशपाल, जयपूर-एलोरा येथील ऐतिहासिक लेण्या, (संपा. अन्नदाते श्रेणिक) जैन ऐतिहासिक, सुमेरु प्रकाशन, डोंबीवली, २००३, पृ.१५

९०. Morwanchikar R.S., The city of the Saints Paithan through the ages, Delhi, Ajanta Publication, 1985, p.47

९१. माटे म.श्री., मध्ययुगीन महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ.३९

९२. दळवे अरुण, राष्ट्रकुट कालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, २००४, पृ.१६९

९३. सांकलिया ह.धी., भारतीय पुरातत्व - एक समालोचन, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ.४८

९४. अग्रवाल वा.श., भारतीय सर्वेक्षण, सारनाथ, दिल्ली, १९९२, पृ.१२

९५. कठारे, नगराळे, पूरवोक्त, पृ.४१६

९६. जोशी सु,ग., पूर्वोक्त, पृ.७

९७. भारतरत्न पा.वा. काणे, पूर्वोक्त, पृ.४२८

९८. कावडकर के.डी., मराठवाड्यातील किल्ले, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, २००२, पृ.६१-६२.

९९. तत्रैव, पृ.६४

१००. तत्रैव, पृ.६५

१०१. शास्त्री, चित्राव महादेव, प्राचीन भारतीय स्थलकोश, प्रास्ताविक, १९६९, पृ.५१

१०२. मोरवंचीकर रा.श्री., दक्षिणकाशी पैठण, पुणे, १९८५, पृ.४

१०३. Mujumdar R.C. (Edi.), The Age of Imperial Kanouj, Bombay, Bhartiya Vidya Bhavan, II, 1964, p.1

१०४. महाराष्ट्र शासन, बीड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, मुंबई, १९६०, पृ.६

१०५. तत्रैव.१२-१३

१०६. मोरवंचीकर रा.श्री., बीडच्या ऐतिहासिक व्यक्तीमत्वाचे पैलू, यशवंत स्मरणिका, २४ वे अधिवेशन मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, २००४, पृ.३१

१०७. काटे पी.व्ही., पूर्वोक्त, पृ.७०

१०८. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.३७७

१०९. तत्रैव, पृ..३७८

११०. कावडकर के.डी., ऐतिहासिक स्मारके अवशेष पुरातत्वीय स्थळांच्या रुपाने, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, २००२, पृ.४९-५०.

# प्रकरण - २

# बीड आणि लातूर जिल्ह्यातील शिल्पकलेचा इतिहास

प्रकरण दुसरे

# बीड आणि लातूर जिल्ह्यातील शिल्पकलेचा इतिहास

बीड आणि लातूर जिल्ह्यातील शिल्पकलेचा इतिहास अभ्यासावयाचा म्हटले की, या दोन्ही जिल्ह्यांतील ऐतिहासिक स्थळांचा व तेथील शिल्पकलेने नटलेल्या ऐतिहासिक वास्तूंचा आपणाला प्रामुख्याने अभ्यास करावा लागतो. लातूर आणि बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणे शिल्पकलेने नटलेले दिसून येतात. परंतु त्यांचा तपशिलवार आपणाला अभ्यास करावयाचा म्हटले की आपणाला एक - एक जिल्हा अनुक्रमे अभ्यासावा लागेल. त्यामध्ये अगोदर अस्तित्वात आलेला जिल्हा म्हणजे बीड आहे. त्याचा अभ्यास आपणाला अगोदर करावा लागेल.

मराठवाड्याच्या इतिहासात बीड जिल्हा हा कलेच्या बाबतीत एक संपन्न असा जिल्हा म्हणून ओळखल्या जातो हे निर्विवाद सत्य आहे. जसा हा जिल्हा इतर क्षेत्रांमध्ये इतिहास घडविण्यात पुढे आहे त्याचप्रमाणे कलेच्या दालनातही या जिल्ह्याचा लौकिक हा सर्वत्र पसरलेला आहे. या जिल्ह्यामध्ये शिल्पकला, चित्रकला आणि वास्तुकला या कलेच्या प्रकारांचा उत्तम असा संगम झालेला आपणाला जाणवल्याशिवाय राहात नाही. बीड जिल्ह्यामध्ये अनेक तीर्थक्षेत्रे देखील नावारुपास आलेले दिसतात.

माडेकर अपर्णा म्हणतात, "कपीलधारचा मन्मथस्वामी, अंबाजोगाईची योगेश्वरी, परळीचा वैजनाथ (ज्योतिर्लिंग), गंगामसला मोरेश्वर संस्थान गणपती, मंजरथ द. काशी, तलवडा-त्वरिता-पुरी देवी, नामलगांव गणपती मंदिर, राजुरी गणपती मंदिर, लिंबागणेश गणपती मंदिर, मानुर नागनाथाचे मंदिर, नारायणगढ-भाविकांचे श्रध्दास्थान (ज्ञानेश्वर माऊली महाराज समाधी मंदिर), बीड-खंडेश्वरी देवी व खंडोबा मंदिर दिपमाळ प्रसिध्द आहे."[१] अशा प्रकारे या स्थळांमध्ये काही प्राचीन ठिकाणे आहेत तर काही ठिकाणे मध्ययुगीन व अर्वाचीनही

१. माडेकर अपर्णा (संकलक), मराठवाड्यासह बीड जिल्हा, पृ.४

आहेत. यांच्या व्यतिरिक्त ही अनेक ऐतिहासिक धार्मिक ठिकाणे या जिल्ह्यामध्ये आपल्याला पहावयास मिळतात. अशा ठिकाणी मंदिरे किंवा अनेक ज्या काही वास्तू असतील त्यावर शिल्पकला ही कोरलेली आहे. हे आपल्या अभ्यासाअंती निदर्शनास येईल.

शिल्पकलेच्या बाबतीत बीडचे मंदिर, आंबेजोगाईचे मंदिर, परळीचे मंदिर, धर्मापुरीचे मंदिरे आदिचा अभ्यास केल्यावर त्यांचे महत्व लक्षात येते.

**बीड जिल्ह्यातील शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास**

बीड जिल्ह्याचा अभ्यास करताना लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात समावलेला हा बीड जिल्हा १८'२८' ते १९'२७' उत्तर अक्षांश आणि ७४'५४ ते ७६'५७' पूर्व रेखांश वर वसलेला आहे."[२] अशा प्रकारे आपणाला बीड जिल्ह्याचे क्षेत्रफळ सांगता येते. असा हा जिल्हा कशा प्रकारे निश्चित स्वरुपात राहिलेला आहे यांसंबंधी पुन्हा जोशी लक्ष्मणशास्त्री म्हणतात, "अग्नेय दिशेला लातूर ही बीड या जिल्ह्याची सीमा उत्तरेकडून गोदावरी नदीने आणि दक्षिणेकडून मांजरा नदीने निश्चित ठरवून टाकली आहे."[३]

वरील विधानाला पुष्टी देत रा.श्री. मोरवंचीकर ही म्हणतात, "बीड जिल्हा हा उत्तरेकडून वाहणारी गोदावरी आणि दक्षिणेकडून वाहणारी मांजरा यांच्यामध्ये बांधला गेला आहे."[४] अशा प्रकारे वरील उदाहरणांवरुन किंवा विधानांवरुन बीड जिल्हा हा कसा भौगोलिकदृष्ट्या बांधला गेला आहे. याचा अभ्यास होतो या बीड जिल्हयाच्या पूर्वेला परभणी, दक्षिणेला लातूर, पश्चिमेला नगर आणि उत्तरेला जालना अशा प्रकारचे जिल्हे येतात.

असो अशा बीड जिल्ह्याच्या ठिकाणी कंकालेश्वराचे अप्रतिम मंदिर आहे. ज्याच्या भोवती खंदकासारखे पाणी आहे. याझदानी म्हणतात, "कंकाल नावाचा सिध्दपुरुष जो नाथपंथाच्या कंथडी परंपरेतील होता त्याचे नावावरुन व ईश्वरशब्दाचा अर्थ महादेवास उद्देशून

---

२. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड-II, पृ.६२६.

३. तत्रैव.

४. मोरवंचीकर रा.श्री., बीडच्या ऐतिहासिक व्यक्तीमत्वाचे पैलू, पृ.३०

'कंकालेश्वर' असे नाव पडले. भद्रपुर्मा नावाच्या एका भक्तपरायण गरिब ब्राम्हणास महादेव प्रसन्न होऊन सोन्याने भरलेले एक हजार कुंभ याच जागेवर त्याला दिले. ती जागा म्हणजे आजचे कंकालेश्वर मंदिर होय."[५] हे मंदिर शिल्पकलेचा एक अद्वितीय असा नमुना म्हणून अभ्यासता येते. या मंदिरावर शिव, विष्णू, ब्रम्हा यांच्यासोबतच अनेक शिल्पाकृती कोरलेल्या दिसून येतात.

न.शे. पोहनेरकर म्हणतात, "मंदिराच्या बाह्यांगामध्ये पीठभागावर विविध थर आहेत. सर्वात खालचा थर चौकटांच्या नक्षीने तर वरचा भाग कीर्तीमुखांनी अलंकृत केलेला आहे. थर भागांतील देवकोष्टात शक्ती, ब्रम्हदेव आणि शिव संप्रदायातील देवदेवता आहेत. तर मंडोवरावरील जंगाभागात विष्णूचे दशावतार आणि अष्टदिकपाल कोरलेले आहेत."[६]

यावरुन आपणाला कंकालेश्वर मंदिर म्हणजे पोहनेरकरांनी मराठवाड्यातील सौभाग्यलेणी म्हणून उल्लेख केलेला आहे. हे शिल्पकलेचा उत्तम नमुना असलेले मंदिर यादव राजांच्या काळातील आहे. अशाच प्रकारे अंबाजोगाई या तालुक्याच्या ठिकाणीही अनेक मंदिरे आहेत. त्यामध्ये अंबाजोगाई या ठिकाणी अमलेश्वर मंदिर, सकलेश्वर मंदिर, खोलेश्वराचे मंदिर, चौबारा गणेश मंदिर आणि योगेश्वरी देवीचे मंदिर अशा अनेक मंदिरांचा ऐतिहासिक शिल्पकलेचा अभ्यास आपणाला करावयास मिळतो.

अशाच एका अंबाजोगाईच्या अमलेश्वराविषयी देगलूरकर म्हणतात, "बाह्य भिंतीतील शिल्पांकनात गजथरासोबत सिंह आणि आश्वांचेही शिल्पांकन झालेले आहे. येथे वाघ-वाघीनीचे शिल्प कामातूर आहे. शिवाय देवदेवतांची शिल्पे शिल्पकारांनी शिल्पाकींत केलेली आहेत. त्यामध्ये गणेश, पार्वती, महिषासुरमर्दीनी, शिव यांच्या प्रतिमा आहेत. दक्षिण दिशेच्या भिंतीवर सुंदर पध्दतीने विष्णूचा वामन अवतार शिल्पांकीत केलेला आहे. नृत्य गणेश सुंदरपणे शिल्पांकीत केलेला आहे."[७] अशाच प्रकारचे गजथराचे शिल्पांकन धर्मापुरीच्या

---

५. Yazdani, Gulam, The Early History of the Deccan, p.२२५.

६. पोहनेरकर न.शे., मराठवाड्याची सौभाग्यलेणी विज्जल बीड, पृ.३४

७. Deglurkar G.B., Temple Architecture and Sculpture of Maharashtra, p.६४

केदारेश्वर मंदिरावरही आहेआणि पानगांवच्या विठ्ठल मंदिरावरही अप्रतिम अशा शिल्पांचा थर आहे. अशाच गणेश, पार्वती, शिवाच्याही अनेक प्रतिमा धर्मापुरी या ठिकाणी सापडतात.

अशाच निरनिराळ्या प्रकारचे शिल्पांकन हे योगेश्वरी देवीच्या मंदिराबाबत बी.जी. कुलकर्णी म्हणतात, "योगेश्वरी देवीच्या जंगाभागावर सुंदर शिल्पे होती. असे सुक्ष्म निरीक्षणाअंती लक्षात येते. पण निष्काळजीपणे तसेच शेणमाती व चुण्याचा गिलावा देवून जिर्णोध्दार केल्यामुळे ते सर्व नष्ट झालेत."[८] अशी कितीतरी शिल्पे ही काळाच्या पडद्याआड मानवाच्या हलगर्जीपणामुळे गेलेली दिसून येतात. या ठिकाणी नसून अनेक ठिकाणी खेड्यापाड्यात या मंदिरांच्या बाह्यांगावर गोवऱ्या देखील लोक लावत होते. तरीही मानवाच्या या प्रतिकाराला शिल्पांनी आजपर्यंत तोंड दिलेले दिसून येते. तरीही अशा अवस्थेत बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात केसापूरीचे केशवमंदिर, नागनाथ मंदिर पाली, यळमघाटचे शिवमंदिर, संगमेश्वर मंदिर पाटोदा, पुरुषोत्तमपुरीचे मंदिर, सिध्देश्वर मंदिर शिरुर कासार, धर्मापुरी, परळी इत्यादी अनेक ठिकाणी बीड जिल्ह्यात शिल्पकला अभ्यासावयास आपणाला मिळते. पण बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात यादवांच्याच काळात ही शिल्पकला निर्माण झाली आणि बहरासही आली.

**बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वैभव**

बीड जिल्ह्याचा इतिहास व संस्कृती ही कशा प्रकारे रुजली-वाढली त्यामध्ये अनेक नद्या-डोंगरांचा प्रदेश असलेला निदर्शनास येतो. याबाबत इरावती कर्वे म्हणतात, "मानवी संस्कृतीचा अभ्यास म्हणजे विविध भागातील नद्यांच्या काठी अस्तित्वात असलेल्या व विकसीत झालेल्या वसासहतींचा अभ्यासच म्हणावा लागेल. महाराष्ट्राचे वर्णन करावयाचे म्हणजे त्यातील नद्यांच्या व डोंगरांच्याच अनुषंगाने विकसित झालेल्या मानवी जीवनाचे वर्णन

८. कुलकर्णी बी.जी., बीड जिल्ह्यातील मध्ययुगीन मंदिर कला स्थापत्य, पृ.२४९.

करावे लागेल."[९] अशा प्रकराचा सर्व भूप्रदेश हा या जिल्ह्याच्या संदर्भात आहे. आणि याच ठिकाणी मानवी वसाहती अस्तित्वात आलेल्या आहेत.

कालिदास गणोरकर म्हणतात, "बीड जिल्ह्याला असलेला संतांचा वारसा, सांस्कृत पीठ, इतिहासकालीन महत्व, आयुर्वेदीक औषधीचे माहेरघर, पौराणिक कथांचे रनकंदन, सह्याद्री सातपुड्याच्या वनश्रीने, नटलेल्या रांगा, निसर्गरम्य पहाडातून खोल दरीत पडणारे पाण्याचे धबधबे, भग्नावशेष धारण केलेले ऐतिहासिक किल्ले, नवनाथ आदींची कार्यभूमी आहे."[१०]

"मायबोलीच्या मृदू मवाळ माध्यमातून विवेकाचा सिंधू सामान्य माणसांपर्यंत काव्यरुपाने पोहचविणारे आद्यकवी मुकुंदराज याच जिल्ह्यातील, अंबानगरीची 'पासोडी' सारखा ग्रंथ लिहणारे मनाला स्तंभित करणारे दासोपंत आणि परळीच्या वैराग्यवंत वैद्यनाथालाही वेध लागावा अशी अंबिकाजोगाई हे सर्व वैभव याच बीड जिल्ह्यातले क्षेत्रस्थान होऊन बसले आहे."[११] अशा प्रकारचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभव या बीड जिल्ह्याने प्राचीन काळापासून जतन करुन ठेवले आहे. ऐतिहासिक वैभवाच्या बाबतीत बोलायचे झाले तर बीड जिल्ह्यातील तत्कालीन वास्तु किंवा शिलालेखांचाही अभ्यास हा महत्वपूर्ण ठरतो. बीड जिल्ह्यात पाली, चन्नई, मानूर, खोलेश्वर आदी ठिकाणी शिलालेख सापडते. यापासून इतिहासाचा बोध होतो. यु.म. पठाण म्हणतात, "मराठवाडा ही अशी संतांची भूमी आहे तशीच ती शिलालेखांची व ताम्रपटांचीही भूमी आहे. भव्यदिव्य होते, अलौकिक होते, या भूमिने शतकानुशतके जे जे पाहिले होते ते ते मोठे अपूर्व होते. तसेच ते अलौकीकही होते. त्या रम्य गतकाळाच्या खूना या भूमीने आपल्या दगडा धोंड्यात आपल्या मातीच्या कणाकणांत, अणूरेणूत दडवून ठेवल्या वैभवाची तोरणे, बिरुदे जशी या भूमीने आपल्या उराशी जतन करुन ठेवली."[१२]

---

९. कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृति, पृ.६४

१०. गणोरकर कालिदास, बीड जिल्हा, पृ.१११

११. तत्रैव.

१२. पठाण यु.म., मराठवाड्यातील मराठी शिलालेख, पृ.१

बीड जिल्ह्यातही अशाच प्रकारचे इतिहासाचे पुरावे येथील मातीने जतन करुन ठेवली आहेत. अंबाजोगाई या ठिकाणीच अनेक प्रकारच्या कला बहरास आलेल्या आपणास दिसतात. चित्रकला व वास्तुकलेचा सुंदर मिलाफ म्हणजे अंबाजोगाईच्या वायव्य दिशेस मुकुंदराजाच्या समाधीमार्गाकडे जाताना वाटेत लागणारा लेणीसमुह कलेचा अद्वितीय नमुनाच आहे. येथील लेण्या या मराठवाड्याच्या इतिहासात हत्ती लेण्या या नावाने ओळखल्या जातात. अंबाजोगाईला अनेक मंदिरांचा समुह असून येथील मंदिरावर सुंदर कोरीव काम आहे. डॉ. कठारे म्हणतात, "बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे तालुक्याचे ठिकाण एके काळी कला व संस्कृतीचे माहेरघर होते."[१३]

या जिल्ह्यामध्ये संस्कृती बहरास आल्याने या ठिकाणी अनेक पर्यटन स्थळे विकसीत झाली.यामुळे या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक होऊ लागली त्यामध्ये येथील "बालाघाटच्या रांगेत जिल्ह्यातील केज, धारुर, अंबाजोगाई, परळी घाटनांदूर, मांजरसुंबा, लिंबा गणेश ही पर्यटन स्थळे वसलेली आहेत आणि बालाघाटच्या रांगेत लेणी, मंदिरे या स्वरुपात कला व स्थापत्याचा विकास झाल्याचा दिसून येतो."[१४] याच विधानाला पुढे घेऊन बोलावयाचे झाले तर या जिल्ह्यातील परळी हे एक ज्योतिर्लिंग आहे. जी की भारतात फक्त १२ ज्योतिर्लिंगाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. त्याविषयी न.शे. पोहनेरकर म्हणतात, "मराठवाड्याच्या धार्मिक महत्तेला अशा तीन ज्योतिर्लिंगांनी भूषविलेले आहे. अशा प्रकारे शिवशक्ती उपासनेच्या परंपरेत वेरुळचे घृष्णेश्वर, परळीचा वैजनाथ, औंढ्याचा नागनाथ या शिवपिठांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. शिव आणि शक्ती या दोन्ही उपासना परंपरांची मराठवाड्याने प्राचीन काळापासून जपवणूक केलेली आहे. यासाठीच भारतीय सांस्कृतिक परंपरेत मराठवाड्याचे स्थान आगळ्या महत्वाचे आणि मोलाचे आहे."[१५]

---

१३. कठारे ए.एम., मराठवाड्यातील लेणी, पृ.२७

१४. Intelectuals Sandarbh Maharaashtra, p.६६४.

१५. पोहनेरकर न.शे., मराठवाडा - दिवाळी अंक, १९९६, पृ.९९

बीड जिल्ह्यामध्ये स्थापत्याच्या क्षेत्रात जर विचार केला तर या ठिकाणी अनेक हेमाडपंथी मंदिरे ही यादवांच्या काळात निर्माण झालेली आहेत. बीड जिल्ह्यातील यळंबघाट येथील महादेव मंदिराविषयी येथील गॅझेटमध्ये असा उल्लेख आहे की, हेमाडपंथी शैलीतील प्राचीन मंदिर यादवकाळाचे प्रतिक आहे. या मंदिराबाबत म्हटले आहे, "The Mahadeo Temple is to the north-east the village, a little by yond the inhabited locality, in the midst of an open field. The temple is built in Hemadpanthi style and is a work in Masonry a small Piazza - like Parth with two pillars on either side forms the entrance. There are beautiful artistic designs carved upon it."[१६] हे यादवकालीन मंदिर भग्नावस्थेत आहे. त्यावरील शिवपार्वतीच्या प्रतिमा लक्षवेधक आहेत. गर्भगृहात शिवलिंग असून काही मूर्ती भग्नावस्थेत आहेत. श्रावणात भाविक मंडळी दर्शनासाठी गर्दी करतात. या सर्व घटकांच्या मागे धर्म श्रध्दा हा घटक कारणीभूत असतो. सु.र. देशपांडे म्हणतात, "धर्मश्रध्दा हे प्राचीन भारतीय जीवनाचे एक प्रमुख अंग असले आणि कलेच्या क्षेत्रात ही भावना प्रभावी ठरली असली तरी सुध्दा भारतीय मूर्तीकलेत वास्तववादी धर्मनिरपेक्ष व आदर्शवादी अशा तिन्ही प्रकारच्या कलाकृती आढळतात. याचे कारण की या कलेत धर्मप्रेरणा व सौंदर्यप्रेरणा यांचा संगम झालेला आहे. ज्या कलाकृतीत सौंदर्यप्रेरणा धर्मप्रेरणेला आत्मसात करुन प्रकर्षाला पोहचते त्या कलाकृती आदर्शवादी कलाकृती होत."[१७]

अशाच प्रकारे बीड जिल्ह्यातील इतिहासातून व धर्मप्रेरणेतून संस्कृती कशी विकसित झाली व ती एक काळ वैभवास पात्र ठरली याचा आपणाला वरील विवेचनात स्पष्ट करता येते.

---

१६. बीड जिल्हा राजपत्र, पृ.६६६

१७. देशपांडे सु.र., भारतीय शिल्प वैभव, पृ.८

## २.३ बीड जिल्ह्यातील शिल्पकलेची ऐतिहासिक दालने :

बीड जिल्हा हा एक शिल्पकलेने समृध्द असा जिल्हाआहे. या जिल्ह्याला मराठवाड्यात मंदिरांचा जिल्हा म्हणूनही ओळखतात या जिल्ह्यात प्राचीन काळातील अनेक मंदिरे आहेत की, ती आपल्या जिल्ह्याचा इतिहास सांगतात. त्यापैकी अनेक महत्वाची शिल्पकलेची दालने या जिल्ह्यात आढळतात. त्यापैकी काही महत्वाची शिल्पकलेची दालने आपण आपल्या लिखानात अभ्यासणार आहोत.

### २.३.१ बीड (विल)

बीड हे मराठवाड्यातील एक जिल्ह्याचे ठिकाण आहे. याचे प्राचीन नाव 'विल' असावे या स्थलनामाचा उल्लेख सर्वात जुना इ.स.नाच्या सातव्या शतकातील बदामीच्या चालुक्यांच्या ताम्रपटात आढळतो. अनिल कठारे / नगराळे म्हणतात, "यादवकालीन शिलालेखावरुन समजते की, बीड हे विद्वानांचे माहेरघर व वेदविद्येचे एक प्रमुख केंद्र होते. बीड जिल्ह्यात प्राचीन संस्कृतीचे अवशेष मोठ्या प्रमाणात आढळतात. आजही काही सुस्थितीत तर काही भग्नावस्थेत आढळतात. बीड येथे प्राचीन हेमाडपंथी बांधकाम शैलीचे 'कंकालेश्वर मंदिर' आहे. या मंदिरा भोवती सतत पाणी असते. या मंदिराच्या भोवती बांधलेल्या दगडी कल्लोळात सतत पाणी असते. हे मंदिर विविध कलाकुसरीने नटलेले आहे."[१८] या मंदिराची निजाम राजवटीत काही नासधूस झाली आहे हे मंदिर पुरातत्व विभागाने संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले असले तरी म्हणावे तेवढे लक्ष दिले जात नाही.

या मंदिराबरोबरच याठिकाणी गाणपत्य संप्रदायातील चालुक्यकालीन गणेशाची पुजा प्रचलीत होती. त्रिपुरासूर राक्षसाचा वध करण्यासाठी ब्रम्हदेवाने नवगनाची स्थापना केली. अशी अख्यायिका आहे. व.रा. रामदासी म्हणातात, "ऐसे गणेश स्थापून।गौतमेसी स्नान करुन ब्रम्हादिकांनी यज्ञ पूर्ण । करोनी युध्दाशी पातले । पुष्पे वर्षीत आनंदे."[१९] अशा पध्दतीने

१८. कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, पृ.३९५.
१९. रामदासी, व.रा., नवगण साक्षात्कार, पृ.१३

त्रिपुरासूराचा वध करण्यासाठी ब्रम्हदेवाने नवगनाची निर्मिती केली. ज्या नवगनाच्या नाावावर या जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी नवगण संस्था निर्माण झालेल्या दिसून येतात. याच आख्यायिकेची ती अपत्य आहेत असे आपणाला यथार्थ पणे म्हणता येते.

बीड या ठिकाणी बहुतांशी शैवधर्माचाच प्रभाव आपणाला जाणवतो. कंकालेश्वराविषयी असेच काही आहे. ग.ह. खरे म्हणतात "देवालयाच्या मुख्य गाभाऱ्यात पृथ्वीलिंगाची प्रतिष्ठापना झालेली आहे. गाभाऱ्याचे प्रवेशद्वार कलापूर्ण रितीने कोरलेले आहे. पूर्ण कलश व कमल शिल्पांनी द्वार पट्टी कोरलेली आहे. या द्वारपट्टीच्या दोन्ही बाजूस असलेल्या शिल्पमूर्तीच्या हातात त्रिशूल व नाग आहेत. त्यांचे खालचे दोन्ही हात भग्न झालेले आहेत. डावीकडील शिवमूर्ती डमरु, त्रिशूल व अक्षमालाधारी आहे शिव मूर्तीचे बाजूस इतर देवता, चौरीधारी स्त्रीपुरुष कोरण्यात आलेले आहेत. द्वारपट्टीच्या दोन्ही भागात सुक्ष्म नक्षीकाम केलेले आहे."[२०]

यावरुन कंकालेश्वराच्या मंदिरावरील शिल्पकलेचा अद्‌भूत खजिना आपल्या लक्षात येतो. या मंदिरावरील शिल्प हे मानवाला चालती-बोलती वाटतात, यात शंका नाही. याचप्रमाणे बीडच्या पूर्वेस खंडेश्वरी देवीचं अत्यंत पुरातन मंदिर आहे. या मंदिराविषयी सुधीर कोर्टीकर म्हणतात, "आजुबाजूला पसरलेल्या टेकड्यांचा परिसर आणि डोंगराच्या माथ्यावर असणारं हे मंदिर संपूर्ण मंदिराचं बांधकाम. हे चुना आणि विटांचा वापर करुन करण्यात आलेलं आहे. असंख्य खांबाचा सभामंडप असणारं हे मंदिर आतमध्ये गाभाऱ्यात खंडेश्वरी देवीची प्रसन्न मूर्ती आहे. याच देवीच्या मंदिराच्या समोरील डोंगरावरच खंडोबाचही छानसं मंदिर आहे. या मंदिराच्या समोरच जवळ जवळ दहा मजल्याच्या उंचीइतक्या मोठ्या उंच अशा प्रचंड दोन दीपमाळा उभ्या आहेत. दसरा, दीपावली, नवरात्र महोत्सवाच्या वेळी तसेच चंपाष्टीच्या

---

२०. खरे ग.ह., मूर्ती विज्ञान, पृ.२२७

नरात्राच्या वेळी या प्रचंड उभ्या असणाऱ्या दोन्ही दीपमाळांवर दिव्यांची रोषणाई करण्याची पूर्वपरंपरागत चालत आलेली प्रथा आहे."[२१]

बीडच्या या मंदिराप्रमाणेच अंबाजोगाई या ठिकाणच्या योगेश्वरी मंदिराच्या नजीकही अशाच प्रकारची दीपमाळ पहावयास मिळते. ज्या-ज्या ठिकाणी देवींची मंदिरे असतात त्या त्या ठिकाणी अशा दीपमाळा आपणाला बहुतांशी पहावयास मिळतात. असो बीड या ठिकाणी ही मंदिरे म्हणजे तेथील शिल्पकलेचे दालनच म्हणता येईल.

## २.३.२ अंबाजोगाई (मौमिनाबाद)

बीड जिल्ह्यातील एक नावलौकिक पावलेले व ऐतिहासिक शहर म्हणजे अंबाजोगाई डॉ. मो.ग. दिक्षीत म्हणतात, "निजाम हद्दीतील अंबाजोगाई उर्फ मौमिनाबाद हे एक तालुक्याचे ठिकाण असून तेथे प्राचीन व ऐतिहासिक काळातील अनेक अवशेष विखुरलेले आहेत. १९४६ साली हैद्राबादच्या पुराण वस्तु संशोधन खात्यामार्फत ह्या लेखाची दुरुस्ती सुरु असता मातीच्या गाडल्या गेलेल्या ढिगाऱ्यात शिलालेख निदर्शनास आला."[२२] अंबाजोगाई येथे श्री. योगेश्वरी देवीचे प्राचीन हेमाडपंथी असलेले सुंदर मंदिर आहे. दगडी खांबाचा गाभारा व दगडावरील नक्षीकाम सुरेख दिसते. मंदिराच्या शिखरावर विभिन्न देवदेवतांच्या मूर्ती आहेत. हे मंदिर यादवांच्या सेनापतीने म्हणजे खोलेश्वराने बांधले.

"यादवपूर्व काळापासूनच अंबाजोगाई हे शक्तीपीठ म्हणून प्रसिध्द असावे, चौबारा गणेश मंदिरातील शिलालेखामध्ये खोलेश्वराने योगेश्वरी मंदिरास दिलेल्या दानांची नोंद आहे."[२३] खोलेश्वराने आपल्या हयातीत अनेक मंदिरांना दान दिलेल्या नोंदी सापडतात. खोलेश्वराविषयी अ.ल. गाडगीळ म्हणतात, "यादव काळात या स्थानाचा महिमा सर्वदृष्टीने खोलेश्वराने वाढविला त्यांचे ठानेच येथे होते. हा मुदगलयोगी ब्राम्हणभाई देव-स्वामी देव-त्रिविक्रम-खोलेश्वर अशी त्याची पितृ परंपरा आहे. सिंघन यादवांच्या काळापासून याने

---

२१. सुधीर कोटीकर, मराठवाड्यातील मंदिरे, पृ.७०

२२. दिक्षित मो.ग., दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खण्ड ४, पृ.५७

२३. महाराष्ट्र शासन, दी बीड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, पृ.२३२

यादवांच्या साम्राज्यवृध्दीत स्वतःच्या बाहुबलाने आणि बुध्दीवैभवाने मोठा वाटा उचलला होता."[२४]

खोलेश्वराच्याच नावावर महादेवाचे एक असेच अद्वितीय मंदिर अंबाजोगाई या ठिकाणी आहे. हे मंदिर ही कलेचा अद्वितीय नमुना आहे. या मंदिरात फार मोठे शिवलिंग आहे. श्री. वा. चितळे म्हणतात, "अंबाजोगाई येथील खोलेश्वराचे मंदिर मध्ययुगीन मंदिर स्थापत्यातील महत्त्वाचे देवालय आहे. हे मंदिर अंबाजोगाईचे मध्ययुगीन चळवळीतील योगदान दर्शविणारे दिसते हे मंदिर गावाच्या दक्षिण दिशेला जैत्रपालाची गढी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या बुरजा (गढी) जवळ उत्तर दिशेला पूर्वाभिमुख आहे."[२५] खोलेश्वराच्या मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत मुख्य मंडपात प्रवेश केल्यास दक्षिण दिशेला व उत्तर दिशेला १८ x ८ फुट या आकाराची छोटी दालने आहेत. ती दोन्ही भिंतीनी बंद केलेली आहेत. मुखमंडपाचे छत सपाट स्वरुपाचे आहेत. अशा स्वरुपाची छते निलंगा, पानगाव आणि धर्मापुरी इ। मंदिरात पहावयास मिळतात. मुख्यमंडपाला दक्षिण व उत्तर दिशेने अर्थमंडप जोडलेले आहेत. तसेच अंबाजोगाई या ठिकाणी चौबारा गणेश मंदिर ही आहे. शरद हेबाळकर व अरुणचंद्र पाठक या मंदिराविषयी म्हणतात, "हे गणेश मंदिर म्हणजे उंच अशा अधिष्ठाणावर उभारण्यात आलेले आहे हा मंडप १२ स्तंभावर उभा आहे. हे स्तंभ यादवकालीन स्तंभाच्या तूलनेत जवळपास उंचीने दुप्पटच आहेत. स्तंभाच्यावर वितानाच्या प्रारंभी अष्टकोणाकृती बैठक तयार करुन त्यावर करोटक पध्दतीने वितान उभारलेले आहे. या वितानाच्या प्रारंभी असलेल्या बैठकीवर लहान लहान देवकोष्ठे आहेत. त्यात पुरुषांच्या आकृती कोरलेल्या आहेत. त्या खोलेश्वराच्या राजदरबारातील मंडळीच्या प्रतिमा असाव्यात."[२६]

अंबाजोगाई या ठिकाणी योगेश्वरी देवीचे शिल्पकलापूर्ण मंदिर, खोलेश्वराचे अप्रतिम मंदिर, अमलेश्वराचे मंदिर हे कलेचे महत्वाचे दाखले आहेत. या ठिकाणी चांगल्या

---

२४. गाडगीळ अ.ल., य़ोगेश्वरीचे माहेर श्री क्षेत्र अंबाजोगाई, पृ.४

२५. चितळे श्री.वा., मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक, पृ.३७-४०.

२६. हेबाळकर शरद, पाठक अ.श., खोलनायकाचे अंबे अर्थात यादवकालीन अंबाजोगाई, पृ.११

प्रकारे शिल्पकला नावारुपाला आली. तसेच येथील सकलेश्वर मंदिराविषयी शां.भा. देव म्हणतात, "या मंदिराला मुखमंडप, मंडप आणि दोन अर्धमंडप अंतराळ आणि गर्भगृह हे अवयव आहेत. आतील मंदिराचे स्वरुप ४५ x ३२ फुट या आकाराचे असून हे मंदिर अधिष्ठाणावर आधारलेले असावे हे अधिष्ठाण सध्या मातीत गाडले गेलेले व अर्धे उध्वस्त स्वरुपात आहे."[२७]

अशा मंदिरांची कितीतरी अवशेष या ऐतिहासिक नगरीत सापडतात. प्राचीन काळापासून ते अर्वाचिन काळापर्यंत या नगरीने आपल्या सांस्कृतिक जीवनात इतिहास घडवलेला दिसतो. हा इतिहास येथील मानवाला घडविणे भाग पडले. जसे की, डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात, "वास्तविक हत्यारे निर्माण करणे आणि चित्र रेखाटने ही एकच कृती होत. त्या वेगवेगळ्या गोष्टी नव्हत्या या चित्रांनीच माणसाची सांस्कृतिक गरज भागविली. अन्न, कामवासनेची तृप्ती या जशा सर्वच प्राण्यांच्या मूलभूत गरजा आहेत आणि एक प्राणी म्हणून माणसाला जशा त्या भागवाव्याच लागतात तशाच चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, उत्सवप्रियता या फक्त माणसाच्याच 'माणूस' म्हणून गरजा आहेत."[२८] अशाच गरजेपोटी अंबाजोगाई येथे लेण्याही निर्माण झाल्या आणि त्या ठिकाणी मोठे कोरीवकाम व मूर्ती निर्माण केल्या गेल्या. या मूर्ती कलाकाराने आपल्या कलापूर्ण अविष्काराने निर्माण केल्या.

## २.३.३ परळी

परळी हे एक बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर आहे. या ठिकाणीही शिल्पकलेचे दालन असलेले आपणाला दिसून येते. या ठिकाणी जाण्यासाठी रेल्वे मोटार अशा साधनांचा लोक दळणवळणासाठी उपयोग करतात. एस.जी. जाधवांच्या मते, "दक्षिण-मध्य लोहमार्गावरील स्थानक तसेच मनमाड-पूर्णा जंक्शन परळी असे येथे लोहमार्गाने जाता येते."[२९] येथे औष्णिक विद्युत केंद्र असल्याने परळी हे गाव अनेक मार्गांना जोडलेले आपणाला

---

२७. देव शां.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भसूची, पृ.४२
२८. कसबे रावसाहेब, धर्म : मानवी संस्कृती विकास, पृ.१३
२९. जाधव एस.जी., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, पृ.५४७

निदर्शनास येते अशा या परळी शहराला सांस्कृतिक इतिहास लाभलेला दिसतो. या ठिकाणी देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग आहे.

परळीचे प्राचीन नाव 'पर्यली' असे होते, येथील ज्योतिर्लिंग हे किंवा मंदिर हे प्राचीन असावे असे येथील एका शिलालेखावरुन समजते. पूर्वेकडील एका जुन्या घराच्या दगडावर शके ११०८ अशी नोंद आहे. तेथील मंदिरात इंदौरची राणी अहिल्याबाईचा एक शिलालेख आहे. त्यांनी १७८४ रोजी या वैजनाथाच्या मंदिराचा जिर्णोध्दार केला. हे मंदिर मेरु पर्वतावर असल्याने गावाच्या तूलनेत ७०-८० फुट उंच आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराला तीन बाजूकडून पायऱ्या आहेत. उत्तरेकडील घाटाच्या पायऱ्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. प्रत्येक दोन पायऱ्यानंतर एक मोठी चिरेबंदी पायरी खालपासून वरपर्यंत आहे.

संपूर्ण मंदिराला दगडी चिरेबंदी आहे. महाद्वारावर देवाचा चौघाडा आहे. मंदिरात गर्भगृहाच्या दाराशी उजव्या बाजूस पार्वतीची पाषाणाची रेखीव मूर्ती आहे. इथेच शंकर-पार्वतीसह निवास करतात. म्हणून या क्षेत्राला काशीपेक्षा जगभर श्रेष्ठ असे संबोधले जाते. मंदिरात गर्भगृहात वैद्यनाथाची हातभर उंच व दोन हात व्यासाची शालीग्रामाची पींड पाषाणाची आहे. शिवलिंगाच्या निर्मितीविषयी नी.पु. जोशी म्हणतात, "दगड, माती, काष्ठ, अष्ट लोह (सोने, रुपे, तांबे, पितळ, वगैरे आठ प्रकारच्या धातू) रत्ने, मणि, इत्यादी निरनिराळ्या माध्यमांनी शिवलिंगे तयार करीत. याशिवाय अपराजित पृच्छेमध्ये तत्कालिक माध्यमे म्हणून कुंकु, कापूस वगैरेचाही उपयोग करीत असत. याशिवाय नर्मदेत मिळणारे मोठे गुळगुळीत दगड 'बाण लिंगे' म्हणून पुजले जातात."[३०] अशा प्रकारे ही ज्योतिर्लिंगे बनवली जातात व पुजली जातात. अशाच पाषाणाची पिंड ही परळी येथे आहे. येथील गर्भगृह व सभामंडप एकाच पातळीवर असल्याने मंदिरात प्रवेश करताच शिवलिंगाचे दर्शन होते. मंदिर सर्व काळ्या पाषाणांनी बनविलेले असून गर्भगृहाच्या उत्तरेकडील भिंतीत एक लहान गारेची चीप बसविली

---

३०. जोशी नी.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, पृ.१९६-१९८.

आहे. ती अहिल्याबाईंनी बसविल्याचे सांगतात. मंदिराचा घुमट हा पाषाणाचा आहे. या मंदिराच्या परिसरात अनेक लहान-लहान शिवमंदिरे आहेत.

परळीसारखीच औंढा नागनाथ व घृष्णेश्वर ही मराठवाड्यात ज्योतिर्लिंगे आहेत. ही ज्योतिर्लिंगे निर्माण कशी झाली, "शिवमूर्तीचा हा प्रकार दक्षिणेत लोकप्रिय होताच पण उत्तरेतही तो चांगलाच पसरला होता. लिंगोद्भवाच्या कथेचे पडसाद स्वात (पाकिस्तानचा उत्तर पश्चिमी कोपरा) च्या काही लोककथांतही मिळतात ही कथा लिंगपुराणाच्या पूर्वार्धात विस्ताराने पाहता येते."[३१] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ब्रम्हदेव आणि विष्णू हे दोघे स्वतःला श्रेष्ठ समजून भांडू लागले. अकस्मात त्या दोघांमध्ये विस्तवाने धगधगनारे एक लिंग प्रगट झाले. त्याच्या मुळाचा व उंचीचा मागमूस लागत नव्हता स्वतःला श्रेष्ठ समजणारे दोघेही याचा पता लावण्यासाठी निघाले. हंसाचे रुप धारण करुन ब्रम्हदेव वर गेला आणि वराहाच्या रुपाने विष्णूने खालची वाट धरली. दोघेही खूप भटकले व तसेच परत आले एका एकी प्रणवाचा नाद उमटला, हेच शिवाचे स्वरुप होय. दोघेही त्याला शरण गेले व क्रमाने उजवी व डावीकडे हात जोडून उभे राहिले.

अशा प्रकारे भारतातील जी बारा ज्योतिर्लिंगे निर्माण झाली त्याच्या निर्मितीची कथा आपणाला लिंगपुराणात प्रामुख्याने पाहावयास मिळते. ज्योतिर्लिंगाच्या अनेक अशा कथा समाजात प्रसारीत झाल्या आहेत. हे सत्य नाकारता येत नाही त्याचे अपत्य परळीचे हे ज्योतिर्लिंग आहे. असे समाज मानतो मु.ग. पानसे म्हणतात, "राष्ट्रकुट काळात परळी हे महत्वाचे केंद्र होते. परळी ताम्रपटाद्वारे हे प्रथमतः निदर्शनास आले. परळी हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथील वैद्यनाथ मंदिर हे आद्य ज्योतिर्लिंग समजले जाते. पानसे यांच्या मते हे अतिप्राचीन मंदिर असून हे एका शिलालेखावरुन स्पष्ट होते."[३२]

तसेच परळिविषयी जोशी महादेवशास्त्री म्हणतात, "येथील मंदिरातील यादवकालीन जुना नंदी प्राचीन अवशेषांपैकी गणला जातो. येथे शिव-पार्वती यांचा निवास

---

३१. लिंगपुराण, पूर्वार्ध, १७.१५-९२, पृ.४०-४४

३२. पानसे, मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.११९

असल्याने जवा आगळ काशी असे म्हटले आहे. परळीचे सांस्कृतिक श्रेष्ठत्व हे काशीपेक्षा जवाएवढे का होईना श्रेष्ठ आहे असे दिसते."[३३] यावरुन परळी शहराचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

### २.३.४ धर्मापुरी (इंद्र नगरी)

बीड जिल्ह्यातील परळी या तालुक्यात धर्मापुरी हे गाव आहे. ते अंबाजोगाई-अहमदनगर रस्त्यावर अंबाजोगाईपासून ३० कि.मी. आहे. हे गाव प्राचीन असून ती कल्याणीच्या चालुक्यांच्या काळातील इंद्रनगरी होती. या ठिकाणी चालुक्य कालीन सहा शिलालेख प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये चार कानडी भाषेत आहेत एक देवनागरी लिपीत आहे व एक अवाचनीय आहे. भूलोकमल्ल सोमेश्वर नावाच्या राजाच्या काळात धर्मापुरी हे शहर जागतिक ख्यातीचे होते. असे देवनागरी शिलालेखावरुन समजते.

डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "मराठवाड्यातील होट्टल, तलखेड, करडखेड, सगरोळी, धर्मापुरी, निलंगा, पानगाव, येथील मंदिर शिल्पस्थापत्यावर कल्याणीच्या चालुक्य शैलीचा येथील अवशेषांमध्ये कल्याणीच्या चालुक्यांचे असंख्य शिलालेख कानडी भाषेत आजपर्यंत उपलब्ध झालेले आहेत. आतापर्यंत नांदेड जिल्ह्यातच असे ४० कानडी शिलालेख सापडले."[३४] यावरुन चालुक्यांचा प्रभाव हा मराठवाड्यावर फार मोठ्या प्रमाणात प्राचीन काळात असलेला दिसून येतो. चालुक्यांचे मुळ घराणे कर्नाटकातील असल्याने त्यांचे शिलालेखही कानडी भाषेतच मोठ्या प्रमाणात मिळतात. अशाच शिलालेखामुळे धर्मापुरीचा इतिहास आपणाला रेखाटण्यास मदत होते.

धर्मापुरी या नगराला प्राचीन काळात भक्कम तटबंदी होती. जी आता दिसत नाही येथे अनेक विहरी व जलाशय होती. आताही काही अंशी ती त्या ठिकाणी अस्तित्वात असलेली दिसतात. धर्मापुरीच्या आग्नेय दिशेला एक शिवाचे अर्थातच केदारेश्वराचे एक मंदिर

---

३३. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोश, खंड १ ला, पृ.४०९-४१०

३४. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, पृ.

भग्नावस्थेत उभा आहे. हे शिवालय अर्थातच देवालय म्हणजेच मूर्तीकलेचे मराठवाड्यातील माहेर घरच मानले जाते. असे म्हटले जाते कारण या ठिकाणी असंख्य मूर्तींची कोरीवकामाच्या किंवा शिल्पकलेच्या माध्यमातून निर्मिती करण्यात आलेली दिसते. या गावात दुसरे अनेक मंदिरे आहेत. त्या ठिकाणी देखील फार मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक शिल्पकला निर्माण झालेली दिसून येते. त्यांचे अवशेष अत्यंत चांगल्या स्थितीत आपल्या संशोधनाची वाट पाहत आहेत. व आपला वैभवशाली इतिहास मांडण्याचा आग्रह करीत आहेत.

धर्मापुरीच्या पश्चिमेस दोन कि.मी. अंतरावर मरळसिध्दाचे मंदिर आहे ते पण मंदिर शिवाचेच आहे. त्या ठिकाणीही फार चांगल्या प्रकारची शिल्पे कोरलेली आपणाला आढळतात. त्या ठिकाणी एक तीर्थ देखील आहे "धर्मापुरी हे गाव फार प्राचीन आहे कारण धर्मापुरी गावात शिरताक्षणीच वस्तीच्या प्राचीनत्वाच्या खानाखुना दिसू लागतात. प्राचीनत्वाची साक्ष येथील शिलालेखही देतात."[३५] धर्मापुरी हे गाव चालुक्य कलचुरी काळातील अवशेषांनी भरलेले गाव आहे. याचा अभ्यास आपणाला प्राचीन साधनांच्या आधारे चांगल्या प्रकारे करता येतो.

धर्मापुरी गावात अंबाजोगाई रोडकडे जाताना एक टेकडी लागते त्या टेकडीवर एक मंदिराचा ओटा आहे त्या ठिकाणी सप्तमातृकांचा शिलापट पहावयास मिळतो. जैन तीर्थकारांची मूर्तीशिल्पे त्या ठिकाणी आहेत. गणपती, ब्रम्हदेव अशा अनेक शिल्पांनी त्या दगडी ओट्यावर गर्दी केलेली आहे. तसेच गावामध्ये राम मंदिराच्या बाजूला एका ओट्यावरही अशाच प्रकारची अनेक शिल्पे पहावयास मिळतात. त्यामध्ये नागराजाची बरीच शिल्पे पहावयास मिळतात. गणपती, शिवपार्वती, शक्ती देवता, नंदी इ. अनेक शिल्पे या ठिकाणी पहावयास मिळतात.

धर्मापुरी या गावातच तुकाई देवीचे मंदिर म्हणून ओळखले गेलेले मंदिर या मंदिराचा जर अभ्यास केला तर अत्यंत चांगल्या अवस्थेत याचा फार मोठा सभामंडप दिसतो. व त्यावर निरनिराळ्या कलाकृती कोरलेल्या आहेत. गावाला लागूनच दक्षिण दिशेला एक

३५. रोडे सोमनाथ (संपा.), मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद निवडक शोधप्रबंध, खंड ३, पृ.१२८.

उत्तर मध्ययुगीन काळातील किल्ला भग्नावस्थेत उभा आहे. या किल्याच्या बाह्य व अंतर्भागाच्या भिंतीवरही कोरीव काम केलेले दिसून येते.

अशा प्रकारे आपणाला धर्मापुरी या गावाच्या शिल्पवैभवावर पुढे विस्तृत अभ्यास करावयाचा असल्याने आपण या ठिकाणी थांबणे योग्य ठरेल.

### २.३.५ शिल्पकलेची इतर दालने

बीड जिल्ह्यात मागील ठिकाणा व्यतिरिक्त अनेक ठिकाणे उपलब्ध असलेली दिसतात. जिथे की, शिल्पकला व मूर्तीचा चांगला विकास झाला आहे. अ.श. पाठक म्हणतात, "या काळातील धार्मिक अवस्थेमध्ये वेगवेगळ्या देवतांच्या मूर्ती पुजनाला फार महत्वाचे स्थान होते. पुराणांमध्ये गौरव केलेल्या सर्व देवता बहुतेक लोकांमध्ये प्रिय झाल्या होत्या. भिन्न भिन्न राजवंशांच्या कोरीव लेखांमध्ये आलेल्या निरनिराळ्या देवतांच्या उल्लेखावरुन असे दिसते की, या काळातील प्रमुख देवता विष्णू व शिव यांच्यापैकी शिवाच्या वेगवेगळ्या रुपांची पूजा फार प्रिय होती. मूर्तीपूजा पध्दतीमुळे निरनिराळ्या देवतांसाठी देवालये बांधण्यास प्रारंभ झाला. कालांतराने देवालये ही या काळात अस्तित्वात असलेल्या धार्मिक व्यवस्थेचा अविभाज्य अंग बनली."[३६]

धार्मिक व्यवस्थेत ज्या संप्रदायाचा जास्त प्रभाव असे त्यांच्या अराध्य देवतांच्या मोठ्या प्रमाणात मूर्ती या निर्माण केल्या जात असत. अशाच प्रकारे बीड जिल्ह्यात शैवांचा मोठा प्रभाव दिसून येतो. हे सत्य नाकारता येत नाही यु.म. पठाण यांनी मराठवाड्यातील प्राचीन मराठी शिलालेख या ग्रंथात "बीड जिल्हा परिसरात सापडलेल्या मराठी शिलालेखांची माहिती दिलेली आहे. त्याच्या आधारे मंदिरे व त्यांना दिलेले दान संदर्भातील स्थानांची व इतिहासाची माहिती मिळते."[३७]

---

३६. पाठक अ.सं. (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड १), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, पृ.६७९.

३७. पठाण यु.म., मराठवाड्यातील प्राचीन मराठी शिलालेख, पृ.७-६७

यावरुन तत्कालीन देवालयांना किंवा ती निर्माण करण्यासाठी तत्कालीन बीड जिल्ह्यातील राजेरजवाड्यांनी दान दिलेली माहिती किंवा राजाश्रय कशा प्रकारे दिला याची संबंध माहिती आपल्याला आकलन होते. अशाच एका मंदिरावर चालुक्यकालीन प्रभाव जाणवतो. देगलूरकर म्हणतात, "माजलगाव तालुक्यातील केसापुरीचे मंदिर व त्याच्या बाह्यंगावर देवदेवतांच्या प्रतिमा अगदी सुंदरपणे शिल्पांकीत केलेल्या आहेत. मंदिराच्या सभोवती पडलेल्या शिल्पांकनाच्या उध्वस्त अवशेषांवरुन मुळ शिल्पाकनाची आपणास कल्पना येते. काही भग्न शिल्पे त्यावरील चालुक्यकालीन शिल्पाकनाचा असलेला प्रभाव दर्शवितात. मंदिर इ.स. च्या १२ व्या शतकातील असावे असे वाटते."[३८] या मंदिरावरुन आपणाला समजते की याच ठिकाणी अशी शिल्पे भग्न झालेली नसून बीड जिल्ह्यात धर्मापुरी या ठिकाणीही अशी शिल्पे जागोजाग विखुरलेली आहेत. तसेच बीड जिल्ह्यात पाली हे छोटेसे गाव आहे. बीड-मांजरसुंबा रस्त्यावर ६ मैल अतंरावर असून या ठिकाणी सुध्दा मंदिरांचे अवशेष सापडतात. यु.म. पठाण म्हणतात, "या गावात अनेक मंदिरे आहेत त्यातील नागनाथ मंदिर पूर्व दिशेला आहे. पाली गावाच्या दक्षिण दिशेला गावाच्या बाहेर हे मंदिर बिंदूसरानदी किणारी आहे. या मंदिराची रचना मंडप अंतराळ आणि गर्भगृह अशा स्वरुपाची आहे. मंदिर समचतुष्कोणी आकाराचे असून ३८ x १८ ते पूर्वाभिमुख आहे. या मंदिराची आतील रचना दोन फुट उंच अधिष्ठाणावर केली आहे."[३९] पाली येथील मंदिराबरोबरच माजलगाव तालुक्यात पश्चिम दिशेला १९ कि.मी. अंतरावर हे पुरुषोत्तमपुरी गाव आहे. या गावातही एक प्राचीन कालीन मंदिर आहे.

डॉ. प्रभाकर देव म्हणतात, "या गावामध्ये गोदावरी नदीच्या किणारी पुरुषोत्तमाचे एक मंदिर आहे. ते गावाच्या प्राचीनत्वाची साक्ष देते. मंदिराची रचना गाभारा, अंतराळ, सभामंडप अशी आहे मंदिराला शिखर असून त्या शिखराच्या विटा पाण्यावर तरंगतात याचे हे

---

३८. Degloorkar G.B., Op.cit., p.८६

३९. पठाण यु.म., मराठवाड्यातील प्राचीन मराठी शिलालेख, पृ.१६६

वैशिष्ट्ये आहे. हे मंदिर ५ फुट उंच चौथऱ्यावर असून ते पुर्वाभिमुखी आहे."[४०] पुरुषोत्तम पुरीप्रमाणेच बीड जिल्ह्यातील दुसरे ठिकाण म्हणजे धारुर होय या ठिकाणी धारेश्वर मंदिर होते ते उध्वस्त झालेले आहे. पण येथे मात्र आता जैन धर्मीयांची जैन मूर्तीशिल्पच पहावयास मिळतात. यापुढे जाऊन आपणाला शिरुर कासार येथील शिध्देश्वर मंदिराचाही अभ्यास करावयास मिळतो. सिंदफणा नदीकाठी महादेवाचे हे मंदिर असून, ते गावाच्या प्राचीनत्वाची साक्ष देते. मंदिराची रचना गाभारा, अंतराळ, सभामंडप अशाच प्रकारची आहे. मंदिराची ही रचना वास्तुशास्त्रानुसार केलेली आहे. बीड जिल्ह्यात पुष्कळ मंदिरे आहेत जी की संशोधनाने प्रकाशात आणली आहेत. वि.भि. कोलते म्हणतात, "नेकनूरपासून ४ कि.मी. अंतरावर पूर्वेस यळमघाट येथे शिवमंदिर आहे हे मंदिर साध्या स्वरुपाचे आहे. मंदिराचा सभामंडप उघडा असून चौरसाकृती आहे. आश्चर्याची बाब म्हणजे हे मंदिर बसक्या स्वरुपाचे आहे. या मंदिराची रचना जामखेड (जि. जालना) येथील खडकेश्वर मंदिराप्रमाणे वाटते."[४१] अशी कितीतरी मंदिरे ही आपणाला या जिल्ह्यात शिल्पकलेचा सांस्कृतिक इतिहास सांगतात. या जिल्ह्याच्या सांस्कृतिक परंपरेत फार मोठी भर घालणाऱ्या अजूनही वास्तू आहेत. तेलगाव रोडवर एका बाजूला उंच टेकडीवर एक सुंदरसे टुमदार मंदिर उभे असल्याचे आपणास दिसेल. नवनाथांपैकी एक संतश्रेष्ठ हटयोगी श्री गोरक्षणाथ यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही गोरक्ष टेकडी म्हणून ओळखली जाते. स्त्री राज्यात रमलेल्या व स्वकर्तव्य विसरलेल्या आपल्या श्री गुरुला 'चलो मछिंदर गोरख आया' अशी आर्त पुकार केवळ मृदंगाच्या बोलातून ऐकवणाऱ्या गोरक्षणाथाची ही टेकडी चढून जाताना चांगल्या चांगल्याची भंबेरी उडून जाते. या टेकडीभोवतालचा सारा नयनरम्य, आल्हाददायक देखना नेत्रपालवात ओतल्याशिवाय राहत नाही.

कालीदास गणोरकर म्हणतात, "बीड शहराच्या मध्यभागी जुने जटाशंकर मंदिर आहे. या ठिकाणची ख्याती अशी आहे की, प्रभु रामचंद्र सीतेचा शोध घेत दक्षिण दिशेने चालले

---

४०. Deo Prabhakar, Temples of Marathwada, p.६४

४१. कोलते वि.भी. (संपा.), लीळाचरित्र, पृ.४४५

असताना त्यांना अतिशय असहाय्य व घायाळ अशा अवस्थेत जटायू नावाचा पक्षी भेटला सीतेला रावणाच्या तावडीतून सोडविण्याच्या प्रयत्नात तो जटायू रावणाकडून घायाळ झाला होता. सीतेच्या अपहरणाची सारी हकिकत त्यांना या जटायू पक्षाकडून ऐकायला मिळाली. व त्याचवेळी जटायूने श्रीरामाच्या चरणावर आपला प्राण सोडला. तेव्हा त्याचे अंत्यसंस्कार स्वतः श्रीरामाने करुन हे जटाशंकर स्थान स्थापन केले आहे. तेच हे जटाशंकर मंदिर आपणाला रामायणातील रोमहर्षक प्रसंगाची आठवण करुन देणारे आहे."[४२]

या वास्तुप्रमाणेच बीड जिल्ह्यातील पाटोदा हे तालुक्याचे ठिकाण आहे. या स्थळाच्या उत्तर दिशेला नदीच्या काठी यादवकालीन संगमेश्वर मंदिर आहे. बी.जी. कुलकर्णी म्हणतात, "या मंदिराच्या प्रवेशद्वारा जवळ एक शिलालेख आहे तो दानलेख आहे. या दानलेखात यादवराजाने या मंदिराला दिलेल्या दानासंबंधीची माहिती आहे. मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ, सभामंडप आणि मुखमंडप अशी आहे."[४३] अशा प्रकारे बीड जिल्हा हा कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात अग्रेसर असलेला दिसतो. पण प्राचीन काळाप्रमाणेच चालू काळामध्ये या कलेचे व सांस्कृतिक मूल्यांचे चांगल्या प्रकारे जतन झाले पाहिजे. जेणेकरुन आपला वैभवशाली इतिहास बीडकर जगाला सांगू शकतील.

## २.४ लातूर जिल्ह्यातील शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास

लातूर जिल्हा हा मराठवाड्यात अनेक वैशिष्ट्यामुळे समोर आलेला जिल्हा आहे. या जिल्ह्याने सध्याच्या काळात प्रत्येक क्षेत्रात मोठी गरुड भरारी मारलेली आपणाला दिसून येते. अशा या जिल्ह्याचा प्राचीन इतिहास देखील फारच समृध्द होता. या जिल्ह्याचे सध्याचे स्थान सांगताना रा.नी. देशमुख म्हणतात, "महाराष्ट्र राज्याच्या नकाशाप्रमाणे साधारणतः आग्नेय नावाची उपदिशा येते लातूर जिल्ह्याचे स्थान शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, औद्योगिक, सहकारी व सामाजिक क्षेत्रात महत्वाचे आहे. ह्या जिल्ह्याच्या दक्षिणेला कर्नाटक हे राज्य आहे

---

४२. गणोरकर कालिदास, पूर्वोक्त, पृ.११५
४३. कुलकर्णी बी.जी., पूर्वोक्त, पृ.२५८

या उत्तरेस परभणी व इशान्येस नांदेड जिल्हा आहे. दक्षिणेस व पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा तर वायव्यकडे बीड जिल्हा आहे. पूर्व व दक्षिणेकडे कर्नाटक राज्याच्या सीमा आहेत. या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७ हजार १५७ चौ.कि.मी. इतके असून ते राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २.३३ टक्के एवढे आहे. ह्या जिल्ह्याचे मुख्यालय लातूर हेच आहे."[४४] अशा पध्दतीने आपणाला लातूर जिल्हयाचे स्थान लक्षात घेता येते. अशा या लातूर जिल्ह्यात पुढील तालुक्यांचा समावेश होतो. लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, रेणापूर, चाकूर, देवणी, जळकोट व शिरुर अनंतपाळ एकूण तालुक्याची संख्या १० आहे.

लातूर परिसरातील बराच परिसर नद्यांच्या खोऱ्यात मोडणारा आहे. नद्यांची खोरी हा सपाट मैदानी भाग आहे. यामध्ये उदगीर, शिरुर-अनंतपाळ, देवणी, रेणापूर, अहमदपूर व जळकोट तालुक्यांचा भाग येतो. येथील जमीन कमी आर्द्रता शोषणारी असल्याने येथे खरीप पिकांसाठी योग्य आहे. निलंगा तालुक्यातील काहीजमीन तांबड्या रंगाची आढळून येते. येथील नद्यांविषयी बोलतात रा.नी. देशमुख म्हणतात, "या जिल्ह्यात पुढील नद्या आढळून येतात मांजरा,तावरजा, तेरणा, मन्याड, तिरु व धरणी या नद्या आहेत. त्यापैकी मांजरा ही आपल्या लातूर जिल्ह्यातील सर्वात मोठी नदी आहे."[४५] अशा या लातूर जिल्ह्याची निर्मिती इ.स. १९८२ मध्ये झाली. तत्पुर्वी हा जिल्हा उस्मानाबाद जिल्ह्यातील अकरा तालुक्यापैकी एक तालुका म्हणून प्रसिध्द होता. उस्मानाबाद जिल्ह्याचीही निर्मिती देखील विसाव्या शतकाच्या आरंभीची तत्पूर्वी उस्मानाबाद हा नळदूर्ग जिल्ह्यातील एक तालुका होता. व लातूर औसा तालुक्यातील एक गाव होते. १९०५ मध्ये निजामाने नळदूर्ग हे जिल्ह्याचे ठिकाण बरखास्त करुन उस्मानाबाद हे जिल्ह्याचे ठिकाण म्हणून जाहीर केले. त्याच्या पूर्वीचा गंमतीचा इतिहास म्हणजे उस्मानाबाद शहर व त्याच्या अवतीभोवतीची खेडी निजामाने सात वर्षासाठी इंग्रजाकडे गहाण म्हणून ठेवली होती. १८५३ मध्ये गहाण ठेवलेला उस्मानाबाद निजामाने १८६० मध्ये सोडवून घेतला.

---

४४. देशमुख रा.नी., आपला लातूर जिल्हा, पृ.९

४५. तत्रैव, पृ.१०

डॉ. सूर्यनारायण रणसुभे म्हणतात, "जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यात अकरा तालुके होते. लातूर, उदगीर, निलंगा, औसा, तुळजापूर, भूम, परांडा, अहमदपूर, कळंब, नळदूर्ग आणि उस्मानाबाद. जिल्ह्याचे क्षेत्रफळ १२२७१.७ किलोमीटर अथवा ५५१०.३ चौ.मैल होते. या अवाढव्य जिल्ह्याच्या प्रशासनीक कारभारात सुसूत्रता आणणे दिवसेंदिवस कठीण होत चाललेले होते. त्यामुळे १९८२ मध्ये या जिल्ह्याचे विभाजन करुन लातूर जिल्हा स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आला."[४६]

अशा या स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेल्या लातूर जिल्ह्यामध्ये शिल्पकलेचा विकासही बऱ्याच प्रमाणात झालेला दिसून येतो. लातूर जिल्ह्यात पानगाव हे एक महत्वाचे ठिकाण आहे. या ठिकाणी गेल्यावर आपणाला प्राचीन इतिहासाच्या पाऊलखुना दिसून येतात. तसेच निलंगा, खरोसा, उदगीर, औसा आदि ठिकाणी इतिहासाची साक्ष देणारी पुरावे आपल्या निदर्शनास येतात. या पुराव्यावरुन लातूर जिल्ह्याच इतिहास आपणाला अभ्यासता येतो. लातूर जिल्ह्यातही स्थानिक ठिकाणी इतिहासाची साक्ष देणारी काही अवशेष शिल्लक आहेत. रा.नी. देशमुख म्हणतात, "लातूर येथील सिध्देश्वर मंदिर प्रसिध्द आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते या मंदिर परिसरात चौफेर दगडी शिळांनी बांधलेले एक प्राचीन तीर्थ असून याचे पाणी कधीही संपत नाही. अशी अख्यायिका आहे. केशवराज मंदिरात काळ्या पाषाणाची सुंदर अशी विष्णूची मूर्ती आहे. जैनांचे पार्श्वनाथ मंदिर व जैन मुनीची समाधीही प्रसिध्द आहे. येथील अष्टविनायक मंदिर प्रेक्षणीय आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले नाना-नानी पार्क शहरवाशियाचे आकर्षण बनले आहे."[४७] अशा प्रकारे लातूर या ठिकाणी इतिहासाची साक्ष देणारे पुरावे दिसून येतात. लातूर शहराचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे येथील गंज गोलाई ही वर्तूळाकार बाजारपेठ शहराच्या मध्यवर्ती भागात असून तिचे बांधकाम दोन मजली व वर्तूळाकार असे आहे. या गंज गोलाईकडे शहरातील प्रमुख रस्ते जवळ जवळ अकरा रस्ते

---

४६. रणसुभे सूर्यनारायण, लातूर जिल्हा, पृ.१२५

४७. देशमुख रा.नी., पूर्वोक्त, पृ.१६

येऊन मिळतात. गंज गोलाई या प्रसिध्द बाजार पेठेची रचना सुप्रसिध्द स्थापत्य विशारद फैयाजुद्दीन यांनी केली आहे. लातूर हे जसे हिंदू धर्माचे ऐतिहासिक ठिकाण आहे तसेच ते जैनांचेही होते. याविषयी सुभाषचंद्र अक्कोळे म्हणतात, "लातूरच्या पीठाविषयी किंवा पिठावरील अजित कीर्ती, विशाल कीर्ती, महीचंद्र, चंद्रकीर्ती यांचा गुरु म्हणून त्यांच्या शिष्यांनी उल्लेख केला आहे. अजितकिर्ती उल्लेख शके १५३८ मध्ये लिहिलेल्या अनंतव्रत कथेत अभय किर्ती यांनी केला आहे. पुण्यसागराने हरिवंशपुराणात याच पीठावरील दुसरे एक अजितकिर्ती यांचा उल्लेख केला आहे. मराठी वाङमयाच्या दृष्टीने या पीठावरील सर्वात महत्वाचे भट्टारक म्हणजे महीचंद्र होत. स्वतः महिचंद्राने आदिपुराण हा ग्रंथ लिहिला. महाकीर्तीने शीलपताकेत ब्रम्हचिंतामनी याने पद्मपुराण (अध्याय २८-३५) लक्ष्मीचंद्राने गरुडपंचमी व्रतकथेत, रामकीर्तीने पद्मावती आरतीत व देवेंद्र कीर्तीने कालिका पुराणात या महिचंद्राचा गुरु म्हणून उल्लेख केला आहे."[४८]

लातूर या ठिकाणी जसे वैदिक धर्माचे पुरावे सापडतात तसेच जैन धर्माचे पुरावेही सापडतात. या ठिकाणी राष्ट्रकुट घराण्याचा उदय झाल्यामुळे या ठिकाणी सर्वधर्मसंहिष्णू वातावरण असावे. राष्ट्रकुट राजे परधर्म संहिष्णुता दाखविणारे असल्याने या ठिकाणी हिंदू आणि जैन धर्माचा व त्यांच्या संस्कृतीचा उदय व विकास झाला व या जिल्ह्यातील अनेक ऐतिहासिक ठिकाणांवर यांचे अवशेषही सापडतात. त्यामुळे आपणाला संशोधनास मदत होते. लातूर जिल्ह्यात या दोन्ही धर्माची शिल्प किंवा मूर्ती मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यावरुन आपणाला पानगाव हे रेणापूर तालुक्यातील ठिकाण शिल्पकलेच्या दृष्टिकोणातून चांगले अभ्यासता येते यात शंका नाही.

## २.५ लातूर जिल्ह्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा :

लातूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासत असतांना अनेक विद्वानांनी या विषयी लिखान केलेले आहे. त्यामध्ये लव्हाळे बाळासाहेब म्हणतात, "लातूर जिल्ह्याला प्राचीन

---

४८. अक्कोळे सुभाषचंद्र, प्राचीन मराठी जैन साहित्य, पृ.१७४

ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. सम्राट अशोक राज्याच्या सीमा सध्याच्या महाराष्ट्र मौर्यांच्या अधिपत्याखाली होता. त्यावरुन लातूरवर मौर्यांची सत्ता होती. असे अनुमान निघते. या प्रदेशावर मौर्याचे राज्य होते लातूर हे राष्ट्रकुट राज्याचे मूळ निवासस्थान होते. राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष पहिला लट्टालूर नगरचा अधिपती स्वामी असल्याचे नमूद आहे. त्यानेच या शहराची स्थापना केली. सन ७५३ मध्ये बदामीच्या चालुक्यानंतर आलेले राष्ट्रकुट राजे स्वतःला लट्टालूर प्रवर्शिष म्हणजे लट्टालूर निवासी असेच म्हणवून घेत काही ताम्रपटात लातूरचा लट्टालूर असा उल्लेख आढळतो."[४९]

चालुक्य घराण्यातील "विक्रमादित्य ६ व्या नंतर त्याचा पुत्र सोमेश्वर ३ रा हा गादीवर आला त्याने "अभिलाषीतार्थ" हा ग्रंथ लिहिला. त्यामुळे त्यांना सर्वत्र "चक्रवर्ती" असे म्हणत. लातूर जिल्ह्यात त्याचे राज्य असल्याचा व त्याच्या कारकीर्दीची नोंद असलेला कोरिव लेख सापडला आहे. त्यामध्ये लातूर येथील पापविनाशक देवीचे मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. सदर कोरीव लेख शके १०४९ इ.स. ११८९ मध्ये कोरल्याचा उल्लेख आहे. लातूर ही राष्ट्रकुटांची मुळ भूमी असल्याचे अनेकजन सांगतात. त्यात सूर्यनारायण सणसुभे सांगतात, "लातूर ही राष्ट्रकुटांची जन्मभूमी होती. राष्ट्रकुटातील एक प्रख्यात राजा अमोघवर्ष (एक) हा लट्टालूरचा होता संस्कृतमध्ये 'रत्नपूर' म्हणून विख्यात असलेल्या या नगरीच्या नावानेच रुपांतर कालमाणाप्रमाणे लट्टालूर (अपभ्रंश) आणि लत्तालूरपासून लातूर झाले असावे. कर्नाटकातील सौंदंतीवर राज्यकरणाऱ्या राष्ट्रकुटांच्या एका कागदपत्रात आम्ही मूळचे लत्तालूरचे तेथून आमचे पूर्वज येथे आले आधी हे रत्नपूर की लत्तातूर छत्तीसगढच्या भागात असावे. असे काही अभ्यासकांना वाटले. पण लातूरच्या सिध्देश्वर मंदिराजवळ सापडलेल्या शिलालेखावरुन हे सिध्द झाले की, रत्नपूर किंवा लत्तातूर (आजचे लातूर) हीच राष्ट्रकुटांची मूळ जन्म भूमी आहे."[५०]

---

४९. संकलन लव्हाळे बाळासाहेब, लातूर जिल्हा सामान्य माहिती, पृ.१३
५०. रणसुभे सूर्यनारायण, पूर्वोक्त, पृ.१२६

हा लातूर जिल्हा राष्ट्रकुट राजांचे मूळ स्थान असल्याचे वरील स्पष्टीकरणातून लक्षात येते. लातूर या नावाविषयीही फार मोठ्या प्रमाणात मंथन झालेले दिसून येते. लव्हाळे बाळासाहेब म्हणतात "लातूर किंवा रत्नपूरमहात्म्य ग्रंथात लातूरचे वर्णन आहे. प्राचीन काळात लातूरला सत्यपूर, श्रीपूर, रत्नापूर आदी नावे आढळतात. इसवीसनाच्या आठव्या शतकात लातूर या शहराचा उल्लेख 'लट्टालूर' आहे. लट्टालूरचा, लन्तलूर, लत्तनूर, लत्तनौर, लातूनूर असा अपभ्रंश होत जावून आताचे 'लातूर' असे नाव पडले."[५१]

लातूरच्या इतिहासावर राष्ट्रकुट आणि चालुक्य यांच्या कारकिर्दी बरोबरच अनेकांनी आपला ठसा उमटवला आहे.याचा आपणाला अभ्यास होतो राष्ट्रकुट चालुक्यानंतर हा भाग देवगीरीच्या यादवांच्या अधिपत्याखाली आला. इ.स. १३३७ मध्ये यादवांचे राज्य दिल्लीच्या सुलतानाच्या ताब्यात आले व दक्षिणेत मुस्लिम सत्तेचा अंमल सुरु झाला.

लव्हाळे बाळासाहेब म्हणतात, "इ.स. १३५१ मध्ये दिल्लीच्या सुलतानाच्या साम्राज्यातील हा भाग बहामनी साम्राज्यात आला. बहामणी राजधानी गुलबर्गा होती. तद्नंतर बहामनी राज्याची शकले होऊन शेवटी निजामशाही मध्ये हा भाग आला. निजामाचे हैद्राबाद राज्य १९४८ मध्य स्वतंत्र भारतात सामील झाल्यानंतर हा भाग महाराष्ट्र राज्यात आला. थोडक्यात राष्ट्रकुटानंतर यादव घराण्याने या प्रदेशावर राज्य केले. पुढे हा प्रदेश दिल्ली सल्तनीच्या अंमलाखाली आला. त्यानंतर बहामनी राजवटीखाली व पुढे आदिलशाही आणि निजामशाही या त्यांच्या शाह्यांच्या अंमलाखाली गेला."[५२] असा इतिहास प्राचीन आणि मध्ययुगातील आपणाला दिसतो. नंतर १६८१ मध्ये औरंगजेबाने आदिलशाही नष्ट केल्यानंतर हा मोगलांच्या ताब्यात आला. नंतर निजाम-उल-मुल्क याने हैद्राबाद येथे स्वतंत्र संस्थान केले. पुढे भारत स्वतंत्र होईपर्यंत हा प्रदेश निजामाच्या ताब्यात होता. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. १९४८ मध्ये हैद्राबाद संस्थानाचे भारतात विलीनीकरण झाले. हा प्रदेश मुंबई

---

५१. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.१५
५२. तत्रैव, पृ.१४

इलाख्यात आला. १९५६ ला भाषावार राज्यपुनर्रचना करण्यात आली. नंतर हा प्रदेश द्वैभाषिक मुंबई राज्याचा एक भाग बनला. १ मे १९६० रोजी हा प्रदेश महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्या अंतर्गत महाराष्ट्र राज्याचा घटक बनला. १६ ऑगस्ट १९८२ रोजी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन स्वतंत्र लातूर जिल्ह्याची निर्मिती झाली. अशा प्रकारे आपणाला लातूर जिल्ह्याचा व त्याच्या निर्मितीपासून च्या इतिहासाचा आढावा घेण्यास वरील स्पष्टीकरणात मदत होते.

लातूर जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा जसा आहे त्याच तूलनेत सांस्कृतिक वारसाही या ठिकाणचा महत्वाचा आहे. लातूर या ठिकाणी असलेले सिध्देश्वराचे मंदिर हा सांस्कृतिक तेचा उत्कृष्ट नमुना आहे. यालाच लातूरचे ग्रामदैवत म्हणतात याचबरोबर येथील गंजगोलाई बाजारपेठ महत्वाची आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणे प्राचीन कलेचे आहेत. त्यामध्य रेणापूर, औसा, उदगीर, पानगाव, निलंगा खरोसा, किल्लारी इत्यादी ठिकाणे चांगल्या प्रकारचा सांस्कृतिक वारसा जतन करणारी स्थळे आहेत. निलंग्याविषयी रा.नी. देशमुख म्हणतात, "तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे तेथील निळकंठेश्वराचे मंदिर फार प्राचीन आहे. साधारणतः बाराव्या शतकातील हे मंदिर असून यावरील कोरीव काम फारच सुंदर आहे."[५३]

याच्याही पुढे जाऊन खरोसा येथील लेण्याविषयी म्हणतात, "खरोसा हे औसा तालुक्यातील एक लहान गाव असून येथे सहाव्या शतकातील वाकाटक काळातील प्रसिध्द हिंदू व बौध्द लेणी आहेत. यामधील शैवशिल्पे प्रेक्षणीय आहेत. लातूर-बिदर महामार्गावर हे गाव आहे."[५४] अशी कलेने नटलेली अनेक ठिकाणे या जिल्ह्यात आहेत. खरोसा ठिकाणाविषयी डॉ. साळी म्हणतात, "Kharusa in Ausa taluka, the village has a group of caves cut in bad rock during early Rastrakuta Period. The earliest cave from the group seems to be of 5th C.A.D. of vakataka period. But

---

५३. देशमुख रा.नी, पूर्वोक्त, पृ.१७
५४. तत्रैव.

he dilapidated condition does not allow to have clear idea. The group is important to understand the development of Brahmanical cave architecture of early period."[५५] अशा प्रकारे या ठिकाणच्या लेण्या या देखील महत्वाच्या मानल्या जातात. खरोसा येथील लेण्या प्रमाणेच अनेक ठिकाणे सांस्कृतिकतेच्या दृष्टीने महत्वाची मानली जातात. अलीकडच्या काळातही सांस्कृतिकतेच्या दृष्टीने महत्वाचा हा जिल्हा दिसून येतो. लव्हाळे बाळासाहेब म्हणतात, "सांस्कृतिक क्षेत्रातही कला उपासना मंडळ संवाद फिल्म सोसायटी, सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक व्यासपीठ म्हणून मोठ्या जोमाने पुढे आलेली माध्यम ही संस्था, स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला, विलासाव देशमुख फांउडेशन, प्रदिप राठीचे अष्टविनायक प्रतिष्ठान आदी संस्थांनी आपल्या नाममुद्रा उमटविल्या आहेत."[५६] एवढेच नव्हे तर चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रातही मराठवाड्यात लातूरनेच पहिले पाऊल या काळात उचललेले दिसते. श्रीराम गोजमगुंडे यांनी 'झटपट करु दे खटपट' हा चित्रपट मराठवाड्यात प्रथमच लातूरला निर्माण केला.

श्रीराम तात्यांनी पुढे ही परंपरा भालचंद्र गोजमगुंडे (थैमान), शिवणर्ग नागेश दरक (हळद रुसली कुंकू हसले) यांनीही चालविली. रितेश देशमुख यांनी तर थेट बॉलीवुडवर चढाई केली. आणि हिंदीतील आघाडीच्या अभिनेत्यांमध्ये स्थान मिळविले यांच्या नावे चार चित्रपटांचे तारे एव्हाना झळकले आहेत. अशा तऱ्हेने लातूर जिल्ह्याने आपला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा हा जतन करुन ठेवलेला आपल्या निदर्शनास येतो.

## २.६ लातूर जिल्ह्यातील कलेची ऐतिहासिक दालने :

मराठवाडा हा तसा पाहिला तर कलेच्या क्षेत्रात त्यातल्यात्यात प्राचीन कलेच्या क्षेत्रात नावारुपाला आलेला भाग आहे. इतर जिल्ह्यांप्रमाणे याही जिल्ह्यात ऐतिहासिक शिल्पकलेची दालने असलेली आपणाला आभ्यासता येतात. यामध्ये प्रामुख्याने किल्ले, मंदिरे,

---

५५. Sali Chetan, Sali Geeta, Latur (Maharashtra), p.७२६

५६. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२०

दर्गाह, लेण्या, मूर्तीशिल्प, बारवा इत्यादींचा अभ्यास आपणाला होतो. त्यात शिल्पकला आणि वास्तुकला किंवा स्थापत्यकला यांना अभ्यासात विशेष महत्व द्यावे लागेल. लातूर जिल्ह्यातील अनेक दालनांचा अभ्यास हा पुढील प्रमाणे

## २.६.१ लातूर (लट्टालूर)

डॉ. साळी म्हणतात, "Chincholi Ballalnath Latur taluka, is known for Bhairavnath temple of Yadav Period."[५७] लातूर तालुक्यामध्ये चिंचोली बलालनाथ या ठिकाणी यादव काळातील एक भैरवनाथाचे म्हणजे महादेवाचे मंदिर आहे तसेच "Gangapur Latur taluka has a Yadav period temple dedicated to Ganga."[५८] लातूर तालुक्यातील आणखी एक मंदिर म्हणजे गगापूर येथील यादवांच्या काळातील गंगेचे होय. लातूर जिल्ह्यातील काही गावांप्रमाणेच लातूर या ठिकाणीही काही ऐतिहासिक वास्तु सापडतात. याविषयी डॉ. साळी सांगतात, "Latur the town has few temples called Siddheshwara. Ramlingeshwara, Papvinash Bhutesvara, Rama, Kesavarada and Ambabai. The Siddhesvara temple is considerably old and famous. Papvinash Bhutesvara was build in early ११th C.A.D. The temple has on incription of the period of somesvara III dated to sake १०४९ (AD ११२८). Kesavrav Shrine is of yadav period."[५९] अशा तऱ्हेने लातूर या ठिकाणी काही ऐतिहासिक मंदिरे आहेत. त्यामध्ये सिध्देश्वर हे लातूर वासीयांचे ग्रामदैवत, रामलिंगेश्वर, पापविनाश भूतेश्वर, केशवराजमंदिर, अंबाबाई आदि मंदिरे येथे दिसून येतात. येथील सिध्देश्वराचे मंदिर प्राचीन किंवा पुरातन आणि प्रसिध्द आहे. पापविनाश भूतेश्वर मंदिर अकराव्या शतकात बांधलेले आहे. चालुक्य राजा

---

५७. Sali Chetan, Sali Geeta, Op.cit., p.७२६
५८. Ibid.
५९. Ibid

सोमेश्वर तिसरा याच्या काळातील आहेत. यादव काळातीलही केशवराज मंदिर आहे अशा प्रकारे लातूर या ठिकाणीही कलेचे अवशेष हे आपणाला दिसून येतात.

तसेच लातूर या ठिकाणी सुरतशहावलीचा दर्गा आहे. तो सर्वधर्मसमभावाचा प्रतिक आहे. हा दर्गा हजरत सय्यद सैफुदुल्लाशाह कादरी यांचा आहे ते मुळचे रहिवाशी होते. सुरतहून ते लातूरचे प्रसिध्द नागरिक शामरावजी दिवाण यांच्या आजोबाच्या काळात लातूरला आले. येथे आल्यापासून या सिध्द पुरुषाने अनेक चमत्कार दाखविले त्यामुळे लातूर व परिसरातील सर्व हिंदू मुसलमान लोकांमध्ये त्यांचे नाव लोकप्रिय झाले. लातूर येथील ग्रामदैवत सिध्देश्वर देवस्थानचे महाराज सिध्दी बाबा हे सुरतशहावली यांचे निकटचे स्नेही होते. या स्नेहसंबंधाचे प्रतीक म्हणून आजही सुरतशहावली यांच्या ऊरुस प्रसंगी सिध्देश्वर देवस्थानला नारळ व झेंडा अर्पन केला जातो तर ग्रामदैवत सिध्देश्वराच्या यात्रेवेळी सुरतशहावलीच्या दर्ग्यास नारळ व चादर अर्पण करण्यात येते. १७ व्या शतकापासून आजपर्यंत हिंदू मुसलमान ऐक्याचा संदेश देणारे सुरतशाहवलीसारखे संत लातूर परिसरात झाल्यामुळेच लातूर येथील हिंदू-मुस्लिम समाजात गेल्या अनेक वर्षापासून एकोप्याची भावना दिसून येते.

### २.६.२ उदगीर (उदयगिरी)

उदगीर हे लातूर जिल्ह्यातील एक ऐतिहासिक शहर आहे. याविषयी अनेकांनी लिखाण केलेल आहे. या ठिकाणी प्राचीन काळाचेही अवशेष आढळतात. चालुक्यांच्या काळापासून या ठिकाणचा इतिहास मिळतो. शं.गो. तुळपुळे म्हणतात, "लातूर जिल्ह्यातील उदगीर हे तालुक्याचे ठिकाण असून या शहराजवळील टेकड्याचे जुने नाव 'उदयगिरी' हे होते."[६०] उदगीर हे एक प्रसिध्द असे ऐतिहासिक शहर आहे उदगीर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून येथे उडीद आणि भूईमुगाचा मोठा व्यापार चालतो रा.नी. देशमुख असे म्हणतात की,

६०. तुळपुळे शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पृ.३१

"येथे ऐतिहासिक असा यादवकालीन किल्ला या शहराचे आकर्षण आहे. उदागीरबाबा या संत पुरुषाची समाधी या किल्यात आहे."[६१]

उदगीर शहराच्या जवळ काही टेकड्या आहेत यांच्यामुळेच या ठिकाणी किल्याची निर्मिती झाली असावी. हा किल्ला या टेकड्यांमुळे संरक्षित झालेला आपल्या निदर्शनास येतो. उदगीर शहराच्या जवळच एका लेंडी नदीचा उगम होतो. या विषयी पी.सी. राठोड म्हणतात, "लेंडी नदी लातूर जिल्ह्यातील उदगीर या तालुक्याच्या ठिकाणा जवळून ही नदी उगम पावते. उदगीरच्या किल्याजवळ दोन डोंगर टेकड्या आहेत. त्यांच्या मध्य भागातील खोल दरिमध्येच या नदीचा उगम असल्याचे मानले जाते."[६२]

या नदीचा उपयोग परिसरातील सिंचन व्यवस्थेसाठी होतो. उदगीर येथे पशुसंवर्धन केंद्रही आहे. शैक्षणिक व कापूस खरेदीकेंद्र म्हणूनही उदगीर प्रसिध्द आहे. दुधाची भुकटी तयार करण्याचा येथे कारखाना आहे.हे लातूर जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर असून कर्नाटक राज्याच्या सरहद्दीजवळील मोठे व्यापारी केंद्र आहे. लातूर जिल्ह्यातील उदगीर हे ऐतिहासिक शहर आहे. याचे प्राचीन नाव "'उदयगिरी' होते. उदगीरच्या जवळ 'उदयगिरी' नावाचा डोंगर आहे. त्यावरुन हे नाव पडले. मराठवाड्याच्या तसेच महाराष्ट्राच्या सिमेवर हे गाव असून येथून आंध्रप्रदेश व कर्नाटक या राज्याच्या सीमा बारा की.मी. अंतरावर आहेत. येथे भूईकोट किल्ला आहे या किल्याचा प्राथमिक स्वरुपाचा उल्लेख डॉ. कठारे व नगराळे म्हणतात, "मुस्तनत तारिख ए-फरिस्ता, सफरनामा ए-यार-जंग बहादूर व बरवाये शुर्षिदेजाही या फारशी भाषेतील ग्रंथात आहे. त्यानुसार उदगीर चे सुरुवातीचे नाव 'अतगीर' आणि नंतर 'इब्राहीम गड' असे असल्याचे आढळते."[६३] तारिख-ए-फरिस्ता या ग्रंथानुसार इ.स. ८९६ मध्ये संत उदागीर बाबा यांचे येथे आगमन झाले. त्यानांच 'उद्दालीक ऋषी' असे म्हणत त्यांनी येथे वस्ती केली. त्यांनी

---

६१. देशमुख रा.नी., पूर्वोक्त, पृ.१६

६२. राठोड पी.सी., उदगीर एक सांस्कृतिक अभ्यास, पृ.१२

६३. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.४२३

पुढे किल्ल्यात समाधी घेतली. त्यांच्या आदरापोटी या वस्तीला 'उदगीर' या नावाने ओळखले जाऊ लागले.

उदगीरचा किल्ला उदगीरच्या इतिहासाच्या आठवणी घेऊन उभा असलेला दिसून येतो. उदगीर शहराच्या उत्तरेला हा किल्ला शेकडो वर्षांच्या काळाच्या आठवणी देत अभिमानाने मजबूत पायावर ताठरपणे उभा आहे.उदगीर शहराच्या मानाने हा किल्ला अधिकच उतारावर बांधला आहे. कृत्रिम खंदक आणि तटापेक्षा नैसर्गिक दऱ्याखोऱ्यानेच किल्याचे संरक्षण अधिक मजबूत झालेले आहे. ज्या भौगोलिक परिस्थितीत हा किल्ला दौलताबादच्या किंवा आसीरगडच्या किल्याप्रमाणे उंच टेकडीवर वसलेला नाही किंवा गोवळकोंड्याच्या किल्याप्रमाणे मैदानी पठारावर एका उंच टेकडीवर बांधण्यात आलेला नाही. राजाराम राठोड म्हणतात, "उदगीरचा किल्ला ज्या टेकडीवर वसलेला आहे ती टेकडी एका खोल दरीतून निर्माण झालेल्या दोन खोऱ्यांच्या आत आहे. त्या दरीच्या खोऱ्याचे फाटे किल्याच्या पश्चिमेला आणि पूर्वेला फुटलेले आहेत. आणि उत्तरेला मोठी दरी अस्तित्वात आहे. अशा प्रकारे किल्याच्या पूर्वेला पश्चिमेला व उत्तरेला मोठे नैसर्गिक खोरे आहे आणि किल्याच्या दक्षिणेला उदगीर हे शहर वसलेले आहे."[६४] लव्हाळे बाळासाहेब म्हणतात, "किल्याचा पाया व उभारणी दक्षिणेतल्या चालुक्य राज्याच्या काळात झाली व त्यानंतर बहामनी राजांनी या किल्यात वाढ केली असे इतिहासकारांचे म्हणणे आहे."[६५] चौबारा ते किल्ला दरवाजा या मार्गाने सरळ गेल्यास खाली उतारामध्ये किल्ला दिसतो. लोकवस्ती संपल्याबरोबर एक जुनी पडलेली आडवी भिंत दिसते. ती भिंत म्हणजे शहराची व किल्याची सीमा होय. किल्याच्या चहुबांजुनी एक खंदकच आहे. त्या खंदकाची खोली ४० फुट असून रुंदी २० फुट आहे. किल्याचा बाहरेचा तट आजही मजबूत अवस्थेत आहे. तटाच्या भिंतीत हत्ती कोरलेले ती मोठे दगड बसवण्यात आलेले आहेत. या हत्तीवर माणूस बसलेला आहे. किल्याच्या बाहेरच्या तटाचा परिघ ७७५ गज

६४. राठोड राजाराम, उदगीर इतिहास आणि स्मारके, पृ.३७-३८
६५. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२२

असून बाहरेच्या तटात एकूण १२ बुरुज आहेत. यापैकी किल्याच्या उत्तरेकडील भागात खूप खोल दरी आहे आणि त्यात मोठ-मोठे दोन बुरुज होते.

कठारे व नगराळे म्हणतात, "किल्याच्या बांधकामासाठी मोठ-मोठे दगड, नक्षीकाम केलेले दगड, चुना, वाळू, कापूस, आंबाडा याचा वापर केला असून किल्याभोवती मोठा खंदक आहे. किल्याच्या आतील भागात दोन धान्य कोठारे, कारंजे, बाग, किल्लेदाराचे निवासस्थान राणी महाल, प्रार्थना मंदिर, तोफखाना, बारुदखाना, रंग महाल, बडी राणी महाल, उदगीर बाबाची समाधी आहे. डाव्या बाजुकडील तटबंदीलगत अश्वशाळा असून पूर्वेस पाण्याची विहीर आहे. राणी महालात सुंदर नक्षीकाम आहे. तटबंदीवर हत्तीची चित्रे आहेत. उदगीर बाबाच्या समाधीजवळ दोन विहीरी असून त्यामधील पाणी तटबंदीवर आणण्याची व्यवस्था आहे. समोरील भागात दोन मोठे बुरुज आहेत त्याच्यावर मोठ्या तोफा आहेत."[६६] मागील बाजूला एक बुरुज व एक उंच मनोरा आहे. किल्याच्या प्रवेशद्वारात आणि मागच्या बाजूने उत्तरेकडे एक भूयार आहे.

व्हि.एस. कुलकर्णी म्हणतात, "ढासळत चाललेला ऐतिहासिक भूईकोट किल्ला जतन करण्याची जबाबदारी असताना पुरातन विभागाने मात्र उदगीरच्या किल्याच्या दुरुस्तीच्या व डागडूजीच्या साठी कागदोपत्री कामे दाखवून करोडो रुपयांचा चुराडा केला आहे.त्यामुळे किल्याची दुरावस्था आजही कायम असून किल्ला भूईसपाट होण्याच्या मार्गावर आहे."[६७] सन १७६० मध्ये मराठे व निजाम यांच्यात लढाई होऊन यात मराठ्यांचा विजय झाला होता. या विजयानंतर पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचा संबंध या किल्याशी आहे. असे इतिहासकारांचे मत आहे. त्यामुळे उदगीरच्या किल्याची राज्यात नव्हे तर भारताच्या इतिहासात गणना केली जाते.

---

६६. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.४२४

६७. कुलकर्णी व्ही.एस., उदगीरचा भूईकोट किल्ला - भूईसपाट होण्याच्या मार्गावर, पृ.१

## २.६.३ निलंगा

लातूर जिल्ह्यातील निलंगा हे एक ऐतिहासिक दालन म्हणून आपणाला अभ्यासता येते. या ठिकाणी इतिहासाची साक्ष देणारी अवशेष दिसून येतात. निलंग्याविषयी सांगताना बाळासाहेब लव्हाळे म्हणतात, "निलंगा तालुका मुख्यालयाचे ठिकाण असून २००१ च्या जणगणनेप्रमाणे लोकसंख्या ३१६६२ इतकी आहे. नगरपरिषदेची स्थापना १९४४ ला झाली असून नगरपरिषद हद्द २०.४९ चौ.कि.मी आहे. येथे इ.स. १२ व्या शतकात निळकंठेश्वराचे मंदिर हेमाडपंथी वास्तुकलेने बांधलेले आहे. यावरुन या गावाचे नाव निलंगा पडले."[६८]

लातूर जिल्ह्यातील निलंगा येथील निळकंठेश्वराचे मंदिर प्रसिध्द आहे या मंदिराचे स्थापत्य प्रामुख्याने चालुक्य होयसळ पध्दतीचे आहे. या मंदिराचा आराखडा बिल्वदळी बनलेला आहे. हा होयसळ पध्दतीचा प्रभाव आहे. मंदिराचा मंडप चौकोनी आकाराचा आहे. येथील १६ खांब अत्यंत योजकतेने उभारलेली आहेत. खांबावरील मध्य चौकोनात रामायण-महाभारतातील काही कथाप्रसंग शिल्पीत केलेले दिसून येतात. कठारे व नगराळे म्हणतात, "निळकंठेश्वर मंदिर चालुक्य कालीन असून या मंदिरालाच 'हरिहर' मंदिर असे म्हटले जाते. या मंदिराची लांबी ४५ फूट व रुंदी ६० फूट आहे. मंदिराचा मंडप ३० फूट लांब व ३० फुट रुंद आहे. मंडपात कोरीव नक्षिकाम केलेले १६ स्तंभ आहेत. मंडपाच्या दोन्ही बाजूस देवकोष्टासारखी उपमंदिरे आहेत, म्हणूनच या मंदिराला हरिहरेश्वर या नावाने ओळखले जाते. गर्भगृहात शिवलिंग आहे. मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडी असून त्यावरील कोरीव काम सुंदर आहे."[६९] हे मंदिर अनेकांनी म्हटल्याप्रमाणे हेमाडपंथी नसून हे मंदिर त्रीदल पध्दतीचे आहे व चालुक्यांच्या काळातील मंदिर आहे. असे आपणाला याच्या बाबतीत बोलता येते.

"इ.सनाच्या बाराव्या शतकातील या मदिराच्या भिंतीवर आतून व बाहेरही कोरीव शिल्प आढळतात. अशा शिल्पांची संख्या ९२ आहे. उत्तराभिमुख गाभाऱ्यात उत्कृष्ट गौरीहर

---

६८. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२९
६९. कठारे, नगराळे, पूर्वोक्त पृ.३७७

प्रतिमा आहे. मागील बाजूस मकरतोरण कोरलेले आहे. शिव-पार्वतीचेही सुंदर शिल्प आहे शिवाचे वाहन नंदी आणि पार्वतीचे गोधा हे शिल्पही मोहक आहेत."[७०] याशिवाय हरगौरी शिव-विष्णूची संयुक्त प्रतिमा हरिहर, सप्तमातृका, पार्वती, गौरी, चामुंडा, शिवाचे पूर्णरुप असलेला भैरव, नृसिंह, श्रृंगार करीत असलेली नृत्यांगना विष्णूचे विविध अवतार, महिषासूरमर्दिनी, हातात पोपट व आंब्याची डहाळी घेतलेली मदनिका व शिवनटराज ही शिल्पे मंदिरावर आढळतात. येथील शिल्पांचे अनेक विद्वानांनी तोंड भरुन स्तुती केलेली आहे. डॉ. प्रभाकर देव म्हणतात, "लातूर पासून दक्षिणेस चाळीस मैलांवर आणि खरोसा लेण्यांच्या अग्नेयेस पंचवीस कि.मी. अंतरावर असलेल्या या लेण्यांच्या आग्नेयस पंचवीस कि.मी. अंतरावर असलेल्या व तेरणानदीच्या उत्तर किणाऱ्यावर वसलेल्या तालुका निलंगा येथे प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडातील अवशेष आढळतात. या सर्व अवशेषांत गावाच्या पूर्वेस मध्यवस्तीत असलेले निळकंठेश्वर मंदिर सर्वात महत्वाचे असून ते मध्ययुगीन काळातील आहे. या मंदिराच्या छतावर कीर्तीमुख, सप्तमातृका आणि नृत्यांगना कोरलेल्या आहेत."[७१]

येथील मंदिरावरील शिल्पांबाबत डॉ. देव प्रभाकर सिल्लोड येथील राज्यस्तरीय इतिहास विषयाच्या परिषदेत म्हणतात, "निलंग्याच्या निळकंठेश्वराच्या मंदिरावर दोन अप्सरांच्या मूर्ती आहेत."[७२] या ठिकाणी सुरसुंदरीच्या शिल्पाकृतीही मोठ्या संख्येने आहेत. मंडपाच्या मुख भागात वामभिंती असून दरवाजा जवळ दोन स्तंभ आहेत. मुखभाग सोडल्यास मंडपाच्या उरलेल्या बाजू बंद आहेत. मंडपाच्या प्रत्येक कोपऱ्यात स्तंभांची चतुष्की आहे म्हणजेच मंडप एकूण सोळा स्तंभावर उभा आहे. मंडपाच्या मधोमध रंगशिला असून तिच्यावरील छत प्रत्येक चतुष्कीच्या कोपऱ्यातील एक स्तंभ अशा चार स्तंभावर पेललेले आहे.

अरुणचंद्र पाठक म्हणतात, "मंडपातून तीन गर्भगृहामध्ये जाण्याचे प्रवेशमार्ग आहेत प्रत्येक आणि मंडप यांच्यामध्ये अंतराळ आहे. पूर्वाभिमुख असलेल्या दोन गर्भगृहात शिवलिंग

---

७०. तत्रैव

७१. Deo Prabhakar, Temples of Mrathwada, p.४९

७२. देव प्रभाकर, सिल्लोड येथील मराठवाडा इतिहास परिषदेतील भाषण.

आहे. उत्तराभिमुख गर्भगृहात हर आणि गौरी यांच्या मूर्ती आहेत. दक्षिणाभिमुख गर्भगृहामध्ये विष्णूच्या चोवीस रुपापैकी केशव हे रुप दाखविले आहे."[७३] या मंदिराच्या शिल्पशैलीवरुन हे मंदिर १२ व्या शतकाच्या अखेरीस बांधले गेले असावे असा अनेक इतिहासकार काढतात. बहुतांशी तो सत्य असावा असे आपणाला म्हणता येते.

## २.६.४ खरोसा

लातूर जिल्ह्यातील अनेक इतिहासाच्या दालनापैकी खरोसा हे एक दालन म्हणून आपणास अभ्यासता येते. खरोसा या ठिकाणी प्रामुख्याने लेणी आहे. त्यांचाच अभ्यास आपणाला कलात्मक दृष्टीने करावा लागतो. मराठवाड्यात जगप्रसिध्द अशी लेणी स्थापत्य आहेत. त्यात स्थापत्य आणि शिल्पकलेचा परमोत्कर्ष वेरुळ येथील कैलास लेणीत व अन्य लेणीत पहावयास मिळतो. तसेच प्राचीन शिल्प स्थापत्य आणि चित्रकलांचा उत्कर्ष अजिंठा येथील लेणीत साकार झालेला दिसून येतो. सोमनाथ रोडे म्हणतात, "शैलगृह स्थापत्याचा दक्षिणेतील पहिला अविष्कार या भागातील पितळखोरा येथील लेणीत आढळतो. याशिवाय जंजाळा, म्हैसमाळ, औरंगाबाद, धाराशिव, खरोसा येथील वैशिष्ट्यपूर्ण लेणी देखील महत्वपूर्ण मानल्या जातात."[७४] या सर्व लेणींनी मराठवाड्याच्या सांस्कृतिक आणि कलात्मक जडणघडणीत मोलाची भर घातली आहे.

के.के. शर्मा म्हणतात, "दशावतार लेण्यात पहिला टप्पा दिसतो. बौध्दविहारातील आरेखणाशी या लेण्यांचे आरेखन मिळते-जुळते आहे. या लेण्यात मागील बाजूस गर्भगृह असून त्यापुढे खांबयुक्त सभागृह आहे. अंबेजोगाई, पाताळेश्वर, भोकरदन, खरोसा, व गुलवाडा यांचा या गटात समावेश होतो."[७५] यावरुन खरोसा लेणी ही एक प्रसिध्द अशा प्रकारची लेणी असलेली आपल्या निदर्शनास येते. ही लेणी लातूर जिल्ह्यामध्ये आहे लव्हाळे बाळासाहेब म्हणतात, "औसा तालुक्यात औशापासून २६ कि.मी. अंतरावर लातूर-बिदर महामार्गावर

---

७३. पाठक अं.श., पूर्वोक्त, पृ.१९५
७४. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, पृ.२७१
७५. शर्मा के.के. (संकलन), संदर्भ महाराष्ट्र, खंड-१, पृ.७०

छोटेसे खेडे आहे. येथे बौध्दकालीन प्राचीन लेणी आहेत. येथील महादेव लेणी सुंदर व भव्य असून पाहण्यासारखी आहे."[७६]

लातूर जिल्ह्यात, निलंगा तालुक्यातील खरोसा या गावच्या डोंगराळ लेणी आहेत. त्यामुळेच येथील लेणी खरोशाच्या लेणी म्हणून ओळखल्या जातात. येथील लेणी क्रमांक बारा सोडून बाकीच्या सर्व लेणी हिंदू धर्मीय आहेत. खरोसा हे गाव लातूर ते निलंगा रस्त्यावर असून ते निलंगा शहरापासून तीन कि.मी. अंतरावर आहे. खरोसा येथील डोंगरातील खडक लालसर व वाळुमिश्रीत असून त्याला स्थानिक भाषेत केंगल या नावाने ओळखले जाते. डोंगरातील खडक ठिसूळ असल्याने कलाकाराची कला चांगली झाली नाही. परिणामी त्यांना लेणी खोदण्याचे काम सोडून दुसऱ्या लेणी खोदण्याचे काम करणे आवश्यक वाटले. डॉ. अनिल कठारे म्हणतात, "खरोसा या ठिकाणी एकूण तेरा लेणी असून त्यांची निर्मिती इ.स. ४ थ्या ते ६ व्या शतकात झाली असावी. वाकाटक आणि राष्ट्रकुटांच्या काळात लेणींचे खोदकाम झाले असावे. लेणी खोदकामासाठी निवडलेल्या या डोंगराच्या टेकडीची लांबी दीड कि.मी. असून रुंदी अर्धा कि.मी. आहे."[७७]

येथील लेणी क्रमांक एक आणि दोनमध्ये कसल्याच प्रकारचे शिल्पकाम केलेले आढळत नाही. लेणी क्रमांक तीनमध्ये सहा स्तंभ असून प्रदक्षिणापथ निर्मितीचा प्रयत्न केला आहे. लेणीमध्ये शिवलिंग कोरण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. गो.बं. देगलूरकर म्हणतात, "येथील क्रमांक चार च्या लेण्यास महादेव लेणी म्हणतात याची रचना विशेष म्हणावी अशी आहे. नंदी मंडप, मंडप आणि मंडपाच्या मागील बाजूस सर्वतोभद्र पध्दतीचे गर्भगृह (४.८८ मी x ३.३५ मी) अशी ही ठेवण आहे. वेरुळ येथे असे गर्भगृह आहे. मंडपात प्रवेश करावयाचा तो कठड्याच्या भिंतीतून मंडपात एकूण २६ स्तंभ आहेत. गर्भगृहाच्या दाराच्या दोन्ही अंगास द्वारपाल प्रतिमा आहेत. त्यात काही स्त्री प्रतिमाही आहेत. असा प्रकार वेरुळ येतील सीता-की-

---

७६. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२८

७७. कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य (खंड-२), पृ.१६

न्हानी या लेण्यातही आढळतो. गर्भगृहात सुमारे १ मीटर उंचीचे शिवलिंग आहे."[७८] याच्यापुढे गेल्यानंतर लेणी क्रमांक ५ आणि ६ मध्ये कसल्याच प्रकारचे शिल्पकाम केलेले नाही लेणी क्रमांक सात आकाराने मोठी असून त्यामध्ये नृसिंहाचे शिल्प अर्धवट आणि ओबडधोबड स्वरुपात असल्याचे दिसते. लेणी क्रमांक आठ प्रशस्त आहे परंतु यामध्येही शिल्पकाम नाही.

लेणी क्रमांक नऊ ही दोन मजली असून पहिल्या म्हणजे तळमजल्यात कसलेच शिल्पकाम आढळत नाही. परंतु दुसऱ्या मजल्यात २४ स्तंभ आहेत. तसेच लेणीत प्रकाश रहावा यासाठी छताला एकछिद्र ठेवले आहे. या छिद्राला स्थानिक भाषेत 'सोमण' म्हणतात. पावसाळ्यात या छिद्रातून लेणीत आलेले पाणी येथेच साठून राहू नये म्हणून त्याची व्यवस्था केली आहे. या लेणीच्या बाजूस उपमंदिराच्या भिंतीत शिल्पकाम केलेले आढळते. कठारे व नगराळे म्हणतात, "लेणी क्रमांक दहाच्या प्रवेशद्वारावर 'त्रिशुलधारी शिवाची' प्रतिमा कोरलेली आहे. लेणीत प्रवेश केल्यावर तांडवनृत्य करीत असलेली 'डमरुधारी शिव' प्रतिमादिसते. त्यास 'नटेश्वर' म्हटले आहे. याच लेणीत शिवपार्वती, समुद्रमंथनाचा देखावा आणि राम-रावणाचा युध्दांचा प्रसंग शिल्पांकीत करण्यात आला आहे. या युध्दात रथदल मोठ्या प्रमाणात दाखविले आहे. युध्दात लक्ष्मणाला बाण लागताच हनुमान सर्व पर्वतच उचलून घेत असल्याचे या लेणीतील हे शिल्प अतिशय सुंदर आहे. याच लेणीत विष्णूचे नऊ अवतार शिल्पांकित केले असून त्या नऊ अवतारापैकी नृसिंह, वराह, मत्स्य, बुध्द आणि राम हे अवतार अत्यंत सुबक आहेत. याच लेणीत नम्र झालेला गजराज अस्पष्ट अवस्थेत दिसतो."[७९] लेणी क्रमांक अकरा ही दोन मजली असून तळमजल्यात प्रशस्त सभागृह आहे. त्यामध्ये शिल्पे कोरलेली नाहीत. दुसरा मजला मात्र झोपडी सारखा असून त्यामध्ये चार अस्पष्ट शिल्पे आहेत. लेणीच्या दुसऱ्या भिंतीवर मानवाच्या चार मूर्ती आहेत.

---

७८. देगलूरकर गो.बं., गोदा खोऱ्यातील लेणी, पृ.४८

७९. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.३२७

डॉ. अनिल कठारे म्हणतात, "लेणी क्रमांक बारा ही बुध्द लेणी या नावाने ओळखली जाते. लेणी क्रमांक तेरामध्ये कसल्याच प्रकारचे शिल्प आढळत नाही. या लेणींची निर्मिती वाकाटक काळात झाली असावी."[८०] खरोसा येथील लेणी हिंदू आणि बौध्द धर्माच्या असून त्यांच्यातील सलोखा हा आपणाला त्या काळात किती उत्कृष्ट होता हे समजते. प्राचीन कालातील या लेण्या वेरुळ येथील लेण्यांशी काही बाबतीत साम्य दर्शवितात.

गो.बं. देगलूरकर म्हणतात, "वेरुळ येथील १५ व्या व १६ व्या लेणीत आहेत. तसेच कथनात्मक शैव आणि वैष्णव शिल्पपट येथेही आहेत, उत्तरेकडे शैव कथा तर दक्षिणेकडे वैष्णव कथा शैवपटामध्ये रावणानुग्रह, उमामहेश्वर, नटराज, लिंगोद्भव, समुद्रमंथन (निळकंठ) तर वैष्णव पटात वराह, नृसिंह, गोवर्धनधारी, कालियामर्दन इत्यादीचा समावेश होतो."[८१] यावरुन हिंदूतील अनेक संप्रदाय उदा. वैष्णव, शैव, शक्ती संप्रदायाचा या ठिकाणी प्रभाव दिसतो पण बाराव्या क्रमांकाचे बौध्द लेणे याला अपवाद मानले पाहिजे. पण प्राचीन काळापासून जो तत्कालीन कलाकारांनी आपणाला एकात्मतेचा संदेश दिला आहे याची जपणूक आपण चांगल्या प्रकारे केली पाहिजे असा उपदेशच जणू काही खरोशाच्या लेण्यांचा समुह हा संबंध मानव जातीला करतो आहे यात शंका नाही.

### २.६.५ पानगाव

पानगाव हे शहर पूर्वी खेडेच होते. पण आता या ठिकाणी शनिवारचा बाजार भरतो. हे ठिकाण पूर्वी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात मोडत होते पण आता मात्र हे ठिकाण लातूर जिल्ह्यातील रेणापूर मतदारसंघात मोडते या ठिकाणी कलेचा सुंदर विकास झालेला आपल्या निदर्शनास येतो. या ठिकाणची शिल्पकला ही इतिहासाला अमर योगदान देणारी आहे. मराठवाड्याच्या इतिहासाला समृध्द करणारे हे ठिकाण आहे. पण महत्वाच्या काही ठिकाणांनाच इतिहासात वाव मिळाला आहे.

---

८०. कठारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१७

८१. देगलूरकर गो.बं., पूर्वोक्त, पृ.४८

संजय भारती म्हणतात, "मराठवाडा म्हटल की पहिल्यांदा नजरेसमोर येतं वेरुळ आणि अजिंठा या अद्भूत लेणी पाहण्यासाठी जगभरातून पर्यटकांची ये-जा सारखी सुरु असते. अनेक मंदिरांचे त्यांच्या कलाकृतीचे पुरावे समर्थपणे आजही मराठवाड्याने आपल्या कड्या कपारीत जतन केले आहेत. मराठवाड्याची कला परंपरा फार-फार पुरातन अशी आहे. दुसऱ्या शतकातील तरंगणाऱ्या विटांची मंदिरे तेर येथे होती. राष्ट्रकुटांनी देखील मराठवाड्यात मंदिरे बांधली. अतिशय अवघड पध्दतीने शिल्पीत झालेले वेरुळचे कैलास मंदिर अजूनही पुरातन कलेची साक्ष देते रावण कैलास पर्वत हालवतो, गंगा, यमुना, सरस्वती, सप्तमातृका अशी अनेक मंत्र मुग्ध करणारी शिल्पे या मंदिरात कोरलेली आहेत."[८२]

अशाच प्रकारे चालुक्य काळामध्ये देखील आपणाला मंत्रमुग्ध करणारे शिल्पवैभव हे पानगावच्या विठ्ठल मंदिरावर दिसून येते. हे मंदिर गावाच्या मध्यभागी असून ते अतिशय भव्य आहे. भंजनामुळे मूर्ती विद्रुप झाल्या तरीही मंदिराचे शिल्पसौंदर्य टिकून आहे. हे मंदिर चालुक्यांच्या काळातील असले तरी यावर होयसळ शैलीचा बराचसा प्रभाव आहे. काही इतिहासकार हे मंदिर पूर्वी महादेवाचे मानतात. पण सध्या गाभाऱ्यात विठ्ठलाची स्थापना केलेली पाहून हे मंदिर वैष्णव मानता येते. हे मंदिर अकराव्या शतकातील आहे. कठारे व नगराळेही म्हणतात, "पानगाव येथे जिल्हा परिषदेच्या जवळच चालुक्य काळातील विठ्ठल मंदिर आहे."[८३]

पानगाव येथील मंदिराचा बाह्य भाग हा विविध शिल्पांनी जखडून गेलेला आपल्या निदर्शनास येतो. अशा शिल्पांमध्ये मातृदेवता, विष्णूची अवतार शिल्प, अप्सरा, मदनिकांची अनेक शिल्पे येथे दिसून येतात. येथील स्त्रियांच्या मूर्ती पाहणाराला खिळवून ठेवतात. अशाच प्रकारे अजिंठा येथील चित्राकृती देखील फारच मोहक आहेत. डॉ. रमझान शेख म्हणतात, "अजिंठ्याच्या स्त्रियांच्या चित्राकृती अगदी अपूर्व अशा आहेत. गौरवर्ग आणि श्यामा, मुग्धा अर्धस्फुटिता, प्रोढा आणि कुमारिका,सुस्तनी आणि कृपुल नितंबिनी अशा शेकडो विविध

८२. भारती संजय, कला मराठवाड्याची, पृ.२१४
८३. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.३७८

वर्णांच्या विविध आभूषणे धारण करणाऱ्या, विविध अवस्थेतील देशोदेशीच्या या स्त्रिया चित्रकारांनी अजिंठ्यात सामूर्त केल्या आहेत. स्त्री हीच मुळी कलावंताचे स्फुर्तिस्थान अजिंठ्याचे प्रतिभावान चित्रकार या स्फुर्तिविषयात एवढे मग्न झाले यात नवल कसले."[८४]

पानगाव या ठिकाणी देखील अशा स्त्री प्रतिमा मोहक रुपात निर्मित केल्या आहेत. येथील कलावंताच्याही प्रेरणा या स्त्रियांनीच दिल्या अर्थातच स्त्री प्रतिमांनीच त्यांना प्रेरित केले असे आपणाला वरील विधानाचा आधार घेऊन स्पष्ट करता येते. पानगाव येथील मंदिर हे भूमिज प्रकारात मोडत असावे याला पुरावा म्हणून के.के. शर्मा म्हणतात, "महाराष्ट्रात सर्वत्र या प्रकारची मंदिरे पहावयास मिळतात. शिखर पध्दतीमुळे ही मंदिरे नागर मंदिरापासून निराळी आहेत. अनेक भूमिज मंदिरावर विटांची शिखरे होती ती आज अस्तित्वात नाहीत या मंदिराच्या वितानात फारसे असे वेगळे काही नाही. यात गर्भगृह, अंतराळ, मंडप व कधी-कधी मुखमंडपावर अर्धमंडप असतात. दोन अर्धमंडप असलेल्या मंदिरात तीन गर्भगृहे आढळतात. यापैकी काही मंदिरे शिल्पे आणि नक्षींनी अलंकृत आहेत. काहीत कोणाड्यात ठेवलेल्या मूर्ती, अर्धमंडप व समलंब चौकोणाची अथवा चौकटी नक्षी असलेल्या आहेत. तर काहीत कोणतेही शिल्प आढळत नाही. अंबरनाथ, बळसाने, वाघळी सिन्नर, पाटणे, मेशी, अन्वा, लोणार, सातगाव, औंढा, मानकेश्वर आणि कालगाव ही एक गर्भगृहे असलेली मंदिरे तर झोडगे, बीड व निलंगा येथील मंदिरे ही त्रिदल पध्दतीची आहेत."[८५]

पानगाव या ठिकाणी विठ्ठल मंदिरा व्यतिरिक्त दुसरे पन्नगेश्वराचे मंदिर, पंचकुंड, महादेव मंदिर आहे आणि एक चांगल्या अवस्थेतील बारवही तेथे सापडतो. अशा प्रकारे आपणाला लातूर जिल्हयातील कलेच्या ऐतिहासिक दालनाचा अभ्यास करता येतो.

---

८४. शेख रमझान, औरंगाबाद जिल्हा ओळख व इतिहास, पृ.१०३

८५. शर्मा के.के., पूर्वोक्त, पृ. ७८-७९

## २.७ बीड आणि लातूर जिल्ह्यातील कलेला उत्तेजन दिलेली राजघराणे :

बीड आणि लातूर हे जिल्हे तसे प्राचीन काळापासूनच ऐतिहासिक दृष्टी असलेले जिल्हे आहेत. हे दोन जिल्हे मराठवाड्यातील प्रमुख जिल्ह्यांमध्ये मोडतात. आश्मयुगीन काळापासूनची काही अवशेष या जिल्ह्यांमध्ये नद्यांच्या काठी सापडतात. ह.धी सांकलिया म्हणतात, "मराठवाड्यात अनेक भागात आश्मयुगीन मानवी संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत. हे अवशेष गोदावरी , तेरणा आणि मांजरा नद्यांच्या काठी मिळाले आहेत. भूगर्भशास्त्रज्ञ 'वायने' यांनी इ.स. १८६५ मध्ये पैठण जवळील मुंगी या गावी गारगोटीचे दगडी हत्यार व प्राचीन रानटी हत्तीचे अवशेष मिळाले. याच ठिकाणी ताम्रपाषाणकालीन घराचे अवशेष, रंगीत खापरे, धान्य व दगडी हत्यार मिळाले. या वस्तीचा काळ इ.स.पू. १५६४ असा ठरविला गेला."[८६] गोदावरी नदी ही बीड जिल्ह्यातून वाहते तर मांजरा नदी लातूर जिल्ह्यामधून वाहते यामध्ये या दोन्ही जिल्ह्यात अशा प्रकारची अवशेष मिळतात.

ज्या प्रमाणे या जिल्ह्यांमध्ये प्राचीन व अतिप्राचीन काळातील अवशेष सापडतात. त्याच प्रमाणे या भागात शिलालेख आणि ताम्रपट ही मोठया प्रमाणात सापडतात. यु.म. पठाण म्हणतात, "मराठवाडा ही जशी संतांची भूमी आहे तशीच ती शिलालेखाची व ताम्र पटांचीही भूमी आहे. या भूमीने शतकानुशतके जे जे पाहिले ते ते मोठे अपूर्व होते, भव्य, दिव्य होते. लौकिक होते तसे ते अलौकिक ही होते. त्या रम्य गतकाळाच्या खूना या भूमीने आपल्या दगड धोंड्यात आपल्या मातीतल्या कणाकणांत, अनुरेणूत दडवून ठेवल्या. आपल्या उराशी जतन करुन ठेवल्या. वैभवाची तोरणे-बिरुदे जसी या भूमीने उराशी जतन करुन ठेवली तशीच पराभवाची शल्यही जतन करुन ठेवली. मराठवाडी मनाला फुंकर घालून, कधी कुरवाळून, कधी, स्वस्तीवचने, सांगत तर कधी धाकदपटशा दाखवून 'शापवचने' उच्चारीत या भूमीने मराठवाडी मनाचे शतकानुशतके पोषण केले."[८७]

---

८६. सांकलिया ह.धी, महाराष्ट्रातील पुरातत्व, पृ.१५

८७. पठाण यु.म., मराठवाडा शिलालेख व इतिहास, पृ. २०

अशा या मराठवाड्यात प्रारंभी जे साम्राज्य उदयाला आले ते म्हणजे सातवाहनांचे होय. राजा सिमुख सातवाहनाने सातवाहन राज्याची स्थापना केली. गो.ब. देगलूरकर आणि विराज शहा म्हणतात, "Though the puranas state that the dynasty was founded by one simukh, it was actually started by one satavahana after whom the family came to be known as satvahana. Simuk flourished one or two generation after satvahana around २०० B.C. He was a brave warrior, who born the title 'Dakhinapathapati' and probably reled over a small area from junnar in Pune district."[८८]

अशा पध्दतीने महाराष्ट्रात सर्वप्रथम जे साम्राज्य उदयाला आले ते म्हणजे सातवाहनांचे, सातवाहनांचे साम्राज्य लयाला गेले की पुढे वाकाटकांचे विदर्भात एक राज्यनिर्माण झाले. सातवाहनांच्या कालात महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात कला निर्माण झाली पण मराठवाड्यातील लातूर आणि बीड जिल्ह्यात त्यांचे कलावशेष मोठ्या प्रमाणात मिळत नाहीत. पण सातवाहनांची सत्ता ही या दोन्ही जिल्ह्यांवर होती.

वा.वि. मिराशी म्हणतात, "सातवाहनांच्या अंमलाखाली समान्यतः नर्मदेच्या खालचा प्रदेश आणि पश्चिमेच्या क्षेत्रपांच्या सत्तेखाली कच्छ, काठेवाड, गुजरात आणि माळवा हे देश होते. यातील पहिल्यास दक्षिणापथ अशी संज्ञा होती. अशी दक्षिणापथाची व्याख्या करुन त्यात महाराष्ट्र, महिषक, विदर्भ, कुन्तल, कोकण, कांची, केरळ, चोल, पांड्य, पल्लव वगैरे दक्षिण भारतातील सर्व देशांचा अंतर्भाव केला आहे."[८९] एवढे मोठे साम्राज्य हे या सातवाहन घराण्याचे होते. यांनीही कलेला आश्रय दिला पण तो इतर ठिकाणी त्यांच्या इतिहासाची साक्ष देतो.

---

८८. Deglurkar G.B., Shaha Viraj, Intellectuals Sandarbh Maharashtra, p.१५

८९. मिराशी वा.वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, पृ.१०२

सातवाहनांच्या नंतर उत्तर भारतात गुप्तांची सत्ता आणि दक्षिणेकडे वाकाटकांची सत्ता उदयाला आली. वाकाटकांच्या काळामध्येही मोठ्या प्रमाणात विदर्भात मंदिरे बांधली गेली. त्यामध्ये रामगिरी, प्रवरपूर, तिगवा, नचना आदि ठिकाणी त्यांनी देवालये उभा केली. पण वाकाटकांच्या काळात लातूर जिल्ह्यातील खरोसा आणि बीड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी वाकाटकांच्या काळातील कलात्मक अवशेष मिळतात. ५ व्या शतकात वाकाटकांच्या काळात खरोसा लेण्या निर्माण केल्या. म्हणून वा.वि. मिराशी म्हणतात, "स्थापत्यादि कलांमध्ये वाकाटक काळाची कामगिरी इतर क्षेत्रातल्या पेक्षा कमी नव्हती. वाकाटककाळी अनेक देवालये बांधली गेलेली होती. त्यापैकी काहिंचा उल्लेख त्यांच्या कोरीव लेखांत येतो."[१०] अशा प्रकारे सातवाहन, वाकाटक यांनीही कलेला चांगला राजाश्रय दिलेला दिसून येतो. यांनी मराठवाड्यात अनेक ठिकाणी अजरामर कलाकृती कलावंतांकडून निर्माण करुवून घेतल्या. खऱ्या अर्थाने बीड आणि लातूर जिल्ह्यात कलेला उत्तेजन जे दिले ते म्हणजे राष्ट्रकुट, चालुक्य आणि यादवांनी यांच्याच काळामध्ये या ठिकाणी कला ही बहरास आली आहे. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी चालुक्य काळाचा प्रभाव दिसून येतो. लातूर या ठिकाणी राष्ट्रकुट घराण्याचा उदय झाला. राष्ट्रकुटांच्या काळामध्ये लातूरला महत्व प्राप्त झाले होते. अशा या राष्ट्रकुट घराण्याचा संस्थापक म्हणून जदुनाथ सरकार म्हणतात, "राष्ट्रकुट या राजघराण्याचा संस्थापक दंतिदुर्ग मानल्या जातो."[११] राष्ट्रकुटांच्या काळात खरोसा येथील लेण्या निर्माण झाल्या राष्ट्रकुट आणि वाकाटकांच्या काळात या लेण्या निर्माण झाल्या आहेत. राष्ट्रकुट राजा अमोघवर्षाच्या काळात जैनांची ही काही शिल्पाकृतीची ठिकाणे निर्माण केली गेली.

यांचाच प्रभाव पुढे चालुक्यांवर होता. त्यांच्या काळात धर्मापुरी या ठिकाणी जैन शिल्पाकृती सापडतात. रिती आणि शेळके राष्ट्रकुटांविषयी म्हणतात, "सौंदतीच्या रट्टाच्या एका शिलालेखात राष्ट्रकुट नृपती कृष्ण तृतीय यांचा उल्लेख 'लत्तलूरपूर वराधिश्वर' या बिरुदाने

---

१०. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, पृ.१३०

११. Sircar D.S., Studies in the Geography of Ancient and Midival India, p.५७२

केला आहे."[९२] यावरुन राष्ट्रकुटांचे मुळ स्थान लातूर हेच ठरते.त्यांनी मोठ्या प्रमाणात कंधार परिसरातच आपल्या कलेचा प्रसार केला. कंधार ही राष्ट्रकुटांची उपराजधानी होती. काही काळ राष्ट्रकुटांची राजधानी वेरुळ हे ठिकाणही राहिले. याच राष्ट्रकुट घराण्यातील राजा कृष्ण पहिला याच्या काळात वेरुळ येथील कैलास लेणे निर्माण झाले ते एक भारतातीलच नसून जगातील आश्चर्य मानले जाते.

सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट आणि त्यांच्या नंतर कल्याणीचे अर्थातच उत्तर चालुक्यांचा उदय झाला. या चालुक्यांच्या काळामध्ये अनेक ठिकाणी मंदिरे उभा केली. त्यांच्या काळात सर्व धर्माच्या कलाकृतींना राजाश्रय दिला. नुसता राजाश्रय न देता त्यांनी कलेला उत्तेजन ही दिले. चालुक्यांच्या काळामध्ये होट्टल, धर्मापुरी, पानगाव, निलंगा आदी ठिकाणी मंदिरे ही निर्माण केली गेली. प्रामुख्याने चालुक्याच्या काळात नांदेड भागात मोठ्या प्रमाणात देवालये ही निर्माण केली गेली. त्या संदर्भात डॉ. रविंद्र रसाळ म्हणतात, "राष्ट्रकुटानंतर कल्याणीच्या चालुक्य वंशाने या भागात राज्य केल्याचा ४० पेक्षा अधिक शिलालेखांद्वारे माहिती मिळते. या घराण्याचा राजा सोमेश्वर याने १०६८-१०७६ राज्य केले असून 'पराक्रमाचा चाहता' अशी त्याची प्रतिमा होती. या भागातील अनेक गावात सुंदर मंदिरे असून त्याचे नियोजन काळजीपूर्वक करण्यात आलेले दिसते. काही मंदिरात पाठशाळा व धर्मशाळा सुध्दा होत्या. खगोलशास्त्र, भूमिती इत्यादी विषयात पारंगत असलेली विद्वान मंडळी या काळी होती. कुशल कलावंत, कारागीर, यांनी मंदिरे पुष्कळशी शिल्पे निर्माण करुन त्यांनी हा परिसर शोभिवंत व देखना केला आहे. नटराज, तांडव नृत्य, शिवमूर्ती, विष्णू, ब्रम्हदेव, महिषासुरमर्दिनी, चामुंडा, सूर्य इत्यादी सुरेख मूर्ती म्हणजे 'देखणा डोळा' अशी परिस्थिती होती. कलेचा समृध्द काळ असल्याशिवाय हे कलात्मक शक्य नाही."[९३]

---

९२. Ritti & Shelke (Edi.) Incription from Nanded District, p.२

९३. रसाळ रविंद्र, नांदेड जिल्हा, पृ.१३४

चालुक्यांच्या नंतर यादवाचे राज्य आले. यांच्याकाळात भिल्लम याने देवगिरी येथे नगरी तयार करुन राजधानी तयार केली. "यादव काळात अंबाजोगाई येथे खोलेश्वर या सेनापतीने खुपच पराक्रम केल्यामुळे तेथील खोलेश्वर मंदिर त्यांच्या नावाने आजही पराक्रमाची साक्ष देत आहे."[९४] यादवांच्या काळामध्ये बीड जिल्हयात मोठ्या प्रमाणात देवालयांची निर्मिती केली गेली. त्यात विशेषतः हेमाडपंथी बांधकामाची शैली विकसीत केली गेली. अंबाजोगाई या ठिकाणी अनेक मंदिरे आहेत. त्यामध्ये चौबारा गणेशमंदिर, खोलेश्वर मंदिर, सकलेश्वर, योगेश्वरी देवीचे शक्तीपीठ, हत्ती लेण्या अशा प्रकारे या ठिकाणी कलाकारांना चांगला वाव मिळालेला दिसतो. अंबाजोगाई व खोलेश्वरासंबंधी बोलतांना डॉ. अनिल सिंगारे म्हणतात, "खोलेश्वराच्या वास्तव्यामुळे अंबाजोगाईची मोठी भरभराट झाली. अंबाजोगाई येथील एका शिलालेखात अंबेजोगाईचे निसर्गवर्णन केलेले आहे. या लेखावरुन अंबेजोगाईची उद्याने भव्य अशा इमारती सकलेश्वर, माणीक्य, अंबर इ. देवतांची प्रचंड अशी उंच मंदिरे रमणीय वातावरण या सर्वांचे मनोहर वर्णन सदरील शिलालेखात आहे. हे सर्व खोलेश्वराचे या ठिकाणी वास्तव्य होते म्हणून शक्य झाले."[९५]

अंबाजोगाई प्रमाणेच केशवमंदिर, पालीचे नागनाथ मंदिर, यळमघाटचे शिवमंदिर, संगमेश्वर मंदिर पाटोदा, पुरुषोत्तमपुरीचे मंदिर, सिध्देश्वर मंदिर शिरुर कासार अशी कितीतरी मंदिरे ही बीड जिल्ह्यात पहावयास मिळतात. बीड जिल्ह्यातील या सर्वांची माहिती सांगणारी अनेक शिलालेख आहेत. ब्रम्हानंद देशपांडे चनई शिलालेखाविषयी म्हणतात, "महाकुमार सिंघनदेवाचा चनई शिलालेख अंबाजोगाई जवळच चनई ह्या गावी उपलब्ध झाला. हे गाव बीड अंबाजोगाई मार्गावर अंबाजोगाईपासून अलिकडे तीन मैलावर आहे."[९६] यामध्ये सिंघनदेव या यादवराजाच्या काळाची माहिती मिळते अशाच प्रकारचे शिलालेख खोलेश्वर मंदिर अंबाजोगाई येथे मिळते. अंबाजोगाई येथील संगीत मशिदीतील शिलालेख, मानूर येथील शिलालेख,

---

९४. तत्रैव, पृ.१३५
९५. सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास, पृ.११७-११८.
९६. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड-१, पृ.१

सिंघनदेवाचा पाली येथील शिलालेख तसेच धर्मापुरीचा चालुक्य राजा तृतीय सोमेश्वर याचा शिलालेख या भागाचा इतिहास सदन करण्यास मोलाची मदत करतात.

मंदिराप्रमाणेच लेण्यांना देखील या काळात आश्रय हा काही राजांनी दिला. अनेक ठिकाणी किल्यांचे, देखील बांधकाम करण्यात आलेले होते. लातूर जिल्ह्यात उदगीर, औसा या ठिकाणी किल्ले पाहावयास मिळतात. तसेच बीड जिल्ह्यात धर्मापुरी, किल्लेधारुर या ठिकाणी किल्ले हे पहावयास मिळतात. प्रा. भगवान काळे म्हणतात, "किल्ले धारुर एक तालुक्याचे ठिकाण बीड शहरापासून ७५ कि.मी अंतरावर असलेले एक प्राचीन शहर, श्रीमंत शहर आजही तेथे गतवैभवाची साक्ष म्हणून प्रचंड मोठे चिरेबंदी वाडे तग धरुन उभे आहेत. सोन्या चांदीची पेठ म्हणून महाराष्ट्र भर या शहराचा लौकिक आहे. जवळपास बाराशे वर्षे ही जुनी बाजारपेठ आहे. राष्ट्रकुट यादव चालुक्य, मोगल या सर्व राजवटींशी या शहराचा संबंध होता. दंडकारण्यातून जाताना प्रभू रामचंद्र काही काळ येथे थांबले होते."[१७]

अशा प्रकारे आपणाला लातूर आणि बीड या दोन जिल्ह्यात कलेची दालने उघडली गेली यांना अनेक राजवटींनी आश्रय आणि उत्तेजन दिले त्यांचा अभ्यास हा आपण वरील विवेचनात केलेलाच आहे. हे वरील स्पष्टीकरणावरुन समजते.

## २.८ कलेवरुन जीवनाच्या विविध अंगाचा अभ्यास :

बीड आणि लातूर जिल्ह्यातील कला स्थापत्याचा अभ्यास केल्यानंतर आपणाला कलेवरुन जीवनाचे अनेक अंग रंगवता येतात. अर्थातच अभ्यासता येतात. कलेवरुन धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय आदी जीवनाचा अभ्यास आपणाला करता येतो. शिल्पस्थापत्यावरुन किंवा तत्कालीन शिलालेख व इतर साधनांवरुन आपणाला या जिल्ह्यांतील विविध अंगाचा अभ्यास करता येतो.

---

१७. काळे भगवान, किल्ले धारुर, पृ.२५

### २.८.१ भौगोलिक अभ्यास :

महाराष्ट्रात बीड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान साधारणतः मध्यवर्ती आहे. म्हणजे उत्तर-दक्षिण व पूर्व - पश्चिम सर्व महामार्ग बीड मधूनच जातात. याच प्रमाणे लातूर जिल्हाही महत्वाचा मानला जातो. या जिल्ह्यावरही औद्योगिक विकासाबरोबर सहकार क्षेत्रात मोठा बदल झाला आहे. या दोन्ही जिल्ह्यात प्रामुख्याने बालाघाटाच्या रांगा दिसूनयेतात. "बालाघाटाच्या रांगेत जिह्यातील केज, धारुर, अंबाजोगाई, परळी, घाटनांदूर, मांजरसुंबा, लिंबागणेश ही पर्यटन स्थळे वसलेली आहेत. तसेच बालाघाटाच्या रांगेत लेणी-मंदिरे याच्या स्वरुपात कला व स्थापत्याचा विकास झाल्याचा दिसून येतो."[९८] लातूर आणि बीड जिल्हयातील या पर्वताच्या रांगामुळे जसा विकास झाला तसाच येथील जनजीवन सुधारण्यासाठी नद्यांनीही योगदान दिले. "The district is drained by the Manjra and its tributaries of the Godavari system. The Manyar river fisinginthe Balaghat flows in the eastern direction through the regions of Latur district. Manjara rises in Beed district flows in the center of the district and enter into Karnatak. River Terna flows on the border of Ausa taluka and empties into Manjara river. River Lendi flows in taluka of Ahmadpur and Udgir."[९९] या जिल्ह्यांमध्ये भौगोलिक दृष्टीने मांजरा, तेरणा, गोदावरी, लेंडी, धारणी; तवाजा आदि नद्या महत्वाच्या मानल्या जातात. या नद्यांच्या खोऱ्यामध्ये कलेचा चांगला विकास झाला.

### २.८.२ राजकीय अभ्यास :

बीड आणि लातूर जिल्ह्याला फार मोठा राजकीय वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत या भागात राजकारणाचा केंद्रबिंदू राहिलेला आपणाला दिसून येतो. हे जिल्हे संबंध महाराष्ट्राचे लक्ष आपणाकडे वेधून घेतात. "प्रस्तुत कालखंडात सातवाहन,

---

९८. Intellectuals Sandharbha Maharashtra, Vol.II, p.६६४

९९. Ibid, p. ७२५

वाकाटक, चालुक्य (बदामी) राष्ट्रकुट, चालुक्य (कल्याणी) यादव आणि होयसळासारख्या प्रमुख राजघराण्यांनी या परिसरात प्रभुत्व गाजविलेले आहे."[१००]

'मुलक', 'अश्मक' आणि 'कुंतल' या प्राचीन महाजनपदाचा म्हणजेच जनपदांचा भूभाग याच परिसरात मोडत होता. म्हणजे केवढा जुना इतिहास या भागाला आहे. सातवाहनांच्या कालखंडात प्रतिष्ठानकडून वेनुकोंडा आणि वनवासीकडून जाणारे सार्थराहपथ बीड जिल्ह्यातूनच जात होते. तथापि त्यांचे मार्ग हे प्रामुख्याने गोदावरी व मांजरा नद्यांच्या अनुषंगाने जात असल्याने सामंतशाहीच्या प्रसारास फारसा वाव नव्हता. शिवाय कुंतल प्रदेशावर (भिमा-मांजरा दरम्यानचा प्रदेश) त्यांची पकड मजबूत असल्याने या परिसरात काहीसे नागरीकरण झाले असावे असे वाटते. या प्रक्रियेचा अद्याप अभ्यास झालेला नसून संशोधकांसमोर ते मोठेच आव्हान असलेले दिसते. लातूर जिल्ह्यात उदगीर आणि औसा या ठिकाणी दोन किल्ले होते. त्यांचा राजकीय दृष्टीने इतिहासात चांगला ठसा आहे एवढेच नव्हे तर बीड जिल्ह्यातील किल्ले धारुर आणि धर्मापुरीचा किल्ला हे देखील तेवढेच महत्वाचे मानले जातात.

### २.८.३ सामाजिक व धार्मिक अभ्यास :

बीड आणि लातूर जिल्ह्यातील ज्या प्रमाणे राजकीय महत्व वाढत गेले त्याचप्रमाणे सामाजिक व धार्मिक महत्वही वाढत गेले. सामाजिक जीवनामध्ये तत्कालीन रुढी, परंपरा, चाली-रिती, पोषाख, आहार-विहार, सण-उत्सव, मनोरंजनाची साधने आदि घटकांचा समावेश होतो. त्याकाळातील समाजरचना ही आपणाला वर्णव्यवस्थेचाच आधार बनली होती. समाजात चार वर्ण होते हे सर्वश्रुतच आहे. त्यामध्ये कर्मावर त्यांचे दृढीकरण केले होते. गुणाला कसल्या प्रकारचा वाव नव्हता. हे आपणाला इतिहासाच्या सामाजिक अंगाचा अभ्यास करतांना लक्षात घेता येते.

---

१००. तत्रैव, पृ.३३

धार्मिक अंगाचा विचार करताना "बीड जिल्ह्यात धार्मिक महत्व वाढल्याने एक ज्योतिर्लिंग व एक शक्तीपीठ येथे विकसीत झाले त्यांच्या छत्राछायेखाली संतमहंतांना आश्रय लाभला."[१०१] त्यांच्या अलौकिक आठवणींमुळे यात्रा-जत्रा या मोठ्या प्रमाणात भरवल्या जाऊ लागल्या. या घटकांमुळे मोठ्या प्रमाणात समाज हाे एकवटला जाऊ लागला. लातूरमध्येही मुस्लिम दर्गा सिध्देश्वर मंदिर यांच्यामुळे समाजात ऐक्यता निर्माण होण्यास मदत झाली. पुढे दुर्दैवाने निजामाच्या काळात या प्रकारांवर फार बंधने लादली गेलेली दिसतात. परंतु स्वातंत्र्यानंतरचा काळ पाहिला तर या भागाला परत पूर्वीचे धार्मिक महत्व प्राप्त झालेले दिसते. बीड, अंबाजोगाई, धारुर, तेर, परळी, लातूर, उदगीर इ. ठिकाणी उत्सव व यात्रा भरतात. धार्मिक ठिकाणे ही यात्रांच्या काळात भाविकांनी भरुन जातात. महाशिवरात्रीला परळी व इतर शिवाच्या ठिकाणी यात्रा भरते तर घट स्थापनेच्या वेळी अंबाजोगाईच्या जोगाईची यात्रा ही भरते व अलोट जनसागर या ठिकाणी जमा होत असतो. यावरुन या जिल्ह्याला असलेले धार्मिक व सामाजिक महत्व समजते.

## २.८.४ ऐतिहासिक व सांस्कृतिक अभ्यास :

बीड आणि लातूर जिल्ह्याचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा खूप महान आहे. बीड आणि लातूर जिल्ह्यांचा इतिहास हा पुरातन काळापासून असून जवळपास महाजन पदापासूनचाच नव्हे तर रामायन काळापासूनचा पुरातन इतिहास हा बीड जिल्ह्याला आहे. हे आपणाला बालाघाट पर्वतावरील सितेची नहानी किंवा रामकुंडावरुन समजते. येथील परिसरात प्राचीन इतिहास सांगणारे अनेक शिलालेख प्राप्त झाले. सु.ग. जोशी म्हणतात, "अंबाशिलालेखावरुन असे स्पष्टपणे दिसून येते की, या वेळी उदयादित्य हा या भागाचा महामंडलेश्वर (प्रांताधिकारी) होता. त्याचे निवासस्थान अंबाजोगाई असून कदाचित तेथूनच त्याच्या आज्ञेने त्याचा प्रधान देवास याने हे मंदिर उभारिले असावे."[१०२] म्हणजे गरसोळी येथील

---

१०१. तत्रैव, पृ.३३

१०२. जोशी सु.ग. (संपा.), मराठवाडा संशोधनमंडळ, वार्षिक, १९७४, पृ. ३९

मंदिर हे उदयादित्याच्या या प्रांताधिकाऱ्याच्या काळात इ.स. ११४८ च्या सुमारास बांधले असावे. अशा शिलालेखांचा अभ्यास केल्यास आपणाला ऐतिहासिक महत्व पटल्याशिवाय रहात नाही.

ज्या प्रमाणे या भागाला ऐतिहासिक महत्व आहे त्याच प्रमाणे सांस्कृतिक वारसा देखील मोठाच आहे. अंबाजोगाई, धारुर, धर्मापुरी, परळी, माजलगाव, गरसोळी, बीड, लातूर, पानगाव, औसा, उदगीर, निलंगा, खरोसा, अशा अनेक ठिकाणांचा अभ्यास केल्यावर आपणाला या परसिरातील सांस्कृतिक इतिहास समजल्याशिवाय रहात नाही. सांस्कृतिक वाटचालीत या परिसराने कला आणि स्थापत्याच्या माध्यमातून समाजाचे अनेक अंगाचे चित्रण केले आहे. येथील कलाकारांच्या कलेला दाद द्यावी लागेल.

## २.९ येथील कलेचे सांस्कृतिक वर्गीकरण :

भारतामध्ये अनेक संस्कृति या प्राचीन काळापासून गुण्यागोविंदाने नांदत. भारत हा अनेक संस्कृतींनी नटलेला देश आहे. असे आपणाला म्हणता येते. लातूर आणि बीड जिल्ह्यात देखील प्राचीन संस्कृतीची अवशेष मिळतात. र.रा. बोरकर म्हणतात, "आपल्या भारताची संस्कृती ही प्राचीन आहे तसेच त्या त्या संस्कृतीचे प्राचीन अवशेषही सर्वत्र भारतभर मिळतात. आज आपण इ.स.पू. ३०० पासूनचा सलग इतिहास, म्हणजेच मौर्य काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा क्रमवार इतिहास आपणास अवगत आहे. हे कुठल्या आधारावर तर जे त्या त्या संस्कृतीचे द्योतक पुरावशेष आहेत. त्याच आधारावर त्यात मुख्यतः शिलालेख, नाणी, मूर्तीशिल्प, मंदिरे, किल्ले, प्राचीन साहित्य इ. पुरावशेषाचा अंतर्भाव होतो. तसेच इ.स.पू. ५ व्या शतकातील बौध्द, जैन कालखंड आणि त्याच्याही पलीकडचे म्हणजे प्रागैतिहासिक काळापासूनचे प्राचीनतम अवशेष मिळतात."[१०३]

---

१०३. बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, पृ.१३

अशा अवशेषांमुळे आपणाला संस्कृतीचा चांगला आणि डोळस अभ्यास होतो. प्राचीन भारताचा विचार केला तर त्या काळात वैदिक संस्कृती ही तर जुनीच होती. पण जैन आणि बौध्द या दोन संस्कृतीचा उदय या संस्कृतीला पर्यायी संस्कृती म्हणून झाला. मौर्य राजांच्या काळात बौध्द धर्माला मोठा राजाश्रय मिळाला पण कुशानांच्या कालात या धर्मातील आराध्य देवतांची शिल्पाकृती निर्माण होऊ लागली. यांचाच प्रभाव पुढे गुप्त, राष्ट्रकुट, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, यादव आदी घराण्यांवर पडला आणि या सर्वच धर्मातील राजे आपापल्या पध्दतीने धर्माला अर्थातच संस्कृतीला राजाश्रय देऊ लागले. आणि त्यांच्या माध्यमातून भारतात मोठ्या प्रमाणात त्या त्या संस्कृतीचे शिल्पावशेष निर्माण केली गेली. ही शिल्पावशेष बीड आणि लातूर जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात सापडतात.

धर्मापुरीला जैन धर्माची शिल्पे बऱ्याच ठिकाणी आपणाला निदर्शनास पडल्याशिवाय राहत नाहीत. "येथे पुरातत्वीय गवेषणात एकूण आठ जैन शिल्पे मिळालेली आहेत. त्यात बहुतांश दिगंबर शिल्पे आहेत."[१०४] ही शिल्प आताही धर्मापुरी या ठिकाणी आपणाला अभ्यासण्यास मिळतात. तसेच जैनांचे अनेक शिल्प मराठवाड्यात मिळतात. त्यामध्ये कंधार, नेमगिरी, धर्मापुरी, अंबाजोगाई, कुंथलगिरी आदी ठिकाणी जैनांच्या शिल्पाकृती मिळतात. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई या ठिकाणी मुकुंदराजाच्या मार्गावर लेण्या कोरल्या आहेत. त्या लेण्या बाराव्या शतकातील आहेत. या ठिकाणीही आपणाला प्रमुख तीन लेण्या पहावयास मिळतात. त्यामध्ये शैव, वैष्णव आणि जैन यांच्या लेण्या आहेत. खरोसा ठिकाणाविषयी गो.बं. देगलूरकर म्हणतात, "येथे ब्राम्हणी लेणी प्रामुख्याने असली तरी त्यात एक जैन लेणेही आहे. ते ७.३२ मी x ५.०३ मी आकाराचे आहे. लेण्याच्या मागील भिंतीत तीर्थकर प्रतिमा आहे."[१०५]

१०४. तत्रैव, पृ.१९०

१०५. देगलूरकर गो.बं., पूर्वोक्त, पृ.५२

अशा प्रकारे जैन लेण्यांप्रमाणे किंवा जैन शिल्पाकृती प्रमाणे बौध्दाच्याही काही मूर्ती या मराठवाड्यात मिळतात. खरोसा या ठिकाणी जैन व हिंदू प्रमाणे बौध्द धर्माची एक बारा क्रमांकाची बुध्दलेणी असलेली आपल्या निदर्शनास येते. पानगाव या ठिकाणीही मंदिराच्या मागच्या बाजूला विष्णूच्या बौध्द अवताराचे शिल्प आहे. काही याला योगनारायण असेही म्हणतात. बीड जिल्हयातही बौध्दाची काही शिल्पे मिळतात. परंतु औरंगाबाद, नांदेड, उस्मानाबाद जिल्ह्यात बौध्दांच्या अनेक प्रतिमा आपणाला मिळतात.

तसेच जैन आणि बौध्दांप्रमाणेच हिंदूच्या अनेक प्रतिमा या भागात आपणाला पहावयास मिळतात. विशेषतः लातूर आणि बीड जिल्ह्यात असंख्य हिंदू देवतांची मंदिरे आपणाला पहावयास मिळतात. लातूर जिल्ह्यामध्ये निलंगा, पानगाव, रेणापूर, किल्लारी, लातूर, खरोसा आदी ठिकाणी आपणाला हिंदू देवदेवतांच्या असंख्य प्रतिमा अभ्यासण्यास मिळतात. त्यामध्ये अनेक पंथाच्या प्रतिमा या मंदिरांवर दिसून येतात. त्यात शैव, वैष्णव, शक्ती, गाणपत्य, सौर आदि संप्रदायाच्या मूर्ती आपणाला आभ्यास करण्यास मिळतात.

बीड जिल्ह्यातही शिवाची मंदिरे मोठ्या प्रमाणात आपणाला पहावयास मिळतात. गणपतीचे मंदिरेही दिसून येतात. यावरुन अनेक पंथ हे बीड परिसरात उदयाला आलेले दिसून येतात. परळी, अंबाजोगाई, पुरुषोत्तमपुरी, गरसोळी, बीड, पाटोदा, यळंबघाट, किल्लेधारुर आदि ऐतिहासिक ठिकाणांवर आपणाला ऐतिहासिक अवशेष पाहावयास मिळतात ती अवशेष म्हणजे आपल्या संशोधन कार्याची डोळे आहेत. आणि याच डोळ्यांनी आपणाला भूतकाळाचा वैभवशाली इतिहास हा अभ्यासावयास मिळतो. अनेक धर्म अनेक पंथाची शिल्पे व मूर्ती या परिसरात जागोजागी सापडतात. गो.बं. देगलूरकर याविषयी म्हणतात, "एकूण काय तर गोदा खोरे लेणींच्यामुळे देखणे आणि प्रेक्षणीय झाले आहे. या खोऱ्याला त्यांनी सालंकृत केले आहे.

शिवाय एकमेकां शेजारी असलेल्या बौध्द, ब्राम्हणी आणि जैन लेणींनी गुण्यागोविंदाने एकत्र राहण्याचाही संदेश दिला आहे."[१०६]

अशा प्रकारे कितीही चांगल्या प्रकारे आपण या संस्कृतीचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला तरी हिंदू-बौध्द-जैन यांच्यातील साम्य किंवा अखंडत्व आपणाला वेगळेपण भासू देत नाही. याची उत्तम साक्ष आपणाला या लेण्यांच्या किंवा या इतिहासाच्या अजरामर ठेव्यांच्या माध्यमातून पटल्याशिवाय रहात नाही.

---

१०६. तत्रैव, पृ.५३

**संदर्भ :**

१. माडेकर अपर्णा (संकलक), मराठवाड्यासह बीड जिल्हा, अपर्णा प्रकाशन, बीड, पृ.४

२. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड-II, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९६९, पृ.६२६.

३. तत्रैव.

४. मोरवंचीकर रा.श्री., बीडच्या ऐतिहासिक व्यक्तीमत्वाचे पैलू, यशवंत स्मरणिका, २४ वे अधिवेशन मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, २००४, पृ.३०

५. Yazdani, Gulam, The Early History of the Deccan, Vol. I & II, Oxford University Press, London, १९६०, p.२२५.

६. पोहनेरकर न.शे., मराठवाड्याची सौभाग्यलेणी विज्जल बीड, प्रतिष्ठाण, ऑक्टो. १९७०, पृ.३४

७. Deglurkar G.B., Temple Architecture and Sculpture of Maharashtra, Nagpur, १९७४, p.६४

८. कुलकर्णी बी.जी., बीड जिल्ह्यातील मध्ययुगीन मंदिर कला स्थापत्य-एक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, २००६, पृ.२४९.

९. कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृति, १९५१, पृ.६४

१०. गणोरकर कालिदास, बीड जिल्हा, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, २००२, पृ.१११

११. तत्रैव.

१२. पठाण यु.म., मराठवाड्यातील मराठी शिलालेख, विद्यापीठ, औरंगाबाद, १९८९, पृ.१

१३. कठारे ए.एम., मराठवाड्यातील लेणी, डी.एन. बंडाळे, कल्पना प्रकाशन, नोव्हें. २००१, प्रथमावृत्ती, पृ.२७

१४. Intelectuals Sandarbh Maharaashtra, Vol.-२, p.६६४.

१५. पोहनेरकर न.शे., मराठवाडा - दिवाळी अंक, १९९६, पृ.९९

१६. बीड जिल्हा राजपत्र, पृ.६६६

१७. देशपांडे सु.र., भारतीय शिल्प वैभव, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००५, पृ.८

१८. कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, शिवाजी नगर, नांदेड, प्रथमावृत्ती, नोव्हें. १९९९, पृ.३९५.

१९. रामदासी, व.रा., नवगण साक्षात्कार, केलोना मुद्रणालय, बीड, १९९९, पृ.१३

२०. खरे ग.ह., मूर्ती विज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३९ पृ.२२७

२१. सुधीर कोर्टीकर, मराठवाड्यातील मंदिरे, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, २००२, पृ.७०

२२. दिक्षित मो.ग., दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खण्ड ४, चि.ग. कर्वे प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, ऑक्टो. १९५१, पृ.५७

२३. महाराष्ट्र शासन, दी बीड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, पृ.२३२

२४. गाडगीळ अ.ल., य़ोगेश्वरीचे माहेर श्री क्षेत्र अंबाजोगाई, सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शनमाला, बोरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., मुंबई, १९६०, पृ.४

२५. चितळे श्री.वा., मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक, १९७४, पृ.३७-४०.

२६. हेबाळकर शरद, पाठक अ.श., खोलनायकाचे अंबे अर्थात यादवकालीन अंबाजोगाई, ७ वे इतिहास अधिवेशन, १९८६, पृ.१५

२७. देव शां.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भसूची, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८४, पृ.४२

२८. कसबे रावसाहेब, धर्म : मानवी संस्कृती विकास, प्रकाश विश्वासराव लोकवाङमय गृह, भूपेश गुप्ता भवन, मुंबई, २००५, पृ.१३

२९. जाधव एस.जी., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, डिसें. २००५, पृ.५४७

३०. जोशी नी.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ, निर्मिती मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९, पृ.१९६-१९८.

३१. लिंगपुराण, पूर्वार्ध,१७.१५-९२, मनसुखराय मोर, कलकत्ता संस्करण, १९६०, १७.१५-९२, पृ.४०-४४

३२. पानसे, मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथ संग्रहालय, प्रकाशन, मुंबई, १९६३, पृ.११९

३३. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोश, खंड ९ वा, पृ.४०९-४१०

३४. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, जाने. १९८८, पृ.११६

३५. रोडे सोमनाथ (संपा.), मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद निवडक शोधप्रबंध, खंड ३, प्रकाशक सचिव मराठवाडा इतिहास परिषद द्वारा प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड, फेब्रु. १९९९, पृ.१२८.

३६. पाठक अ.शं. (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड १), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई, प्रथमावृत्ती (इंग्रजी), १९६७, मराठी आवृत्ती-२००२, पृ.६७९.

३७. पठाण यु.म., पूर्वोक्त, पृ.७-६७

३८. Degloorkar G.B., Op.cit., p.८६

३९. पठाण यु.म., पूर्वोक्त, पृ.१६६

४०. Deo Prabhakar, Temples of Marathwada, Jaipur Publication, १९९३, p.६४

४१. कोलते वि.भी. (संपा.), लीळाचरित्र, महराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८, पृ.४४५

४२. गणोरकर कालिदास, पूर्वोक्त, पृ.११५

४३. कुलकर्णी बी.जी., पूर्वोक्त, पृ.२५८

४४. देशमुख रा.नी., आपला लातूर जिल्हा, डी.एन. बंडाळे, कल्पना प्रकाशन, नांदेड, सप्टेंबर २००८, पृ.९

४५. तत्रैव, पृ.१०

४६. रणसुभे सूर्यनारायण, लातूर जिल्हा, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, २००२, पृ.१२५

४७. देशमुख रा.नी., पूर्वोक्त, पृ.१६

४८. अक्कोळे सुभाषचंद्र, प्राचीन मराठी जैन साहित्य,शामकान्त बनहट्टी सुविचार प्रकाशन मंडळ धनतोली, नागपूर-पुणे, प्रथमावृत्ती, ५ सप्टेंबर १९६८, पृ.१७४

४९. संकलन लव्हाळे बाळासाहेब, लातूर जिल्हा सामान्य माहिती, पृ.१३

५०. रणसुभे सूर्यनारायण, पूर्वोक्त, पृ.१२६

५१. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.१५

५२. तत्रैव, पृ.१४

५३. देशमुख रा.नी, पूर्वोक्त, पृ.१७

५४. तत्रैव.

५५. Sali Chetan, Sali Geeta, Latur (Maharashtra), Intellectuals Sandarbha, Maharashtra (State & District), Chief Compliler, Dr. K.K. Sharma, Vol.II, First Published २००४, p.७२६

५६. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२०

५७. Sali Chetan, Sali Geeta, Op.cit., p.७२६

५८. Ibid.

५९. Ibid

६०. तुळपुळे शं.गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६३, पृ.३१

६१. देशमुख रा.नी., पूर्वोक्त, पृ.१६

६२. राठोड पी.सी., उदगीर एक सांस्कृतिक अभ्यास, अप्रकाशित लघुशोध प्रबंध, डॉ.बा.आ.मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,१९८७, पृ.१२

६३. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.४२३

६४. राठोड राजाराम, उदगीर इतिहास आणि स्मारके, प्रकाशक डॉ. ना.य. डोळे प्राचार्य महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, प्रथमावृत्ती, १९६८, पृ.३७-३८

६५. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२२

६६. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.४२४

६७. कुलकर्णी व्ही.एस., उदगीरचा भूईकोट किल्ला - भूईसपाट होण्याच्या मार्गावर, (संपा. दर्डा राजेंद्र), दैनिक लोकमत, मंगळवार दि. २८ जुलै २००९, पृ.१

६८. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२९

६९. कठारे, नगराळे, पूर्वोक्त पृ.३७७

७०. तत्रैव

७१. Deo Prabhakar, Temples of Mrathwada, Jaipur Publication Scheme, १९९३, p.४९

७२. देव प्रभाकर, सिल्लोड येथील मराठवाडा इतिहास परिषदेतील भाषण, २९ वे राज्यस्तरीय अधिवेशन, ३० नोव्हें. व १ डिसें. २००९, सिल्लोड, जि. औरंगाबाद.

७३. पाठक अं.श., पूर्वोक्त, पृ.१९५

७४. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास (१९६० पर्यंत), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून १९९९, पृ.२७१

७५. शर्मा के.के. (संकलन), संदर्भ महाराष्ट्र, खंड-१, इंटलेक्च्युअल बुक ब्युरो प्रकाशन, भोपाळ, २००५, पृ.७०

७६. लव्हाळे बाळासाहेब, पूर्वोक्त, पृ.२८

७७. कठारे अनिल, भरातीय कला आणि स्थापत्य (खंड-२), पुनम प्रकाशन, कंधार, जि. नांदेड, पहिली आवृत्ती, नोव्हें. २००६, पृ.१६

७८. देगलूरकर गो.बं., गोदा खोऱ्यातील लेणी, (संपा. देव प्रभाकर) गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, ३ डिसें. २००६, पृ.४८

७९. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.३२७

८०. कठारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१७

८१. देगलूरकर गो.बं., पूर्वोक्त, पृ.४८

८२. भारती संजय, कला मराठवाड्याची, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, २००२, पृ.२१४

८३. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.३७८

८४. शेख रमझान, औरंगाबाद जिल्हा ओळख व इतिहास, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, २००२, पृ.१०३

८५. शर्मा के.के., पूर्वोक्त, पृ. ७८-७९

८६. सांकलिया ह.धी, महाराष्ट्रातील पुरातत्व, (संपा. माटे म.श्री.), मुंबई म.रा.सा. व सं.मंडळ, १९७६, पृ.१५

८७. पठाण यु.म., मराठवाडा शिलालेख व इतिहास, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, २००२, पृ. २०

८८. Deglurkar G.B., Shaha Viraj, Intellectuals Sandarbh Maharashtra, (Compiler Sharma K.K.), Vol.I, First Published २००४, p.१५

८९. मिराशी वा.वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७९, पृ.१०२

९०. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, प्रकाशक रजीस्ट्रार नागपूर, विश्वविद्यालय, नागपूर, प्रथमावृत्ती, १९५७, पृ.१३०

९१. Sircar D.S., Studies in the Geography of Ancient and Midival India, Motilal Banarasidas, Delhi, (Edi.), १९७१, p.५७२

९२. Ritti & Shelke (Edi.) Incription from Nanded District, Y.M. Nandd, १९६८, Introduction, p.२३

९३. रसाळ रविंद्र, नांदेड जिल्हा, (संपा. पाटील श्रीराम) मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, २००२, पृ.१३४

९४. तत्रैव, पृ.१३५

९५. सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास, (इ.स.पू. २३०-१३८१), कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९७, पृ.११७-११८.

९६. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड-१, अकलनंदा प्रकाशन गुरुद्वारामागे उस्मानपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९७६, पृ.१

९७. काळे भगवान, किल्ले धारुर, संकेत प्रकाशन जालना, प्रथमावृत्ती, जाने. २००४, पृ.२५

९८. Intellectuals Sandharbha Maharashtra, Vol.II, p.६६४

९९. Ibid, p. ७२५

१००. पांचाळ ज्ञानेश्वर (संपा.), २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, प्रकाशक प्राचार्य डॉ. राठोड गणपत, जाने. २००५, पृ.३१

१०१. तत्रैव, पृ.३३

१०२. जोशी सु.ग. (संपा.), मराठवाडा संशोधनमंडळ, वार्षिक, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन मराठवाडा संशोधन मंडळाकरिता शिरुर ताजबंद, १९७४, पृ. ३९

१०३. बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, प्रकाशक कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, प्रथमावृत्ती, फेब्रु. २००४, पृ.१३

१०४. तत्रैव, पृ.१९०

१०५. देगलूरकर गो.बं., पूर्वोक्त, पृ.५२

१०६. तत्रैव, पृ.५३

# प्रकरण - ३

# शिल्पकलेचा कला आणि वास्तुशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास

प्रकरण तिसरे

# शिल्पकलेचा कला आणि वास्तुशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास

## ३.१ शिल्पकलेचा इतिहास

शिल्पकलेचा इतिहास शोधावयाचा असेल तर आपणाला अगोदर कमीत कमी महाराष्ट्र तरी काय आहे हे जाणून घेतले पाहिजे. महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात या शिल्पकलेचा प्रसार झालेला आपणाला दिसून येतो. शिल्पकलेची निर्मिती होण्यामागे अगोदर जो कलाकार लागतो हा कलाकार येथे होता का ? यांच्याविषयी किंवा येथील मानवाच्या प्राचीन राहणीमानाविषयी सुध्दा आपणाला चर्चा करावी लागते. कारण त्याच्याशिवाय आपणाला हे कोडे उलगडणे कठीण आहे.

डॉ. सांकलिया म्हणतात, "अश्मयुगीन मानवाचा वावर गोदाखोऱ्यात नाशिक जवळ गोदातटाकीच्या उजव्या तिरावर असल्याच्या पाऊलखुना आढळल्या आहेत."[१] मानवाची वस्ती ही महाराष्ट्रात फार प्राचीन काळात होती याचाही अभ्यास होतो. महाराष्ट्राची जीवनदाहीनी नदी गोदावरी हिच्या किनाऱ्यावर तत्कालीन मानवाने आपला वावर असलेला पुरावा हाती आलेला आहे. या काळाचे सबळ पुरावे अनेक मान्यवर लेखकांनी दिलेले आहेत. त्यामध्ये वि.ल. धारुरकर म्हणतात, "अतिप्राचीन प्रागैतिहासिक काळातील पूर्व आश्मयुगापासून ते १२ व्या शतकातील देवगिरीच्या यादवापर्यंतचा पुरातत्वीय क्रम आपणास सलगपणे लावता येतो गोदाकाठची प्राचीन नगरे, मंदिरे, तसेच मठ, साहित्यसृष्टी आदींचे साक्षेपी अध्ययन करताना पुरातत्व व वाङमयीन साधने यांची सुसंगती लावण्याची गरज आहे. गोदाकाठी जोर्वेपासून प्रकटलेला संस्कृती प्रवाह हा राष्ट्रकुट काळी कंधारच्या वास्तुपुरुषापर्यंत येऊन पोहचतो."[२]

---

१. Sankliya, The Godavari Poliothic Industry Deccan College Research Bulletin, १९५२, Pune.

२. धारुरकर वि.ल, गोदाकाठच्या ताम्रपाषाणायुगीन संस्कृती, पृ.२२

यावरुन महाराष्ट्रातील मानवी संस्कृतीचे जुने व प्राचीन पुरावे जर आपण सुसंगतवार लावले व त्यांचा जर अभ्यास चिकित्सक केला तर निश्चितच आपणाला महाराष्ट्रातील प्राचीन मानवी इतिहास सखोल अभ्यासण्यास मोलाची मदत होते व आपला इतिहास हा आपल्या समोर एक दिपस्तंभ म्हणून कार्यरत होतो हे तेवढेच सत्य आहे. गोदावरीचा काठ हा सुपिक व समृध्द असल्याने या काठावर फार मोठ्या प्रमाणात मानवी रहावा आढळून येतो. धारुरकरांच्या मते, "कोदाकाठचा प्रदेश हा समृध्द आणि संपन्न पुरातत्वीय अवशेषांनी युक्त आहे. त्यातल्या ऐतिहासिक काळापूर्वीही या प्रदेशात प्रागैतिहासिक काळापासून पुरातत्वीय अवशेषांचा अढळ दिसून येतो. डॉ. शं.आ. साळी यांनी वेरुळ लेणी परिसरामध्ये पूर्व व उत्तर अश्मयुगीन अवशेष सापडले असल्याचे नोंदविले आहे."[३]

समृध्द परिसरामुळे या ठिकाणी जीवसृष्टी स्थिरावली जसे की सिंधू संस्कृती ही सिंधू नदीच्या काठावर निर्माण झाली. उत्तर भारतातील याच संस्कृतीप्रमाणे दक्षिण गंगा म्हणून ओळखली जाणारी गोदावरी नदीच्या काठावरही मानवी वसाहत दिसून येते. मग अशा गोदाकाठचा परिसर म्हणजे नद्याचा कोणता भाग यात दिसून येतो तर याच्या बाबतीत आपले मत प्रकट करताना जयकुमार मगर म्हणतात, "गोदावरी खोऱ्यात प्रामुख्याने औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर, गंगापूर, पैठण तालुके तर कन्नड-खुलताबाद तालुक्याचा काही भाग व औरंगाबाद तालुक्याचा बहुतांशी भाग, तर ... बीड तालुक्याचा उत्तर भाग गोदावरी खोऱ्यात मोडतो."[४] यावरुन आपणाला असा अनुमान काढता येतो की, फक्त एकढाच प्रदेश या भागात किंवा खोऱ्यात मोडत नसून नाशिक, परभणी, हिंगोलीचा काही भाग, नांदेड आदि जिल्ह्यांचा परिसर हा मोठ्या प्रमाणावर याच्या प्रभावाखाली येतो नाशिक येथून उगम पावणारी ही गोदावरी पुढे बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते.

---

३. तत्रैव, पृ.१९

४. मगर जयकुमार, गोदा खोरे प्राकृतिक पर्यावरण, पृ.१३

"मराठवाड्यातील आश्मयुगीन हत्यांराचा शोध भारतीय पुरातत्व सर्वेक्षणातील तंत्रसहाय्यक एम.एन. रघुनाथ यांनी येलदरी धरणाच्या परिसरात घेतला आहे. बीड जिल्ह्यातील बीड, माजलगांव, गेवराई तालुक्यांतही उत्तर अश्मयुगातील हत्यारे सापडली आहेत. याचा अर्थ असा की, मराठवाड्यात अश्मयुगात प्राचीन काळातही मानवी वसाहती अस्तित्वात होत्या."[५] ज्या प्रकारे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अश्मयुगातील हत्यारे सापडली त्याचप्रमाणे मराठवाड्यातही अशी हत्यारे सापडली आहेत.

ख्रिस्तपूर्व एक हजाराच्या सुमारास तापी आणि गोदा खोऱ्यातील वसाहती उजाड झाल्या. हवामानातील वाढत्या शुष्कतेमुळेही गोदा खोऱ्यातील या प्रारंभीच्या वस्ती विस्कळीत झाल्या. इ.स.पू. ५ व्या शतकापासून गोदा खोरे पुन्हा हळूहळू गजबजू लागले. तांडे, पाडे, गावे, नवे रुप घेऊन पुन्हा उभी राहिली. प्रकाशे, नाशिक, नेवासे येथील उत्खननातून ही गोष्ट स्पष्ट झाली की मध्यंतरीच्या पाच सातशे वर्षाच्या कालखंडात गोदा खोऱ्यातील जीवनही भटक्या टोळ्यांनीच व्यापले आहे. याचे पुरावे गोदा खोऱ्यात कालेगांव, नांदूर, मधमेश्वर, वडोली-वाघोली, नेवासा, किवळा, भोकर आदी ठिकाणी आढळले आहेत.

याविषयी वि.ल. धारुरकर म्हणतात, "चालुक्य, राष्ट्रकुट व यादवकालीन मराठवाडी अवशेषांची उत्खनने झाल्यामुळे कुट प्रश्न सुटू शकतील. मुळज, मुरुम (चालुक्य) तसेच कंधार, धारुर (राष्ट्रकुट) पुरुषोत्तम पुरी, अंबाजोगाई (देवगिरी) या काही स्थळांचे अन्वेषण व उत्खनन केले तर मराठवाड्याचे पुरातत्व व्यक्तिमत्व सिध्द करता येईल."[६] मराठवाड्यात अनेक ठिकाणे आहेत की त्या ठिकाणांचे शास्त्रीय पध्दतीने उत्खनन झाले तर त्या ठिकाणापासून अनेक इतिहासाचे धागे-दोरे हाती येतील. धर्मापुरी हे देखील असेच एक प्राचीन ठिकाण आहे आणि पानगावही तसेच ठिकाण असल्याने या ठिकाणी उत्खनन किंवा संशोधन होणे गरजेचे आहे.

---

५. धारुरकर वि.ल., पूर्वोक्त, पृ.१९

६. तत्रैव, पृ.२२

"चालुक्य व राष्ट्रकुट पुरातत्व स्थळांचे अध्ययन अद्याप हाती घेण्यात आलेले नाही. देवगिरी उत्खननाचा अपवाद वगळता अन्य स्थळाचे अध्ययन करण्यास वाव आहे. मराठवाड्याचा समृध्द ऐतिहासिक वारसा गोदाकाठी पसरला आहे. यांच्या शास्त्रीय अध्यापनासाठी दोन विद्यापीठात स्वतंत्र पुरातत्व विभाग आणि अजिंठा-वेरुळच्या कला अभ्यासासाठी स्वतंत्र अध्ययनाची गरज आहे."[७]

असे जर स्वतंत्र अध्ययन या ठिकाणचे झाले तरच मराठवाड्यातील कला, शिल्पकला, पुरातत्वीय स्थळे, पुरातत्वीय साधने, मराठवाड्यातील वास्तू, अर्थातच इतिहास हा सखोल अभ्यासण्यास मोलाची मदत होते. हे केवळ संशोधनाने आपणाला साध्य करण्यास मदत होते.

### ३.१.१ महाराष्ट्रातील शिल्पकला

शिल्पकलेमध्ये प्रामुख्याने वास्तुकला, मुर्तिकला, चित्रकलेचा समावेश होतो. ब्राम्हण ग्रंथात शिल्प हा शब्द कला अद्‌भूत कृत्य, कौशल्य, कारागिरी व कलाकृती इत्यादी विविध अर्थाने वापरला आहे. भांडवलकर, हनवते म्हणतात, "मनुष्यनिर्मित कलाकृती म्हणजे मनुष्यशिल्प होय. शिल्प हा शब्द कला या अर्थाने प्रथम मैत्रायणी उपनिषदात वापरलेला आहे. अथर्व वेदात शिल्पी हा शब्द कारागिरी या अर्थाने आलेला आहे. स्थापत्य या अर्थानेही शिल्प शब्द रामायणात आढळतो. 'विशेष कौशल्याची कामे करणारा तो शिल्पी' असे कौटिल्याच्या अर्थशास्त्रात वर्णन मिळते. त्यानंतर शुक्रनितीसार आणि वराहमिहीरच्या बृहतजातकात शिल्प हा शब्द वापरलेला दिसतो."[८]

यावरुन शिल्प ह्या शब्दाचे वर्णन अनेकांनी आपआपल्या परीने वेगवेगळ्या ग्रंथात नमुद केलेले दिसून येते. यावरुन आपणाला या शिल्प शब्दाची ही प्राचीनता लक्षात घेता येते.

---

७. तत्रैव, पृ.२३

८. भांडवलकर,हनवते, मराठवाड्याचा इतिहास, पृ.१८०

विशेष कौशल्याची कामे करणारा तो शिल्पी म्हणजे कलाकार-कारागीर यांच्यापासूनच ही शिल्पकला निर्माण झाली. हेच शिल्पकलेचे जन्मदाते असलेले दिसून येतात.

डॉ. प्रभाकर देव म्हणतात, "महाराष्ट्रातील शिल्प स्थापत्य परंपरेचा प्रारंभ होतो इ.स.पू. २ ऱ्या शतकात पुण्यातील भाजे समुहाच्या रुपाने हे प्राचीनतम कला वैभव साकारते. येथील चैत्य आणि विहार लेणी वैशिष्ट्यपूर्ण ठरावीत. डोंगरातील प्रचंड कातळ कोरुन तयार केलेल्या या लेण्यांनी महाराष्ट्रातील लेणीस्थापत्य परंपरेचा प्रारंभ केला. कोंढाने येथील स्थापत्य शिल्पकारांनी ही परंपरा सुरु ठेवली. कुलाबा जिल्ह्यातील कोंढाने येथील लेणीसमुहही याच काळातील इसवीसन पूर्व पहिल्या शतकात औरंगाबाद जिल्ह्यातील प्रतिष्ठानच्या सातवाहन सत्तेचा उदय झाल्यानंतर तर शिल्प-स्थापत्य कला अविष्काराला बहर येतो."[९]

अशा प्रकारे महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन कला स्थापत्य निर्माण झाल्याचे दिसून येते. ते म्हणजे भाजे आणि कार्ले या ठिकाणी भाजे हे हिनयान बौध्द धर्मियांचे सोपाऱ्यानंतरचे महत्वाचे केंद्र असावे. दिवंगत बौध्द आचार्य व भिक्षू ह्यांच्या स्मरणार्थ एकाच ठिकाणी प्रस्तरातून लहान मोठ्या आकाराचे चौदा स्तूप खोदण्यात आलेले आहेत. प्रस्तर स्तूपाबरोबर बांधीव स्तूपही असावे, पण कालांतराने ते नष्ट झाले. मा.शा. बोराडे म्हणतात, "महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन असे भाजे इसवीसनपूर्व दुसऱ्या शतकात खोदले गेले असावेत. सह्याद्रीतील कातळशिळा अशा शैलगृहासाठी योग्य व उपयुक्त असल्यामुळे बौध्दांच्या अनेक धार्मिक शाखांनी महाराष्ट्राकडे धाव घेतली. पुढच्या काही शतकात भाजे, कोंढाने, बेडसे, कार्ले, जुन्नर, कुडा, महाड, कऱ्हाड, वाई, कान्हेरी यथील डोंगरांची निवड होऊन शैलगृहांच्या निर्मितीला वेग आला. इसवीसनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत हीनयान पंथीयांनी कोकणातील बहुतेक ठिकाणी सर्वेक्षण करुन योग्य जागा निवडल्या व लेण्यांच्या माध्यमातून आपली धार्मिक व शैक्षणिक केंद्रे प्रस्थापित केली."[१०]

---

९. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, पृ.१०८-१०९.

१०. बोराडे, मा.शा., भाजे व कार्ले लेणी, पृ.३

महाराष्ट्रातील लेण्याचे वैशिष्ट्ये म्हणजे बहुतेक सर्व लेणी डोंगराच्या विशिष्ट पातळीवर खोदण्यात आली आहेत. पायथ्यापासून सुमारे दोनशे ते चारशे फुट उंचीवर असलेला कातळ लेण्यांच्या निर्मात्यांनी निवडलेला दिसतो. ही उंची त्यांना सुरक्षीततेच्या दृष्टिकोनातून महत्वाची वाटली असावी.

"भाजे हे महाराष्ट्रातले आद्य लेणे, महाराष्ट्रातील लेणी इसवीसनपूर्व २५० ते इसवीसन १२०० या साडेचौदशे वर्षात घडली. अजिंठा वेरुळ अशी प्रसिध्द लेणी असली तरी भारतातल्या एकूण बाराशे लेण्यापैकी आठशे लेणी महाराष्ट्रात आहेत. त्याची पडझड बरीच असली तरी त्या प्रत्येकाची वैशिष्ट्ये आहेत. त्या लेण्यांनी सारा सह्याद्री व्यापला आहे. कोकण व देशपठारांना जोडणारे दुवे म्हणून प्राचीन काळी जे रस्ते होते त्यावर आश्रय, रात्रीचा निवास आणि पुजास्थान म्हणून लेणी खोदण्यात आली."[११] अशा प्रकारे महाराष्ट्राला प्राचीन काळापासून शिल्पकलेचा व वास्तुकलेचा इतिहास असलेला आपणाला समजतो. लेण्याप्रमाणेच महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात मंदिरांनाही राजाश्रय दिला गेला. त्यामध्ये प्रभाकर देव म्हणतात, "प्राचीन महाराष्ट्रातील ही कला साधना डोंगरदऱ्यातून लेणी स्थापत्याच्या रुपात जशी साकारली तशीच ती गावागावातील मंदिरातूनही अविष्कारीत झाली. इसवीसनपूर्व पहिल्या शतकापासून देवतायनाचे उल्लेख शिलालेखातून आढळतात. परंतु प्रत्यक्ष देऊळ मात्र सापडते ते इसवीसनाच्या ४ थ्या शतकातले भारतातील उपलब्ध अशा प्राचीनतम देवळांमध्ये महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील त्रिविक्रमाचे देवालय विशेष उल्लेखनीय ठरावे महाराष्ट्रातील मंदिरशिल्प स्थापत्य परंपरेचा प्रारंभ तेर येथील या त्रिविक्रम मंदिरापासून होतो. मंदिर स्थापत्य विकासाचे काही निर्णायक टप्पे दर्शविणारी मंदिरे ५ व्या ६ व्या शतकात बांधलेली येथेच आढळतात."[१२] तेर येथील उत्खननात बौध्द स्तुपाचेही काही अवशेष, आढळले आहेत. तेर, भोकरदन आणि पैठण या गावी विस्तृत प्रमाणावर उत्खनन कार्य हाती

११. तत्रैव, पृ.१३
१२. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११४

घेतले गेल्यास सातवाहन कालीन मंदिर स्थापत्याचे अवशेष उपलब्ध होऊ शकतील. गाथा सप्तशतीमध्ये सातवाहनकालीन मंदिराचे उल्लेख आलेले आहेतच हे समजते.

साधारणतः ११ व्या शतकात व त्याच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात राजकीय स्थैर्य विस्कळीत होऊ लागले. राष्ट्रकुटांचा प्रभाव हा उतरणीला लागला कल्याणीच्या परिसरात चालुक्यांचे राजघराणे नव्याने उदयाला आले. वरंगलला काकतीय सत्ता प्रबळ बनत चाललेली समजते. कलचुरींचाही प्रभाव वाढला. तात्पर्य राजकीय सत्ता संघर्षाचा केंद्रबींदू काही काळ महाराष्ट्रातून खालच्या भागात अर्थातच तेलंगणा आणि कर्नाटक परिसरात सरकला. काकतीय, कलचुरी, चालुक्य, होयसळ या राजसत्तांनी दख्खन पठारावरील राजकीय संघर्ष चालू ठेवला. या संघर्षाबरोबरच कला, साहित्य, शिल्प परंपराही जोपासल्या. मंदिर स्थापत्याच्या रुपाने अप्रतिम मंदिर स्थापत्य अविष्कार चालुक्यांच्या कालखंडातील गोदा खोऱ्यातील होट्टल, धर्मापुरी, पानगाव, निलंगा, बीड, अन्वा या ठिकाणी घडलाय. चालुक्य शिल्पकलेचा अप्रतिम वारसा गोदा खोऱ्यातील या गावांनी जोपासला आहे.

डॉ.सौ. शोभना गोखले म्हणतात, "प्राचीन काळापासून महाराष्ट्राच्या लोकमाता ठरलेल्या नद्यांनी या संस्कृतीचे संवर्धन आणि जतन केले आहे.त्यामध्ये गोदावरी नदीने महाराष्ट्राची सांस्कृतिक संपदा प्रकर्षाने रुजवली आणि संवर्धित केली आणी तोच वसा तिला मिळणाऱ्या उपनद्या प्रवरा, मन्याड आणि तेरणा यांनीही घेतला."[१३] अशा या नद्यांच्या खोऱ्यामध्ये महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शिल्पकला ही साकार झाली आणि बहरास आली. या कलेला योग्य असे पोषक वातावरण महाराष्ट्रीयन मातीत मिळलेले दिसते. विभिन्न धर्माची व पंथांची कला या मातीत रुजली व तीने आपला नावलौकिक मिळविला.

## ३.१.२ मराठवाड्यातील शिल्पकला

मराठवाडा हे प्रादेशिक नाव असून तो महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकीय विभाग आहे. त्यामध्ये उस्मानाबाद, लातूर, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व औरंगाबाद या

---

१३. गोखले शोभना, प्राचीन धनसंपदा, पृ.५४

आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. माठवाड्याला अतिप्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. मराठवाड्यात प्रागैतिहासिक काळात मानवी संस्कृती अस्तित्वात होती. प्राचीन काळात मराठवाड्यावर वाकाटक, शिलाहार, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट व कल्याणीचे चालुक्य, मध्ययुगीन काळात देवगिरीचे यादव, दिल्लीचे खिलजी व तुघलक आणि मोगल घराण्याने राज्य केले. बहामनी राज्याची स्थापना मराठवाड्यातच देवगिरी या ठिकाणी झाली होती. मराठवाड्याचे गुणगौरव करतावा कठारे व नगराळे म्हणतात, "मराठवाड्यात अनेक ठिकाणी प्राचीन मंदिरे, लेणी, किल्ले, मस्जिद, गुरुद्वार व स्तूप आहेत. अजिंठा व वेरुळ येथील लेणी जगप्रसिध्द आहेत. मराठवाड्यात अनेक संत व कवी जन्माला आले.त्यांनी सामाजिक व धार्मिक एकतेसाठी महान कार्य केले त्यांची शिकवण समाजाला प्रेरणा देणारी ठरली."[१४]

अशा प्रकारचा हा प्रादेशिक भूभाग आहे. ज्याचा अभिमान महाराष्ट्रातील प्रत्येक मानवाला वाटला पाहिजे. यामध्ये दूमत नाही. अशा या मराठवाड्यात प्राचीन काळामध्ये अनेक राजघराण्यांनी राजाश्रय दिलेला होता. व त्यांच्या आश्रयाखाली येथे मोठ्या प्रमाणात शिल्पकला निर्माण झाली. दादासाहेब पोहनेरकरांच्या आठवणीत यु.म. पठाणांनी जो लेख लिहिला आहे. त्यात ते म्हणतात, "दगडावरील लेखाप्रमाणेच दादांना दगडाच्या मूर्तीतही रस वाटे. मराठवाड्यातील अद्याप फारशा प्रकाशात न आलेल्या पितळखोरा, धाराशिव इ. ठिकाणच्या लेण्यातील शिल्पांच्या अपूर्वाई बद्दल ते बोलू लागत, तेव्हा ते बोलणे थांबू नये, असे वाटे. त्यांचे हे अमोघ खरं तर खणखणीत वत्कृत्व त्यांच्या या शिल्पाविषयींच्या लेखांतही उतरले होते. अंबाजोगाईजवळच्या धर्मापुरीच्या शिल्पाविषयी त्यांनी प्रतिष्ठाण मधून जो लेख लिहिला आहे त्यात त्यांच प्रत्यंत्तर मिळतं."[१५] या पठाणांच्या लेखावरुन आपल्या लक्षात येते की, मराठवाड्यात अशी अभूतपूर्व शिल्पे कोरण्यात आलेली आहेत. त्यामुळे येथील शिल्पांवर जर इतिहासतज्ञ दादासाहेब पोहनेरकर बोलत असत त्यावेळी नुसतं येथील शिल्पसौंदर्याचे वर्णन

---

१४, कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, पृ.७

१५. पठाण यु.म., मराठवाड्याचा मिटलेला इतिहास, पृ.४

ऐकावसं वाटत असे. मराठवाड्यात प्राचीन काळातच शिल्पकला निर्माण झाली. त्यामध्ये सातवाहन घराणे हे महाराष्ट्रातील प्राचीन राजघराणे असून या राजघराण्याची राजधानी औरंगाबाद जिल्ह्यातील प्रतिष्ठाण होती. मोरवंचीकर म्हणतात, "सातवाहन घराण्याने इ.स.पू. २३० पासून इ.स. २३० पर्यंत राज्य केले."[१६] जवळपास सातवाहन घराण्याने ४६० वर्षे राज्य केले. त्यामध्ये त्यांनी सर्वच क्षेत्रात मोलाची कामगिरी पार पाडलेली दिसून येते. जोगळेकर म्हणतात, "हाल सातवाहणाच्या गाथासप्तशती नावाच्या ग्रंथात सातवाहन काळातील मंदिरांचे उल्लेख आढळतात. परंतु आजपर्यंत तरी सातवाहनकालीन मंदिरांचे अवशेष मिळालेले नाहीत."[१७] उस्मानाबाद तालुक्यामध्ये तेर नावाचे एक ऐतिहासिक गाव असून या ठिकाणी असलेले त्रिविक्रमाचे (विष्णू) मंदिर हे भारतात उपलब्ध असलेल्या प्राचीन मंदिरात उल्लेखनीय ठरते. असे मत डॉ. देव प्रभाकर यांनी आपल्या महाराष्ट्राचे कलावैभव नावाच्या लेखामध्ये नोंदविले आहे.

पर्सी ब्राऊन यांच्या मते, "तेरच्या या मंदिराचा कालखंड इसवी सनाचे पाचवे शतक आहे. हे त्रिविक्रम मंदिर म्हणजे मूलतः बौध्द चैत्यगृह आहे."[१८] अशाच प्रकारचे बांधीव चैत्यगृह हे "आंध्रप्रदेशातील चेझर्ला येथेही आहे."[१९] त्रिविक्रमाचे मंदिर हे विटांनी बांधलेले आहे. महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्यकलेचा प्रारंभ हा तेर येथील त्रिविक्रमाच्या मंदिरापासून होतो. हे मंदिर मराठवाड्यातील आहे मंदिर स्थापत्याच्या विकासाचे काही निर्णायक टप्पे दर्शविणारी मंदिरे इसवीसनाच्या पाचव्या व सहाव्या शतकात तेर येथेच बांधलेली आढळतात. मंदिर स्थापत्याची ही परंपरा व कला जोपासण्याचे महत्वाचे काम बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट, पल्लव, कल्याणीचे चालुक्य, वरंगळचे काकतीय व देवगिरीच्या यादवांनी केले. यांनी आपआपल्या काळात फार मोठ्या प्रमाणात कला, केंद्रेही विकसितकेलेली दिसून येतात.

---

१६. Morwanchikar R.S., The City of the Saints Paithan Through the Ages, p.२२
१७. जोगळेकर स.आ. (संपा.), हाल सातवाहनाची गाथासंप्तशती, पृ.२५६
१८. Brown Percy, Indian Architecture (Budhist and Hindu), p.१२७
१९. देव शां.भा., तेर, पृ.८

त्यामध्ये कंधार, तेर, धर्मापुरी, पानगाव, अंबाजोगाई, बीड, वेरुळ, अजिंठा, धारासूर, चारठाणा, होट्टल आदि ठिकाणे यांच्या काळात नावारुपाला आलेली दिसून येतात. त्यांनी निर्माण केलेल्या वास्तुकलेवर त्याचेच अभिन्न अंग असलेले शिल्पकाम साकारत गेले. पुराणातील अनेक कथा व कथानके त्यावर, साकार होत गेले व तत्कालीन कलाकाराने आपल्या हस्तकौशल्याने मोठ-मोठे शिल्प सौंदर्य निर्माण केले.

मराठवाड्यात अनेक जिल्हे अशी आहेत की ती शिल्पकलेने नटलेली आहेत. आणि त्यांचा सांस्कृतिक विकास घडून आलेला आहे. अभिजित बेल्हेकर म्हणतात, "बीड उस्मानाबाद, लातूर भागात कधी कोणी पर्यटनासाठी गेल्याचे ऐकायला मिळत नाही. खरे तर या भागातही बुलंद गडकोट, कोरीव लेणी, मंदिरे यांचे जाळे आहे."[२०] बीड जिल्हा जसा सर्वच ठिकाणी प्राचीन अवशेष मिळवून देण्यास मोलाचे सहाय्य करतो तसेच लातूर आणि उस्मानाबाद ही मदत करतात. बीड जिल्ह्यात अंबाजोगाई हे असे ठिकाण आहे की या ठिकाणी अप्रतिम शिल्पकलेचा ठेवा दिसून येतो. त्यामध्ये खोलेश्वराचे मंदिर, चौबारा गणेश मंदिर, योगेश्वरी देवीचे मंदिर, सकलेश्वराचे मंदिर आदि मंदिरे शिल्पकलेची उत्तम नमुने आहेत. तसेच येथील हत्तीलेण्याही अप्रतिम आहेत.

बीड येथील कंकालेश्वर मंदिर, खंडेश्वरीचे मंदिर, धारुरचा किल्ला, परळीचा वैद्यनाथ, पुरुषोत्तमपुरी, पाली, धर्मापुरी, आदी ठिकाणी शिल्पकला दिसून येते. लातूर जिल्ह्यातही निळकंठेश्वराचे मंदिर, खरोसा लेण्या, सिध्देश्वर मंदिर, पानगाव उदगिरचा किल्ला, औसा येथील किल्ला आदी ठिकाणी ऐतिहासिक वास्तु आहेत. तसेच उस्मानाबाद डिल्ह्यातही मानकेश्वर, परंड्याचा किल्ला, उमरग्याचे मंदिर, कुंथलगिरी, भूम, तेर आदी ठिकाणी ऐतिहासिक शिल्प मिळतात. त्यामध्ये बेल्हेकर तेर येथील शिल्पाविषयी बोलताना म्हणतात, "दगडी शिल्पांच्या या 'वेरुळा'तून आपला प्रवास सुरु होतो. उमा-महेश्वर, शेषशाही, विष्णू, यक्ष, कार्तिकेय, पार्श्वनाथ, अन्य जैन तिर्थकार, गौतम बुध्दाचे शिर असे एकेक लेणे पुढे येऊ

२०. बेल्हेकर अभिजित, सातवाहनांचे तेर, लोकरंग पुरवणी, लोकसत्ता, पृ.३

लागते त्यातही झिलईकाम केलेला चकाकता विष्णू कार्तिकेयाची मोरावरची आगळी मूर्ती आणि गौतम बुध्दाचे शिर ही शिल्प तर अक्षरशः खिळवून ठेवतात."[२१] मानवाच्या आनंदाला द्विगुणीत करण्याचा प्रयत्न जणू ही शिल्प करतात असेच आपणाला येथील शिल्पातून दिसून येते. धर्मापुरीतही अशाच प्रकारे पाहणाऱ्याला अक्षरशः खिळवून ठेवणारी शिल्पकला ही केदारेश्वर मंदिरावरही असल्याची आपणाला दिसून येते आणि पानगाव येथील मूर्तीही आपणाला पाहण्यासाठी वेड लावून सोडतात. पानगावच्या मातृवत्सलेच्या मूर्ती ह्या माता आणि पुत्राच्या प्रेमाचा अद्वितीय नमुना दिसून येतो.

## ३.२ स्थापत्यकलेची पूर्वपरंपरा

आपण वास्तुशास्त्राची अगदी अलगद उकल करुया जसे आपण पाहिले यंत्र, तंत्र आणि मंत्र यांचा जर आधुनिक भाषेत विचार केला तर यंत्र म्हणजे मशीन व मेकॅनिक्स किंवा मेकॅनिझम, तंत्र म्हणजे टैक्निक आणि टेक्नॉलॉजी मंत्र म्हणजे परिभाषा, टर्मिनॉलॉजी, आता जरा सर्व समजण्यास सोपे जाईल. तसे तर आपण हे शब्द वापरतच असतो. जसे यंत्रशाळा, तंत्रनिकेतन वगैरे, वास्तुशास्त्र किंवा स्थापत्यशास्त्र म्हणजे आर्किटेक्चर. आता वास्तुशास्त्रामध्ये यंत्र, तंत्र, आणि मंत्र वापरावयाचे म्हणजे वास्तु बांधण्यासाठी त्याच्या परिभाषेप्रमाणे टेक्नॉलॉजी व मेकॅनिक्स वापरायचे आणि यंत्र तयार करायचे. पूर्वीच्या परिभाषेप्रमाणे याचे वर्णन ग्रंथामध्ये केले आहे. ते समजून घेणे आवश्यक आहे. वास्तुशास्त्र मुळात आले कोठून? ते काही अभाळातून टपकले नाही, की कोणा एका व्यक्तिला अचानक सूचले नाही.

सुबोध दिक्षित म्हणतात, "आदिकाळापासून जेव्हा माकडाचा माणूस होण्याची प्रक्रिया सुरु होती तेव्हापासूनच निसर्गाच्या अत्यंत जवळ किंवा निकट राहत असल्याने निसर्गातील प्रत्येक बदल आणि त्याचा होणारा एकंदरीत परिणाम याची नोंद माणसाने घेतली, तेव्हा माणूस भटकत असे त्यानंतर हळूहळू गुहा, झाडांचा आडोसा, दगडांचा आडोसा, असे

---

२१. तत्रैव.

करत तो एका जागी स्थिर होऊ लागला."[२२] पाण्याच्या गरजेमुळे नदीकिणारा जवळ असेल अशा ठिकाणी आणि हळूहळू समुहाने राहू लागला. पुरुष शिकारीला गेले असताना स्त्रिया फावल्या वेळेत शेती करु लागल्या. नदीला जेव्हा पूर येतो तेव्हा पाणी आजूबाजूच्या सखल भागात पसरते आणि आपल्या बरोबर आणलेला सुपिकगाळ येथे सोडते त्यातून अशा सखल भागात शेती होऊ लागली. परंतु पुरापासून दूर आणि उंचावर वस्ती होऊ लागली. शेतीतून थोडे शाश्वत उत्पन्न मिळण्याबरोबरच काही प्राणी पाळणे आणि त्यांच्यापासून विविध कामे करणे, हे प्रकार होऊ लागले. लोकसंख्या वाढू लागली तशी, आसरा निवाऱ्याची गरज भासू लागली.

शेती आणि पशुपालन यामुळे थोडा निवांत वेळ मिळताच वेगवेगळे प्रयोग सुरु झाले. निसर्गाच्या अभ्यासाची जोड होतीच. याबरोबरच हत्यारांची विविधता तसेच चाक आणि अग्नी यांचा शोध यामुळे माणसाची अत्यंत प्रगती सुरु झाली. असे अनेक समूह निर्माण झाले. पूर्वी फक्त शिकार एवढेच जगण्याचे साधन असताना माणूस आक्रमक होता. पण आता शेती उत्पन्न आणि पशुधन यांचे संरक्षण करणे गरजेचे झाल्याने सुरक्षितता महत्वाची झाली. त्याच जोडीला अंगीभूत आक्रमकता वापरुन दुसऱ्याने साठवलेल्या धनाची लूट हाही एक उद्योग झ ाला. एका जागी स्थिर होताना प्रथमतः झाडांचा आडोसा, त्यानंतर झाडे, झावळ्या, फांद्या वापरुन कच्ची झोपडी, नंतर त्याभोवती मातीचे लिंपण, दगडांची चळत लावून त्यावर झावळ्या घालून छप्पर, कच्च्या मातीच्या विटा, मातीते लिंपण असे करत भाजीव मातीच्या विटा किंवा दगडांच्या पक्क्या भिंती अशी प्रगती होत गेली. पशुधन आणि शेतीचे उत्पन्न तसेच लूट आणि इतर साहित्य यांचे संरक्षण होण्यासाठी त्यांची साठवण मध्यात ठेवून इतर बाजूने घरांची रचना सुरु झाली.

याचबरोबर कामांची वाटणी होऊ लागली. यामध्ये संरक्षण, शासन, समुहाची देखभाल, शेतीची कामे, पशुंची देखभाल, बांधकाम व इतर कामे यासाठी योग्य त्या त्या व्यक्तींकडे ती-ती कामे सुपूर्द करण्यात आली. हे सर्व काही एका रात्रीत झाले नाही. यासाठी

---

२२. दिक्षित सुबोध, उगम वास्तुशास्त्राचा, दैनिक सकाळ मधील लेख, गुरुवार पुरवणी, पृ.४

हजारो वर्षाचा काळ गेला हे सर्व होताना अनुभवातून सुधारणा होत गेल्या. भाषा लिखाणाचा आतून उगम नसल्यामुळे मौखिक पध्दतीने पुढच्या पिढीकडे अनुभव पोहोचविला जाऊ लागला. तसेच चित्रलिपीद्वारे काही घटना आणि मजकूर नोंदवून ठेवण्यात आला. आपण विचार करत असाल, यासर्वाचा अंतर्गत संरचनेशी काय संबंध? पण अशीच अंतर्गत संरचनेची सुरुवात झाली. समूह, गाव, खेडे आणि शहर याचबरोबर बांधकाम आणि अंतर्गत रचना यांचाही विकास झाला. यातच वास्तुशास्त्राचा उगम आहे आणि याचा अभ्यास केल्याशिवाय वास्तुशास्त्राच्या मूळ संकल्पना आपल्याला समजणार नाहीत आणि आपण परत-परत कोणाच्या तरी सांगण्यावरुन फसत बळी पडत जाणार.

हळूहळू मानव स्थिरावल्यावर तो मनोरंजणासाठी कलेकडे वळला. कला या अनेक ढंगांनी निर्माण केल्या. वास्तुकलेचे अशाच एक ढंगात रुपांतर होते. वास्तुकलेचे सर्वात प्राचीन अवशेष सिंधू संस्कृतीत पहावयास मिळतात. त्यापूर्वी प्रागैतिहासिक कालीन वसाहती किंवा वास्तू या प्रगल्भ अवस्थेत येऊन पोहचल्या नव्हत्या. परंतु मौर्य काळात प्रथमच वास्तुंचे सुस्थितीतील अवशेष मिळतात. तेथूनच पुढे वास्तुकलेच्या स्थितीत व प्रगतीत एकसुत्रीकरण निर्माण झालेले दिसून येते. अशा प्रकारे प्राचीन काळात महाराष्ट्रात वास्तुकलेला लागूनच अनेक कलांचा उगम झालेला दिसतो.

### ३.२.१ महाराष्ट्रातील स्थापत्यकला

महाराष्ट्रात स्थापत्यकलेसोबतच अनेक कलांचा प्राचीन काळात उदय झाला. भांडवलकर, हनवते म्हणतात, "शिल्प स्थापत्य, नाट्य, संगीत व चित्र इत्यादी प्रकारांना कला या नावाने ओळखतात. संस्कृत शब्दकोश, ऋग्वेद, अथर्ववेद, ब्राम्हणग्रंथ, आरण्यके, भरताचे नाट्यशास्त्र यातून कलेबाबत चर्चा केलेली आहे. कलेच्या विविध प्रकारांची माहिती विविध ग्रंथातून भिन्न-भिन्न प्रकारे सांगितलेली आहे. त्यात मुख्यतः शुक्रनिती, तंत्रे व कामसुत्रांनी ६४ कलेचे प्रकार, प्रबंध कोशात ७२ कला प्रकार, ललित विस्तार ग्रंथातून ८६ कला व क्षेमेंद्राच्या कला विलास ग्रंथातील १०० कला इत्यादी विविध प्रकारच्या कला प्राचीन काळापासून

अस्तित्वात असल्याचे दिसते. ज्या कामात थोडे बहुत कौशल्य लागते त्या सर्व कामांची प्राचीन विद्वानांनी कलेच्या सदरात गणना केली होती."[२३]

महाराष्ट्रात स्थापत्यकलेचा प्रारंभ हा इ.स.पू. दुसऱ्या शतकात झाला. तो म्हणजे मंदिर स्थापत्याचा त्यात तेर येथील मंदिराला महत्व दिले जाते. प्राचीन भारतीय कलेत मंदिर वास्तुकलेप्रमाणेच विकसित झालेला एक स्वतंत्र कलाविष्कार म्हणजे लेणी होय. लेण्यांनाच शैलस्थापत्य, शैलगृह, गुहा, गुंफा व गुहांमंदिरे या नावानेही संबोधिले आहे. भारतात हिंदू, जैन आणि बौध्द लेणी आहेत. या संदर्भात आर शरण म्हणतात, "भारतात आजपर्यंत एकूण १५४५ लेण्यांचा शोध लागला आहे."[२४] त्यामध्ये जेम्स फर्ग्युसन म्हणतात, "त्यापैकी १२०० लेण्यांची नोंद भारतीय पुरातत्व विभागाकडे आहे. त्यापैकी ९०० बौध्द लेणी, २०१ जैन लेणी आणि ९९ हिंदू लेणी आहेत."[२५] लेणी हा प्राचीन वास्तुकलाप्रकार आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आशा प्रकारच्या स्थापत्याचा अविष्कार झालेला दिसून येतो. महाराष्ट्रात नांदेड जिल्ह्यात शिरुर व माहूर या ठिकाणी लेण्या आहेत. बीड जिल्ह्यात अंबाजोगाई, लातूर जिल्ह्यात खरोसा तसेच वेरुळ, अजिंठा, औरंगाबाद, पितळखोरा, कार्ले, भाजे, बेडसा आदी ठिकाणी लेण्या निर्माण होण्यास मदत झाली. एम.आर. बक्शींच्या मते, "भारतात जगप्रसिध्द मौर्य घराणे होऊन गेले या घराण्याने इ.स.पू. ३२२ पासून इ.स.पू. २८७ पर्यंत राज्य केले."[२६] मौर्य राजांनी सर्वप्रथम लेणी निर्माण करण्यास राजाश्रय दिलेला दिसतो.

मौर्य घराण्यातील राजा सम्राट अशोकाने बौध्द धर्म स्वीकारल्यावर त्याने उरलेले आयुष्य धर्म प्रसारासाठी खर्च केले याच अशोकाने भारतात सर्वप्रथम लेणी खोदकामास प्रारंभ केला. अशोकाने सुरु केलेली लेणी खोदकामाची परंपरा त्याचा नातू दशरथ (दर्शन) याने पुढे

---

२३. भांडवलकर, हनवते, मराठवाड्याचा इतिहास, पृ.१७९
२४. Sharan R. Ancient Indian History Culture and Archeology, p.४२८.
२५. James Ferguson and James Burgess, The Cave Temples of India, p.५८
२६. Bakshi S. R, Advaced History of ancient India, pp.२-२८.

चालू ठेवली. पर्सी ब्राऊन म्हणतात, "सम्राट अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांनी आजीवक नावाच्या धर्मपंथीयासाठी इ.स.पू. २५२ ते इ.स.पू. २१४ या काळात लेणी खोदविल्या."[२७]

यावरुन आपणाला समजते की मौर्य काळापासून भारतात खऱ्या अर्थाने लेणी स्थापत्याला प्रारंभ झाला. याचे श्रेय मौर्य घराण्यातील सम्राट अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांना द्यावे लागते. जेम्स फर्ग्युसन म्हणतात, "त्यांनी बिहार राज्यात बाराबार पहाड, सीतामढी टेकड्या, राजगीर जवळच्या टेकड्या व सौराष्ट्रातील जुनागढ जवळच्या उपरकोट आणि नौदुर्ग या टेकड्यांत लेण्या खोदविल्या."[२८] याच लेण्यांना चैत्यगृह आणि विहार म्हणूनही ओळखले जात असते. लेण्या निर्माण होण्यासाठी किंवा त्या दृष्टीने लेणी स्थापत्याच्या निर्मितीला चालना मिळाली. भारतात या प्रारंभीच्या विहार स्थापत्यानंतर कलात्मक अशा शैलगृहाची म्हणजेच लेण्याची निर्मिती झालेली आढळते. भारतात ज्या-ज्या ठिकाणी डोंगर आहेत त्या त्या सर्वच ठिकाणी लेण्या खोदल्या नाहीत. तर कलाकारांनी लेणी या स्थापत्य प्रकाराला अनुकूल असलेला खडक ज्या ठिकाणी उपलब्ध आहे, अशाच डोंगरात लेण्यांचे खोदकाम केले.

महाराष्ट्रात सह्याद्री पर्वताच्या मोठ-मोठ्या रांगा आहेत. या पर्वतरांगा लेण्यांच्या खोदकामासाठी आणि शिल्प प्रकाराला विशेष अनुकूल आहेत. या पर्वताचे स्तर एकावर एक आडवे पसरलेले असून प्रत्येक थर घट्ट व एकसंघ आहे. पर्वतात उभे आडवे छेद किंवा मुरमाड भाग फारसा आढळत नाही. या पर्वताचा बहुतेक भाग सरळ खडा उभा असल्यामुळे वास्तुची एक बाजू आयतीच तयार होते. लेणी स्थापत्याच्या निर्मितीपूर्वी त्या खडकाचा आपणास हवा तेव्हा भाग कोरुन घासून सपाट केला जातो. यानंतर लेण्यांच्या खोदकामाला प्रारंभ करता येतो. थोडक्यात महाराष्ट्रात सह्याद्री पर्वताचा भाग लेणी स्थापत्याला अनुकूल असल्याने या पर्वतातच लेण्यांचे खोदकाम करण्यात आले. जेम्स बर्गेसच्या मते, "भारतात ज्या ज्या ठिकाणी लेण्याचे खोदकाम करण्यात आले त्या सर्व लेणी प्राचीन महामार्गावर आणि व्यापारी मार्गावर खोदण्यात

२७. Percy Brown, Op.cit., pp.१०-११

२८. James Ferguson and James Burgess, Op.cit., p.५३

आल्या."[२९] विशेष म्हणजे या सर्व लेण्यांचे खोदकाम नगरांपासून दूर अंतरावर असलेल्या डोंगरातच करण्यात आले. पुढे परत जेम्स बर्गेस म्हणतात, "नाशिकच्या लेणी सोपारा ते उज्जैन या राजमार्गावर आहेत कल्याण मार्गे निघणाऱ्या दुसऱ्या हमरस्त्यावर कार्ले भाजे आणि जुन्नरच्या लेणी आहेत. पैठण ते कल्याण व्यापारी मार्गावर जुन्नरच्या ४०० लेण्यांचे खोदकाम करण्यात आले. औरंगाबाद, पितळखोरा आणि वेरुळच्या लेणी तेरहून पैठणमार्गे चाळीसगावला जाणाऱ्या महामार्गावर आहेत. अजिंठा व घटोत्कच ह्या लेणी औरंगाबादहून महेश्वरला (महिष्मती) जाणाऱ्या महामार्गावर आहेत."[३०]

भारतात लेण्यांच्या खोदकामास राजे महाराजे आणि व्यापारी लोकांनी आश्रय दिला. त्यांनी केलेल्या आर्थिक धन धर्मातून लेण्यांचे खोदकाम करण्यात आले. भारतात सर्वप्रथम लेण्यांच्या खोदकामास मौर्य सम्राट अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांनी आश्रय दिला. त्यांनी केलेल्या आर्थिक सहकार्यातून लेण्यांचे काम पूर्ण झाले. यानंतर पैठणचे सातवाहन वत्सगुल्मचे वाकाटक, गुप्तवंश, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य व देवगिरीचे यादव इत्यादी राजघराण्यांच्या राजाश्रयामुळे देशात व महाराष्ट्रात विविध भागामध्ये या लेणी स्थापत्याला बहर आलेला आपणास समजतो.

ज्या प्रकारे हिंदूची मंदिरे व शिल्पकला आहे तशीच बौध्दांची विहारे, चैत्यगृहे किंवा लेणी स्थापत्य यांची पूर्वपरंपरा आपण अभ्यासली त्याच प्रमाणे जैनांनी पण आपल्या स्थापत्य कलेला विकसितकेलेले समजते. इ.स.पू. पहिल्या शतकात महाराष्ट्रात जैन धर्माचा प्रसार झाला. या जैन धर्माला विविध कालखंडात विभिन्न राजघराण्यांनी आश्रय दिला.त्यामुळे जैन धर्माचा विकास व प्रसार होण्यास मदत झाली. आर.एस. त्रिपाठी म्हणतात, "भारतात सर्वप्रथम चंद्रगुप्त मौर्याने एकछत्री अंमल निर्माण केला त्याने इ.स.पू. ३२१ ते २९७ पर्यंत राज्य केले.

---

२९. James Burgess, Report on the Buddist Cave Temples and Their Incriptions, Archeaological Survey of Western India, p.३६.

३०. Ibid, p.३७

त्याने जैन धर्माचा स्वीकार केला होता."[३१] दक्षिण भारतात जैन धर्माचा प्रसार करण्याचे कार्य त्यानेच केले होते. मोरवंचीकर म्हणतात, "चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीत उत्तर भारतात मोठा दुष्काळ पडल्यामुळे तो आपला जैन धर्मगुरु भद्रबाहू याच्याबरोबर इ.स.पू. चौथ्या शतकात कर्नाटकात श्रवणबेळगोळ या ठिकाणी येऊन राहिला."[३२] अशा प्रकारे या मौर्यासोबतच सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य आदी राजघराण्यांनी जैन धर्माला आश्रय दिला व भारतीय इतिहासात यांचेही स्थापत्य निर्माण होण्यास मोलाची मदत झाली.

## ३.२.२ मराठवाड्यातील स्थापत्य परंपरा

प्राचीन काळापासूनच मराठवाडा स्थापत्याच्या बाबतीत महत्वाचा मानला जातो. म्हणूनच रा.वि. जोशी म्हणतात, "पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या पुरातत्व विभागाने गोदावरी परिसराचा प्रामुख्याने मराठवाड्यातील मानवी जीवन पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी मोठा प्रकल्प हाती घेतला होता."[३३] या प्रकल्पात त्यांनी अनेक ठिकाणी ऐतिहासिक स्थळांचा शोध घेतला होता.

मौर्य-सातवाहन काळातील वसाहतींचे अवशेष खानदेशात (प्रकाशे व बव्हाळ), विदर्भात (कौंडीण्यपूरवपवणार), गोदावरी प्रवरा खोऱ्यामध्ये (नाशिक व नेवासा), मुंबई (बालासोपारा), दक्षिण महाराष्ट्र (कऱ्हाड व कोल्हापूर) आणि विशेषत्वाने मराठवाड्यामध्ये तेर आणि पैठण जवळ उपलब्ध झाले आहेत. मराठवाड्यात मंदिरे, लेण्या, वास्तु, विहार, चैत्यगृहे, किल्ले, ऐतिहासिक स्मारके यांनी गर्दी केलेली दिसून येते. मराठवाडा हा इतिहासाच्या किंवा स्थापत्य कलेच्या बाबतीत संपन्न आहे. मराठवाड्यातील लेणी स्थापत्याविषयी माहिती देतांना अनिल कठारे म्हणतात, "अशा ऐतिहासिक लेण्यांचा वारसा असलेल्या मराठवाडा विभागातील बीड जिल्ह्यात अंबाजोगाई या ठिकाणी तीन लेणी आहेत. शिवाय खरोसा, लोहगड, जिंतूर, भोकरदन, माहूर, शिरुर, अंबाजोगाई येथेही लेणी आहेत. मराठवाड्यातील वरील लेणींच्या

---

३१. Tripathi R.S., History of Ancient India, pp.१४०-१५९.
३२. Morwanchikar, R.S., Op.cit., p.४७
३३. जोशी रा.वि., मराठवाड्यातील आश्मयुगीन संस्कृती, पृ.३

निर्मितीसाठी सातवाहन, गुप्त, वाकाटक, राष्ट्रकुट व बदामीच्या चालुक्य राजवंशांनी आर्थिक सहाय्य केले."[३४] अशा या लेणी स्थापत्यात मराठवाडा हा अग्रेसर दिसून येतो. याबाबतीत गो.बं. देगलूरकर म्हणतात, "हिंदूस्थानात लेणी निर्माण झाली ही इसवीसनाच्या तिसऱ्या शतकापासून, मात्र त्यांची वाढ, विस्तार झाला तो महाराष्ट्रात. येथे सुमारे नऊशेपेक्षा अधिक लेणी आढळून आलीत. त्यातही विशेष म्हणजे स्थापत्य, शिल्प, आणि चित्र या तिन्ही क्षेत्रांत नावाजली जातील अशा लेणीही येथेच आहेत. महाराष्ट्राला या क्षेत्रात मोठेपण मिळते ते आणखी एका वैशिष्ट्याने ते म्हणजे या पैकी काहीलेणी तिन्ही पंथांच्या म्हणजे बौध्द, ब्राम्हणी, जैन यांच्या एकत्र अशा आहेत. शिवाय शैलगृहात सर्वोत्कृष्ट ठरतील अशी अजिंठा व वेरुळ येथील लेणी तर गोदा खोऱ्यातच आहेत असे म्हणावे लागते."[३५] या लेण्या जागितक ख्यातीच्या आहेत. यांना मराठवाड्याचा कलेच्या क्षेत्रातील मुगुटमणी म्हणता येईल ज्यांनी आपला कलासौदर्यात मोलाचा ठसा उमटवला आहे. यशपाल जैन म्हणतात, "एलोरा हे केवळ महत्वाचे ऐतिहासिक स्थानच नसून येथील सुंदर अनुपम स्थापत्यकला शिल्प व चित्रकला तसेच निसर्गरम्य दृष्यांमुळे जगप्रसिध्द बनले आहे. बौध्द, शैवपथीय, ब्राम्हणीय व जैन दिगंबरीय अनुपम शिल्पकलेमुळे भारतीय संस्कृतीच्या प्रसिध्द तीन प्रवाहांचे हे संगमस्थान मानले जाते किंवा बनले आहे. या प्रसिध्द लेण्यांमुळे प्रत्येक वर्षी हजारो प्रवासी देश व परदेशातून येत असतात."[३६] या ऐतिहासिक ठिकाणामुळे भारतीय संस्कृतीतील अनेक धर्मपंथाचे एकत्रीतपणे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही.

मराठवाड्यातील स्थापत्य परंपरेत आपण बौध्द स्थापत्यपरंपरेचा धावता आढावा घेतला. तसे जैन स्थापत्यही मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी आढळून आलेले आपणाला तत्कालिन अवशेषांवरुन समजते. चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, यादव, होयसळ आणि शिलाहार ही घराणी श्रुती-स्मृती, पुराण व आगम धर्मानुयायी असली तरी त्यांनी व

---

३४. कठारे अनिल, मराठवाड्यातील लेणी, पृ.५

३५. देगलूरकर गो.बं., गोदा खोऱ्यातील लेणी, पृ.३४

३६. जैन यशपाल, जयपूर-एलोरा येथील ऐतिहासिक लेण्या, पृ.१४

दरबारातील प्रमुख अधिकाऱ्यांनी अथवा वर्ण श्रेष्ठी समाजाने जैन समाजाला मोठ्या प्रमाणात आश्रय दिल्याचे लेखनिविष्ट पुरावे लक्षणीय संख्येने उपलब्ध आहेत. आजही दक्षिण महाराष्ट्रात व कर्नाटकात जैन समाज मोठ्या संख्येने उपलब्ध असल्याने व ही परंपरा पूर्व काळापासून अक्षुष्ण असल्याने त्या प्रदेशात जैन अभिलेख मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. यादवांच्या अस्तानंतर सल्तनीच्या काळात जैन श्रेष्ठी मोठ्या संख्येने व्यापार उदिमाच्या निमित्ताने वऱ्हाड व मराठवाड्यात आले."[३७] यावरुन मराठवाड्यात जैन धर्म कसा आला व वाढला यांची कारणे आपल्या लक्षात येते. भारतीय संस्कृतीच्या राजांनी कोणत्याच धर्माचा म्हणावा तेवढा मध्ययुगीन काळाप्रमाणे धर्मद्वेश केला नाही. जशी मुस्लीमांच्या काळात भारतीय स्थापत्य कलेला हानी पोहचली तशी हानी तर सोडाच पण येथील राजांनी उलटा परधर्मीयांना राजाश्रय दिलेला दिसून येतो.

"दौलताबाद या किल्याची संरक्षित वास्तु म्हणून जी पुरातत्व सर्वेक्षणाकडून जी साफसफाई करण्यात आली त्यात मिळालेले पुरावशेष आतल्या कोटाच्या आवारात मांडून ठेवली आहेत. त्यात दिगंबर व श्वेतांबर मूर्तीचा मोठा साठा आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मराठवाडा विद्यापीठाचा इतिहास विभाग व डेक्कन कॉलेजचा पुरातत्व विभाग यांच्या विद्यमाने दौलताबाद किल्याच्या आवारातील व आवाराबाहेरील, वास्तुंचा शेजारच्या तलावाचा व त्यातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा नगर वास्तुशास्त्राच्या दृष्टीने आणि उत्खननाच्या माध्यमातून पुरातत्वाच्या दृष्टिनेही अभ्यास करण्यात आला. डेक्कन कॉलेजमधील संशोधन चमूचे नेतृत्व करणाऱ्या म.श्री. माटे यांच्या मते, उपलब्ध जैन मूर्ती व वापरलेले जैन मंदिरातील स्तंभ यावरुन सहज असे अनुमान करता येते की या ठिकाणी कमीतकमी तीन मंदिरे जैनांची असावीत."[३८] यावरुन दौलताबाद परिसरातही जैनांच्या वास्तु ह्या प्राचीन काळात नावारुपाला आल्या असाव्यात असे आपणाला म्हणता येते. जैन हा धर्म असा आहे यांच्या मूर्तीच्या

३७. जामखेडकर अ.प्र., जैन पुरातत्व, पृ.६२

३८. तत्रैव, पृ.६७

प्रमाणात वास्तु आपणाला दिसून येत नाही. पण त्यांच्या सापडलेल्या अवशेषांवरुन आपणाला अनुमान लावता येतो.

जैनांची अनेक ठिकाणे मराठवाड्यासह महाराष्ट्रात असलेली निदर्शनास येतात. त्यामध्ये "जैन शैलगृहे असलेली यादवकालीन स्थळे पुढीलप्रमाणे आहेत. मांगी-तुंगी, चांदवड, आजमेरी (जि. नाशिक), पाटणे (जि. जळगाव), भामरे व मोहिदे (जि. धुळे), दौलताबाद किल्ला व परिसर (जि. औरंगाबाद), बामचंद्र (जि. पुणे) आणि जिंतूर (जि. परभणी) यादव व तदुत्वरकालीन लेणी अगदीच साधी, कधी-कधी अनाकर्षकही आहेत काही तर नुसत्या एकाच्या भिंतीत अथवा मंडपातल्या दोन खांबावर आम्बिका आणि सर्वाहन/कपर्दियक्षांच्या प्रतिमा निश्चितच असतात."[३९] अशा प्रकारे जैनांच्या स्थापत्याचा आपणाला थोडक्यात अभ्यास करावयास मिळतो. जैन धर्माची स्थापत्य कला ही हिंदू व बौध्द धर्माप्रमाणेच महान असलेली आपणाला अभ्यासाअंती निष्कर्ष काढता येतो. बौध्द आणि जैनांप्रमाणेच, मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात हिंदू धर्माचीही स्थापत्य परंपरा असलेली आपणाला दिसून येते. याचाही अभ्यास आपण पुढील प्रमाणे करुयात.

मराठवाड्यात हिंदू मंदिरांचा प्रारंभ हा तेर येथील एका त्रिविक्रमाच्या मंदिरापासून झाला असे संशोधक मानतात. इ.स.पू. दुसरे शतक याचा कालखंड ते दर्शवितात आणि तिच प्राचीन मराठवाड्यातील पहिली वास्तु असावी, असे वाटते या तेर शहराचा इतिहास फार प्राचीन आहे. याविषयी अभिजित बेल्हेकर म्हणतात, "वर्षामागून वर्षे गेली, प्राचीन तगर पूर्णपणे स्मृतिआड गेले पण तत्कालीन रोमन-ग्रीक प्रवाशांनी लिहून ठेवलेली वर्णने मात्र अभ्यासक व संशोधकांना तगरच्या शोधाविषयी आव्हान देऊ लागली. या आव्हानातूनच मराठवाड्याची वाट शोधत इ.स. १९०१ मध्ये हेन्री कझिन्स हा ब्रिटिश संशोधक पहिल्यांदा तेर गावी पोहचला. त्याने केलेल्या संशोधन सर्वेक्षणातून तेर उर्फ तगरचा दैदीप्यमान भूतकाळ पुन्हा जगासमोर आला. त्यानंतर पांढरिच्या या टेकड्यामध्ये दडलेल्या प्राचीन इतिहासाचा शोध

३९. तत्रैव, पृ.६८

घेण्यासाठी देश-विदेशातील अनेक अभ्यासक-संशोधकांचे पाय तेरला लागू लागले. सर्वेक्षण, अभ्यास, उत्खनन सुरु झाले आणि या साऱ्यांतून दोन हजार वर्षापूर्वीचे एक भरभराटीला आलेले नगर त्यांची संस्कृती पुन्हा एकदा प्रकाशात आली. या संस्कृतीतील रहस्यांनी भरलेला 'वस्तुपट' म्हणजेच तेरमधील रामलिंगप्पा खंडप्पा लामतुरे ऐतिहासिक संग्रहालय."[४०] अशा प्रकारे तेर हे एक प्राचीन शहर असल्याने या ठिकाणी वास्तुकलेचे अनेक अवशेष पहावयास मिळतात. याचबरोबर प्रतिष्ठाण, भोकरदन, कंधार, धर्मापुरी, अंबाजोगाई, अशी अनेक ठिकाणे प्राचीन आहेत. त्यांच्या ठिकाणी अद्यापही वास्तुंची किंवा स्थापत्यकलेची परंपरा जोपासणारे पुरावे मिळतात. याच्या नंतरच्या काळातील मराठवाड्यातील वास्तुकलेची परंपरा ही कशी होती याविषयी डॉ. अनिल सिंगारे म्हणतात की, "वास्तूकलेच्या कालगणनेत इ.स.च्या ७ व्या शतकानंतर मध्ययुगाला प्रारंभ होतो. तर शेवट तेराव्या शतकात होतो. म्हणजे इ.स.चे ७ वे शतक ते इ.स. १३ वे शतक असा ६०० वर्षाचा कालखंड मंदिर रचनेच्या इतिहासात मध्ययुग या नावाने ओळखला जातो. याचे पुन्हा दोन विभाग पडतात. पहिला ७ वे ते १० वे शतक दुसरा दहावे ते तेरावे शतक पहिल्या विभागात दक्षिण भारतात पूर्व चालुक्य, राष्ट्रकुट, पल्लव हे प्रमुख राजघराणे येतात. तर दुसऱ्या विभागात कल्याणीचे चालुक्य, चोल, पांड्य, काकतीय, होयसळ आणि यादव हे राजघराने प्रमुख होत. मराठवाड्यातील काही प्रमुख मंदिरे ही मध्य युगाच्या दुसऱ्या विभागात मोडणारी आहेत."[४१] मध्ययुगाच्या दुसऱ्या विभागात मोडणारी मंदिरे मराठवाड्यात धर्मापुरी पानगाव, अंबाजोगाई, होट्टल, चारठाणा, धारासूर, आदी ठिकाणी पहावयास मिळतात. शक्यतो हेमाडपंथीयांनी जी आपली वास्तुकलेतील शैली विकसित केली तिही प्रामुख्याने याच गटात मोडणारी आहे. १० वे ते १३ वे शतक हा मराठवाड्यातही व येथील स्थापत्यकलेसाठी एक वैभवशाली ठरलेला काळ म्हणून आपणाला अभ्यासता येतो.

४०. बेल्हेकर अभिजित, पूर्वोक्त, पृ.३
४१. सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास, पृ.१९६

## ३.३ धर्मापुरी आणि पानगांव येथील वास्तुंचा कला-स्थापत्यशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास :

धर्मापुरी आणि पानगाव या गावांचा कला आणि स्थापत्याच्या दृष्टिकोनातून जर अभ्यास केला तर या ठिकाणी अनेक आणि निरनिराळ्या प्रकारच्या वास्तु ह्या आहेत. त्यामुळेच या ठिकाणचा इतिहास आपणाला त्याच्या सर्वेक्षणावरुन ज्ञात होण्यास मोलाची मदत होते. धर्मापुरी व पानगाव परिसराचा जर विचार करावयाचा झाला तर या परिसरात राष्ट्रकुटांची सत्ता होती. यांच्या काळातही या भागात काही वास्तु व शिल्प निर्माण झाले असावेत. नंतर या परिसरातील भागावर अर्थातच बीड, नांदेड, उस्मानाबाद, आदी जिल्ह्यांवर कल्याणीच्या चालुक्यांनी आपले वर्चस्व प्राप्त केले. भगवान काळेच्या मते, "चालुक्य नरेशांच्या काळातच अंबाजोगाई, लातूर, धाराशिव, धर्मापुरी आदी केंद्रे उदयाला आली."[४२]

शिल्पसौंदर्याच्या दृष्टिकोनातून विचार केला तर धर्मापुरी आणि पानगाव येथील या ठिकाणचे शिल्पसौंदर्य हे अप्रतिम ठरते. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणीव परिसरात अनेक वास्तु, मंदिरे, किल्ला, बारव, तलाव, नगररचनेचे अवशेष आदी घटकांचा आपणाला वास्तुकला व स्थापत्याच्या दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करता येतो.

चालुक्यांच्या काळात लातूर आणि बीड जिल्ह्यांच्या परिसरात शेकडो मंदिरे निर्माण झाली. अशा या वास्तु निर्माण होण्यामागे धर्माचा प्रभावही तेवढाच दिसून येतो. याविषयी डॉ. अंबादास मांडगूळकर म्हणतात, "मध्ययुगीन काळातील लोकांच्या दैनंदिन व्यवहारावर देखील धर्माचा जबरदस्त प्रभाव पडलेला होता. समाज जीवनाची जवळ-जवळ सर्वच क्षेत्रे धर्माने व्यापून टाकली होती."[४३] याच्या प्रभावामुळे याही परिसरात शेकडो मंदिरे व धार्मिक वास्तु या निर्माण झाल्या. पण काळाच्या ओघात मात्र या वास्तु आपले म्हणावे तेवढे अस्तित्त्व टिकवून असलेल्या दिसत नाहीत. त्याला असंख्य कारणे जबाबदार असतील कारण एक कारण सांगणे

४२. काळे भगवान (संपा.), मराठवाडा काल आणि आज, पृ.२०
४३. माडगूळकर अंबादास, डेव्हलपमेन्ट ऑफ सोशल थॉट इन महाराष्ट्र, पृ.२२

ही अशक्य बाब आहे. म्हणून इतिहासामध्ये कार्यकारणभावाच्या संकल्पनेनुसार अनेक कारणे आपणाला जोडता येतात. येथील कलावैभव आणि वास्तु या सध्याच्या काळात किंवा समकाळात काही अंशी उपलब्ध असलेल्या दिसून येतात. त्यांचे अवशेष हे ठायी ठायी दिसून येतात. यावरुन आपणाला गतकाळाचा सांस्कृतिक असेल किंवा अन्य प्रकारचा इतिहास असेल तर तो उलगडता येतो.

तर अशा प्रकारे तत्कालीन अवशेषांच्या आधारे आपण धर्मापुरी आणि पानगाव येथील वास्तुंचा कला व स्थापत्यशास्त्रीय अभ्यास हा पुढील प्रमाणे करुयात.

### ३.३.१ धर्मापुरीची नगररचना :

धर्मापुरीची नगररचना ही अत्यंत साधी सरळ आणि गतकाळाच्या इतर रचनेप्रमाणे होती. भगवान काळे म्हणतात, " बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई तालुक्यातील धर्मापुरी हे आज एक खेडेगाव आहे. परंतु इ.स.च्या ११ व्या आणि १२ व्या शतकात हे एक अतिशय समृध्द असे नगर होते."[४४] धर्मापुरी हे गाव सध्याच्या काळात किंवा चालू कालखंडात म्हणावे तेवढे प्रगत वाटत नसले तरी प्राचीन काळचा जर अभ्यास केला तर धर्मापुरी या गावामध्ये फार मोठ्या प्रमाणात वैभव नांदत होते. व त्या काळात एक जागतिक किर्तिचे शहर म्हणून याचा गौरव आपणाला इतिहासाच्या आधारे करता येतो.

धर्मापुरी हे गाव चालुक्य राजा तृतीय सोमेश्वर यांच्या काळात फारच संपन्न होते. याला भूलोकमल्ल या नावानेही ओळखले जात असत. त्याच्या काळातील एका शिलालेखाचे वर्णन करताना ज्येष्ठ संशोधक ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, "अशा या भूलोकमल्लाच्या राज्यात जगप्रसिध्द अशी पुरी 'धर्मपुरी' होती. ती जणू पृथ्वीदेवीच्या ललाटावरील तिलकच होती. या नगरीत अनेक तलाव, वापी इ. असून ती वनराजींनी हिरवीगार दिसत असे. या नगरीतील प्रसाद इतके उंच होते की, त्यांच्या शिखरावर नृत्य करणाऱ्या मयूराचा घात होऊ नये म्हणून सूर्याला आपला रथ जपून चालवावा लागे. अशा अनेक प्रासादानी मंडित असलेल्या नगरीत

४४. काळे भगवान (संपा.) पूर्वोक्त, पृ.६७

गीत, नृत्य इ. कार्यक्रम नेहमी चालत व धर्मापुरी ही इंद्राच्या नगरीशी स्पर्धा करीत असे. अशा या नगरीची नीट व्यवस्था लावुन भूलोकमल्लाने ही नगरी मल्लराजाच्या स्वाधीन केली."[४५]

अशा प्रकारचे वैभव प्रत्यक्ष इंद्रनगरीशी स्पर्धा करणारी चालुक्यकालीन इंद्रनगरी ही धर्मापुरी या नावाने आता ओळखली जाते. या गावाची नगररचना किंवा गृहरचना ही त्या काळाचा विचार करावयाचा झाला तर दगडी घरे आणि त्यांना चुना व पांढऱ्या मातीची मदत असे. कारण तत्कालीन अवेशेषांवरुन जुन्या धर्मापुरीचा अभ्यास करतांना असे दिसते की, चुना, माती आणि दगडाची घरे होती. प्रत्येक घराकडे जाताना लहान-लहान रस्ते असलेले आपणाला दिसून येतात. किल्याच्या सभोवतालच्या भागामध्ये सर्व जुने अवशेष दिसतात. असे जुने व भग्नावशेष गावाप्रमाणे शेतातही सापडतात. डॉ. यु.म. पठाण आपल्या स्मृतिस्थल या लेखात म्हणतात, "मराठवाड्यातल्या धर्मापुरीच्या बांधासाठी हे भग्नावशेष वापरल्याचं पाहून मी थक्क झालो ! (त्या शेताच्या बांधाच्या हद्दी दाखविण्यासाठी वापरलेल्या भग्नावशेषाचां देखील त्यांच्या सातबाराच्या उताऱ्यात उल्लेख होता की नाही याची कल्पना नाही) त्यावेळी ते भग्नावशेष उदासवाण्या नी हताश नजरेत माझ्याकडे पहात होती. पुरातत्व खात्याऐवजी जणू ते माझीच प्रतिक्षा करीत असावेत. त्यांची वास्तपुस्त करण्यासाठी मी त्यांच्याजवळ गेलो. त्यातल्या काही भग्नावशेषांवर चौकटीच्या सरळ रेषा दिसल्या. त्या रेशांच्या आत काही वेडीवाकडी फुटलेली अर्धवट शिल्प दिसली. त्यामुळं माझ्या मनातलं त्यांच्याविषयीचं नी शिवमंदिराविषयीचं कुतूहल नि जिज्ञासा वाढत चालली"[४६]

अशा प्रकारे यु.म. पठाण यांनी धर्मापुरी या ठिकाणी असंख्य अवशेष असल्याचे सांगितले ज्यांचा उपयोग हा किती दुरुपयोग म्हणून केला जातो आहे याच्याकडे पुरातत्व खात्याचे लक्ष वळले पाहिजे एवढेच आपणाला सांगता येते. या ठिकाणी त्या काळात संरक्षणाच्या दृष्टिकोनातून तटबंदी असलेली दिसून येते. ही तटबंदी देखील दगडांची असे.

---

४५. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड-१, पृ.३१-३२.

४६. पठाण यु.म., स्मृतिस्थळ, (लोकसत्ता दैनिक), पृ.८

धर्मापुरी किल्याच्या उत्तर बाजूला हे नगर वसलेले आपणाला पुराव्यांच्या आधारे किंवा प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे अभ्यासता येते. गावांच्या भोवती तलाव, विहिरी, बारव असत आणि पाण्याची मुबलक व्यवस्था यांच्यामुळेच होत असावी असे समजते. या गावामध्ये अनेक प्रकारचे मंदिर स्थापत्यही होते आणि आताही त्याची साक्ष आपणाला पटते. मोठ्या प्रमाणात भरणारा बाजार आणि येथील पेठ ही या नगराची शोभा वाढवत असलेली दिसते. या ठिकाणी सभोवतालच्या प्रदेशात प्रचंड प्रमाणात वनराईचा भाग होता. यामुळे या नगराचे सौंदर्य हे गगनाला भिडणारे दिसते. असे वर्णन तेथील शिलालेखांवरुन अभ्यासावयास मिळते.

### ३.३.२ धर्मापुरीची बाजारपेठ[४७]

धर्मापुरी हे गाव व्यापारी दृष्ट्या एक महत्वपूर्ण असे गाव होते. या गावात फार मोठी बाजारपेठ होती आणि याचा परिणाम असा की, या गावाला आर्थिक संपन्नता हीप्राप्त झालेली आपणाला दिसते. तर या गावामध्ये कोणकोणत्या घटकांचा बाजार हा भरत होता याची यादीच तेथील शिलालेखात दिलेली आहे ती पुढील प्रमाणे -

१. पर्नशाला विभाग - विड्याच्या पानांची दुकाने
२. मण्डपिका - भाजीमंडई व फळबाजार
३. भक्तमंडपिका - तांदूळ किंवा धान्य बाजार
४. पूगलमण्डपि - सुपारी बाजार
५. धृतकेणी - तुपाची विक्री करणारी दुकाने
६. तैलकेणी - तेली बाजार
७. पत्र्यहन्तिमण्डपि - लोहवस्तुंची पेठ
८. आम्बकुंज - आंब्याच्या आढ्यांची पेठ
९. मुद्रापण - नाणेबाजार
१०. अन्नकेणी - इतर धान्याची बाजारपेठ

---

४७. काळे भगवान, पूर्वोक्त, पृ.६८

११. मुरय - घोड्यांचा किंवा जनावरांचा बाजार

वरील माहितीवरुन धर्मापुरी ही या भागातील प्रमुख बाजारपेठ होती या विषयी शंका उरत नाही. या गावाला चालुक्यांच्या काळात एक प्रशासकीय व व्यापारी केंद्र म्हणून महत्व प्राप्त झाले. व्यापाऱ्यांच्या निवासासाठी व्यापारी वखारी व धर्मशाळा होत्या. पी.व्ही. काटे म्हणतात, "चालुक्यांच्या काळात राज्याची मुख्य टांकसाळ धर्मापुरी येथेच होती. म्हणून या नगराच्या सभोवती भक्कम तटबंदी बांधण्यात आली होती. या नगराचे संरक्षण करण्यासाठी मल्लराज या विशेष अधिकाऱ्याची तेथील प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. हे शहर प्रसिध्द व्यापारपेठ होते. त्यामुळे गुजराथ आणि मथुरा येथून आलेले अनेक लोक धर्मापुरी येथे स्थायिक झालेले होते. हे सर्व धर्माचे क्षेत्र होते. त्यामुळेच या गावास 'धर्मपुरी' असे संबोधले जाते."[४८]

अशा या गावाची व्यवस्था मल्हराज नामक व्यक्तीकडे होती. ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, "मल्हराज हा भूलोकमल्लाच्या विशेष कृपा प्रसादास प्राप्त होता. संपत्ती, दानशूर, पराक्रम आणि राजाचा कृपाप्रसाद ह्या बाबतीत उत्कर्ष पावलेला त्यावेळी संपूर्ण पृथ्वीत दुसरा कोणीही नव्हता. त्याची किर्ती ऐकून स्वतः देव येऊन त्यास स्वर्गात घेऊन गेले."[४९] अशा प्रकारे हा मल्लराज नामक व्यक्ती होता. याच्या काळात धर्मापुरी हे शहर फारच वैभवाच्या शिखरावर पोहचलेले आपल्याला या अभ्यासावरुन निदर्शनास येते.

## ३.३.३ धर्मापुरीचे मंदिर स्थापत्य व कला

उत्तर चालुक्य कलेचे इ.स. च्या ११ व्या शतकातील टप्पे नांदेड, लातूर व उस्मानाबाद या दक्षिण मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये दिसून येते. त्यापैकी बीड मधील धर्मापुरी या ठिकाणी अनेक मंदिरे निर्माण करण्यात आलेली आपणाला दिसून येतात. धर्मापुरी या ठिकाणी वेगवेगळ्या मूर्तीशिल्यांची माहिती मिळते. कारण या ठिकाणी अनेक मूर्ती शिल्प ही

---

४८. काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, पृ.७०-७१
४९. देशपांडे ब्रम्हानंद, पूर्वोक्त, पृ.३२

देऊळ स्थापत्यामध्ये विकसीत झालेली आपणाला दिसून येतात. धर्मापुरीचे केदारेश्वर मंदिर, मरळसिध्दाचे मंदिर, तुकाई देवीचे मंदिर गावात जागोजागी ओट्यांवर मूर्तीशिल्प मिळतात. या स्थापत्यावर अनेक प्रकारची शिल्पे कोरलेली आढळतात. कारुण्य, भय, शांतता इत्यादी पाडरसांचे दर्शन हे येथील शिल्पात घडून आलेले हे आपणाला दिसून येते.

तसेच वामन अवताराचे अप्रतिम पॅनल आपणाला येथेच दिसून येतात. भारतात अन्यत्र अशा प्रकारचे दिसत नाही. दाढी असलेला ब्रम्हदेव, स्थानक शिवपार्वती व इतर अनेक शिल्प आजही शिल्पाकृती म्हणून तज्ञाला निश्चित बहुमोल आहेत. उण, वारा, पाऊस, इत्यादी नैसर्गिक आपत्तींशी तोंड देत उपेक्षित अवस्थेत तग धरुन आहेत. भगवान देशमुख म्हणतात, "मराठवाड्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या भारताच्या मूर्तीकलेच्या इतिहासात धर्मापुरीचे महत्वाचे स्थान आहे."[५०] या सर्व शिल्पावशेषावरुन मराठवाड्याच्या कलेचे माहेरघर धर्मापुरी म्हणावयाचा मोह होतो. येथील मंदिरांची रचना ही मुख्य गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, नंदीमंडप अशी आहे आणि येथील मंदिरांच्या भिंतीवर आतून व बाहेरुन अनेक शिल्पमूर्ती या कोरलेल्या दिसतात. प्रत्येक खांबावर कोरीवकाम काहीतरी दिसते. येथील मंदिरे स्थापत्याच्या दृष्टिकोनातून महत्वाची मानली जातात. अशा ढंगाची मंदिरे उस्मानाबाद आणि नांदेड जिल्ह्यातही निर्माण झालेली आपणाला दिसून येतात. या सर्व कलेच्या संपत्तीची जपणूक व्हावी संरक्षण व्हावे ही अपेक्षा. नाही तर काही काळ गेल्यास येथील कलासंस्कृती काळाच्या ओघात नष्ट होईल इतकेच म्हणावेसे वाटते.

### ३.३.४ धर्मापुरी येथील किल्ला स्थापत्य

धर्मापुरी येथील किल्ला हा कदाचित चालुक्यांच्या काळातील भव्य प्रसादाच्या ठिकाणी किंवा जागेवर उभारण्यात आला असावा. असे याच्या बांधकामात उपयोगात आणलेल्या कन्नड शिलालेख व अन्य शिल्प असलेल्या दगडावरुन वाटते. ज्ञानेश्वर पांचाळ म्हणतात, "आज उभा असलेला किल्ला हा उत्तर मध्ययुगीन काळात बांधलेला असून तो

---

५०. देशमुख भगवान, मूर्तीकलेचे माहेरघर- धर्मापुरी, पृ.१३३

चांगल्या स्थितीत आहे."[५१] १० व्या ११ व्या शतकात बांधण्यात आलेल्या या किल्याची दक्षिणोत्तर व पूर्व पश्चिम लांबी-रुंदी अनुक्रमे १४० X ७३ मी. आहे. याचा आकार साधारणतः अष्टकोणी असून एका भागात असलेली विहिर ही प्राचीन काळातील विहीरींच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वपूर्ण वाटते.

एकूण धर्मापुरी या शहराचा चालुक्य काळात जाणीवपूर्वक विकास करण्यात आला होता. येथील किल्यावरुन या ठिकाणी तत्कालीन सत्ताधिश आपले वर्चस्व या नगरावर ठेवतअसे. या किल्यामध्ये मुस्लीमांची पीर म्हणून श्रध्दास्थाने आहेत. किल्याच्या द्वारालाच एक मशिद आहे. अशा प्रकारे धार्मिक अंग देखील आहे. जसे की देवगिरी किल्यामध्ये जनार्धन व स्वामींची समाधी आहे, देवीचे मंदिर आहे तशाच प्रकारे शिवनेरी किल्ल्यात शिवाई देवीचे मंदिर आहे. तसेच भगवान काळे म्हणतात, "किल्लेधारुरमध्ये ग्रामदैवत आंबाचौंडी आर्य समाजाचे प्रवेशद्वार मधले बालाजी मंदिर, प्राचीन जैन मूर्ती जुने बालाजी मंदिर, शिवकालीन राजमुद्रा, गोडी दिंडी (पाण्याचा साठा) सीतेची नहानी, संत उध्द्वचिदघन यांची समाधी, नाथ बाबांची समाधी, धारेश्वर मंदिर सहस्त्रबिंब, प्राचीन शिवपार्वती शिल्प, शिवाचे शिल्प अशा प्रकारची अनेक प्रमाणात आढळून येणारी शिल्प परंपरा या ठिकाणी असलेली आपल्याला अभ्यासावरुन निदर्शनास आल्याशिवाय राहत नाही."[५२] अशा प्रकारे अनेक किल्ले मराठवाड्यात वैशिष्ट्यपूर्ण होते. त्यात राष्ट्रकुट कालीन कंधारचा भूईकोट किल्ला देखील महत्वाचा आहे. किल्यांच्या अभ्यासात धर्मापुरीच्या किल्यावरही अनेक अवशेष अभ्यासास योग्य सापडतात. आताही तेथील किल्ला हा इतिहासाची साक्ष म्हणून उभा आहे. त्या किल्याचे बलदंड बुरुज त्याची विशिष्ट्यपूर्ण तटभिंत. किल्यातील बारव, बुरजांवर चढायला पायऱ्या, भिंतीवर वेगवेगळ्या कलाकृती कोरण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पुष्पकांचे थर, गजथर, काही जंगली प्राण्यांची

---

५१. पांचाळ ज्ञानेश्वर (संपा.), २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, पृ.४९
५२. काळे भगवान, किल्लेधारुर, पृ.६५

चित्रे, ग्रासपट्ट्या आदी चित्रे कोरण्यात आली आहेत. यामुळे येथील किल्ला स्थापत्याला महत्वाचे स्थान देता येते.

### ३.३.५ धर्मापुरीतील महाग्राहार (वेदाध्ययन केंद्र)

आजही ब्राम्हण गल्लीमध्ये असलेले तुकाई देवीचे मंदीर हे चालुक्य राजा जगदेकमल्ल द्वितीय याचा एक प्रशासक 'देमरस' यानें वसवलेले वेदाध्ययन केंद्र असावे असे वाटते. याची सर्व सामान्यपणे मंदिर रचनाच आढळते त्यापेक्षा या वास्तुची रचना वेगळ्या प्रकारची आहे. प्रा. पांचाळ ज्ञानेश्वर म्हणतात, "याची स्थापत्यशास्त्रीय वैशिष्ट्ये व याच ठिकाणी असलेल्या देवनागरी लिपीतील एक संस्कृत शिलालेख यावरुनही वरील अनुमानास पुष्टी मिळते"[५३] या मंदिराची रचना एक छोटे गर्भगृह व त्यापुढे प्रशस्त सभागृह व मुखमंडप (पोर्च) अशी आहे.

प्रमुख देवतेचा गाभारा (२.१५ x २.१५ मी.) लहान आहे. यात एका चौथऱ्यावर (२.१५ x ०.५० मी.) आज तुकाई देवी मंदिर म्हणून संबोधल्या जाणारी महिषासूरमर्दिनीची मूर्ती बसविली आहे. मूर्तीपुजेचे पाणी जाण्यासाठी या अधिष्ठानास असलेले प्रणाल (पन्हाळी) कलात्मक आहे. गर्भगृहापुढे मोठा चौकोणी मंडप आहे. (८.३५ x १०.४०मी) यात एकूण आठ आडवे व सहा उभे स्तंभ असे अठेचाळीस स्तंभ आहेत. पैकी गर्भगृहासमोरील दोन ओळी ह्या केवळ ०.३२ मीटरच्या अंतराने उभारल्या आहेत. या मुख्य सभागृहासमोरील मुखमंडप (२.२० x १०.१०) आहे. व्हरांड्याच्या डाव्या बाजूला लहान (१.९० x १.८० मी.) गृहे आहेत. समोरचा व्हरांडा ८ पूर्ण व ८ अर्ध अशा एकूण १६ स्तंभावर उभा आहे.

अशा पध्दतीने आपणाला या वास्तूचा अभ्यास हा करता येतो. या वास्तुच्या अभ्यासावरुन या ठिकाणी ज्ञानदानाचे केंद्र असावे याचे पुरावे मिळतात. प्राचीन काळात भारतात विद्या दानासाठी गुरुकूल पध्दती अस्तित्वात होती याचेच एक अपत्य असे आपणाला याकडे पाहून म्हणता येते. यालाच कोणी मठही म्हणतात. जोशी लक्ष्मणशास्त्री म्हणतात, "मठ

---

५३. पांचाळ ज्ञानेश्वर, पूर्वोक्त, पृ.४६

म्हणजे विद्यार्थी (छात्र) निवासस्थान संस्कृत भाषेतील मठ म्हणजे (वास्तव्य करणे) या धातुपासून हे नाम बनले आहे."[५४] त्या काळामध्ये मठाकडे अनेक दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. मठ ही ज्ञान दान करणारी संस्था होती. या सोबतच ती आध्यात्मिक केंद्र, न्याय देणारे ठिकाण, विश्वासाने ठेव ठेवण्याची जागा आणि नितीदर्शक केंद्र म्हणूनही मठाला महत्व प्राप्त झालेले दिसून येते.

मठाविषयी मोरवंचीकर रा.श्री. म्हणतात, "एक शिक्षण केंद्र म्हणूनच मठाची उभारणी या हेतूनेच केली जात असे. आचार्य व विद्यार्थी यांच्या निवास व भोजन, व्याख्यान आदी सोयी या मठामधून उपलब्ध केल्या जात होत्या"[५५] अशा या शिक्षण किंवा विद्या दान केंद्रात आचार्य लोक दूर प्रदेशातून येत असत. अशाच एका धर्मापुरी येथील मठाविषयी वि.भि. कोलते म्हणतात, "बीड जिल्ह्यातील धर्मापुरी येथील लेखात दिलेले दान हे तेथील मठाला दिल्याची नोंद आहे."[५६] या मठाला फार मोठ्या प्रमाणात दान दिल्याच्या नोंदी आहेत. "कल्याणी चालुक्य राजा सोमेश्वर तृतीय यांच्या काळातील मुरारीमठ धर्मापुरी या गावी आहे."[५७]

अशा प्रकारे धर्मापुरी या ठिकाणी मुरारीमठ म्हणून ओळखला जाणारा हा मठ म्हणजे वास्तुचा एक अद्वितीय नमुना आहे. याचा अभ्यास आता लोक किंवा संशोधक हे मंदिर म्हणून करतात. ही वास्तु तेथील ऐतिहासिक वास्तुमध्ये अत्यंत चांगल्या अवस्थेत तग धरुन उभी आलेली आताही दिसून येते.

### ३.३.६ धर्मापुरीतील इतर वास्तु आणि स्थापत्य

धर्मापुरी या खेडेवजा गावात अनेक प्रकारे स्थापत्याचे स्वरुप हे आपणाला पहावयास मिळते. त्यामध्ये किल्यांच्या सभोवतालची तटबंदी व त्याला असलेली पुष्कळशी बुरुजे ही संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची मानली जातात. या तटबंदीचा उपयोग शत्रू

---

५४. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी शब्दकोश, खंड १२, पृ.९०९.
५५. मोरवंचीकर रा.श्री., दक्षिण काशी पैठण, पृ.७४
५६ कोलते वि.भि., महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, पृ.१३४
५७. तत्रैव.

पक्षापासून आपल्या जनतेचा किंवा प्रजेचा बचाव करणे हे अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारची तटबंदी ही गावाच्या संरक्षणासाठी देखील होती. असे म्हटले जाते. आणि ही तटबंदी तत्कालीन राजे लोक बांधत असत.

त्याचप्रमाणे धर्मापुरी या गावामध्ये टांकसाळ देखील असल्याची नोंद आहे. या ठिकाणी प्रचंड प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असल्यामुळे त्या ठिकाणी टाकसाळ असणे साहजिकच आहे. आणि या ठिकाणच्या या टाकसाळीचे संरक्षण होण्यासाठी तटबंदीचा मोठा फायदा झाला. तसेच या ठिकाणी किल्याच्या उत्तराभिमुख एक मुस्लीम मस्जिद आहे ही मस्जिद उत्तर मध्ययुगीन काळातली असावी. ही किल्याच्या फारच नंतर बांधली असावी.

या मस्जितीचे बांधकाम मात्र विटांनी केलेले दिसून येते. तेथील मुस्लिम पंथाचे ते एक श्रध्दास्थान मानले जाते. प्रा. ज्ञानेश्वर पांचाळ हे म्हणतात की, "चालुक्य राजाच्या काळात धर्मापुरी या ठिकाणी सामंत श्रीपतीने मुरारी मठाची स्थापना केली."[५८] अशा पध्दतीने अनेक प्रकारे आपणाला या गावातील ऐतिहासिक वास्तुंचा अभ्यास करता येतो. धर्मापुरी येथील वास्तुंचा व स्थापत्यांचा अभ्यास कलेच्या दृष्टिकोनातून आपणाला वरील प्रमाणे करता येतो.

### ३.३.७ पानगाव येथील कला आणि स्थापत्याचा अभ्यास

पानगाव हे तसे पूर्वी बीड जिल्ह्यात येणारे ठिकाण होते पण अलिकडे हे ऐतिहासिक स्थळ लातूर परिसरात गेले आहे. रेणापूर तालुक्यात याचा समावेश होतो. धर्मापुरी ते रेणापूर मार्गावर हे ठिकाण असून परळी ते लातूर या लोहमार्गानेही या ठिकाणाला जोडलेले दिसून येते. अशा या दळणवळणाने पूर्ण असलेल्या गावात प्राचीन काळात कला आणि स्थापत्याचा जन्म झालेला दिसून येतो. या ठिकाणी अनेक मंदिरे असावीत पण अलिकडे दोन ते तीन मंदिरेच दिसून येतात. त्यामध्ये चांगल्या अवस्थेत असलेले मंदिर म्हणजे पानगावचे भूषण ठरणारे विठ्ठल मंदिरच या ठिकाणी अस्तित्वात दिसते. या ठिकाणी एक विहीर देखील चांगल्या अवस्थेत दिसून येते. हे कलास्थापत्याचे उत्कृष्ट नमुने मानले जातात. यात शंका नाही.

---

५८. पांचाळ ज्ञानेश्वर, पूर्वोक्त, पृ.४५

डॉ. म.श्री. माटे म्हणतात, "प्राचीन साहित्यात भारतीय उपखंडात ५ हजार वर्षापासून जे समाज अस्तित्वात होते त्यांनी काही कला अवशेष निर्माण केले होते. त्याचा वर्ण्यविषय धार्मिक मिश्रणे, कथा, आचार यांच्याशी निगडित आहे."[५९] अशा प्रकारे येथील मंदिरावर १००० वर्षापूर्वी अत्यंत चांगल्या प्रकारच्या शिल्पांची निर्मिती झालेली दिसून येते. हे एक सृजनशीलतेचे नाविन्यच म्हणावे लागेल. आणि कलेला येथील कलाकाराने चांगल्या प्रकारे दाद दिलेली दिसून येते. आणि वास्तुशास्त्राच्याही दृष्टिकोनातून संपन्न असे मंदिर या ठिकाणी अभ्यासकांची प्रतिक्षा करत असलेले दिसून येते. येथील कला आणि स्थापत्य हे खरोखरच एक अद्वितीय कलेचा मिलाफ आहे. कलाकाराने आपल्या अत्युच्य पातळीवरील भावनेचा सुंदर अविष्कार केलेला दिसून येतो. म्हणून या किंवा अशा कला निर्मिती करणाऱ्या कलावंताविषयी आर.जी. कॉलिंगवूड म्हणतात, "अमुक एखादा कलावंत एका विशिष्ट वेळी एखाद्या कलाकृतीची जी निर्मिती करतो किंवा वेगळ्या शब्दात तिचे सर्जन घडवून आणतो ही गोष्ट तो तशी निर्मिती करु शकतो. म्हणून घडत नसून तिची निर्मिती करणे हे अपरिहार्य असते. म्हणूनच होय याऐवजी त्याला ज्या अनेकानेक कृती करता येणे शक्य असते त्यापैकीच ती एक असते असे आपण तिच्याबाबतीत म्हटल्यास आपले ते म्हणणे सत्य असणार नाही कलावंत हा स्वतःच्या जीवनाच्या एका विशिष्ट टप्प्यावर ही निर्मिती करीत असतो."[६०]

यावरुन कलावंत हा ही एखादी कला किंवा कलाकृती निर्माण करावयाची म्हणून निर्माण करत नाही किंवा ही निर्माण करायचीच असाही चंग बांधत नाही तर त्याची एका विशिष्ट टप्प्यावरील ही अवस्था असते. जीवनात तो क्षण म्हणजे मी तर म्हणेल कलाकाराने त्याच्या कलाकृतीतील जन्म दिला की, तो सर्वात जास्त सुखी होईल नव्हे तर तो परमानंदातच बुडेल असा क्षण असतो.

---

५९. माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, पृ.९

६०. कॉलिंगवूड आर.जी., कलेची मूलतत्वे, पृ.३२८

धर्मापुरी येथील विठ्ठल मंदिराला कला व स्थापत्याचा उत्तम नमुना म्हणता येतो. मंदिराचे अधिष्ठान ३ ते ४ फुटावर आहे. तेथपासून आपणाला स्थापत्यास प्रारंभ झालेला दिसून येतो. मंदिराच्या अधिष्ठानावरच चौकोणी पुष्पांचा थर करण्यात आलेला आहे. अधिष्ठानावर प्रदक्षिणापथ दिसतो. अधिष्ठानावर खूर आहे. त्यावर कर्णिका आहे, कर्णिकेच्यावर छोटासा अंतरपट आहे. त्यावर गजथर आहे. गजथरावर स्तंभ आहेत ते स्तंभ छोट्या-छोट्या आकाराचे आहेत. त्या स्तंभामध्ये वेगवेगळ्या शिल्पाकृती कोरल्या आहेत. त्यांच्यावर शिल्पाकृती पुष्पांच्या जाळ्या आहेत. त्या जाळ्या मोठ-मोठ्या स्तंभाना चिकटून आहेत. हे स्तंभ दगडी सभामंडपाला भिडलेले दिसतात. स्तंभावर अनेक सुरसुंदरीच्या मूर्ती आहेत. अशा मूर्ती मंदिराच्या चहूबाजूंनी दिसून येतात. सभामंडपाच्या भागासारखाच गर्भगृहाचा बाह्यभागही शिल्पकला कृतींनी मंडीत झालेला दिसून येतो. त्यावरही बाह्य भागावर सुरसुंदरीच्या मोठ्या प्रमाणात शिल्पाकृती पहावयास मिळतात. या सुरसुंदरीच्या बाबतीत किरण देशमुख म्हणतात, "सारांश रुपाने असे म्हणता येईल की, मानवी जीवनाला व्यापलेल्या षडरिपूंपासून (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर) आणि रुप, गंध, रस, शब्द व स्पर्श यांच्या आसक्ती पासून प्रत्येकाने दूर राहिले पाहिजे. हा संदेश तत्कालीन शिल्पकारांनी सुरसुंदरीच्या माध्यमातून मानवा पर्यंत पोचविण्याचे काम केले आहे."[६१] यावरुन किती अमूल्य व मानवी जीवनाला मार्गदर्शक अशा प्रकारे या तत्कालीन कलाकारांनी संदेश दिलेला दिसून येतो. मंदिराच्या गर्भगृहाच्या बाह्य भागावरही मोठ्या प्रमाणात कोरीवकाम केलेले आहे. त्यातील देवकोष्टांमध्ये अनेक मूर्ती निर्माण केल्या आहेत. ज्यामुळे मंदिराची सुंदरता अधिक वाढली आहे.

पानगाव येथे गावाच्या उत्तर दिशेला विठ्ठल मंदिरापासून जवळच शेतामध्ये पंचकुंड महादेवाचे मंदिर आहे. त्या ठिकाणी छोटा सभामंडप आहे. या मंडपाला आधार म्हणून सात-आठ दगडी स्तंभ दिसून येतात. ते स्तंभ रेखीव किंवा सौंदर्यपूर्ण नसून साधारण अशा आकाराचे दिसून येतात. सभामंडपाच्या पुढचा मंडप म्हणजे गर्भगृह होय. त्यामध्ये शिवलिंग आहे. व

---

६१. देशमुख किरण, सौंदर्य व तत्वज्ञानाचा समन्वय म्हणजे सुरसुंदरी, पृ.६३-६७

देवकोष्टात शिव-पार्वतीचे एक शिल्प अप्रतिम असलेले दिसून येते. पार्वती शिवाच्या वाम मांडीवर बसलेली निदर्शनास येते. बाहेर काही खंडोबाची शिल्प कोरलेली दिसतात. त्या ठिकाणी अनेक शिल्पाकृती पडलेल्या स्वरुपात दिसून येतात. अशाच प्रकारचे दुसरे एक गावाच्या मध्यभागी पन्नगेश्वराचे मंदिर आहे. त्यात विशाल शिवलिंग आहे. विठ्ठल मंदिरांच्या डाव्या बाजूला एक अप्रतिम बारव आहे. त्यात अद्यापही पाणी आहे हा बारव ही त्याच काळातील असावा बारवासंबंधी अरुणचंद्र पाठक म्हणतात, "एका विशिष्ट काळात मंदिरांची उभारणी आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणात झाली. सर्व साधारणपणे ही मंदिरे हेमाडपंथी म्हणून अशी ओळखली जातात. त्याच कालावधीत बारव स्थापत्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत गेली."[६२] अशा प्रकारे धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी कला आणि स्थापत्याचा असा अद्वितीय अविष्कार निर्माण झाला आणि तत्कालीन कलावंताचे भव्य-दिव्य अशा कलाकृतींचे स्वप्न साकार झाले असेच आपणाला यथार्थपणे म्हणता येईल.

## ३.४ शिल्पकला आणि स्थापत्य यांचा घनिष्ठ संबंध

भारतीय कला आणि स्थापत्याच्या परंपरेत शिल्पकला आणि स्थापत्यकला यांचा संबंध तसा जुनाच आहे. शिल्पकला ही मूर्तीच्या स्वरुपात आणि एखाद्या वास्तुवर निर्माण केली तर तिचे महत्व हे वाढते. अर्थातच ते शोभून दिसते. उदा. अनेक मंदिरांच्या जंगाभागावर ही शिल्प मोठ्या प्रमाणात कोरली गेलेली दिसून येतात. अशाच प्रकारचे मंदिर स्थापत्य हे धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी असलेले आपल्याला निदर्शनास येतात. मग अशा मंदिरांच्या सुरुवातीपासून अभ्यास केल्यास आपल्या लक्षात येते.

भारतात सर्वप्रथम गुहामंदिरे (Rock temple) निर्माण केली गेली. सर्वप्रथम बौध्द त्यानंतर जैन आणि शेवटी हिंदू गुहा मंदिरे निर्माण केली. गुहा मंदिराप्रमाणेच वास्तु मंदिरांचीही निर्मिती करण्यात आली. गावागावात वास्तु मंदिरे बांधण्यात आली. मंदिर बांधकामासाठी दगड, माती आणि चुना-विटांचा उपयोग करण्यात आला. मंदिर स्थापत्याची ही

---

६२. पाठक अरुणचंद्र, बारव स्थापत्य एक आढावा, पृ.४०१-४६०

परंपरा प्राचीन आहे. ऋग्वेदात यक्ष सदनचा उल्लेख आहे. (यक्षवास्तु) याचा अर्थ असा की, यक्षाला देवता मानले जात होते आणि त्यासाठी विशिष्ट प्रकारची वास्तु बांधली जात होती. "इ.स.पू. पहिल्या शतकापासून देवतायनाचे उल्लेख शिलालेखांतून आढळतात, असे मत डॉ. देव प्रभाकर यांनी व्यक्त केले आहे."[६३] बांधीव म्हणजेच वास्तुमंदिराचा सर्वप्रथम पुरावा आपल्याला राजस्थानमधील जयपूर जिल्ह्यातील भरहूत येथे मिळाला येथील उत्खननात मौर्य काळातील इ.स.पू. तिसऱ्या शतकातील मंदिर स्थापत्याचे पुरातत्वीय अवशेष प्राप्त झाले.

कृष्णा देवा म्हणतात, "या मंदिराचा आस ८.२३ मीटर असून या मंदिराचे बांधकाम विटांनी केले आहे. पूर्वाभिमुख असलेल्या मंदिरात २६ लाकडी स्तंभ होते."[६४] अशा प्रकारे मंदिरांचे अवशेष अनेक ठिकाणी मिळालेले दिसतात. मौर्य काळातील मंदिर स्थापत्याचे अवशेष मध्यप्रदेशातील सांची येथील उत्खननातही मिळाले आहेत. "येथील मंदिराच्या काटकोणी चौकोन २१ मी लांब व १३.५ मी. रुंद आहे. मंदिराचा मंडप ४१.७५ मी. लांब व २७.७५ मी. रुंद आहे. मंडपात १० स्तंभाच्या पाच ओळी आहेत."[६५] याच ठिकाणी इ.स.पू. दुसऱ्या शतकातील १८ क्रमांकाचे मंदिर आहे. ही दोन्ही मंदिरे पाषाणात बांधलेली होती. पृथ्वी कुमार म्हणतात, "पुढे गुप्त कालखंडात मंदिर स्थापत्याचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. या काळात विविध ठिकाणी मंदिरे उभारण्यात आली."[६६]

सातवाहन घराणे महाराष्ट्रातील प्राचीन घराणे पण या काळातील मंदिरांचे अवशेष प्राप्त होत नाहीत. पण उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर या ठिकाणी त्रिवीक्रमाचे देवालय व त्याचे अवशेष प्राप्त झाले. हे मंदिर प्राचीन ठरवण्यात आले. याच्या नंतरच्या कालखंडात मोठ्या प्रमाणात विशेषतः चालुक्यांच्या काळात मंदिर स्थापत्याला मोठा आश्रय व प्रेरणा देण्यात आली.

---

६३. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, पृ.११४
६४. Deva Krishna, Temples of North India, p.५
६५. Ibid.
६६. Pruthvi Kumar, Gupta Temple Architecture, p. १२.

कठारे, साखरे म्हणतात, "महाराष्ट्रात प्राचीन कालखंडात दोन प्रकारची मंदिरे बांधण्यात आली. गर्भगृह, अंतराळ, सभामंडप व मुखमंडप आणि क्वचित प्रसंगी सभामंडपाला जोडून दोन अर्धमंडप हा मंदिराचा किंवा मंदिर स्थापत्याचा पहिला प्रकार होय. या प्रकारातील मंदिराच्या बाह्य भिंतीवर अप्रतिम मूर्तीशिल्पाअविष्कार आढळतो. बाह्य भिंतीना क्षिप्त आणि उत्क्षिप्त असे आकार दिल्यामुळे बाह्याकार तारकाकृती बनत जातो. अशी मंदिरे उंच व्यासपीठावर अर्थात जोत्यावर बांधली जातात. सभामंडपाला शक्यतो भिंती नसतात. भिंतीऐवजी सभामंडप व मुखमंडपाच्या बाजूवर कक्षासन ठेवलेली असतात. अंतराळातील शुकनासावर सभामंडपाच्या गजपृष्ठावर ही सुंदर कोरीवकाम केलेले असते. बाह्य भिंतीवरील देवकोष्ठात अप्रतिम मूर्ती असतात. अशा प्रकारची मंदिरे अंबरनाथ, देवठाण, बलसाने, वाघली, सिन्नर, लोणार, धर्मापुरी, होट्टल, पानगाव, केसापुरी व उमरगा येथे आढळतात."[६७]

ह्यामध्ये वरील मंदिरावर मोठ्या प्रमाणात शिल्प कला ही कोरण्यात आलेली आहे. मंदिरांच्या वेगवेगळ्या भागावर अप्रतिम अशी शिल्पे कोरलेली आढळतात बहुतांशी शिल्पाकृती या मंदिराच्या बाह्यभागापैकी जंगा भागावरच आढळतात. त्या ठिकाणी शिल्पकलेचा थरच पहावयास मिळतो. याला धर्मापुरी व पानगाव येथील मंदिरे देखील अपवाद नसलेली आपणाला सांगता येतात. येथील मंदिरांच्या कलावंतानीही अशा प्रकारची प्रथा आपल्या येथे कायम ठेवलेली दिसून येते.

वरील एक प्रकार जसा मंदिरांच्या बाबतीत रुढ आहे तसाच आणखी एक प्रकार मंदिरांचा रुढ आहे. त्यामध्ये कठारे, साखरे म्हणतात, "दुसऱ्या प्रकारातील मंदिर स्थापत्याचे विधान त्रिदल पध्दतीचे आहे. सभागृहाच्या तिन्ही बाजूस तीन गर्भगृहे व समोर मुखमंडप अशी योजना या त्रिदल पद्धतीत आढळते. या मंदिर स्थापत्याच्या प्रकारात एका ऐवजी तीन गर्भगृहे असल्याने शिल्पकाराला आपला कलाविष्कार सादर करण्यास अधिक वाव मिळतो. त्यामुळे मंदिरांच्या बाह्य भिंतीवर प्रत्येक क्षिप्त व उक्षिप्त दगड कोरुन त्यावर सुंदर मूर्तीशिल्प कोरण्यात

---

६७. कठारे, साखरे, मंदिर आणि मूर्तीशिल्प, पृ.१२-१३

आले. यामध्ये नृत्यांगना, अप्सरा, स्त्रीप्रतिमा, नटराज, अंधकासूरवध, गणेश विष्णू आणि नृसिंहाच्या मूर्ती उल्लेखणीय ठरतात. त्रिदल पध्दतीची मंदिरे नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यात होट्टल आणि कंधार तालुक्यातील कापसी (बु.) येथे आढळतात. होट्टल येथील सोमेश्वर मंदिर हे त्रिदल पध्दतीचे आहे."[६८]

अशा त्रिदल मंदिराच्या प्रकारामध्ये गर्भगृहाची संख्या एकच नसून त्यांची संख्या तीन एवढी आहे. सभामंडप हा मध्यभागी असून त्याच्या भोवती तीन बाजूंनी तीन गर्भगृह असतात. व एकच समोर मुखमंडप आढळून येतो. असा अनेक गर्भगृहात वेगवेगळ्या मूर्तीही असूशकतात. आणि अनेक गर्भगृहांवर मोठ्या प्रमाणात कोरीव कामही केलेले दिसून येते. कारण एकच जर गर्भगृह असेल तर त्यावरकिती जास्तीत जास्त कोरीव काम करण्याचा प्रयत्न हा कलावंतकरीत असतो. पण त्रिदल पध्दतीच्या मंदिरात अनेक गर्भगृह असल्याने कलावंताच्या संवेदनेला किंवा भावनांना कलेच्या माध्यमातून चांगला वाव हा मिळत असतो. अशा प्रकारचे मंदिरे अनेक ठिकाणी दिसून येतात. त्यामध्ये अरुणचंद्र पाठक महाराष्ट्र गॅझेटिअरमध्ये सांगतात की, "लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्याच्या ठिकाणी येथील निळकंठेश्वर मंदिर त्रिदल पध्दतीचे असून मुखमंडप, मंडप आणि मंडपाला जोडलेली तीन गर्भगृहे असा त्याचा तलविण्यास आहे. मुख्य गर्भगृहात शिवलिंग असून तीन गर्भगृहांच्या तीन भद्रांवर शैव आणि वैष्णव देवदेवतांच्या मूर्ती आहेत."[६९] अशा प्रकारे अनेक ठिकाणामध्ये निलंग्याचा उल्लेख करावा लागतो येथील त्रिदल पध्दतीचे हे मंदिर अप्रतिम आहे.

अशा त्रिदल पध्दतीच्या मंदिरात वेगवेगळ्या पंथाच्या मूर्ती स्थापत्याने अनेक पंथांचा संगम हा याच्यामुळे होत होता. त्यामुळे आपआपसात सहिष्णूतेची भावना नांदत होती. धर्मापुरी आणि पानगाव येथील मंदिरे मात्र त्रिदल पध्दतीत मोडत नसून ते पहिल्या प्रकारात मोडतात. त्यामध्ये गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, मुखमंडप व क्वचीत प्रसंगी दोन बाजूंना

---

६८. तत्रैव, पृ.१३

६९. पाठक अरुणचंद्र, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ, खंड १ भाग २, स्थापत्य व कला, पृ.१९५.

अर्धमंडप अशा प्रकारे असणाऱ्या मंदिरात यांचा समावेश होतो. त्याचे उत्कृष्ट उदाहरण धर्मापुरीचे केदारेश्वर मंदिर आणि पानगावचे विठ्ठल मंदिर आहे. काही अंशी यामध्ये धर्मापुरीचे मल्लीकार्जून मंदिर आणि तुकाई देवीचे मंदिर त्यात सामावले जाते.

शिल्पकला आणि स्थापत्यकला यांचा घनिष्ट संबंध असलेले अनेक वास्तु प्रकार आपणाला अभ्यासावयास मिळतात. वि.भि. कोलते म्हणतात, "मराठवाडा विभागाच्या बीड जिल्ह्यात पाटोदा हे तालुक्याचे ठिकाण असून त्याला ऐतिहासिक वारसा प्राप्त आहे. पाटोदा हे इ.स. १२/१३ व्या शतकात अस्तित्वात होते. याचा पुरावा लिळाचरित्रात मिळतो. चक्रधर स्वामींचे वास्तव्य काही काळ पाटोद्यात होते."[७०] बीड जिल्ह्यात असे अनेक क्षेत्रे ऐतिहासिक आहेत. त्यामध्ये किंवा तेथे अनेक वास्तुप्रकार पहावयास मिळतात ज्या ठिकाणी वास्तु पूर्णतः नसेल अशा ठिकाणी अवशेष का होईना सापडतात. हे मात्र सत्य आहे.

ब्रम्हानंद देशपांडे आपल्या शोधमुद्रात म्हणतात, "पाटोदा व आष्टी सीमेवर मानूर नावाचे गाव आहे. येथे शके ११७० मधील यादव राजा कृष्णदेवाचा शिलालेख मिळाला आहे. यादवांच्या काळातील अवशेष येथे सापडतात. या शिलालेखात मंदिर बांधल्याचा पुरावा आहे. त्यामुळे या स्थळाचे यादव कालीनत्व सिध्द होण्यास आधार मिळतो."[७१] अशा प्रकारे अनेक पुरावे मिळाले आहेत की लातूर आणि बीड जिल्ह्यात कला स्थापत्याचे भांडार असणारे अनेक ठिकाणे ही नामशेष झाली आहेत. आता फक्त अशा ठिकाणी त्यांची मुळाक्षरे म्हणून पुरावे मात्र नश्चितच सापडतात. बीड आणि लातूर जिल्ह्यातील बहुतांशी मंदिरे ही शिल्पकला आणि स्थापत्यकलेचा संबंध दर्शवितात. त्यांचा संबंध एवढा घनिष्ठ झालेला आहे की, शिल्पकलेशिवाय मंदिरे, लेण्या, काही किल्ले किंवा स्मारके ही होऊच शकत नाहीत आणि वास्तुकलेशिवाय शिल्पकला ही उठून दिसत नाही. एखादे शिल्प हे तेव्हाच चांगले दिसते की,

---

७०. कोलते वि.भि., लिळाचरित्र, लीळा क्र.पु. ३२४, पृ.१९९

७१. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा भाग -१ , पृ.१०७

ज्यावेळी त्याला एखाद्या स्थापत्यामध्ये किंवा वास्तुत शिल्पबध्द केलेले असते. शिल्पकलेची दालने असलेली बरीच ठिकाणे ही या जिल्ह्यांत दिसून येतात.

भगवान देशमुख म्हणतात, "अंबाजोगाई शहरात खडकपुरा भागात काळामारोती मंदिर आहे. या मंदिराच्या उजव्या बाजूला उत्तरेकडील भिंतीला स्थावर सरस्वतीची विणाधारी मूर्ती आहे. देवीच्या पायाजवळ खाली मोर कोरलेला आहे. ज्ञानाची आणि विद्यार्जनाची देवता सरस्वती होय. येथील सरस्वती चतुर्भूज असून तिच्या हातामध्ये अक्षमाळ, कमळ, पुस्तक, विणा, कमंडलू इ. वस्तु आढळतात."[७२] या ठिकाणाचा अभ्यास केल्यानंतर मंदिराच्या उजव्या बाजूला अर्थात उत्तरेकडील जी भिंत आहे ती भिंत म्हणजे एक स्थापत्यकलेचाच एक भाग आहे. आणि तो भाग अविभाज्य आहे. भिंतीशिवाय मंदिरे असू किंवा इतर वास्तु या चांगल्या प्रकारे उभा राहू शकत नाहीत. मग अशा या भिंतीवर ही सरस्वतीची मूर्ती कोरल्यामुळे कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून याचा अभ्यास हा करत असतात.

ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, "सरस्वतीचा खालचा उजवा हात अभयमुद्रेत आहे. वरच्या उजव्या हातात पुस्तक आहे. वरच्या डाव्या हातात वीणा धारण केलेला आहे. खालचा डावा हात वरमुद्रेत असून मूर्ती अलंकृत आहे."[७३] यावरुन आपणाला मूर्तीच्या माध्यमातून कलाकार आपल्या पर्यंत ज्ञान पोहचवण्याचे योग्य कार्य करत असतो. मूर्ती कशी का असेना पण ती किती बोधप्रद ठरते किंवा संदेश कसा देते हे महत्वाचे आहे. अभयमुद्रेतून ती मूर्ती दर्शन घेणाराला अभय देते, पुस्तक हे एक ज्ञानाचे प्रतिक आहे, विणा हे एक नादाचे किंवा संगीत कलेचे प्रतिक आहे. यावरुन आपणाला विणा किंवा संगीतकला व विद्यानिष्णात होण्यासाठी सरस्वतीची आराधना करावी लागते. असा याचा अर्थबोध हा पाहणाराने घेतला पाहिजे. अशाच प्रकारची विणावादक स्त्री प्रतिमा ही पानगावच्या विठ्ठल मंदिरावर असलेली निदर्शनास येते.

---

७२. Deshmukh Bhagwan, Iconography of Hindu Temples in Maharashtra, p.१४७.

७३. देशपांडे ब्रम्हानंद, पूर्वोक्त, पृ.१०५-१०७

जशा प्रकारे एखादा शिक्षक हा आपल्या ज्ञानाचे संप्रेषण किंवा ज्ञानाचे संदेशवहन करण्यासाठी बोर्ड किंवा फळ्याचा वापर करत असतो. तशाच प्रकारे कलावंत हा देखील आपल्या ज्ञानाचा किंवा आपल्या भावनांना वाट मोकळी करुन देण्यासाठी असंख्य शिल्पांची निर्मिती करतो. पण ते शिल्प हे वास्तुकलेच्या किंवा वास्तुंच्या भिंतीचा उपयोग हा फळ्यासारखा करुन आपली शिल्पकला जन्माला घालत असतो आणि ती आपणापर्यंत पोचवण्याचे कार्य ही करत असतो.

तशाच प्रकारे केदारेश्वर मंदिराच्या बाह्य मंडोवरावर अलंकृत झालेले शिल्प व मूर्ती केवळ एका कोणत्याही देवता परंपरेच्या नसून त्या शैव, वैष्णव, शाक्त, सौर संप्रदायाच्या आढळतात. या मूर्ती शिल्पामध्ये ब्रम्हा, विष्णू, शिवाची विविध स्वरुपे दिसतात. येथे मैथून शिल्प सुध्दा मोहक पध्दतीने कोरले असून मुरारीकृष्ण, शालभंजिका, सुरसुंदरी इ. मूर्ती दर्जेदार आहेत. येथील सुरसुंदरी तर अप्रतिम आहेत.

सतारीच्या तारा ओढताना बोटात ओतलेली नजाकत येथील पत्रलेखीकेच्या करंगळीतील कमनीयता मन हेलावून टाकते. प्रमाणबध्द अवयवाची सुडौल यौवनानी रसरसलेली ही स्त्री ज्या शिल्पींनी घडविली त्यांच्या कलाकुसरीची थोरवी वर्णावी तेवढी थोडीच आहे. येथील अवतार शिल्पांचे रुपही मोहक वाटते. त्यात विष्णू प्रतिमा, वामनाची बटूक अवताराची प्रतिमा, नृसिंहाची प्रतिमा अशा प्रतिमा मनाला मोहून टाकतात. येथील मूर्ती म्हणजे धर्मापुरीतील मूर्ती किंचितशा, ठेंगण्या, बसक्या पण भरदार वाटतात. अशा या मोठ्या प्रमाणात मूर्ती मंदिरांच्या वास्तुवर पहायला मिळतात आणि हजार वर्षापासून शिल्पकलेची आणि वास्तु किंवा स्थापत्यकलेची मैत्री किती घनिष्ट आहे यांचा संबंध किती जवळचा आहे याचा आपणाला अभ्यास होतो.

## ३.५ मराठवाड्याच्या इतिहासाला या ऐतिहासिक स्थळांचे सांस्कृतिक योगदान

मराठवाड्याच्या इतिहासाला पानगाव आणि धर्मापुरी या दोन ऐतिहासिक स्थळांनी आपल्या सांस्कृतिक वारस्याचे मोलाचे योगदान दिलेले दिसून येते. पानगाव आणि धर्मापुरी ही

दोन्ही गावे मराठवाड्याच्या इतिहासाला देणगी देणारी ठरली आहेत. ज्या प्रकारे भारतात, महाराष्ट्रात किंवा मराठवाड्यात संस्कृती रुजली त्याच प्रकारे धर्मापुरी आणि पानगाव या ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी रुजली ही संस्कृती मन्याड आणि मासोळी नद्यांच्या काठी रुजली व बालाघाट पर्वतांच्या रांगावर तिचा विकास झाला.

अरुणचंद्र पाठक म्हणतात, "भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनाच्या वाटचालीवर दृष्टिक्षेप टाकला असता भारतीय प्राचीन संस्कृतीचा प्रारंभ सिंधू संस्कृती पासून मानल्या जातो. गंगा नदी ही आपल्या राष्ट्राच्या विकासाची आधारस्तंभ बनली आहे. इजिप्शियन संस्कृती नाईल नदीच्या कुशीमध्ये विकसीत झाली. चिनच्या हो-हँग हो नदीने चिनी संस्कृतीला आश्रय दिला. तर तैग्रीस व युफ्रायटिस या नद्यांच्या सानिध्यात बॅाबीलोनीयांची संस्कृती आकाराला आली. थोडक्यात नद्यांच्या काठीच संस्कृतीचा उदय व विस्तार झाला."[७४]

यावरुन आपणाला असे म्हणता येते की, नदी हा घटक संस्कृती निर्माण होण्यासाठी किती महत्वाचा आहे., धर्मापुरी आणि पानगावच्या उत्तरेकडील भागातच मासोळी आणि मन्याड या नद्या उगम पावतात. या नद्यांचा वास्तविक या दोन्ही गावांच्या परिसराला फायदा होत नसून खाली मात्र शेकडो गावांना फायदा झालेला दिसून येतो. त्यामध्ये लातूर जिल्ह्यातील गावांना नांदेड आणि परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यातील गावांना याचा फायदा होतो. मासोळी नदीवर खोकलेवाडी, माखणी, चिलगरवाडी आणि सिरसम आदी गावांना सिंचनाची सोय झाली पण या गावांच्या ठिकाणीच धरण झाल्यामुळे त्या गावांचे पुनर्वसन झाले. बीड जिल्ह्यातील नद्यांविषयी बोलायचे झाले तर मोरवंचीकर म्हणतात, "गोदावरी ही मुख्य नदी असलेल्या मराठवाड्यातील बीड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान साधारणपणे मध्यवर्ती आहे."[७५] गोदावरी नदीचा फार मोठा फायदा बीड जिल्ह्यातील गावांना होतो. हे तेवढेच सत्य आहे. संस्कृतीचे मुळ जरी आपल्या लक्षात आले असले तरी संस्कृती म्हणजे काय याचाही शोध

---

७४. पाठक अरुणचंद्र, गोदावरी एक पुरातत्वीय अभ्यास, पृ.६

७५. मोरवंचीकर रा.श्री., बीडच्या ऐतिहासिक व्यक्तिमत्वाचे पैलू, पृ.३०

आपण घेतला पाहिजे. पण संबंध भारताच्या संस्कृतीचा रंग हा आगळा-वेगळा दिसून आल्याशिवाय राहत नाही. साधारणतः संस्कृती म्हणजे आपणाला विशिष्ट अशा चाकोरीबद्ध किंवा नितीनियमांत राहून आपले जीवन हे व्यथीत करणे होय.

प्रत्येकांनी प्रत्येक धर्माची संस्कृती ही भिन्न मांडण्याचा प्रयत्न हा आपणाला आजुबाजुला पाहिल्यानंतर झालेला आढळून येतो. मोरवंचीकर म्हणतात, "संस्कृती म्हणजे एखाद्या समाजाने सभोवतालच्या अपरिवर्तनीय अशा परिसराशी साधलेला कालबध्द संवाद होय. या व्याख्येत समाज परिसर आणि काल हे तीन घटक स्पष्ट आहेत. यापैकी कोणत्याही एका घटकात परिवर्तन झाले की, संवादात विकृती निर्माण होते. त्यामधून संस्कृती जतन व संवर्धन होऊशकत नाही. त्या दृष्टिकोनातून भारतीय संस्कृती एक असली तरी तिचे हिंदू, जैन, बौध्द, इस्लाम, शीख, ख्रिश्चन हे महत्वाचे घटक ठरतात. या सर्वांच्या एकजीनशी अविष्कारालाच आपण संस्कृती असे संबोधतो."[७६] यापैकी प्रथमचे तीन घटक हे प्राचीन कालखंडाचे सूचक आहेत. तर इस्लामी आगमनापासून मध्ययुगीन कालखंड ध्वनीत होतो. ख्रिश्चनांचे आगमन हे अर्वाचिन कालाचे प्रतिक मानले जाते. थोडक्यामध्ये सांगावयाचे झाले तर संस्कृतीचे कालाशी आणि समाजाशी अतूट असेच नाते असते.

धर्मापुरी आणि पानगावचा विचार केला तर या ठिकाणी हिंदू संस्कृती, जैन संस्कृती आणि मध्ययुगीन काळामध्ये मुस्लिम संस्कृतीचा प्रभाव या ठिकाणी पडलेला आपणाला प्रकर्षाने दिसून येतो. भारतात हा सांस्कृतिक मतभेद असलेला आपणास दिसून येतो. पण आपणाला याचा आनंद वाटला पाहिजे की, एवढ्या भिन्न संस्कृती भारतात नांदत असूनही अजोड भारत किंवा अखंड भारत हा जगामध्ये आपले मानाचे स्थान योग्य रितीने टिकवून असलेला दिसून येतो.

सांस्कृतिक इतिहासातून धर्मापुरी या ठिकाणी तर प्राचीन काळामध्ये डोकावले तर या ठिकाणी जैन धर्म आणि हिंदू धर्म ह्या दोन धर्माचे लोक शांततेने राहत होते. त्या काळातील

---

७६. मोरवंचीकर रा.श्री., महाराष्ट्रातील जैन धर्म, संस्कृती आणि साहित्य, पृ.४७.

राजे लोकांनी देखील कोणाचा भेदभाव केलेला नसून धर्मसंहिष्णू धोरण अंगिकारलेले आपल्या लक्षात घेता येते. सांस्कृतिक इतिहासात अनेक घटक हे येत असतात त्यामध्ये मुख्यतः धर्म, तत्वज्ञान, साहित्य, संगीत, कला, सन-उत्सव, परंपरा आणि आपल्या आचार पध्दती इ. घटक हे सांस्कृतिक इतिहास प्रबळ बनवण्याचे कार्य हे करत असतात. धर्मापुरी या गावापासून किंवा पानगाव या गावापासून आपणाला मराठवाड्याच्या इतिहासाला कोणत्या प्रकारचे योगदान देता येईल याचा सखोल आढावा हा आपणाला घेणे गरजेचे आहे.

धर्मापुरी या गावामध्ये जैन आणि हिंदू धर्माचे प्राबल्य दिसून येते. यांनी आपापल्या पध्दतीने जरी या ठिकाणी राहण्याचा प्रयत्न हा केला असला तरी त्यांच्यातील सांस्कृतिक ऐक्य हे महत्वाचे मानले जाते. र.रा. बोरकर म्हणतात, "भारतात आज जे धर्म प्रचलित आहेत त्यात जैन धर्मास बरेच महत्वाचे स्थान आहे. बौध्द धर्माप्रमाणेच तो प्राचीन असून आजपर्यंत टिकून राहिला आहे. आरंभीच्या काळी या धर्मात मूर्तीपुजेला स्थान नव्हते. पण पुढे वैदिक आणि बौध्द धर्माप्रमाणेच याही धर्मात मूर्तीपुजेचा शिरकाव होऊन आज अनेक महत्वाच्या स्थलांचा शोध लागला आहे. एवढेच नव्हे तर या धर्मातील दिगांबर व स्वेतांबर अशा दोन पंथात ते विभाजीत झाले आहे. वैदिक किंवा बौध्द धर्मातील मूर्तीमध्ये जितके वैविध्य आहे तितके मात्र खात्रीने यात नाही. या धर्मातील मुख्य मूर्ती म्हणजे चोविस तीर्थंकर यांच्या २४ यक्ष, २४ यक्षी, १६ विद्या, देवता आणि बाहुबली व भरत फक्त दिगंबर पंथातच आहेत. परंतु त्यांची शिल्प फारच दुर्मिळ आहेत. अशाच काही धर्मापुरी येथे मिळालेल्या शिल्पाचे वर्णन करता येते."[७७]

वरील आशयावरुन आपल्या लक्षात येते की, जैन धर्मात पूर्वी मूर्ती पुजा असली तरी येथील प्राचीन संस्कृतीचा त्यावर प्रभाव पडलेला दिसून येतो. येथील संस्कृतींनी आपल्या सांस्कृतिक मूल्यांची देवाण-घेवाण किंवा आदान-प्रदान केलेली दिसून येते. धर्मापुरी या ठिकाणी दोन भिन्न धर्माचे लोक एकत्र निर्भयपणे नांदले व नांदतात ही एक महत्वाची बाब आहे. धर्मापुरी या गावात जे काही शिलालेख सापडले त्यावरुन आपणाला चालुक्य राजांच्या

---

७७. बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, पृ.१९०-१९१

काळातील सांस्कृतिक इतिहास अभ्यासण्यासाठी मोलाची मदत होते. व एका काळी कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या परिसरात आपले वर्चस्व प्राप्त करणाऱ्या घराण्याच्या सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश पडतो. धर्मापुरी आणि पानगाव परसिरात ज्या प्रकारे वैष्णव संप्रदाय होता त्याच प्रमाणे या भागात शैव व नाथ संप्रदायाचे लोकही नांदत होते. अर्थातच शांततेत राहत होते. हे तेथील शिल्पावरुन समजते. मल्लीकार्जून मंदिराचा जर अभ्यास केला तर आपणाला असे लक्षात घेता येते. त्या मंदिरात असलेल्या नाथ पंथीयांच्या किंवा संतांच्या समाध्या आणि त्यावर असलेले शिवपार्वतीचे शिल्प, गणपतीचे शिल्प किंवा गर्भगृहात असलेले शिवलिंग अशा अनेक घटकांवरुन किंवा केदारेश्वर मंदिरावर असलेल्या वैष्णव पंथाचा प्रभाव या घटकांवरुन धर्मापुरी या ठिकाणी प्राचीन व मध्ययुगाच्या प्रारंभीच्या काळात नाथ, शैव, वैष्णव इ. संप्रदाय हे नांदत असलेले आपणाला लक्षात येते. याबरोबर या ठिकाणी सौर, गाणपत्य आणि शक्ती संप्रदायही रुजलेले दिसतात.

परंतु शैव पंथाचाच प्रभाव मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात झाला होता. याविषयी बसवराज कोरे म्हणतात, "मराठवाडा, महाराष्ट्रच काय तर संपूर्ण आशिया खंडात शिवमंदिरे मोठ्या प्रमाणात आहेत. मठ-मंदिरे हे शैवांचे मुख्य प्रसार माध्यम आहे. बारा ज्योतिर्लिंगापैकी, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ आणि वेरुळचे घृष्णेश्वर ही शिवमंदिरे मराठवाड्यात आहेत. राष्ट्रकुट, वाकाटक, यादव, चालुक्य ही राजघराणी शिवपुजक होती. यांच्या आश्रयाने अनेक हेमाडपंथी मंदिरे आणि गोपूरे मराठवाड्यात बांधली गेली. अंभई, येडेश्वर, वटेश्वर, वडगाव सिध्देश्वर, लातूर रामेश्वर, येडशी, रामलिंग, निळकंठेश्वर, पंचमुख महादेव, कंकालेश्वर, जालना, पंचमुखी महादेव, ढवळेश्वर, अमृतेश्वर, नागरतास, सावरगाव, नागपूर, गोळेगाव, भोकरदन, साष्टपिंपळगाव, पाथरवाला नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात सर्वाधिक शिवमंदिरे आहेत."[७८] यावरुन शैव संप्रदाय हा प्रबळ संप्रदाय दिसून येतो. यामध्ये धर्मापुरी व पानगाव परिसरातही अनेक ठिकाणी शिवलिंग मिळतात. नागनाथ कोतापल्ले सिल्लोड येथे एका

---

७८. कोरे बसवराज, दक्षिण गंगेच्या तिरावरील वीरशैव परंपरा : एक चिंतन, पृ.१५

उद्‌घाटनपर भाषणात म्हणतात, "धर्मापुरी या ठिकाणी स्थापत्याचा अद्वितीय नमुना आहे आणि येथील प्राचीनत्वाचे संशोधन झाले पाहिजे."[७९] यावरुन येथेही मंदिरे, शिल्प व मूर्ती मोठ्या प्रमाणात दिसून येतात. धर्मापुरी येथील मंदिरावरील असलेली स्तंभावरील चित्रकला ही पण सांस्कृतिक दर्शनच घडवत असलेली आपल्या लक्षात येते. त्या ठिकाणी असलेली वेगवेगळी मंदिरे उत्तर मध्ययुगीन काळातील किल्ला, बारव, स्थापत्य आणि वेगवेगळ्या प्रकारच्या वास्तु यावरुन तेथील कला व वास्तुकलेवर प्रकाश टाकण्यास मोलाची मदतच होते. केदारेश्वर मंदिरावरील शिल्पकलेविषयी डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "धर्मापुरीचे केदारेश्वर मंदिर हे कलेचा एक अद्वितीय नमुनाच आहे."[८०]

यावरुन आपल्या लक्षात येते की, या ठिकाणची कला ही किती आश्चर्यकारक असावी अनेकांनी आपआपल्या पध्दतीने येथील शिल्प व स्थापत्य कलेचे वर्णन केलेले आपल्या लक्षात येते. धर्मापुरी या गावाचा आता जरी अभ्यास केला तरी तेथे अनेक धर्माचे लोक निवास करत असलेले दिसून येतात. आणि आपापली सांस्कृतिक प्रतिके टिकवून असलेली आपल्या लक्षात येतात.

पानगाव व धर्मापुरी या ठिकाणी प्राचीन काळातील रुढी आणि परंपरा जरी आता पूर्णतः अंगिकारल्या जात नसल्या तरीही काही अंशी त्या प्रचलित असलेल्या दिसून येतात. अशा प्रकारे धर्मापुरी आणि पानगाव या गावांचा सांस्कृतिक वारसा हा महत्वपूर्ण मानला जातो. आणि हा घटक संशोधनाच्या दृष्टिकोनातून अप्रकाशित राहिल्या कारणामुळे त्याला प्रकाश झोतात आणण्यासाठी आणि ही दोन्हीही ऐतिहासिक व सांस्कृतिक ठिकाणे मराठवाड्यातील इतिहासात महत्वाचा वाटा उचलतील नव्हे तर ती दोन्ही ठिकाणे मराठवाड्याच्या सांस्कृतिक इतिहासाला फार मोठे योगदान देतील हे निश्चित असल्यानेच आपण हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

---

७९. कोतापल्ले नागनाथ, मराठवाडा इतिहास परिषदेचे २९ वे राज्यस्तरीय अधिवेशन, सिल्लोड येथील भाषण.
८०. देव प्रभाकर, मराठवाडा इतिहास परिषदेचे २९ वे राज्यस्तरीय अधिवेशन, सिल्लोड येथील भाषण.

**संदर्भ :**


1. Sankliya, The Godavari Poliothic Industry Deccan College Research Bulleting, 1982, Pune.

२. धारुरकर वि.ल, गोदाकाठच्या ताम्रपाषाणायुगीन संस्कृती, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक-दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, २००६, पृ.२२

३. तत्रैव, पृ.१९

४. मगर जयकुमार, गोदा खोरे प्राकृतिक पर्यावरण, (संपा. देव प्रभाकर) गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक-दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, २००६, पृ.१३

५. धारुरकर वि.ल., पूर्वोक्त, पृ.१९

६. तत्रैव, पृ.२२

७. तत्रैव, पृ.२३

८. भांडवलकर, हनवते, मराठवाड्याचा इतिहास, अभिजित प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, जून १९९९, पृ.१८०.

९. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, १९८८, पृ.१०८-१०९.

१०. बोराडे, मा.शा., भाजे व कार्ले लेणी (महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन), भारतीय पुरातत्व विभाग, निर्मिती व वितरण, ग्रेस प्रिंटर्स, पुणे-३०, पृ.३

११. तत्रैव, पृ.१३

१२. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११४

१३. गोखले शोभना, प्राचीन धनसंपदा, (संपा. देव प्रभाकर) गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक-दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, २००६, पृ.५४

१४. कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, शिवाजी नगर, नांदेड, १९९९, पृ.७

१५. पठाण यु.म., मराठवाडी माणसं पुस्तकातील लेख, मराठवाड्याचा मिटलेला इतिहास, (संपा. दर्डा राजेंद्र), लोकमत, औरंगाबाद, पृ.४

१६. Morwanchikar R.S., The City of the Saints Paithan Through the Ages, Ajanta Publication, Delhi, 1985, p.22

१७. जोगळेकर स.आ. (संपा.), हाल सातवाहनाची गाथासंप्तशती, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५६, पृ.२५६

१८. Brown Percy, Indian Artchitecture (Budhist and Hindu), D.B. Taraporerala & Son, Bombay, 1971, p.127

१९. देव शां.भा., तेर, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.८

२०. बेल्हेकर अभिजित, सातवाहनांचे तेर (संपा. केतकर कुमार), लोकरंग पुरवणी, लोकसत्ता, १३ सप्टें. २००९, पृ.३

२१. तत्रैव.

२२. दीक्षित सुबोध, उगम वास्तुशास्त्राचा, दैनिक सकाळ मधील लेख, गुरुवार पुरवणी, ६ ऑगस्ट २००९, पृ.४

२३. भांडवलकर, हनवते, मराठवाड्याचा इतिहास, अभिजित प्रकाशन, लातूर, १९९९, पृ.१७९

२४. Sharan R. Ancient Indian History Culture and Archeology, Radha Publications, Delhi, 2002, p.428.

२५. James Ferguson and James Burgess, The Cave Temples of India, London, 1980, p.58

२६. Bakshi S. R, Advaced History of Ancient India, Vol.II, Anmol Publications, Delhi, 1995, pp.2-28.

२७. Percy Brown, Op.cit., pp.10-11

२८. James Ferguson and James Burgess, Op.cit., p.53

२९. James Burgess, Report on the Buddist Cave Temples and Their Incriptions, Archeaological Survey of Western India, Vol.IV, London, 1883, p.36.

३०. Ibid, p.37

३१. Tripathi R.S., History of Ancient India, Motilal Banarsidas, Delhi, 1967, pp.140-159.

३२. Morwanchikar, R.S., Op.cit., p.47

३३. जोशी रा.वि., मराठवाड्यातील आश्मयुगीन संस्कृती, मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक, शिरुर ताजबंद, १९७६, पृ.३

३४. कठारे अनिल, मराठवाड्यातील लेणी, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रस्तावना, नोव्हें. २००१, पृ.५

३५. देगलूरकर गो.बं., गोदा खोऱ्यातील लेणी, (संपा. देव प्रभाकर) गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक-दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, २००६, पृ.३४

३६. जैन यशपाल, जयपूर-एलोरा येथील ऐतिहासिक लेण्या, (संपा. श्रेणिक अन्नदाते), जैन ऐतिहासिक, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, २६ जाने. २००३, पृ.१४

३७. जामखेडकर अ.प्र., जैन पुरातत्व, (संपा. देव प्रभाकर) गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक-दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, २००६, पृ.६२

३८. तत्रैव, पृ.६७

३९. तत्रैव, पृ.६८

४०. बेल्हेकर अभिजित, पूर्वोक्त, पृ.३

४१. सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास (इ.स.पू. २३०-१३८१) के.एस. अतकरे कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, जून १९९७, पृ.१९६

४२. काळे भगवान (संपा.), मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, १९८६, पृ.२०

४३. माडगूळकर अंबादास, डेव्हलपमेन्ट ऑफ सोशल थॉट इन महाराष्ट्र, प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, १९७२, पृ.२२

४४. काळे भगवान (संपा.) पूर्वोक्त, पृ.६७

४५. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड-१, अलकनंदा प्रकाशन, उस्मानपुरा, औरंगाबाद, फेब्रु. १९७६, पृ.३१-३२.

४६. पठाण यु.म., स्मृतिस्थळ, (लोकसत्ता दैनिक), (संपा. केतकर कुमार), रविवार ८ मार्च २००९, पृ.८

४७. काळे भगवान (संपा.), पूर्वोक्त, पृ.६८

४८. काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, के.एस. अतकरे कैलास पब्लिकेशन्स, गोकुळवाडी, औरंगपुरा, औरंगाबाद, १९९९, पृ.७०-७१

४९. देशपांडे ब्रम्हानंद, पूर्वोक्त, पृ.३२

५०. देशमुख भगवान, मूर्तीकलेचे माहेरघर- धर्मापुरी, (संपा. रोडे सोमनाथ), मराठवाडा इतिहास परिषद औरंगाबाद, निवडक शोध निबंध, खंड तिसरा, फेब्रु. १९९९, पृ.१३३

५१. पांचाळ ज्ञानेश्वर (संपा.), २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, प्रकाशक प्राचार्य डॉ. राठोड गणपत, जाने. २००५, पृ.४९.

५२. काळे भगवान, किल्लेधारुर, संकेत प्रकाशन, जालना, जाने. २००४, पृ.६५

५३. पांचाळ ज्ञानेश्वर, पूर्वोक्त, पृ.४६

५४. जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी शब्दकोश, खंड १२, मुंबई, १९९५, पृ.९०९.

५५. मोरवंचीकर रा.श्री., दक्षिण काशी पैठण, रविवार प्रकाशन, पुणे, १९८७, पृ.७४

५६. कोलते वि.भि., महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७, पृ.१३४

५७. तत्रैव.

५८. पांचाळ ज्ञानेश्वर, पूर्वोक्त, पृ.४५

५९. माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.९

६०. कॉलिंगवूड आर.जी., कलेची मूलतत्वे, (अनु. मालशे स.गं., मिलिंद स. मालशे), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, डिसें. २००४, पृ.३२८

६१. देशमुख किरण, सौंदर्य व तत्वज्ञानाचा समन्वय म्हणजे सुरसुंदरी, (समीकरण), संशोधक, सप्टें. २००५, पृ.६३-६७

६२. पाठक अरुणचंद्र, बारव स्थापत्य एक आढावा, डॉ. देविसिंग चौहान गौरव ग्रंथ, लातूर, १९९८, पृ.४०१-४६०

६३. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, (संपा. काळे भगवान) संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, १९८८, पृ.११४

६४. Deva Krishna, Temples of North India, National Book Trust, 1969, p.5

६५. Ibid.

६६. Pruthvi Kumar, Gupta Temple Architecture, Delhi, 1965, p.12.

६७. कठारे अनिल, साखरे विद्या, मंदिर आणि मूर्तीशिल्प, श्रीमती आबेदा बेगम, अल्फा पब्लिकेशन्स, सुंदर नगर, नांदेड, डिसें. २००८, पृ.१२-१३

६८. तत्रैव, पृ.१३

६९. पाठक अरुणचंद्र, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ, खंड १ भाग २, स्थापत्य व कला, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७, पृ.१९५.

७०. कोलते वि.भि., लिळाचरित्र, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८, लीळा क्र.पु. ३२४, पृ.१९९

७१. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा भाग -१ , कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, १९९६, पृ.१०७

७२. Deshmukh Bhagwan, Iconography of Hindu Temples in Maharashtra, Jaipur, 1987, p.147.

७३. देशपांडे ब्रम्हानंद, पूर्वोक्त, पृ.१०५-१०७

७४. पाठक अरुणचंद्र, गोदावरी एक पुरातत्वीय अभ्यास, अप्रकाशित लघुशोध प्रबंध, डॉ. बा.आ.म.विद्यापीठ, औरंगाबाद, १९८०, पृ.६

७५. मोरवंचीकर रा.श्री., बीडच्या ऐतिहासिक व्यक्तिमत्वाचे पैलू, यशवंत स्मरणिका, २४ वे अधिवेशन, मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, २००४, पृ.३०

७६. मोरवंचीकर रा.श्री., महाराष्ट्रातील जैन धर्म, संस्कृती आणि साहित्य, (संपा. श्रेणिक अन्नदाते), जैन ऐतिहासिक, सुमेरु प्रकाशन, जाने. २००३, पृ.४७.

७७. बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, फेब्रु. २००४, पृ.१९०-१९१

७८. कोरे बसवराज, दक्षिण गंगेच्या तिरावरील वीरशैव परंपरा : एक चिंतन, (संपा. देव प्रभाकर) गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक-दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, २००६, पृ.१५

७९. कोतापल्ले नागनाथ, मराठवाडा इतिहास परिषदेचे २९ वे राज्यस्तरीय अधिवेशन, सिल्लोड येथील भाषण, ३० नोव्हें. २००९.

८०. देव प्रभाकर, मराठवाडा इतिहास परिषदेचे २९ वे राज्यस्तरीय अधिवेशन, सिल्लोड येथील भाषण, ३० नोव्हें. २००९.

# प्रकरण - ४

# धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास

प्रकरण चौथे

# धर्मापुरी व पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास

## ४.१ धर्मापुरी व पानगाव शहरांचा इतिहास :

धर्मापुरी आणि पानगाव ही दोन्ही ठिकाणे तशी मराठवाड्यातील शिल्पकला आणि इतर महत्वाच्या आणि ऐतिहासिक अवशेषांच्या दृष्टिकोनातून समृध्द ठिकाणे आहेत या अवशेषांमुळेच इतिहासाला पुरावे मिळतात. आणि त्यांच्या आधारेच इतिहासाचे लिखान केले जाते. मराठवाड्यात अशी प्राचीन अनेक ठिकाणे उदयाला आलेली आपणाला त्या काळातील पुरव्यांवरुन समजते. रा.वि. जोशी म्हणतात, "मराठवाड्याच्या या भागातच गोदावरी काठी पैठणजवळील मुंगी येथे महाराष्ट्रातील पहिले आश्मयुगीन हत्यार वायने या भूगर्भशास्त्रज्ञाला १८६५ मध्ये मिळाले होते."[१] यावरुन मराठवाड्यात आश्मयुगीन काळात मानवी जीवन निवास करत असलेले पुरावे प्राप्त होतात. तसेच आर.सी. त्रिपाठी म्हणतात, "प्रागैतिहासिक कालीन अवशेषात परिसरात अश्मयुगीन अवशेषही काही ठिकाणी सापडले आहेत. त्यात उत्तर अश्मयुगातील काही समावेश होतो. सिंदफणा काठच्या हिगनगाव येथे पी.एन. कांबळे यांनी लघुहत्यारे, गारगोटीचे छिलके, त्यासाठी वापरलेले तुकडे तसेच शुद्राश्मयुगीन तिक्ष्न हत्यारे व ते करण्यासाठी वापरलेले कच्चे तुकडे इत्यादीचा समावेश होतो."[२]

अश्मयुगीन व उत्तर अश्मयुगातील हत्यारावरुन मराठवाड्यातील प्राचीन मानवी जनजीवनाचा सुगावा लागतो. याच्या नंतरच्या काळात म्हणजे अलिकडे जनपदांचे ही पुरावे या ठिकाणी सापडतात. प्राचीन काळात दक्षिण पथावर अनेक विभाग होते. त्यापैकी गोदावरीच्या दक्षिणेचा भाग 'अश्मक' म्हणून ओळखला जात असे त्यानंतर कुंथल या गणराज्यात दख्खनचा बराच भाग समाविष्ठ करण्यात आला होता. हळूहळू या भागाचा किंवा परिसराचा विकास होत गेला आणि याच परिसरात एका महान घराण्याचा उदय झाला तो म्हणजे सातवाहनांचा

---

१. जोशी रा.वि., मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिकांक, १९७६, पृ.३०

२. Tripathi R.C., Indian Archeaology A Review, p.१५०

सातवाहन राजवंशाचे देवकुल हे पुणे जिल्ह्यात जुन्नरजवळ नानेघाटात आहे. सातवाहन हे आद्य घराणे मानले जाते. ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, "सातवाहन हे एका राजकुलाचे नाव आहे."[३] सातवाहनाचा मुळ संस्थापक सिमुकराजाला मानले जाते. या सातवाहनांबद्दल वा.वि. मिराशी म्हणतात, "सातवाहन नामक नृपतींची नाणी औरंगाबाद, पैठण, नेवासे, हैद्राबाद, कोंडापूर आदि ठिकाणी सापडली आहेत."[४] यावरुन आपणाला मराठवाड्यातील पैठण, औरंगाबादचा अभ्यास होतो. सातवाहनानंतर महाराष्ट्रात वाकाटकांची राष्ट्रकुटांची सत्ता प्रस्थापित झाली. मराठवाड्यात राष्ट्रकुट काळात अनेक शहरे विकसित झालेली होती. त्यामध्ये लातूर, वेरुळ, औरंगाबाद आदी ठिकाणावर राष्ट्रकुटांच्या इतिहासाचे अवशेष सापडतात. नांदेड जिल्ह्यात कंधार, अर्धापूर, होट्टल, करडखेड, येरगी, तळणी, तडखेल, जुनवाडी आणि रायवाडी यांसारखी प्राचीन नगरे आहेत. डी.सी. सरकार म्हणतात, "कंधार ही राष्ट्रकुटांची राजधानी असल्याने या ठिकाणी राष्ट्रकुटकालीन बरेच पुरातत्वीय अवशेष आढळून आले या काळात हे नगर वैभवशाली होते. त्यामुळे राष्ट्रकुट कालखंड कंधार नगराचा सुवर्णकाळ ठरतो."[५]

राष्ट्रकुटांच्या अधिपत्याखाली अनेक शहरांचा विकास मराठवाड्यात झालेला आपणाला तत्कालीन अवशेषांवरुन दिसून येतो. मला वाटते राष्ट्रकुटांच्या काळात धर्मापुरी आणि पानगाव ही दोन्ही शहरे असावीत पण त्यांचे पुरावे मिळत नसल्याने आपणाला विधान करता येत नाही. परंतु या दोन्ही ठिकाणी जर पुरातत्व खात्याने उत्खननाचे कार्य हाती घेतले तर निश्चितच या ठिकाणी आपणाला राष्ट्रकुटांच्या काळचे पुरावे हाती लागतील. अलिकडच्या अभ्यासावरुन चालुक्यांच्या काळापासूनचाच इतिहास आपणाला सापडतो.

धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात शिल्पवैभव प्राप्त झाले. या ठिकाणचे शिल्प हे मराठवाड्यातीलच नाही तर देशातील आश्चर्यकारक शिल्पात गणले पाहिजे पण म्हणावे तेवढे महत्व या स्थानाला प्राप्त झालेले आपणाला दिसत नाही. कारण या

---

३. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड III, पृ.२६

४. Mirashi V.V., Studies in Indology, Vol.I, II, p.१

५. Sircar D.C. (Ed.), Select Inscriptions, Vol.II, p.५१४.

ठिकाणाचे गुणगौरव हे इतिहासकारांनी किंवा संशोधकांनी आपल्या लेखणीतून केलेले दिसत नाही. परंतु अलिकडे इतिहासाच्या संशोधकात जागृती झालेली दिसते. सु.ग. जोशी म्हणतात, "चालुक्य राजा तृतीय सोमेश्वर याचा धर्मापुरी येथील शिलालेख नुकताच श्री. ब्रम्हानंद देशपांडे यांनी प्रसिध्द केला आहे. व बरेच अप्रसिध्द शिलालेखांचे ठसे घेऊन महाराष्ट्र शासनाच्या औरंगाबाद येथील उपपुरातत्व खात्याने प्रसिध्द करण्याकरिता संग्रहित केल्याचे समजते."[६] यावरुन आपल्या लक्षात येते की, इतिहासाच्या किंवा संशोधनाच्या क्षेत्रामध्ये आता मोठीच जागृती ही झालेली दिसून येते. व संशोधनाला शास्त्रीय स्वरुप प्राप्त झालेले दिसून येते. धर्मापुरी आणि पानगाव मध्ये पुष्कळ ठिकाणी शिल्पांच्या खणाखुणा असलेल्या आपणाला येथील सर्वेक्षण केल्यावर दिसून येतात. धर्मापुरी या शहरात व पानगाव येथे अनेक मंदिरे आहेत की ज्या मंदिरांच्या भिंतीवर किंवा स्तंभावर अंतरभागात बाह्यभागात फारच रेखीव व सुबक अशा शिल्पाकृत्या ह्या कोरलेल्या आपणाला दिसून येतात. त्यामध्ये मनुष्याच्या देवदेवतांच्या प्राण्याच्या, वृक्ष-वेलींच्या आदी आकृत्या किंवा शिल्प कोरलेले दिसतात. पण सध्याची वस्तुस्थिती ही आपण पाहिल्यावर लक्षात येते. त्या ठिकाणांवर हे सर्व शिल्प वैभवहे अस्तावेस्त पडलेले दिसून येते. कारण याकडे होत असलेले दुर्लक्ष किंवा पुरातत्व खात्याची याकडे असलेली डोळेझाक वृत्ती त्याला कारणीभूत आहेत.

यू.म. पठाण धर्मापुरीतील शिवमंदिराजवळचा अनुभव सांगताना म्हणतात, "जसाजसा मी मंदिराजवळ जाऊ लागलो, तसतशी भग्नावशेषांची संख्या वाढत गेली. मंदिराच्या सभोवती तर एवढे भग्नावशेष दिसले की जणू त्यांनी ते मंदिर वेढलेले असावे. त्या अवशेषांच्या मध्यभागी मंदिराच्या भग्नावस्थेतील प्रवेशद्वाराजवळ एक निळी-जांभळी जुनाट पाटी होती ती पुरातत्व खात्याची होती. अशी पाटी लावली की आपलं काम संपलं नि आपली जबाबदारीही संपली असा जणू त्यांचा शिरस्ता असावा ! हा शिरस्ता त्यांनी धर्मापुरीच्या

६. जोशी सु.ग. (संपा.) मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक १९७४, पृ.२२

मंदिराबाबतच नाही तर मराठवाड्यातल्या अनेक भग्न मंदिरांच्या बाबतीत, भेदभाव न बाळगता तो पाळला असल्याची आठवण त्याही मंदिराजवळ गेल्यानंतर मला झाली."[७]

मंदिराच्या प्रवेश द्वाराच्याच भागावरचे चिरे ढासळत होते.आत पुजारी वगैरे कोणीही नव्हते. पण त्या ठिकाणी एक पुजारी येत होता. असे समजते मंदिराच्या भोवताली इतस्ततः विखुलेल्या काळ्या कुळकुळीत दगडांकडे नि त्यातील भग्न शिल्पांकडे पाहतच रहावं वाटतं. यु.म. पठाण म्हणतात, "मंदिराभोवती अवशेष इतके पडले होते की त्यावरुनच चालत जावं लागत होतं. त्याचे ही क्लेश होत होते. त्यातल्या काही अवशेषांतील शिल्प मी निरखून पाहिली तेव्हा शेतातल्या बांधावरचे शिल्पावशेष यांचेच भाऊबंद आहेत, अस जाणवलं अजिंठा आणि वेरुळच्या लेण्यात तर माझा चार-पाच दशकांचा राबता, तिथल्या प्रसिध्द शिल्पांशिही या अवशेषांच दूरच का होईना नात असलच पाहिजे याची जाणीव होऊ लागली. त्यांना जी जागतिक किर्ती मिळाली त्यातली यांना रतिभरही किर्ती का बरं मिळू नये. या विचारांनी मन खंतावल या अवशेषांप्रमाणे जी शिल्प मंदिराच्या आधारान अजून तिष्ठत, प्राण कंठाशी आणून, बसली होती. मंदिराला ही प्रदक्षिणा घालीत असताना त्या शिल्पात एक संगती आढळली कलात्मक संगती आढळली हे मंदिर हेमाडपंथी मंदिर आहे चिऱ्यावर चिरा ठेवून त्याची रचना झाली. त्यातले काही चिरे ढासळू लागले नि त्यातूनच या मंदिराचा बऱ्याच शतकांमध्ये ज्ञाताकडून अज्ञाताकडे प्रवास सुरु झाला. त्याचा हा अज्ञातवास (किंवा शब्दशः 'वनवास') केवळ १४ वर्षाचाच नव्हता तर अनेक शतकांच्या घोर उपक्षेचा होता."[८] वरील स्पष्टीकरणात किती भयानक रुप हे येथील कलेच आपणाला दिसून येतं. या ठिकाणी एवढ कलेच दालन असून ते दुर्लक्षित आहे. पठाणांनी येथील मंदिरे ही हेमाडपंथी असल्याचा उल्लेख केला. काही नागर शैलीची मानतात पण ही मंदिरे भूमिज प्रकारात मोडतात हे आपणाला चिकित्सक अभ्यासावरुन समजते.

---

७. पठाण यु.म., स्मृतिस्थळ, पृ.८

८. तत्रैव

धर्मापुरी आणि पानगावचा इतिहास अभ्यासने ही गोष्ट आपल्या तेवढीच महत्वाची आहे कै. डॉ. भगवान देशमुख म्हणतात, "धर्मापुरी हे गाव बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील आहे. धर्मापुरी हे गाव तसे पाहता खेडेच म्हणावे लागेल. अंबाजोगाई पासून बी-नांदेड रस्त्यावर १६-१७ मैलावर हे गाव वसलेले आहे."[१] बालाघाटच्या उत्तरेस वसलेल्या या स्थळाचा विकास मासोळी नदीच्या काठावर झाला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात दहाव्या ते तेराव्या शतकामध्ये ज्या स्थानांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले अशा स्थानापैकी हे एक स्थान होय. पानगाव हे ठिकाण रेणापूर ते धर्मापुरी या मार्गावर आहे. धर्मापुरीपासून हे ठिकाण १०-१५ कि.मी. आहे. हे ठिकाण परळी ते लातूर या लोहमार्गाला जोडलेले आहे. अत्यंत सुपिक व घाटाच्या जमीनीवर या भागाचा विकास झाला आहे. या ठिकाणाच्या पूर्वेला कारेपूर, गोपाळवाडी उत्तरेला निरपणा, धर्मापुरी, दक्षिणेला रेणापूर, लातूर आणि पश्चिमेस अनेक खेडे आहेत. या दोन्ही ठिकाणी बाजार भरत असतो.

डॉ. आर.एस. शर्मा सारख्या सुप्रसिध्द अभ्यासकांनी भारताच्या दुसऱ्या नागरीकरणाचा प्रारंभ म्हणून कुषाण सातवाहनसत्ताची नोंद केली आहे. यानंतर मात्र मोगल सत्तेच्या उदयापर्यंत कुठलीही सत्ता नव्हती व सर्वत्र ग्रामीणीकरण होते. यासारखे मत नोंदविले जाते. महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र नवव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत अनेक लहान-मोठ्या स्थानांचा विकास जाणीवपूर्वक केला जात होता. यामध्ये राष्ट्रकुटांनी वसविलेले कंधार शहर हे महत्वपूर्ण मानले जाते.

चालुक्यांच्या काळातील गणेशवाडी, धर्मापुरी, पानगाव, जुनवाडी, सगरोळी, होट्टल, रायवाडी यांचा विकास केला गेला. किंबहुना या नगरांची निर्मिती केली गेली. शिलाहारांनी कोल्हापूर, नगर, श्रीवर्धन यासारखी स्थाने विकसीत केली होती. तर यादवांच्या काळामध्ये अंबाजोगाई, चारठाणा, देवगिरी, सिन्नर यासारखी स्थाने विकसीत केली ही वस्तुस्थिती आहे. येथील विकासाच्या नोंदी प्रत्यक्षपणे स्थानावर उपलब्ध होणाऱ्या अभिलेखीय

१. देशमुख भगवान, मूर्तिकलेचे माहेरघर-धर्मापुरी, पृ.१२९

पुरावे, स्थानमहात्म्य आणि पुरातत्वीय अवशेष स्मारके, पुरातत्वीय गर्भक्षेत्रात जाणवतात. कल्याणीच्या चालुक्यांनी चोल व परमारांशी निकराचा संघर्ष दिल्यावर चालुक्य नृपती सोमेश्वर पहिला (१०६८-१०७६) या दूरदृष्टीच्या राजाने नैसर्गिकरित्या संपन्न असलेल्या स्थानाचा शोध घेतला. उत्तर चालुक्यांच्या काळामध्ये मराठवाड्यात आपली सत्ता प्रस्थापित करुन काही केंद्रे विकसीत केली होती. तर यांच्याच प्रेरणेतून नांदेड जिल्ह्यात होट्टल, तरडखेड प्रमाणेच बीड जिल्ह्यात धर्मापुरी हे स्थान व लातूर जिल्ह्यात पानगाव हे स्थान विकसीत झाले. या स्थानांचा विकास १० व्या ते १२ व्या शतकात चालुक्य काळात झाला असून राजा विक्रमादित्य ६ व्या पासून ते जगदेकमल्ल दुसऱ्याच्या काळापर्यंत जवळपास ७५ वर्षे सातत्याने होत होता. त्यामुळे या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात शिल्पवैभव निर्माण झाले. धर्मापुरी विषयी भगवान देशमुख म्हणतात, "चालुक्यमूर्ती शिल्प स्थापत्याचे अवशेष गावात शिरताक्षणीच आपणास दिसतात."[१०] या संदर्भातील शिलालेख धर्मापुरी येथे असून गावात ब्राम्हण आळीत तुकाईदेवी मंदिराच्या समोर देवनागरी लिपीतील शिलालेख आहे तो सध्या अप्रकाशित आहे पण ब्रम्हानंद देशपांडे येथील प्रकाशित शिलालेखात म्हणतात, "धर्मापुरी हा गाव कल्याणी चालुक्य आणि कल्याणीकलचुरी ह्या दोन राजवंशाच्या काळातील अवशेषांनी समृध्द असा आहे."[११]

याशिवाय पूर्वीच्या ग्रामपंचायत कार्यालयासमोर जैन धर्मियांच्या एका सर्वोतभद्र शिल्पावर कन्नड शिलालेख आहे. तसेच निळकंठ खुशाल फड यांच्या सर्वे . २३ मध्ये कन्नड शिलालेख आहे. आणि किल्याच्या उत्तरकालीन बांधकामात दोन कन्नड शिलालेख असल्याचे स्वतः अरुणचंद्र पाठक यांनी नोंदविले आहे. शिवाय केदारेश्वर मंदिराच्या अधिष्ठणाच्या भागात एक शिलालेख आहे तो कन्नड असून गावात चालुक्यकालीन स्मारके, शिल्प व मोठ्या प्रमाणात पुरातत्वीय गर्भक्षेत्र उपलब्ध आहे. गावातील या लेखांपैकी बहुतेक लेख हे अप्रकाशित असून ॲन्यूअल रिपोर्ट ऑन इंडिया एपिग्राफी (१९६१-६२) अंकात एकूण पाच शिलालेख प्रकाशित

---

१०. तत्रैव, पृ.१२९

११. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड १, पृ.२०

आहेत. हे लेख अनुक्रमे ४५९-४६३ असे प्रकाशित केले आहेत. लेख क्रमांक ४५९ हा चालुक्य राजा जगदेकमल्ल द्वितीय याच्या काळातील असून देमरस याने कालेश्वर मंदिराला दिलेल्या दानाची नोंद यात आहे.लेखांक ४६० हा कन्नड लेख अकराव्या शतकातील असून यापनीय संघाचा जैन असा उल्लेख येथे मिळाला. ईश्वर भट्ट त्याचा लेखक आहे. ४६१ वर विविध महत्व मंदिरांना दिलेल्या दानाचा तपशील आहे. ४६२ हा पण अकराव्या शतकातील आहे. ४६३ मध्ये बहुदा विक्रमांक या व्यक्तीच्या कर्तत्वाची स्थिती आढळून येते. शिवाय धर्मापुरी येथे एक मोठा शिलालेख न.शं. पोहनेरकर यांनी (प्रतिष्ठाणमध्ये औरंगाबाद येथे सप्टे. १९७०) प्रकाशित केले आहे. त्या लेखात चालुक्य राजा तृतीय सोमेश्वर उर्फ भूलोक मल्ल यांच्या काळातील विकसीत झालेल्या धर्मापुरी नगरीचे वर्णन व मुरारी मठाची नोंद यात आली आहे.

धर्मापुरी येथील शिलालेखात आलेली नोंद पांचाळ ज्ञानेश्वर करतात, "हे नगर (धर्मापुरी) पृथ्वीच्या (चालुक्य राजाच्या) भाल प्रदेशातील तिलकाप्रमाणे शोभायमान आहे. येथे अनेक वापी आणि पुष्करणी आहेत."[१२] प्रासादांच्या ठिकाणच्या नृत्यशाळांनी या नगराची मोहकता वाढविली आहे. येथे अनेक विस्तीर्ण बाजारपेठ आहे. अशाच प्रकारे पानगांव या ठिकाणीही हे वैभव असावे आताच्या काळात यादोन्ही ठिकाणी बाजार भरतो आहे. या दोन्ही शहरांना चालुक्य राजाचे खरे योगदान म्हणावे लागेल. अशा प्रकारे आपणाला वरील शिलालेख व साधनांच्या माध्यमातून किंवा त्यांच्या अभ्यासावरुन प्रत्यक्ष स्थानाचे सर्वेक्षण केले असता या नगरींची ऐतिहासिक माहिती ही विस्तीर्णरुपाने मिळाल्याशिवाय रहात नाही. आपण अभ्यासलेल्या धर्मापुरीचा व पानगावचा इतिहास आता हुबेहुब तसा दिसणार नाही कारण वरील सर्व वर्णन हे ११ व्या व १२ व्या शतकातील आहे. म्हणजेच ते एक इतिहासाचा भाग झालेले आहे आता फक्त त्यांचे अवशेष हे साधन रुपाने उपलब्ध आहेत आणि याच साधनांच्या सहाय्याने आपणाला त्या नगरीचा शोध घेता येतो. आणि संशोधकाला धर्मापुरी व पानगाव

---

१२. पांचाळ ज्ञानेश्वर, २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, पृ.८

शहरांचे प्राचीन जनजीवन समजण्यास मोलाचे मार्गदर्शन सुध्दा झाल्याशिवाय राहत नाही. हे सत्य आहे.

### ४.२ येथील ऐतिहासिक शिल्पकलेला दिलेला राजाश्रय :

धर्मापुरी आणि पानगाव या दोन्ही बीड आणि लातूर जिल्ह्यातील ठिकाणी या प्रकारे कलेचा अविष्कार झाला तशाच प्रकारे या परिसरात अनेक ठिकाणी शिल्पकलेचा अविष्कार हा आपणाला झालेला दिसून येतो. या दोन्ही जिल्ह्याबरोबरच मराठवाडा, महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरही येथील राजघराण्यांनी राजाश्रय दिलेला आपणाला दिसून येतो या ठिकाणी अनेक राजांच्या सत्ता उदय आणि अस्त पावल्यापण त्यांच्या कला मात्र अजूनही चिरकाल टिकून आहेत. हजार वर्षे झाले तरी त्यांच्या इतिहासाच्या खाणाखुना सांगणारी अनेक ऐतिहासिक ठिकाणे आजही आपली संशोधनासाठी वाट पाहतात.

डॉ. देव प्रभाकर यांच्या मते, "प्राचीन वैभव संपदेत शिल्प स्थापत्याला अनन्यसाधारण महत्व होते. चालुक्य, राष्ट्रकुट, काकतीय, होयसळ आणि यादव नृपतींनी शिल्प स्थापत्य कलेला राजाश्रय देऊन आपल्या उदात्त कलासक्तीचा अविष्कार घडविला होता. त्या नृपतींच्या दिव्य धर्मभक्तीच्या खाणाखुणा साऱ्या महाराष्ट्रात, आंध्र आणि कर्नाटकाच्या विस्तृत प्रदेशात मंदिर स्थापत्याच्या रुपे ठायी-ठायी आढळतात."[१३] यावरुन प्राचीन काळामध्ये किती मोठ्या प्रमाणात शिल्प स्थापत्याला अग्रक्रम दिलेला होता त्यांनी आपली धर्मभक्ती या कलेतूनच अभिव्यक्त केलेली दिसून येते या राजांनी कलाकारांना राजाश्रय दिला व त्या कलाकारांनी आपला प्राण ओतून अशा अजरामर शिल्पाकृती निर्माण केलेल्या दिसून येतात.

"महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग तर या कला संपदेच्या बाबतीत अग्रेसर ठरावा प्राचीन शिल्प स्थापत्य अवशेषांचे समृध्द भांडारच या विभागात दडलेले आहे."[१४] महाराष्ट्रात मराठवाड्याला प्राचीन काळात महत्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते कारण याच भागामध्ये

---

१३. देव प्रभाकर, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिकांक, १९७५, पृ.१०

१४. तत्रैव.

मोठ्या प्रमाणात कलेचा उद्‌गम झालेला आपल्या ध्यानात येतो. मराठवाड्यात अनेक केंद्रे विकसीत झाली त्यामध्ये बीड, अंबाजोगाई, परळी, औंढा, वेरुळ, अजिंठा, नांदेड जिल्ह्यातील ठिकाणे, लातूर निलंगा, उद्‌गीर, धर्मापुरी पानगाव आदि ठिकाणी कलेचा चांगला विकास झ ालेला आपल्या लक्षात येतो. चालुक्यांबरोबरच यादवानींही या भागात कलेला राजाश्रय दिला. मु.ग. पानसे म्हणतात, "अंबाजोगाई हे यादवांच्या काळातील कला व संस्कृतीचे माहेरघर होते. या ठिकाणी सपाट जमीनी कोरलेल्या तीन लेण्या आहेत. बहुतेक सर्व लेणी डोंगरात कोरलेल्या आहेत पण येथील लेणी मात्र सपाट जमीनीत कोरलेल्या आहेत हे विशेष आहे."[१५] यादवांनी ज्या ठिकाणाला राजाश्रय दिला त्यामध्ये अंबाजोगाई हे एक प्रमुख ठिकाण आहे. अंबाजोगाई या ठिकाणी यादवांच्या काळात चांगला आणि उत्कृष्ट कलेचा विकास झालेला समजतो. या ठिकाणी अनेक मंदिरे आहेत अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत. या ठिकाणी लेण्यादेखील आहेत. पण या लेण्यांचे वैशिष्ट्ये या लेण्या सपाट भागावर आहेत. भारतात इतरत्र लेण्या ह्या डोंगराळ भागावरच दिसून येतात.

"येथील लेणीतील शिल्पावरुन त्या वेरुळ व अजिंठा लेणीच्या कालखंडातच कोरलेल्या असाव्यात. असे विदवानांचे मत आहे. १२ व्या शतकात तेथीलशासक उदयादित्य परमार याने या लेणी कोरल्याचा उल्लेख तेथील शिल्पलेखात करण्यात आलेला आहे. या लेण्यांचे तीन प्रकार पडतात शिव, वैष्णव व जैन धर्मीय असे आहे."[१६] या विधानाचा परामर्ष घेताना आपल्या लक्षात ही गोष्ट कदाचित आली असेल की, या भागामध्येपरमारांचेही वर्चस्व काही काळ असावे. आणि त्यांनीही शिल्पकलेला या ठिकाणी राजाश्रय हा दिलेला दिसून येतो. यांच्या काळामध्ये अंबाजोगाईचा लेणींच्या संदर्भात इतिहास सांगणारे पुरावे मिळतात आणि यावरुन कलेच्या क्षेत्रातील त्याची आवड स्पष्ट होते.

---

१५. पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, १९२.

१६. तत्रैव

कलेच्या संदर्भात बोलायचेच झाले तर व.दि. राव म्हणतात, "भारतात मूर्ती पुजा सुरु झाल्यावर पूर्वीचे गुहाशिल्प हे अपूरे वाटू लागले दगडांमध्ये प्रार्थना स्थान खोदण्यापेक्षा आता उघड्या मैदानावर भव्य अशी मंदिरे बांधण्याकडे भारतीयांची प्रवृत्ती होऊ लागली."[१७] गुहाशिल्प हे एखाद्या डोंगरात किंवा खडकात कोरत वेळ घालण्यापेक्षा अडचणीमध्ये कलाशिल्प निर्माण करण्यापेक्षा पुढे कलाकार हे मोकळ्या पटांगणात आणू लागले. याचाच परिणाम किंवा या गोष्टीचे अपत्य म्हणून आपणाला बीड जिल्ह्यातील धर्मापुरी आणि लातूर जिल्ह्यातील पानगाव यांचा अभ्यास करावा लागतो. या दोन्ही ठिकाणी जी मंदिरे मिळाली किवा आताही ती उभी आहेत तर ही मंदिरे मोकळ्या पटांगणात आहेत. आणि त्यांच्यावर कलाकारांनी आपण स्वतः होऊन किंवा प्राण अर्पण करुन प्रेम केलेले निदर्शनास येते. कारण या ठिकाणी जी शिल्प परंपरा कलाकारांनी जोपासली ती खरोखरच अप्रतिम आहे आणि चालुक्य राजांच्या आश्रयाखाली येथील कलेचा विकास झालेला आहे. चालुक्यांच्या काळात येथील कलासाधनेला मुक्त हस्ताने दान दिलेले आहे. हिंदूच्या सोबतच जैनांच्याही शिल्पांची निर्मिती या ठिकाणी झालेली आपल्या लक्षात येते.

या ठिकाणी प्राप्त झालेली शिल्पकला ही जास्त प्रकारची धार्मिक अंगानेच निर्माण केलेली दिसून येते. आणि त्यातून धर्मभक्ती मोठी आढळून येते. माटे म.श्री. म्हणतात, "त्यात बौध्दांचे स्तुप, शैलगृहे, पौराणिक हिंदू धर्मियांचे व जैन पथियांची मंदिरे मूर्ती यांचाच प्रामुख्याने किंबहुना सर्वस्वी समावेश आहे. स्वाभाविकच असा प्रश्न उपस्थित करता येईल की, भारतीय समाजाने आपले सर्व कला कौशल्य केवळ धर्म संवाद गोष्टीवरच केंद्रीत केले होते की काय"[१८] वरील विधानात माटे यांनी तत्कालीन कलेचा विचार फक्त धघर्मभक्तीतून केलेला दिसतो पण अनेक ठिकाणे याला अपवाद दिसून येतात. त्या काळातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक अंगाचाही आपणाला शिल्पकलेवरुन अभ्यास करता येतो चालुक्यांनी

---

१७. राव व. दि., प्राचीन भारतीय सांस्कृतिक इतिहास, पृ.४०

१८. माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, पृ.१०२

राजाश्रय दिलेली धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी शिल्पांचा डोळस दृष्टीने अभ्यास केल्यास आपणाला सर्व दृष्टीने परिक्षण करता येते. याचा आपण अभ्यास करणारच आहोत.

राष्ट्रकुटांच्या काळातही या परिसरात अनेक वास्तू उदयाला आल्या त्यामध्ये राष्ट्रकुटांच्या काळातील महत्वाची शहरे कंधार, लातूर, वेरुळ इ. प्रामुख्याने विचार करता येतो. कठारे व दळवे, म्हणतात, "मराठवाड्यातील धारुर व धर्मापुरी ह्या सुध्दा राष्ट्रकुटांच्या प्रारंभिक राजधान्या होत्या. यावरुन निष्कर्ष निघतो की, राष्ट्रकुटांची मुळ भूमी आधुनिक लातूर असून तेथूनच त्यांनी आपल्या सत्तेचा विस्तार केला. लातूर ही त्यांच्या राज्याची पहिली राजधानी ठरते. एवढेच नव्हे तर तीच त्यांची जन्म व प्रारंभिक काळातील कर्मभूमी ठरते. एलिचपूर (वेरुळ) (एलापूर), कंधार, मयुरखिंडी मान्य खेट असा त्यांचा राजधानीचा प्रवास ठरतो. लातूर वेरुळ व कंधार ह्या त्यांच्या प्रारंभिक राजधान्या मराठवाड्यातच होत्या धारुर, अंबाजोगाई, तेर, पैठण व परळी ही राष्ट्रकुट काळातील मराठवाड्यातील महत्वाची नागरी केंद्रे होती"[१९] राष्ट्रकुटांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या या खेड्यांमध्ये किंवा शहरामध्ये तत्कालीन अवशेष मिळतात आणि त्याच अवशेषांच्या जोरावर एक एक इतिहासाचे पान रंगवले जाते आणि तत्कालीन सांस्कृतिक व अन्य प्रकारचे जीवन आजच्या अर्थात वर्तमान समाज जीवनासमोर ठेवले जाते.

हळूहळू काळ बदलला सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट आणि या राष्ट्रकुटांशी कल्याणीच्या चालुक्यांचा संघर्ष सुरु झाला व त्यानंतर हा भाग चालुक्यांच्या आश्रयाखाली आला. हरीहर ठोसर म्हणतात, "इसवीसनाच्या ६ व्या शतकापासून काही काळ गोदा खोऱ्यात राजकीय सत्तासंघर्ष झाला. कर्नाटक विजापूरजवळ बदामी परिसरात चालुक्यांच्या रुपाने एक प्रभावशाली सत्ता उदयास आली. सामान्यतः ही राजसत्ता पूर्व चालुक्य किंवा बदामीचे चालुक्य या नावाने इतिहासात ज्ञात आहे. या चालुक्यांपैकी राजा जयसिंह याने खऱ्या अर्थाने चालुक्य घराण्याची प्रतिष्ठा वाढविली त्याने सत्ता विस्तार केला. या

---

१९. कठारे दळवे, राष्ट्रकुटांची राजधानी कंधार, पृ.१८

सत्ताविस्तारात चालुक्यांची सत्ता गोदाखोऱ्यात येऊन पोहचली. गोदा खोऱ्यात चालुक्य राष्ट्रकुट संघर्ष सुरु झाला. वेरुळ, राजतडाग परिसरात हा संघर्ष झाला.चालुक्य नृपती या संघर्षात विजयी झाले. काही काळ हा परिसर चालुक्यांच्या ताब्यात गेला."[२०]

पूर्वकालीन चालुक्य राजामध्ये पुलकेशी दुसरा हा राजा फारच पराक्रमी होता. याच्या काळात चालुक्यांनी अनेक विजय मिळविले होते. उत्तरेतील नावाजलेला राजा हर्षवर्धन याचाही पराभव पुलकेशीने केला होता. तसेच उत्तर कालीन चालुक्य राजांमध्ये सोमेश्वर पहिला, सोमेश्वर तिसरा, विक्रमादित्य दुसरा आदि राजे नाव घेण्यासारखे होते. या राजांच्या काळात चांगल्या प्रकारे अनेक शहरांना राजाश्रय मिळाला व त्या शहरांचा चांगला विकास झ ााला. त्यामध्ये आपणाला धर्मापुरी आणि पानगावचा प्रामुख्याने उल्लेख करता येतो. चालुक्यांच्या नंतर महाराष्ट्रात एक महान घराने उदयास आले या घराण्याचे नाव 'यादव' असे होते. यादवांच्या काळामध्ये मराठवाड्यात अनेक ठिकाणांचा विकास झाला. त्यामध्ये दौलताबाद, बीड, अंबाजोगाई, परळी, चारठाणा, धर्मापुरी, आदि ठिकाणाचा विकास यादव राजांच्या काळात झाला. यादवांचे साम्राज्य हे गोदावरी नदीच्या काठी होते. म.श्री. माटे म्हणतात, "महाराष्ट्राच्या उत्तरेकडील भागावर विशेषतः गोदावरीच्या काठाभोवतीच्या प्रदेशावर इ.स. ९ व्या शतकापासून ते १४ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत 'यादव' घराण्याची सत्ता होती. याच घराण्याला 'सेऊन' या नावानेही ओळखले जाते. यादव किंवा सेऊन हे प्रथम राष्ट्रकुट आणि चालुक्यांचे मांडलिक किंवा प्रांताधिप म्हणून गोदावरीच्या प्रदेशात आलेले होते."[२१]

यादवांनी आपले साम्राज्य गोदाखोऱ्यात प्रसारीत केल्यास यांच्या काळात कलेला, संस्कृतिला, साहित्याला मोठा राजाश्रय दिला. यांच्याच काळात नरेद्र कवी, साल कवी, नृसिंह कवी, मुकुंदराज, ज्ञानदेव आदि कवी किंवा लेखक निर्माण झाले. यांच्याच काळात लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू सारखे अमर साहित्य निर्माण झाले. यादवांच्याच काळात हेमाद्री

---

२०. ठोसर हरिहर, भारतीय इतिहास आणि संस्कृती, पृ.३-१

२१. माटे म.श्री., पूर्वोक्त, ९७

पंडिताकडून हेमाडपंथी बांधकाम शैली विकसित झाली. हरिहर ठोसर म्हणतात, "यादव काळातील बीड परिसराचे महत्व लष्करी तसेच बौध्दिक दृष्टीने महत्वाचे ठरते. १२ व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेले विख्यात ज्योतिर्विद आणि गणिती भास्कराचार्य यांचे बिज्जल (बीड) हे निवासस्थान होते."[२२] या भास्कराचार्यांचे गणिताच्या दृष्टिकोनातून मौलिक योगदान आहे. पोहनेरकर म्हणतात, "भास्कराचार्यांचे नातू चांगदेव हा देवगिरीच्या सिंघनदेव या राजाचा ज्योतिषी होता."[२३] यावरुन यादव नरेशांच्या राजदरबारात अनेक विद्वानांचा राबता होता. या विद्वानांना त्यांनी आपल्या राजवाड्यात राजाश्रय दिलेला होता. यादवांनी साहित्य आणि बौध्दिकतेच्या क्षेत्रात क्रांतीच घडवून आणली होती. याच यादवांच्या काळात कलेलाही बहर आलेला होता. पं. महादेवशास्त्री जोशी म्हणतात, "यादवांच्या काळातील एक भव्य व रमनीय असे कंकालेश्वराचे मंदिर आहे. त्यांच्या भोवती जलपूर्ण खंदक आहे. याशिवाय इथले किल्ले व प्राचीन इमारती, पुराणवस्तु संशोधनाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत."[२४] अशा प्रकारे बीड जिल्हा असो की लातूर जिल्हा यांच्यामध्ये प्राचीन वास्तू किंवा पुराण वस्तुंचे जागोजागी अवशेष सापडतात आणि या आपल्या ऐतिहासिक वैभवाचा इतिहास आपणाला सांगतात. अशा प्रकारे इतर राजघराण्यां प्रमाणे यादवांच्या काळात ही येथील शिल्पकलेला राजाश्रय मिळाला.

## ४.३ चालुक्य काळातील पानगाव आणि धर्मापुरीची शिल्पकला :

दक्षिण भारतात अनेक घराण्यांनी प्राचीन काळात राज्य केले आणि त्यांनी वेगवेगळ्या आपल्या खाणाखुणा जपून ठेवलेल्या होत्या. यात शंका नाही त्यात सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट आणि चालुक्यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. चालुक्यांचे प्रमुख दोन वंश मानले जातात. त्यात बदामीचे चालुक्य आणि कल्याणीचे चालुक्य होत. भगवान काळे म्हणतात, "वाकाटकांच्या नंतर दक्षिण भारतात बदामीच्या चालुक्यांची सत्ता उदयाला आली.या चालुक्यांची राजधानी कर्नाटकातील बदामी हे नगर असल्याने हे चालुक्य घराणे बदामीचे

---

२२. ठोसर हरिहर, प्रतिष्ठान, पृ.४०
२३. पोहनेरकर न.श., प्रतिष्ठाण, पृ.२९
२४. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड ६, पृ.१८८

चालुक्य या नावाने प्रसिध्द आहे. या चालुक्यांची सत्ता मराठवाड्यावर होती. चालुक्यांच्या शिला ताम्रशासनात नांदेड हे एक शैक्षणिक केंद्र आणि विद्वानांचे माहेरघर म्हणून उल्लेखिले आहे."[२५] बदामीचे चालुक्य हेच कल्याणीच्या चालुक्यांची मुळ शाखा मानली जाते. यांनीही फार मोठे साम्राज्य निर्माण केले होते. निळकंठ शास्त्री म्हणतात, "पुलकेशी दुसरा हा या घराण्यात सर्वात कर्तबगार सम्राट होऊन गेला. त्याने इ.स. ६१० पासून इ.स. ६४२ पर्यंत राज्य केले."[२६] हा पुलकेशी दुसरा एवढा पराक्रमी होता की, याने उत्तरेतील त्या काळचे सर्वात मोठे राज्य वर्धन साम्राज्य आणि राजा हर्षवर्धन याचा देखील पराभव केला होता.

या बदामीच्या चालुक्यांच्या काळात बदामी, वैकुंठगुहा, पांडवलेणी, माहूर, वेरुळ लेणी, औरंगाबाद येथील ३,९,१०,११,१२ ह्या बौध्द लेणी बदामी चालुक्यांनी कोरल्या तसेच पट्टदख्खल येथील मंदिरे त्यात विरुपाक्ष मंदिर, गळगनाथ मंदिर, पापनाथ मंदिर, संगमेश्वर मंदिर, एहोळ येथील मंदिर समुह, तेर येथील मंदिरे आणि इतर ठिकाणची अनेक मंदिरे यांच्या काळात निर्माण झाली. यावरुन बदामीच्या चालुक्यांनी कलेला किती वाव दिलेला आहे हे समजते. चालुक्यांनी कलेचे सर्वोत्कृष्ठ असे नमुने भारतात बनवले. बदामीचे चालुक्य म्हणजेच पूर्वकालीन चालुक्य असेही म्हटले जाते. हे चालुक्य कल्याणीच्या म्हणजे उत्तर कालीन चालुक्यांचे पूर्वज चांगल्या प्रकारे शोभून दिसतात. यांच्याही काळात कलेचे अद्वितीय नमुने जन्मास आले. डॉ. अनिल कठारे म्हणतात, "पट्टदकल येथील विरुपाक्ष मंदिर हे चालुक्य कलेचा सर्वोत्कृष्ठ नमुना आहे."[२७] यावरुन चालुक्यांचा कलेचा इतिहास किती महान आहे याचा अभ्यास आपणाला होतो. बदामीच्या चालुक्यांबरोबरच कल्याणीच्या चालुक्यांचाही कलेवर ठसा उमटलेला दिसून येतो. कठारे व दळवे म्हणतात, "राष्ट्रकुटांच्या सत्तेच्या नंतर दक्षिणेत कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता स्थापन झाली. तैल दुसरा हा या राज्याचा संस्थापक असून तो राष्ट्रकुटांचा महासामंत होता. राष्ट्रकुट सम्राट कर्क दुसरा याला युध्दात ठार मारुन

---

२५. काळे भगवान, (संपा.), मराठवाडा काल आणि आज, पृ.७९
२६. Shastri Nilkanth, A History of Sough India, pp.१४८-१६१
२७. कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य, खंड २, पृ.४३

त्याने राष्ट्रकुटाचे राज्य मिळविले इ.स. ९७५ पासून इ.स. ११९० पर्यंत या चालुक्य घराण्याची सत्ता दक्षिण भारतावर होती. या राज्याची राजधानी कर्नाटक प्रदेशातील बिदरजवळ असलेले कल्याणी नावाचे नगर होते."[२८] अशा तऱ्हेने कल्याणीच्या चालुक्यांनी आपले साम्राज्य पुढे वाढवण्याचाही प्रयत्न केला. विक्रमादित्य, सोमेश्वर पहिला व तिसरा हे प्रभावशाली राजे झाले. या चालुक्यांच्या काळात कलेचे नवनवीन दालने निर्माण झाले. त्यामध्ये धर्मापुरी आणि पानगांव या शहरांचा विचार करावा लागतो.

### ४.३.१ धर्मापुरीच्या केदारेश्वर मंदिरावरील शिल्पकला :

धर्मापुरी हे गाव तसे पाहिले तर ते एक ऐतिहासिक गाव आहे. या गावाच्या आग्नेय दिशेला अर्धा कि.मी. अंतरावरच एक भग्नावस्थेत उभे देवालय आपणाला पाहता येते.हे देवालय म्हणजेच केदारेश्वराचे होय. या देवालयावर मोठ्या प्रमाणावर कोरीव काम आहे. आणि येथील शिल्पकला तर महाराष्ट्रातच प्रसिध्द आहे. केदारेश्वराचे मंदिर हे चालुक्य काळातील मंदिरस्थापत्याचे उत्तम उदाहरण आहे. येथील सर्वच मूर्तीशिल्पांमध्ये जिवंतपणा आणि गतीमानता वाटते. केदारेश्वराच्या बाह्य भिंतीवरील शिल्पामध्ये एक शिलालेख लिहणाऱ्या लेखिकेचे शिल्प आहे. ती लेखिका पाठमोरी उभी आहे. त्यातून शिल्परचनेच्या माध्यमातून कलाकाराने आपली अभिव्यक्ती दर्जेदार बनविली आहे. प्रभाकर देव म्हणतात, "त्यातील ब्रम्हा, विष्णू, शिव, नृसिंह, वामन इ. अवतार शिल्पे ही कोरीव आहेत. वामन अवताराचा प्रसंग अत्यंत ओजस्वीपणे दर्शविणारा शिल्पखंड मंदिराच्या शेजारीच उघड्यावर पडलेला दिसतो. विष्णू, लक्ष्मी, शिव, पार्वती यांच्या शिल्पाकृतीमधून कलाकारांच्या कलाविष्काराचा परिचय होतो. मुरारी कृष्णाचेही त्यात शिल्प आहे. या देवता शिल्पाबरोबरच नृत्यांगना, अप्सरा, रती, शालभंजिका यातून शिल्पसौंदर्याचा अप्रतिम अविष्कार कलाकारांनी निर्माण केला आहे."[२९] केदारेश्वर मंदिरावर एकूण ६७ शिल्प कोरलेली दिसून येतात.

---

२८. कठारे, दळवे, पूर्वोक्त, पृ.४९

२९. Deo Prabhakar, Temples of Marathwada, p,६४

केदारेश्वर मंदिरावर अनेकशिल्प सुरसुंदरीचीही आहेत. त्यामध्ये मातृवत्सला, शालभंजिका, शुकनासिका, नृत्यांगणा आदि शिल्पे मोठ्या चतुराईने कलाकाराने निर्माण केलेले आहेत. या मंदिराच्या पायाला अर्थातच सर्वात खालचा शिल्पांचा म्हणजे तो गजथर असलेला दिसून येतो. पुष्कळसे हत्ती हे एकेमेकांच्या मागे शेपटी धरुन साखळी स्वरुपात उभे दाखविले आहेत. यावरुन त्या काळामध्ये हत्तीला महत्व दिले जात असावे. पानगावच्या मंदिरावरही चालुक्यांनी हत्ती थर दाखविला आहे. यावरुन चालुक्यांचे गजदल प्रभावी व शक्तीशाली असावे असा तर्क काढता येतो.

डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "चालुक्य राजवटीतील शिल्पकलेचा कलापूर्ण वारसा म्हणून या केदारेश्वर मंदिराला महत्व आहे."[३०] हे मंदिर धर्मापुरी येथील सर्वोत्कृष्ठ मंदिर आहे. या मंदिराला बाह्य भागावर देवकोष्ट आहेत. त्यामध्ये नृसिंह विष्णू व इतर मूर्ती पहावयास मिळतात. बाह्य भागाप्रमाणे आत देखील देवकोष्टे आहेत पण ती रिकामी दिसतात. एका ठिकाणी गणपती प्रतिमा आहे. बाह्य भागावरील देवकोष्टातील मूर्तीच्या एका रेषेतच मोठ्या आकाराची ही शिल्पे आहेत. ही शिल्पे फारच अप्रतिम आहेत. त्यामध्ये रतीमदन, शुकनासिका, शालभंजिका, नृत्यांगणा, मिथुन शिल्प, मातृवत्सला, शिव, विष्णू, ब्रम्हा वामन, नृसिंह, त्रिविक्रम, एक शिल्पपट कोरणारी स्त्री आदि मूर्ती तेथे पाहावयास मिळतात. आतल्या भागामध्ये मंदिराच्या गर्भगृहात शिवलिंग व बाजूला ब्रम्हाची तीन तोंडी प्रतिमा ठेवलेली आहे. एक अवतारांचा शिल्पपट आहे. चौकटीवर छोटीशी गणेश मूर्ती कोरली आहे. दोन्ही बाजूने स्त्री प्रतिमा व कुंभ घेतलेली स्त्री दिसून येते. समोर अंतराळ आणि सभामंडप अशी रचना आहे. सभामंडपात पुष्कळ स्तंभ आहेत. त्यात काही नवीन आधार देण्यासाठी लावलेले दिसतात असे हे सुंदर मंदिर न.श. पोहनेरकर म्हणतात, "हे केदारेश्वर मंदिर चालुक्य राजा विक्रमादित्य

---

३०. देव प्रभाकर, धर्मापुरी येथील चालुक्य शिल्प स्थापत्य अवशेष, पृ. १६

सहावा याने बांधल्याची नोंद आहे."[३१] अशा प्रकारे हे मंदिर मराठवाड्यातच नव्हे तर भारतातच शिल्पकलेच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानले पाहिजे असे म्हणता येते.

### ४.३.२ धर्मापुरीच्या मल्लिकार्जून मंदिरावरील शिल्पकला

धर्मापुरीच्या ठिकाणी मंल्लिकार्जून नावाचे एक मंदिर आहे. हे मंदिर धर्मापुरी पासून पश्चिमेस २ कि.मी. अंतरावर अंबाजोगाई रोडवर आहे. हे मंदिर शिवाचे असून या मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ व सभामंडप अशी आहे. या मंदिराच्या गर्भगृहात शिवलिंग आहे. जवळच सात तोंडे असलेला एक नागफणा उभा केला आहे. आणि एक पितळेची शिवाची मूर्ती आहे. तसेच गर्भगृहाच्या द्वारशाखांवर वेगवेगळी कलाकृती आहे. सभामंडपात अनेक स्तंभ आहेत. सभामंडपातील एकूण स्तंभाची संख्या बावीस आहे. मंदिराच्या उत्तर बाजूला ३० x ३५ चे भव्य बारव आहे. ज्यात बाराही महिने पाणी असते.

सभामंडपातील स्तंभांवर कोरीवकाम दिसून येते. केदारेश्वराच्या मंदिरातील स्तंभापेक्षा येथील स्तंभ अलंकृत आहे. हे स्तंभ उंचीच्या बाबतीत लहान आहेत आणि रुंदही आहेत. याच मंडपात उजव्या बाजूला मरळसिध्दाची समाधी आहे. आणि अन्य नाथ पंथीयांच्या समाध्या या ठिकाणी आहेत. मंदिराच्या बाह्य भागावर अनेक शिल्पे दिसून येतात त्यामध्ये भैरवाचे शिल्प, गणेशाचे शिल्प, उमामहेश्वर शिल्प आणि बलरामाचे शिल्प आहे. एवढेच नव्हे तर समोर नंदीच्या देखील मूर्ती ठेवण्यात आल्या आहेत. यातील बलरामाचे शिल्प हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. काही याला विष्णू किंवा सूर्य म्हणतील पण ही मूर्ती बलरामाची असावी असे वाटते. या मूर्तीच्या मागे नऊ फणांचा नाग आहे व उजव्या हातात नांगरासारखे छोटेसे आयुध आहे. बाजूला दोन स्त्री शस्त्र देवता आहेत. नी.पु. जोशी म्हणतात, "विष्णूच्या चार व्यूहांमध्ये संकर्षण किंवा बलरामाची गणना होते. त्याला शेषावतार असेही मानतात. पण या शिवाय 'कृष्णस्तु भगवान स्वयम' असे गृहीत धरुन त्याला विष्णूचा आठवा अवतार म्हणूनही

---

३१. पोहनेरकर न.शे., मराठवाड्याची प्राचीन सौभाग्यलेणी, पृ.२१-२४

ओळखतात."[३२] शेषाचा अवतार आणि कृष्णाचा मोठा भाऊ बलराम या नावाने याला मान्यता प्राप्त होती. अशा प्रकाराची शिल्पे किंवा मूर्तीशिल्पे या ठिकाणी शिल्पकला म्हणून आपणाला अभ्यासता येतात.

### ४.३.३ धर्मापुरी येथील इतर ठिकाणची शिल्पकला :

धर्मापुरी या ठिकाणी इतर काही ठिकाणी देखील मोठ्या प्रमाणात शिल्पकला पहावयास मिळते. त्यामध्ये धर्मापुरी ते अंबाजोगाई रोडवर अंबाजोगाईला जाताना उजव्या बाजूला टेकडीवर एक हनुमान मंदिर आहे या ठिकाणी अनेक मूर्ती ठेवलेल्या दिसून येतात. त्यामध्ये सप्तमातृका शिल्पपट आहे. असे दोन शिल्पपट तेथे आहेत. गणेशाचे शिल्प आहे. तसेच ब्रम्हदेव आणि जैन शिल्प या ठिकाणी पहावयास मिळतात. येथील शिल्पांविषयी र.रा. बोरकर म्हणतात, "अशा या प्राचीन वैभवशाली नगरीत अनेक जैन (दिंगबर) शिल्प, शैव, वैष्णव, सौर व गाणपत्य संप्रदायाची अनेक शिल्पे आहेत. तसेच येते सप्तमातृकांचेही शिल्पपट आहेत. या मूर्तीपैकी गावात व परिसरात पडलेल्या दिगंबर जैन शिल्पाचे मूर्तीशास्त्रीय दृष्ट्या विवेचन करणे हा या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे. त्यात सुपार्श्वनाथाचे दोन शिल्प, चंद्रप्रभु आणि पार्श्वनाथाचे एकएक शिल्प, दोन स्तंभ, यक्षी सिध्दायिका आणि एक खंडीत तीर्थकारांचे शिल्प आहे."[३३] एवढेच नव्हे तर गावात शिरताना रस्त्यानेही जैनांची काही ठिकाणी नग्न स्वरुपाची शिल्पे मिळतात. धर्मापुरीतील एका ओट्यावर शिल्पे नसून अनेक ठिकाणी हिंदू देवतांची शिल्पे मोठ्या प्रमाणात आढळतात.

येथील बँकेच्या शेजारी असलेल्या एक ओठ्यावर एक धनुष्य घेऊन उभा पुरुष कोरलेला आहे. तो कदाचित परशुराम असावा त्याच ठिकाणी एका शिल्पात एक स्त्री बसलेली आहे व ती नंदी, शिवलिंग, चंद्र आणि सूर्य याची पुजा करताना दाखविली आहे. किल्याच्या समोरील एका चौथऱ्यावर उमा महेश्वर, गणपती, नागबंदाच्या अनेक मूर्ती सापडतात. तसेच

---

३२. जोशी नी.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, पृ.७३

३३. बोरकर र.रा, धर्मापुरी येथील जैनशिल्प, पृ.१९०

गावातील राम मंदिराच्या बाजूला एका चौथऱ्यावर शक्तीदेवता, उमामहेश्वर, गणपती, नंदी, नागबंद, दोनस्तंभ अर्धवट आहेत आणि नक्षीयुक्त आहेत. तेथे अनेक कमलासने दिसून येतात. तसेच तुकाई देवीचे ब्राम्हण गल्लीतील मंदिरात ही अनेक शिल्प अभ्यासण्यास मिळतात. गावाच्या बाहेर अंबाजोगाई रस्त्यावर महाबळेश्वर ह्या उत्खननातील शिवलिंगाच्या टेकडीवरच एक विष्णूचे अप्रतिम मूर्तीशिल्प दिसून आले. या मूर्तीच्या हातात शंख, चक्र, गदा आहे. अशा प्रकारे धर्मापुरी हे गाव शिल्पकलेने संपन्न असे गाव आहे. या ठिकाणी निरनिराळी शिल्पे अभ्यासकाला भुरळ घातल्याशिवाय रहात नाहीत.

### ४.३.४ पानगाव येथील विठ्ठल मंदिरावरील शिल्पकला :

पानगाव हे ठिकाण येथील विठ्ठल मंदिरावरुन ओळखण्यात येते की हे ऐतिहासिक ठिकाण आहे. पानगावचे विठ्ठलमंदिर हे शिल्पकलेप्रमाणेच वास्तुकलेतही प्रसिध्द आहे. या मंदिराबाबत कठारे आणि नगराळे म्हणतात, "पानगाव येथील जिल्हा परिषदेच्या जवळच चालुक्य काळातील 'विठ्ठल मंदिर' आहे. या मंदिरावर होयसळ शैलीचा प्रभाव पडल्याचे जाणवते. हे मंदिर जमिनीपासून चार फुट उंचीवर आहे मंदिराच्या समोर नंदिमंडप आहे. त्यामुळे हे मंदिर शिवमंदिर असावे पण आज मात्र या मंदिरात विठ्ठलाची मूर्ती आढळते."[३४] विठ्ठल मंदिर हे प्राचीन काळातही विष्णूचेच असावे पण डॉ. कठारे व नगराळे यांच्यासारखे हे शिवाचे असावे असे अनेकांनी मत मांडले आहे पण ते खोटे वाटते. कारण गर्भगृहात शिवलिंग तर आज अस्तित्वात नाही.पण देवकोष्ट दिसून येते त्यात विठ्ठल व रुक्मिनी यांच्या प्रतिमा दिसून येतात. सहसा शिवाच्या मंदिरात मूर्तीऐवजी शिवलिंग असते. पण मागे देवकोष्ट असल्याने ते विष्णूच्या मूर्तीसाठी निर्माण केल असाव नंतर बाहेर अंतरातील द्वारशाखांवर वैष्णव प्रतिमा दिसून येतात. याच्याही पुढे सभामंडपात अलिकडच्या काळातील का होईना कूर्म स्थापन केले आहे. व वर मंडपाला कमलपुष्प दिसून येते जे बहुतांशी वैष्णव मंदिरात असते मंदिराच्या बाह्य भागावरही वराह, बौध्द व विष्णूच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात दिसतात. यावरुन हे मंदिर आपणाला वैष्णव

---

३४. कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, पृ.३७८

असावे असे म्हणता येते. येथील पुजाऱ्यानेही सांगितले की त्यांच्या आजोबापासून व त्यांच्याही ऐकण्यात या ठिकाणी वैष्णव मंदिरच आहे.

असो या मंदिरावर बाह्य भागात अनेक शिल्प असलेले आपल्या निदर्शनास येतात. त्यामध्ये या मंदिराच्या खूर भागातच पुष्पकांचा एक थर आहे. त्याच्यावर हत्तीचा थर आहे. हा दुसरा थर आहे. पण डॉ. कठारे म्हणतात "मंदिराच्या बाह्य भींतीचा पहिला थर हत्तींचा असून त्यास गजथर म्हणतात."[३५] हे विधान आपणाला चुकीचे ठरविता येईल. याच्यानंतर तिसरा थर पुष्पकांचा आहे. त्यांच्यानंतर वेगवेगळ्या शिल्पांचा थर आहे. पुढे मंदिराच्या मध्यभागात मोठ मोठ्या शिल्पांचा थर आहे. त्यामध्ये सुरसुंदरीच्या अनेक मूर्ती या ठिकाणी आपणाला अभ्यासण्यास मिळतात. यामध्ये मातृदेवता, विष्णूचे विविध अवतार, मदनिका आणि अप्सरांचा समावेश आहे.

या मंदिरावरील सुरसुंदरी वैशिष्ट्यपूर्ण वाटतात या ठिकाणी शुकसारिका, मातृवत्सला, शाल भंजिका, नृत्यांगणा, विनावादिका, चामरधारिणी, डालमलीका, आलसा आदिंच्या मूर्ती चांगल्या हावभावाने कोरलेल्या दिसून येतात. एका शालभंजिका किंवा डालमलीकेच्या हातात फांदी धरलेली आहे. झाडाच्या फांदीला धरलेला उजवा हात आणि डाव्या बाजूला तिचा लहान मुलगा कलाकाराने उभा केला आहे. व उजव्या बाजूला एक माकड तिच्या वस्त्रांना धरुन झोंबत असलेले शिल्प बाह्य भागावर आहे. एवढेच नव्हे तर एका सुरसुंदीने एका हातात चामर आणि दुसऱ्या हातात म्हणजे डाव्या हातात पोपट घेतलेला आहे. आणि तो हात आपल्या स्तनाच्या जवळ आणलेला आहे. तो पोपट त्या स्तनाला आपल्या चोचीने स्पर्श करत आहे. अशा प्रकारची बोलकी चित्रे किंवा शिल्प कलाकाराने येथे अविष्कृत केले आहेत.

सुरसुंदरीविषयी गो.ब. देगलूरकर म्हणतात, "अशा सुरसुंदरीची निर्मिती किंवा त्यांचे अस्तित्व बीड जिल्ह्यातील धर्मापुरी, पानगाव (जिल्हा लातूर) बीड, अंबाजोगाई, केसापूरी

---

३५. तत्रैव.

इ. ठिकाणी मंदिराच्या बाह्यांगावर झालेली असून त्याचाच धांडोळा घेण्याचा हा प्रयत्न सर्वेक्षणाच्या आधारे केला गेला आहे. मध्ययुगीन मंदिरावरील विपूल प्रमाणातील त्यांच्या शिल्पकलेचे श्रेय त्या काळी विलक्षण लोकप्रिय झालेल्या भक्ती संप्रदायाकडे जाते."[३६] यावरुन आपणाला या सुरसुंदरीचा संबंध हा संप्रदायाशी जोडता येतो. पुढे देगलूरकर म्हणतात, "अशा सुरसुंदरी ज्या भावभावना व्यक्त करतात. त्यांच्या भावभावनांच्या अभिव्यक्तींवरुन त्यांचे प्रकार सांगता येतात. यांचे असंख्य प्रकार देता येतील, अलसा, तोरणा, मुग्धा, डालमलिका, पद्मगंधा, दर्पना, विण्यासा, मातृमूर्ती (पुत्रवल्लभा), मर्दला, नुपूर, पादिका, सुंगंधा, लोलावती, जया, विजया, कर्पूर मंजरी, शुभगामिनी, चंद्रावली, शत्रू मर्दिनी, पत्रलेखिका, मेनका, विविचित्ता, पचिनी, गुढशब्दा, गौरी, उर्वशी, रंभा इ. यापैकी सुरसुंदरीचे शिल्पांकन अभ्यासक्षेत्रातील मंदिरावरही आढळते."[३७] यावरुन आपणाला पानगाव आणि धर्मापुरी या ठिकाणी अशा अनेक सुरसुंदरीचा अभ्यास हा बारकाईने करण्यास मदत होते. या ठिकाणी पुष्कळ स्त्री शिल्पे दिसून येतात. ज्यावर आजपर्यंत म्हणावे तेवढे संशोधन केलेले नाही हे सत्य आहे.

### ४.३.५ पानगाव येथील इतर ठिकाणची शिल्पकला :

पानगाव या ठिकाणी विठ्ठल रुक्मिनी मंदिरा प्रमाणेच इतर ठिकाणीही काही शिल्प असलेले आपल्या निदर्शनास येतात. त्यामध्ये प्रामुख्याने तेथील पन्नगेश्वराचे मंदिर आणि पंचकुंड महादेव मंदिर तसेच तेथील हनुमान मंदिर येथे काही शिल्पकलेचे अवशेष पडलेले आपल्या निदर्शनास येतात. त्यामध्ये विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूला एक आधुनिक बालाजी मंदिर आहे. व त्याच्याही डाव्या बाजूला एक प्राचीन काळातील बारव आहे. या बारवामध्ये उतरण्यासाठी दक्षिणेकडून पायऱ्या आहेत. आणि पायऱ्याच्या दोन्ही बाजूंनी चिरेबंदी दगडी भिंती आहेत. बारवाचे जे दक्षिण द्वार आहे त्या द्वाराच्या शिळा टाकलेल्या दिसतात. आणि या

---

३६. देगलूरकर गो.ब., सुरसुंदरी, पृ.७-८
३७. तत्रैव

बारवामध्ये बारमाही पाणी असते. मध्ये उतरताना पायऱ्यांच्या पश्चिमेस एक देवकोष्ट आहे आणि त्यामध्ये एक उमामहेश्वराचे जोड शिल्प आहे हे शिल्प फारच अप्रतिम असलेले आपणाला दिसून येते.

बारवाच्या उत्तर दिशेला एक हनुमान मंदिर आहे. त्या परिसरातही अनेक शिल्पावशेष दिसून येतात. त्यामध्ये गणपती, नागबंध व इतर शिल्प विखूरलेली दिसून येतात. हनुमान मंदिराच्या मागे शेतामध्ये एक पंचकुंड महादेव मंदिर आहे या मंदिरामध्ये छोटा सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह आहे. त्यात सभामंडपात ओबडधोबड स्तंभ उभारलेले दिसून येतात त्या स्तंभावर प्रचंड मोठी शिळा आडवी टाकलेली आहे. अंतराळात काही कोरीवकाम दिसून येत नाही. पण गर्भगृहात एक उत्कृष्ठ शिवलिंग आहे. ज्या शिवलिंगाला जमिनीत चोहिकडून गाडलेले दिसून येते. याच गर्भगृहात पूर्वेकडे तोंड करुन दोन देवकोष्ट आहेत. त्यामध्ये एका देवकोष्टात उमामहेश्वराचे शिल्प आहे आणि दुसऱ्यामध्ये एक नागदेवतेचे शिल्प आहे. हे गर्भगृह थोडे खोल असलेले दिसून येते. मंदिराच्या बाह्य परिसरातही अनेक शिल्पावशेष पडलेले दिसून येतात.

तसेच गावामध्ये एक पन्नगेश्वराचे मंदिर आहे. मंदिराचे अलिकडेच बांधकाम झाले असले तरी त्याच्या गर्भगृहात अतिशय विशाल शिवलिंग आहे. त्या शिवलिंगाला खाली आसन दिसून येते. त्यावर पडलेले पाणी जाण्यासाठी आतल्या भागातून व्यवस्था केलेली आहे. या मंदिराच्या पन्नगेश्वर नावावरुनच गावालाही पानगाव असे संबोधिले जात असावे.

## ४.४ मराठवाड्यातील दुर्लभ खजिना म्हणजे धर्मापुरी आणि पानगावची मूर्तीशिल्पे :

मराठवाडा हा तसा पाहिला तर प्राचीन काळापासून या क्षेत्रात पुढे होता. प्राचीन कालखंडात मराठवाड्यात मूलक, अश्मक, भोगवर्धन आदि जनपदे अस्तित्वात होती यापैकी मुलक म्हणजे पैठण परिसरातील गोदा खोरे होय. आजचे भोकरदन हे भोगवर्धन जनपदाचे ठिकाण होते. त्याचबरोबर आजचा नांदेड जिल्ह्याचा काही भाग हा अश्मक जनपदाचा भाग

असावा. यापैकी मूलक जनपदाची प्रतिष्ठाण (पैठण) ही राजधानी होती. भोकरदन, तेर, पैठण तर इकडे जुन्नर, कोल्हापूर, चौल या काळातल्या प्रसिध्द बाजारपेठा होत्या. संपत्तीचा प्रचंड ओघ परदेशातून येत असल्यामुळे या परिसराचे नागरीकरण अधिक प्रमाणात झालेले होते. सातवाहनानंतर महाराष्ट्रात किंवा या परिसरात वाकाटक राजवंशाने राज्य केले यांच्या काळात अजिंठा येथील जगप्रसिध्द लेणी निर्माण झाल्या.

प्रा. सुनिल पुरी म्हणतात, "आठव्या शतकात राष्ट्रकुट सत्तेचा उदय झाला व त्यांनी संपूर्ण मराठवाडा आपल्या वर्चस्वाखाली आणला. आपली राजधानी म्हणून प्रथम वेरुळची निवड केली. या राजवंशाच्या काळात वेरुळ, लातूर, कंधार ही महत्वाची केंद्रे होती. याच वंशातील राजा कृष्ण याने इ.स. ७७३ मध्ये वेरुळ येथील जगप्रसिध्द अप्रतिम कैलास लेणी निर्माण करुन जगाला अचंबित केले."[३८] असा हा असामान्य प्रतिभेतून साकार झालेला व वेगळा एकसंघ पाषाणातून साकारलेला शिवाचा कैलास लेणीचा अविष्कार हा मानव जातीचा सौंदर्याचा सांस्कृतीक ठेवा आता संपूर्ण जगात नोंदविला गेला आहे.

"कंधार ही राष्ट्रकुट राजा कृष्ण तिसरा याच्या काळात उपराजधानी होती. यानंतर या परिसरात कल्याणीच्या चालुक्यांनी राज्य केले. या राजवंशाच्या काळात बनलेली अनेक मंदिरे व शिल्पे याची साक्ष देतात. शिल्पसौंदर्याच्या दृष्टिकोनातून धर्मापुरीची (बीड जिल्हा) शिल्पे अप्रतिम ठरतात. त्याचप्रमाणे नांदेड जिल्ह्यात होट्टल, करडखेड या ठिकाणी चालुक्यांची अनेक मंदिरे व शिलालेख सापडतात."[३९] कल्याणीच्या चालुक्यानंतर यादवांनी या ठिकाणी राज्य केले. देवगिरी ही त्यांची राजधानी होती. या काळात अन्वा, निलंगा, अंबाजोगाई, केज, उदगीर, बीड, औसा, पैठण ही नगरे प्रसिध्दीस आली अंबाजोगाई येथे पुष्कळ मंदिरे याची साक्ष देतात.

---

३८. पुरी सुनिल, मराठवाड्याच्या इतिहासाच्या पाऊलखुणा, पृ.१७
३९. तत्रैव

डॉ. भगवान देशमुख म्हणतात, "धर्मापुरी गावातील येथील शिलालेखांची नोंद न.शे. पोहनेरकर, डॉ. वि.ल कोलते, प्रा. ब्रम्हानंद देशपांडे संशोधकांनी केली आहे. इथे सापडलेल्या ६ लेखापैकी ४ कानडीमध्ये, एक देवनागरीत व एक अवाचनीय आहे. गावाच्या जवळील शेतात सापडलेल्या देवनागरी लिपीत असलेल्या शिलालेखात भूलोक मल्लसोमेश्वर चालुक्याच्या राज्यात धर्मापुरी नावाची जगप्रसिध्द अशी नगरी होती ही नगरी म्हणजे जणू पृथ्वीच्या कपाळावरील तिलक. अनेक तडाग, विहिरी आणि वनराजी यांनी ती आच्छादिली होती. अशा प्रकारचे काव्यमय वर्णन केले आहे. या गावात तत्कालीन वैभवाच्या असंख्य खुणा कला अवशेषाच्या रुपाने गावात विखुरलेल्या दिसतात."[४०] महाराष्ट्रातील कुठल्याही इतर भागापेक्षा मराठवाडा मंदिर स्थापत्य व शिल्पाच्या बाबतीत अधिक संपन्न आहे. प्राचीन शिल्प-स्थापत्य, मूर्तीशिल्पांचे समृध्द भांडार या विभागात दडलेले आहे. खेड्या-खेड्यातून संपन्न मूर्तीशिल्पाचे अवशेष आम्हाला कुणीतरी विचारणार आहेत का ? अशा प्रकारचे प्रश्नचिन्ह करीत आहेत.

भगवान देशमुख पुढे म्हणतात, "महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्यासंबंधी जेम्स बर्जेस, कझिन्स, मेजर गिल फर्ग्यूसन, डॉ. अ.वि. नाईक, डॉ. देगलूरकर जी.बी., डॉ. पती टी.व्ही., डॉ. देव प्रभाकर या विद्वानांनी लेखन केले आहे, यापैकी डॉ. देगलूरकर जी.बी., डॉ. प्रभाकर देव, डॉ. पती टि.व्ही. यांनी मराठवाड्याच्या मंदिर स्थापत्याचा अभ्यास केला. मला सहज मागचा अंक वाचण्यात आला या अंकात डॉ. ए.पी. जामखेडकर यांचा Ancient Structures नावाचा लेख आहे. त्यात महाराष्ट्राच्या प्राचीन स्थापत्य शिल्पाविषयी माहिती आहे. मराठवाड्यातील फक्त औंढा नागनाथ, कंधार, होट्टल या गावांचा फक्त उल्लेख केला."[४१] मग आपणापुढे मराठवाड्यात फक्त हे तीनच ठिकाणे आहेत का असा प्रश्न साहजीकच पडतो. कारण मराठवाड्यात शिल्पकलेने भरलेली कितीतरी ठिकाणे आहेत त्यामध्ये बीड, अंबाजोगाई,

४०. देशमुख भगवान, पूर्वोक्त, पृ.१२८
४१. तत्रैव, पृ.१२८-१२९

लातूर, चारठाणा, धारासूर, जांब, निलंगा, खरोसा, वेरुळ, अजिंठा, औरंगाबाद, पितळखोरे, तेर, मानकेश्वर, उमरगा, धर्मापुरी, पानगाव इ. या कलेच्या भांडारांचा उल्लेख करावा लागतो. आणखीही बारीकसारीक ठिकाणे आपल्या नजर चुकीने वंचित राहिले असतील. त्यांचाही अभ्यास होणे गरजेचे आहे. "मराठवाडा कलेच्या क्षेत्रात संपन्न असला तरी प्रसिध्दीच्या बाबतीत उपेक्षित आहे. उपेक्षित मराठवाड्यातील मंदिर स्थापत्य-शिल्प यांचा अभ्यास डॉ. देगलूरकर, डॉ. देव प्रभाकर, डॉ. पती यांनी केला आहे."[४२] मग अशाच या मराठवाड्यात शिल्पकलेचा दुर्लभ खजिना धर्मापुरी आणि पानगाव या दोन्ही ठिकाणी आपणाला याच्या अभ्यासाअंती सांगता येते. धर्मापुरी आणि पानगाव या दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात मूर्ती किंवा शिल्प हे रस्त्यांवर, शेतामध्ये, मंदिरांच्या परिसरात असे कोठेही सापडतात. खरे तर या दोन्ही ठिकाणांचे उत्खनन होणे गरजेचे आहे.

धर्मापुरी संबंधी अरुणचंद्र पाठक म्हणतात, "धर्मापुरी गावात सुट्या मूर्ती मोठ्या प्रमाणावर आढळतात."[४३] अशाच प्रकारे पानगाव या ठिकाणीही मूर्ती मोठ्या प्रमाणात सापडतात. धर्मापुरी येथे किल्याच्या परिसरात गावाच्या पश्चिमेकडील डोंगरावर, तलावांच्या परिसरात, केदारेश्वर मंदिर व मरळसिध्द मंदिर परिसरात, गावातील रस्त्यांच्या बाजूला अशा प्रकारे सुट्या मूर्ती मोठ्या प्रमाणात आढळतात. या ठिकाणी भरपूर मूर्तीशिल्प सापडतात. केदारेश्वरासंबंधी अरुणचंद्र पाठक म्हणतात, "येथील गर्भगृहाचा तलविण्यास नवरथ आहे. गर्भगृहाच्या तीन भद्रांवर प्रत्येकी एक रथिका आहे. या रथिकांमध्ये केशव, वासुदेव आणि नरसिंहाच्या मूर्ती आहेत. या मंदिरावर शिव, भैरव, पार्वती आणि काली यासारख्या शैव संप्रदायातील देवता दाखविल्या असल्या तरी बहुसंख्य देवमूर्ती वैष्णव आहेत. विशेषतः केशव नारायण, गोविंद, त्रिविक्रम, वासुदेव, जनार्दन यासारखी विष्णूची रुपे दाखविली आहेत."[४४] या मंदिरावरील मूर्ती या कोणाच्या जास्त प्रमाणात आहेत या घटकापेक्षा महत्वाचा घटक म्हणजे या

---

४२. तत्रैव, पृ.१२९
४३. पाठक अ.शं., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, पृ.२०८
४४. तत्रैव.

ठिकाणी किती मोठया प्रमाणात वैष्णव मूर्तीचा खजिना सापडला आहे याची आपणाला खात्री पटते.

या मंदिरावर फारच दुर्मिळ अशा प्रकारचे शिल्प सापडलेले आपल्या निदर्शनास येतात. त्यामध्ये नृसिंहाचे शिल्प हे मोठे बोलके दिसून येतात. भगवान देशमुख म्हणतात, "धर्माच्या अभ्युदयासाठी विष्णूस केंव्हा केंव्हा अवतार घ्यावे लागले. त्यातील काही अंशिक, तात्कालिक तर काही पूर्णावतार आले. नृसिंह हा तात्कालिक अवतार होय."[४५] नृसिंह अवताराचे कथानक कुर्मपुराण, वायू पुराण, पदमपुराणात चांगल्या प्रकारेदिले आहेत. अशा प्रकारचे नृसिंहाचे वेगवेगळे शिल्प या मंदिरावर कोरलेले आपणाला दिसून येते. ही शिल्पकला जीवंत असल्याचा अभ्यासकाला भास झाल्याशिवाय राहत नाही.

धर्मापुरी या ठिकाणी अनेक अशी शिल्पे आहेत. तशाच प्रकारे पानगाव या ठिकाणीही सुरसुंदरीची अद्वितीय अशी शिल्पे येथील विठ्ठल मंदिराच्या भोवती आहेत. आणि तेथील ज्या पुष्पांच्या जाळ्या आहेत. त्या जाळ्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामुळे येथील विठ्ठल मंदिराची शोभा वाढून दिसते. तशाच प्रकारे धर्मापुरीच्या मंदिरावरही अशाच प्रकारे एक शिल्पपट कोरत असलेल्या महिलेचे शिल्प कलाकाराने निर्माण केले आहे. ती महिला एक पत्रलेखिका आहे. याविषयी डॉ. देव प्रभाकर म्हणतात, "मंदिराच्या मंडोवरावर पत्र लिहणाऱ्या स्त्रियांच्या अनेक प्रतिमा आढळतात. त्यातील उत्कृष्ट शिल्प म्हणून धर्मापुरी येथील केदारेश्वराच्या मंदिरावर असलेली पत्रलेखिकेची प्रतिमा आहे."[४६]

ही पत्रलेखिकेची प्रतिमा केदारेश्वर मंदिराच्या दक्षिण बाजूने पाहिल्यास दिसेल. ही स्त्री पाठमोरी होऊन एक छोटासा शिल्पपट किंवा शिलालेख कोरत असलेली दिसून येते. या शिल्पावरुन आपणाला त्या काळातील महिला या सुशिक्षित असाव्यात असा अंदाज बांधता येतो. एवढेच नव्हे तर धर्मापुरी या ठिकाणी वामनाचे अप्रतिम शिल्प कोरलेले आपणाला

४५. देशमुख भगवान, पूर्वोक्त, पृ.१३०
४६. Deo Prabhakar, Op.cit., p.६४

अभ्यासा अंती पाहावयास मिळते. याविषयी र.रा. बोरकर म्हणतात, "वामन हा विष्णूचा आठवा अवतार राजा बली कडून दानोदक हातावर पडताच वामन अवतार रुपी बटूने त्रिविक्रमाचे रुप धारण केले. या संबंधीचा उल्लेख अनेक पुराणातून मिळतो म्हणजेच दानोदकानंतरचे रुप म्हणजे त्रिविक्रम होय."[४७] हे शिल्प अनेक ठिकाणी मिळाल्याची उदाहरणे आहेत. परंतु दानोदकापूर्वीचे वामनासह बली राजाचे शिल्प वेरुळ येथील शिल्प वगळता महाराष्ट्रात तरीही दुर्मीळच, "म्हणून धर्मापुरी येथील या दानोदकपूर्व वामन-बली शिल्पास अनन्य असे महत्व आहे. वरील विवेचना वरुन वामन अवतार शिल्पाचे दानोदकपूर्व शिल्प आणि दानोदकानंतरचे शिल्प या दोन वर्गात विभागणी करता येते अर्थातच धर्मापुरी येथील शिल्प दानोदकापूर्वीचे आहे हे उघड आहे."[४८]

अशा तऱ्हेने मराठवाड्यातील वैशिष्ट्यपूर्ण शिल्पकलेच्या ठिकाणात या दोन म्हणजे धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणांनी आपले स्थान आपल्या येथील शिल्पकलेवरुन प्राप्त केलेले दिसून येते. हे येथील दुर्लभ शिल्पकलेच्या अवशेषांवरुन अभ्यासता येते.

## ४.५ विभिन्न मूर्तशिल्पांचा अभ्यास :

धर्मापुरी आणि पानगाव ही ठिकाणे अनुक्रमे बीड आणि लातूर जिल्ह्यातील आहेत. या ठिकाणी अनेक मंदिरे असून मूर्तीशिल्पांचे अवशेष मोठ्या प्रमाणात तेथे पाहावयास मिळतात. तेथील मूर्तीशिल्प ही अनेक प्रकारची आहेत यांचा आपणाला सखोलपणे अभ्यास करावयाचा आहे. त्यामध्ये अनेक प्रकारच्या संप्रदायाचे शिल्प आपणाला अभ्यासण्यास मिळतात.

### ४.५.१ वैष्णव मूर्तीशिल्प :

वैष्णव मूर्ती धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणांवर मोठ्या प्रमाणात सापडतात. विष्णुचे विविध अवतार झालेले त्यावरुन स्पष्ट करण्यात येते. र.रा. बोरकर म्हणतात,

---

४७. बोरकर र.रा., धर्मापुरी येथील - दुर्मिळ शिल्प, पृ.१८५

४८. तत्रैव, पृ.१८६

"धर्माच्या अभ्युदयासाठी केंव्हा केव्हा वेगवेगळे अवतार घ्यावे लागतात. हे अवतार सामान्यतः दहा समजत असले तरी ग्रंथात ते कधी १८ तर कधी २२ सांगितले असून क्वचित ही संख्या वाढविली जाते उदा. मत्स्यपुराणाने यज्ञ, नरसिंह, वामन, दत्तात्रय, माधव, परशुराम, राम, वेदव्यास, बुध्द, कली असे दहाच अवतार सांगितले असले तरी त्यांच्या नावात आणि मत्स्यादी सामान्य नामावलीत फरक आहे."[४९] याच्याही पुढे जाऊन ते असे सांगतात, "विष्णूधर्मोत्तरात सर्व अवताराचे एकत्र परिगणन केले नसले तरी हंस, मत्स्य, कुर्म, वराह, नरसिंह, वामन, त्रिविक्रम, परशुराम, राम, बलराम, कृष्ण, व्यास, दत्तात्रय, पशु, मोहिनी, कपिल, हयग्रीव, नरनारायण, धन्वंतरी अशी रुपे कशी असावी हे त्यात सांगतिले आहे."[५०] अशा प्रकारची अवतार शिल्पे बऱ्याच प्रमाणात चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात अवतारशिल्पे सुप्रसिध्द मार्कंडी येथील देवालय समुहातील दशावतार मंदिरात बघावयास मिळतात. यातली अनेक शिल्पे ही धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणांवर देखील येथील मंदिरावर शिल्पीत केलेले आपल्याला अभ्यासावरुन समजते. विष्णूची शिल्पे किंवा त्यांचा उल्लेख शिवाप्रमाणेच प्राचिन आहे. जसे की, वा.वि. मिराशी म्हणतात, "घोसुंडी (चित्तोडगड जिल्हा) येथे संकर्षनाचे (बलरामाचे) आणि वासुदेवाचे (कृष्णाचे) देवालय ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात होते हेही एका कोरीव लेखावरुन समजते."[५१] सातवाहनाच्या आरंभीच्या काळात वासुदेव व बलराम यांची पुजा प्रचलित होती हे नानेघाटातील नागणिकेच्या लेखाच्या आरंभी त्यांना नमन आहे. त्यावरुनही स्पष्ट दिसते यावरुन वैष्णव सांप्रदायाचे अवशेष प्राचीन काळात अनेक ठिकाणी मिळता हे, तेवढेच सत्य मानता येते. विष्णूच्या अनेक शिल्पांचा आपणाला अभ्यास करता येतो. वैष्णव शिल्पांच्या प्राचीनते बद्ल अनेकांनी आपली मते मांडली आहेत. त्यामध्ये आर. चंपकलक्ष्मी म्हणतात, "दक्षिण भारतात विष्णू प्रतिमा इ.स. तिसऱ्या-चौथ्या शतकात निर्माण करण्यास प्रारंभ झाला असावा. नागार्जून कोंडा येथील उत्खननात सापडलेल्या एका शिलालेखात तिसऱ्या-चौथ्या

४९. बोरकर र.रा., चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील मूर्तीशिल्प वैभव, पृ.१०६
५०. तत्रैव, पृ.१०७
५१. मिराशी वा.वि,, सातवाहन आणि पश्चिमी क्षेत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, पृ.११३

शतकांत आंध्र प्रदेशात असलेल्या एका अष्टभूज विष्णूच्या काळशिल्पाचा उल्लेख मिळतो"[५२] विष्णूची चोवीस रुपे मानली जातात. बी.एस. देशमुख म्हणतात, "केशव हे त्यापैकीच एक परंतु पहिल्या क्रमांकाचे रुप आहे."[५३] शंख, चक्र, गदा व पद्म ही केशवाची लांछने म्हणजेच आयुधे आहेत. अशी आयुधे असलेली शिल्पे ही केदारेश्वराच्या मंदिरावर सापडतात. सात्विक भावाच्या मूर्ती येथे दिसतात तसेच द्वारशाखांवर ही यांचा प्रभाव दिसतो. तुकाई देवीच्या मंदिराच्या द्वारशाखांवरही वैष्णव प्रतिमा धर्मापुरीत आहेत आणि पानगाव येथील विठ्ठल मंदिरावरही गदाधारी नृसिंहाच्या प्रतिमा दिसतात.

नी.पु. जोशी म्हणतात, "विष्णूच्या मान्यतेचे धागेदोरे ऋग्वेदापर्यंत पोहचलेले आहेत. ऋग्वेदाच्या एकूण सहासुक्तात त्याचे उल्लेख मिळतात."[५४] धर्मापुरी या ठिकाणी वैष्णवांच्या अनेक मूर्ती पहावयास मिळतात. त्यामध्ये, मुरारीकृष्ण, विष्णू, नृसिंह व त्यांचे अनेकप्रकार त्या ठिकाणी पहावयास मिळतात. विदारक नृसिंह त्या ठिकाणी आहे. व बसलेल्या स्वरुपात अनेक नृसिंह मूर्ती आपणाला केदारेश्वर आणि विठ्ठल मंदिरांच्या देवकोष्टात पहावयास मिळतात तसेच वामन अवतारांचे विष्णूचे शिल्प बळीराजासोबत दाखविले आहे. तसेच संकर्षनाचेही शिल्प मरळसिध्द मंदिरावर आहे. वराह अवताराचे शिल्प विठ्ठल मंदिराच्या कोष्टकात आहे आणि तेथेच बौध्द अवताराचे शिल्पही आपणाला अभ्यासण्यास मिळते ते बसलेल्या स्वरुपात तसेच विष्णूच्याच नावाने धर्मापुरी या ठिकाणी मिळालेला शिलालेख लिहण्यास प्रारंभ केलेला आपणाला समजतो. त्या शिलालेखावर विष्णूचे शिल्प कोरलेले देखील आहे. ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, "लेखाच्या प्रारंभीच श्री. विष्णूची स्तुती असून त्यात समुद्रातून उत्पन्न होणाऱ्या (समुद्रजाती) शंख, सोम, लक्ष्मी, कौस्तुभरत्न इत्यादी वस्तुंचा उल्लेख आहे. पण बराचसा भाग फुटल्यामुळे हा भाग नीट वाचता आला नाही. याच्यानंतर नरश्रेष्ठ ज्या वंशात जन्माला येतात तो चालुक्य वंश तिन्ही लोकांत श्रेष्ठ आहे असे वर्णन आले

---

५२. Champaklakshimi R., Visnava Concept in Early Tamilnadu, p.७३३
५३. Deshmukh B.S., Iconography of Hindu Temples in Marathwada, p.३२
५४. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.४५

आहे."[५५] विष्णूची एक अप्रतिम मूर्ती धर्मापुरीच्या पश्चिमेकडील टेकडीवर महाबळेश्वर मंदिराजवळ आहे. त्या मूर्तीच्या हातात शंख, चक्र, गदा ही आयुधे आहेत. धर्मापुरी या ठिकाणच्या केदारेश्वर मंदिरासंबंधी अरुणचंद्र पाठक म्हणतात, "गर्भगृहाच्या द्वारावरील वैष्णव द्वारपाल, भद्रांवरील देवकोष्ठामधील मूर्ती आणि मोठ्या संख्येने आढळणाऱ्या वैष्णव शिल्पाकृतींवरुन हे मंदिर मुळात विष्णुचे असल्याचे निःसंदिग्धपणे स्पष्ट होते."[५६] आणि मंदिराच्या अभ्यासावरुन आपणाला ही हे मंदिर वैष्णव धर्मीय अर्थातच विष्णूचे असावे असे स्पष्ट करता येते. यावरुन या ठिकाणांवरील वैष्णव मूर्तीशिल्पांचा आपणाला अभ्यास होतो.

### ४.५.२ शिव मूर्तीशिल्पे :

पुर्वीच्या काळी देवतासंघ जरी एकेश्वरवादाचे समर्थन करीत असला तरी त्याचे मूळ आधार शिव, विष्णू व ब्रम्हदेव हे आहेत. यापैकी पुढे ब्रम्हदेवाचे महत्व कमी होऊन त्यांची जागा शक्ती सूर्य व गणपती यांनी घेतली व पंचदेवोपासना रुढ झाली आता आपण त्यातील शिवाचा विचार करु.

धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी शिवाच्या प्रतिमा मोठ्या प्रमाणात मिळतात तसेच शिव पुजेची दुसरी पध्दत म्हणजे शिवलिंगे देखील मोठ्या प्रमाणात दिसून येतात. येथे शिवपुजा चांगल्या प्रकारात होत असावी. या शिवपुजेचे संदर्भ फार प्राचीन काळापासून मिळतात. नी.पु. जोशी म्हणतात, "सिंधु नदीच्या खोऱ्यात ज्या प्राचीन वसाहतीचे अवशेष सापडले आहेत त्या वसाहतीच्या वेळेपासून लिंगपुजा या देशात चालत आली असे म्हणता येते."[५७] तसेच श्रीसंपूर्णानंद वर्मा यांनी अनेक पाश्चात्य लेखकांच्या मतांचा आधार घेऊन आपल्या ग्रंथात हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. की जगाच्या कानाकोपऱ्यांत वासना आणि प्रजनन या दोन कारणामुळे लिंगपुजेचा प्रसार झाला होता. असे स्पष्टीकरण दिले. पुढे नी.पु. जोशी म्हणतात, "शिव पुजनाचे दुसरे प्रतिक म्हणजे शंकराची मानवाकार प्रतिमा हे होय हिचा

---

५५. देशपांडे ब्रम्हानंद, पूर्वोक्त, पृ.२५
५६. पाठक अ.शं., पूर्वोक्त, पृ.२०९
५७. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.१३३

देखील प्रारंभ सिंधु-सभ्यतेच्या वेळेपासून झालेला असावा असे वाटते. सिंधूच्या खोऱ्यातून मिळालेल्या एका ठशावर पशुपती शिवाचे अंकन आहे. असे मत सर्व प्रथम सर जॉन मार्शल यांनी प्रतिपादिले."[५८] असा हा इतिहास शिव देवतेच्या किंवा शिवाच्या पुजनाचा आपणाला सांगता येतो. अशाच प्रकारे भारतात फार मोठ्या प्रमाणात शिव प्रतिमा आणि शिवलिंगे सापडतात. त्यात मराठवाड्यात तीन ज्योतिर्लिंग तसेच कंधार, होट्टल, धारासूर, लातूर, निलंगा, उमरगा, तेर, माणकेश्वर, पानगाव, धर्मापुरी, चारठाणा, अंबाजोगाई, परळी, औंढा, वेरुळ, बीड अशा अनेक ठिकाणी शिवाची मंदिरे व त्याची प्रतिमा किंवा प्रतिके सापडतात. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी पुष्कळ शिवलिंग आणि मानव आकृती शिवाच्या मिळतात.

या ठिकाणावर मोठ्या प्रमाणात शिवाच्या उमामहेश्वर मूर्ती सापडतात. कठारे व दळवे म्हणतात, "शिवपार्वतीच्या आसन व स्थानक प्रतिमात उमामहेश्वर प्रतिमेचासर्वाधिक प्रसार झालेला आढळतो. मत्स्यपुराण, अपराजितपृच्छा, देवतामूर्तीप्रकरण इत्यादी ग्रंथात उमामहेश्वराचे वर्णन करण्यात आलेले आहे. परस्परांना अलिंगन देत एकाच आसनावर बसलेल्या किवा स्थानक स्थितीत असलेल्या शिवपार्वती प्रतिमेला साधारणपणे उमामहेश्वर या नावाने ओळखले जाते."[५९] अशा प्रकारचे उमा महेश्वराचे पुष्कळ शिल्प हे या दोन्ही गावामध्ये प्राप्त होतात. उमामहेश्वराचे शिल्प हे केदारेश्वराच्या बाह्य भागावरही नवीन बांधण्यात आलेल्या भिंतीत आहे. तसेच किल्याच्या परिसरातही आहे. राम मंदिराच्या समोरील ओट्यावरही आहेत तसे मल्लिकार्जून मंदिरावरही उमामहेश्वर आहे. पानगाव या ठिकाणीही बारवात एका देव कोष्टकात अप्रतिम उमामहेश्वराचे शिल्प सापडते. तसेच शिवलिंग तर जागोजागी प्राप्त झालेली दिसून येतात.

ई. मॅकी नावाचे लेखक म्हणतात, "भग आणि लिंग हे शक्ती आणि शिवाचे प्रत्यक्ष प्रतिक होय. सिंधू संस्कृतीपासून भारतात लिंगपुजा प्रचलित आहे. मोहोंजोदडो आणि हडप्पा

---

५८. तत्रैव, पृ.१३४

५९. कठारे अनिल, दळवे, पूर्वोक्त, पृ.१३१

येथील उत्खननात शंकुच्या आकाराचे व दंडगोलाकार लिंग प्राप्त झाले आहे."[६०] अशा प्रकारे हे शिव आणि शक्तीचे प्रतिक असले तरी शिव आणि शक्ती हे उमामहेश्वराच्या रुपात एकत्र बसलेले या ठिकाणी आपणाला दिसून येतात. तसेच अर्धनारी नरेश्वरातही आपणाला शिव व शक्तीचे दर्शन झाल्याशिवाय रहात नाही. अशा प्रतिमा सर्वप्रथम मथुरेच्या कुशान कलेत मिळतात. पी.एल. गुप्ता म्हणतात, "अर्धनारीनटेश्वराच्या गुप्तकाळातील दोन प्रतिमा अत्यंत सुंदर दिसणाऱ्या मथुरा संग्रहालयात ठेवण्यात आलेल्या आहेत."[६१] अशा या प्रतिमांना ही आपणाला शिव व शक्तीचे प्रतिक म्हणता येईल. त्याच रुपाने येथेही उमा महेश्वर आणि शिवलिंग याचे प्रतिक मानले जाते.

शिवलिंग आणि शिवाच्या उमामहेश्वर शिल्पाबरोबरच धर्मापुरी येथे काही भैरवाच्याही मूर्ती सापडतात. त्यामध्ये मरळसिध्द मंदिरावरील पूर्वाभिमुख भैरव हा हातामध्ये डमरु आणि खटवांग घेऊन उभा दाखविला आहे. एवढेच नव्हे तर केदारेश्वर मंदिरावरही अ.शं. पाठक म्हणतात, "या मंदिरावर शिव, भैरव, पार्वती आणि काली यासारख्या शैव संप्रदायातील देवता दाखविल्या असल्या तरी बहुसंख्य देवमूर्ती वैष्णव आहेत."[६२] भैरवाच्या अनेक मूर्ती धर्मापुरीमध्ये सापडतात. शिवाच्या संहारमूर्तीपैकी एक भैरवमूर्ती होय. शिवपुराणानुसार भैरव हे शंकराचे पूर्ण रुप असून तो सर्व जगाचे भरण करतो आणि रुपाने भीषण आहे. तेवढ्याकरिता त्याला भैरव हे नाव प्राप्त झाले. काळही त्याला वचकतो म्हणून भैरवालाच 'कालभैरव' असेही म्हणतात.

बृजभूषण श्रीवास्तव म्हणतात, "भैरव हा वाराणसी नगरीचा अधिपती मानतात. भैरव हे शिवाच्या विशिष्ट वर्गाचे नाव आहे."[६३] शैव आगमनात शिवाच्या ६४ प्रकारच्या भैरवाचा उल्लेख आढळतो. शिवाच्या भैरव रुपातील मूर्ती सामान्यपणे उत्तर भारतात प्राप्त

---

६०. Mackey E., Further Excavation at Mohenjodaro, p.२६०

६१. गुप्ता पी.एल., गुप्त साम्राज्य, पृ.५७०

६२. पाठक अ.शं., पूर्वोक्त, पृ.२०८

६३. श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तीकला, पृ.७८

झालेल्या आहेत. या मूर्ती नग्न भयानक मुद्रा, हातात तलवार, शूल अथवा कपाल प्रदर्षित केलेल्या आहेत. दक्षिण भारतातील भैरव मूर्तीत कुत्रा प्रदर्शित केला आहे. कुत्रा हे भैरवाचे वाहन आहे. डॉ. कठारे आणि विजया साखरे म्हणतात, "रुपमंडन आणि विष्णुधर्मोत्तर पुराणात भैरव मूर्तीची लक्षणे सांगितली आहेत. रुपमंडनानुसार आठ हात, हातात तलवार, पाश, शूल, डमरु, कपाल व सर्प आणि एक हात अभय मुद्रेत ही भैरव मूर्तीची लक्षणे आहेत. तर विष्णू धर्मोत्तर पुराणानुसार ढेबरं पोट, बटबटीत गोल व पिवळे डोळे, ओठांतून बाहेर पडणाऱ्या दाढा, नरमुंडाच्या माळा, हत्तीचे चामडे, सापाचे दागिने, हातात निरनिराळी शस्त्रे तीक्ष्ण नखे आणि ते सर्पाने समोर असलेल्या पार्वतीस भयभीत करीत असलेले प्रदर्शन ही भैरव मूर्तीची लक्षणे आहेत. भैरवाची बरीच रुपे आहेत. परंतु त्यात 'अष्ठभैरव' म्हणून ओळखली जाणारी आठ रुपेच प्रसिध्द आहेत. भैरवाच्या आसण व स्थानक स्थितीतील मूर्ती भारताच्या विविध भागात मिळाल्या आहेत."[६४] अशा भैरवाच्या मूर्ती चालुक्य राजांच्या काळातील नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यात होट्टल या ठिकाणीही आहेत. चालुक्यांच्याच काळात धर्मापुरी याही ठिकाणी निर्माण झाल्या. जी.बी. देगलूरकर म्हणतात, "अशा आसनस्थ दोन भैरव मूर्ती औंढा येथील नागनाथ मंदिराच्या बाह्य भिंतीवर आढळतात."[६५] भैरवाच्या स्थानक स्थितीतील मूर्ती मात्र तेर येथील त्रिविक्रम मंदिर जागजी येथील देवी मंदिर, होट्टल येथील रेब्बेश्वर मंदिरावर आढळतात. बी.एम. देशमुख म्हणतात, "भैरवाच्या मूर्ती निलंगा येथील निळकंठेश्वर मंदिरावरही आढळतात."[६६] आणि "धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिराच्या बाह्य भिंतीवरही आढळतात."[६७] अशा प्रकारे शिवाच्या अनेक मूर्तीप्रकारात भैरवलाही मूर्तीशास्त्रात किती महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते याचा अंदाज येतो. शिवाच्या उमामहेश्वर, शिवलिंग आणि भैरव मूर्ती या भागात सापडतात. पण याची फारशे काही लेखक सोडले तर इतरांनी दखल घेतलेली दिसून येत नाही.

---

६४. कठारे अनिल, साखरे, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, पृ.१२०

६५. Degloorkar G.B., Temple Architecture and Sculpture, p.१२२-२३

६६. Deshmukh, B.S., Op.cit., p.११३

६७. Ibid, p.११४

## ४.५.३ नंदी आणि नाग मूर्तीशिल्प :

धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागमूर्तीशिल्पे आणि नंदीची शिल्पे सापडली आहेत. भारतीय लोकधर्माचे नागपुजन हे एक जुने रुप आहे. नागांचा उत्सव नागमह या नावाने ओळखला जात असे. आज जरी हजारो वर्षे उलटून गेली असली तरी नागाची पकड अजूनही ढिली झालेली नाही. नाग पुजेला जैन, ब्राम्हण, बौध्द धर्मात मान्यता मिळाली नी.पु. जोशी म्हणतात, "नागाशी संबंध असलेल्या देवांना मानव रुपांसह नागरुपात दाखविण्याची पध्दत इसवीसनाच्या कमीतकमी दोन शतके आधीपासून होती. भरहूत, सांची, अमरावती वगैरे ठिकाणीच्या कलाकृतीत सर्पफणा असलेले नाग किंवा नागस्त्रिया किती तरी दिसतात. मथुरा हे कुषाण काळातील नागपुजेचे एक मोठेकेंद्र होते."[६८] यांच्या प्रमाणे देशाच्या अनेकभागात नागपुजा असलेली दिसून येते. यांच्या पूर्वी सिंधू संस्कृतीतही अशा प्रतिमा सापडलेले आपणाला काही पुरावे हाती लागतात. जॉन मार्शल म्हणतात, "मोहोंजोदडो येथील उत्खननातही नागमूर्ती मिळाल्या आहेत. त्यांतील बऱ्याच मूर्ती अर्धनग्न व अर्धमानव या स्वरुपाच्या आहेत."[६९] अशा नागमूर्ती या प्राचीन काळापासून निर्माण केल्या गेल्यामुळे त्या नागांची देवता म्हणून पुढे पुजा होऊ लागली कुठे-कुठे गर्भगृहात नागाची शिल्पे मिळतात. एवढेच नव्हे तर नाग देवतेचे मंदिरेही मिळतात. जसे की ह.धी. सांकलिया म्हणतात, "मथुरेजवळ सोंख येथे विटांनी बांधलेले नागमंदिर होते."[७०] एवढेच नव्हेतर धर्मापुरी येथे मरळसिध्द मंदिरात गर्भगृहात शिवलिंगासोबतच सात फणा असलेले नागशिल्प आहे. तसेच पानगाव येथेही पंचकुंड महादेव मंदिरात अशाच प्रकारचे एक नागशिल्प शिवलिंग आणि उमामहेश्वर मूर्ती सोबतच स्थापन केलेले दिसते.

पानगाव येथे हनुमान मंदिर परिसरातही आणि पन्नगेश्वर मंदिर परिसरात ही शिल्पे सापडतात. तसेच धर्मापुरी येथे एक चकीत करणारे नागशिल्प तुकाई देवीच्या मुखमंडपात

---

६८. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३१६

६९ Marshall John, Annual Report, Archeological Survey of India, p.४६

७०. सांकलिया ह.धी., भारतीय पुरातत्व - एक समालोचन, पृ.२१

स्तंभावर पाच तोंडी फणा असलेले नागशिल्प बोलके वाटते. तसेच मरळसिध्दाच्या मंदिराच्या भिंतीत बलरामासोबत नऊ फण असलेला नाग डोक्यामागे अप्रतिम कोरला आहे. अशाच प्रकारे नागप्रतिमा नांदेड जिल्ह्यात शिराढोण, मानसपुरी, घोडज, रायवाडी व जंगमवाडी येथे सापडतात. तसेच दळवे अरुण म्हणतात, "नांदेड जिल्ह्यात कंधार येथेही नागमूर्ती अर्धनाग आणि अर्धमानव अशा स्वरुपाच्या मिळालेल्या आहेत."[७१] धर्मापुरी येथे काही जैन शिल्पांचाही नागाशी संबंध असलेल्या मूर्ती प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारे आपणाला नाग मूर्तीशिल्पांचा सखोल अभ्यास होतो.

नागाप्रमाणेच नंदीची (वृषभ) शिल्पे मोठ्या प्रमाणात सापडतात. नंदीचीही पुजा केली जाते. शिव आणि त्याचा बैल याचा संबंध जुन्या काळापासून दिसतो. नी.पु. जोशी म्हणतात, "ह्या वृषाची स्थापना शिवलिंगासमोर करतात समोर बैल नसलेल्या पींडीची पुजा साधारणपणे वर्ज्य मानलेली आहे. त्यामुळे असे तुहिमाचल शिवाचे मंदिरात सभामंडपात असलेला बैल हा अवश्य दिसतो."[७२] शिवाचे वाहन असलेला हा नंदी धर्मापुरी येथील उमामहेश्वर शिल्पात दिसून येतोच. परंतु इतरत्रही तो दिसतो मरळसिध्दाच्या मंदिरासमोर नंदी आहे. तसेच राम मंदिर परिसरातही नंदी दिसून येतात. पानगाव आणि धर्मापुरी येथे नंदी बहुतांशी बसलेल्या स्थितीतच दिसून येतात. पण धर्मापुरी येथे बँकेच्या उजव्या बाजूला एक ओटा आहे. त्या ओट्यावर एका शिल्पात नंदी हा शिवलिंगासमोर उभा दाखवलेला आहे. टी.ए. गोपिनाथराव म्हणतात, "शंकराच्या म्हणजेच शिवाच्या बैलाला 'नंदी' या नावाने ओळखले जाते."[७३] शिवाच्या एका प्रसिध्द गणाचे नावही नंदी होते. "लिंगपुराणानुसार त्यास तीन डोळे व चार हात आहेत आणि मुकुटावर चंद्र आहे 'सुयशा' हे त्यांच्या पत्नीच नाव आहे."[७४] रामायनानुसार नंदी हा वानरमुख आहे. अशा या नंदीच्या मूर्ती भारतात मोठ्या प्रमाणात

---

७१. दळवे अरुण, राष्ट्रकुटकालीन कंधार, पृ.२२८

७२. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३२२

७३. Gopinathrao, T.A., Elements of Hindu Iconolography, Vol.II, p.४६.

७४. Ibid, p.४५८.

सापडतात. मराठवाड्यातही लातूर बीड, नांदेड, औरंगाबाद, आदि जिल्ह्यात महादेवांच्या ठिकाणी नंदीच्या मूर्ती सापडतात त्याला धर्मापुरी आणि पानगाव ही ठिकाणे अपवाद नाहीत.

### ४.५.४ मूर्तीशिल्पातील ब्रम्हदेव :

भारतात इतर देवतांप्रमाणे ब्रम्हदेवाचीही मंदिरे बांधण्यात आली. परंतु ती तुरळक प्रमाणात आढळतात. ब्रम्हदेवालाच परमेश्वर या नावानेही उल्लेखिले जाते. के.आर. श्रीनिवासन म्हणतात, "दक्षिण भारतात प्रथम ब्रम्हदेवाची उपासना आणि आणि पुजा केली जात होती. दक्षिण भारतात ब्रम्हदेवाची मंदिरेही बांधण्यात आली होती. त्यानंतर तो अपूज्य होऊन इसवीसनाच्या १० व्या शतकाच्या सुमारास ब्रम्हदेवाची पुजा लुप्त होऊन त्याचे स्थान सुब्रम्हणम देवतेने घेतले"[७५] पूर्वी शिव, विष्णू व ब्रम्हदेव यांची एकत्र पुजा होत असे पण शिव व विष्णू हे प्रभावी बनत गेले पण ब्रम्हदेव मात्र भविष्यात अपुज्य ठरत गेला. प्रारंभिक चोल राजघराण्याच्या कालखंडात निर्माण झालेल्या नर्तमल्लई व "तिरुकतल्लईच्या मंदिरात दक्षिण भारतात ब्रम्हदेवाचे स्वतंत्र अस्तित्व होते."[७६]

तसेच बदामी आणि एहोळ या ठिकाणीही ब्रम्हदेवाच्या मूर्ती प्राप्त झाल्या आहेत. या ठिकाणी बदामीच्या चालुक्यांच्या काळात चांगल्या प्रकारचा कलेला राजश्रय मिळाला होता. महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी ब्रम्हदेवाच्या मूर्ती मिळाल्या आहेत. "नागपूर जिल्हयातील उमरेड तालुक्यात मांढळ येथील उत्खननात ब्रम्हदेवाची मूर्ती मिळाली आहे."[७७] महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन म्हणून या मूर्तीचा उल्लेख करावा लागतो. भारतामध्ये गुजरातमध्ये खेटब्रम्हा आणि राजस्थानातील पुष्कर येथेही ब्रम्हदेवाची मंदिरे आहेत. तसेच बंगाल आणि उत्तर भारताच्या इतर भागांत चतुर्भूज ब्रम्हाच्या मूर्ती जास्त प्रमाणात आढळतात.

मग अशाच प्रकारे मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात धर्मापुरी या ठिकाणीही ब्रम्हदेवाच्या तीन तोंडी मूर्ती दिसून येतात. त्यामध्ये केदारेश्वर मंदिराच्या पूर्वेकडील भागात

---

७५. Shrinivasan K.R., Temples of South India, p.१०९
७६. Ibid, p.१५
७७. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३०५

देवकोष्टकातील विष्णू प्रतिमेपासून पाचव्या क्रमांकाचे ब्रम्हदेवाचे शिल्प अप्रतिम आहे. त्यावर तीन तोंडे आहेत आणि ब्रम्हदेवाची दाडीही स्पष्टपणे नजरेत भरते. तसेच गर्भगृहात एक सुटी मूर्तीही ब्रम्हदेवाची ठेवलेली दिसून येते धर्मापुरी आणि अंबाजोगाई रोडला जाताना उजव्या बाजूच्या टेकडीवर एका ओट्यावर बरीच शिल्पे आहेत. त्यामध्ये एक ब्रम्हाचे शिल्प सापडते. अशा प्रकारे देशाच्या अनेक भांगाप्रमाणे धर्मापुरी या ठिकाणीही ब्रम्हदेव शिल्प दहाव्या शतकानंतरही सापडतात. हे महत्वाचे आहे.

### ४.५.५ मूर्तीशिल्पातील सूर्य :

धर्मापुरी आणि पानगाव यापैकी धर्मापुरी या ठिकाणी सूर्याच्या प्रतिमा दिसून येतात. पण त्या मानवाकृती नसून त्यांचा आकार हा गोल म्हणजे उगवणाऱ्या सूर्यासारखाच आहे तसेच चंद्राच्याही प्रतिमा सापडतात. भारतात सूर्याच्या प्रतिमा कलेच्या क्षेत्रात शुंग काळापासून मिळतात. बुध्दगयेच्या (बिहार) एका वेदिका स्तंभावर तो रथारुढ दिसतो अशाच प्रतिमा यु.पी. शाह म्हणतात, "अनंतगुंफेच्या (ओडिसा) द्वारावरही तो आढळतो. या प्रतिमा शुध्द भारतीय धर्तीच्या आहेत."[७८] सूर्य हा आपल्या प्रकृतीच्या आदिम शक्तीपैकी एक आहे. सूर्य उगवताच अंधकार नष्ट होतो. त्यामुळे मनुष्याने सूर्याला सर्वप्रथम देवत्व प्रदान केले. म्हणूनच इ.बी. टायलोर म्हणतात, "त्यामुळेच जगाच्या सर्व प्राचीन संस्कृतित सूर्याच्या उपासनेची पंरपरा प्रचलित होती."[७९]

भारतात सूर्योपासनेचा आरंभ केंव्हा झाला, हे निश्चित सांगणे कठीण आहे. तरीही व्ही.सी. श्रीवास्तव म्हणतात, "नवपाषाणयुगीन संस्कृतित सूर्योपासनेच्या अस्तित्वाचा उल्लेख विचारकद्वारा केला गेला होता."[८०] वैदिक काळात भारतीय समाजात सूर्याला अत्यंत महत्वाचे स्थान होते. या काळात सूर्यपुजा प्रचलित होती. सूर्यपुजेची हीच प्रतिमा किंवा परंपरा पुढे अव्याहतपणे चालू राहिली. विष्णूधर्मोत्तर पुराणात सूर्याचे अनेक लक्षणे सांगितली आहेत.

---

७८. Shah U.P., Studies in Jain Art, p.७
७९. Tylor E.,B., Religion Primitive Culture, ३७२
८०. Shrivastav V.C., Sun-worship in Ancient India, pp.२३-३०

बीड जिल्ह्यातील धर्मापुरी या ऐतिहासिक ठिकाणी देखील सूर्य पुजक होते. त्यामुळे त्याच्या त्या ठिकाणी मानवाकृती प्रतिमा जरी नसल्या तरी त्याच्या गोल आकाराच्या प्रतिमा काही ठिकाणी मिळतात. जसे की, धर्मापुरीतील बँकेच्या दक्षिणेला किल्याकडे जाणाऱ्या मार्गावर एक मूर्ती ठेवलेला ओटा आहे. त्यावर एकाच शिल्पात एक स्त्री-पुजक प्रतिमा आहे. त्यात सूर्य शिवलिंग आणि बैल अशा प्रतिमा दाखविल्या आहेत. एवढेच नव्हे तर धर्मापुरीचा अत्यंत महत्वाचा पुरावा म्हणजे तेथे सापडलेला शिलालेख चालुक्य राजा तिसरा सोमेश्वराविषयी माहिती सांगतो. त्या शिलालेखावर सुरुवातीला विष्णूची प्रतिमा आहे. आणि त्याच्या दोन्ही बाजूंना सूर्य आणि चंद्र प्रतिमा असलेल्या दिसून येतात.

यावरुन येथील लोक चालुक्यांच्या काळात सूर्याचे ही उपासक असलेले आपल्याला लक्षात येते हे सत्य नाकारता येत नाही.

### ४.५.६ मूर्तीशिल्पातील गणेश :

धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी गणेशाच्या पुष्कळ प्रतिमा सापडतात. गणपती ही भारतातील प्राचीन देवता आहे. या देवतेचा प्रथम उल्लेख वेदात येतो. गणेशपुराणात त्याच्या उत्पत्तीच्या शेकडो कथा दिल्या आहेत.विघ्ननाशक व मंगलकारी देव म्हणून या देवतेचे अस्तित्व आहे. शिव आणि पार्वती पुत्र म्हणून गणेशाकडे पाहिले जाते विघ्नविनायक, विघ्नेश्वर, विघ्नराज, शूर्पकर्ण, सिध्दीनायक, गजमुख, एकदंत, वक्रतुंड व लंबोदर इ. नावानेही गणपतीला ओळखले जाते. गणपतीला सिध्दी व बुध्दी अशा दोन पत्नी होत्या. गणपती ही मुळची आर्येत्तर देवता आहे.

प्रा. फौचर यांच्या मते, "काही अर्येतर गण किवा समूह हत्तीचा पुजा करित असत. त्या पुजेतून गणेशपुजा विकास पावली गणेश ही प्रारंभी आर्येत्तरांची देवता होती. आर्यत्तरांची ही देवता पुढे वैदिकांनी स्वीकारली."[८१] शिवाप्रमाणेच महाराष्ट्रात गणपती पुजा सातवाहन काळापासून रुढ झालेली होती. डॉ.रा.श्री. मोरवंचीकर यांच्या मते, "सातवाहन काळात गणपती

---

८१. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड २, पृ.७००

हे दैवत रुढ असले तरी लोकप्रिय नव्हते. साहित्यात त्याचे संदर्भ येतात. तथापित्याची प्रतिमा मात्र आढळत नाही."[८२] इसवीसनाच्या सहाव्या सातव्या शतकात गणपतीची प्रतिमा आस्तित्वात येऊ लागली. असे मत डॉ. मधुकर ढवळीकर, डॉ. दिनेश चंद्रसरकार आणि ह.धी. सांकलिया यांनी नोंदविले आहे.

तसेच बीड जिल्ह्यातील धर्मापुरी आणि लातूर जिल्हयातील पानगाव या ठिकाणी दहाव्या शतकाच्या नंतर गणेश मूर्ती बनविल्या गेल्या. त्या मूर्ती या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आढळतात. केदारेश्वर मंदिर, तुकाई मंदिर, विठ्ठल मंदिर पानगाव यांच्या प्रवेशद्वारावरील चौकटीत गणेश प्रतिमा दिसून येतात. एवढेच नव्हे तर राममंदिर परिसर, मरळसिध्द परिसर, धर्मापुरी गावात इतरत्र आणि पानगाव परिसरात सुट्या मूर्ती मोठ्या प्रमाणात आहेत. येथे मिळणाऱ्या गणपतीच्या मूर्ती बहुतांश चतूर्भूज सापडतात. आणि बसलेल्या किंवा आसनस्थ प्रकारात मोडणाऱ्या आहेत. या मूर्तीच्या हातात साधारणतः पाश, अंकुश, परशु, मोदक, कमंळ वगैरे प्रतिके सापडतात किंवा दिसतात.

अशा प्रकारे भारतात इतरत्र किंवा भारताबाहेरही गणेश प्रतिमा सापडतात. तशाच प्रकारे या स्थानिक ठिकाणावरही गणेश प्रतिमा किंवा मूर्ती मोठ्या प्रमाणात मिळतात. याचा संशोधकांना अभ्यास करता येतो.

### ४.५.७ मूर्तीशिल्पांतील शक्तिदेवता :

जगातील प्राचीनतम उपासनेत शक्तीउपासनेला फार महत्व आहे. मानव जीवनात असलेले स्त्रीचे महत्व याचे एक मुख्य कारण असावे. विशेषतः मातेच्या रुपात ती त्याच्या जन्म व संवर्धनाकरिता सदैव जिम्मेदार असते. नी.पु. जोशी म्हणतात, "भारत आणि भारताच्या बाहेर आलेल्या कित्येक उत्खननात आदिमाता, महीमाता, मातृदेवी, वगैरे नावाने आज ओळखल्या जाणाऱ्या शक्ती प्रतिमा बलूचिस्तान, मेसेपोटामिया, ईराण, तुर्कस्थान, बाल्कनराष्ट्रे सिरिया,

---

८२ मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, पृ.१०२

पॅलस्टाईन, क्रीट आणि ईजिप्त येथे मिळाल्या आहेत."[८३] "भारतात मातृदेवीच्या मूर्तीविशेषतः ई.स. पूर्व २५०० ते ई.स.पू. तिसऱ्या शतकापर्यंत मिळतात."[८४]

पुढे याचे रुप पालटले आणि नवीन परिवर्तने दिसू लागतात. आणि प्रतिमांचा आकारही जास्त सुंदर होतो. फार प्राचीन काळातील या मातीच्या तयार केलेल्या मातृदेवी ह्या पुढील वैशिष्ट्यांनी स्पष्ट करता येतील "संपूर्ण नग्नावस्था जननेंद्रीयांचे विशेष प्रदर्शन, योनिभागांवर मेखला असणे, पूर्ण विकसित स्तनांचे अंकन, पायाखाली उमललेले कमळ ह्या प्रतिमांत हातांची ठेवण अभ्यास करण्यासारखी आहे, मातृदेवीच्या काही मूर्ती कडेवर बालके घेतलेल्या आहेत."[८५] कडेवर बालके घेतलेल्या अनेक मूर्ती केदारेश्वर मंदिर धर्मापुरी आणि पानगावचे विठ्ठल मंदिर यांच्यावर सापडतात. अशा निरनिराळ्या प्रतिमांचा अभ्यास केल्यास असे विधान करता येईल की जुन्या जगात शक्तीची उपासना तीन रुपांत केली जात असे एक तर संपूर्ण दिगंबर रुप, दुसरे तसेच पण बाळांसह आणि तिसरे म्हणजे दिग्वसना स्त्री पण मुखांचे ठिकाणी कमलासारखी फुले, पशु किंवा पक्षांचे तोंड असणे. भारतात विशेष म्हणजे मथुरेला अशा प्रकारच्या बऱ्याच मातीच्या मूर्ती मिळाल्या आहेत.

दक्षिण भारतात चालुक्य, राष्ट्रकुटांच्या काळात या शक्तीदेवतांच्या प्रतिमा निर्माण केल्या गेल्या. मराठवाड्यामध्ये बीड आणि लातूर जिल्ह्यासह नांदेड जिल्ह्यातही शक्ती देवतांच्या मूर्ती प्राप्त होतात. निलंग्याच्या मंदिरावर सप्तमातृकांची शिल्पे मिळतात. तसेच धर्मापुरी या ठिकाणीही सुट्या प्रकारचे सप्त मातृकांचे शिल्पपट मिळतात. या शिल्पपटांवर हुबेहुब सर्व मातृका मूर्ती दिसून येतात. सप्तमातृकांची नावे आपणाला पुढील प्रकारे सांगता येतात. ब्राम्ही-वाहन हंस, माहेश्वरी- वाहन नंदी, कौमारी-वाहन मयूर, वैष्णवी-वाहन गरुड, इंद्रानी-वाहन गज, वाराही-वाहन वराह, चामुंडा-वाहन उलूक (घुबड) अशी नावे आपणाला या सप्तमातृकांची सांगता येतात.

---

८३. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.२१३
८४ तत्रैव
८५. तत्रैव

सप्तमातृका प्रमाणेच या ठिकाणी पारवतीच्या मूर्ती पहावयास मिळतात. ज्याला तुकाई देवी असे संबोधिले आहे. सप्तमातृका असो किंवा कोणत्याही देवीच्या प्रतिमा असून त्यांची पुजा शक्तीदेवता म्हणून भारतीय समाज करत असतो. आणि ही परंपरा फारच प्राचीन होती काही लेखक म्हणतात आर्यांच्याही पूर्वीची होती. लेन एस, बँगडेल यांच्या मते, "मातृदेवतेची पुजा भारतात नेपाळातच नव्हे तर जगातील भूमध्यप्रदेशाच्या भागात, युरोप व प्राचीन मध्य आशियातही प्रचलित होती."[८६] सिंधू संस्कृतित मातृदेवता अत्यंत पूजनिय मानली जात होती. सिंधू संस्कृतीतील मातृदेवता ही प्रजनन शक्ती, सुपिकता, व मातृत्वाची प्रतिकात्मक देवता होती. मातृदेवतेचे प्रधान अस्तित्व महाराष्ट्र आणि कर्नाटकात इतिहास काळाच्या सुरुवातीपासून प्रकर्षाने दिसून येते. सातवाहनांच्या काळातही प्रतिमा मिळतात.

अरुण दळवे म्हणतात, "चालुक्यांच्या काळात मातृदेवतेच्या मूर्ती बहुसंख्येने मिळाल्या आहेत."[८७] तसेच रा.चि. ढेरे म्हणतात, "हिंदू संस्कृतीत याच 'नग्न कबन्ध' मातृदेवतेला 'लज्जागौरी' या नावाने संबोधिले आहे. लज्जागौरी ही मातृदेवी आहे. महामाता आहे विश्वसर्जनाची देवता म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. लज्जागौरी ही सर्जनाची देवता सर्जनेंद्रियाच्या रुपातच पुजिली जात असल्याने तिची मूर्ती हेच विश्वाचे 'गर्भगृह' ठरते. वारुळ प्रतिकातून मातृदेवतेची योनीमूर्ती उत्क्रांत होत गेली, असे मत व्यक्त केले."[८८] अशी ही मातृदेवता संतानप्राप्तीसाठी पुजिली जाते.

याच मातृदेवता नावाच्या शक्तीचे आधुनिक रुप धर्मापुरी या ठिकाणी सापडते ते म्हणजे सप्तमातृका, काली, पार्वती, म्हैशासूरमर्दिनीच्या रुपात पहायला मिळते. काली आणि पार्वती यांच्या मूर्ती केदारेश्वरवर मिळतात. तर पार्वतीच्या काही मूर्ती शिवासोबत उमामहेश्वर रुपात मिळतात. तिच्या हातामध्ये मध्ययुगीन पद्मचक्र आहे. एका हातात कमळ आहे ती मूर्ती चतुर्भूज असून उभ्या स्वरुपात मिळते. तसेच तुकाई देवीचे मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

---

८६ Lain S. Bangdel, The Early Sculpture of Nepal, p. १३

८७. दळवे अरुण, पूर्वोक्त, पृ.१६२

८८. ढेरे रा.चि., लज्जागौरी, पृ.१९६

मंदिरात महिषासुरमर्दिनीची अष्टभूजा मुर्ती आहे. तिच्या हाती पदमचक्र, त्रिशुल, खटवांग, पोत, काल, शंख व राक्षसाचे शिर आहे. याच्या लगतचे अन्य दोन बाजूंनी महिशासूरमर्दिनी मूर्ती बसविण्यात आल्या आहेत. पानगाव येथे मात्र उमामहेश्वराच्या काही मूर्ती मिळतात.

### ४.५.८ मूर्तीशिल्पातील सुरसुंदरी :

आपण धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणावरील मूर्तीशिल्पातील अनेक मूर्तीचा अभ्यास केला. त्यामध्येच आपणाला सुरसुंदरीच्या मूर्ती चाही अभ्यास करावयाचा आहे. सुरसुंदरी म्हणजे नेमके काय असावे तर त्या सुंदर अशा स्त्रिया होत आणि त्यांची शिल्पे ही मंदिरावर शिल्पित केली आहेत. सारांश रुपाने असे म्हणता येईल की, मानवी जीवनाला व्यापलेल्या षडरिपूंपासून काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आणि रुप, गंध, रस, शब्द व स्पर्श यांच्या आसक्ती पासून प्रत्येकाने दूर राहिले पाहिजे हा संदेश तात्कालिक शिल्पकारांनी सुरसुंदरीच्या माध्यमातून मानवापर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. असे सौंदर्य व तत्वज्ञानाचा समन्वय म्हणजे सुरसुंदरी या संशोधक मासिकातील लेखात डॉ. किरण देशमुख म्हणतात,

अशा सुरसुंदरीची निर्मिती किंवा अस्तित्व बीड जिल्ह्यातील धर्मापुरी, पानगाव, बीड, अंबाजोगाई, केसापुरी, इ. ठिकाणच्या मंदिराच्या बाह्यांगावर अत्यंत चांगल्या प्रकारे झालेले. आपल्या लक्षात येते. तत्कालीन कलाकारांची प्रगल्भता यावरुन आपल्या लक्षात येते. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणांवरील मंदिरावर अप्रतिम सुरसुंदरीच्या मूर्ती कोरलेल्या दिसून येतात. गो.ब. देगलूरकर म्हणतात, "धर्मापुरी येथील एक सुरसुंदरी आपल्या साथीदाराच्या बासरीवादनाच्या निनादावर लुब्ध झालेली असून ती सुरसुंदरी नागीणीच्या डूलण्याप्रमाणे अगदी तल्लीन होऊन डुलत असताना दिसते. तिची ही नादमुग्धता पाहणाऱ्यालाही नादमग्न करते अशा या नृत्याला भाषेची, विशिष्ट जातीची, पंथाची वा जमातीची जवळीक लागत नाही, त्याचे विश्वच निराळे असते."[८९] यावरुन किती पुरोगामी स्वरुपाचे शिल्प या ठिकाणी असलेले

---

८९ देगलूरकर गो.ब., पूर्वोक्त, पृ.१६

आपणाला अभ्यासता येते. एवढेच नव्हे तर याच ठिकाणी केदारेश्वर मंदिरावर एका स्त्रीच्या हातामध्ये पोपट असलेली मूर्ती पहायला मिळते तसेच ह्याच प्रकारच्या दोन मूर्ती पानगाव येथील विठ्ठल मंदिरावर पहायला मिळतात. येथील या मूर्ती त्रिभंगामध्ये उभ्या असलेल्या आहेत एका मूर्तीच्या खांद्याच्या जवळ हातावर बसला आहे तो पोपट तोंडाजवळ तोंड आणतो आहे. एका शिल्पात तर तो चक्क स्वतःच्या जवळ आपली चोंच लावत असलेला दिसतो कदाचित पोपटाला त्या ठिकाणी पेरुचा भास होत असावा. अशा शिल्पाला गो.ब. देगलूरकर म्हणतात, "हातामध्ये पोपट असलेली सुरसुंदरी म्हणजे शुकसारिका"[९०] पानगाव येथील पोपट हा आपणाला अति वात्रट असलेला दिसून येतो. तसेच पुढचे सुरसुंदरीचे शिल्प म्हणजे धर्मापुरी येथील केदारेश्वराच्या बाह्यांगावर असलेले तोरणा सुरसुंदरीचे गो.ब. देगलूरकर म्हणतात, "ज्या शिल्पात आपल्या डोक्यावर तोरणासारखे स्वतःचे दोन्ही हात धरलेले असतात त्या सुरसुंदरीला तोरणा म्हणतात."[९१] तोरणेप्रमाणेच जया नावाची सुरसुंदरी मोठ्या प्रमाणात दिसते धर्मापुरी या ठिकाणी केदारेश्वर मंदिरावर बाह्यांगावर तसेच अंतराळाच्या ठिकाणी, तुकाई देवीच्या मंदिराच्या द्वारशाखांवर, पानगाव येथील विठ्ठल मंदिराच्या द्वारावर अशा जयेची शिल्पे दिसतात. अशा सुरसुंदरीच्या हाती जल कुंभ असतो व त्या उभ्या असतात त्याच गंगायमुना देवता असाव्यात.

तसेच रती नावाच्या सुरसुंदरीविषयी गो.ब. देगलूरकर म्हणतात, "तिची स्वतंत्र प्रतिमा अशी जोडिदार मदनासमवेत असलेले शिल्प धर्मापुरी केदारेश्वर, पानगाव-विठ्ठल मंदिरावर आढळतात. या मंदिरावरील तिच्या प्रतिमा अकराव्या ते तेराव्या शतकातील आहेत. मंदिराच्या आवारात रतीसुध्दा विषय भावना टाळते. असे या रतीशिल्प मूर्तीवरुन वाटते. त्यावरुन मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांनी या रती सुरसुंदरीपासून बोध घ्यावा. त्यासाठीच तर मंदिराच्या बाह्यांगावर अशा सुरसुंदरी विराजमान करण्यात आल्या आहेत."[९२] रती प्रमाणेच धर्मापुरी या ठिकाणी विजया किंवा मोहिनी नावाची ही एकच सुंदरी पुरुषांसमवेत

---

९० तत्रैव, पृ.२५
९१ तत्रैव, पृ.२८-२९
९२ तत्रैव, पृ. ४१

अलिंगण मुद्रेत उभी राहिलेली दिसते. याच्याही पुढे जाऊन चालुक्यांच्या काळात स्त्रीया शिक्षण घेत असाव्यात याचा बोध करणारे शिल्प म्हणजे केदारेश्वरावरील पत्रलेखिका सुरुसुंदरीचे होय. धर्मापुरी आणि पानगाव प्रमाणेच अंबाजोगाई या ठिकाणच्या दर्पनेचा अभ्यास करता येतो. किरण देशमुख म्हणतात, "दर्पणा सुरसुंदरी आरशात पाहणारी अबंजोगाईच्या अंमलेश्वर मंदिरावर आहे. मानवी जीवनात भावभावनांचे स्थान आणि त्या भावभावनांना कायम ठेवण्यासाठी मानवाचा चाललेला खाटाटोपच या सुरुसुंदरीच्या माध्यमातूनच पहायला मिळतो."[९३]

यावरुन आपणाला धर्मापुरी येथील शिल्पांतील व पानगाव येथील शिल्पांप्रमाणे अंबाजोगाईचे शिल्पही ज्ञान देते असे म्हणता येते. सुरसुंदरी या ठिकाणांवर अनेक प्रकारच्या आहेत परंतु काही महत्वाच्या शिल्पांचा आपण या ठिकाणी अभ्यास केला आहे. पण सुरसुंदरी या पुढील प्रमाणे अनेक मंदिरावर दिसून येतात. यांचा अभ्यास पुढील प्रमाणे

१. मर्दला सुरसुंदरी - मृदंग वाजविणारी

२. शुकसारिका सुरसुंदरी - हातात पोपट असलेली

३. पुत्रवल्लभा (मातृका) - मातृप्रेम जागृत करणारी

४. तोरणा सुरसुंदरी - डोक्यावर तोरणासारखे दोन्ही हात असलेली.

५. चामरधारिणी - चामर ढाळणारी सुरसुंदरी

६. जया सुरसुंदरी - हातात जलकुंभ असलेली

७. रती सुरसुंदरी - जोडीदार मदनासमवेत असलेले शिल्प

८. विजया किंवा मोहिनी - एकाच पुरुषासोबत अलिंगन देणारी

९. पत्रलेखिका - पत्र लिहणारी सुरसुंदरी

१०. दर्पना सुरसुंदरी - आरशात पाहणारी

११. कर्पूर मंजरी - केशरचना व्यवस्थित करणारी

---

९३ देशमुख किरण, विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, नागपूर, पृ.१८९-२०२.

१२. डालमलिका - झाडाच्या फांदिला धरुन उभी असते.

१३. आलसा - हात वर करुन आळस देणारी

१४. कुंदुका सुरसुंदरी - चेंडू खेळात मग्न असणारी

अशा प्रकारे आपणाला सुरसुंदरीची यादी ही देता येते यांच्या व्यतिरिक्त मुग्धा, पद्मगंधा, विण्यासा, नूपूर पादिका, सुगंधा, लोलावती, शुभगामिनी, चंद्रावली, शत्रू मर्दिनी, मेनका, विधिचित्ता, पचिनी, गुढशब्दा, गौरी, उर्वशी, रंभा इ. शिल्पांचा प्रभाव हा मंदिरावर अनेक ठिकाणी असलेला आपणाला अभ्यासाअंती सांगता येतो. धर्मापुरी या ठिकाणी शुकसारिका, पुत्रवल्लभा, तोरणा, चामरधारिणी, जया, रती, विजया किंवा मोहिनी, पत्रलेखिका, कर्पूर मंजिरी, डालमलिका, आलसा आदि शिल्पांकन कोरलेले आपल्या लक्षात येते. तसेच पानगाव या ऐतिहासिक ठिकाणी देखील शुकसारिका, मातृवत्सलेच्या अनेक मूर्ती, तोरणा, चामरधारिणी, जया सुरसुंदरी, डालमलिका, आलसा, विनावादिका, मर्कट चेष्ठा करणारी, नृत्य करणारी अशा अनेक शिल्पांचा आपणाला या ठिकाणी अभ्यास करता येतो पानगाव या ठिकाणी एक शिल्प असे आहे. एक सुरसुंदरी उभी आहे. तिचा उजवा हात वर फांदी धरलेला दाखविला आहे. आणि तिच्या उजव्या बाजूला एक माकड तिचा पदर धरुन अंगावर चढण्याचा प्रयत्न करत असलेले दिसते. आणि तिच्या डाव्या बाजूला एक छोटासा मुलगा शांत उभा दिसतो. या मूर्तीतून अनेक हेतू साध्य केलेले दिसून येतात. ते म्हणजे डालमलिका, मर्कट चेष्टा करणारी आणि मातृवत्सल अशा अनेक घटकांना स्पर्श करणारी ही मूर्ती आहे.

वरील विवेचनात आपणाला धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी अप्रतिम मूर्तीशिल्प असलेले दिसतात. आणि या ठिकाणी अशा विभिन्न मूर्तीशिल्पांचा अभ्यास करण्याचा आपण प्रयत्न केला आहे.

## ४.६ येथील शिल्पातून विभिन्न धर्मपंथांचे होणारे दर्शन :

धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी ज्या शिल्पांचा अभ्यास हा केला जातो त्या शिल्पांमधून विभिन्न धर्मपंथांचा अभ्यास आपण करुयात. कोणतीही वस्तुस्थिती अथवा कल्पना

प्रथमतः कितीही चांगल्या हेतूच्या पोटी जन्माला आली असली तरी काळ हा असा इलमी जादूगार आहे की, आपल्या धावत्या गतीबरोबर त्या हेतूचे रंग आरपार बदलून त्या वस्तूला, स्थितीला आणि कल्पनेला सुध्दा उलटी-पालटी करुन टाकतो. पूर्वी स्तुत्य वाटणारी गोष्ट आज निंद्य का ठरते. काळ हा असा अखंड प्रगतिशील असतो. निसर्गाकडे पाहिले तरी तोच प्रकार कालचे लहान मूल सदासर्वकाळ मूलच न राहता परिवर्तन पावते काळाच्या प्रगतीच्या तीव्र वेगामुळे झपाझप मागे पडणारी प्रत्येक वस्तुस्थिती आणि कल्पना ती जर दगडाधोंड्याप्रमाणे अचेतन अवस्थेत असेल तर प्रगतीशील डोळ्यांना ते गैर वाटते.

जुने ते सोने ही म्हण भाषालंकारापुरती कितीही सोनेमोल असली तरी जुन्या काळाच्या सर्वच गोष्टी सोन्याच्या भावाने आणि ठरलेल्या कसाने नव्या काळाच्या बाजारात विकल्या जाने कधीच शक्य नाही. कालगतिच्या चक्रात त्यांच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्याशिवाय रहात नाहीत. निसर्गाचा न्याय आंधळा असला तरी काटेकोर असतो. निसर्गाच्या अपराध्यापुढे भलेही ब्रम्हदेव आडवा पडला तरी सुटायचा नाही. म्हणून निसर्गाची किंवा काळाची कुचाळी नको. प्रबोधनकार ठाकरे म्हणतात, "काळाच्या कुचाळ्या करण्यात हिंदुजनांनी दाखविलेला पराक्रम आज त्यांच्या सर्वांगिण अधःपातास उमटलेला आहे. आजचा हिंदू समाज या नावाला कुपात्र ठरलेला आहे. हिंदूधर्म हे भले मोठे भटी गौंडबंगाल आणि हिंदू संस्कृती म्हणजे एक देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे"[१४] असे मत व्यक्त करतात.

अशा प्रकारचे समर्थन जरी प्रबोधनकार करत असले तरी धर्म आणि देवळांना हिंदू समाजात फारच आदराचे स्थान दिसते. संत ज्ञानेश्वरांनी वर्णन केले आहे की,

देव देऊळ परिवारु । किजे कोरुनी डोंगरु ।

ऐसा भक्तीचा व्यवहारु । का न व्हावा ।

यावरुन असे म्हणता येते की, इतिहास काळातील कलावंतांनी डोंगर पोखरुन देव आणि देवळांचा परिवार साकारला आणि त्याला जशी मेहनत घेतली त्याप्रमाणे भक्तीचा

---

१४ ठाकरे प्रबोधनकार, देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे, पृ.६

देखील व्यवहार झाला पाहिजे. एवढेच नव्हे तर कोणताही धर्म असू त्यात त्याची श्रध्दास्थाने असोत त्यांना आदराचे आणि सन्मानाचे स्थान आहेच. मग प्रबोधनकारांना हिंदू धर्मच अपवाद का वाटला असावा हा प्रश्न पडतो. असो आपणाला त्या त्या धर्माची किंवा त्या मार्फत विभिन्न धर्मपंथांची माहिती करुन घ्यावयाची आहे. हे विसरता कामा नये. धर्मापुरी या ठिकाणी आपणाला काही मूलभूत धर्मपंथाचे आकलन निश्चितच होईल यात शंका नाही.

### ४.६.१ वैष्णव संप्रदाय :

भारतीय समाजात हिंदू धर्मात अनेक संप्रदाय उदयाला आले आणि या संप्रदायांनुसार भारतात प्राचीन व मध्यकाळात शिल्पकला निर्माण केली गेली. त्यामध्ये अनेक संप्रदायांची शिल्पकला निर्माण केली. त्यापैकी वैष्णव संप्रदाय हा प्रमुख मानला पाहिजे. वैष्णवाची शिल्पे मोठ्या प्रमाणात धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी मिळतात. विशेषकरुन ती अवतार शिल्पे आहेत.

भारतरत्न पा.वा. काणे म्हणतात, "मध्ययुगीन काळापासून असे मानण्यात येते की, जगाचे आणि जगातील संस्कृतीचे संरक्षण करण्याकरिता विष्णूने मत्स्य, कुर्म, वराह, पृभृती दहा अवतार पृथ्वीवर धारण केले होते. या अवतारांच्या कल्पनेच्या अंधूक खुना सर्वात जुन्या अशा वैदिक वाङमयात देखील दिसून येतात. विष्णूच्या अवतारांची कल्पना इ.स.च्या पूर्वी काही शतके प्रचलित होती. दुष्टांना शासन करण्याकरिता सज्जनांचे संरक्षण करण्याकरिता आणि धर्माची स्थापना करण्याकरिता देव भूतलावर अवतार घेतो असे महाभारत आणि रामायण यात वारंवार सांगितले आहे."[९५] याचे उदाहरण म्हणून आपणाला धर्मापुरीच्या स्थौन नरसिंहाचा अभ्यास करता येतो. या नरसिंहाने खांबातून प्रगट होऊन प्रल्हादाच्या रक्षणासाठी अवतार घेऊन या ठिकाणी हिरण्याक्षाचा वध केला आहे.

"प्रल्हादाकारणे । स्तंभी अवतार धरिला
विदारोनी दैत्य । प्रेम पान्हा पाजिला"

---

९५ काने पा.वा., (भारतरत्न) धर्मशास्त्राचा इतिहास, पृ.२७२

या ओळींची आठवन होते. विदारण नरसिंहाचे रुप आपल्याला या ठिकाणी दिसते. भगवान देशमुख म्हणतात, "ही मूर्ती चतुर्भूज असून समोरचे दोन हात नरसिंहाचे पोट फाडण्यासाठी गुंतलेले आहेत. तर वरच्या उजव्या हातात चक्र तर डाव्या हातात गदा आहे. हिरण्य मांडीवर आहे मूर्तीच्या उजव्या बाजूला गरुड अंजली मुद्रेत उभा असून डाव्या बाजूला भक्त प्रल्हाद नमस्कार मुद्रेत उभा आहे."[९६] अशा प्रकारे धर्माचे रक्षण करण्यासाठी देव अवतरत असतो.

ईश्वराने अनेक अवतार भारतात घेतले त्यापैकी येथील शिल्पातून मुरारीकृष्ण, विष्णू, वामन, त्रिविक्रम, नरसिंह, वराह आणि बौध्द अवतारांचे दर्शन होते. भविष्यात संतांनी या अवतारांचे कार्य समाजात प्रसारीत करण्याचे कार्य केले. भगवान काळे म्हणतात, "महाराष्ट्राच्यां विशाल देशात मराठवाड्यातच दृश्य आहे त्याचे स्पंदन महाराष्ट्रासाठी, अवघ्या विश्वासाठी आहे. संत ज्ञानेश्वरांच पसायदान याची साक्ष आहे. मराठवाडा ही संत महंतांची जन्मभूमी आहे. कर्मभूमी वतन भूमी, उत्तरेत गंगेच्या काठी वैदिक संस्कृतीने आकार घेतला अन् पाहता पाहता ती विश्वव्यापक बनली साता समुद्राच्या पलीकडे गेली. त्याचप्रमाणे दक्षिणेत गोदावरीच्या खोऱ्यात संतमंहताच्या अभंग वाणीने ज्ञानगंगेने कैलास शिखर गाठलं. 'अवघे विश्वची माझे घर' हा विश्वात्मक विचार मांडणारे संत ज्ञानेश्वर हे या देशातील पहिले संत जागतिकीकरणाची भाषा आज सर्वत्र सुरु झाली असली तरी प्रत्यक्षात सातशे वर्षापूर्वी ज्ञानेश्वरांनी विश्वात्मकतेचा विचार मांडला आणि ध्येयपूर्तीसाठी आयुश्यातला क्षण-क्षण वेचला."[९७]

ज्ञानेश्वरांनी, नामदेवांनी, एकनाथांनी, गोरा कुंभार, सावता माळी, चोखामेळा, जनाबाई, तुकाराम आदि संतांनी शिल्प रुपातील तत्वज्ञान ग्रंथरुपात मांडले आणि कृतीत उतरवलं. "मराठवाडा प्राचीन आहे त्याला अद्यापी अर्वाचिन जगाची फारशी ओळख नाही. इथे

---

९६ देशमुख भगवान, पूर्वोक्त, पृ.१३१

९७ काळे भगवान, संत परंपरा, पृ.१००

कारखाने आहेत भक्तीचे आज ते गोपूरांच्या रुपात उभे आहेत. म्हणून इथं श्रध्देने पहावयास हवे"[१८] अशा प्रकारे मराठवाडा हा वैष्णव संप्रदायाचा गाभा असलेला आपणाला समजतो. त्याला धर्मापुरी आणि पानगाव अपवाद नाही.

### ४.६.२ शैव संप्रदाय :

प्राचीन काळी दक्षिण भारतात अलवार आणि नयनारांची भक्ती चळवळ उदयाला आली. आणि त्याचा परिणाम तत्कालीन राज घराण्यांवर झाला. आणि त्या राजघराण्यांनी आपल्या मतानुसार अनेक संप्रदायांना शिल्पकलेच्या माध्यमातून आश्रय दिला. चालुक्यांच्या काळात अशाच प्रकारे अनेक शैव प्रतिमा सापडतात. त्यामध्ये उमामहेश्वर, शिव, नटेश्वर, भैरव आदि शिल्पे सापडतात. याच्या वरुन आपणाला शैव संप्रदाय किंवा धर्माची माहिती मिळते. बसवराज कोरे म्हणतात, "दक्षिण गंगा गोदावरीच्या दक्षिण-उत्तर कर्नाटक ते विदर्भ आणि पूर्व-पश्चिम आंध्र ते नगर-नाशिकलगतच्या प्रदेशात मराठवाडा म्हटले जाते. अतिप्राचीन काळापासून सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक, राजकीय परंपरेने संपन्न असलेला मराठवाडा स्वतःचे वेगळेपण जपून आहे. मध्ययूगीन भारताच्या सांस्कृतिक व धार्मिक इतिहासात परिवर्तनवादी क्रांतीकारक भूमित घेऊन प्रकाशात आलेल्या निवडक धर्मसंप्रदायापैकी वीरशैव लिंगायत हा एक स्वतंत्र धर्म आहे. कोणी मान्यता देवो अथवा न देवो देशातील वीरशैव लिंगायतांनी हा स्वतंत्र धर्म मानला आहे."[१९] वीरशैव लोक आपणाला स्वतंत्र समजत असलेला दिलासा आपणाला या विधानावरुन मिळाला आहे. परंतु प्राचीन काळातील शिल्पकलेवरुन आपणाला त्यात स्वतंत्रता दिसत नाही. अनेक संप्रदायांची शिल्पे ही एकाच मंदिरावर दिसून येतात.

"शिवाशिवाय दुसरे अन्य दैवत नाही ही वीरशैवांची कडक शीस्त आहे. एक देश, एक धर्म, एक ईश्वर ही एकेश्वरी शिकवन आजपर्यंत चालू आहे. १२ व्या शतकात महात्मा

---

१८ तत्रैव.

१९ कोरे बसवराज, दक्षिण गंगेच्या तिरावरील वीरशैव परंपरा - एक चिंतन, पृ.१५०

बसवेश्वरांनी वीरशैवांच्या परंपरागत मतांची विचारधनांची चिंतनपूर्वक तपासणी केली. अधिकचे कर्मकांड बाजूला ठेवून आपल्या शिवभक्ताने समाज उध्दाराच्या तळमळीतून विरशैव मतांचे प्रवर्तन केले. लिंगायतांच्या नव्या चळवळीचे नेत्रत्त्व महात्मा बसवेश्वरांनी केले. असे पाश्चात्य विचारवंत डॉ. सॅले टॉर यांना वाटते."[१००] अर्थातच बसवेश्वरांनी शैवांमध्ये सुधारणा करण्याचे कार्य केले आहे. चालुक्य राजांनी तर अनेक सांप्रदायांची शिल्पे एकाच मंदिराला कोरायला लावून फारच पुरोगामी विचारमांडला.

"शिवभक्तांची संख्या मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात आहे. परंतु सर्वच वीरशैव नाहीत. वीरशैवांची साधी सोपी खून म्हणजे गळ्यात शिवलिंग, मगती स्त्री असोवा पुरुष कुठल्याही जातीचा असो वीरशैवात जातीला स्थान नाही मद्यपान, मांसाहार टाळून, शुध्द आचरण, शिवाचार्याकडून, जंगमाकडून किंवा पंचाचार्य जगदगुरुकडून रीतसर शिवलिंग दिक्षा घेतली की कोणीही लिंगायत होऊ शकतो. तो जन्मानेच असावा असा काही दंडक नाही. चांभार, कुंभार, माळी, सुतार, तेली, मातंग, ढोर, साळी, बुरुड, न्हावी, परीट अशा अनेक व्यावसायिकांचा लिंगायत धर्मात समावेश आहे."[१०१] एवढ्या मोठ्या प्रमाणातील समाजाचा जसा समावेश या धर्मात आहे. तसेच मराठवाड्यातील बीड, लातूर, परभणी नांदेड जिल्ह्यात फार मोठ्या प्रमाणात शिवाची मंदिरे आहेत. हाच संप्रदाय धर्मापुरी आणि पानगाव येथील शिल्पकलेत साकार झालेला दिसून येतो.

### ४.६.३ शक्ती संप्रदाय :

धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी अनेक स्त्री प्रतिमा मिळाल्या आहेत ह्या प्रतिमा बहुतांशी आदिशक्तीच्या आहेत. आदिशक्तीचेच रुप पार्वतीला मानले जाते. किंवा पृकृतीला मानले जाते. या शक्तीच्या अनेक प्रतिमा या ठिकाणी सापडतात. पार्वतीविषयी नी.पु. जोशी म्हणतात, "दक्ष प्रजापतीच्या व स्वतःच्या झालेल्या अपमानाने संतापून सतीने अग्निकुंडात

---

१०० तत्रैव, पृ. १५१
१०१ तत्रैव, पृ.१५२

स्वतःला जाळून घेतले. पुढच्या जन्मात ती हिमालयाची मुलगी झाली. व तिने पुनः शंकरच पती मिळावा एवढ्याकरिता खडतर तपश्चर्या केली. तिला अपर्णा हे नाव प्राप्त झाले. पार्वतीची ही तपश्चर्या अंकित करणे कलाकाराचा आवडीचा विषय झाला. त्याची सुरवात कुशान काळांतच झालेली दिसते. या काळाची मथुरेला मिळालेली प्रतिमा जरी कमरे खाली तुटलेली असली तरी तिची अभय मुद्रा व आजूबाजूची यज्ञकुंडे स्पष्ट आहेत."[१०२]

पार्वतीने आपल्या पतीच्या स्थानी शंकराची इच्छा पूर्ण करण्यासाठी तप आरंभिलेले उदाहरण एक धर्मापुरी येथेही सापडते. तिच्या पुढे बैल, शिवलिंग, सूर्य, चंद्र आदींची शिल्पे कोरली आहेत. मातृदेवतेच्या अनेक प्राचीन मूर्ती भारतात मिळतात. मुन्शिचंद्र जोशी म्हणतात, "मातृदेवतेचे अवशेष आलाहाबाद जवळ बेलन नदी किंवा सोन नदीच्या परिसरात मिळाले आहेत. या अवशेषांचा काळ रेडिओ कार्बन पध्दतीने इ.स.पू. २३, ४८० ते इस.पू. १७७६ या दरम्यानचा आहे. भारतात मातृदेवता पुजा परंपरा ही प्राचीन काळापासून चालत आली आहे. हे सिध्द होते."[१०३] यावरुन कितीतरी प्राचीन काळापासून ही प्रथा सुरु असलेली आपल्याला लक्षात येते.

सु.ग. जोशी म्हणतात, "शाक्त शब्दाचा संबंध शक्तीबरोबर जोडला जातो. शक्तीचा अर्थ धर्माच्या संदर्भात स्त्रीरुपी देवता या अर्थाने जोडला जातो. सर्वशक्तीशाली स्त्री रुपी देवतेच्या उपासकाला शाक्त म्हणतात. शक्ती पुजेच्या तांत्रिक पध्दतीचा विकास हा टप्याटप्याने झाला आहे. जगमाता या स्वरुपात देवीची उपासना केली जाते."[१०४] या प्रकारे धर्मापुरी या ठिकाणी आणि पानगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्त्री व शक्ती रुपांच्या प्रतिमा सापडतात. यावरुन या ठिकाणी प्राचीन व मध्य काळात शक्ती संप्रदायाचा चांगला प्रसार झाला होता. हे येथील शिल्पकलेवरुन लक्षात येते.

---

१०२ जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.२३५-२३६
१०३ जोशी मुन्शिचंद्र, ऐतिहासिक संदर्भ मे शाक्त पंथ, पृ.१९
१०४ जोशी सु.ग., मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक, पृ.१८६

### ४.६.४ सौर संप्रदाय :

धर्मापुरी आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी सौर संप्रदायाच्या खुना सापडतात. एस.ए.जोगळेकर म्हणतात, "गाथासप्तशतीमध्ये सूर्य देवतेचा उल्लेख आहे."[१०५] प्राचीन वाङमयात अनेक ठिकाणी सूर्य देवतेचा उल्लेख आढळतो. रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी आदि ग्रंथात या देवतेचा उल्लेख आढळतो. त्याच प्रमाणे भारतात व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सूर्याच्या असंख्य मूर्ती सापडतात. किरण देशमुख म्हणतात, "सूर्यभक्तीचा प्रसार भारतभर अधिक प्रमाणात झाला होता म्हणूनच कोणार्क (ओरिसा) खजुराहो (मध्यप्रदेश), मोहोरा (गुजरात), मंद सौर-ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) या ठिकाणी सूर्याची मंदिरे उभारली गेली."[१०६]

अशा प्रकारे भारतात अनेक ठिकाणी सूर्य मंदिरे दिसून येतात. कोणार्कचे सूर्य मंदिर तर एक जागतिक आश्चर्यच मानले पाहिजे. या मंदिराचे शिल्पकलेतील सौंदर्य तर फारच अप्रतिम आहे. "मराठवाड्यातील मध्ययुगीन सूर्य प्रतिमा औंढा, होट्टल, कवठा, धर्मापुरी या ठिकाणी सूर्य मूर्ती आढळतात."[१०७]

कुंटे मोरेश्वर म्हणतात, "लातूर या ठिकाणी सूर्यमूर्ती आढळतात."[१०८] अशा प्रकारे लातूर जिल्ह्यातही सूर्यमूर्ती मिळतात. तसेच हिंगोली, नांदेड, बीड जिल्ह्यातही अनेक ठिकाणी सूर्यमूर्ती सापडतात. धर्मापुरी या ठिकाणचा जो वाकडी या ठिकाणी शिलालेख आहे त्या शिलालेखाच्या सुरुवातीला सूर्य प्रतिमा एक पुरुष प्रतिमा व चंद्रप्रतिमा आहे. तसेच गावातील बँकेच्या अर्थात किल्याच्या रोडच्या एका ओट्यावरही सूर्य, चंद्र, प्रतिमा दिसून येतात. गावातील तुकाई देवीच्या मंदिरात सूर्यमूर्ती असून सप्त अश्वांच्यारथावर आरुढ झालेली ही सूर्य मूर्ती चालुक्य कालीन आहे.

---

१०५ जोगळेकर एस.ए., हाल सातवाहनाची गाथासप्तशती, पृ.१९५

१०६ देशमुख किरण, मराठवाड्यातील मध्ययुगीन सूर्य प्रतिमा, पृ. १८६

१०७ तत्रैव.

१०८. कुंटे मोरेश्वर, देवदर्शन - जिल्हा लातूर, पृ.२८

वैष्णव संप्रदाय, शैव संप्रदाय, शक्ती संप्रदायाप्रमाणेच धर्मापुरी या ठिकाणी चालुक्यांच्या काळातील सौर संप्रदायाचे अवशेषही आपणाला अभ्यासावयास मिळतात. धर्मापुरी हे गाव अनेक धर्म संप्रदायांना आश्रय देणारे गाव ठरले हे सत्य नाकारता येत नाही.

### ४.६.५ गाणपत्य संप्रदाय :

धर्मापुरी आणि पानगाव या दोन्ही ठिकाणी देखील गणेशाच्या मूर्ती सापडतात. प्राचीन काळापासूनच भारतीय समाजात गणपती या देवतेची पुजा प्रचलित होती. महाराष्ट्रात सातवाहन काळापासून गणपती पुजा सुरु झाली. गणपतीचे चतुर्भूज, षडभूज, दशभूज, अष्टादशभूज इत्यादी अनेक रुपांत वर्णन केलेले आढळते. धर्मापुरी येथे गणेशाच्या चतुर्भूज मूर्ती आढळतात.तसेच पानगाव येथेही अशाच मूर्ती आढळतात. रिती व शेळके म्हणतात, "राष्ट्रकुट काळात कंधार शहरात मंडल सिध्दीविनायक एक भव्य मंदिर होते."[१०९] "या मंदिराला राष्ट्रकुट सम्राटांनी दान दिले होते. याची माहिती कंधारच्या शिलालेखात आढळते."[११०]

अशा प्रकारे गाणपत्य संप्रदायाला प्राचीन काळापासूनच महत्वाचे स्थान असलेले आपणाला दिसून येते. गणेशाच्या मूर्ती व त्याची शिल्पे इतर संप्रदायांच्या देवताप्रमाणेच अनेक ठिकाणी दिसून येतात. कारण पंचायतन देवतेची संकल्पना रुजली होती आर.जी. भांडारकर म्हणतात, "आठव्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडातील भवभूती आपल्या मालती माधव या नाटकात गजमुखी गणपतीचे वर्णन करतो."[१११] किरण देशमुख म्हणतात, "मराठवाड्यात अनेक प्राचीन मंदिरातून गणपतीच्या निरनिराळ्या रुपातील मूर्ती आढळतात. स्वतंत्र मंदिराशिवाय ही अन्य मंदिरात शिल्पांच्या रुपातील अनेक गणेश प्रतिमा दिसतात."[११२]

मराठवाड्यातील इतर ठिकाणाप्रमाणेच धर्मापुरी या ठिकाणी किल्याच्या समोरील रोडवर दोन ओट्यांवर अनेक मूर्ती सापडतात. त्या मूर्तीमध्ये गणेशाच्या चतुर्भूज मूर्ती दिसतात.

---

१०९ Riti Shrinivas & Shelke G.C. (Edi.), Inscriptions from Nanded District, Nanded, p.४

११० Ibid.

१११ भांडारकर आर.जी., वैष्णव, शैव और अन्य धार्मिक मत, पृ.१६८-१७१

११२ देशमुख किरण, मराठवाड्यातील गणेश प्रतिमा, पृ.९-१०

त्या मूर्ती सुट्या प्रकारच्या आहेत तसेच केदारेश्वर मंदिराच्या द्वारशाखांवर गणेशाचे शिल्प दिसतात. मरळसिध्दांच्या मंदिरावरही अशा प्रकारचे शिल्प दिसून येते आणि तलावाच्या जवळही एक गणेश मंदिर आहे. एवढेच नव्हे तर पानगाव या ठिकाणी देखील विठ्ठल मंदिराच्या दारावर गणेशाचे शिल्प दिसून येते. ते शिल्प म्हणजे मंदिराच्या द्वारावरील दगडी चौकटीत कोरलेले आहे. तसेच इतर ठिकाणी गावातही गणेशाचे सुटे मूर्तीशिल्प सापडतात. गाणपत्य संप्रदायाचा प्रभाव असलेला दिसून येतो. चालुक्यांचा काळ याला अनुकूल असलेला आपल्या लक्षात येतो.

### ४.६.६. जैन धर्मसंप्रदाय :

प्राचीन भारतातील प्रचलित धर्मात जैन धर्मास बरेच महत्वाचे स्थान आहे. बौध्द आणि हिंदू धर्माप्रमाणेच तो प्राचीन असून आज पर्यंत तो टिकून आहे. हा धर्म सनातनी विचार धारेप्रमाणेच वेदप्रामाण्यावर मूळीच विश्वास न ठेवणारा नास्तिकवादी आहे. जैनमत ईश्वराच्या सामर्थ्यावर किंवा त्याने सृष्टी निर्माण केली अशा गोष्टीवर विश्वास ठेवणारा नाही. पण 'देववाद' जैन परिसराच्या बाहेरचा आहे असेही नाही. आरंभीच्या काळी या धर्मात मूर्तीपुजेला स्थान नव्हते. पण पुढे वैदिक किंवा बौध्द धर्माप्रमाणेच याही धर्मात मूर्तीपुजेचा शिरकाव होऊन आज जैनांत देवमूर्ती पुजनाचा चांगलाच प्रचार व प्रसार झाला आहे. एवढेच नव्हे तर या धर्मातील दिगंबर व श्वेतांबर अशा दोन्ही पंथात ती जारी आहे.

धर्मापुरी या ठिकाणी देखील जैनांच्या मूर्ती सापडतात. त्यामध्ये यापनिय पंथाचा प्रभाव दिसून येतो. गो.ब. देगलूरकर म्हणतात, "अशाच प्रकारच्या काही जैनमूर्ती केशव मूंडेच्या शेतात आणि गावातील मारोतीच्या मंदिरात ठेवलेल्या आहेत. पार्श्वनाथांच्या मूर्तीची संख्या या गावात जास्त असल्याने त्यातून जैन यापनीय संघाची निष्ठा व्यक्त होताना दिसते."[११३] धर्मापुरी या ठिकाणी सुपार्श्वनाथांच्या दोन मूर्ती मिळतात. ९० x ४५ x १५ आणि १.० x ५० x २० से.मी. या आकारातील काळ्या बेसाल्ट पाषाणात घडविलेल्या दोन पार्श्वनाथाच्या मूर्ती येथे

---

११३ देगलूरकर गो.ब., पूर्वोक्त, पृ.२१

मिळाल्या आहेत. ह्या दोन्ही मूर्ती दिगंबर पंथीय असून कायोत्सर्ग पध्दतीच्या म्हणजे समपादात सरळ उभ्या पाय जोडलेले आणि दोन्ही हात खाली सोडून मांड्यास चिकटलेले अशा उभ्या आहेत. सुपार्श्वनाथ हे चोवीस तीर्थकारांपैकी सातवे तीर्थकर होत त्यांचे लांछन पाच फण्यांचा नाग त्यांचे शिर्षस्थानी कोरले असून पादपिठावर स्वास्तिक मात्र कोरलेले दिसत नाही. तसेच एका मूर्तीत त्यांचे यक्ष 'वरनंदी' आणि यक्षी 'काली' पादपिठाच्या वरच्या भागात डावी व उजवीकडे कोरली आहेत. तसेच धर्मापुरी या ठिकाणी चंद्रप्रभूची मूर्ती सापडलेली आहे. तीही मूर्ती चांगली आहे.

र.रा. बोरकर पार्श्वनाथाविषयी म्हणतात, "ते तेविसावे तीर्थकर या तीर्थकराची मूर्ती ६०x२०x२० से.मी. आकाराची असून ती वरील मूर्तिप्रमाणे काळ्या बेसॉल्ट पाषाणात कोरली आहे. ही मूर्ती सुध्दा दिगंबर पंथीय असून कायोत्सर्ग मुद्रेत उभी आहे. पार्श्वनाथाचे लांछन सात फण्याचा नाग त्याच्या शिर्षस्थानी मागे कोरले आहे. त्याच्या 'पार्श्वधरनेंद्र' आणि यक्षी (शामनदेवी) 'पदमावती' उजव्या व डाव्या बाजूस पादपिठाच्या वरच्या भागात कोरली आहेत. या तीर्थंकराचे जन्मस्थान वाराणसी समजले जाते."[११४]

धर्मापुरी या ठिकाणी जैन दिगंबर पंथीयांची एक खंडीत मूर्ती सापडली आहे. पण ती कोणत्या तीर्थकरांची आहे हे मात्र समजले नाही. "धर्मापुरी या ठिकाणी यक्षी सिध्दायीका म्हणजे शेवटच्या तीर्थकरांची म्हणजे वर्धमान महाविराची ही शासनदेवी, ही मूर्ती ४५ x ४५ x १० से.मी. आकाराची असून काळ्या बेसाल्ट पाषाणात घडविलेली आहे. ती द्विहस्त असून त्यापैकी एक हात खंडीत असून दुसरा हात कटीस्थानी आहे. ती सव्यललितासनात बसलेली असून पादपिठावर लांछन सिंह कोरले आहे. आणि शिर्षाच्या मागे आम्रवृक्ष आहे. या सर्व लक्षणावरुन यक्षी सिध्दायीकाची मूर्ती होय यात शंकाच नाही."[११५] वरील सर्व मूर्तीप्रकारावरुन धर्मापुरी हे गाव दिंगबर जैन पंथीयांचे एक प्रमुख तीर्थस्थान असल्याचे स्पष्ट होते. जैन धर्माचा प्रचार व

---

११४ बोरकर र.रा., पूर्वोक्त, पृ.१९१-१९२

११५ तत्रैव, पृ.१०२

प्रसार प्राचीन काळापासून श्वेतांबर पंथाचे प्राबल्य उत्तरेत आणि दिगंबर पंथाचा प्रसार दक्षिणेस विशेष असल्याने त्या त्या पंथांच्या मूर्ती त्या त्या प्रदेशात जास्त आढळतात. त्याची प्रचिती सदर धर्मापुरी येथील दिगंबर मूर्तीवरुन येते. परंतु महाराष्ट्रात दोन्ही पंथाच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात आढळतात. र.रा. बोरकर म्हणतात, "धर्मापुरी येथील शिल्प मात्र इ.स. ११ व्या शतकातील चालुक्य काळातील होत हे मात्र तेथील शिलालेख आणि अन्य पुराव्यावरुन सांगता येते तसेच चालुक्य काळात वैदिक देव-देवता सोबतच जैन धर्माला सुध्दा राजाश्रय प्राप्त होऊन त्याचा प्रसार व प्रचार या भागात होत होता. हे स्पष्ट होते."[११६]

अशा प्रकारे धर्मापुरी या ठिकाणी हिंदू धर्मातील अनेक संप्रदायांचा अभ्यास हा आपणाला शिल्पकलेवरुन करुन घेण्यास मदत झाली. त्यात प्रामुख्याने वैष्णव, शैव, शक्ती, सौर, गाणपत्य आदि संप्रदायांचा अभ्यास केला तसेच त्याचबरोबर येथील जैन शिल्पदेखील त्यांच्या धर्मांची माहिती येथील शिल्पांमधून प्रगट करतात. हे वरील अभ्यासातून समजण्यास सोपे जाते.

---

११६ तत्रैव, पृ.१९३

**संदर्भ :**


१. जोशी रा.वि., मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिकांक, १९७६, पृ.३.

२. Tripathi R.C., Indian Archeaology A Review, १९८४, p.१५०

३. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड III, के.एम. अतकरे कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्र.आ., ५ जूलै २००१, पृ.२६

४. Mirashi V.V., Studies in Indology, Vol.I-III, Vidarbha Sonshodhan Mandal, Nagpur, १९६०, p.१

५. Sircar D.C. (Ed.), Select Inscriptions, Vol.II, Delhi Motilal Banarsidas, १९८३, p.५१४.

६. जोशी सु.ग. (संपा.) मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक १९७४, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन मराठवाडा संशोधन मंडळाकरिता शिरुर ताजबंद, १९७४, पृ.२२

७. पठाण यु.म., स्मृतिस्थळ, (संपा. कुमार केतकर), दैनिक लोकसत्ता, मराठवाडा वृत्तांत, रविवार ८ मार्च २००९, पृ.८

८. तत्रैव

९. देशमुख भगवान, मूर्तिकलेचे माहेरघर-धर्मापुरी, (संपा. सोमनाथ रोडे), मराठवाडा इतिहास परिषद औरंगाबाद, निवडक शोध-निबंध, खंड-३, मराठवाडा इतिहास परिषद द्वारा प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड, फेब्रु. १९९९, पृ.१२८

१०. तत्रैव, पृ.१२९

११. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड-१, अलकनंदा प्रकाशन, गुरुद्वारामागे, उस्मानपुरा, औरंगाबाद, प्र.आ., फेब्रु. १९७६, पृ.२०

१२. पांचाळ ज्ञानेश्वर, २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, प्रकाशक प्राचार्य डॉ. राठोड गणपत, जाने. २००५, पृ.४२

१३. देव प्रभाकर, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिकांक, १९७५, पृ.१०

१४. तत्रैव.

१५. पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई मराठी ग्रथ संग्रहालय प्रकाशन, १९९३, पृ.१९२.

१६. तत्रैव

१७. राव व. दि., प्राचीन भारतीय सांस्कृतिक इतिहास, लोखंडे प्रकाशन, पुणे, १९९०, पृ.४०

१८. माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.१०२

१९. कठारे दळवे, राष्ट्रकुटांची राजधानी कंधार, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्र.आ., नोव्हें. २००५, पृ.१८

२०. ठोसर हरिहर, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जुलै-सप्टें. १९९० मधील लेख (संपा. देव प्रभाकर), गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्र.आ., २००६, पृ.३-१२

२१. माटे म.श्री., पूर्वोक्त, ९७

२२. ठोसर हरिहर, प्रतिष्ठान, सप्टें. - डिसें. १९७९, पृ.४०

२३. पोहनेरकर न.श., प्रतिष्ठाण, ऑक्टोबर १९९०, पृ.२९

२४. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड ६, पृ.१८८

२५. काळे भगवान, (संपा.), मराठवाडा काल आणि आज, जालना, संकेत प्रकाशन, १९८६, पृ.७९

२६. Shastri Nilkanth, A History of South India, Delhi, Oxford University Press, ४th Edi., १९७६, pp.१४८-१६१

२७. कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य, खंड २, पूनम प्रकाशन कंधार, जि. नांदेड, प्र.आ., नोव्हें. २००६, पृ.४३

२८. कठारे, दळवे, पूर्वोक्त, पृ.४९

२९. Deo Prabhakar, Temples of Marathwada, Jaipur, १९९३, p,६४

३०. देव प्रभाकर, धर्मापुरी येथील चालुक्य शिल्प स्थापत्य अवशेष, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिकांक, १९७५, पृ. १६

३१. पोहनेरकर न.शे., मराठवाड्याची प्राचीन सौभाग्यलेणी, प्रतिष्ठाण, सप्टें. १९७०, पृ.२१-२४

३२. जोशी नी.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, अ.अं. कुळकर्णी, नियंत्रक, प्रकाशन समिती, महारष्ट्र विद्यापीठ ग्रथ निर्मिती मंडळ, पुणे, प्र.आ., १९७९, पृ.७३

३३. बोरकर र.रा, धर्मापुरी येथील जैनशिल्प, (पुरातत्वीय शोध) प्रकाशक, कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, प्र.आ., फेब्रु. २००४, पृ.१९०

३४. कठारे, नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, ओव्हर ब्रीजजवळ, शिवाजी नगर, नांदेड, प्र.आ., नोव्हें. १९९९, पृ.३७८

३५. तत्रैव.

३६. देगलूरकर गो.ब., सुरसुंदरी, भारतीय विद्या भवन, पुणे केंद्र, पुणे, २००४, पृ.७-८

३७. तत्रैव, पृ.९

३८. पुरी सुनिल, मराठवाड्याच्या इतिहासाच्या पाऊलखुणा, (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, मायानगर, सिडको, औरंगाबाद, खंड-१, जाने. २००२, पृ.१७

३९. तत्रैव

४०. देशमुख भगवान, पूर्वोक्त, पृ.१२८

४१. तत्रैव, पृ.१२८-१२९

४२. तत्रैव, पृ.१२९

४३. पाठक अ.श., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास - प्राचीन काळ, खंड-१, भाग-२, स्थापत्य व कला, प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्र.आ., १९६७, पृ.२०८

४४. तत्रैव.

४५. देशमुख भगवान, पूर्वोक्त, पृ.१३०

४६. Deo Prabhakar, Op.cit., p.६४

४७. बोरकर र.रा., धर्मापुरी येथील - दुर्मिळ शिल्प, (पुरातत्वीय शोध) प्रकाशक, कल्याण शिक्षण संस्था, नागपूर प्र.आ., फेब्रु. २००४, पृ.१८५

४८. तत्रैव, पृ.१८६

४९. बोरकर र.रा., चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील मूर्तीशिल्प वैभव, (पुरातत्वीय शोध) प्रकाशक, कल्याण शिक्षण संस्था, नागपूर प्र.आ., फेब्रु. २००४, पृ.१०६

५०. तत्रैव, पृ.१०७

५१. मिराशी वा.वि,, सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ., १९७९, पृ.११३

५२. Champaklakshimi R., Vaishnava Concept in Early Tamilnadu, Journal of Indian History, Vol.I, Part III, Dec. १९७२, New Series No.१५०, p.७३३

५३. Deshmukh B.S., Iconography of Hindu Temples in Marathwada, Jaipur, Publication Scheme, १९८७, p.३२

५४. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.४५

५५. देशपांडे ब्रम्हानंद, पूर्वोक्त, पृ.२५

५६. पाठक अ.श., पूर्वोक्त, पृ.२०९

५७. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.१३३

५८. तत्रैव, पृ.१३४

५९. कठारे अनिल, दळवे, पूर्वोक्त, पृ.१३१

६०. Mackey E., Further Excavation at Mohenjondaro, New Delhi, १९३८, p.२६०

६१. गुप्ता पी.एल., गुप्त साम्राज्य, वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन, १९७०, पृ.५७०

६२. पाठक अ.शं., पूर्वोक्त, पृ.२०८

६३. श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तीकला, वाराणशी, विश्वविद्यालय प्रकाशन, द्वि.आ., १९९०, पृ.७८

६४. कठारे अनिल, साखरे, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा पब्लिकेशन्स, सुंदर नगर, नांदेड, प्र.आ., डिसें. २००८, पृ.१२०

६५. Degloorkar G.B., Temple Architecture and Sculpture, Nagpur, १९७४, p.१२२-२३

६६. Deshmukh, B.S., Op.cit., p.११३

६७. Ibid, p.११४

६८. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३१६

६९. Marshall John, Annual Report, Archeological Survey of India, Delhi, १९२७-२८, p.४६

७०. सांकलिया ह.धी., भारतीय पुरातत्व - एक समालोचन, मुंबई पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८९, पृ.२१

७१. दळवे अरुण, राष्ट्रकुटकालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध, नांदेड, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, २००४, पृ.२२८

७२. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३२२

७३. Gopinathrao, T.A., Elements of Hindu Iconography, Vol.II, Part-I, Delhi, Reprint १९६८, p.४६.

७४. Ibid, p.४५८.

७५. Shrinivasan K.R., Temples of South India, Delhi, National Book Trust, १९७१, p.१०९

७६. Ibid, p.१५

७७. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३०५

७८. Shah U.P., Studies in Jain Art, Banaras, १९५५, p.७

७९. Tylor E.,B., Religion Primitive Culture, New York, १९५८, p.३७२

८०. Shrivastav V.C., Sun-worship in Ancient India, Allahabad, १९७२, pp.२३-३०

८१. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड २, पुणे, १९८५, पृ.७००

८२. मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, पुणे, प्रतिभा प्रकाशन, १९९३, पृ.१०२

८३. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.२१३

८४. तत्रैव

८५. तत्रैव

८६. Lain S. Bangdel, The Early Sculpture of Nepal, १९८२, p. १३

८७. दळवे अरुण, पूर्वोक्त, पृ.१६२

८८. ढेरे रा.चि., लज्जागौरी, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, १९८८, पृ.१९६

८९. देगलूरकर गो.ब., पूर्वोक्त, पृ.१६

९०. तत्रैव, पृ.२५

९१. तत्रैव, पृ.२८-२९

९२. तत्रैव, पृ. ४१

९३. देशमुख किरण, विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, नागपूर, १९८६, पृ.१८९-२०२.

९४. ठाकरे प्रबोधनकार, देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे, सुमेध प्रकाशन, गोखले नगर, पुणे, प्र.आ., १९२९, पृ.६

९५. काने पा.वा., (भारतरत्न) (अनु. यशवंत भट) धर्मशास्त्राचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वि.आ., १९८०, पृ.२७२

९६. देशमुख भगवान, पूर्वोक्त, पृ.१३१

९७. काळे भगवान, संत परंपरा, (संपा. प्रभाकर देव), गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरात्रे, समर्थनगर, औरंगाबाद, प्र.आ., डिसें. २००६, पृ.१००

९८. तत्रैव.

९९. कोरे बसवराज, दक्षिण गंगेच्या तिरावरील वीरशैव परंपरा - एक चिंतन, (संपा. प्रभाकर देव), गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरात्रे, समर्थनगर, औरंगाबाद, प्र.आ., डिसें. २००६, पृ.१५०

१००. तत्रैव, पृ. १५१

१०१. तत्रैव, पृ.१५२

१०२. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.२३५-२३६

१०३. जोशी मुन्शिचंद्र, ऐतिहासिक संदर्भ मे शाक्त पंथ, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, १९८९, पृ.१९

१०४. जोशी सु.ग., मराठवाडा सशोधन मंडळ वार्षिक, १९७६, पृ.१८६

१०५. जोगळेकर एस.ए., हाल सातवाहनाची गाथा सप्तशती, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५६, पृ.१९५

१०६. देशमुख किरण, मराठवाड्यातील मध्ययुगीन सूर्य प्रतिमा, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, नागपूर, १९८५, पृ.१८६

१०७. तत्रैव.

१०८. कुंटे मोरेश्वर, देवदर्शन - जिल्हा लातूर, मंदिरकोश, प्रकाशन, पुणे, पृ.२८

१०९. Riti Shrinivas & Shelke G.C. (Edi.), Inscriptions from Nanded District, Nanded, Yeshwant Mahavidyalaya, १९६८, p.४

११०. Ibid.

१११. भांडारकर आर.जी., वैष्णव, शैव और अन्य धार्मिक मत, (अनु. महेश्वर प्रसाद), भारतीय विद्या प्रकाशन, वाराणसी, १९६७, पृ.१६८-१७१

११२. देशमुख किरण, मराठवाड्यातील गणेश प्रतिमा, दैनिक सकाळ, औरंगाबाद, दि. १९ सप्टें. १९९९, पृ.९-१०

११३. देगलूरकर गो.ब., पूर्वोक्त, पृ.२१

११४. बोरकर र.रा., पूर्वोक्त, पृ.१९१-१९२

११५. तत्रैव, पृ.१०२

११६. तत्रैव, पृ.१९३

# प्रकरण - ५

# बांधकाम तंत्राचा किंवा शैलीचा अभ्यास

प्रकरण पाचवे

# बांधकाम तंत्राचा किंवा शैलीचा अभ्यास

## ५.१ मंदिर रचना तंत्राचा अभ्यास

भारतीय कलेच्या इतिहासात बांधकाम तंत्राला विशेष महत्व दिले जाते कारण बांधकामात जर तंत्र पध्दतीचा वापर नाही केला तर ती वास्तू आकर्षक वाटणार तर नाहीच पण ती वास्तू दीर्घकाळही टिकणार नाही या दोन कारणांसाठी बांधकामात प्राचीन काळापासून काही तंत्राचा किंवा रचना तंत्राचा वापर केला जातो.

बांधकामात अनेक घटकांचा प्राचीन काळापासून प्रामुख्याने उल्लेख केला आहे. त्यामध्ये राहण्यासाठी घरे, श्रद्धास्थाने म्हणून मंदिर किंवा अन्य वास्तू, राजवाडे, किल्ले, स्नानगृहे, बारव-स्थापत्य, लेण्या, स्तूप, शैलगृहे आदींचा वापर केला जातो. पण प्रत्येकाची बांधण्याची पध्दत ही निराळी असते. भारतात तर विभिन्नतेतून एकात्मता वास्तूंच्या स्वरुपातही दिसून येते. अनेक प्रकारच्या वास्तू असतात. त्यामध्ये मंदिर स्थापत्याचा किंवा त्याच्या रचना तंत्राचा या ठिकाणी आपणाला अभ्यास करावा लागणार आहे. भारतात काश्मीरपासून तामीळनाडू पर्यंत व गुजरात, कच्छ पासून आसाम राज्यापर्यंत सर्वत्र विखूरलेली आढळतात. या मंदिरांच्या बांधकामाच्या पध्दतीविषयी, त्यांच्या वास्तुशास्त्रीय शैलीविषयी तसेच त्यांच्या निरनिराळ्या अवयवांची पूर्ण माहिती होण्यासाठी भारतीय वास्तुशास्त्रावरील ग्रंथांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. नागर, द्रविड, उडिया वैगैरे निरनिराळ्या वास्तुकामाच्या पध्दती वर्णन करणारे अनेक ग्रथ संस्कृतभाषेत लिहिलेले आढळतात. त्यांच्यापैकी सूत्रधार मंडनाने लिहिलेल्या नागर शैलीच्या प्रासादांची माहिती देणाऱ्या 'प्रासादमंडन' या वास्तुशास्त्रावरील लहानशा ग्रंथाचे मराठी भाषेत भाषांतर केले आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने सौराष्ट्र गुजरात व महाराष्ट्रातील नागर शैलीत बांधलेल्या मंदिरांच्या वास्तुशास्त्राबद्दलची काहीशी संक्षिप्त पण ठोस अशी माहिती मिळते.

र.पु. कुळकर्णी यांच्या मते, "सूत्रधार मंडनाने शिल्पशास्त्रातील निरनिराळ्या विषयांवर लहान, सूत्ररुप मात्र ठोस माहिती देणारे अनेक पुस्तके संस्कृत भाषेत लिहिली आहेत. 'प्रासादमंडन' हे पुस्तक प्रासादांच्या (मंदिरांच्या) वास्तु संबंधी माहिती देते. 'राजवल्लभ' या पुस्तकांत राजवाड्यांच्या बांधकामासंबंधी माहिती दिली आहे. वास्तुमंडन, वास्तुशास्त्र व वास्तुसार ही पुस्तके इमारतींच्या बांधकामांसबंधी आहेत. 'आयतत्व' या पुस्तकात वास्तुचे आय, व्यय, नक्षत्र, तारा वगैरेंचे गणित दिलेले असून वास्तुच्या मालकाला त्याने बांधलेली वास्तु त्याला लाभकारक कशी होईल याबद्दलचा उहापोह केलेला आहे. 'देवतामूर्ती प्रकरण' व 'रुपमंडन' ही पुस्तके मूर्तीशास्त्रावर आहेत. असे म्हणतात की, सूत्रधार मंडनाच्या काळी शिल्पशास्त्रावरील पुस्तके-त्यांच्यातील माहिती ही बरीच अव्यवस्थीत स्वरुपात उपलब्ध होती व शिल्पशास्त्रांच्या सर्व विषयांवर उत्तम पुस्तके लिहून त्या काळी भारतीय शिल्पशास्त्राला जी उतरती कळा लागली होती. ती नाहीशी करुन या शास्त्राचे त्यांनी पुनरुज्जीवन केले. याचे श्रेय सूत्रधार मंडनास दिले जाते."[१]

मंदिरांच्या बांधकामाचा किंवा रचना तंत्राचा सखोल अभ्यास करण्यासाठी आपणाला भारतात किती प्रकारची मंदिरे अस्तित्वात आली यांचाही अभ्यास करावा लागतो. यामध्ये अनेक धर्माची मंदिरे प्राचीन काळात अस्तित्वात आली. हिंदू धर्माप्रमाणे बौध्द आणि जैन धर्माचीही मंदिरे निर्माण झाली. यांचाही आपणाला अभ्यास करावा लागेल. प्रामुख्याने सांगावयाचे झाले तर बौध्द धर्माचीच देवालये अगोदर निर्माण झाली ती म्हणजे गुहा मंदिरांच्या रुपाने. बौध्दानंतर जैन मंदिरे अस्तित्वात आली. आणि त्यांच्या नंतर हिंदू मंदिरे निर्माण झाली. यासाठी ऐतिहासिक पुरावेही सापडतात.

पर्सी ब्राऊन म्हणतो, "भारतात सर्वप्रथम गुहामंदिरे (Rock temple) निर्माण केली गेली."[२] या विधानावरुन आपल्या वरील स्पष्टीकरणास पुस्ती मिळते. भारतात खऱ्या

---

१. सूत्रधार मंडन, प्रासाद मंडन (अनु. र.पु. कुळकर्णी), प्रस्तावणा, पृ.१
२. Brown Percy, Indian Architecture, pp.१९-३०

अर्थाने सर्वप्रथम गुहामंदिरांची निर्मिती झाली. तसेच "सर्वप्रथम बौध्द त्यानंतर जैन आणि शेवटी हिंदू गुहा मंदिरे निर्माण केली गेली."[३] पुढे या गुहामंदिरांप्रमाणेच वास्तुमंदिरांचीही निर्मिती करण्यात आली. गावागावात वास्तु मंदिरांचे बांधकाम करण्यात येऊ लागले. मंदिर बांधकामासाठी दगड, माती, चुना आणि विटांचा उपयोग करण्यात आला. धर्मापुरी व पानगाव या ठिकाणी दगड आणि विटांचा प्रामुख्याने वापर केलेला आपणाला दिसून येतो. दगड आणि मातीचा उपयोग किल्यासाठी केला आहे.

मंदिरांच्या निर्मितीवरुन गुहा मंदिरे प्राचीन आहेत. प्राचीन भारतीय कलेत मंदिर वास्तुकलेप्रमाणेच विकसित झालेला एक स्वतंत्र कलाविष्कार म्हणजे लेणी होय. लेण्यांनाच शैल स्थापत्य, शैलगृह, गुहा, गुंफा व गुहामंदिरे या नावानेही संबोधिले जाते. भारतात हिंदू, बौध्द आणि जैनधर्मीय लेणी आहेत. आर. शरण म्हणतात, "भारतात आजपर्यंत १५४५ लेण्यांचा शोध लागला."[४] यांच्यापैकी फक्त १२०० लेण्यांचीच नोंद भारतीय पुरातत्व विभागाकडे आहे. जेम्स फर्ग्युसन म्हणतात, "त्यापैकी १००० बौध्द लेणी १०१ जैन लेणी आणि ९९ हिंदू लेणी आहेत."[५]

लेणी हा प्राचीन वास्तुप्रकार आहे. याच लेण्यांना गुहा मंदिरे असेही म्हणतात, तर आपणाला मंदिर रचना तंत्राचा अभ्यास करण्यासाठी वरील तीन प्रमुख धर्मांच्या मंदिरांच्या रचना तंत्राचा अभ्यास करावा लागेल.

### ५.१.१ बौध्द मंदिरे

हिंदू आणि जैन धर्माप्रमाणेच बौध्द धम्म ही प्राचीन म्हणून गणला जातो. या धर्माचे संस्थापक गौतम बुध्दाला मानले जाते. डॉ. भी.रा. आंबेडकरही या विधानाला पुस्ती देत म्हणतात, "या धर्माचे संस्थापक गौतम बुध्द आहेत."[६]

---

३. Ibid.
४. Sharan R., Ancient Indian History Culture and Archeaology, p.४२८
५. James Ferguson and James Burgess, The Cave Temples of India, p.५८
६. आंबेडकर भी.रा., भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, पृ.६५

इ.स.पू. ६ वे शतक हे भारताच्या इतिहासात 'धार्मिक क्रांतीचे युग' म्हणून ओळखले जाते. या काळात वैदिक धर्माचे साधे स्वरुप समाप्त झाले. व त्यामध्ये अनेक दोष निर्माण झ ाले. या धर्मात यज्ञ आणि कर्मकांडाचे महत्व वाढले. त्यामुळे सामान्य जनतेत धार्मिक असंतोष निर्माण झाला. या पार्श्वभूमिवर भारतात इ.स.पू. ६ व्या शतकात ६२ पंथ उदयास आले. त्यापैकी एक म्हणजे बौध्द धर्म होय. या धर्माचा भारतीय संस्कृतीवर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. डॉ. कठारे आणि साखरे म्हणतात, "कला व स्थापत्य क्षेत्रात या धर्माची भातीय संस्कृतीला फार मोठी देणगी मिळालेली आहे."[७] गौतम बुध्दाच्या हयातीतच महाराष्ट्रात पर्यायाने दक्षिण भारतात बौध्द धर्माचा प्रसार झालेला होता. जैन धर्माच्या तुलनेत महाराष्ट्रात बौध्द धर्माचाच सर्वप्रथम प्रसार व प्रभाव निर्माण झाला. त्यामधूनच एका नवीन संस्कृतीचा उदय झाला. असे आपणाला म्हणता येते.

बौध्द भिख्खूंमुळे महाराष्ट्रात बौध्द धर्माचा प्रसार झाला त्यांनीच या ठिकाणी कलेलाही आश्रय दिला. एम.एस. मोरे म्हणतात, "ठाणे जिल्हयातील सोपारा (सुप्परका) येथील व्यापारी अर्हत पुष्ण याने श्रावस्ती येथे गौतम बुध्दाकडून धर्माची दीक्षा घेतली."[८] यानंतर त्याने सोपारा येथे विहार बांधला. व धम्माचा प्रसार सुरु केला.

लेणीच्या बाबतीत बीड आणि लातूर जिल्ह्यातील अनुक्रमे अंबाजोगाई आणि खरोसा येथील लेण्याही प्रसिध्द आहेत. लेणीच्या बांधकामासाठी किंवा लेणी खोदण्यासाठी कोणते तंत्र आवश्यक असते यांचा आपण विचार करु.

लेणी निर्माण करीत असतांना डोंगरी भाग, जंगलांचा परिसर, नद्यांचा काठ, निसर्ग सौंदर्य आदि घटक तत्कालीन कलाकाराने समोर ठेवले. मा.शा. बोराडे म्हणतात, "लेण्यांतील स्तंभांची ठेवण लेणी खोदताना स्थापत्यविशारदांनी झोपडीच्या आकृतीबंधाचा उपयोग केला. त्यांना झोपडी किंवा घर जसे दिसेल तशी लेणी खोदण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसतो.

---

७. कठारे अनिल, साखरे विजया, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, पृ.२०७

८. मोरे एम.एस., महाराष्ट्रातील बौध्द धम्माचा इतिहास, पृ.३५-३६

एखादे घर ज्याप्रमाणे लाकडी खांबावर तुळ्या (गोपाने) आणि कड्या टाकून उभारण्यात येते व नंतर भिंतीमध्ये दारे खिडक्या बसवण्यात येतात. त्याप्रमाणे गुंडाची प्रारंभिक रचना दिसून येते. स्वाभाविक लेण्यांत स्तंभांना अपार महत्व आहे."[१]

लेणी खोदतांना कशा प्रकारचे तंत्रज्ञान, हत्यारे व अवजारे वापरण्यात आली ते निश्चितपणे सांगता येत नाही. लेणी खोदण्यासाठी अगोदर त्याचा आराखडा तयार करण्यात येत असावा. लेणी दान करणारे सत्पुरुष आपल्या आवडीनिवडीप्रमाणे त्यात फेरबदल करत असावेत. आरंभी सर्व भर साधेपणावर होता. लाकडी घरबांधनीचे संकेत वगळता फारशी सजावट करण्यात येत नसे. लेण्यांची उपयुक्तता व गांभीर्य लक्षात घेऊन त्यांची निर्मिती झाली. लेणी खोदतांना त्यांचा आराखडा आणि मोजमापे निश्चित झाल्यानंतर खडकाचे पृष्ठभाग तासून साफ करण्यात येई. भिंतीच्या किंवा छताच्या पृष्ठभागावर बहुधा खडू किंवा रंगीत माती ह्यांनी शिल्पाचे रेखाटन करुन यानंतर ते छिन्नी-हातोड्याने खोदण्यात येईल. शिल्प प्रतिमेची असलेली आकृती प्रमाणे ठरवल्यानंतर अंतिम कोरीव कामास सुरुवात करण्यात येत असे. कलाकारांनी केलेली अशी कोरीव रेखाटने खरोसा-अंबाजोगाई व अन्य ठिकाणी पहावयास मिळतात.

लेण्यांमधील स्तंभांची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण असते. वास्तुतज्ञांनी चैत्यमंडपातील स्तंभ झोपडीतील खांबाप्रमाणे अगदी साध्या पण थोड्या कलत्या आकारात खोदलेले आहेत. काही ठिकाणी या स्तंभावर कलात्मक बौध्द प्रतिके व लेख खोदलेले आढळतात. लेण्यांच्या रचनेत जसजसी प्रगती होत गेली तसतसे स्तंभांच्या आकारात परिवर्तन येऊ लागले. कार्ले, भाजे, नाशिक, अजिंठा व इतर ठिकाणी स्तंभ कलते ठेवण्याऐवजी कुंभासारख्या दिसणाऱ्या तळखड्यात येऊ लागला. लाकडी इमारतींच्या खांबाना वाळवी व इतर कीटक लागू नयेत म्हणून त्यांना माती व चुना ह्यांच्या मिश्रनाने भरलेल्या माठात उभे करत. त्यांचे अनुकरण लेण्यांतील खांब खोदताना करण्यात आले.

---

१. बोराडे मा.शा., महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन भाजे व कार्ले लेणी, पृ.४

"वास्तविक दगडात खांब कोरायचे असल्यामुळे तळखड्यांचे प्रयोजन नव्हते. मात्र यामुळे स्तंभांना डौल व भरीव पणा येऊ लागला. स्तंभाचे शीर्ष हत्ती, सिंह, वृषभ इत्यादी प्राणी व त्यावर स्वार असलेल्या स्त्री-पुरुषांच्या आकृतींनी अलंकृत करण्यात येऊ लागले."[१०] लेणी स्तंभाप्रमाणेच बौध्दाचे श्रध्दास्थान म्हणजे स्तूप होय. असे स्तूप देखील प्राचीन काळात उभारले गेले मग या स्तूपाला नेमकं काय म्हणायचं. "स्तूप म्हणजे एखाद्या महापुरुषाची विशिष्ट आकाराची समाधी होय."[११] इतिहासपूर्व काळात मृत व्यक्तींचे किंवा शरीराचे दफन किंवा दहन केल्यावर त्या अवशेषावर मातीचा किंवा दगडाचा ढिगारा करण्याची प्रथा होती. तिच्या मधूनच स्तूपाचा विशिष्ट आकार उत्क्रांत झाला. जैन धर्मीय लोक स्तूप उभारीत, परंतु सम्राट अशोकानेही २० कपिलवस्तूकडे पुनरागमन करुन भव्य स्तूप बांधून त्यांना भेटी देण्याचा प्रघात सुरु केला.

लोकांना तीर्थयात्रा करणे सुलभ व्हावे या उद्देशाने असे स्तूप विविध नगरांत मुख्य रस्त्यांजवळ उभारण्यात आले. बुध्दाचा संदेशव जीवन या स्तूपांच्या रुपाने सतत जनतेच्या समोर राहावेत हा स्तूप उभारण्यामागील प्रमुख उद्देश होता. अशोकाने अनेक स्तूप बांधले स्तूपाचे मूळचे स्वरुप समाधीचे होते भगवान बुध्द किंवा त्यांचे महान शिष्य वा भिक्षू यांचे पार्थिव अवशेष अस्थी, रक्षा, केस इ. एखाद्या कलशात ठेवीत. व तो जमीनीखाली ठेऊन त्यावर स्तूपाची वास्तु बांधण्यात येई. सर्वात खाली चौरस किंवा दंडगोलाकार पाया बांधल्या जाई. या पायावर अर्घगोलाकार अंडाकृती, घुमटासारखी रचना असे. खालच्या पायाला 'मेंढी' किंवा 'दंड' म्हणत तर वरील अर्धगोलाकार भागाला 'अंड' अशी संज्ञा आहे. अंडाकृती भाग वरील बाजूस थोडा चवढा केलेला असे. या वर्तुळाकार भागाच्या मध्यावर एक छोटा चौरसाकृती मंडप असे त्याला 'हर्मिका' म्हणतात. हर्मिकेच्या मध्यावर एक खांब किंवा यष्टी उभी करुन तिच्यावर एक किंवा तीन छत्र्या असत. या रचनेला छत्रावली किंवा त्रिरत्न असे

---

१०. तत्रैव, पृ.६

११. तत्रैव, पृ.८

म्हणतात. स्तूपाचा पाया व अंडाकृती भाग संपूर्णपणे भरीव असे आतील भाग कच्या विटांनी बांधून त्यावर बळकटीसाठी पक्क्या विटांचे थर व चुन्याचा गिलावा केला जाई.

"स्तूपासभोवती प्रदक्षिणा करण्यासाठी प्रदक्षिणा-पथ असे. त्याच्या बाहेरील अंगाने कठडे उभारले जात. आत प्रवेश करण्यासाठी या कड्यांना चारी दिशांना चार भव्य व अलंकृत प्रवेशद्वारे असत. त्यांना 'तोरणे' असे नाव आहे व कठड्यांना 'वेदिका' म्हणतात."[१२] प्रारंभीच्या काळात मृतांच्या पार्थिव अवशेषांवर स्तूप रचना करण्यात येईल. परंतु नंतरच्या काळात पुष्कळ स्तूपाची आवश्यकता भासू लागली. म्हणून स्तूप हे बुध्दाच्या महापरिनिर्वानाचे प्रतिक मानण्यात येऊ लागले व एक उपासनीय वास्तु असे त्याचे स्वरुप बनले. अनेक गुहामंदिरातील चैत्यांमध्ये कोरलेले स्तूप या प्रकारचे (पितळखोरे, भाजे, कार्ले, नाशिक, जुन्नर व अजिंठा) आहेत. समाधी असे त्याचे स्वरुप नसून एक पुजनीय प्रतिक असेच स्वरुप नंतरच्या काळात राहिलेले दिसते.

"मौर्यकाळात डोंगर खोदून गुहामंदिरे निर्माण करण्याची प्रथा सुरु झाली होती."[१३] अशा या गुहांमदिरांचे चैत्य आणि विहार असे दोन प्रकार आहेत. चैत्य म्हणजे बौध्द भिक्षूंची प्रार्थनेची जागा व विहार म्हणजे त्यांची राहण्याची, निवासाची जागा चैत्यामध्ये एक आयताकृती आकाराचे सभागृह असते. सभागृहाच्या मागील बाजूस अखंड दगडात बांधलेला स्तूप असून त्या मागील भिंत ही अर्धवर्तुळाकार असते. सभागृहात स्तूपासमोर स्तंभाच्या दोन ओळी प्रवेशद्वारापर्यंत असतात. स्तंभांच्या दोन रांगामुळे मध्यवर्ती सभागृहाच्या दोन्ही दोन चिंचोळी दालने किंवा पाखी निर्माण करत. स्तूपाभोवती प्रदक्षिणापथ असतो. चैत्याचे छत घुमटाकार असते. व त्यात लाकडी किंवा दगडात कोरलेल्या तुळ्या असतात. मुख्य सभागृहाला प्रवेशद्वार व बाजूला पडद्यांना लहान प्रवेश मार्ग असतात. मुख्य प्रवेशद्वारावर मोठी अश्वनालाकृती कमान असते. हवा व प्रकाश आत येण्यासाठी त्याची योजना असावी. "चैत्याच्या प्रवेशद्वारा

---

१२. तत्रैव, पृ.८-९
१३. तत्रैव, प.१०

प्रमाणेच विहाराचे प्रवेशद्वार असते."[१४] सभागृहाच्या तिन्ही बाजूच्या भिंतीत भिक्षुंसाठी एका व्यक्तीला पुरतील अशा लहान खोल्या असतात. त्यात बिछाना म्हणून दगडी चौथरे असतात. व दिवा ठेवण्यासाठी कोनाडा असतो. मोकळ्या पटांगणाच्या तिन्ही बाजूंना राहण्याच्या खोल्या असतील तर त्याला संघाराम म्हणजे अनेक भिक्षूंच्या संघाची राहण्याची जागा म्हणतात. गुप्तकाळाच्या अखेरीस चैत्य व विहार यांची एकत्र योजना केलेली आढळते.

अशा प्रकारे बौध्द धर्माची श्रध्दास्थाने किंवा त्यांची मंदिरे कशा प्रकारची असतात त्यांची गुहामंदिरे त्यातील चैत्य आणि विहार तसेच लेण्या आणि स्तूप मंदिरांची रचना तंत्रे कशा प्रकारची असतात याचा आपणाला वरील स्पष्टीकरणात धावता व उपयुक्त असा आढावा घेता येतो.

## ५.१.२ जैन मंदिरे

भारत देश विविध धार्मिक संस्कृतीने नटलेला असून जगाच्या पाठीवर विविध धर्म, कला, शिल्प व संस्कृतीचे जैनांची अतिशय अशी प्राचीन तीर्थक्षेत्रे आहेत. महाराष्ट्रात जैन धर्माचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. इ.स.च्या पहिल्या शतकापूर्वीच जैन धर्मियांनी महाराष्ट्रात पावले रोवलेली दिसून येतात.

सुभाष धोंगडे म्हणतात, "मराठवाडा विभागात एक सिध्दक्षेत्र व १४ अतिशय क्षेत्रे आहेत. त्यापैकी बरीचशी प्राचीन आहेत. यामध्ये मंदिरे तीर्थक्षेत्रे, गुंफा, पीठे आदींचा अंतर्भाव आहे या सर्व प्राचीन क्षेत्रांतून जैनांचा एकेकाळी मराठवाड्यात चांगला प्रभाव होता याची प्रचिती येते."[१५] तसेच मराठवाडा विभागात कुंथलगिरी हे एकमेव सिद्धक्षेत्र आहे तर "कचनेर, तेर, वेरुळ, पैठण, जटवाडा, सावरगाव, नवागड, जिंतूर, शिरडशहापूर, आष्टा (कासार) असेगाव, केसापूरी, पंचालेश्वर आणि कोठाळा ही अतिशय क्षेत्रे आहेत."[१६] याबरोबरच जैनांचे लातूर आणि बीड जिल्ह्यातही काही ठिकाणे आहेत. त्यामध्ये बीड जिल्ह्यात अंबाजोगाई येथेही जैन

---

१४. तत्रैव, पृ.११
१५. धोंगडे सुभाष, मराठवाड्यातील प्राचीन जैन तीर्थक्षेत्रे, पृ.७५
१६ तत्रैव

लेणे सापडते तसेच धर्मापुरी या ठिकाणी जैनांच्या अनेक मूर्ती सापडतात. या अवशेषांवरुन आपणाला असा तर्क काढता येतो. की या ठिकाणी जैनांचे एखादे मंदिर असावे. जैन धर्माची दक्षिणेतील प्राचीनता ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकापर्यंत मागे जाते जामखेडकर म्हणतात, "जैन लोकांमध्ये असे सांगितले जाते की, चंद्रगुप्त मौर्य हा जैन इतिहासातील सुप्रसिध्द मुनी भद्रबाहूचा शिष्य होता. त्याने आपल्या आयुष्याच्या अखेरचा काळ दक्षिण कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथे घालविला."[१७] प्राचीन काळापासून असा हा जैन धर्म भारतात अविरत आपले स्थान टिकून असलेला आपणाला निदर्शनास येतो. बौध्द आणि हिंदू धर्माच्या खांद्याला-खांदा लावून हा धर्म आपला सांस्कृतिक विकास साधत आहे या धर्मात दिगंबर आणि श्वेतांबर असे प्रमुख दोन पंथ आहेत. अशा या धर्माने कला-स्थापत्यातही प्रगती साधलेली दिसते.

जैन धर्मात चोवीस तीर्थकारानांच महत्वाचे स्थान दिले जाते. त्यांच्याच प्रतिमा पुजनीय मानल्या जातात. अशा प्रतिमा अनेक ठिकाणी मंदिरे किंवा गुंफामध्ये दिसून येतात. याच्याही पूर्वी जैन लोक कशाची पुजा करत होते याचा अभ्यास करताना नी.पु. जोशी म्हणतात, "आयागपट्टाची पुजा करत तीर्थकर प्रतिमांची लोकप्रियता वाढण्याअगोदर जैनांचे आवडते पूजन प्रतिक दोन सव्वादोन फुट लांबीचा वर्गाकार दगड असे याच्यावर स्तूप, धर्मचक्र, स्वस्तिक, तीर्थकर प्रतिमा, त्रिरत्न, अष्टमंगल चिन्हे वगैरे कोरलेली असत. अशा दगडांवरील लेखांत त्याला आयागपट्ट ही संज्ञा दिली असून तो पुजेकरिता बसविला गेला. अशी नोंद आढळते."[१८] मथुरेहून असे बरेच आयागपट्ट मिळाले आहेत. कुषाण काळानंतर यांची लोकप्रियता मावळलेली दिसते.

स्तूपाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर कोणत्याही मान्य व वंदनीय अशा आचार्याच्या उत्तरक्रिनेंतर त्याचे अवशिष्ट पांचभौतिक अवशेष एका घटांत-धातुकरण्डकात स्थापन करुन त्यावर छत्रांच्या आकाराची 'स्तूप' नावाची वास्तु उभारीत "स्तूप बांधण्याची

---

१७ जामखेडकर अ.प्र., स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, पृ.८५

१८ जौशी नी.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, पृ.३३९

पध्दत जैन व बौध्द या दोघांसही मान्य होती."[१९] दोघांतही स्तूप हे उपासनेचे प्रतिक मानले जात असे. बौध्दांत याला फारच मान्यता मिळाली आणि त्यांचे स्तूप भारतभर पसरले. बौध्दांना सम्राट अशोकाप्रमाणे महान असे सम्राट लाभले त्यामध्ये त्यांनी आपल्या धर्माला मोठ्या प्रमाणात राजाश्रय दिला. परिणामी जैनांच्या तुलनेत बौध्द धर्म भारतभर या कलेच्या क्षेत्रातही आघाडीवर गेला. जैन धर्मामध्ये चैत्यवृक्ष नावाची संकल्पना रुढ होती यु.पी. शहा म्हणतात, "बोधी वृक्षांप्रमाणे तीर्थकरांच्या निमित्ताने काही वृक्षांना पावित्र्य मिळाले"[२०] पण येथे बौध्दाप्रमाणे याचे फार महात्म्य वाढलेले दिसत नाही. त्याचप्रमाणे या वृक्षांत वैविध्यही दिसत नाही. दक्षिणेत तीर्थकर प्रतिमेच्या डोक्यावर वृक्ष दाखविण्याची पध्दत बरेच दिवस होती. उत्तरेत ती काही शिल्पांतच दिसते. सुरुवातीच्या कलेत चैत्यवृक्षाचे अंकन कठड्याने घेरलेल्या एका झ ाडाच्या रुपांत केले जाते.

मथुरेच्या एका शुंगकालीन शुंगकला कृतीत जी कंकाली टीला येथूनच मिळाली आहे. चैत्य स्तंभाच्या पुजनांचे दृश्य अंतिम आहे. वरच्या टोकावर सिंह असलेला हा खांब कठड्याने आवृत्त आहे. काही मंडळी त्याला प्रदक्षिणा करीत आहेत. अशाच प्रकारचे चैत्यस्तंभ स्तूपाच्या भंगणांत उभारले जात. नी.पु. जोशी म्हणतात, "मथुरेहून मिळालेल्या एका आयागपट्टावर स्तूप व त्याच्या जवळचे चैत्य स्तंभ दिसतात."[२१] यु.पी. शाह म्हणतात, "याच स्तंभातून मध्यकाळात मानस्तंभाचा उदय झाला. मानस्तंभाच्या वरच्या टोकांवर सर्वतोभद्र प्रतिमेप्रमाणे चार तीर्थकर दिसतात."[२२]

नंतरच्या काळामध्ये जैनांच्या प्रतिमा अर्थातच चोवीस तीर्थकरांच्या प्रतिमा या मानवी स्वरुपात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या आपल्याला दिसून येतात. अशा या प्रतिमा लेणींच्या स्वरुपात काही ठिकाणी मंदिरे बांधून त्यात ठेवत तर काही ठिकाणी गुंफामध्ये त्या

---

१९ तत्रैव

२० Shah U.P., Studies in Jain Art, pp.६५-७६.

२१. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३४०

२२ Shah U.P., op.cit., p.६१

असलेल्या दिसून येतात. जिंतूर या ठिकाणी जैनांच्या अनेक मूर्ती गुंफामध्ये ठेवलेल्या दिसून येतात. अंबाजोगाई या ठिकाणी हत्ती लेणी म्हणून प्रसिध्द असलेल्या ठिकाणी जैन शिल्प लेणीत गणले जाते. खरोसा या ठिकाणीही जैन शिल्प लेणींच्या स्वरुपात अभ्यासले जाते.

तसेच धर्मापुरी या ठिकाणी मात्र सुट्या स्वरुपात मूर्ती विखुरलेल्या दिसतात. त्यामध्ये सुपार्श्वनाथ, चंद्रप्रभ, पार्श्वनाथ, तीर्थकराची खंडीत मूर्ती, यक्षी सिध्दायीका आणि स्तंभाच्या स्वरुपात दिसून येतात. यावरुन जैन धर्मात कशा प्रकारे आपल्या श्रध्दास्थानांची जपणूक केली आहे याचा आपणाला अभ्यास होतो. बौध्दांप्रमाणेच जैनांच्याही देवालयांचा किंवा त्यांच्या कलास्थापत्याच्या विविध अंगांचा आपणाला वरील माहितीत अभ्यास करता येतो.

### ५.१.३ हिंदू मंदिरे

हिंदू धर्मात मंदिरांना किती महत्वाचे स्थान आहे. याचा आपणाला हिंदू मानसीकतेचा अभ्यास केल्यावर समजते. सुधीर कोटीकर म्हणतात, "मराठवाड्यात असंख्य मंदिरे आहेत त्यांचे प्रत्येकाचे वेगळें असे वैशिष्ट्य आहे. प्रत्येकाला वेगळा असा इतिहास आहे. अशा मंदिरांमधून विविध अशा देवदेवतांचे पूजन केले जाते. उत्सव साजरे केले जातात. अशा उत्सवांच्या नवरात्र महोत्सवाच्या यात्रेच्या निमित्ताने हजारो मैलांवरुन भक्तगण एका आत्मिक ओढीन येतात. आपल्या प्रिय देवतेचं मंदिर दूरुन पाहूनच त्यांची मनं बहरुन येतात. मग ह्रदयात भावसुमनांची माला गुंफलेली असते. मनात दर्शनाची ओढ असते मग आपल्या देवतेच्या चरणावर अशी भावसूमने अर्पित केल्यावर त्या भक्तगणांचं जीवन कृतार्थ झाल्यासारखं त्यांना वाटतं."[२३]

अशाच प्रकारच्या या मंदिर बांधकामतंत्राचा आपणाला अभ्यास करावयाचा आहे. मंदिर कशी, कोठे का आणि कशा प्रकारे उभा केली जातात याचाच सामान्य अभ्यास आपणाला करावा लागेल. मंदिराच्या बांधकामासाठी अत्यंत मार्गदर्शनपर असे प्रासादमंडन

---

२३ कोटीकर सुधीर, मराठवाड्यातील मंदिरे, पृ.७०

पुस्तक किंवा ग्रंथ उपलब्ध झालेला आहे. त्यात मंदिराविषयी माहिती देतांना सुत्रधार मंडन म्हणतात, "प्रासादात सहा मुख्य अवयव (षड वर्ग) असतात. पीठ, मंडोवर अथवा जंघा म्हणजे भिंत, मंच किंवा उत्तर, आमलसार व कळस प्रासादांच्या वर्गीकरणासाठी या षडवर्गाचाही अंतर्भाव केला जातो."[२४] धर्मापुरी येथील मंदिरे ही प्रामुख्याने पीठ आणि मंडोवर एवढ्याच रुपात दिसून येतात. मुख्यतः पाच आकाराचे मंदिरेअसतात. चौरस, आयाताकार, वर्तुळाकार, अंडाकृती आणि अष्टकोनी असतात.

नागर, मिश्रक व लतिन प्रकारचे मंदिरे या पाचही आकारांची असू शकतात. द्रविड, भूमिज व फांसनाकार प्रकारचे प्रासाद चौरस, वर्तुळाकृती किंवा अष्टकोनी असतात. ते आयाताकार किंवा अंडाकृती नसतात. सांधार, वराट, सिंहावलोकन, दारुज, विमान नागर व विमान पुष्पक या प्रकारांचे प्रासाद फक्त चौरस आकाराचे असतात. धर्मापुरी आणि पानगाव येथील मंदिरे भूमिज प्रकारची असून या मंदिरांच्या गर्भगृहांची रचना ही चौरसाकृती आहे. व वरचा भाग गजपृष्ठाकार असलेला दिसून येतो. मंदिरासाठी किंवा त्याच्या बांधकामासाठी योग्य प्रकारचा दगड लागतो. दगडाची पारक करावी लागते तसेच मंदिराची जागा ठरवावी लागते. योग्य जागी योग्य दिशेला त्या मंदिराचे प्रवेशद्वार असावे लागते. सुरुवातीला मंदिराचा पाया घालावा लागतो. त्याच्यावर पीठ असते किंवा जोते असते. यालाच काही ठिकाणी जगती म्हणतात. सुत्रधार मंडनाच्या मतानुसार, "प्रासादाच्या अधिष्ठनाला जगती असते."[२५] याच जगतीवर किंवा अधिष्ठानावर मंदिराचा पूर्ण डोलारा उभा असतो. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणीही अशा प्रकारची जगती असलेली दिसते.

जगतीचे अनेक प्रकार असतात. चौरस, आयात, अष्टकोनी, वर्तुळाकार, वृतायत असे प्रासादाच्या आकाराला अनुरुप असे जगतीचे पाच प्रकार सांगितले आहेत. प्रासाद चौरस, आयात, वर्तुळाकार असा ज्या आकाराचा असेल त्याच आकाराची त्याची जगती असावी.

---

२४ सुत्रधार मंडन, पूर्वोक्त, प्रस्तावना, पृ.१०

२५ तत्रैव, पृ.१८

सुत्रधार मंडन पुढे म्हणतात, "कनिष्ठ प्रासादाला कनिष्ठ, मध्यम प्रासादाला मध्यम व स्वरुपवान अशी जगती असावी."[२६]

मण्डपात (मंडपाच्या बाहेर मंडोवरावरती) ज्या देवमूर्ती असतात. (त्यांचे स्नानाचे पाणी बाहेर नेण्यासाठी) त्याच्या उजव्या अथवा डाव्याबाजूला बुध्दीमान शिल्पीने प्रणाल करावी. जगतीवर (असलेल्या देवमुर्तीसाठी) चारी दिशांना (प्रणाली) कराव्यात. धर्मापुरीच्या केदारेश्वर, मरळसिध्द, तुकाईदेवीचे मंदिर आणि पानगावचे विठ्ठल मंदिर यांना प्रणाल सोडलेल्या दिसून येतात. "देव पूर्वाभिमुख किंवा पश्चिमाभिमुख असतात. त्यांचे मुख दक्षिण व उत्तर दिशांना असू नये (हा झाला सामान्य नियम) ब्रम्हा, विष्णू, शंकर, सूर्य, इन्द्र वा कार्तिकेय यांचे मुख पूर्व अथवा पश्चिमेकडे असावे."[२७] म्हणजे यांची दिशा देखील महत्वाची असते. त्यानुसार मंदिराचे द्वार असते तसेच श्रेष्ठ देवांच्या मूर्ती शहरांच्या मध्यभागी किंवा शहराबाहेर असोत त्या शहराभिमुख असाव्यात. गणपति, कुबेर व लक्ष्मी यांची स्थापना शहराच्या वेशीपाशी केल्यास ते सुख देणारे होतात. वानर श्रेष्ठ हनुमानाचे तोंड नैऋत्य दिशेला करावे इथर कुठल्याही देवाचे तोंड उपदिशेकडे कधीही ठेवू नये. धर्मापुरी येथील मंदिराला पिठ, जाड्याकुंभ, कर्णिका, ग्रासपट्टी, गजथर, अश्वथर, नरथर आदि भाग निदर्शनास येतात. तसेच जंगा भागही वैविध्यपूर्ण शिल्पांनी कोरलेला दिसून येतो. सुत्रधार मंडनाच्या मतानुसार, "जंघेवरती नक्षी म्हणून हत्ती, सिंह, काळ व मकर यांच्या रांगा दाखवाव्यात कोनांपाशी आठ दिकपालांच्या मूर्ती असतात. भद्रावरती शंकराची नरेशमूर्ती असावी. अंधक मूर्ती दक्षिण दिशेकडील भद्रावर असावी. तसेच जंघेवर ब्रम्हा, विष्णु, महेश आणि इतर देवांच्या मूर्ती कोरतात. पाण्याची निष्कास नाली उत्तरेस जंघेवर द्रष्टांनी शोभत असलेल्या देवीची मूर्ती असते. वीतराग आणि त्यांच्या शासन देवता यांच्या मूर्ती देखील जंघेवर असतात. उभे वारीमार्ग असतात. त्यांच्यापाशी समाधीत मग्न असलेले ऋषी मुनी दाखवावेत."[२८]

---

२६ तत्रैव.
२७ तत्रैव, पृ.२९
२८ तत्रैव, पृ.४६

अशा प्रकारे जंघेचा भाग किंवा मंडोवराचा भाग हा बाह्यांगाने सुशोभित केलेला बहुतांशी शिल्प सौंदर्याने नटलेल्या मंदिराचा दिसून येतो. जंघेच्या वरचा भाग भरणी, शिरावटी, कपोतालिका, अंतराल आणि छाद्य अशा प्रकारचा असतो. धर्मापुरीचे केदारेश्वर मंदिर छाद्य पर्यंतच आहे. पण मरळसिध्द मंदिराला मात्र विटांचे शिखर दिसून येते. तशाच प्रकारचे शिखर हे पानगावच्या विठ्ठल मंदिरालाही आहे. मंदिराच्या शिखराची रचनाही विविधतापूर्ण असते. याचा आपण विचार करणारच आहोत. मंदिराच्या गर्भगृहात मुख्यमूर्ती असून त्याचे द्वारही वैशिष्ट्यपूर्ण असते. "दाराच्या उंचीचे आठ किंवा नऊ भाग करुन (वरचा) एक भाग गाळावा. उरलेल्या भागांचे तीन भाग करुन दोन भागांची उभी मूर्ती (व एक भाग आसन) असावे. बसलेली मूर्ती एक भाग (व तीचे आसन दोन भाग) असावे."[२९]

मंदिराचे अर्थातच गर्भगृहाचे द्वारही वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यापुढे अंतराळ असतो. नंतर सभामंडप आणि मुखमंडप अशा प्रकारची मंदिरांची रचना ही सामान्यतः असते सभामंडपात अनेक स्तंभ असतात व ते अनेक प्रकारच्या चित्रांनी मंडीत असतात. साधारणतः अशाच प्रकारची रचना ही आपणाला धर्मापुरी आणि पानगाव येथील मंदिर स्थापत्याची असलेली आपल्या लक्षात येते.

## ५.२ मंदिर बांधकाम शैलींचा अभ्यास

मंदिरे ही हिंदू धर्मात एक आदराचे व पुजनीय ठिकाणे म्हणून निर्माण केली जातात. जसे बौध्द आणि जैन धर्मातील मंदिरे निर्माण केली त्याचाच परिपाक म्हणून हिंदू धर्मातही ती निर्माण केली. या मंदिराचा विकास कसा झाला याचाही आपणाला अभ्यास करावा लागतो. गेल्या शतकात मूर्ती पुजेच्या प्राचीनतेचा शोध घेण्यासाठी झालेल्या संशोधनाचा एक भाग म्हणून भारतीय मंदिर स्थापत्याला कधी व कशी सुरुवात झाली याचाही शोध घेण्यात आला. अ.प्र. जामखेडकर म्हणतात, "भारतात आढळलेल्या सर्वाधिक प्राचीन मूर्ती बुध्दाच्या व कुषाणकालीन असून त्या व्यवच्छेदकपणे गांधार आणि मथुरा शैलीतील आहेत. त्यामुळे

---

२९. तत्रैव, पृ.६३

मूर्तीपुजा आणि मंदिरस्थापत्य या बाबी भारतात ग्रीकांकडून किंवा भारताच्या वायव्य सरहद्दीलगत नांदनाऱ्या ग्रीकोदभव (Hellenistic) संस्कृतीकडून आल्या असाव्यात असे गृहित धरण्यात आले. मूळ भारतीय धर्मात, म्हणजेच वैदिक संस्कृतीत देवांना अग्निमध्ये आहुत्या दिल्या जात आणि आहुती अग्नी देवांना पोचवतो अशी धारणा होती. त्यामुळे यज्ञविधी हाच पुजेचा एकमेव प्रकार प्रचलित होता."[३०] म्हणजे याच्या अगोदर हिंदू धर्मामध्ये मूर्तीपुजा अस्तित्वात नव्हती.

पी.जी. जोशीही म्हणतात, "ग्रीकांच्या संपर्कामुळे व महायान पंथांच्या उदयामुळे भारतातील वैदिक, जैन व बौध्द धर्मात मूर्तीपुजा सुरु झाली. त्याप्रमाणे शैव-वैष्णव भक्तीपंथाचा उदय, त्यासाठी कारणीभूत ठरला. परिणामी भारतात मूर्तीशिल्पांचा जन्म झाला. लौकिक व देवतांच्या कलात्मक मूर्तीची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली मात्र त्यातून मथुरा व गांधार शैलींचा जन्म झाला. प्रारंभी भारतीय स्वतंत्र मूर्ती शिल्प विकसित झाले. त्याचे प्रमुख केंद्र मध्य भारतातील मथुरा होते. म्हणून त्यास 'मथुरा शैली' असे म्हणतात"[३१] ग्रीकांच्या आक्रमनामुळे भारतीय स्थापत्य शिल्पावर त्यांचा प्रभाव पडलेला होता. शिकंदराच्या स्वारीपासून जवळपास तीनशे वर्षे ग्रीकांशी भारतीयांचे घनिष्ठ संबंध होते. "कुशाण काळात ग्रीक रोमन, इराणी प्रभावातून जी भारतीय स्थापत्य शिल्पकला उदयाला आली तिला गांधार शैली अशी संज्ञा आहे."[३२] भारतीय परकीय शैलीचा मनोज्ञ संगम ह्या कला प्रकारांत दिसून येतो. इ.स.च्या पहिल्या तीनशे वर्षात (इ.स. ०१-३००) गांधार पध्दतीची भरभराट झालेली होती. भारताच्या वायव्य सरहद्द प्रांतातील 'तक्षशिला-गांधार' हे प्रमुख केंद्र होते. विशेष म्हणजे चीन, जपान, कोरिया व ब्रम्हदेशात गांधार शैलीची बौध्द स्मारके व मूर्ती निर्माण झाल्या.

मूर्तीपुजेचे उल्लेख वेदांमध्ये आढळत नाहीत. त्यामुळे देवांच्या मूर्ती बनवणे आणि या मूर्तीकरिता वास्तु किंवा मंदिरे बांधणे ही संकल्पनाच वेदविधींना अज्ञात किंवा परकी होती.

---

३०. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.९७
३१ जोशी पी.जी., प्राचीन भारत, पृ.२७९
३२. तत्रैव.

त्यामुळे आपल्या आचार्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या प्रतिकांची किंवा त्यांचे अवशेषांनी युक्त असलेली स्तूपासारख्या वास्तुची पुजा करणाऱ्या बौध्दांना आणि जैनांनाही ती नवीन होती असे युरोपीयन गटाच्या काही विद्वानांचे ठाम मत आहे. भारतीय विद्वानांनी विशेषतः आनंद कुमार स्वामी यांनी या मताच्या विरोधात जोरदार पुरावे सादर करुन मूर्तीपुजा आणि मंदिरस्थापत्याची मुळे इतिहासकाळाच्या प्रारंभी भारतात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेल्या यक्षपुजेत होती असे दाखवून दिले.

अ.प्र. जामखेडकर म्हणतात, "धार्मिक वाङमय, उत्खननात आढळलेले भौतिक पुरावे कलैतिहासिक प्रतिनिधीत्व करणाऱ्या वस्तु आणि पुराणवस्तु यांचा साकल्याने अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, इसवी सनाच्या पहिल्या दोन शतकांत वैदिक, जैन आणि बौध्द अशा विविध धर्मप्रवाहांना देवांच्या सगुण उपासनेची तीव्रगरज भासली. हिंदू धर्मात ही स्थिती भक्ती आणि अवतार या संकल्पनांमध्ये तसेच विष्णू, शिव, बुध्द व महावीर या साऱ्यांना सामायिक असलेल्या भगवान या संज्ञेने महत्वपूर्णपणे विशद झाली आहे."[३३] पण पुराणवस्तुचे म्हणजे देवाचे सगुण स्वरुप कसे असावे किंवा मर्त्य स्वरुपात जन्माला आलेल्या भगवान बुध्दाची किंवा महावीरांची मूर्ती कशी असावी तिची कलात्मक वैशिष्ट्ये काय असावीत हे मात्र स्थानिक कला परंपरेवर अवलंबून होते.

ग्रीकोद्भव कलापरंपरा असलेल्या प्रांतातील बौध्द आणि हिंदू लोकांनी शिव, विष्णू किंवा बुध्दाला ग्रीक देवतांशी साधर्म्य असलेल्या स्वरुपात साकारले तर मूळ स्थानिक कला परंपरा अगोदरच विद्यमान असलेल्या प्रांतातील लोकांच्या देवमूर्ती पुजेत आधीपासूनच प्रचलित असलेल्या यक्षमूर्तीशी मिळत्याजुळत्या होत्या. दगडी फरशीवर किंवा शिलाफलकावर देवमूर्ती व दगडी कठडा असे पहिल्यावहिल्या देववास्तुंचे किंवा मंदिरांचे स्वरुप होते. देवमूर्ती आणि सभोवताली दगडी कठडा असलेल्या शिलाफलक एखाद्या झाडाखाली असत. या शिलाफलकांवर संबंधित देवतेचे वाहन कोरलेले असे प्राचीन काळात ज्यांची पुजा बहुतेक सर्व

---

३३ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त,पृ.९८

ठिकाणी प्रचलित होती ते वृष्णिवीर स्तंभशीर्ष म्हणून कोरलेल्या लांच्छनांच्या स्वरुपात दाखविले जात असत.

इतिहास काळाच्या सुरुवातीलाच मंदिरांचे जे देवगृह असे स्वरुप होते. ते जाऊन त्याला प्रासाद असे स्वरुप प्राप्त झाले. "राजा हा विश्वातील महत्वाची कार्ये करणाऱ्या आठ देवांचा (लोकपालांचा) पृथ्वीवरील प्रतिनिधी आहे अशी श्रध्दा होती. त्यामुळे जर राजा हा देवाचा प्रतिनिधी असून प्रासादात राहतो तर देवाच्या निवासवास्तुचे स्वरुप अनेकमजली प्रासाद असावे हे ओघानेच आले. देवाची दिनचर्याही राजाशी मिळतीजुळती ठेवण्यात आली. उदा. दर चार घटिकांनंतर देवळात नगारा वाजविण्यात येऊ लागला. यालाच चौघडा म्हणतात. भूपाळ्या म्हणून त्याला उठविणे व रात्री झोपविणे, नैवद्य दाखविणे., त्याची संगीत आणि नृत्याद्वारे करमणूक करणे हेही दिनचर्येचे भाग होते."[३४]

वरील सर्व उपचारांना अंगभोग आणि रंगभोग अशी नामाभिदाने आहेत. देवाला हे असे राजासारखे स्वरुप प्राप्त झाल्यामुळेच पुजाविर्धीमध्ये अनेक राजोपचारांचा समावेश झाला हे सर्व राजोपचार यथासांग पार पडावेत यासाठी मंदिराच्या तलविण्यासातही काही बदल घडून आले. मंडप आणि गर्भगृह यांच्यामध्ये अंतराळाची योजना करण्यात आली आणि मंडपामध्ये नृत्याकरिता एका चौकाची (रंगमंडपाची) भर पडली. गर्भगृहावरील अनेक मजले अभिव्यक्त करणारे शिखर आणि गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला द्वारपाल किंवा प्रतिहार आले.

"यानंतरच्या विकासात मंदिर खुद्द ब्रम्हांडाचे प्रतिक बनले. ख्रिस्तोत्तर दहाव्या ते अकराव्या शतकात साकारलेल्या या स्वरुपात मंदिर हे गर्भगृहावरील देवाचे शरीर मानले गेल्यामुळे मंदिराच्या बाह्य आणि अंतरभागावर परिवार देवता कोरण्यात आल्या. मंदिर स्थापत्याच्या चौथ्या टप्यात मंदिर नगरांचा (Temple cities) उदय झाला. यात संपूर्ण नगर मंदिराच्या तटबंदीच्या आत असून मुख्य मंदिर या नगराचे मध्यवर्ती केंद्र बनले."[३५]

---

३४ तत्रैव, पृ.९९
३५ तत्रैव.

पूर्णपणे विकसित मंदिर स्थापत्यात अनेक गोष्टींचा समावेश झाल्यामुळे त्या हिंदू किंवा भारतीय जीवनाचे घटक आणि सामाजिक संस्था म्हणून त्यात झालेल्या विकासाची किंवा फेरफाराची प्रतिबिंबे दिसून येतात. याला अपवाद धर्मापुरी आणि पानगावांची मंदिरेही नाहीत. कारण याही ठिकाणी जी मंदिरे आहेत त्यांच्यावरील जीवनाची ओळख होते. मग अशी मंदिरे बांधण्यासाठी तत्कालीन स्थापर्तींनी काही तंत्रे विकसीत केली आणि त्यानुसार मंदिरे उभारली जाऊ लागली. त्या मंदिरामध्ये काही मंदिरे विटांची बांधली गेली तसे पाहिले तर प्रारंभी विटांचीच मंदिरे बांधली गेली पण पुढे चिरकाल ती वास्तु टिकावी या हेतुने दगडाची मंदिरे उभी केली. मग अशी उभी केलेली मंदिरे अनेक प्रकारे अर्थातच अनेक शैलींनी परिपूर्ण आहेत त्या शैलींचा आपण अभ्यास करुया. मंदिराच्या काही मोजक्या बांधकाम शैली प्रकारांचा अभ्यास -

## ५.२.१ नागर मंदिर शैली आणि उत्तर भारतीय मंदिरे

याच रचना प्रकाराला पाश्चिमात्य इतिहासकार 'इण्डो-आर्यन प्रकार' असे म्हणतात. ही शैली बांधीव प्रकारातील सर्वात जुनी शैली म्हणून ओळखली जाते. उत्तर भारतातील आद्य शैली असल्याने या शैलीची काही खास वैशिष्ट्ये आहेत. डॉ. अनिल सिंगारे ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगतात, "शिखराची उंची व त्याचा उठावदारपणा अत्यंत प्रभावी असतो, शिखराचा पाया संपूर्ण गर्भगृह व्यापणारा असतो, गर्भगृह चौरस पध्दतीचे असते, मंदिराच्या रचनेत गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, मुख्य मंडप (द्वारमंडप) नंदी मंडप हे भाग महत्वाचे असतात. मंदिराचे कळस हे टोकदार असतात अशा प्रकारच्या मंदिराचा प्रसार उत्तर भारत, दक्षिण भारत व पश्चिम भारतात झालेला दिसतो."[३६]

विशेषतः उत्तर भारतातील मंदिरांना नागर शैलींची मंदिरे म्हणतात.शैव, वैष्णव व महायान पंथाच्या प्रसारामुळे मूर्तीपुजेला प्रारंभ झाला आणि त्यातून अनेक मंदिराची निर्मिती झ ाी. गुप्त कालात मंदिर स्थापत्याचा उदय झाला रचनेच्या दृष्टीने उत्तर भारतीय मंदिरे व द्रविडी पध्दतीची दक्षिणेतील मंदिरे असे दोन प्रकार पडतात. पी.जी. जोशी म्हणतात, "तसे पाहता

---

३६ सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास (इ.स.पू. २३०-१३८१), पृ.१९६-१९८.

गुप्तशैली, चालुक्यशैली, प्रतिहार शैली, सोळंकी शैली, नागर शैली, वेसर शैली, ओडिसी शैली व हेमाडपंथी शैली असे मंदिरांचे अनेक प्रकार आहेत. धार्मिक उपासनेसाठी ही मंदिरे बांधण्यात आली तरीही मंदिर शिल्पात अनेक लौकिक प्रसंग चित्रित केलेले आहेत."[३७]

उत्तर हिंदूस्थानातल्या (विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील) विविध मंदिरांचे विवेचन येथे केलेले आहे. त्यात इ.स. ४००-१००० पर्यंतच्या मंदिरांचा समावेश आहे. काही मंदिरे विटांनी व इतर मंदिरे चुनखडी वालुकाश्म दगडांनी बांधलेली आहेत गुप्त प्रतिहार, पाल, चंदेल व अनेक रजपूत राजांनी ह्या मंदिरांची निर्मिती केली.

मंदिराची जास्त संख्या मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान व उत्तरप्रदेशात आहे. उत्तर भारतातील मंदिर रचनेची व नागरशैलीशी साम्य असलेली मंदिर रचनेची काही ठळक वैशिष्ट्ये.

१. चौकोनी किंवा चौरस गर्भगृह व देवतांच्या मूर्ती.

२. भोवताली मोकळा किंवा छत असलेला प्रदक्षिणा मार्ग.

३. गर्भगृहासमोर लहान मोठे सभामंडप.

४. सभामंडप व गर्भगृहाला जोडणारी देवळी.

५. उंच चौथरे व त्यावर कोरीव शिल्पे.

६. गर्भगृहावर निमुळते होत जाणारे उर्ध्वगामी, अंतरवक्र, चिरथ, पंचरथ, सप्तरथ, उत्तुंग कळस आणि त्यावरील आमलक व कलात्मक शिखरे.

७. मंदिराच्या भिंती व कळसाला नक्षीदार कोणाडे व जाळीदार खिडक्या.

८. सपाट व अर्धगोलाकार छत.

९. छताला आधार देण्यासाठी कलात्मक खांब, त्यावर दगडी घोडे, लाकूड, लोखंड व दगडी तुळ्या.

---

३७ जोशी पी.जी., पूर्वोक्त, पृ.२७१

१०. भव्य व उंच प्रवेशद्वार, एकावर एक अनेक चौकटी त्यावर देवतांच्या प्रतिमा व शिल्पे द्वारावर गवाक्ष आणि मंडपात प्रवेश करणारी पडवी.

११. प्रवेशद्वार, मंडप, चौथरा व मंदिरात प्रवेश करण्यासाठी उंचच उंच लांबलचक पायऱ्या व काही मंदिराभोवती आवार (कुंपण).

र.पु. कुलकर्णी म्हणतात, "देश व काल यांना अनुसरुन अनेक आकारांचे तसेच विभागांचे असे (देवालयांचे) नेहमीच विशिष्ट भाग (अवयव) असतात."[३८] अशा अनेक भागांचा अभ्यास आपण वर केला आहे. "देवालयाचे भाग व उप विभाग केले नाही तर देवालय बांधने म्हणजे केवळ ढोर मेहनत होईल."[३९] म्हणून देवालयाच्या सुशोभनासाठी मंदिरांचे विभाग पाडले जावेत गुप्त काळात अशी अनेक मंदिरे बांधली.

गुप्तकाळापासून मोकळ्या हवेत आद्ययावत मंदिर निर्मितीला प्रारंभ झाला. गुप्तकाळातील मंदिरे सामान्य स्वरुपाची होती. अनेक मंदिरे विटांनी बांधण्यात आली. चौरस गाभारा, समोर छोटेसे दालन, चपटे छत व प्रसंगी दक्षिणमार्ग असेच आरंभीच्या मंदिरांचे स्वरुप होते. नंतर उंच चौथरे, भरपूर पायऱ्या, भव्य मंडप, मोठे प्रदक्षिणामार्ग व कलात्मक प्रवेशद्वाराची त्यात भर पडत गेली. सांची, तिगदा, एरन येथील मंदिरे प्राचीन आहेत. 'तिगवा' (जबलपूर) येथे दोन विष्णू मंदिरे असून एकाचे छत चपटे व दुसऱ्याचे उंच निमुळते आहे. प्रवेशद्वाराच्या चौकटीवर नक्षीकाम आहे स्तंभाच्या माथ्यावर बैठ्या सिंहाच्या आकृत्या छताच्या आधारासाठी आहेत. एरणचे विष्णू मंदिर व तिगदाटे मंदिर आणि साकोरचे शिवमंदिर सारखेच आहे. गुप्तकालीन दुसरे महत्वपूर्ण मंदिर नाचनाकुथा (म.प्र.) येथे आहे. हे पार्वती मंदिर आहे. मंदिराची रचना सारखी असून प्रदक्षिणामार्गाच्या भिंतीवर जाळीदार खिडक्या व वृक्षवेलीचे नक्षीकाम आहे छत सपाट आहे. उंच चौथरा असून मंदिर दोन मजली आहे. मंदिरात पशुपक्षांच्या आकृत्या आहेत. मध्यप्रदेशातील भूमरचे शिवमंदिर उल्लेखनीय आहे. उंच चौथरा,

---

३८. कुलकर्णी र.पु., शिल्पप्रकाश, पृ.७०

३९ तत्रैव, पृ.७१

पायऱ्या, चौरस गर्भगृह व कलात्मक प्रवेशद्वार ही मंदिराची वैशिष्ट्ये आहेत. पी.जी. जोशी म्हणतात, "उत्तर प्रदेशातील कानपूरजवळ भिंतरगाव येथे एक मंदिर आहे. त्याचे बांधकाम भाजलेल्या विटांनी केलेले आहे. मंदिराचा कळस ७०१ उंचीचा शुंडाकार असून तो अनेक मजली आहे. गर्भगृह त्रिरथ पध्दतीचे असून पाठीमागे एक खोली आहे. छत घुमटाकार व अर्धगोलाकार आहे. भींतीत नक्षीदार कोणाडे असून कळस व भिंतीवर भरपूर नक्षीकाम केलेले आहे. गणेश, वराह, काली, जलदेवता, बटु, देवदूत, नरनारायण, सीताहरण, प्राणी व पक्षांची असंख्य चित्रे आहेत. मात्र ही चित्रे म्हणजे कुंभारीकला आहे. कारण हे काम भाजलेल्या चिकन मातीचे आहे."[४०]

मध्यप्रदेशातील देवगडचे 'दशावतार मंदिर' गुप्तकाळातील सर्वश्रेष्ठ मंदिर स्थापत्य आहे. मंदिराचा चौथरा उंच असून चारही बाजूला पायऱ्या आहेत. मुख्य मंदिराच्या बाजूला चार छोटी मंदिरे आहेत. गर्भगृहत्रिरथ पध्दतीचे आहे. मंदिराच्या आतील भिंतीवर गजेंद्र मोक्ष, नरनारायण, शेषशायी विष्णु व दशावताराची चित्रे कोरलेली आहेत. रामकृष्ण चरित्रातील बारा प्रसंगापैकी अहिल्योध्दार, शूर्पनखेची विटंबना,द्रोणागिरी पर्वताचा प्रसंग, कृष्णाची बालक्रीडा व नंद यशोदेनी केलेले कृष्ण बलरामाचे संगोपन ह्या घटना नाट्यमय पध्दतीने रेखाटलेल्या आहेत. मंदिराच्या छतावर छोटे चैत्य व उंच शिखर असून मोकळ्या जागेत रामकृष्णाच्या चरित्रातील मूर्तीशिल्प आहे हे दशावतार मंदिर गुप्तकालीन मंदिर स्थापत्याचे सर्वोत्तम प्रतिक आहे. "ह्या प्रधान मंदिराशिवाय अपहोलखेले (कर्नाटक) दहपर बातिया (आसाम), बैग्राम (पाकिस्तान), गयेचे महाबोधी मंदिर (बिहार), तेरगाव (महाराष्ट्र) व चेछलीचे कपोतेश्वर मंदिर (आंध्रप्रदेश) गुप्तकाळात बांधली गेली."[४१]

गुप्तकालीन मंदिर निर्मितीचे कार्य उत्तरोत्तर प्रगतीपथावर होते. गुप्तोत्तर काळात (इ.स. ५५०-१०००) उत्तमोत्तम मंदिराची निर्मिती करण्यात आली. गुर्जरप्रतिहार, सोळंकी,

---

४०. जोशी पी.जी., पूर्वोक्त, पृ.२७

४१ तत्रैव, पृ.२७३

चंदेल व राजपूत राजांनी पुढाकार घेऊन शेकडो मंदिरे मध्यप्रदेश, गुजरात, उत्तरप्रदेश व राजस्थानात बांधली. गुप्तकालीन मंदिर स्थापत्याची वैशिष्ट्ये कमीजास्त फरकाने ह्या काळातही दिसून येतात. उंच चौथरे, भव्य मंडप, अनेक मजली कळस, सहोदर कळस, कलात्मक स्तंभ, भिंती व प्रवेशद्वारे ही गुप्तोत्तर मंदिरांची खास लक्षणे होत. दरवाजाच्या चौकटीवर त्रिकोणी पाने, साखळी व घंटा यांच्या प्रतिमा फक्त प्रतिहार शैलीतच दिसून येतात. "नरेसरा, अमरोल, बरेसरा, महुआ, इंदौर, बर्वासागर, बडोह, नाचना, मानखेडा, पाठारी, देवगड, ग्यारसपूर (मध्यप्रदेश) जगतत्सुख, जोगेश्वर, गोपेश्वर, लाखमंडल, बजौर, छत्राही व ब्रम्हौर (उत्तरप्रदेश) येथे ह्या कालखंडातील हिंदू मंदिरे आहेत."[४२]

कर्कोटक वंशीय ललितादित्याने काश्मीरमध्ये 'मार्तंड मंदिर' (सूर्यमंदिर) बांधले. प्रतिहार कालीन ग्वाल्हेरचे तेलीका मंदिर प्रसिध्द आहे. ते मिहिरभोजाने इ.स. ८५० च्या सुमारास बांधले गर्भगृह आयाताकार असून छतावर ८२ उंचीचे शिखर आहे. छत अर्धगोलाकार आहे. मंदिराच्या कोणाड्यात देवतांच्या मूर्ती आहेत. भिंती व कळसावर भरपूर कोरिवकाम आहे. कळसावर गवाक्ष व अर्धगोलाकार कमानी आहेत. प्रवेशद्वारावर जलदेवता, शैव द्वारपाल व नक्षीदार पानाच्या प्रतिमा आहेत. प्रवेशद्वारासमोर भरपूर पायऱ्या आहेत. हे मंदिर गुर्जर शैलीचे उत्तम प्रतिक आहे.

ह्या कालखंडात अनेक शिवमंदिरे व सूर्यमंदिरे राजस्थानात बांधण्यात आली. शीतलेश्वर मुचकाला, पाली आणि कालीकामातेचे चित्तोडचे सूर्यमंदिर, बडोलीचे घटेश्वर मंदिर जगतचे अंबिका मातेचे मंदिर (उदयपूर) एक लिंगजीचे लाकुलीश मंदिर व नागदाचे सासबहु मंदिर (विष्णू) प्रमुख आहेत. "जोधपूर जवळील 'असिअन मंदिर' उल्लेखणीय आहेत. हा अठरा मंदिराचा समूह असून इ.स. ७८३-१०१६ मध्ये बांधला गेला. पायाचे उंच ओटे, त्यावर नक्षीकाम, पंचरथ बांधणी, भिंतीच्या व शिखराच्या कोणाड्यात देवतांच्या मूर्ती, भिंतीवर वेलबुट्टी व पौराणिक कथांचे चित्रण, पंचरथ कळस, सभामंडप, प्रवेशद्वारावर चार-पाच चौकटी

---

४२. तत्रैव

आणि कळस, स्तंभ व भिंतीवरील भरपूर नक्षीकाम ही असिअन मंदिरांची वैशिष्ट्ये आहेत. गर्भगृहापेक्षा कळस उंच व भव्य असून अंतिम भाग गोलाकार आहे. हीच शैली पुढे ओरिसाच्या मंदिर स्थापत्यात विकसीत झाली."[४३]

गुजरातमध्ये राजस्थान व मध्य भारतीय शैलीच्या मिश्रणातून 'सोळंकी शैलीचा' उदय झाला. गोपकडवार, मांजा, कोटाई व नन येथे ह्या पध्दतीची मंदिरे आढळतात. 'मोंढेराचे सूर्यमंदिर' दहाव्या शतकाच्या शेवटी बांधण्यात आले. अबुची प्रसिध्द मंदिरे नंतरच्या काळात बांधलेली आहेत. मध्य भारतात चंदेल राजाने जगप्रसिध्द खजुराहोची मंदिरे बांधली. ह्या मंदिराची गंगा दुथडी भरुन वाहतच राहिली आणि उत्तर शैलीची मंदिर निर्मिती चौदाव्या शतकापर्यंत चालू होती. ओरिसातील मंदिरांनी (कोणार्कचे सूर्यमंदिर) परमोत्कर्ष साधला. तसेच भूवनेश्वर येथे तर नागर शैलीने इतिहासच रचला. जवळपास ५०० मंदिरे या ठिकाणी निर्माण केली. जगन्नाथ पुरी या ठिकाणीही नागरशैलीचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त मंदिरे आहेत. अशा प्रकारे उत्तर भारतातील अनेक मंदिरशैलींचा आपण धावता आढावा घेतला व त्यासोबतच नागरशैलीही अभ्यासली.

### ५.२.२ द्रविड मंदिर शैली आणि दक्षिण भारतीय मंदिरे

द्रविड शैली ही कृष्णा नदीपासून ते कन्याकुमारी पर्यंतच्या दक्षिण प्रदेशात प्रचलित आहे. द्रविड व नागर पध्दतीतील फरकाच्या बाबतीत डॉ. अनिल सिंगारे म्हणतात, "मुळ फरक हा की गर्भगृह व त्या मंदिराचे शिखर यांच्या दरम्यान जी पोकळी असे त्याला विमान म्हणतात या विमानात फरक असे द्रविड शैलीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे 'गोपूर' होय. नागर शैलीत गोपूर असे नाही आणि द्रविड शैलीत मात्र ते असे"[४४] मंदिराभोवती जे प्रांगण असे त्याला 'प्राकार' असे म्हणतात. आणि प्राकारासभोवती उंच तटबंदी बांधण्यात येते. त्या तटबंदीला चार दिशेला चार प्रवेशद्वार ठेवलेली असतात. त्यांना गोपूर असे म्हणतात. गोपूरे हे

---

४३ तत्रैव

४४ सिंगारे अनिल, पूर्वोक्त,पृ.१९६-१९८

कधी शिखरापेक्षाही उंच असत वेरुळच्या कैलास मंदिरात एकच गोपूर आहे तर चैन्नई येथे असलेल्या मिनाक्षी मंदिरात नऊ गोपूरे आहेत असे काही ढोबळ फरक दाखविता येतात.

सुत्रधार मंडनाच्या मतानुसार, "यात एक ते बारा मजली व काही वेळेला सोळा मजल्यापर्यंत मजले असतात. सर्वात वरती घंटा असते ती चौरस अष्ठकोणी अथवा वर्तुळाकार असते. तिच्या खाली वेदीचा थरविभाग असतो."[४५] तसेच नागर प्रासादाप्रमाणे तळमजल्याच्या भिंतीचे थर भागात विभाग केलेले नसतात. अशा प्रकारे आपणाला साधारणपणे द्रविड मंदिर शैली कशी असते याचा अभ्यास करता येतो.

दक्षिणेत कर्नाटक आंध्र व तामीळनाडूत प्राचीन काळी सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, पल्लव व चोल घराण्याची राज्य निर्माण झाली. त्यांच्या काळात वैशिष्ट्यपूर्ण मंदिरशैलीचा विकास झाला. तिलाच दक्षिणात्य द्रवीड शैली, असे म्हणतात. हे मंदिर स्थापत्य उत्तरेपेक्षा बरेच भिन्न आहे. सर्व मंदिरे पाषाणाची जास्त भव्य व कलात्मक आहेत. आरंभी बौध्द धर्मीयांनी लेण्यांची निर्मिती केली. दक्षिणेतील कलाकारांनी प्रगतीचा पुढचा टप्पा गाठला आणि चालुक्य राष्ट्रकुटांच्या काळात अजस्त्र डोंगर खोदून मोठमोठी शैल मंदिरे निर्माण केली. एहोळ आणि महाबलिपुरमची मंदिरे अशाच प्रकारची आहेत. पी.जी. जोशी म्हणतात, "दक्षिणेत ह्याशिवाय जमीनीच्या पृष्ठभागावर द्रविडी शैलीची मंदिरे बांधण्यात आली त्यास पल्लव, चोल व पांड्य रांजांनी फार मोठे प्रोत्साहन दिले."[४६]

दक्षिण भारतीय मंदिर शैलीची विशेष लक्षणे पुढील प्रमाणे आहेत.

१. रुंद व उंच आकार आणि त्यात एक ते चार अत्युच्य प्रवेशाद्वारे त्यास 'गोपूरे' म्हणत.

२. अवारानंतर व मंदिराच्या भोवती पटांगणवजा प्रदक्षिणा मार्ग तसेच गर्भगृहाभोवतीचा प्रदक्षिणा मार्ग.

---

४५ सूत्रधार मंडन, पूर्वोक्त, पृ.१८

४६ जोशी पी.जी., पूर्वोक्त, पृ.२७४

३. प्रवेशद्वार व प्रदक्षिणामार्गानंतर एक किंवा अनेक सभामंडप आधारासाठी कलात्मक स्तंभ नंदी मंडप भोवताली ओवऱ्या.

४. मंडपाच्या शेजारी पितळेनी (प्रसंगी सोन्याचा) मढविलेला उंच ध्वजस्तंभ.

५. मंडपानंतर मुख्य गर्भगृह व आत देवतेची कलात्मक मूर्ती गर्भगृह एक किंवा दोन (मदुराई) असून ती अंधारी असत हवेसाठी जाळीदार खिडक्या ठेवीत.

६. गर्भगृहे व मंदिराची प्रवेशद्वारे (गोपूरम) उंच व भव्य कलात्मक असत.

७. गर्भगृहावर अनेक मजली व निमुळते होत जाणारे लंब चौकोनी शिखरे असतात. त्यांना विमान म्हणतात. त्यावर अनेक कोणाडे व असंख्य प्रतिमा असतात. एकंबेश्वर, कुम्बकोनम व मदुराईची विमान व गोपूरे उत्तुंग उंचीची आहेत.

"सभामंडप व बाजूच्या ओवऱ्यात अनेक देवतांच्या मूर्ती असतात. गणेशाच्या भव्य मूर्ती व अजस्त्र नंदी ठिकठिकाणी आढळतात. सभामंडपाचे स्तंभ अत्यंत कोरीव असून त्यावर विपूल प्रतिमा असतात. घोड्याचे शरीर व असुराचे तोंड असलेले रुंद व भव्य स्तंभ सर्वत्र आढळतात. जवळपास सर्व मंदिरात चौकोनी व चारही बाजूंनी पायऱ्या असलेल्या 'पुष्करणी' (स्नानकुंड) आहेत."[४७] अशा प्रकारे कितीतरी मंदिरे ही दक्षिण भारतात दक्षिणात्य द्रविड शैली म्हणून ओळखली जातात. दक्षिण भारतामध्ये अर्थातच कर्नाटकात चालुक्यांच्या काळात एहौळ, बदामी आणि पट्टदक्कल या ठिकाणी काही मंदिरे निर्माण केली. पण ही मंदिरे द्रविड नसून ती मंदिरे मिश्रीत म्हणजे वेसर प्रकाराची आहेत असे मानले जाते. चालुक्यांप्रमाणेच पल्लव राजांनी मंदिर स्थापत्यात विलक्षण प्रगती केलेली होती. द्रविड शैलीचे निर्माते पल्लव कलाकारच होते. पल्लवांचे राज्य तामीळनाडूत होते. जगप्रसिध्द मामळपुरमची (महाबली पुरम) आणि कांची पुरमची मंदिरे त्यांनीच बांधली. "मद्रासपासून ५८ कि.मी. अंतरावर 'मामळपुरमची मंदिरे' आहेत त्यांची संख्या दहा असून ती पल्लव राजा पहिल्या नरसिंहवर्मनने (इ.स. ६३०-६६८)

---

४७ तत्रैव

बांधली ही एकसंघ दगडात व समुद्रकिणारी खोदलेली गुहामंदिरे आहेत."[४८] येथे त्रिमुर्ती, वराह, दुर्गा, गणेश, पिंडारी व पाच पांडवांची मंदिरे आहेत. त्यांना धर्मराज, भीम, अर्जून, सहदेव व द्रोपदी रथ अशी नावे आहेत.

'कांचिपुरम' ही पल्लवांची राजधानी होती येथे राजसिंह नरसिंहवर्मन दुसरा व नंदी वर्मन दुसऱ्याने (इ.स. ६९५-८००) कैलासनाथ, मुक्तेश्वर (मेत्तुंगेश्वर) व वैकुंठ पेरुमल ही मंदिरे बांधली. कांचीपुरम येथे नंतरच्या काळात अनेक मंदिरे बांधण्यात आली. व हे राजधानीचे ठिकाण 'मंदिर नगरी' बनली. कैलासनाथ मंदिर जास्त भव्य असून चपटे छत शंखाकार मिनार, कलात्म भिंती, अनेक स्तंभांचा मंडप ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. गर्भगृहावर अनेक मजली पिरॅमिडच्या आकाराचे विमान (शिखर) आहे. भोवती उंच आवार आहे मंदिराचे मुख पूर्वेकडे आहे. दुसरे वैकुंठ पेरुमल हे विष्णू मंदिर जास्त प्रगत वाटते. मंडप, गाभारा, प्रदक्षिणामार्ग, विमान, स्तूपिका व कलात्मक भव्य स्तंभ ही मंदिराची वैशिष्ट्ये होत.

"दक्षिण पूर्व किणाऱ्यावर चोलवंशाचे राज्य होते. चोलराजांनी गंगाईकोंडा चोलपुरम व तंजावर ह्या राजधानींच्या ठिकाणी भव्य मंदिरे बांधली. तंजावरचे 'बृहदिश्वराचे मंदिर' सर्वोत्कृष्ट व सर्वांग परिपूर्ण द्रविड स्थापत्याचा नमुना आहे."[४९] राजराजा चोलाने दहाव्या शकताच्या शेवटी (इ.स. ९८५-१०१४) हे मंदिर बांधले. सौंदर्य, भव्यता व स्थापत्यकलेच्या दृष्टीने हे मंदिर सर्वश्रेष्ठ ठरते. ही शिवमंदिरे असून त्यास राजराजेश्वर मंदिर असेही म्हणतात. ह्या मंदिराचे क्षेत्रफळ १२५००० चौ.फुट (५०० x २५० सुमारे तीन एकर) आहे. प्रमुख मंदिर १८० चौरसाचे आहे. गर्भगृहावरील कळसाची (विमान) उंची २१६ असून त्यास चौदा मजले आहेत. कळसाच्या शिरोभागावर एकसंघ दगडाचा गोल घुमट आहे. तो २५ व्यासाचा व ८१ टन वजनाचा आहे. भव्य गोपुराचे प्रवेशद्वार असून मंदिराच्या भोवताली मोठा खंदक आहे. प्रवेशद्वाराच्या समोर एक नंदीमंडप आहे. तेथील नंदी १९ लांब ८ रुंद व २० टन वजनाचा आहे.

---

४८ तत्रैव, पृ.२७६
४९ तत्रैव, पृ.२७७

मंदिराच्या भोवताली पटांगण व प्रदक्षिणा मार्ग आहे. पटांगणाच्या मागे व आवाराला लागून मंदिराच्या तिन्ही बाजूंनी १०८ शिवलिंगाची छोटेखानी मंदिरे आहेत. तसेच गंगाईकोंडचोलपुरम मिनाक्षी पुरम, एकंबेश्वर, कुंभकोणम व श्री रंगमची भव्य मंदिरे नंतरच्या काळात बांधण्यात आली. ती द्रविड शैलीची उन्नतावस्था दर्शवितात.

## ५.२.३ वेसर मंदिर शैली (मिश्रीत शैली)

डॉ. अनिल सिंगारे म्हणतात, "द्रविड व नागर शैलीच्या मिश्रणातून ही शैली उदयास आलेली आहे. यामुळे हिला 'मिश्रीत शैली' म्हणतात."[५०] या शैलीचे सर्वात उठून दिसणारे वेगळेपण म्हणजे मुख्य सभामंडपाला लागून अनेक गर्भगृहे असतात. अशा प्रकारचे मंदिर सोमनाथपूर येथे आहे. बाकी सर्व थोड्याफार फरकाने कधी नागर कधी द्रविड पध्दतीचा वापर करुन ही मंदिरे उभारली जातात. कोणत्याही मंदिराची रचना करीत असतांना गर्भगृह त्याच्या समोर अंतराळ, सभामंडप आणि मुख्य मंडप भागांना विशेष महत्व असे.

सुत्रधार मंडनाच्या मतानुसार, "निरनिराळ्या प्रासादाच्या अवयवांचे मिश्रण यात केलेले असते म्हणून यास मिश्रप्रासाद म्हणतात."[५१] दक्षिण आणि उत्तर भारतातील सर्वच शिल्प संहिता मंदिर स्थापत्याच्या प्रादेशिक प्रकाराचे वर्णन करतात. हे मंदिर प्रकार गर्भगृहावर असलेल्या शिखराची धाटणी, जडणघडण आणि त्याचे दृश्य स्वरुप यावरुन ठरत असत. नागर आणि द्रविड हे मंदिर प्रकार सुप्रसिध्दच आहेत. पण या प्रकारांबरोबरच शिल्पसंहितांमध्ये भूमिज, वेसर, कलिंग व वराह याही मंदिर प्रकारांचा उल्लेख येतो. प्रो. स्टेला क्रॅमरिश यांनी केलेल्या महत्वपूर्ण आणि गौरवास्पद संशोधनामुळेच भूमिज मंदिरे नागर आणि द्रविड मंदिरापासून वेगळी ओळखता येऊ लागली. परंतु वेसर मंदिरांची म्हणजेच पर्यायाने वेसर शिखराची व्यवच्छेदक वैशिष्ट्ये काय असावीत यावर मात्र प्रदीर्घ वादंग झाले.

---

५० सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९६-१९८
५१ सुत्रधार मंडन, पूर्वोक्त, पृ.१८

अ.प्र. जामखेडकर म्हणतात, "बदामीच्या चालुक्यांच्या राजाश्रयाखालील ऐहोळे, बदामी आणि पट्टदक्कल येथील मंदिरांमध्ये वेसर प्रकारची वैशिष्ट्ये आहेत. असा सर्वसाधारण समज होता पण काही विद्वानांना हे मान्य नव्हते."[५२] कारण वेसर हा शब्द संस्कृत असून याचा अर्थ खेचर असा आहे. या नावावरुन हा संकरीत स्थापत्यप्रकार असावा असे दिसून येते. बहुदा हा प्रकार नागर आणि द्रविड या दोन वास्तुस्थापत्याचे मिश्रण असावे असाही विद्वनांचा होरा होता. दक्षिण भारतातील स्थपतींनी परंपरेने वर्णिलेली नागर आणि द्रविड वास्तुस्थापत्याचे तलविण्यासाची गृहीतके आणि वेसर प्रकाराबाबत असलेली समजुतीतील संदिग्धता यामुळे वेसर वास्तुस्थापत्याची व्यवच्छेदक लक्षणे कोणती याबाबत बरेच उलटसुलट मतप्रवाह होते. एम.ए. ढाकी म्हणतात, "१२ व्या शतकातील कानडी शिलालेखांचा अभ्यास करुन त्यातील काही शिलालेखांमध्ये काही स्थपतींनी त्यांना नागर, कलिंग, द्रविड आणि वेसर किंवा अन्य लेखात नागर, भूमिज आणि द्रविड स्थापत्यांचे साद्यत ज्ञान आणि अनुभव असल्याचा दावा केल्याचे निदर्शनास आणून कल्याणीचे चालुक्य आणि द्वार समुद्राचे होयसळ यांच्या राजाश्रयाखाली विकसीत झालेल्या नंतरच्या काळातील कर्नाटक शैलीतील मंदिरे वेसर मंदिरे म्हणून ओळखता येतील हे दाखवून दिले. नागर आणि द्रविड शैलीतील वास्तुघटकांच्या संयोगातून इ.स.च्या पहिल्या सहस्त्रकाच्या अखेरीस वेसर शैली उदयाला आली असे दिसते."[५३]

ढाकी यांनी केलेल्या संशोधनातूनही नागर आणि द्रविड शैलीच्या संयोगातूनच वेसर शैलीचा उगम दाखविला आहे. "सध्या आपण त्याला महाराष्ट्र म्हणून ओळखतो त्या प्रदेशावर वर्चस्व असणाऱ्या चालुक्य राजांच्या आश्रयाखाली किंवा त्यांचे मांडलिकअसलेल्या शिलाहार आणि यादव राजांच्या प्रदेशातही या शैलीचा प्रभाव पडून अनेक वेसर मंदिरे उभारण्यात आली असण्याची शक्यता असली तरीही आजमितीस फारच थोडी वेसर मंदिरे महाराष्ट्रात शिल्लक आहेत."[५४]

---

५२ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१३०
५३ ढाकी एम.ए., इंडियन टेंपल्स फॉर्मस इन कर्नाटक इस्क्रिप्शन्स अँड ऑर्किटेक्चर, ९१-९४
५४ तत्रैव

सिन्नर येथील आयेश्वर मंदिर हे वेसर शैलीयुक्त मंदिर आहे. या ठिकाणी यादवांची राजधानी होती. या ठिकाणी अ.प्र. जामखेडकर म्हणतात, "गोंदेश्वर आणि आयेश्वर ही दोनच मंदिरे उल्लेखणीय आहेत. बहुधा ही दोन्ही मंदिरे राजाश्रयातूनच निर्मिली गेली असावीत. यातील गोंदेश्वर मंदिर भूमिज प्रकारचे तर आयेश्वर मंदिर वेसर प्रकारचे आहे."[५५] आयेश्वर मंदिराचा मुखमंडप, मंडप, अंतराळ आणि गर्भगृह असा या मंदिराचा तलविण्यास आहे.

सिन्नर येथील मंदिराप्रमाणेच पाटणे येथील देवी मंदिरालाही काही संशोधक वेसर प्रकारचे आहे असे मानतात. तसेच अकोला जिल्हयातील किन्ही हे ठिकाणही ऐतिहासिक असून येथे तीन मंदिरे आहेत. त्यापैकी एक मंदिर वेसर शैलीचे आहे असे मानले जाते. अशा प्रकारे दक्षिण भारतातील मंदिराप्रमाणेच महाराष्ट्रातही वेसर शैलींनी युक्त अशी मंदिर रचना असलेली आपणाला अभ्यासाअंती दिसून येते.

### ४.२.४ हेमाडपंती मंदीर शैली

वास्तविक पाहता शुष्कसांधी मंदिरे भारतात सर्वत्र आढळतात. इतर प्रांतातील अशा प्रकारच्या मंदिराप्रमाणेच महाराष्ट्रातही ह्या मंदिरांची कोणत्यातरी आख्यायिकेशी सांगड घातल्याचे दिसते अशी सांगड घातलेली व्यक्ती एकतर स्थपती तरी असते किंवा मंदिर बांधकामाचा आर्थिक भार उचलणारी आश्रयदात्री तरी असते. कर्नाटकात अशा प्रकारच्या मंदिरांची सांगड जक्कणाचार्याशी घातली जाते. महाराष्ट्रात अशा मंदिरांना हेमाडपंथी संबोधण्यात येते. तर बहुतांशी भारतात पसरलेल्या स्थापत्य परंपरेची सांगड कोक्कसाशी घातली जाते. हेमाडपंती हे विशेषण बऱ्याचदा या मंदिराचे मध्ययुगीन मंदिरापासूनचे वेगळेपण स्पष्ट करते.

जामखेडकर म्हणतात, "बहुतेकदा सज्जापर्यंत दगडी आणि सज्जाच्या वर विटांचे बांधकाम असलेल्या मराठाकालीन मंदिरापांसून या मंदिराचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी त्यांना

---

५५ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१३०-१३१

हेमाडपंती संबोधण्यात येते."[५६] या मंदिरांच्या गर्भगृहावरील केवळ शिखरच मराठा मंदिरांपेक्षा वेगळे असते असे नाही तर मराठाकालीन मंदिरावर नंतर चुन्याचे नक्षीकाम होत असल्यामुळे त्यांच्या दिसण्यातही वेगळेपण असते म्हणूनच सर्व सामान्य माणूस जेव्हा एखाद्या मंदिराला हेमाडपंती म्हणत तेव्हा त्याच्या मनात मंदिर ज्या कच्च्या मालापासून बनविले आहे ते बांधकाम साहित्य, मंदिराची प्राचीनता यासह मध्ययुगीन मंदिरापासून वेगळेपण दाखविणारी अनेकविध वैशिष्ट्ये असतात.

डॉ. कठारे/नगराळे लिहतात, "हेमाद्री पंडीत शिव मंदिराच्या विशिष्ट प्रकारच्या मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. त्याला हेमाडपंती मंदिरे असे म्हणतात. चुन्याच्या किंवा इतर कसल्याही वस्तुच्याशिवाय केवळ एका ठराविक पध्दतीने हेमाडपंती स्थापत्य प्रकाराची असंख्य मंदिरे आजही मराठवाड्यात पहायला मिळतात. याचे वैशिष्ट्ये म्हणजे दगडावर दगड ठेवून किंवा दगडांना खाचा ठेवून हे बांधकाम केले जाते. मंदिराच्या शिखराची घडण हे याचे मुळ वैशिष्ट्ये आहे."[५७] हेमाडपंत किंवा हेमाद्री महाराष्ट्रात चांगलाच प्रख्यात होता. त्याच्याशी निगडीत असलेल्या अनेक दंतकथा आहेत. तो तेराव्या शतकात यादवांचा मुख्य प्रधान होता त्याची कारकीर्द चांगलीच प्रदीर्घ होती. तीन यादवराजांची सेवा करण्याचे भाग्य त्याला लाभले. तो प्रकांडपंडित असून त्याने "चतुर्वर्गचिंतामणी" नामक ग्रंथाची निर्मिती केली.

हेन्री कझिन्सने त्याच्या "मिडीवल टेंपल्स ऑफ दि डेक्कन" या ग्रंथात मध्ययुगातील ठराविक काळातील मंदिराचा (१३ व्या व १४ व्या शतकातील मंदिरांना) हेमाडपंती संबोधले आहे. आणि ११ ते १४ व्या शतकातील सर्वसाधारण मंदिराचा उल्लेख त्याने नागर, स्थानिक नागर किंवा (तथाकथित) इंडो आर्यन आणि उत्तरभारतीय मंदिरे असे केला आहे. थोडक्यात कझिन्सला असे दाखवून द्यायचे होते की, महाराष्ट्रात आढळणारी ही मध्ययुगीन मंदिरे उत्तर कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ आणि तामीळनाडूमध्ये आढळणाऱ्या

---

५६ तत्रैव, पृ.११४

५७ कठारे नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, पृ.३८४

मंदिरापेक्षा वेगळी आहेत. महाराष्ट्राने ११ व्या शतकापासून आचानकपणे अंगिकारलेला शुष्कसांधी प्रस्तरमंदिराचा हा स्थापत्य प्रकार गुजरात, माळवा, मध्यभारत, उत्तर प्रदेश आणि ओरिसा येथे आढळणाऱ्या मंदिरांशी म्हणजेच उत्तर भारतातील स्थानिक मंदिर स्थापत्याशी, नागर शैलीशी, अधिक मिळताजुळता आहे. हा मुद्दाही त्याने आग्रहाने मांडला.

पुणे, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील त्याच प्रमाणे खानदेश, विदर्भ आणि मराठवाडा भागातील निझामाच्या संस्थांनातील व दक्षिण महाराष्ट्रातील त्यावेळच्या संस्थानातील मध्ययुगीन मंदिर स्थापत्याचा हेन्री कझिन्स हा पहिला अभ्यासक, त्यानंतर डॉ. ए.व्ही. नाईक यांनी १९३० ते १९४० च्या काळात दख्खनमधील अगदी चौथ्या शतकापासून ते १४ व्या शतकापर्यंतच्या सर्व स्थापत्य प्रकारांचा आणि या कालखंडातील स्थापत्य प्रकारांचा विस्तृत आढावा घेतला. ए.व्ही. नाईक यांनी महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्य आणि शिल्प यांचा स्वतंत्र अभ्यास केला. त्याविषयी डॉ. गो.ब. देगलूरकर त्याचप्रमाणे मराठवाड्यातील मंदिर स्थापत्यांचे अभ्यासक डॉ. प्रभाकर देव यांनीही मंदिराचे वर्णन आणि वर्गीकरण करताना "दख्खन प्रकारची नागर शैली" असा संज्ञाप्रकार वापरला. महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्यशैलीला अशा रितीने "दख्खन प्रकारची नागर शैली" असे संबोधले आहे.

आनंद कुमारस्वामी , आर.के. आचार्य आणि स्टेला क्रॅमरिश यांनी केलेल्या पायाभूत संशोधनामुळे आणि नंतरच्या काळातील डॉ. कृष्णदेव आणि मधुसुदन ढाकी यांनी केलेल्या अभ्यासामुळे भारतीय स्थापत्यशास्त्राबाबत एक नवीन दृष्टीकोन तयार झाला आहे. त्यामुळे स्थापत्य, शिल्प आणि मूर्तीचे संदर्भग्रंथ, किंवा तत्कालीन स्थापतीकरिता असलेले संदर्भग्रंथ असे स्वरुप असलेल्या शिल्पसंहितेच्या दृष्टिकोनातून प्राचीन भारतीय वास्तुशास्त्र समजून घेण्याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले.

अशा प्रकारे आपण मंदिरशैलीचे भारतातील विविध प्रकार पाहिले अनेक प्रकारांपैकी काही महत्वाच्या मंदिर शैलीचा आपण या ठिकाणी अभ्यास केला आहे. मग धर्मापुरी आणि पानगाव येथील मंदिरे कोणत्या प्रकारात मोडतात याचा अभ्यास करुया.

## ५.३ धर्मापुरी व पानगाव येथील मंदिरांचे वेगळेपण (भूमिज मंदिरशैली)

जामखेडकर म्हणतात, "हेन्री कझिन्सने त्याच्या मिडीव्हल टेंपल्स ऑफ द डेक्कन या ग्रंथात महाराष्ट्रातील मंदिराबाबतची काही निरीक्षणे नमुद केले आहेत. त्यापैकी महाराष्ट्रातील बहुसंख्य मंदिरावरील शिखरे पडून गेली आहेत. हे एक सगळ्यात धक्कादायक निरीक्षण आहे."[५८] त्याच्या कारणमिमांसेचा शोध घेताना स्थानिक प्रस्तर लेणी खोदण्याकरता उपयुक्त आहे पण मोठ्या व मध्यम आकाराच्या तुळ्या आणि स्तंभ बनवण्याकरिता तो निरुपयोगी आहे. या वस्तुस्थितीकडे त्याने लक्ष वेधले आहे.

कदाचित याच कारणामुळे मंदिर बांधून पूर्ण झाल्यानंतर अगदी अल्पावधीतच मंडपाच्या तुळ्यांना आधार द्यावा लागलेला दिसून येतो. स्थानिक प्रस्तराच्या वजन धारण करण्याच्या अक्षमतेमुळे काही स्थपतींनी गर्भगृहावर विटांची शिखरे बांधली भूमिज प्रकारचे शिखर असलेल्या मंदिरांमध्ये अशी विटांची शिखरे असलेली बरीच मंदिरे आढळतात. या अशा प्रकारच्या शिखरांची रचना पाहता ही मंदिरांची मुळ शिखरेच होती. दगडी शिखर पडल्यानंतर किंवा दगडी शिखर दूर करुन त्याजागी नंतर बांधलेले विटांचे शिखर असे त्यांचे स्वरुप नाही हे अगदी स्पष्टपणे लक्षात येते. विटांनी हे शिखर बांधताना त्यात कोणकोणते बदल घडून आले हे पाहणे महत्वाचे असल्यामुळे भूमिज मंदिरांचे विवेचन अ) प्रस्तर शिखर असलेली भूमिज मंदिरे आणि ब) विटांची शिखरे असलेली भूमिज मंदिरे असा दोन भागात केले जाते.

महाराष्ट्र गॅझेटिअर मध्य असे वर्णन केलेले आहे की प्रस्तर शिखर असलेली भूमिज मंदिरे महाराष्ट्रात अंबरनाथ येथील शिवमंदिर, बलसाने येथील मंदिरे, झोडगे येथील शिवमंदिर, सिन्नर येथील गोंदेश्वर मंदिर, खिद्रापूर येथील कोप्पेश्वर मंदिर, अंजनेरी येथील विष्णू मंदिर, सातगाव येथील विष्णू मंदिर, साकेगाव येथील साकेश्वर मंदिर, रतनवाडी येथील अमृतेश्वर मंदिर विटाची शिखरे असलेली भूमिज मंदिरे महाराष्ट्रात टाकाहारी येथील भवानी मंदिर, फलटन येथील जबरेश्वर मंदिर, जागजी येथील सोमलिंग मंदिर, शिंगणापूर येथील

---

५८ जामखेडकर अ.प्र., पुर्वोक्त, पृ.१३२

अमृतेश्वर मंदिर, धारासूर येथील विष्णू मंदिर तसेच राहेर येथील नरसिंह मंदिर आदी मंदिराचा यामध्ये समावेश होतो. तसेच धर्मापुरी आणि पानगाव येथील मंदिरांचाही यात समावेश होतो याचाही अभ्यास होणे गरजेचे आहे.

## ५.३.१ तुकाई देवीचे मंदिर (धर्मापुरी)

आज ब्राम्हण गल्लीमध्ये असलेले तुकाई देवीचे मंदिर हे चालुक्य राजा जगदेकमल्ल द्वितीय याचा एक प्रशासक देमरस याने निर्मिलेले वेदाध्यायन केंद्र असावे असे वाटते. या मंदिराची रचना एक छोटे गर्भगृह व त्यापुढे प्रशस्त सभागृह व मुखमंडप (पोर्च) अशी आहे. प्रमुख देवतेचा गाभारा महान आहे. यात एका चौथऱ्यावर (२.१५ x ०.५० m) आज तुकाईदेवी म्हणून संबोधल्या जाणारी महिषासुरमर्दिनीची मूर्ती बसविली आहे. मूर्तीपुजेचे पाणी जाण्यासाठी या अधिष्ठानास असलेले प्रणाल (पन्हाळी) कलात्मक आहे. गर्भगृहापुढे मोठा चौकोनी सभामंडप (८.३५x१०.४०m) आहे यात एकूण आठ आडवे व सहा उभे असे अठ्ठेचाळीस स्तंभ आहेत. पैकी गर्भगृहासमोरील दोन ओळी ह्या केवळ ०.३२ मीटरच्या अंतराने उभारल्या आहेत. या मुख्य सभागृहासमोरील मुखमंडप (२.२० x १०.१०M) आहे. व्हराड्यांच्या डाव्या बाजूला लहान (१.९०x १.८०M) गृहे आहेत. समोरचा व्हरांडा ८ पूर्ण व ८ अर्ध अशा एकूण १६ स्तंभावर उभा आहे.

मंदिराच्या प्रवेशद्वाराची द्वारशाखा ही वैष्णवी पध्दतीची असून ती तीन शाखांनी युक्त आहे. खाली गंगा, यमुना व शंख, चक्र, गदा, पदम धारण केलेले द्वारपाल आहेत. द्वाराच्या ललाटावर गणेश अंकित आहे तर द्वारशाखेवरील अंतरंग शीळा कलात्मक असून त्यावर भौमितिक नक्षी काढली आहे. मंदिरातील स्तंभ साधारण दोन प्रकारचे असून स्तंभशिर्ष हे नागबंध युक्त व साधे आहेत. स्तंभरचना करताना स्तंभपाद, स्तंभमध्य त्यावर स्तंभशिर्ष व वितानाशी सलान असलेले हस्त असे आहे. तसेच या वास्तुपुढे १ बाय १ मी आकाराचे विटात

बांधलेले यज्ञकुंड आहे. ज्ञानेश्वर पांचाळ या वास्तुविषयी म्हणतात, "एकूण या वास्तुरचनेचा विचार करता ही वास्तु म्हणजे वेदाध्ययन केंद्र किंवा बहुउद्देशीय सभागृह असू शकते."[५९]

वरील मताचा विचार केल्यास काही अंशी असे वाटणे सहाजिक आहे. परंतु या वास्तुच्या प्रवेशद्वारावरील शिल्पकला ही केदरेश्वर मंदिराप्रमाणेच आहे. तसेच आतमध्ये जे प्रणाल आहे ह्या प्रणालाची निर्मितीही देवतामूर्तीच्या स्नानाचे पाणी बाहेर जाण्यासाठी केले आहे. मग आतमध्ये देवतामूर्ती होती हे ही नाकारता येत नाही. आणि तिसरे म्हणजे या वास्तुला गर्भगृह सभामंडप आणि मुखमंडप अशी रचना आहे. मग वेगळे गर्भगृह व देवतापीठ निर्माणच केले नसते. यावरुन प्रा. पांचाळ यांचे मत आपणाला निराधार वाटते. या निकषावरुन ही वास्तु एक वैष्णव वास्तु असावी आणि हे मंदिर असावे पूर्वीच्या काळात धार्मिक शिक्षण हे मुलांना मंदिरात देत असत. कदाचित त्यामुळेच याची रचना ही अशी असावी.

हे तुकाई देवीचे मंदिर भूमिज मंदिर शैलीत मोडणारे दिसून येते. या मंदिरावरही शिखराचे बांधकाम हे केलेले दिसून येत नाही. मुखमंडपाला आधारस्तंभ उभारलेले निदर्शनास येतात. हे स्तंभ काही सोडले तर बहुतांशी कला विरहीत दिसून येतात. मुखमंडपातील स्तंभ उंच असून ते कलाविरहीत आहेत. त्यांच्यावर तिरप्या आकाराच्या आडव्या शिला पट्ट टाकल्या आहेत. व वर विटांचा टोप आहे. मंदिराच्या या टोपावर मोठ्या प्रमाणात गवताची वाढ झालेली दिसून येते. मंदिराचा आकार मोठा असल्याने ते मंदिर आहे की नाही यात अभ्यासक संकोच करतात पण हे भूमीज मंदिर आहे.

### ५.३.२ मल्लिकार्जून मंदिर (धर्मापुरी)

आज मल्लिकार्जून नावाने ओळखले जाणारे शिवमंदिर गावाच्या बाहेर असून पुर्वाभिमुख आहे. यालाच मरळसिध्द असेही म्हणतात. मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ, सभामंडप आणि उघडा नंदिमंडप अशी आहे. गर्भगृह चौकोनी आहे. आत चार कोपऱ्यात चार स्तंभ आहेत. तसेच मुख्य शिवलिंगही त्यात आहे. तसेच एक साततोंड असलेले एक नागबंध

५९ पांचाळ ज्ञानेश्वर, (संपा.), २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, पृ.४७

मध्ये ठेवलेले आहे. व बाजूलाच एक शिवमूर्ती तांब्याच्या धातूपासून बनवलेली आहे. पुढच्या मंडप अंतराळ आणि सभामंडप हा सभामंडप मुळात गुढमंडप पध्दतीचा आहे. याला तीन प्रवेश द्वार असावेत. सभागृहास पण मुखमंडप आहे. आज पूर्वेकडील एकच मुख्य प्रवेशद्वार उघडे आहे. अन्य दोन उत्तर-दक्षिण बाजूचे प्रवेशद्वार बंद करण्यात आली आहेत. सभामंडपात रंगशिला आहेत.

मंदिराच्या बाह्य अंगावर म्हणजे मंडोवरावरचा जो भाग आहे. त्यावर शिव, विष्णू, गणेश, भैरव, शिवपार्वती यांच्या उत्कीर्ण मूर्ती कोरल्या आहेत. सभामंडपात उजव्या बाजूला मरळसिध्दांची समाधी आहे. या सभामंडपात एकूण २२ स्तंभ आहेत. अंतराळ गृहातील स्तंभावर व भिंतीवर वेगवेगळ्या आकृत्या, शिल्प व चित्र कोरलेली आहेत. येथील स्तभांची रुंदी तुकाई देवीच्या व केदारेश्वराच्या स्तंभापेक्षा दुप्पटीने जास्त आहे. पण उंची मात्र कमी आहे. मंदिराच्या डाव्या बाजूला एकमोठा बारव आहे. त्याला तीर्थ असे म्हटले जाते ३० x ३५ असे आहे. तेथे बारमाही पाणी असते. या मंदिराचे शिखर हे विटांनी बांधलेले आहे. व ते अलिकडे बांधलेले आहे. मंदिराला रंगरंगोटी केल्याने त्याचा अभ्यास करणे क्लिष्ट आहे. परंतु हे मंदिर बांधकाम शैलीच्या भूमिज मंदिर शैलीत मोडणारे आहे. हे नाकारता येत नाही. श्रावण महिन्यात या ठिकाणी भाविकांची अलोट गर्दी होत असते. विशेष म्हणजे येथील यात्रा महोत्सव कार्तिकी अमावस्येला भरत असतो. या मंदिर स्थापत्याचा काळ बारावे शतक येईल.

### ५.३.३ केदारेश्वर मंदिर (धर्मापुरी)

धर्मापुरी गावी असलेल्या या मंदिराचे उल्लेखणीय वैशिष्ट्ये म्हणजे त्याच्या बाह्यांगावर असलेल्या सुंदर शिल्पाकृती धर्मापुरी गावात सुट्या मूर्ती मोठ्या प्रमाणात आढळतात. यु.म.पठाण म्हणतात, "विदेशात एक तर अशा प्रकारची फारशी शिल्प आढळत नाहीत. काही भग्नावशेष सापडलेच तर ते किंवा त्यांच्या प्रतिकृती वस्तुसंग्रहालयात त्यांच्या विषयीच्या ऐतिहासिक माहितीविषयीच्या टिपणांसह काळजीपूर्वक जपून ठेवले जातात. ज्या ज्यावेळी मी विदेशात गेलो, त्या त्यावेळी अशा प्रतिकृती (रेप्लिकाज) पाहताना मला

धर्मापुरीच्या या मंदिराच्या भोवतालच्या शेतांवरचे बांध आठवले. व त्यावरील हद्दी दाखविण्यासाठी वापरलेली ती संशोधकांची 'वाटुली पाहत बसलेली' भग्न शिल्पही आठवली. शासनानं वर्षातून एकदा 'जागतिक वारसादिन' (वर्ल्ड हेरिटेज डे) साजरा करण्याचा समारंभ करण्यापेक्षा अशा धर्मापुरीच्या शेतांच्या बांधावरील भग्न शिल्पांवर मेहेरनजर टाकली तरी त्यांच्यावर प्रकाशाचे काही कवडसे पडतील व हे प्राचीन वैभव उजेडात येईल. विद्यापीठांच्या इतिहास विभागांना जागतिक वारसा दिनाची तरी किती कल्पना असेल असे वाटण्याचे हे दिवस आहेत. जगाला दिपवून टाकणाऱ्या अशा शिल्पसौंदर्यापासून आपण वंचित ठेवीत आहोत याचे दुःख वाटते."[६०]

केदारेश्वर मंदिर पश्चिमाभिमुख असून एक मुखमंडप आणि दोन बाजूस असलेले दोन अर्धमंडप यांनी युक्त असलेला अर्धखुला मंडप गर्भगृहाइतकेच अंतराळ रुंद आणि गर्भगृह असा त्याचा तलविण्यास आहे. गर्भगृहात शिवलींग आहे या मंदिराची बरीच वैशिष्ट्ये पानगाव येथील विठ्ठल मंदिर आणि होट्टल येथील सिद्देश्वर मंदिर या दोन मंदिराच्या वैशिष्ट्यांशी मिळती जुळती आहेत. गर्भगृहाचा तलविण्यास नवरथ आहे. गर्भगृहाच्या तीन भद्रांवर प्रत्येकी एक रथिका आहे. या रथिकांमध्ये केशव, वासुदेव आणि नरसिंहाच्या मूर्ती आहेत. या मंदिरावर शिव, भैरव, पार्वती आणि काली यासारख्या शैव संप्रदायातील देवता दाखविल्या असल्या तरी बहुसंख्य देवमुर्ती वैष्णव आहेत. विशेषतः केशव, नारायण, गोविंद, त्रिविक्रम, वासुदेव, जनार्दन यासारखी वैष्णव रुपे दाखविली आहेत. डॉ. अनिल सिंगारे म्हणतात, "मंदिराच्या बाह्य शिल्पात विष्णू, मुरलीधर, नटेश्वर, लक्ष्मी, विष्णूचा वराह अवतार, नृसिंह, अनेक मदनिका, लिखाण करत असलेली युवती, काली, ब्रम्हा, रती, नृसिंहाच्या तर अनेक वेगवेगळ्या मूर्ती कोरल्या आहेत. त्यामध्ये हिरण्यकश्यपाला मांडीवर घेऊन फाडलेली मूर्तीही सध्या मंदिराच्या दक्षिण बाजूला आहे आणि मदन मूर्ती आहे अशी ६८ शिल्प शिल्पांकीत केलेली आहेत."[६१]

---

६० पठाण यु.म., दैनिक लोकमत, स्मृतीस्थळ लेख, पृ.८

६१ सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९६-१९८

बाह्यांगाच्या पीठावर काही वेगवेगळे थर आहेत. ९१४ चौरस मिटर आकाराच्या मंडपाला अलिकडेच झालेल्या जिर्णोध्दारात पूर्ण भिंती बांधल्या गेल्या. असल्या तरी हा मंडप अर्धखुला असून त्याच्या तिन्ही बाजूने वेदिका होती. हे दाखवून देणारे पुरावे आहेत पिठाचे नेहमीचे थर संपल्यावर त्याच्या वरच्या भागात नजरेत भरेल असा गजथर आहे. त्यावर राजसेनक, वेदिका आणि आसणपट्ट आहेत. या मंदिरावरील राजसेनकाचे स्वरुप दोन कपोतालींच्या मध्ये असलेल्या अर्धस्तंभाच्या ओळीत दोन अर्धस्तंभामधील भागात दाखविलेल्या चौकटीचे आकार आणि मनुष्याकृती यांचा पट्ट असे आहे.

वेदिकेवर नेहमीप्रमाणे अर्धस्तंभामुळे निर्माण झालेल्या देवकोष्टांमध्ये नृत्यांगणा आणि वादक दाखविले आहेत. मंडपाचा अंतर्भाग नऊ पदांचा असून त्याचे छत कोपऱ्यामध्ये आणि टोकाजवळ काहिसे तिरपेपण सपाट आहेत. छताच्या तिरप्या प्रस्तर भागावर कीर्तिमुखे कोरलेली आहेत. मंडपाच्या मध्यभागी रंगशिला आहे. मंडपातील मागच्या भिंतीत अंतराळाच्या द्वाराच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी एक अशी दोन देवकोष्टे आहेत. अंतराळाचा आकार (१.०४X १.०४M) गर्भगृहाइतकाच आहे. गर्भगृहाचे द्वार पंचशाख प्रकारचे आहे. या द्वारशाखांवर आतील बाजूकडून अनुक्रमे पुष्पपट्ट, भक्त दाम्पत्य, अर्धस्तंभ, व्याल आणि गोलकांची किंवा भोवऱ्याची नक्षी आहे. द्वारशाखांवर खालच्या भागात अनुक्रमे गंगा व यमुना, चौरीधारक, वैष्णव द्वारपाल आणि निधी दाखविले आहेत. गर्भगृहाच्या द्वारावरील वैष्णव द्वारपाल, भद्रांवरील देवकोष्ठांमधील मूर्ती आणि मोठ्या संख्येने आढळणाऱ्या वैष्णव शिल्पाकृतीवरुन हे मंदिर मुळात विष्णूचे असल्याचे निःसंदिग्धपणे स्पष्ट होते. मंदिराचे वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्ये आणि शिल्पशैली लक्षात घेता हे मंदिर इ.स.च्या बाराव्या शतकाच्या सुरुवातीला बांधले गेले असावे. असे तेथील सर्व मंदिराच्या पुराव्यावरुन वाटते. केदारेश्वर मंदिराच्याही वर शिखर नाही पण त्याच्यावर विटांचा टोप आहे. मंदिराच्या आतील सभामंडपाला आधार देण्यासाठी अनेक ठिकाणी स्तंभ उभारले आहेत. यावरुन येथील प्रस्तर किंवा तुळ्या ह्या ठिसूळ आहेत.

कमकुवत आहेत. त्या मंदिराचा जास्त भार सोसू शकत नाहीत. म्हणून केदारेश्वर मंदिर हे देखील भूमिज मंदिर शैलीत मोडणारे आहे. असे आपणाला म्हणता येते.

### ५.३.४ विठ्ठल मंदिर (पानगाव)

परळी वैजनाथपासून ३० कि.मी. अंतरावर असलेल्या पानगाव येथे विठ्ठल मंदिर असून ते पूर्वाभिमुख आहे. पूर्वेस मुखमंडप, दक्षिणेस आणि उत्तरेस अर्धमंडप असलेला अर्धखुला मंडप, अंतराल आणि गर्भगृह असा त्याचा तलविण्यास आहे. जामखेडकर म्हणतात, "होट्टल येथील सिध्देश्वर मंदिर आणि धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिर ही पूर्वाभिमुख असून त्यांचाही तलाविण्यास आदी असाच आहे."[६२] हे या संदर्भात नमुद करणे आवश्यक आहे. उपरोक्त मंदिराशी साधर्म्य असलेल्या घटकांव्यातिरिक्त या मंदिरासमोर एक बऱ्यापैकी मोठा मंडप आहे. डॉ. प्रभाकर देव यांच्या मते मुळात व त्याचे स्वरुप गोपूर असे असावे तसे असेल तर या मंडपाला जोडूनच मंदिराची सिमाभिंत असली पाहिजे.

के.के. शर्मा म्हणतात, "महाराष्ट्रात सर्वत्र या प्रकारची मंदिरे पहावयास मिळतात. शिखर पध्दतीमुळे ही मंदिरे नागर मंदिरापासून वेगळी आहेत. अनेक भूमिज मंदिरावर विटांची शिखरे होती. ती आज अस्तित्वात नाहीत. या मंदिराच्या वितानात फारसे वेगळे असे काही नाही. यात गर्भगृह, अंतराळ, मंडप व कधीकधी मुखमंडपावर अर्धमंडप असतात. दोन अर्धमंडप असलेल्या मंदिरात तीन गर्भगृहे आढळतात. यापैकी काही मंदिरे शिल्प व नक्षींनी अलंकृत आहेत."[६३] अशा या भूमिज मंदिर शैलीत धर्मापुरीच्या मंदिराप्रमाणे पानगावचे मंदिर मोडते.

पानगाव येथील विठ्ठल मंदिराच्या गर्भगृहाचा तलविण्यास सप्तरथ असून त्याचे बाह्यांग आणि मंडपाचा अंतर्भाग सुरसुंदरीच्या मूर्तीशिल्पांनी अलंकृत करण्यात आला आहे. मंडपातील सुरसुरंदरीचे स्वरुप हस्तांतरीत सपाट पट्टीवर असलेल्या मूर्ती असे आहे

---

६२ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१६३

६३ शर्मा के.के. (संकलन), संदर्भ महाराष्ट्र, पृ.७८-७९

होयसळांच्या आश्रयाखाली बांधलेल्या मंदिरामध्येही अशाच मूर्ती आढळतात. अशाच मूर्ती धर्मापुरीच्या केदारेश्वर मंदिरावरही आहेत. त्याच्या बाबतीत यु.म. पठाण म्हणतात, "धर्मापुरीच्या या भग्न मंदिरात पुरुषभर उंचीवर चौकटी-चौकटीमध्ये स्त्रियांच्या विविध अविर्भावांची, त्याचप्रमाणे संगीत नृत्याची सुंदर शिल्प आहेत. बहुधा या अष्टनायिका असाव्यात पण त्या अष्टनायिकाच असत्या तर त्याहून अधिकमुद्रा असलेल्या अन्य नायिकांच काय असा एक जिज्ञासू प्रश्नही चौकटीतली शिल्प पाहत असताना आपल्या मनात निर्माण झाल्याशिवाय रहात नाही. मग या सर्व शिल्पांना सुरसुंदरी म्हणतात असे मराठवाड्याचेच असलेले माझे स्नेही व डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठांचे कुलगुरु डॉ. देगलूरकर यांनी मला सांगितलं."[६४] अशा मूर्ती शैलीच्या दृष्टिकोनातून उत्तर चालुक्यांच्या काळातील म्हणजेच नंतरच्या कर्नाटक शैलीच्या शिल्पांशी मिळत्या-जुळत्या आहेत.

आधीच नमुद केल्याप्रमाणे मंडप अर्धखुला असून प्रवेश मार्गाचा अपवाद वगळता मंडपाच्या सर्व बाजूंनी वेदिकेच्या वामभिंती आहेत. वेदिकेच्या बाह्यांगावर आलटून-पालटून येणारे अर्धस्तंभ आणि कोष्टे यांचे अलंकरण आहे. कोष्टामध्ये नृत्यांगणा आणि वादकांच्या मूर्ती आहेत. अर्धस्तंभांवर शिखरे दाखविली आहेत. मंडपाच्या अंतर्भागात मंडप एकूण बावीस पूर्णस्तंभावर आणि आठ वामनस्तंभावर पेललेला आहे. त्यातील अठरा स्तंभ परिघ भागात आहेत. तर मध्यभागात चार स्तंभ (च तुष्की) आहेत. शिवाय मंडपाच्या वेदिकेवर आठ मानव स्तभ आहेत. स्तंभाचा घटकक्रम म्हणजे त्याच प्रदेशात आढळणाऱ्या स्तंभासारखा म्हणजे चौरस तळखडा, तीन अष्टकोनी घटकांच्या मधोमध वर्तुळाकार घटक, वरच्या बाजूस चौरस घटक, त्यावर उद्‌गम सदृश्य घटक, त्यावर भरणी आणि शिरावटी असा आहे. खांबाचा वरचा भाग आणि खांबावरील तुळई यांना जोडणाऱ्या दगडी फळीसारख्या भागावर (हस्तपट्टांवर) सुरसुंदरीच्या मूर्ती आहेत. विशेष म्हणजे मंडपाच्या आतील मागच्या भिंतीत अंतराळाच्या द्वाराच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी एक दोवकोष्ठ आहे.

६४ पठाण यु.म, पूर्वोक्त, पृ.८

गर्भगृहाच्या द्वारावर खालच्या भागात वैष्णव द्वारपाल आहेत. एरव्ही हे गर्भगृह आतून साधे सपाट असून त्याचे त्याचे छतही साधे सपाट आहे. असे छत शिल्पग्रंथामध्ये समतलवितान म्हणून ओळखले जाते. मंदिरासमोर असलेल्या गोपूरसदृश्य मंडपात नंदी असल्यामुळे हे मुळचे शैव देवालय असून त्याचे नंतर विठ्ठल मंदिरात म्हणजेच वैष्णव मंदिरात रुपांतर झाले. असावे असा डॉ.प्रभाकर देवांप्रमाणे कोणाचाही समज होणे अपरिहार्य आहे. जामखेडकर म्हणतात, "पण गर्भगृहाच्या भद्रांवरील देवकोष्ठकातील वैष्णव मूर्ती लक्षात घेता डॉ. देव यांच्या या मताचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे."[६५] विठ्ठल मंदिर हे अशाच प्रकारे अनेकांनी कोणी होयसळ शैलीचे, कोणी नागर शैली, कोणी डेक्कन प्रकारची नागर शैलीचे आहे असे म्हणतात. आणि हे मंदिर महादेवाचे असावे असे म्हणतात. पण या मंदिराचा सखोल अभ्यास केल्यास हे मंदिर भूमिज मंदिर शैलीत मोडणारे आहे. याच्यावरील शिखर हे अलिकडे बांधलेले आहे. मंदिराचा काळ बारावे शतक आहे. येथील मंडोवरावरील शिल्प धर्मापुरीच्या शिल्पापेक्षा आकाराने मोठे आहेत. काळ एक असला तरी या दोन्ही मंदिरासाठी वापरलेला दगड निराळाच दिसतो. धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिराचा दगड तांबडा आहे. तर पानगाव येथील विठ्ठल मंदिराचा भूरकट पांढरा आहे. व केदारेश्वराच्या तुलनेत येथील दगड ठिसूळ वाटतो.

तसेच मंदिर हे वैष्णव आहे. शैव नसून या मंदिराला मुळातच वैष्णव साज चढवलेला दिसून येतो. याचे विकष पुढील प्रमाणे - गर्भगृहात मूर्ती ठेवण्यासाठी देवकोष्ठ आहे. ते वैष्णवातच असते. शैवांची बहुसंख्य शिवलिंग सापडली आहेत ती खाली ठेवली जातात, गर्भगृहाच्या द्वारशाखांवर वैष्णव द्वारपाल आहेत. सभामंडपात अलिकडच्या काळातील कुर्माची स्थापना आहे. तसेच वरच्या भागात पद्म आहे. मंदिराच्या बाह्य भागावर वराह, बौध्द व वैष्णव शिल्पांचा प्रभाव दिसतो. तेथील पुजाऱ्याला विचारले असता. त्याच्या पूर्वजांनी एकमेकांना सांगत आल्याप्रमाणे या ठिकाणी वैष्णव मंदिर असल्याचेच सिध्द होते.

---

६५ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१६४

पानगाव या ठिकाणी शेतात एक पंचकुंड महादेव मंदिर आहे. या मंदिरावरही अलिकडच्या काळातील शिखर बांधलेले आहे. त्यामध्ये मात्र शिवलिंग आहे. व ते पुरातन वाटते. ते शैव मंदिर असून गावात एक पन्नगेश्वराचे मंदिर आहे. तेथेही एक सर्वात विशाल शिवलिंग आहे. त्या ठिकाणी मंदिर हे आधुनिक बांधलेले दिसते. विठ्ठल मंदिर जरी वैष्णव असले तरी गावामध्ये मोठ्या प्रमाणातक शैव शिल्प सापडतात. हे सत्य नाकारता येत नाही.

अशा प्रकारे आपणाला धर्मापुरी आणि पानगाव येथील मंदिरांच्या बांधकाम शैलींचा अभ्यास सविस्तरपणे करण्यास मदत होते आणि येथील मंदिराचे वेगळेपण प्रकर्षाने दिसून येते.

## ५.४ किल्ला व बारव स्थापत्याचा सविस्तर अभ्यास

राजाच्या निरनिराळ्या अंगामध्ये मनूने राजधानीला राष्ट्राच्याही अधिचे स्थान दिले आहे. ह्या संबंधीचा खुलासा मेधातिथीने आणि कुल्लुकाने असा केला आहे की, राजधानी शत्रुच्या हाती जाण्याने राष्ट्राचा म्हणजे राज्याचा काही प्रदेश शत्रुच्या हाती जाण्यापेक्षा अधिक भयंकर संकट उभे होते कारण राजधानीत धान्याचे साठे ठेवलेले असतात. उत्तर भारतातील भौगोलिक परिस्थितीने आणि प्राचीन काळातील युध्दाच्या प्रकारामुळे बहुदा राजधानी आणि दुर्ग ह्यांना मोठे महत्व आले असावे. म्हणूनच धर्मापुरी या ठिकाणीही लहान का होईना किल्ला हा अस्तित्वात आला असावा.

भारतरत्न पा.वा. काणे म्हणतात, "कौटिल्याने दुर्ग बांधण्यासंबंधी विस्तृत विवेचन केले आहे. आणि राजाने आपली राजघानी एखाद्या दुर्गात ठेवावी असे सांगितले आहे. कौटिल्याने औदक (बेटात असलेला), पार्त (डोंगरावर असलेला), धान्वल (मैदानात असलेला) आणि आरण्य (दाट झाडीच्या प्रदेशात असे) अशा चार प्रकारच्या दुर्गांचा उल्लेख केला आहे. महाभारत, मनुस्मृती आणि निरनिराळी पुराणे ह्यात दुर्गाची चार, सहा, आठ, नऊ

असे निरनिराळे प्रकार आणि त्यांची भिन्न नावे दिली आहेत आणि त्यांची रचना कशी असावी ह्याविषयी विवेचन केले आहे."[६६]

ज्याप्रमाणे किल्ले महत्वाचे असतात तसेच सांस्कृतिक इतिहासात बारवानांही महत्वाचे स्थान इतिहास काळात होते. लोकसत्ता दैनिकात कुमार केतकर म्हणतात, "महाराष्ट्रात आणि संपूर्ण भारतातील सर्व प्रमुख मंदिरांच्या जवळ एक गोष्ट हमखास पहावयाला मिळते ती म्हणजे त्या मंदिराच्या जवळ असलेले पाणी"[६७] काही ठिकाणी ही मंदिरे नदी-नैसर्गिक प्रवाहांच्या काठी आहेत. काही समुद्रकिणाऱ्याच्या आहेत. तर काही तलावाजवळ आहेत. पण ज्या मंदिरांना अशा प्रकारच्या पाण्याचा नैसर्गिक स्त्रोत उपलब्ध झाला नाही तेथे वेगवेगळ्या प्रकारे पाणी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. "एखाद्या मंदिराजवळ नैसर्गिक झ रा किंवा नदीचा उगम असेल तर तिथे पाण्याचे कुंड बांधले जाते. त्यात नैसर्गिक झऱ्याचे पाणी जमा होते."[६८] अशाच प्रकारे कुंड हे धर्मापुरी या गावात जागोजागी पहावयास मिळतात. तसेच पानगाव या ठिकाणीही काही जागी असे कुंड पहायला मिळतात अशा कुंडामुळे तत्कालीन समाजजीवनाची पाण्याची गरज भागविली जात होती. म्हणून कुंडानाही महत्वाचे स्थान होते.

### ५.४.१ किल्ला स्थापत्याचा अभ्यास

महाराष्ट्रात ३८० पेक्षा जास्त किल्ले आहेत. ह्यासर्व किल्यातील वास्तु कालोघात अनेकदा दुरुस्त झाल्या व त्यांचे स्वरुप पूर्णपणे बदलून गेलेले आहे. त्यापैकी बरेच किल्ले दुर्लक्षित स्थितीमध्ये असून पडक्या अवस्थेत आहेत. त्यापैकी काही बऱ्यापैकी अवस्थेत आहेत. पण धर्मापुरी येथील किल्ला मात्र दुर्लक्षित अवस्थेतच आहे. त्याची नोंद म्हणावी तेवढी मराठवाड्यातील किंवा महाराष्ट्रातील संशोधकांनी घेतली नाही ही शोकांतिका म्हणावी लागेल. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, विशालगड, तोरणा, लोहगड, सिंधुदुर्ग, जंजिरा, देवगिरी, कंधार, उदगीर, धारुर, नळदुर्ग हे किल्ले अनेक दृष्टीने महत्वाचे मानले जातात.

---

६६ काणे पा.वा., धर्मशास्त्राचा इतिहास, (अनु. यशवंत भट्ट), पृ.४२८

६७ केतकर कुमार (संपा.), दैनिक लोकसत्ता, पुष्करणी व जलकुंडे, पृ.९

६८ तत्रैव

के.के. शर्मा म्हणतात, "काही किल्यांचे वर्णन समकालीन वाङमयातून प्राप्त होते. या वास्तु हल्ला करण्यासाठी तसेच संरक्षणासाठी वापरल्या गेल्या राजे शिवाजीने किल्याचा फार उत्तम रितीने उपयोग करुन घेतला. डग्लस या इंग्रज इतिहासकाराने राजांचे वर्णन करतांना किल्यात जन्माला आलेला किल्यांचा माणूस असे म्हटले आहे."[६९] यावरुन किल्यांना किती अनन्यसाधारण असे महत्व आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्यांच्याच जोरावर एवढे साम्राज्य वाढवले की एक दिवस सर्वमान्य राजा होण्याचे भाग्य त्यांना लाभले.

धर्मापुरीचा जो किल्ला आहे त्या किल्याचा इतिहास तसा उत्तरमध्ययुगीन काळातला वाटतो. याच काळात या परिसरात अनेक किल्ले ही निर्माण केली गेली आहेत. जसे की औसा उदगीर आणि धारुर या ठिकाणची किल्ले ही मध्ययुगातीलच मानली जातात. राष्ट्रकुट काळातील कंधारचा एक किल्ला सोडला तर बाकीचे किल्ले मध्ययुगातीलच असावेत असे पुरावे मिळतात. लातूर जिल्ह्यातील औसा या ठिकाणाला तर सातवाहन या काळापासूनचा इतिहास आहे. त्या काळातील अवशेष या ठिकाणी मिळतात तसेच वाकाटक, बदामीचे चालुक्य आणि राष्ट्रकुटांबरोबरच मु.ग. पानसे म्हणतात, "कल्याणीच्या चालुक्यानंतर औसा या नगरावर शिलाहार यादव आणि बहामनी यांनी राज्य केले यादवांची राजधानी औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी होती."[७०] म्हणजे या राजघराण्याचे वर्चस्व या ठिकाणी होते. म्हणजे औसा हे एक ऐतिहासिक ठिकाण आहे याला पुस्ती मिळते. शं.गो. तुळपुळे म्हणतात, "औसा नगराचा उल्लेख अंबाजोगाई येथील यादव सेनापती खोलेश्वर याच्या शके ११५० मधील शिलालेखात आढळतो."[७१] म्हणजे प्राचीन काळात बीड जिल्ह्याशी या शहराचा संबंध होता असे म्हणता येते. या ठिकाणच्या किल्याचा उल्लेख करताना फेरिस्ता म्हणतो, "बहामनी काळात औसा येथील किल्ला बांधला गेला."[७२] प्राचीन काळात कल्याणीचा राजा विक्रमादित्य सहावा याचा सेनापती

---

६९ शर्मा के.के., (संकलन) , पूर्वोक्त, पृ.६५

७० पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, पृ.२७

७१ तुळपुळे शं.गो, (संपा.) प्राचीन मराठी कोरीव लेख, पृ.१२०

७२ फेरिस्ता, गुलशने इब्राहिमी, पृ.३९

भीमनाथ याचा एक शिलालेख औसा परिसरात असलेल्या निलंगा तालुक्यातील हिप्पलगाव येथे मिळाला. या शिलालेखाचा काळ इ.स. १०९९ आहे असे एच.एस. ठोसर म्हणतात म्हणजे औसा या ठिकाणचा किल्ला व औसा गाव यांची प्रसिध्दी प्राचीन काळात व मध्ययुगातही होती. औसा किल्याची दुरुस्ती एकदा मलीक अंबरने केल्याची नोंद आहे. याच किल्याच्या समकालीन धर्मापुरीचा किल्ला असावा.

औसा येथील किल्याप्रमाणेच मध्ययुगीन काळातील मराठवाड्यातील महत्वाचा किल्ला म्हणजे उदगीरचा किल्ला होय. रा.था. राठोड म्हणतात, "उदगीर हे शहर बिदरच्या पश्चिमेला शहचाळीस मैलावर असून नांदेड बिदर रोडवर वसलेले आहे. उदगीरपासून नांदेड उत्तरेस ७२ मैलावर आहे."[७३] हे ठिकाण लातूर जिल्ह्यात मोडणारे आहे. "उदगीरला व उदगीरच्या जवळपास दिसणाऱ्या जुन्या अवशेषांवरुन हे शहर अत्यंत पुरातन आहे हे सिध्द होते."[७४] उदगीरच्या किल्याचा पाया हा चालुक्य राजांनी घातला होता. पण पुढे बहामनी काळात याचे बांधकाम झालेले आहे. या किल्याचा फार मोठा राजकीय इतिहास आहे. किल्याच्या बांधकामासाठी मोठमोठे दगड, नक्षीकाम केलेले दगड, चुना, वाळु, कापूस व आंबाडा यांचा वापर केला असून किल्याभोवती मोठा खंदक आहे. किल्याच्या आतील भागात दोन धान्य कोठारे, कारंजे, बाग, किल्लेदाराचे निवासस्थान, राणी महाल, प्रार्थना मंदिर, तोफखाना, बारुदखाना, रंग महाल, बडी राणी महाल व उदगीरबाबाची समाधी आहे. अशा प्रकारचा कलासंपन्न हा किल्ला आहे. इ.स. १३४७-१५२७ च्या दरम्यान हा किल्ला बांधल्याचा उल्लेख तारिख-ए-फरिस्ता या ग्रंथात आहे. अनेकांनी हा किल्ला मध्ययुगात बांधल्याचे सांगितले आहे. मग धर्मापुरीचा किल्लाही मध्ययुगातला आहे याचा संबंध उदगीर आणि परिसराशी असावा.

उदगीर आणि औसाप्रमाणे बीड जिल्ह्यातील किल्ले धारुर हा देखील एक महत्वपूर्ण किल्ला होता. हाही किल्ला मध्ययुगात नावारुपाला आला असला तरी याचा इतिहास

---

७३ राठोड, रा.था., उदगीर इतिहास आणि स्मारके, पृ.४

७४ तत्रैव, पृ.५

राष्ट्रकुटांच्या काळापासून रेखाटला जातो. भगवान काळे म्हणतात, "धारुर म्हटल्यावर फारसा बोध होत नाही. तथापि किल्ले धारुर म्हटले की, चटकन बीड अंबाजोगाई जवळचे धारुर लक्षात येते."[७५] आपण पाहिलेच आहे की, या नगरीचे स्थापत्याचे श्रेय राष्ट्रकुटांकडे जाते. "राष्ट्रकुट काळात या ठिकाणी महादुर्ग नावाचा किल्ला असावा."[७६] याच्या निर्मितीमध्ये निसर्गाचे मोठे वरदान आहे. दोन नैसर्गिक घळीमधील उंचवटा अशी याची रचना आहे. या घळीची रचना इंग्रजी (Y) अक्षरासारखी आहे. वायचे दोन फाटे जिथून निघतात तेथून घळ्यांना आरंभ होतो. घळ्या तीव्र उतारांच्या असल्याने आणि ही फाटे जिथे एकत्रीत होतात त्या ठिकाणी खंदक असल्याने जागा स्वसंरक्षीत आहे.

राष्ट्रकुट काळात खंदकाच्या चढणीवर प्रचंड सिंह द्वार उभारुन दुर्गाची संरक्षण व्ययस्था भक्कम केली. तसेच आतील त्रिकोणाकृती टेकाडावर उपलब्ध असणाऱ्या सपाट जागेभोवती अजस्त्र दगडांच्या पौळी रचून दुर्ग अभेद्य केला. सिंहद्वाराचे अवशेष व राष्ट्रकुटकालीन, यादवकालीन दगडांचे काही अवशेष इतस्ततः विखुरलेले दिसतात. नंतरच्या निर्मात्यांनी या उपलब्ध साधनांचा बाधकामासाठी उपयोग केल्याचे दिसते यानंतर याचे संपूर्ण रुप पालटण्याचे आव्हान किश्वरखानाने स्विकारले. त्याने राष्ट्रकुटांच्या स्थापत्य मदतीने भक्कम किल्ला उभारला. डॉ. कठारे/नगराळे म्हणतात, "विजापुरच्या आदिलशहाने आपला सरदार किश्वरखान यास इ.स. १५६९ साली अहमदनगरच्या निजामशाहीच्या ताब्यातील धारुर जिंकण्यासाठी पाठविले धारुर जिंकल्या नंतर त्याच वर्षी म्हणजेच १५६९ मध्ये किश्वरखानने तेथे भव्य किल्ला बांधला."[७७] पण अहमदनगरचा मुर्तजा निजामशहाने धारुर पुन्हा जिंकून घेतले. आपल्या विजयाचे स्मारक म्हणून त्याने धारुरचे 'फतहबाद' असे नाव ठेवले. नांदेड त्या काळात राजकीय हालचालीचे केंद्र होते "बहामनी राज्यात महमद गवान याचे येथे वास्तव होते

---

७५ काळे भगवान, किल्ले धारुर, पृ.२२

७६ तत्रैव

७७ कठारे/नगराळे, पूर्वोक्त, पृ.४२०

त्याने येथील वजीराबाद ही पेठ वसविली आणि भव्य किल्ला बांधला."[७८] मोगल काळात हे ठिकाण सरकार विभागाचे मुख्य ठाणे होते.

तसेच परांडा येथील किल्लाही बराच काळ बहामनी साम्राज्याच्या वर्चस्वाखाली होता. मग धर्मापुरीच्या चहूकडील सर्व परिसर जर बहामनी साम्राज्याच्या वर्चस्वाखाली येत होता तर धर्मापुरीचा परिसरही मध्ययुगीन काळात त्यांच्या वर्चस्वाखाली असणे साहजीकच आहे. या ठिकाणी किल्याची बांधणी देखील मध्ययुगीन काळातीलच आहे. काही जन ही बांधनी उत्तर मध्ययुगीन असल्याचे सांगतात. जसे ज्ञानेश्वर पांचाळ म्हणतात, "आज उभा असलेला किल्ला हा उत्तर मध्ययुगीन काळात बांधलेला असून तो चांगल्या स्थितीत आहे."[७९]

धर्मापुरीचा किल्ला हा कदाचित कल्याणीच्या चालुक्य कालीन भव्य प्रासादाच्या ठिकाणी किंवा जागेवर उभारण्यात आला असावा. असे याच्या बांधकामात उपयोगात आणलेल्या कन्नड शिलालेख व अन्य शिल्प असलेल्या दगडावरुन वाटते. "१६ व्या व १७ व्या शतकात बांधण्यात आलेल्या या किल्याची दक्षिणोत्तर व पूर्व-पश्चिम लांबी-रुंदी अनुक्रमे १४४x७३ मी. आहे."[८०] याचा आकार साधारणतः अष्टकोनी असून एका भागात असलेली बारव ही उत्तर मध्ययुगीन बारवांच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वपूर्ण वाटते.

धर्मापुरीच्या किल्याची अवस्था पूर्वीप्रमाणे राहिली नसून बरीच नासधूस झालेली दिसून येते. फक्त किल्याची तटबंदी तेवढी चांगल्या स्थितीत आहे. आणि ती अभेद्य वाटते या तटबंदीला ९ बुरुज आहेत. किल्याच्या अंतर भागावर वेगवेगळ्या प्रकारची शिल्पे आढळून आली. बाह्य भागावर मात्र शिल्पे तेवढी नव्हती. किल्याच्या भिंतीवर पुष्प पट्ट अनेक ठिकाणी दिसून आले. हत्तीची पण शिल्पे त्या ठिकाणी गजथराच्या रुपात दिसतात. अनेक प्राण्यांची शिल्पे कोरलेली आहेत. किल्यामध्ये एक दोन इमारती सोडल्या तर मोकळे पटांगणच दिसून आले. किल्याच्या प्रवेशद्वारापाशी एक मशीद आहे. आणि किल्याच्य मागच्या बाजूच्या

---

७८ तत्रैव

७९ पांचाळ ज्ञानेश्वर (संपा.), पूर्वोक्त, ४९

८० तत्रैव

बुरुजावर मुस्लीम पीर आढळून आले. तर हा प्रसिध्द किल्ला धर्मापुरी शहराच्या दक्षिण बाजूला मोठ्या वैभवात उभा आहे.

हा किल्ला इतिहासात दुर्लक्षित राहिलेला आहे. याचे मुल्यमापन झाले पाहिजे. हा किल्ला उदगीर, कंधार, धारुर, औसा, परांडा यांची जरी बरोबरी करीत नसला तरी मध्ययुगात याचे कार्य योगदानास्पद होते. मोगल काळात या ठिकाणी टाकसाळ होती असे उल्लेख आहेत. परंतु हा किल्ला कल्याणीच्या चालुक्य राजाच्यांच काळात बांधला असेल यात शंका नाही. हे पुराव्यावरुन पटते.

## ५.४.२ बारव स्थापत्याचा अभ्यास व जलव्यवस्थापन

धर्मापुरी आणि पानगाव या अनुक्रमे बीड आणि लातूर जिल्हयातही प्राचीन काळात जलव्यवस्थापन तत्कालीन राजे लोकांनी पाण्याची गरज भागावी म्हणून केले होते. भारतात प्राचीन काळापासून जलाशय निर्माण करण्याची परंपरा प्रचलित आहे. वि.भि. कोलते म्हणतात, "चंद्रगुप्त मौर्याच्या काळात सौराष्ट्रातील गिरणार नावाच्या नदीवर बांध घालून त्याचा प्रांत प्रतिनिधी पुष्पराज याने सुदर्शन नावाचा जलाशय बांधला होता."[८१] सम्राट अशोकाचा सुभेदार तुषास्प याने या जलाशयाच्या बांधकामात सुधारणा केली होती. अतिवृष्टीने उध्वस्त झालेल्या या जलाशयाची दुरुस्ती शक राजा महाक्षत्रप रुद्रदामन यानेही केली होती. असा उल्लेख त्याचा जुनागड शिलालेखात आढळतो.

दक्षिण भारतातील चोल राजांनी कावेरी नदीवर पाणी आडवून धरणे बांधली होती. किरण देशमुख म्हणतात, "महादेवराय यादवाने त्याच्या वडीलांच्या स्मरणार्थ वेरुळ येथे एक तलाव बांधला होता. त्याचे नाव कान्हराळे (कान्हरळा) आहे."[८२] रोडे सोमनाथ म्हणतात, "भिरज परिसरात इसवीसनाच्या अकराव्या शतकात शिलाहार राजा गंडारदित्य याने मोठा तलाव बांधला होता."[८३] औरंगाबाद व खुल्ताबाद येथेही प्राचीन तलाव आहेत. वाकाटक

---

८१ कोलते वि.भि., (संपा.), महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, पृ.२०

८२ देशमुख किरण, तीर्थक्षेत्र राहेर, पृ.४०

८३ रोडे सोमनाथ, धाराशीव येथील जैन लेणी, पृ.६५

काळात नागपूर जिल्ह्यातील मत्सर माढळ व माहूरझरी आणि वाशिम येथे जलाशय निर्माण केले. कोलते म्हणतात, "वाकाटक राजा याच्या हिस्से बोराळ शिलालेखात म्हटल्याप्रमाणे त्याने शके ३८० मध्ये वाशिम लगत एका चंद्रसरोवराची निर्मिती केली. त्याचे नाव सुदर्शन होते."[८४] दुसरा वाकाटक राजा द्वितीय पृथ्वीसेन याने माहूरझरी येथे पृथ्वीसेन येथे पृथ्वीसमुद्र या जलाशयाची निर्मिती केली.

"चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याने 'भीमसमुद्र' या जलाशयाची निर्मिती केल्याचा उल्लेख निलंगा तालुक्यातील गणेशवाडी शिलालेखात आढळते."[८५] चालुक्य व यादव काळात माहूर अर्धापूर व सगरोळी (जि. नांदेड) येथे जलाशय निर्माण केले होते. कंधार ही राष्ट्रकुटाची राजधानी होती. कृष्ण तिसऱ्याने येते 'जगतुंग समुद्र' या जलाशयाची निर्मिती केली. असे जलाशय प्राचीन काळात धर्मापुरी या ठिकाणीही होते. पाण्याच्या गरजा भागविण्यासाठी या ठिकाणी अशा प्रकारचे जलाशये निर्माण केली गेली.

डॉ. ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, "अशा या भूलोकमल्लाच्या राज्यात जगप्रसिध्द अशी पुरी धर्मापुरी होती. ती जणू पृथ्वीदेवीच्या ललाटावरील तिलकच होती. या नगरीत अनेक तलाव, वापी इत्यादी असून ती वनराजींनी हिरवीगार दिसत असे."[८६] प्राचीन काळातच हे वैभव होत. मग आता नाही का ? तर आताही या ठिकाणी अनेक तलाव पहावयास मिळतात. किल्याच्या पश्चिमेला एक तलाव आहे. गावाच्या उत्तरेला दोन तलाव आहेत. अशा या तलावासोबतच विहिरीही आहेत. यामुळे गावातील लोक सधन आहेत. उत्पन्न चांगल्या प्रकारे काढतात.

जलाशयाप्रमाणेच या ठिकाणी बारवांचाही आपणाला अभ्यास करता येतो. बारव हा जलव्यवस्थापनाचा प्रमुख घटक आहे. अ.श. पाठक म्हणतात, "बारव स्थापत्याला जलव्यवस्थापनात फार महत्त्व आहे. बारव स्थापत्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली प्राचीन

---

८४ कोलते वि.भि., पूर्वोक्त, पृ.२०-२१

८५ तत्रैव, पृ.१५५

८६ देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा खंड-१, पृ.३१-३२

काळापासून रुढ होती. यादव काळात बारव स्थापत्याची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. कुंड हा बारव स्थापत्याचा आधारभूत घटक ठरतो."[८७] कुंडाच्यावर विशिष्ट पायऱ्या ठेऊन एक पटांगण सोपान ठेवले जाते त्यानंतर दुसरा आणि तिसरा सोपान (टप्पा) ठेऊन करण्यात आलेला विस्तार बारव स्थापत्यात पहावयास मिळतो. सर्वात वरच्या सोपानावर स्वतंत्र व संरक्षक भिंतीत देवकोष्ट ठेवण्यात येतात. थोडक्यात एकात एक लहान होत जाणारे कुंड असे बारवाचे स्वरुप अर्थात विधान असते. बारवेचा आकार प्रामुख्याने चौरस आढळतो आयात व क्वचित अष्टकोणी बारवही आढळतात. बारवेला एक ते चार मुख्य प्रवेशद्वार आढळतात. धर्मापुरीतील मिल्लीकार्जून मंदिराजवळचा बारव जो आहे त्यात बारमाही पाणी असते. त्याला चार बाजूंनी प्रवेशद्वार आहेत व सोपान आहेत.

अ.श. पाठक म्हणतात, "महाराष्ट्रात जलव्यवस्थापनात असाधारण महत्व असलेल्या विहीरी, बारव स्थापत्य यांचा अभ्यास फारसा झालेला नाही. एका विशिष्ट कालखंडामध्ये मंदिरांची उभारणी आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणात झाली सामान्यपणे यादवशैलीची (हेमाडपंथी) म्हणून अशी मंदिरे ओळखली जातात. याच काळात बारव स्थापत्याची निर्मिती ही मोठ्या प्रमाणात होत होती."[८८] यादवाप्रमाणेच चालुक्यांच्या कालखंडातच पुष्कळ ठिकाणी बारवा बांधल्या गेल्या धर्मापुरी या ठिकाणी तुकाईदेवीच्या मंदिराजवळ बुजलेल्या स्वरुपातील बारव तसेच किल्ला परिसरातील बारव अशा बारवांचा आपणाला अभ्यास हा करावयास मिळतो. अशा बारवांची निर्मिती चालुक्यांच्याच काळात झ ालेली आपणाला सांगता येते.

बारवांप्रमाणे कुंड असतात. तीर्थस्थानाच्या ठिकाणी स्नानासाठी बांधलेल्या मोठ्या आकाराचा उथळ हौद. याचा आकार साधारणतः २ ते २.५ मीटर खोल व १० मीटर चौरस रुंद असा आढळतो. तेर येते राज्य पुरातन विभागाने केलेल्या साफसफाईच्या वेळी आढळलेले कुंड

---

८७ पाठक अ.शं., महाराष्ट्रातील बारव स्थापत्य, पृ.४६

८८ पाठक अ.शं., बारवस्थापत्य एक आढावा, पृ.४०१-४६८

हे महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन कुंड असून ते विटांनी बांधलेले आहेत. जामखेडकर म्हणतात, "कुंड या प्रकारात येणाऱ्या वास्तुंची उदाहरणे होट्टल, मुखेड, माहूर (जि. नांदेड) पाली (जि. बीड), त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) इ. ठिकाणी आहेत. मुद्दाम तयार केलेल्या जलाशयालगत सुध्दा प्रसंगी कुंडाची निर्मिती करण्यात येई."[८९]

जलव्यवस्थापनाचा आणकी एक प्रकार म्हणजे एक प्रवेश असलेली वापी म्हणजे विहीर याला पायविहीर असेही म्हणतात. यामध्ये वर्तुळ, अष्टकोन व चौरस असे आकार आढळतात. बहाद्दरपुरा कंधार तालुक्यात राष्ट्रकुट कालीन पुरातत्व क्षेत्र असलेल्या भागात सन १९९९ मध्ये रस्त्याचे काम चालू असताना चौरस आकाराची एक पायविहीर उघडकीस आली. "तळणी (ता. हदगाव) येथे असलेली विहीर विटांनी बांधलेली असून प्रवेशासाठीच्या पायऱ्या दगडी चिऱ्यांच्या आहेत. वर्तुळाकार विहिरींची उदाहरणे आपणाला कंधार (जि. नांदेड) चकलांबा (जि. बीड), पानगाव (जि. लातूर) या ठिकाणी मिळतात. अष्टकोनी आकाराची विहीर धर्मापुरी (जि. बीड) व लासूर (जि. औरंगाबाद) या ठिकाणी आहे."[९०]

विहीरीप्रमाणेच आड हा एक घटक महत्वाचा असतो. द्वारहीन जलाचा संग्रह म्हणजे कुप. यालाच आड असे म्हणता येईल. ही केवळ मर्यादित उपयोगासाठी बांधलेली वास्तु असून याला प्रवेशमार्ग नसतो. आडाचा आकार हा साधारणपणे एक मीटरपेक्षा कमी व्यासाचा असतो. यामध्ये प्रामुख्याने चौरस अष्टकोनी आकार आढळतात. कंधार येते एक अष्टकोनी आड असून त्याची रचना ही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

तसेच कुंड या वास्तु प्रकाराचे थोडे विकसीत स्वरुप म्हणजे कल्लोळ. हे प्रामुख्याने मंदिराच्या समोर किंवा प्राकारात बांधलेले असतात. याला बारवासारखे प्रवेशमार्ग व टप्पे असतात. पण बारवेच्या तुलनेत आकार लहान असतो. गावाच्या पूर्व-पश्चिम भागात असलेले प्रशस्त तलाव तसेच गावाच्या पूर्वेस असलेले श्रीकेदारेश्वर मंदिर या मधल्या परिसरात प्राचीन

---

८९ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.२२७

९० तत्रैव, पृ.२२८

धर्मापुरीचा विकास झाला. आजही या परिसरात विस्कळीत असलेले शिल्पावशेष लागवडीखाली आलेली पांढरीची जमीन व तेथे आढळणारी खापरे ही या शहराच्या प्राचीनत्वाची साक्ष देतात.

शहररचना करताना दोन तलाव मल्लीकार्जून मंदिरालगतची बारव, तुकाई मंदिरालगतची बारव (आता बुजलेल्या स्थितीत) किल्याच्या परिसरातील बारव यांसारख्या बारवांमधून शहराच्या पाण्याची महत्वपूर्ण गरज भागविण्यात आली होती. प्रशस्त तलावाच्या मुळे स्वाभाविक या परिसरातील बागायतीचा विकास झाला असावा. व यातूनच येथे लाभलेल्या संपन्नतेचा परिणाम म्हणून येथे जैन व हिंदू पंथाचा व वेदाध्ययन केंद्राचा विकास झ ाला. या शहराच्या नावातच असलेल्या धर्मविषयक अधिष्ठाणाची कल्पना सूचित होते. येथे जैन व हिंदू शैव व वैष्णव पंथीयांना मोठ्या प्रमाणात आश्रय मिळाला होता.

अशा प्रकारे वरील विवेचनात धर्मापुरी नगरीतील व पानगाव येथील जलव्यवस्थापनात कोणत्या वास्तु महत्वाच्या ठरतात याचा आपणाला अभ्यास होतो.

**संदर्भ :**


१. सूत्रधार मंडन, प्रासाद मंडन (अनु. र.पु. कुळकर्णी), प्रस्तावणा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती,२००१, प्रस्तावना, पृ.१

२. Brown Percy, Indian Architecture, (Buddhist and Hindu) Bombay, D.B. Taraporevala & Son., १९७१, pp.१९-३०

३. Ibid.

४. Sharan R., Ancient Indian History Culture and Archeaology, Delhi, Radha Publications, २००२, p.४२८

५. James Ferguson and James Burgess, The Cave Temples of India, London, १८८०, p.५८

६. आंबेडकर भी.रा., भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, मुंबई, १९९२, पृ.६५

७. कठारे अनिल, साखरे विजया, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा पब्लिकेशन्स, सुंदर नगर, नांदेड, प्रथमावृत्ती, डिसें. २००८, पृ.२०७

८. मोरे एम.एस., महाराष्ट्रातील बौध्द धम्माचा इतिहास, औरंगाबाद, कौशल्य प्रकाशन, २०००, पृ.३५-३६

९. बोराडे मा.शा., महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन भाजे व कार्ले लेणी, ग्रेस प्रिंटर्स, पुणे, पृ.४

१०. तत्रैव, पृ.६

११. तत्रैव, पृ.८

१२. तत्रैव, पृ.८-९

१३. तत्रैव, प.१०

१४. तत्रैव, पृ.११

१५. धोंगडे सुभाष, मराठवाड्यातील प्राचीन जैन तीर्थक्षेत्रे, (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा, खंड-१, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, जाने. २००२, पृ.७५

१६. तत्रैव

१७. जामखेडकर अ.प्र., स्थापत्य व कला, महाराष्ट्र : इतिहास-प्राचीन काळ (खंड-१, भाग-२), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, (संपा. पाठक अ.शं.), दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००९, पृ.८५

१८. जोशी नी.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, अ.शं. कुळकर्णी, नियंत्रक प्रकाशक समिती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९, पृ.३३९

१९. तत्रैव

२०. Shah U.P., Studies in Jain Art, Banaras, १९५५, pp.६५-७६.

२१. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३४०

२२. Shah U.P., op.cit., p.६१

२३. कोर्टीकर सुधीर, मराठवाड्यातील मंदिरे, (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा, खंड-१, योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, जाने. २००२, पृ.७०

२४. सुत्रधार मंडन, पूर्वोक्त, प्रस्तावना, पृ.१०

२५. तत्रैव, पृ.१८

२६. तत्रैव.

२७. तत्रैव, पृ.२९

२८. तत्रैव, पृ.४६

२९. तत्रैव, पृ.६३

३०. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.९७

३१. जोशी पी.जी., प्राचीन भारत, अभय प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, १९९७, पृ.२७९

३२. तत्रैव.

३३. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त,पृ.९८

३४. तत्रैव, पृ.९९

३५. तत्रैव.

३६. सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास (इ.स.पू. २३०-१३८१), के.एस. अतकरे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून १९९७, पृ.१९६-१९८.

३७. जोशी पी.जी., पूर्वोक्त, पृ.२७१

३८. कुलकर्णी र.पु., शिल्पप्रकाश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, जाने. २०००, पृ.७०

३९. तत्रैव, पृ.७१

४०. जोशी पी.जी., पूर्वोक्त, पृ.२७२

४१. तत्रैव, पृ.२७३

४२. तत्रैव

४३. तत्रैव

४४. सिंगारे अनिल, पूर्वोक्त,पृ.१९६-१९८

४५. सूत्रधार मंडन, पूर्वोक्त, पृ.१८

४६. जोशी पी.जी., पूर्वोक्त, पृ.२७४

४७. तत्रैव

४८. तत्रैव, पृ.२७६

४९. तत्रैव, पृ.२७७

५०. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९६-१९८

५१. सुत्रधार मंडन, पूर्वोक्त, पृ.१८

५२. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१३०

५३. ढाकी एम.ए., इंडियन टेंपल्स फॉर्मस इन कर्नाटक इन्स्क्रिप्शन्स अँड ऑर्किटेक्चर, न्यू दिल्ली, १९७७, पृ.९१-९४

५४. तत्रैव

५५. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१३०-१३१

५६. तत्रैव, पृ.११४

५७. कठारे नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, नोव्हें. १९९९, पृ.३८४

५८. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१३२

५९. पांचाळ ज्ञानेश्वर, (संपा.), २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, प्रकाशक प्राचार्य राठोड गणपत, जाने. २००५, पृ.४७

६०. पठाण यु.म., दैनिक लोकमत, स्मृतीस्थळ लेख, मराठ्वाडा वृत्तांत पेज, रविवार, ८ मार्च २००९, पृ.८

६१. सिंगारे अनिल, पूर्वोक्त, पृ.१९६-१९८

६२. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१६३

६३. शर्मा के.के. (संकलन), संदर्भ महाराष्ट्र, खंड-१, इंटलेक्च्युअल बुक ब्युरो, भोपाळ, २००५, पृ.७८-७९

६४. पठाण यु.म, पूर्वोक्त, पृ.८

६५. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.१६४

६६. काणे पा.वा., धर्मशास्त्राचा इतिहास, (अनु. यशवंत भट्ट), सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८०, पृ.४२८

६७. केतकर कुमार (संपा.), दैनिक लोकसत्ता, पुष्करणी व जलकुंडे, गाथा ज्ञानाची पेज, मंगळवार १५ डिसें. २००९, मुंबई, पृ.९

६८. तत्रैव

६९. शर्मा के.के., (संकलन) , पूर्वोक्त, पृ.६५

७०. पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथ संग्रहालय दादर, मुंबई, १९६३, पृ.२७

७१. तुळपुळे शं.गो, (संपा.) प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ, पुणे, १०६३, पृ.१२०

७२. फेरिस्ता, गुलशने इब्राहिमी, (अनु. डॉ.भ.ग. कुंटे), मुंबई, १९८२, पृ.३९

७३. राठोड, रा.था., उदगीर इतिहास आणि स्मारके, प्रकाशक डॉ. ना.य. डोळे, प्राचार्य महाराष्ट्र उदयगिरी महाविदयालय, उदगीर, प्रथमावृत्ती, १९६८, पृ.४

७४. तत्रैव, पृ.५

७५. काळे भगवान, किल्ले धारुर, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, जाने. २००४, पृ.२२

७६. तत्रैव

७७. कठारे/नगराळे, पूर्वोक्त, पृ.४२०

७८. तत्रैव

७९. पाचाळ ज्ञानेश्वर (संपा.), पूर्वोक्त, ४९

८०. तत्रैव

८१. कोलते वि.भि., (संपा.), महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७, पृ.२०

८२. देशमुख किरण, तीर्थक्षेत्र राहेर,देशमुख धनंजय (संपा.), राहेर श्री लक्ष्मी देवस्थान, २००१, पृ.४०

८३. रोडे सोमनाथ, धाराशीव येथील जैन लेणी, बाहुबली, अनेकांत शोधपीठ, १९८६, पृ.६५

८४. कोलते वि.भि., पूर्वोक्त, पृ.२०-२१

८५. तत्रैव, पृ.१५५

८६. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा खंड-१, अलकनंदा प्रकाशन गुरुद्वारा मागे, उस्मानपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, फेब्रु. १९७६, पृ.३१-३२

८७. पाठक अ.शं., महाराष्ट्रातील बारव स्थापत्य, मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर, २००१, पृ.४६

८८. पाठक अ.शं., बारवस्थापत्य एक आढावा, डॉ. देवीसिंग चौहान गौरवग्रंथ, लातूर, १९९८, पृ.४०१-४६८

८९. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.२२७

९०. तत्रैव, पृ.२२८

# प्रकरण - ६

# चालुक्यांच्या काळाचे इतिहासाला योगदान

प्रकरण सहावे

# चालुक्यांच्या काळाचे इतिहासाला योगदान

भारताच्या इतिहासात अनेक राजघराण्यांनी आपले मोलाचे असे योगदान दिलेले दिसून येते आणि त्यांच्याच या योगदानाने इतिहासाची असंख्य पाने रंगलेली आपणाला दिसून येतात. त्यांच्या कार्याची यशोगाथा म्हणजे इतिहास असेच स्वरुप हे बनलेले दिसून कार्लाईल नावाचा इतिहासकार म्हणतो की, "थोर व्यक्तिंची चरित्रे म्हणजे इतिहास होय"[१] मानव हा जसा समाजशील प्राणी आहे तसाच तो इतिहासवत्सल प्राणी आहे. इतिहासरुपी आठवणीची साठवण मानवाला सुखद अनुभव देत असते. इतिहासाची भूमिका खरे पाहता कालजयी व चिरंजीवी स्वरुपाची असते प्रत्येक बाबीला सृष्टीतील अनंत अस्तित्वाला स्वतःचा म्हणून एक आठवणीत ठेवता येण्याजोगा इतिहास असतो.

डॉ. रा.श्री. मोरवंचीकर म्हणतात, "मानव, सजीव प्राण्यासह केंद्रीभूत मानून त्याची सृष्टी निर्मिती पासूनची रोचक, रंजक, धाडसाने आलेली, सुख दुःखाने ओतप्रोत असलेली, रसरसित वाटणारी, त्याच्या अनुभवाची थेट आठवण देणारी, सुखद व प्रगतीशील मधूर पावलांच्या पाऊलखुणांची चिरंतन आठवण करुन देणारी क्षमता इतिहासाशिवाय कोण्याही विषयात असू शकत नाही."[२] अशा इतिहासातील या घटनांवर काही थोर राजघराण्यांचा मोठा प्रभाव पडलेला आपणाला इतिहासाच्या अभ्यासावरुन समजते. भारतात ज्याप्रमाणे उत्तर भारतात मौर्य, शुंग, कण्व, कुशाण, गुप्त, वर्धन, राजपूत घराणे, सुलतान आणि मोगल यांनी जसे इतिहासाला मोठे योगदान दिले तसेच दक्षिण भारताच्या इतिहासात सातवाहन, वाकाटक, बदामी चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, पल्लव, चोल, चेर, पांड्य, यादव, होयसळ आदि घराण्यांनी इतिहासाला महान असे योगदान दिलेले आहे.

---

१ मोरवंचीकर रा.श्री./व्यास पी.सी., भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत), पृ.३

२ तत्रैव, पृ.१

यामध्ये आपणाला चालुक्य घराण्याच्या कालखंडात इतिहासाला विशेषतः दक्षिण भारताच्या इतिहासात यांनी आपला ठसा कशा प्रकारे उमटवला आहे याचा ही आपणाला अभ्यास करावयाचा आहे. चालुक्यांनी इतिहासाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा क्षेत्रात आपले अमुलाग्र असे योगदान दिलेले आहे. त्यामध्ये चालुक्य घराण्याच्या अनेक वंशांनी कार्य केलेले दिसून येते. त्यांचा काळ अनेक दृष्टीने महत्वाचा मानला जातो व त्यांनी इतिहासाला जे काही योगदान दिले याचा आपणाला पुढीलप्रमाणे अभ्यास करण्यास मोलाची मदत होते. चालुक्यांचे योगदान पाहण्या अगोदर त्यांची वंशावळ पाहणे गरजेचे वाटते. त्यामध्ये चालुक्यांचे एकूण चार घराणे झाले. त्यामध्ये बदामी, कल्याणी, वेंगी आणि गुजरात इ. आपल्या दृष्टीने या ठिकाणी आपण कल्याणीच्या घराण्याची वंशावळ पाहू.

**<u>कल्याणी चालुक्य वंश वृक्ष</u>**

विजयादित्य (इ.स. ६९६-७३३)

↓

भीम

↓

तिसरा किर्तीवर्मन

↓

तैलप

↓

तिसरा विक्रमादित्य


↓

दुसरा भीम

↓

अय्य

↓




वरीलप्रमाणे चालुक्य घराण्यांमध्ये आपल्या दृष्टीने महत्वाचा कल्याणीच्या चालुक्यांचा वंशवृक्ष रेखाटला आहे. या घराण्यातील राजाच्यांच काळामध्ये धर्मापुरी आणि

पानगाव येथील इतिहास घडलेला आहे. असे आपणाला येथील शिल्पलेखावरुन स्पष्ट करता येते.

## ६.१ चालुक्यांचे सांस्कृतिक योगदान -

भारताच्या इतिहासाला किंवा महाराष्ट्राच्या इतिहासाला चालुक्य राजांनी फार मोठे योगदान दिले आहे. त्यांनी राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक आदि क्षेत्रात चांगले योगदान दिलेले आहे. यांच्या सांस्कृतिक योगदानात अनेक घटकांचा आपणाला अभ्यास करावा लागतो. संस्कृतीमध्ये कला-स्थापत्य, साहित्य, पोषाख, आहार-विहार, रुढी परंपरा आदिचा अंतर्भाव होत असतो. शा.भा. देव म्हणतात, "प्राचीन परंपरांच्या आवडीतूनच विशाल मानवी संस्कृतीशी संबंध जोडण्याची जाणीवही होत चालली आहे. भारतीय इतिहासाचे उदाहरण घेतले तर हा मुद्दा जास्त स्पष्ट होईल १९४७ साली भारताची फाळणी झाल्याने पाकिस्तान आणि भारत अशी दोन राष्ट्रे निर्माण झाली. दैवयोग म्हणा किंवा काही म्हणा, या फाळणीत असे झाले की, भारताच्या वाट्याला फार मोठ्या संख्येने ईस्लामी स्मारके आले. तर पाकिस्तानात सिंधुसंस्कृतीचे व गांधार कलेचे ईस्लामेत्तर अवशेष राहिले. हे अवशेष धर्माच्या व राष्ट्राच्या मर्यादा पाळण्यापेक्षा मानवी संस्कृतीचा विशालपणा जाणून तो जपणे किती आवश्यक आहे हेच जणू या दोन्ही राष्ट्रांच्या प्रजाजनांवर ठसवीत आहेत."[३]

यावरुन संस्कृती किती महान असते व तिचे नातेही कसे अतूट असते याचा बोध आपणाला होतो. याच संस्कृतीची व्याप्ती सांगताना शा.भा. देव म्हणतात, "मानवी संस्कृतीच्या इतिहासात लिखित पुरावा उपलब्ध असलेला कालखंड फारच थोडा आहे. त्या मानाने ज्या काळात मानव होता पण त्याला लेखनाची कला अवगत नव्हती असा काळ फारच मोठा आहे. मानवी संस्कृतीचा इतिहास अत्यंत व्यापक तर आहेच परंतु त्याची कालदृष्ट्या व्याप्ती फार प्रचंड आहे. पाषाणकाल, इतिहासपूर्वकाल व इतिहासकाल हे मानवी सांस्कृतिक इतिहासाचे

---

३. देव शा.भा., पुरातत्व विद्या, पृ.८

तीन प्रमुख कालखंड कल्पिण्यात आलेले आहेत."[४] यामध्ये आपणाला इतिहास कालखंडातील सांस्कृतिक जीवन किंवा योगदानाचा अभ्यास करावयाचा आहे आणि त्यामध्ये अनेक राजघराने होऊन गेले. अशा घराण्यांच्यामध्ये चालुक्य काळातील सांस्कृतिक जीवनाचा किंवा त्यांनी दिलेल्या सांस्कृतिक योगदानाचा आपणाला अभ्यास हा करावयाचा आहे. चालुक्यांनी आपल्या काळात एवढी किर्ती प्राप्त केली होती की, त्यांच्या वंशाची अनेकांनी स्तुती केलेली आहे. त्यामध्ये त्यांच्या वंशाविषयी वा.सी. बेंद्रे काय म्हणतात, "हे चालुक्य कुल सर्व जग स्तुती करीत असलेल्या मानव्य गोत्रात उत्पन्न झालेले आहे. या चालुक्य वंशाने नलांची लक्ष्मी हस्तगत केली. कदंबांचे अवडंबर नाहीसे केले, मौर्यांना जिंकले स्वतःच्या बाहुबलाने राष्ट्रकुटांना उखडून टाकले व कलचुरींचे ऐश्वर्य खिळखिळे केले. या वंशातील ५९ राजांनी पूर्वी आयोध्येस राज्य केले. त्यानंतर १६ राजांनी दक्षिणपथावर अधिकार चालविला. दुष्टांनी कित्येक वेळा कुसंपत्ती पळविली असतानाही या वंशातील लोकांनी ती परत आणली आहे."[५] अशा प्रकारचा पराक्रम व इतिहासाला नोंद करावा लागलेला त्यांचा प्रताप अवर्णनियच आहे. असे या ठिकाणी म्हणता येते.

"कीर्तीलतेच्या अंकूराचा कांदा, लक्ष्मीच्या विलासाचे स्थान, देवीचा प्रतिनिधी, स्ववर्तनाबद्दल प्रख्यात, प्रजेचे मनहरण करणारा, असा जयसिंह नावाचा (चालुक्य कुलातील) पहिला राजा होऊन गेला. यानेच राष्ट्रकूट काळातील कृष्णाच्या इंद्र नावाच्या ८०० हत्तीचे सैन्य असलेल्या प्रसिध्द मुलाला जिंकून ५०० राजांना जाळून टाकून पुन्हा चालुक्यलक्ष्मी धारण केली त्याला ज्याने व्रात्य शत्रू त्यांचे घोडदळ व हत्तीदळ यांची युध्दाची खुमखुमी जिरविली आहे आणि त्याचे सुकृत व शिवचरण या ठिकाणी प्रेम आहे असा रणराग नावाचा मुलगा झाला. त्याचा मुलगा पुलकेशी हा कृष्णासारखा असून बदामीचा प्रथम राजा झाला."[६] अशा प्रकारे

---

४ तत्रैव, पृ.११८

५ बेंद्रे वा.सी., महाराष्ट्रेतिहासाची साधने विभाग पहिला, पृ.२६४

६ तत्रैव

चालुक्य राजांनी आपला पराक्रम गाजवला. त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रात फार मोठे योगदान दिले. याचा अभ्यास पुढीलप्रमाणे -

### ६.१.१ साहित्य

कठारे/नगराळे म्हणतात, "चालुक्य काळात संस्कृत आणि कानडी भाषेतील साहित्य अधिक प्रमाणात निर्माण झाले."[७] गंगराजा दुर्विनित हा पुलकेशी दुसरा याचा सासरा असून त्याने 'शब्दावतार' या नावाचा ग्रंथ व्याकरणावरील ग्रंथ लिहला. अमोघ वर्षाच्या 'कविराजमार्ग' या ग्रंथावरुन समजते की, दुर्विनित याने कानडी भाषेतही काही साहित्याची रचना केली होती. अचलदर याने भरताच्या नाट्यशास्त्रावर काही रचना केली होती. राणी विजय भट्टारिका ही प्रसिध्द कवयित्री होती. "श्रीवरदेव या प्रसिध्द साहित्यीकाने 'चुडामणी' हा ९६००० श्लोकांचा एक ग्रंथ लिहला"[८] चालुक्य दरबारातील कवी राण्णाचे 'अजिनाथ पुराण' व गदायुध्द, चालुक्य नरेश सोमेश्वर तिसरा याचा 'मानसोल्लास' बिल्हणाने विक्रमाकदेव चरित्र, तर ख्यातनाम विद्वान विज्ञानेश्वराने 'मिताक्षरा' नावाचा ग्रंथ लिहला. अशा प्रकारे चालुक्यांच्या काळातील साहित्याची निर्मिती झालेली दिसते. त्यावरुन त्यांच्या सांस्कृतिक योगदानावर प्रकाश टाकता येतो. त्याचबरोबर चालुक्यांच्या काळातील अनेक शिलालेखांवर व ताम्रपटावरही अलिकडच्या काळात प्रकाश टाकण्यात आलेला आहे. त्यामध्ये धर्मापुरी येथील शिलालेखांवरही प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

### ६.१.२ कला

चालुक्य काळात धर्माच्या विकासाबरोबरच कला क्षेत्रातही अभूतपूर्व विकास झ ाला. चालुक्य सम्राटांनी कलेला धर्माच्या अभिव्यक्तीचे साधन मानल्यामुळे या क्षेत्रात विकास झाला. ऐहोळ बदामी, पट्टदकल, महाबलीपूरम ही चालुक्य काळातील कलांची प्रमुख केंद्रे होती. या काळात द्रविडी आणि नागर शैलीची अनेक मंदिरे बांधण्यात आली. ऐहोळ या

---

७ कठारे/नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, पृ.११२

८ तत्रैव.

ठिकाणी सत्तर मंदीराचे प्राचीन अवशेष मिळाले आहेत. चालुक्यकालीन मंदिरावर उंच उंच शिखरे होती. काही मंदिरांची छते, सपाट असत मंदिरामध्ये गर्भगृह असे आणि मंदिरासमोर मंडप असे. "बदामी येथील दुर्गामंदिर (विष्णू व सूर्यमंदिर) तारबसप्पा व हुचिमलगुडी मंदिर, पट्टदकल येथील पापनाथ मंदिर समूह व कलेश्वर शिवमंदिर, लकुंडी येथील जैनमंदिर, बदामी जवळील मालेगिरी टेकडीवरील शिवालय मंदिर, बदामी येथील विष्णू मंदिर (लेणी क्र. ३) व ऐहोळ जवळील रावणफाडी शिवमंदिर ही सर्व मंदिरे चालुक्यांच्या काळातील असून काही नागर शैलीची तर काही द्राविडी शैलीची आहेत."[९]

आर्य शैलीतील पापनाथ मंदिर (पट्टदकल) आणि द्रविड शैलीतील विरुपाक्ष मंदिर (पट्टदकल) ही मंदिरे चालुक्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहेत. विक्रमादित्य दुसरा याने पल्लवांविरुध्द विजय मिळविला. त्यामुळे विरुपाक्ष (लोकेश्वर) मंदिराची बांधणी पट्टदकल या ठिकाणी सुरु केली. परंतु याला मंदिराचे काम पूर्ण करता आले नाही. तेव्हा त्याची राणी लोकमहादेवीने मंदिराचे काम पूर्ण केले. "वेरुळ येथील कैलास मंदिराची रचना विरुपाक्ष मंदिरासारखीच आहे."[१०] चालुक्यांच्या काळात मूर्तिकलेचाही विकास चांगलाच झाला होता. बदामी येथील लेणी क्र. ३ मधील आकाशगामी गंधर्वयुग ही दख्खनच्या कलाकृतीपैकी वैशिष्ट्य पूर्ण एक कृती आहे. बदामी येथील लेणीतील वामनावतार, नृसिंह मूर्ती सुंदर आहेत. ऐहोळ येथील मंदिरातील विष्णूची मूर्ती, वृषभवाहन शिवमूर्ती, महिषासुरमर्दिनी, वेरुळ येथील गजलक्ष्मी मूर्ती ले.क्र. १४) दशावतार लेणीतील नृसिंह मूर्ती, कैलास लेणीतील कैलासोध्दरण मूर्ती, धुमार लेणीतील शिवपार्वती विवाह, सरिता मंदिरातील गंगा, यमुना व सरस्वतीच्या मूर्ती व घारापूरी येथील (एलिफंटा) त्रिमुर्ती (महेशमूर्ती) ही चालुक्यकालीन मूर्ती कलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

---

९ तत्रैव

१० तत्रैव

"चालुक्यकालीन चित्रकलेचे अवशेष बदामी, वेरुळ आणि अजिंठा येथील लेण्यात पहाण्यास मिळतात. बदामी येथील "शिवपार्वती विवाहाचे' चित्र सर्वप्रसिध्द आहे."[११] चालुक्य कालीन चित्रकलेची परंपरा व अजिंठा चित्रकलेची परंपरा यामध्ये बरेच साम्य दिसते. अजिंठा लेणीमध्ये पुलकेशी दुसरा फारशी राजदुताचे स्वागत करीत असल्याचे चित्र रेखाटले आहे. चालुक्य कलेचे हे एक आगळे व वेगळे असे वैशिष्ट्ये होते.

उत्तर चालुक्य कलेचे इ.स. च्या ११ व्या शतकातील टप्पे नांदेड, लातूर व उस्मानाबाद या दक्षिण मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये दिसून येतात. जामखेडकर म्हणतात, "या भागातील मंदिरे स्थापत्यदृष्ट्या उत्तर कर्नाटकातील मंदिराशी मिळती जुळती आहेत."[१२] त्यातील आकृतीशिल्पे स्तंभाच्या वर आणि मंडोवरावर, वास्तवाकाराहूनही मोठ्या असलेल्या महाकाय प्रतिहारमूर्ती गर्भगृहाच्या द्वाराच्या दुतर्फा आणि मूर्तीशिल्पे मंडपाच्या किंवा गर्भगृहाच्या बाह्यांगाच्या जंघा भागावर आढळतात. तुलापट व खांब यांना जोडणारी आधार शिल्पेही या मंदिरामध्ये आढळतात.

"या कलापरंपरेतील मनुष्याकृतीशिल्पे चांगलीच गुबगुबीत आणि मांसल आहेत. शरीरावयवांचा गुबगुबीतपणा इतका भरीव आहे की, शरीराचा सांगाडा सुचित करणारे अस्थिसंगत स्नायू आणि हाडांचा भाग या आसण भागाखाली पुरेपूर झाकला गेला आहे."[१३] अशा प्रकारच्या मूर्ती मराठवाड्यात आणि महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी दिसून येतात. धर्मापुरी, पानगाव, होट्टल, सिन्नर आदि ठिकाणी चालुक्यांचे अवशेष सापडतात. "धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिरावरील वामन आणि बली, राक्षसाला मारणारा विष्णू हे कथापर पट आणि मिथुनादि शिल्पे उत्तरचालुक्य शिल्पशैलीचे व्यवच्छेदक नमुने आहेत."[१४] तसेच पानगाव येथील

---

११ तत्रैव, पृ.११३
१२ जामखेडकर अ.प्र., स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, पृ.२०८-२०९
१३ तत्रैव, पृ.२०९
१४ तत्रैव

विठ्ठल मंदिरावरील शिल्पेही कलेचा अद्वितीय असाच अविष्कार आहेत असे आपणाला म्हणता येते. अशा तऱ्हेने कलेच्या क्षेत्रातही चालुक्यांनी चांगले योगदान दिलेले दिसून येते.

### ६.१.३ धार्मिक वातावरण

चालुक्य राजे हे धार्मिक सहिष्णुवृत्तीचे होते. सर्व राजे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते. तरीही त्यांनी इतर धर्मीयांचा छळ केला नाही किंवा इतर धर्माच्या विकासात अडथळा निर्माण केला नाही. अ.शं. पाठक म्हणतात, "उपलब्ध अभिलेखांद्वारे प्राप्त झालेल्या माहितीवरुन सर्व धर्म समभाव हे प्रमुख वैशिष्ट्ये दिसते."[१५] निरनिराळ्या राजवंशाच्या लेखांत प्रारंभिच निरनिराळ्या देवांना वंदन व आवाहन करण्याची जी पध्दती स्वीकारलेली आहे. त्यावनरुनही हीच गोष्ट सिध्द होते. या पध्दतीच्या अवलोकनाला बदामीच्या चालुक्य वंशीय राजांच्या कोरीव लेखांपासून प्रारंभ करता येईल. "या वंशाच्या बहुतेक लेखांचा प्रारंभ विष्णुच्या वराह अवताराच्या आवाहनाने होतो."[१६] परंतु या घराण्याचे सभासद वेगवेगळ्या धर्मानुसार आचरण करण्यास स्वतंत्र होते.

उदा. राजा पुलकेशी प्रथम हा वैदिक यज्ञविधी करणारा होता. परंतु त्याने मकुटेश्वर शिवाचे मंदिर बांधले होते. या काळातील प्रजा सुध्दा वैदिक धर्माची अनुयायी होती. अनेक राजांनी वैदिक धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे यज्ञ केले होते. चालुक्य राजांनी ब्राम्हणांना तसेच बौध्द आणि जैन मंदिरांना देणग्या दिल्या. अनिल कठारे म्हणतात, "औरंगाबाद येथील बौध्द लेणी क्र. ३, ९, १०, ११, १२ या बदामीच्या चालुक्य कालखंडात खोदण्यात आल्या."[१७] तत्कालीन लोक हे ब्रम्हा, विष्णु आणि महेशाची पुजा करीत असत. या देवतांच्या मूर्तीची स्थापना बदामी, पट्टदकल आणि ऐहोळ या ठिकाणी मंदिरे बांधून केली आहे. भगवान विष्णूचीही अवताराच्या रुपाने उपासना केली जात होती. धर्मापुरी आणि पानगाव येथे विष्णूचे अनेक अवतार आढळून येतात.

---

१५ पाठक अ.शं. (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड I), महाराष्ट्र गॅझेटिअर, पृ.६७४

१६ तत्रैव

१७ कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य (खंड II), पृ.४२

या काळात जैन धर्माचाही विकास झाला. ऐहोळ अभिलेखाचा रचनाकार रवी कीर्ती हा जैन धर्मावलंबी होता. विजयादित्य व विक्रमादित्य या राजांनी जैन भिक्षूंना अनेक गावे दान दिली होती. धर्मापुरी येथेही उत्तरकालीन चालुक्यांनी जैन धर्माला राजाश्रय दिलेला दिसून येतो. एकाच कालखंडात या ठिकाणी हिंदू मूर्तीशिल्प आणि एकीकडे जैन मूर्तीशिल्प निर्माण झालेले दिसून येतात. र.स. बोरकर म्हणतात, "धर्मापुरी (प्राचीन नाव धर्मपुरी) धर्माची पुरी हे छोटे गाव या गावात आणि परिसरात प्राचीन भारतीय संस्कृतीचा बहुमूल्य ठेवा असलेले कल्याणीच्या चालुक्य काळातील अनेक शिल्प आणि अवशेष बघावयास मिळतात."[१८] यावरुन चालुक्य राजवंशातील लोक धार्मीक दृष्टीकोनातून समतेचे पुरस्कर्ते असलेले दिसून येतात.

## ६.१.४ कुटुंबव्यवस्था

प्राचीन मराठवाड्यात व भारतात संयुक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात होती. एकाच कुटुंबात पती, पत्नी, भाऊ, बहिण, त्यांची मुले-मुली, आजोबा व आजी राहत होते. समाजात पितृसत्ताक कुटुंबपध्दती अस्तित्वात होती. पिता हाच संपूर्ण कुटुंबाचा कर्ता व स्वामी होता. त्याला गृहपती असते म्हणत. कुटुंबातील सर्व सदस्यांवर त्याचे नियंत्रण असे. कुटुंबातील सर्व सदस्याच्या पालनपोषणाची जबाबदारी गृहपती वर येत असे. एकाच कुटुंबात जवळपास तीन पिढ्यांपर्यंतचे लोक राहत असत आणि पित्याला कुटुंबाबाबतचे असिमीत अधिकार असत. असा उल्लेख ऋग्वेदात येतो. हीच आवस्था इ.स. १००० पर्यंतची होती. गृहप्रमुख हा आपल्या पत्नीच्या आणि कुटुंबातील इतर सदस्यांच्या मदतीने सामाजिक व धार्मिक कार्य पार पाडत होता.

कुटुंबात माता-पित्याचा आदर केला जाई. पिता व पुत्र यांच्यातील संबंध स्नेहपूर्ण असत. पित्याप्रमाणेच मातेचाही कुटुंबावर अधिकार चालत असे. अ.शं. पाठक म्हणतात "या काळात एकत्र कुटुंबपध्दती प्रीय होती. भिन्नभिन्न राजवंशातील राजांनी दिलेल्या प्रशस्ती लेखांतील नातेवाईकांचा उल्लेख तसेच सर्व कुटुंबघटकांना पुण्य मिळावे म्हणून दिलेल्या दान

---

१८ बोरकर र.रा., धर्मापुरी येथील जैन शिल्प, पृ.१९०

राजांच्या लेखांतील उल्लेखही हेच सांगतात. भावाभावामध्ये उत्कट प्रेम असल्याचेही बदामीच्या चालुक्य राजांचा बदामी येथील वैष्णव शैलगृहातील लेख व महाकूट स्तंभ लेखातील वर्णनावरुन दिसून येते. धार्मिक समारंभ नेहमी पूर्ण कुटुंबाच्या समृध्दीकरिता केले जात."[१९] समाजात कुटुंबपध्दती संयुक्त असली तरी उत्तर वैदिक काळातच कुटुंबात कौटुंबिक समस्यांवरुन संघर्ष निर्माण झाले होते. त्यामुळे उपनिषद व सूत्रकाळात संयुक्त कुटुंब पध्दतीच्या विघटनास प्रारंभ झाला. अशा प्रकारे आपणाला कुटुंबपध्दतीचा अभ्यास करता येतो.

### ६.१.५ स्त्रियांची परिस्थिती

"सर्व स्मृती, पुराणे आणि सारग्रंथामध्ये पत्नीची कर्तव्य अगदी सविस्तर सांगितली आहेत."[२०] पती हा पत्नीसाठी परमेश्वर आहे. असे मत व्यक्त केले आहे. पत्नीचे तिच्या पतीच्या सबंधात आलेले स्थान पुराणामध्ये दिलेल्या पतिव्रता या संज्ञेच्या व्याख्येमुळे स्फटिकाप्रमाणे स्वच्छ आहे. उदा. पद्म पुराणातील सृष्टी खंडामध्ये असे म्हटले आहे की, जी पत्नी गुलामाप्रमाणे काम करते, गणिकेप्रमाणे लैंगिक सुख देते, मातेप्रमाणे पतीच्या भोजनाची काळजी घेते आणि अडचणीच्या प्रसंगी त्याला योग्य तो सल्ला देते, ती स्त्री पतिव्रता होय. पतीबरोबरच तिने त्याचे माता-पिता आणि इतर नातलगांची सेवा करावी अशी अपेक्षा असे. तत्कालीन समाजात हे नियम अस्तित्वात होते आणि पत्नीकडून या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन घेण्यात येई. पतीशिवाय तिला वेगळे व्यक्तिमत्व नव्हते. "आलमपूर प्रशस्तीमध्ये चालुक्य राजा विजयादित्य याच्या राणीचे वर्णन त्या दृष्टीने पुरेसे बोलके आहे."[२१] परंतु प्राचीन मराठवाड्यातील समाजात आणि कुटुंबात स्त्रियांना सन्मानाचे स्थान होते. त्यांना पुरुषांची अर्धांगिणी समजले जात असत. कवि कालिदासाच्या 'कुमार संभव' या ग्रंथात कन्येला कुटुंबाचा प्राण म्हटले आहे. शिक्षणाचा अधिकार मात्र श्रीमंत घरातील स्त्रियांनाच होता स्त्रियांना समाजिक व धार्मिक उत्सवात पतीबरोबर भाग घेता येत असे.

---

१९ पाठक, अ.शं. (संपा.), पूर्वोक्त, पृ.६३४
२० तत्रैव, पृ.६३५
२१ तत्रैव

सातवाहन राजा सातकर्णी पहिला याची पत्नी नागनिका हिने पतीबरोबर प्रत्येक यज्ञ अनुष्ठानात सहभाग घेतला होता. वाकाटक राजा रुद्रसेन दुसरा यांची राणी प्रभावती गुप्ता ही उत्कृष्ट प्रशासक होती. कठारे व नगराळे म्हणतात, "सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट व चालुक्य काळात विदवा विवाह पध्दती, सती प्रथा, पडदा पध्दती, बालविवाह आणि बहूपत्नीत्वाची पध्दती अस्तित्वात होती."[२२] स्त्रिया विवाह तरुण वयात केला जात असे. स्वयंवर प्रथा प्रचलित होती. आपल्या पतीची उपेक्षा करणाऱ्या स्त्रियांसाठी याज्ञवल्क्याने व कौटिल्याने नाक व कान कापण्याची शिक्षा फर्माविली तर मनूने मृत्यूदंडाची शिक्षा फर्माविली हीच परिस्थिती यादव काळापर्यंत होती. समाजात हुंडा पध्दती होती. मुलगी जन्माला येणे दुःख समजले जात असे.

चालुक्यांच्या काळात मात्र स्त्रिया या बहुतांशी स्वतंत्र असाव्यात असे आपणाला उत्तरकालीन चालुक्य कलेवरुन म्हणता येते. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी स्त्रियांच्या मोठ्या प्रमाणात प्रतिमा सापडतात. नृत्य करणाऱ्या स्त्रिया वेगवेगळ्या कलांमध्ये स्थान असलेल्या स्त्रिया तसेच स्त्री ही त्यांच्या काळात शिक्षण घेत असावी याचा दाखला आपणाला धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिरावरील एक स्त्री दक्षिण बाजूला पाटमोरी होऊन एक शिल्पपट कोरत असलेले शिल्प पहायला मिळते. यावरुन स्त्रियांना समाजात मानाचे स्थान असावे असे आपणाला म्हणता येईल.

### ६.१.६ अलंकार व सौंदर्य प्रसाधने -

अलंकार आणि सौदंर्य प्रसाधने ही स्त्री पुरुषांच्या सौंदर्यात भर टाकणारी महत्वाची साधने आहेत. प्राचीन मराठवाडा व भारतातील स्त्री पुरुषांना अलंकार व सौंदर्य प्रसाधने वापरण्याची फार आवड होती. वैदिक काळातील स्त्री पुरुषांचे अलंकार समान होते. ते दोघेही विभिन्न प्रकारचे स्वर्णद्वार, पुष्पहार, कानातील कुंडले, निष्क (गळ्यात घालण्याचा दागिणा), कर्णफुले, छातीवर घालण्याचा 'रुक्मा' नावाचा दागिणा, डोक्यावर (माथ्यावर घालण्याचा) 'कुटीर' नावाचा दागिणा, नुपूर, अंगठी, गजरे, पैंजन, बांगड्या, भुजबंध घालत असत.

२२ कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.१२४

स्त्री पुरुष दोघेही केस वाढवित असत. पुरुष मिशा व दाढी ठेवत. स्त्रिया केसाला तेल लावून वेणी व अंबाडा घालत. स्त्रिया ओठांना लाल रंग लावत "प्राचीन मराठवाडा व भारतातील लोक सोने, चांदी व शंख-शिंपल्या पासून व मोती हिऱ्यापासून बनविलेले विभिन्न प्रकारचे दागिणे वापरत असत. स्त्रियांना लांब केसांची आवड होती. त्या अंजन, अंगसग, लैपन व सुवासिक शृंगार सामग्रीचा सौंदर्य प्रसाधने म्हणून वापर करीत असत."[२३] स्त्री पुरुष अनेक प्रकारची केशरचना करीत असत. सौभाग्याचे प्रतिक म्हणून स्त्रिया आपल्या भांगात सिंदूर भरत "वात्सायनाने आपल्या कामसुत्रात म्हटले आहे की, स्त्रियांनी दागदागीने वापरणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच स्त्रीने नेहमी सुंदर वस्त्र व अलंकार घालून सुसज्जित होऊन पतीसमोर असले पाहिजे."[२४]

लोक प्राण्यांच्या कातड्यांपासून बनवलेले जोडे घालीत असत कातड्यास पिवळा, लाल, निळा, भुरा व काळा रंग देण्यात येऊन त्याचे चप्पल, जोडे व स्लीपर बनवित. श्रीमंत लोक आपल्या जोड्यात रत्न बसवित असत. गरीब लोक मात्र पत्रे व लाकडाच्या चपला वापरीत असत. बांगड्या, मणी, ताईत, पायातील पैंजन, कर्णफुले, दृष्टमणी व अंगठी यासारके विविध प्रकारचे अलंकार स्त्री-पुरुष वापरीत असत. केशरचनेसाठी हस्तिदंताचे कंगवे व फण्या वापरत असत. चालुक्यांच्या काळातही यातील अनेक दागिने त्यांच्या कलेमध्ये असलेले दिसून येतात. ज्या दागिने व सौंदर्यप्रसाधनांमुळे त्यांची शिल्पे ही अधिक सुंदर आणि उठावदार दिसत आहेत. धर्मापुरी आणि पानगाव याला अपवाद नाहीत.

### ६.१.७ आहार विहार व पोषाख

अ.शं. पाठक म्हणतात, "या काळातील समाज अंशतः शाकाहारी व अंशतः मांसाहारी होता. पश्चिम भारतातील ब्राम्हण पूर्णपणे शाकाहारी होते. तर क्षत्रिय, वैश्य व शुद्र हे मांसाहारी होते. तांदूळ हे प्रमुख खाद्यान्न होते लोकांना तांदळाचे निरनिराळे पदार्थ बनविण्याचे

---

२३ तत्रैव, पृ.१२५
२४ तत्रैव

ज्ञान होते."[२५] ज्वारी हे या काळातील दुसरे प्रमुख धान्य होते. याशिवाय धान्याच्या अन्य जाती उदा. बाजरी, नाचणी उपलब्ध होत्या. आढकी, मसूर, मुग, उडीद या डाळींची आमटी करीत खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी तीळ, नारळ, करडईपासून काढलेली तेले वापरीत. पदार्थ चविष्ट बनविण्यासाठी मीठ, मिरे, वेलदोडे या वस्तुंचाही उपयोग होत असे. गोड पदार्थ बनविण्यासाठी साखर व गुळाचा उपयोग होत असे. पूरक आहार म्हणून दुधाचे वेगवेगळे पदार्थ, भाज्या, फळे यांचा उपयोग करण्याचा प्रघात होता. धर्मापुरी या ठिकाणच्या बाजारातही अशा पदार्थाचा बाजार भरत असे. भगवान काळे म्हणतात, "विड्यांच्या पानांची दुकाने, भाजीमंडई, फळबाजार, तांदूळ किंवा धान्यबाजार, सुपारी बाजार, तुपाचा बाजार, तेली बाजार, आंब्याच्या आठ्याची पेठ, इतर धान्य बाजार"[२६] अशा अनेक प्रकारच्या पदार्थांच्या बाजारातून तत्कालीन समाज हा आहार विहारांच्या गरजा भागवत असे. आहारासोबतच तत्कालीन पोषाखाचाही विचार करावा लागेल.

भारहूत, सांची, कार्ले, वेरुळ, औरंगाबाद, अजिंठा, धाराशिव, भाजे व बेडसा येथील लेणीतील शिल्पांवरुन किंवा औंढा नागनाथ मंदिर, होट्टलचे मंदिर, बीड कंकालेश्वराचे मंदिर, निलकंठेश्वर निलंगा मंदिर, धर्मापुरीची मंदिरे तसेच पानगावची मंदिरे आदि ठिकाणच्या शिल्पांचा अभ्यास केल्यास तत्कालीन वेशभुषा व केशभूषेची माहिती मिळते. पुरुष फेट्यासारखे उष्णीय आणि कमरेखाली धोतर नेसत असत. दरबारातील पुरुष बंदिस्त अंगरखा आणि तंत्र पायजमा घालीत असत. पुरुष डोक्यावर शिरस्त्रान वापरित असत. स्त्रिया कमेरच्या वरील उत्तरीय म्हणजे ओढणीसारखे वस्त्र आणि कमरेखाली लुंगीसारखे वस्त्र वापरीत असत. याशिवाय चोळी, साडी, कंचुकी व पायजमा घालीत असत. स्त्रिया विविध प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण केशरचना करीत असत. त्या आधुनिक स्त्रियांप्रमाणे वेणी घालत असत. असे म्हणता येईल की, प्राचीन काळातील स्त्रियांच्याच प्रमाणे आधुनिक काळातील स्त्रिया ह्या वेणी

---

२५ पाठक अ.शं. (संपा), पूर्वोक्त, पृ.६३८.

२६ काळे भगवान, मराठवाडा काल आणि आज, पृ.६८

घालतात. त्याचेच पाहून हा पोषाखही काही अंशी परिधान करीत आहेत. म्हणजे तत्कालीन स्त्री ही आजच्या स्त्रियांना मार्गदर्शकच म्हणावी लागेल.

### ६.१.८ शिक्षण आणि मनोरंजनाची साधने

चारित्र्यसंवर्धन, व्यक्तिमत्वाचा विकास, कर्तव्यपरायणता आणि संस्कृती संवर्धन ही प्राचीन काळातील शिक्षणाची उद्दिष्ट्ये होती प्राचीन काळात पाठांतर पध्दतीने 'गुरुगृही' शिक्षण देण्यात येत असे. कठारे/नगराळे म्हणतात, "पदपाठ, सुत्रपाठ, जयपाठ व धनपाठ अशा पाठांतराच्या चार पध्दती होत्या. गुरु मौखिक व चिंतनपर अशा दोन अध्यापन पध्दतीचा अवलंब करीत वेद, ब्राम्हण्य, आरण्यके, उपनिषदे, वेदांगे, गणित, इतिहास, भूगोल, खगोलशास्त्र, ज्योतिष्यशास्त्र, पुराणे, नीतीशास्त्र, व्याकरण व भाषाशास्त्र या विषयाचे शिक्षण देण्यात येत असे."[२७] ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्यांना शिक्षणाचा अधिकार होता. ब्राम्हण विद्यार्थ्यास वरील सर्व विषय शिकविले जात. क्षत्रियांना वरील विषयांशिवाय अन्विक्षिती, वार्ता व दंडनितीचा अभ्यास करावा लागे. वैश्य विद्यार्थ्यांना वरील शिक्षणाशिवाय आपल्या व्यवसायाचेही शिक्षण दिले जात असे.

सातवाहन काळात उस्मानाबादजवळील तेर, जालना जिल्ह्यातील भोकरदन, औरंगाबादमधील पैठण, जुन्नर, नाशिक, कऱ्हाड ही शिक्षणाची केंद्रे होती. राष्ट्रकुट काळात कंधार, नांदेड व लातूर ही केंद्रे होती. तर चालुक्यांच्या काळात उस्मानाबाद, तेर, नांदेड, कंधार ही शिक्षणाची केंद्रे होती. धर्मापुरी देखील चालुक्य काळात शैक्षणिक केंद्र होती. हे पुराव्यावरुन सांगता येते.

प्राचीन काळातील समाजाला विविध मनोरंजनाच्या साधनाद्वारे मनोरंजन करुन घेण्याची आवड होती. मनोरंजनाची साधने विविध प्रकारची होती. नृत्य, संगीत, शिकार करणे, रथदौड, द्युतक्रीडा, जुगार खेळणे, मल्लयुध्द, गायन, ढोल, झांज, मृदंग, विना, बासरी, शंख, पशुच्या लढाई, जलक्रिडा, झोके खेळणे आदि साधनांद्वारे मनोरंजनाची गरज भागवित असत.

---

२७ कठारे/नगराळे, पूर्वोक्त, पृ.१३०

"स्त्रिया - रंग शिंपडणे, गायन, वादन, नाचगाणी, फुगडी, सोंगट्या, गंजीफा, सारीपाट, लपंडाव यासारखे खेळ खेळत असत."[२८] समाज हे मनोरंजनाचे महत्वाचे साधन होते. समाज हा लोककलेचा अविष्कार होता. चालुक्य काळातील अशा मनोरंजनाच्या साधनांचा अविष्कार आपणाला धर्मापुरी व पानगाव येथील कलेत उमटलेला दिसतो. येथील शिल्पांत नृत्य, बासरी, मृदंग, विना, शंख अशा साधनांचा शिरकाव झालेला दिसतो. कलेची निर्मितीही मानवाला आनंद देते. कला हिच मुळात अनेक प्रकारे मानवाला सुख देते. समाज हा कलेकडे काही अंशी मनोरंजनातूनही पहात असतो अशा प्रकारे चालुक्यांनी कलेमधून व शिल्पांतून सांस्कृतिक ठेवा अजरामर केलेला दिसून येतो.

## ६.२ चालुक्यांची शिल्पकला इतिहासाला आधार (साधन)

शिल्पकला ही कोण्याही राजघराण्यांच्या काळातील असो ती इतिहासाचा आधार बनत असते. अर्थातच साधन म्हणता येईल साधनाशिवाय हा इतिहास होऊच शकत नाही. म्हणून असे म्हटले जाते की, "No document no history" इतिहासाची पाने रंगवण्यासाठी अनेक भौतिक व वाङमयीन साधनांचा अभ्यास आपणाला डोळ्यांत तेल घालून करावा लागतो. भौतिक साधनांना पुरातत्वीय किंवा अलिखित साधने म्हणून ओळखले जाते. प्राचीन काळातील इतिहास ज्ञात करुन घेण्यासाठी भौतिक साधनांचे महत्व संशोधकांना अलिकडेच पटले आहे. भौतिक साधनांतील बहुतेक साधने ही घटनास्थळाच्या ठिकाणीच सापडतात. त्यामुळे वाङमयीन साधनांपेक्षा त्यांच्यावर अधिक विसंबून राहिले तरी चालते.

सोमनाथ रोडे म्हणतात, "भूतकाळात वापरलेल्या या असंख्य वास्तू, किल्ले, मंदिरे, लेण्या आदि तसेच मूर्तिशिल्प, शिलालेख, नाणी, तसेच मातीची भांडी, खापरे या सर्वांनाच पुरातत्वीय साधने म्हणून ओळखले जाते."[२९] या सर्व पुरातत्वीय वास्तूंचा, साधनांचा अभ्यास इतिहासात केला जातो. यांच्याशिवाय वस्तुनिष्ठ इतिहास हा होऊच शकत नाही.

---

२८ तत्रैव, पृ.१३१

२९ रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास (१९६० पर्यंत), पृ.८

असेच आपणाला म्हणता येते. अश्मयुगीन मानवापासून ते गुप्त सातवाहन कालखंडापर्यंतच्या मानव समुहाविषयी बरीच माहिती उत्खननातून उपलब्ध झालेल्या अवशेषांच्या आधारे मिळाली आहे. उत्खननातून जे हाडांचे सांगाडे सापडतात, त्याचे कार्बन १४ प्रक्रियेद्वारे कालमापन निश्चित केले जाऊ शकते. उत्खननात सापडणारी मातीची भांडी किंवा खापरे ही इतिहासकांच्या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून महत्वाची मानली जातात. भांडी व खापरांप्रमाणेच उत्खननात सापडलेल्या विविध वस्तू, दागदागिणे, धान्यांचे कण, बांधकामाचे अवशेष, मूर्तिशिल्प, हस्तिदंत या सर्व गोष्टी इतिहास लिहण्यासाठी महत्वाच्या मानल्या जातात. "मराठवाड्याच्या इतिहासाच्या दृष्टीने अलिकडेच तेर, पैठण, भोकरदन, कंधार, मुंगी पैठण, चारठाणा, येथे उत्खनन झाले, त्यातून सातवाहनकालीन, राष्ट्रकुटकालीन आणि चालुक्यकालीन अवशेष उपलब्ध झाले आहेत."[३०] या उत्खननात उपलब्ध झालेल्या विविध साधनांच्या आधारे प्राचीन काळातील मानवाच्या वाटचालीचा इतिहास रेखाटण्यास मोलाची मदत होते हे तेवढेच खरे. उत्खननाद्वारे इतिहासातील किंवा इतिहास काळातील अनेक नवीन किंवा अज्ञात दुवे उघडकीस येऊन इतिहासातील योग्य अशी क्रमवारी लावण्यास मोलाची मदत होत आहे. परंतु बहुतांशी शिल्पकला ही जमीनीवरच आहे जी की अनेक गावात किंवा खेड्यापाड्यात विखूरलेली आहे. तिचा देखील सुगावा अद्याप पुरातत्व खात्याला लागलेला दिसत नाही. मग अशा अज्ञात स्थळांचे कधी संशोधन होणार असा सामान्य वाचकासमोर प्रश्न उभा राहतो. यासाठीच आपणही अशा अज्ञात स्थळांची संशोधनासाठी निवड केलेली आहे. अशाच स्थळांची इतर संशोधन कर्त्यांकडूनही निवड होणे गरजेचे आहे.

के.दे. कावडकर म्हणतात, "सात वाहनानंतर वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट व यादव या राजवंशांच्या कारकीर्दित ही मराठवाड्याचे बरेच महत्व होते. नावलौकिक होता."[३१] वाकाटकांच्या राज्यकाळातच अजिंठा येथील काही विश्वप्रसिध्द लेणी कोरली गेली. तसेच

---

३० तत्रैव, पृ.९

३१ कावडकर के.दे., ऐतिहासिक स्मारके, अवशेष पुरातत्वीय स्थळांच्या रुपाने, पृ.४८

राष्ट्रकुटाच्या राज्यकाळातच वेरुळ येथील अद्वितीय कैलास लेणे अस्तित्वात आले. हे राष्ट्रकुट राजे स्वतःस लत्तलूर (वर्तमान लातूर) यास आपल्या राजवंशाचे मुलस्थान म्हणून स्वीकारल्यास गौरवान्वित अनुभव करतात. याच भागातील धारुर व कंधार ही ठिकाणेही राष्ट्रकुटांची सत्ताकेंद्रे म्हणून प्रसिध्द आहेत. या विषयीचे उल्लेख राष्ट्रकुटांच्या अनेक शिलालेख व ताम्रपटांतून आढळून येतात. "बीड जिल्ह्यातील धर्मापुरी व नांदेड जिल्ह्यातील होट्टल ही ठिकाणे तेथे सापडलेल्या चालुक्य शासकांच्या शिलालेखांनुसार प्रसिध्दी प्राप्त झालेली होती."[३२] येथे उभी असलेली मंदिरे व शिल्पे ही आजही इतिहासाची साक्ष देतात. जनू ती आपली अर्थात अभ्यासकांची किंवा संशोधकाची वाटच पाहत उभी असतात. असेच प्रथमदर्शनी निदर्शनास येते. कोणी म्हणेल की, हे खोटे आहे. साहित्य आहे किंवा कल्पनाविलास आहे. परंतु यासाठी हाडामासाचाच इतिहासकार किंवा संशोधक हा लागतो आणि त्याच्या डोळ्यांत ऐतिहासिक दृष्टीच त्यांना ही शिल्पकला इतिहासास कशी अनुकूल असते हे समजल्याशिवाय राहणार नाही. चालुक्यांच्या काळातील कला ही जतन करणे गरजेचेच आहे. त्याचबरोबर भारतातीलसर्वच प्रकारच्या प्राचीन कलांचे जतन होणे गरजेचे आहे. हा वारसा प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या मानवीय जीवनातील विविध क्षेत्रांच्या निरंतर विकासाचे प्रत्यक्ष प्रमाण असल्याकारणाने त्याचे जतन होणे प्रत्येक राष्ट्राचे परमकर्तव्य आहे. "ही जाणीव लक्षात घेऊन मागील शतकापूर्वीच तत्कालीन ब्रिटिश सरकारने भारतातील प्राचीन ऐतिहासिक स्मारकांच्या अवशेषांच्या तसेच पुरातत्वीय स्थळांच्या संरक्षणार्थ संपूर्ण देशाकरिता केंद्रीय पुरातत्व विभागाची स्थापना केली आणि एक कायदा 'प्राचीन स्मारक कायदा' संरक्षण अधिनिम १९०४ अंमलात आणला."[३३]

या कायद्यानुसार भारतातील अत्यंत महत्वाच्या ऐतिहासिक स्मारके व अवशेषांना पहिल्यांदाच "राष्ट्रीय संरक्षीत स्मारक' म्हणून घोषीत करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात

---

३२ तत्रैव

३३ तत्रैव, पृ.५०

भारत सरकारने १९५८ साली जुना कायदा संशोधित करुन प्राचीन स्मारके पुरातत्वीय स्थळे व अवशेष अधिनियमन १९५८ अंमलात आणला. तत्कालीन ब्रिटीश सरकारचे या देशातील प्राचीन वारसाचे जतनविषयक धोरण देशातील काही राज्याकरिता बरेच प्रेरणादायी ठरले. परिणामतः आपापल्या राज्यांतील ऐतिहासिक स्मारकांचे व इतर अवशेषांचे महत्व समजून काही प्रांतीय सरकारांनी सुध्दा त्या त्या राज्यात राज्य पुरातत्व विभागांची स्थापना केली व प्रांतीय सरकारांनी प्राप्त अधिकारात याविषयीचे कायदे करुन अंमलात आणले.

"त्यानुसारच तत्कालीन हैद्राबाद निजाम सरकारने 'हैद्राबाद प्राचीन स्मारके संरक्षण कायदा, १९३७ फसली' हा कायदा पारीत केला व त्यानुसार केंद्र (भारत) सरकारने संरक्षीत केलेले राष्ट्रीय स्मारक अवशेष वगळून तत्कालीन निजाम हैद्राबाद राज्यातील इतर महत्वपूर्ण स्मारक व अवशेष संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले."[३४] यात मराठवाड्यातील सुमारे १५० स्मारके, प्राचीन अवशेष आणि पुरातत्वीय साधनांचा समावेश आहे. पुढे वर्षे १९५६ साली मराठवाडा हा पूनर्गठीत महाराष्ट्रात संमीलीत झाल्यानंतर ही तथाकथित संरक्षित स्मारके ही सांस्कृतिक वारस्याच्या रुपाने निजामाकडून महाराष्ट्राला मिळाली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वतःचे संविधान (घटना वर्ष १९५० मध्ये) अस्तित्वात आले त्यात पुरातत्व हा संवर्तीसूचीतील विषय म्हणून समाविष्ट असल्याकारणाने केंद्र सरकार बरोबरच राज्यसरकारच्या कक्षेतील येणारा विषय आहे. त्यानुसार राष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे प्राचीन स्मारक, अवशेष व पुरातत्वीय स्थळ हे केंद्र शासनाच्या अखत्यारीत येतात. आणि राज्य व प्रादेशिक स्तरीय महत्वाचे अवशेष हे राज्य शासनाच्या (पुरातत्व विभागाच्या) अखत्यारीत येतात. याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनानेही 'महाराष्ट्र प्राचीन स्मारके' आणि पुरातत्वीय स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०' हा नवीन कायदा अंमलात आणला व त्यानुसार केंद्रसरकार व तत्कालीन निजाम हैद्राबाद सरकार यांनी घोषीत केलेले स्मारके

३४ तत्रैव

वगळून इतर मराठवाड्यातील महत्वाची प्राचीन स्मारके व अवशेष वेळोवेळी राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित केली.

"केंद्र सरकारने राष्ट्रीय महत्वाची जी ऐतिहासिक स्मारके, अवशेष व पुरातत्वीय स्थळे संरक्षित म्हणून घोषित केली आहेत त्यांची संख्या महाराष्ट्रात १९९६-९७ पर्यंतच्या यादीप्रमाणे २८५ च्या जवळपास असून त्यापैकी फक्त १५ केंद्र संरक्षित स्मारके मराठवाड्यात आहेत."[३५] तसेच महाराष्ट्र शासनाने आतापर्यंतची जी स्मारके राज्य संरक्षित म्हणून घोषित केली आहेत. "१९५६ पूर्वीची निजाम सरकारतर्फे संरक्षित करण्यात आलेली जी स्मारके महाराष्ट्राच्या वाट्याला आलेली आहेत. सर्व मिळून त्यांची संख्या सुमारे ३०० आहे. त्यापैकी १९५ स्मारके एकट्या मराठवाड्यात आहेत हे विशेष"[३६]

आज अस्तित्वात असलेली ऐतिहासिक मूर्तिकला किंवा शिल्पकला तसेच ऐतिहासिक स्मारके व पुरातत्वीय अवशेष मराठवाड्याचे गतवैभव व समृध्द भूतकाळाचे जिवंत चित्र डोळ्यांसमोर उभे करतात हे खरे, "पण अशा त्यांच्या इतिहासाचे अनेक दुवे आजही अज्ञात आहेत. म्हणूनच या प्रदेशाचे अधिकाधिक पुरातत्वीय सर्वेक्षण, समन्वेषण व पुरातत्वीय स्थळांचे शास्त्रशुध्द उत्खनन होणे जरुरीचे आहे."[३७] ज्या गतवैभवामुळे आपला इतिहास हा लिहण्यास मदत होते. त्या प्राचीन कला व स्थापत्यालाच मुळात अभ्यासक विसरत आहेत. सर्वेक्षण पध्दतीला महत्वच उरलेले दिसत नाही. अलिकडे संशोधनच हे मुळात टेबल संशोधन झाले आहे. त्यामुळे वस्तुस्थितीकडे डोळेझाक केली जात आहे. म्हणून खरा इतिहास हा लिहण्यासाठी कलास्थापत्य तसेच प्राचीन अवशेषांचा आधार घेणे गरजेचे वाटते. चालुक्यांच्या काळातील शिल्पकला ही अनेक ठिकाणी अज्ञातच राहिलेली दिसून येते. कर्नाटकातील बदामी, पट्टदक्कल व ऐहोळ ही ठिकाणे बदामीच्या म्हणजेच पूर्वकालीन चालुक्यांचा वारसा सांगणारी आहेत. पण उत्तरकालीन चालुक्यांची शिल्पकला म्हणावी तेवढी प्रकाशात आलेली

---

३५ तत्रैव, पृ.५१

३६ तत्रैव

३७ तत्रैव, पृ.५५

नाही. मराठवाड्याला या चालुक्यांच्या कलेने सुंदरतेचा साज चढवला असे आपणाला म्हणता येते. या चालुक्यांच्या काळात धर्मापुरी, पानगाव, निलंगा, होट्टल, तडखेड, करडखेड आदि ठिकाणी शिल्पकला उदयाला आली. आणि ती इतिहासाचा एक भाग बनली. अर्थातच आधार बनली शिल्पकलेतून मराठवाड्यातील मनांच्या संवेदना जोपासल्या त्या चालुक्यांनी.

युं.म. पठाण म्हणतात, "मराठवाड्याच्या मनाची स्पंदने कधी अभंगातून तर कधी पदांतून, कधी आख्यानातून तर कधी महाकाव्यांतून, कधी भारुडांतून तर कधी गवळणीतून, कधी लीळा मधून, तर कधी बखरी अखबारीतून, कधी गीताटीकांतून तर कधी महाभाष्यांतून, कधी दशावतारांतून तर कधी लळीतांतून, कधी संपादण्यातून तर कधी सोया-विराण्यांतून मुक्तपणे प्रगट झाली."[३८] ही स्पंदने जशी साहित्याच्या माध्यमातून ताडपत्रावर, पोथ्यावर, बांडावर प्रकटली, लोकनाट्य लोकसंगीत, लोककला यांच्या माध्यमातून लोकरंगमंचावर प्रकटली. तशीच ती मराठवाड्याच्या डोंगरकपारीतल्या शिळांतूनही प्रकटली आणि हिच स्पंदने तत्कालीन कलाकारांच्या कलेतून अर्थातच शिल्पकलेतून भरभरुन प्रकटली आहेत. हे आपणाला पाहताच क्षणी समजते. अशीच शिल्पकला धर्मापुरी व पानगाव या ठिकाणी चालुक्यांच्या काळात साकारली आहे.

ज्या शिळांवर ही शिल्पकला प्रकटली "या शिळांनी दोन मोठी वेधक रुपे घेतली कधी त्यांनी अजिंठा-वेरुळ-धाराशीवच्या लेणींतील मूर्तींची रुपे घेतली तर कधी त्यांनी मराठवाड्यातल्या शिलालेखांची रुपे घेतली. त्यांनी मराठवाड्यातल्या सम्राटांचा, सरदारांचा, राजकार्य-धुरंदरांचा वारसा जसा जतन करुन ठेवला तसाच मराठवाड्यातल्या संतांचा आणि सत्पुरुषांचाही वारसा जतन करुन ठेवला. मराठवाड्याच्या कलावंतांचा आणि व्यावसायिकांचा वारसा जसा त्यांनी जतन करुन ठेवला त्याच प्रमणे मराठवाड्यातल्या सामान्य शेतकऱ्यांचा, कुळवाड्याचा, तेलिणी-माळीणींसारख्या सामान्य 'मऱ्हाठी' स्त्रियाचाही वारसा जतन करुन

३८ पठाण यु.म., मराठवाड्यातील शिलालेख, पृ.२०

ठेवला."[३९] अशाच प्रकारे वेगवेगळ्या देवतांच्या अवतारांचे अवतारपट्ट किंवा त्यांच्या अवतारांतील कार्य रेखाटण्याचा प्रयत्न धर्मापुरी येथील शिल्पांतून बोलक्या पध्दतीने साकारला आहे. जसे बळीला दान मागण्यासाठी आलेला बटू अवतारातील विष्णू आणि त्या छत्र डोक्यावर धरुन आलेला विष्णू याच्या समोर बळीराजा आणि शुक्राचार्य त्याचे गुरु यांच्या प्रतिमा या बोलक्या वाटतात. बळी राजा हा बटू वामनास उदक देताना दाखविला आहे. तशाच प्रकारचे बोलके शिल्प म्हणजे विदारक नृसिंहाचे पहावयास मिळते. या शिल्पामध्ये भक्ताच्या अर्थातच भक्त प्रल्हादाच्या मदतीला धावून आलेला नृसिंह याने हिरण्यकश्यपूला आपल्या मांडीवर घेऊन त्याचे आतडे बाहेर काढताना दाखविले आहे. एवढेच नव्हे तर पानगाव या ठिकाणी विनावादिका बोलकी वाटते. अशी कितीतरी शिल्पे ही आपल्या प्राचीन वैभवाचा इतिहास हा इत्यंभूत सांगण्यास मोलाची मदत करतात.

यु.म. पठाण म्हणतात, "मराठवाड्याने जशा विविध राजवटी पाहिल्या तशाच विविध संस्कृतीही पाहिल्या. विविध धर्म पाहिले. विविध धर्मसंप्रदाय पाहिले या सर्वांना मराठवाड्याने मोठ्या मायेने या काळ्याकभिन्न अभेद्य दगडांत आपल्या उराशी जतन करुन ठेवले."[४०] अशा विविध धर्माची आणि संस्कृती पंथांची प्रतिकेही आपणाला धर्मापुरी या ठिकाणी अभ्यासायला मिळतात. धर्मापुरी या ठिकाणी हिंदू आणि जैन धर्मांचा संगम झालेला दिसून येतो. या ठिकाणी दोन्ही वेगवेगळ्या संस्कृती या एकत्र नांदत असलेले प्राचीन काळातील दर्शन पहावयास मिळते. जैन आणि हिंदू धर्माप्रमाणेच या ठिकाणी हिंदू धर्मातील विविध धर्मपंथ आहेत. त्यांचेही यथार्थ दर्शन होते. ते म्हणजे वैष्णव पंथ, शैव पंथ, नाथ संप्रदाय, सौर पंथ, गाणपत्य पंथ, शक्ती संप्रदाय आदिंचा अभ्यास हा येथे यथार्थपणे करावयास मिळतो.

चालुक्य काळातील शिल्पकला ही येथील बालाघाट पर्वतांच्या रांगावर साकारलेली दिसते. येथील शिल्पकलेचा अभ्यास करण्यासाठी गेल्यास येथील भूगोलही संशोधकास

---

३९ तत्रैव, पृ.२०-२१
४० तत्रैव, पृ.२१

भौगोलिक अभ्यासासाठी मोह पाडतो. हे तेवढेच सत्य आहे. "मराठवाड्याचा हा सारा इतिहास मराठवाड्याच्या डोंगरकपारींच्या, शिळांच्या भूगोलात दडला आहे. इतिहास आणि भूगोल यांचे एक अपूर्व, मनोरम नाते जडले आहे. येथील भूगोलातून इतिहास उलगडतो आणि तेथील इतिहासातून भूगोलाची पाने फडफडतात."[४१] याचे दृश्य आपणाला धर्मापुरी या ठिकाणी पहावयास किंवा अभ्यासण्यास मिळते. अशा या भागाच्या भूगोलात शतकानुशतके दडलेल्या, उनपावसाचा मारा सहन करीत इतिहास, संस्कृती, धर्मकारण, राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण जपणाऱ्या या मातीतील शिल्पकलेचा महिमा वर्णन करील तेवढा थोडा आहे. आणि ही शिल्पकला निर्माण करणाऱ्या कलाकाराच्या प्रतिभाशक्तीला तर दाद दिली पाहिजे. आणि यांना प्रेरणा व मदत करणाऱ्या चालुक्य राजांच्या थोरवीपुढे पाहणाराचे साहजीकच मस्तक झुकल्याविना राहणार नाही.

मराठवाडा अशा ऐतिहासिक वारशाने संपन्न असलेला आपल्या लक्षात येतो. के.दे. कावडकर म्हणतात, "मराठवाड्याच्या संपूर्ण प्रदेशात स्थित असलेल्या किल्ले, लेणी, मंदिरे, मशिदी, घुमट, दर्गे, महाल, बारादरी, तटबंदी व देशी इत्यादी प्राचीन वास्तुंच्या स्वरुपातील हा भाग या प्रदेशांच्या सांस्कृतिक वारशाची एकच अर्थात स्थावर बाजू म्हणता येईल."[४२] यामध्ये चालुक्यांच्या काळातील लेण्या आणि मंदिरे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शिल्प कला निर्माण केलेली दिसून येते. चालुक्यराजे शिल्पकलेचे खऱ्या अर्थाने उपासकच होते. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

निलंग्याचे निलकंठेश्वर मंदिर किंवा होट्टलचे सिध्देश्वर मंदिर येथील कलेवरुनही चालुक्यांची कला किती उच्च दर्जाची होती याची खात्री पटते. तसे धर्मापुरी व पानगाव येथील मंदिरावरील त्यांची शिल्पकला ही देखील अप्रतिम असलेली दिसून येते. धार्मिक हेतूसोबतच कलात्मक हेतूही चालुक्य राजांनी जोपासला आहे. वर अभ्यासल्याप्रमाणे चालुक्यांच्या काळात

---

४१ तत्रैव

४२ कावडकर के.दे.,पूर्वोक्त, पृ.५६

जशा वास्तू होत्या त्याचप्रमाणे दुसऱ्या दृष्टीने विचार केल्यास "या भागात इतरत्र अस्तित्वात असलेले शिल्पावशेष, दगडी व धातूच्या मूर्ती व मृण्मूर्ती सुटे शिलालेख, ताम्रपट, नाणी, हस्तलिखिते, प्राचीन चित्रकृती, ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तीदंती वस्तू, काष्ठशिल्प, धातू व अन्य माध्यमातील प्राचीन कलाकृती इ."[४३] उपयुक्त पुरावशेषांवरुन किंवा त्यांच्या अभ्यासावरुन आपणाला इतिहासाची पाने रंगवता येतात. वरील सर्व साधनांचा अभ्यास केल्याशिवाय कोणत्याच राजघराण्यांचा सांस्कृतिक किंवा अन्य प्रकारचा इतिहास हा उलगडता येत नाही. हे त्रीकालाबाधीत सत्य आहे. वरील सर्व विवेचनात मूर्तीकला किंवा शिल्पकला कितीतरी महत्वाची असते. याचा अभ्यास होतो. प्राचीन अवशेष म्हणजे इहितासाची मुळाक्षरेच असतात. कठारे व साखरे म्हणतात, "भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा प्रारंभ सिंधू संस्कृतीपासून होतो. ही संस्कृती प्राचीन समजली जाते. सिंधुसंस्कृतीच्या उत्खननात मातीपासून बनविलेल्या अनेक स्त्रीमूर्ती मिळाल्या त्यांना मातृदेवीच्या मूर्ती म्हणतात."[४४] अशा या सिंधुसंस्कृतीच्या काळातील मूर्तीवरुन तत्कालीन धार्मिक इतिहास हा संशोधक लिहतात. नव्हे तो लिहला आहे हे सर्व कसे झाले तर त्याला आधार होता तत्कालीन शिल्पावशेषांचा असे म्हणता येते.

हिंदू धर्मात विविध देवदेवता आहेत. या देवदेवतांच्या मूर्ती निर्माण करण्याची सिंधू संस्कृतीपासून सुरु झालेली परंपरा पुढे निरंतर चालू राहिली. "हिंदू धर्मात ज्या मूर्ती निर्माण केल्या गेल्या त्यामध्ये शिव, पार्वती, विष्णू, सूर्य, गणपती, कार्तिकेय, नाग, ब्रम्हदेव, गजलक्ष्मी, मातृदेवता, सप्तमातृका, दुर्गादेवी, वृषभ (नंदी), नृसिंह, श्रीलक्ष्मीनृसिंह, सरस्वती इत्यादी मूर्ती विशेष उल्लेखनीय ठरतात."[४५] नांदेड जिल्ह्यात शैव, वैष्णव, शाक्त, सौर आणि गाणपत्य इत्यादी सांप्रदायाच्या मूर्ती आढळतात. धर्मापुरी व पानगाव या अनुक्रमे बीड आणि लातूर जिल्ह्यातील ठिकाणावरही वरील पाचही संप्रदायाच्या मूर्ती आढळतात हे विशेष होय.

---

४३ तत्रैव

४४ कठारे अनिल/साखरे विजया, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, पृ.११२

४५ तत्रैव, पृ.११३

अशा प्रकारे प्रत्येक मूर्तीकडे आपण जर बारकाईने पाहिले. अर्थातच संशोधन दृष्टितून पाहिले तर आपणाला ती नक्कीच तिचा काहीतरी इतिहास सांगून गेल्याशिवाय रहात नाही. अशा चालुक्यांच्या काळातील शेकडो मूर्ती या परिसरात मिळतात. मग एवढ्या मूर्ती आपणाला कितीतरी मोठा इतिहास अभ्यासण्यास मदत करतील यात शंका वाटत नाही. यावरुन हा शिल्पकलेचा किंवा शिल्पावशेषांचा ठेवा किंवा खजिना हा इतिहास लिहण्यासाठी भक्कम आधार किंवा साधन म्हणून वापरता येतो. असे म्हणता येते.

## ६.३ चालुक्यांची कला इतर राजघराण्यांना प्रेरणादायी

भारताच्या इतिहासात कला आणि स्थापत्याला अलिकडे विशेष असे महत्व दिले जात आहे. परंतु प्राचीन काळापासूनची ही कलेची परंपरा अविरतपणे चालू ठेवण्याचे कार्य अनेक राजवंशांनी जपले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने उत्तर भारतातील आणि दक्षिण भारतातील राजघराने यांचा अभ्यास करावा लागेल. उत्तर भारतातही मोठ्या प्रमाणात शिल्पकला निर्माण झ ालेली येथील मंदिरांच्यावरुन लक्षात येते. पी.जी जोशी म्हणतात, "धार्मिक उपासनेसाठी ही मंदिरे बांधली आहेत. तरीही मंदिर शिल्पात अनेक लौकिक प्रसंग चित्रित केलेले आहेत."[४६]

उत्तर हिंदूस्थानातल्या (विंध्यपर्वताच्या उत्तरेकडील) विविध मंदिरांचे विवेचन आपणाला अभ्यासता येते. त्यात मुख्यतः इ.स. ४००-१००० पर्यंतच्या मंदिरांचा प्रामुख्याने अभ्यास करता येईल. काही मंदिरे विटांनी तर इतर मंदिरे चुनखडी, वालुकाश्म दगडांनी बांधलेली आहेत. "गुप्त, प्रतिहार, पाल, चंदेल व अनेक रजपुत राजांनी ह्या मंदिरांची निर्मिती केली. या मंदिरांची जास्त संख्या मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान व उत्तरप्रदेशात आहे."[४७] आपण यामध्ये गुप्त घराण्यापासून जरी प्रारंभ केला असला तरी त्यांच्या पूर्वीही मथुरा, गांधार कलेपासून नव्हे तर सिंधू कलेपासूनचा जुना इतिहास आहे. परंतु उत्तर भारतात गुप्तांच्या

---

४६ जोशी, पी.जी., प्राचीन भारत, पृ.२७१

४७ तत्रैव

काळापासूनच मोठ्या प्रमाणात मंदिरे व शिल्प निर्मितीस प्रारंभ झालेला दिसून येतो. म्हणजे गुप्तांचीच मुळ प्रेरणा याला कारणमात्र ठरलेली दिसते.

उत्तर भारताप्रमाणेच दक्षिण भारतातही मोठ्या प्रमाणात कलेचा उद्‌गम हा झालेला आपणाला दिसून येतो. त्यामध्ये मंदिरांची निर्मिती मोठ्या प्रमाणात तर केलीच पण त्याचबरोबर त्यांच्यावर शिल्पकलेचाही अजरामर असा अविष्कार घडवून आणलेला आहे. ज्याचा आपण मोठ्या आवडीने आपले प्राचीन वैभव म्हणून अभ्यास करतो. "दक्षिणेतील कर्नाटक, आंध्र, केरळ व तामिळनाडूत प्राचीन काळी सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, पल्लव व चोल घराण्यांची राज्य निर्माण झाली होती."[४८] याच राजघराण्यांच्या काळात वैशिष्ट्यपूर्ण मंदिर स्थापत्य शैलीचा विकास झालेला आहे. तिलाच "दक्षिणात्य द्रवीड शैली" असेही म्हटले जाते. हे मंदिर स्थापत्य उत्तरेपेक्षा बरेच भिन्न आहे. सर्व मंदिरे पाषाणाची जास्त भव्य व कलात्मक आहेत. आरंभीच्या काळात बौध्द धर्मियांनी दक्षिण भारतात लेण्यांची निर्मिती केली. दक्षिणेतल्या कलाकारांनी प्रगतीचा पुढचा टप्पा गाठला आणि चालुक्य राष्ट्रकुटांच्या काळात अजस्त्र डोंगर खोदून मोठमोठी शैल मंदिरे निर्माण केली. "एहोळ व महाबलीपुरमची मंदिरे ह्या पध्दतीची आहेत. दक्षिणेत ह्याशिवाय जमीनीच्या पृष्ठभागावर द्रविडी शैलीची मंदिरे बांधण्यात आली. त्यास पल्लव चोल पांड्य राजांनी फार मोठे प्रोत्साहन दिले."[४९]

परंतु यांच्या पूर्वीच चालुक्य राजांनी कलेला मोठा आश्रय दिलेला दिसून येतो. चालुक्य राजांच्या उत्तरकालीन चालुक्यांपेक्षा पूर्वकालीन चालुक्यांचा इतिहास आपणाला लक्षात घेतला पाहिजे. अर्थातच बदामीच्या चालुक्यांच्या कलेच्या प्रेरणा महत्वाच्या आहेत. सातवाहन आणि वाकाटकांच्या नंतर दक्षिण भारतावर आपले वर्चस्व राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात नाव लौकिक मिळविलेले घराणे म्हणून बदामीचे चालुक्य घराणे यांच्याच पासून मंदिर निर्मितीची परंपरा निर्माण झाली व कलेच्या इतिहासात क्रांती झाली.

---

४८ तत्रैव, पृ.२७४
४९ तत्रैव

## ६.३.१ बदामीच्या चालुक्यांविषयी थोडेसे -

वाकाटकांच्या सत्तेनंतर दक्षिण भारतावर आपला प्रभाव निर्माण करणारी किंवा सत्ता निर्माण करणारी महान राजवट म्हणजे चालुक्यांची होय. अशा या चालुक्यांची राजधानी कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बदामी होती. या नगराचे प्राचीन नाव वातापी होते. अनिल कठारे म्हणतात, "बदामी येथून राज्य करणारा चालुक्य वंश पूर्वचालुक्य या नावाने इतिहासात ओळखला जातो. या घराण्याने इ.स. ५४३ पासून इ.स. ७५३ पर्यंत दक्षिण भारतात राज्य केले."[५०] या घराण्यात पुलकेशी दुसरा या नावाचा कर्तबगार राजा होऊन गेला. त्याने कलेला आश्रय दिल्यामुळे त्याच्या कालखंडात विविध ठिकाणी कला व स्थापत्याची निर्मिती झाली.

बदामी ही चालुक्यांची राजधानी होती. त्यामुळे या ठिकाणी तर चालुक्य कालखंडात कला व स्थापत्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती करण्यात आली. पूर्वीप्रमाणेच चालुक्यांनी गुहामंदिरांची परंपरा जोपासली. बदामी येथील डोंगरात इ.स. ४४०-६४२ च्या दरम्यान खोदण्यात आलेली चार गुहा मंदिरे आहेत. त्यामध्ये पहिली शैवपंथीय दोन आणि तीन वैष्णव पंथाच्या असून आणि शेवटची जैन धर्मीय आहे. या ठिकाणी धार्मिक समन्वय साधला आहे. असाच समन्वय धर्मापुरी येथे देखील नंतरच्या चालुक्यांनी साधलेला दिसून येतो. चालुक्यांनी कर्नाटक प्रमाणेच महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी लेणी निर्माण केल्या. त्यामध्ये माहूरच्या लेणीचा विचार करता येतो. अनिल कठारे म्हणतात, "माहूर येथील प्राचीन लेणी चालुक्य काळात म्हणजेच इ. सणाच्या सहाव्या शतकात कोरली असून ती दक्षिणेतील सर्वात प्राचीन ब्राम्हण धर्मीय लेणी असल्याचेही मत वॉल्टर स्पिक यांनी व्यक्त केले आहे. स्थापत्य आणि शिल्पकलेत येथील लेणी व ऐहोळी, उस्मानाबाद आणि मुंबई येथील एलिफंटा लेणीमध्ये साम्य आहे."[५१] माहूर सोबतच चालुक्यांनी अन्यत्रही लेण्या निर्माण केल्या त्यातच वेरुळ या ठिकाणीही ६ ते १२ क्रमांकाच्या लेणी (बौध्द लेणी) बदामीच्या चालुक्य कालखंडात इ. सणाच्या

---

५० कठारे अनिल, पूर्वोक्त, पृ.३४

५१ तत्रैव, पृ.३५

सातव्या शतकात खोदण्यात आल्या. औरंगाबाद या ठिकाणीही चालुक्य काळातील लेणी सापडतात. "येथील लेणी क्र. ३, ९, १०, ११, १२ ह्या बदामीच्या चालुक्य कालखंडात खोदण्यात आल्या."[५२]

लेण्यांप्रमाणेच चालुक्यांनी मंदिरांची निर्मिती केली. त्यामध्ये "पट्टदक्कल येथील विरुपास मंदिर हे चालुक्य कलेचा सर्वोत्कृष्ठ नमुना आहे. या मंदिराला लोकेश्वर मंदिर या नावानेही ओळखले जाते. हे मंदिर द्रविड शैलीचे असून चालुक्य राजा विक्रमादित्य दुसरा याने बांधले."[५३] तसेच येथेच गळगनाथ मंदिर, पापनाथ मंदिर आदि मंदिरे बांधली. ऐहोळ येथेही तार बसप्पा व हुचीमलगूडी मंदिर, दुर्गा मंदिर, लाडखान मंदिर, मल्लीकार्जून मंदिर निर्माण केले.

तसेच इतरत्र विविध ठिकाणी नावलिंग मंदिर समूह कुकनूर, आलमपूर येथील मंदिरे, लकुंडी येथील जैन मंदिर, मालेगिरी टेकडी वरील शिवालय, तेर येथील उत्तरेश्वर मंदिर, त्रिविक्रम मंदिर, बदामी येथील विष्णु मंदिर, ऐहोळ जवळील रावणफाडीचे शिवमंदिर अशी कितीतरी मंदिरे बदामीच्या चालुक्यांच्या काळात निर्माण झालेली आपल्या लक्षात घेता येतील. बदामीच्या या चालुक्य घराण्याचा इतिहास यामुळे कलेच्या इतिहासात अमर झाला. वास्तुकलेसोबतच, शिल्पकला व चित्रकला काही अंशी त्यांनी निर्माण करुन पुढील राजघराण्यांना आदर्श घालून दिला असेच म्हणता येते. कलेच्या क्षेत्रात भक्कम असा पाया घालून दिला. पुढील राजघराण्यांना त्यांनी आपल्या बोलक्या कलेतून, अविष्कारातून किंवा जाणिवातून प्रेरणाच दिली.

### ६.३.२ राष्ट्रकुट घराण्याने घेतलेली प्रेरणा

बदामीच्या चालुक्य राजवटीनंतर दक्षिण भारतात राष्ट्रकुट घराण्याची सत्ता स्थापन झाली. इ.स. ७४३ पासून इ.स. ९७४ पर्यंत या घराण्याने दक्षिण भारतावर राज्य केले. या

---

५२ तत्रैव, पृ.४२

५३ तत्रैव, पृ.४३

घराण्यांच्या काळात वेरुळ, घारापुरी व कंधार ही कलेची केंद्रे होती. त्यामुळे या ठिकाणी कला व स्थापत्याचा विकास झाला आणि चालुक्यांची कला परंपरा अविरत चालू ठेवली. जामखेडकर म्हणतात, "१९६० नंतर विद्वानांचे असे ठाम मत बनत गेले की, महाराष्ट्रात राष्ट्रकुटांचे स्थान ही तितकेच महत्वाचे होते. राष्ट्रकुटांची एक शाखा विदर्भावर तर दुसरी शाखा वेरुळ परिसरात निश्चितपणे राज्य करीत होती. आणखी एक शाखा दक्षिण महाराष्ट्रात राज्य करीत होती आणि सातारा जिल्ह्यातील माण हे तिच्या राजधानीचे ठिकाण होते."[५४]

महाराष्ट्रात चालुक्यांचा अंमल पूर्णपणे प्रस्थापित होण्याआधी राष्ट्रकुटांच्या या तीन शाखांचेच महाराष्ट्रावर बऱ्यापैकी अधिपत्य होते असे काहीजन मानतात. अगदी चालुक्यांचे सार्वभौमत्व प्रस्थापित झाल्यानंतरही वेरुळ येथे राष्ट्रकुटांची एक शाखा चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करुन टिकून होती. खुद्द चालुक्यांच्या थेट आश्रयातील निर्माण झालेल्या विटांच्या अथवा प्रस्तराच्या स्थापत्याचे अवशेष महाराष्ट्रात आढळून येत नाहीत. राष्ट्रकुटांच्या बाबतीत मात्र असे म्हणता येणार नाही. राष्ट्रकुटांची किंवा राष्ट्रकुटांच्या आश्रयातील बांधण्यात आलेली आहेत. असे म्हणता येईल अशी काही विटांची आणि काही प्रस्तरांची मंदिरे आहेत.

"चंद्रपुर जिल्ह्यातील भांदक किंवा सध्याचे भद्रावती येथे शैलीच्या दृष्टिकोनातून राष्ट्रकुटकालीन म्हणता येतील अशा अनेक मंदिराचे अवशेष सापडले आहेत. त्याचप्रमाणे विदर्भ भागात आणखी दोन प्रस्तरमंदिरेही आहेत. त्यापैकी एक मंदिर रामटेक येथे असून दुसरे वाकेश्वर येथे आहे."[५५] तसेच तेर येथे राष्ट्रकुट काळातील एक विटांचे मंदिर आहे. विदर्भ भागात आणखीही अशी मंदिरे आढळली आहेत की ज्यांचे श्रेय शैलीच्या दृष्टिकोनातून राष्ट्रकुटांचे समकालीन आणि त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या राजघराण्याला जाते. हे राजघराणे म्हणजे मध्यप्रदेशातील नंतरचे कलचुरी घराणे (उत्तरकलचुरी) होय. त्यांच्या स्थापत्यकलेचा नमुना म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील भटाळ्या जवळील शैव मंदिर आणि वैनगंगा

---

५४ जामखेडकर अ.प्र. पूर्वोक्त, पृ.११०

५५ तत्रैव, पृ.१११

नदीच्या तीरावरील मार्कंडी मंदिरे होत. राष्ट्रकुटकालीन औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यात वेरुळ हे एक गाव आहे. येथील डोंगरात खोदलेल्या लेणी जगात प्रसिध्द आहेत. येथील डोंगरास चरनाद्री पहाडाच्या इंध्याद्री पर्वताच्या टेकड्या या नावानेही ओळखले जाते. इंध्याद्री टेकड्या ह्या सहाद्री पर्वताच्या रागांशी संबंधीत आहेत. राष्ट्रकुट काळात येथील लेणी क्र. १३ ते २९ या हिंदू लेणींचे खोदकाम करण्यात आले. येथील कैलास लेणी क्र. १६ विषयी प्रभाकर देव म्हणतात, "कैलास लेणी तर महाराष्ट्राच्या कलावैभवाचा मुकुटमणी येथील स्थापत्य व मूर्ती शिल्पाविष्कार दोन्हीही श्रेष्ठ प्रतीचे रामायण, महाभारतासारख्या महाकाव्यातील सारे प्रसंग क्रमाने येथे शिल्पांकीत करण्यात येऊन या महाकाव्यांना शब्दशिल्परुप देण्यात आलेय. ब्रम्हा, विष्णू आणि शिव या देवतात्रयींची विविध रुपे अवतार मूर्ती आणि विविध धार्मिक दंतकथावर आधारित असे प्रसंग कैलासातील अनामिक कलाकारांनी, अत्यंत सरसपणे आणि भावपूर्णरित्या शिल्पांकीत केलेले आढळतात."[५६]

मूर्ती शास्त्रांच्या परंपरा आणि संकेतांचे तंतोतंत पालन करुन त्यांनी हा अविष्कार घडविलाय. कैलास लेणी आणि एकूणच लेणीशिल्प स्थापत्याने महाराष्ट्रात मूर्तीकलेची जी एक परंपरा निर्माण केली तिचा प्रभाव कमी अधिक प्रमणात यादव कालखंडापर्यंत निश्चितच जाणवत राहिला. वेरुळ प्रमाणेच राष्ट्रकुटांचे महत्वाचे कलाकेंद्र कंधार हे नांदेड जिल्ह्यातील ठिकाण आहे. या ठिकाणी हिंदू जैन आणि बौध्द मूर्ती दिसून येतात. राष्ट्रकुटांच्य ाकाळात हिंदू व जैन मूर्तीशिल्प मोठ्या प्रमाणात येथे निर्माण झाले. राष्ट्रकुट स्वतःला 'कंधारपूर वराधिश्वर' म्हणत. डी.सी. सरकार यांच्या मते "कृष्ण तिसऱ्याच्या काळात कंधार येथे मोठ्या प्रमाणात मंदिरे उभारली गेली. त्याच्या कारकिर्दीतील एक शिलालेख येथे इ.स. १९५९ मध्ये मानसपुरी गावाजवळ मिळाला"[५७] या शिलालेखात कंधार येथील बारा मंदिरांचे वर्णन आहे. याला

---

५६ देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, पृ.११३

५७ Sircar D.C. (Ed.), Select Incriptions, Vol.II, p.५१४

दिलेल्या दानाचाही उल्लेख आहे. ही मंदिरे राष्ट्रकुट घराण्यातील विविध सम्राटांनी बांधली होती. ती आज अस्तित्वात नाहीत.

कंधार प्रमाणेच घारापुरी (एलिफंटा) येथेही राष्ट्रकुट कालीन पाच लेण्यांचा समूह आढळतो. जामखेडकर म्हणतात, "घारापुरीचे लेणे हे महाराष्ट्रात इ.स.च्या सहाव्या शतकात विकसित झालेल्या पाशुपत शैलस्थापत्याचा उत्कृष्ट अविष्कार आहे."[५८] अशा प्रकारे राष्ट्रकुटही शिवाचे उपासकच होते. त्यांच्या काळात अजरामर स्थापत्य निर्माण झाल्याने कलेच्या इतिहासात नव्हे तर जगाच्या इतिहासातही राष्ट्रकुटांची कला योगदान ठरली आहे. परंतु यांना पूर्वपिठीका मिळाली ती चालुक्य राजांची हे मात्र विसरता येणार नाही.

### ६.३.३ उत्तर चालुक्य आणि शिलाहारांना प्रेरणा

उत्तर कालीन चालुक्य म्हणजे कल्याणीचे चालुक्य होय. जामखेडकर म्हणतात, "उत्तर चालुक्य कलेचे इ.स.च्या ११ व्या शतकातील टप्पे नांदेड, लातूर व उस्मानाबाद या दक्षिण मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये दिसून येतात."[५९] या भागातील मंदिरे स्थापत्यदृष्ट्या उत्तर कर्नाटकातील मंदिरांशी मिळती जुळती आहेत. त्यातील आकृतीशिल्पे स्तंभाच्या खांबावर आणि मंडोवरावर वास्तवाकाराहूनही मोठया असलेल्या महाकाय प्रतिहारमूर्ती गर्भगृहाच्या द्वाराच्या दुतर्फी आणि मूर्तिशिल्पे मंडपाच्या किंवा गर्भगृहाच्या बाह्यांगाच्या जंघा भागावर आढळतात. तुलापट व खांब यांना जोडणारी आधारशिल्पेही या मंदिरामध्ये आढळतात.

या कलापरंपरेतील मनुष्याकृती शिल्पे चांगली गुबगुबीत आणि मांसल आहेत. शरीरावयवांचा गुबगुबीतपणा इतका भरीव आहे की, शरीराचा सांगाडा सूचीत करणारे अस्थि संगत स्नायू आणि हांडांचा भाग या मांसल भागाखाली पुरेपूर झाकला गेला आहे. धर्मापुरी आणि पानगाव येथील शिल्प ही अशीच आहेत. परिणामतः गुडघ्याचा भागही किंचित निमुळत्या फुगवट्याद्वारे दाखविण्यात आला आहे. गोलाकार आणि हनुवटी पुढे आलेल्या

---

५८ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.६१

५९ तत्रैव, पृ.२०८

चेहऱ्यावरील डोळे, नाक आणि तोंडाचीही तिच गत आहे. फक्त बाहेर आलेले ओठ, नाकाचा शेंडा आणि भरगच्च भुवयांखाली असलेले डोळेच काय ते दिसतात. स्त्रियांच्या बाबतीत त्यांचे स्तन व नितंबभाग फुगीर झालेला आढळतो.

"हस्तावरील मूर्तीमध्ये शालभंजिकांचा आणि आम्र भंजिकांचा समावेश होतो. या मूर्ती होयसळ मूर्तीशिल्पांशी साधर्म्य दाखवित असल्या तरी त्या होयसळमूर्ती शिल्पांइतक्या मोहक नाहीत. मंदिराच्या बाह्यांगावरील जंघा भागावर दाखविलेल्या अप्सरा आणि नायिका होयसळ काळातील मदनिकाशी साधर्म्य दाखवितात."[६०] या मूर्तीमध्ये वाद्य वाजविणारी स्त्री, पक्षी व माकडांबरोबर खेळणाऱ्या स्त्रिया, प्रेमपत्र लिहणारी स्त्री इत्यादी मूर्तीशिल्पांचा समावेश होतो. या संदर्भात आणखी एक निरीक्षण येथे नमूद करणे आवश्यक आहे की, देव-देवतांच्या मूर्ती अर्धस्तभसदृश्य निर्गमांवर येतात. तरी कमी महत्वाच्या देवता, नायिका आणि मदनिका सलिलांतरावर येतात. धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिरातील वामन आणि बली, राक्षसाला मारणारा विष्णू हे कथापरपट आणि मिथुनादि शिल्पे उत्तर चालुक्य शिल्पशैलीचे व्यवच्छेदक नमुने आहेत.

"शिलाहार राजवंशाच्या एकबण तीन शाखा होत्या व त्यांनी कोकणपट्टी, दक्षिण महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर हे जिल्हे आणि उत्तर कर्नाटकातील सध्याचा बेळगाव जिल्हा या भूभागावर राज्य केले."[६१] बांधीव मंदिरांचा आणि पन्हाळेकाशी येथील लेण्यांचा विचार करता ठाण्याहून राज्य करणाऱ्या उत्तरेकडील शिलाहारांचे स्थापत्य आणि दक्षिण कोकणात बलिपट्टनहून (सध्याचे खारेपाटन) राज्य करणाऱ्या शिलाहारांचे स्थापत्य उत्तर चालुक्यांच्या आणि होयसळांच्या स्थापत्याशी मिळतेजुळते आहे.

अगदी सोदाहरण स्पष्ट करायचे, तर अंबरनाथ येथील मंदिर आणि पन्हाळेकाझी येथील काही लेणी यादव आणि सोळंकी स्थापत्याशी साधर्म्य दाखवितात. कोल्हापूर येथील

---

६० तत्रैव, पृ.२०९
६१ तत्रैव

टाऊन हॉल वस्तुसंग्रहालयात वेसर प्रकारची दोन छोटी शिखरे प्रदर्शित करण्यात आली आहेत. कोकणातील शिल्पांचे दक्षिण गुजरातमधील शिल्पांशी उत्तर कर्नाटकातील म्हणजेच उत्तर चालुक्य व होयसळ शिल्पांशी साधर्म्य आहे."[६२] कोकणपट्टीतील शिलाहार शिल्पांचे उत्तर महाराष्ट्रातील आणि दक्षिण गुजरातमधील शिल्पांशी प्रचंड साधर्म्य असल्यामुळे त्यांचे विराळे विवेचन करण्याची आवश्यकता नाही.

याचा अर्थ असा नाही की, या भागात शिलाहार शिल्पशैलीचा स्वतःचा असा स्वतंत्र विकास झाला नाही. शिलाहारांनी कलेची अनेक केंद्रे विकसित केली. त्यामध्ये कोल्हापूर आणि खिद्रापूर ही महत्वाची केंद्रे आहेत. कोल्हापूरमध्ये शिलाहार स्थापत्यशैलीची सुमारे बारा ते तेरा मंदिरे असून त्यापैकी महालक्ष्मी मंदिर, मंगळवारपेठेतील महादेव मंदिर आणि मानस्तंभ बसती ही मंदिरे अत्यंत उल्लेखणीय आहेत. खिद्रापूरमधील दोन मंदिरेही याच प्रकारात मोडतात. अशा प्रकारे बहारदार अशा कलेला या घराण्यांनी जन्म दिलेला दिसून येतो. उत्तरकालीन चालुक्य व शिलाहार यांनीही कदाचीत पूर्वकालीन चालुक्यांच्याच कलेची प्रेरणा घेतली असावी यात शंका नाही.

### ६.३.४ यादवराजवंशाला प्रेरणा

मध्ययुगीन काळात मराठवाड्यावर यादव, मराठा, मोगल आणि हैदराबादच्या निजामाने राज्य केले. यादव घराणे (इ.स. ८६० ते १३१८) हे मरठवाड्यातील इतिहासप्रसिध्द राजघराणे होते. त्यांची राजधानी औरंगाबाद जिल्ह्यातील 'देवगिरी' येथे होती. दक्षिण भारताच्या प्राचीन इतिसातीलते शेवटचे कर्तबगार घराणे होते. या यादव घराण्याच्या काळातही कलेचा जन्म व तिचे पालन-पोषण चांगल्या प्रकारे झाले. अरुणचंद्र पाठक म्हणतात, "यादव वंशांची मंदिरे महाराष्ट्रात निरनिराळ्या भागात आढळतात. यादव आणि शिलाहार लेखांत विष्णू, कृष्ण,

---

६२ तत्रैव, पृ.२१०

शिव, ब्रम्हा, शिव-पार्वती, लक्ष्मी-नारायण, भवाणी व गणेश या देवतांची त्यांच्या निरनिराळ्या नावाने केलेली स्तुती ही आढळते."[६३]

चालुक्याप्रमाणेच यादवराजांनी ही मोठ्या प्रमाणात कलेला राजाश्रय दिला. यादव कालीन कला मुख्यत्वे त्यांच्या वास्तुतून दृष्टिपथात येते. यांच्या काळात एक विशिष्ट स्थापत्य पद्धती प्रचारात आली. ज्यामध्ये चुन्याचा वापर अजिबात नाही. या वास्तुशिल्प कलेला यादवांचा मंत्री 'हेमाद्री किंवा हेमाडपंत' (१३ वे शतक) यांच्या नावावरुन 'हेमाडपंथी' हे नाव रुढ झाले हेमाडपंत हा महादेवराय यादव आणि रामदेवरायांचा श्रीकरणाधी होता. त्याने 'चतुर्वर्ग चिंतामणी' सारखा धर्मशास्त्रकोश आणि इतर ग्रंथ लिहल्याचे उल्लेख मिळतात. त्याने अनेक नविन मंदिरे बांधली आणि जुन्यांचा जिर्णोद्धार केला. त्याने सुमारे ३०० मंदिरे बांधण्यास उत्तेजन दिलेले होते. कठारे/नगराळे म्हणतात, "तथापि अशा पध्दतीने बांधलेली काही मंदिरे हेमाद्री पूर्वी शंभर सव्वाशे वर्षे आधी बांधल्याचे पुरावे मिळतात. त्यामुळे या सर्व मंदिरांना हेमाडपंती म्हणजे कालदृष्ट्या अप्रस्तुत व चुकीचे ठरेल याकरिता ही अपसंज्ञा बाजुला ठेऊन त्यांना यादव मंदिरे म्हणणे संयुक्तिक होईल."[६४]

यादवकालीन मंदिरे प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशाचा काही भाग यामध्ये आढळतात. त्यापैकी बहुसंख्य मंदिरांची कालोघात पडझड झालेली असून आज फारच थोडी मंदिरे सुस्थितीत आहेत. त्यांचीही शिखरे पडलेली असून उर्वरित काही तग धरुन उभी आहेत. वास्तुशैलीच्या दृष्टीने पाहता येतील बहुसंख्य मंदिरे नागर शैलीतील (इंडोआर्यन) आहेत. विशेषतः पश्चिम भारतातील माळव्यातील प्रचलीत असणाऱ्या 'भूमिज या उपशैलीत बांधली आहेत. ही शैली मूळ नागर आणि द्रविड याहून काहीशी भिन्न असून तिच्यात स्थानिक वैशिष्ट्ये आहेत. या मंदिराच्या बांधणीसाठी चतुरस्त्र आणि वृत्त संस्थान (नक्षत्राकृती) असे सर्वसाधारण दोन आराखडे (विधाने) वापरली असून

---

६३ पाठक अ.श, पूर्वोक्त, पृ.६८०

६४ कठारे/नगराळे, पूर्वोक्त, पृ.१६२

मंदिराच्या कोणाकृती भिंती वरपर्यंत चढत-चढत गेल्यामुळे त्या ठाशीव दिसतात. व छायाप्रकाशाच्या परिणामामुळे त्यांच्या भरीवपणाला अधिक उठावदार पणा दिसतो. बांधणीत दगड व माती सांधण्यासाठी अशा काहीच वस्तुंचा वापर नाही. दगडांना खाचा पाडून एकावर एक दगड रचून भिंती बांधल्या.

"मंदिर वास्तुमध्ये स्तंभ, द्वारशाखा, अर्धमंडप, सभामंडप, विमान (छत) आणि शिखर हे घटक वैशिष्टपूर्ण असून अर्धमंडप व सभामंडप यातून शिल्पांकन क्वचितच आढळते. स्तंभ एकसंघ कातलेलेव गुळगुळीत केलेले आहेत."[६५] उपलब्ध होणाऱ्या अखंड पाषाणाच्या लांबीनुसार वास्तुशास्त्रज्ञांनी मंदिराचे प्रमाण ठरविले असावे असे दिसते. स्तंभ चौकोणी, षटकोणी व अष्टकोणी इत्यादी भिन्न प्रकारचे थर एकांवर एक रचून केल्यासारखे भासतात. स्तंभशिर्ष, किचक, कमळ व क्वचित पर्णाची आहेत. स्तंभातील कर्णिका किंवा कर्णी ही यादव मंदिराची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण देणगी आहे. "तेराव्या शतकाच्या मध्यापर्यंत बांधलेली मंदिरे शिल्पशैलीने नटलेली व अलंकारयुक्त आहेत. त्यानंतरच्या मंदिरात वास्तुशैलीवर अधिक भर असून क्वचितच काही ठिकाणी ओबडधोबड शिल्पाकंन केलेले आढळ्ते."[६६]

मूर्तीचा विचार करता शैव प्रभावळीतील प्रतिमा जास्त आहेत. व उर्वरित प्रतिमांत सुरसुंदरी, मातृकामूर्ती, गणपती, विष्णूचे अवतार, कृष्णमूर्ती किंवा कृष्णलीला, महाभारत, रामायण कथानक शिल्पे, योध्ये व पशुपक्षी इत्यादी विविध प्रकार आढळतात. यादव कालखंडात जबरेश्वर (फलटण), महादेव (परळी), महादेव (शिखरशिंगणापूर), गोंडेश्वर (सिन्नर), महादेव (झोडगे), लक्ष्मीनारायण (पेढगाव), शिव (निलंगा), दैत्यसूदन (लोणार), विष्णू (सातगाव) व विठ्ठल (देवगाव) इत्यादी मंदिरे वास्तुशिल्प शैलीच्या दृष्टीने उल्लेखणीय असून गोंडेश्वराचे मंदिर सर्वात मोठे आहे. वरील सर्व मंदिरातील अलंकरण कलापूर्ण असून त्यातील कल्याण सुंदरमूर्ती, रावणानुग्रहमूर्ती, उच्छिष्ट गणेश, चतुर्भूज विष्णू, तांडवनृत्यातील

---

६५ तत्रैव, पृ.१६३

६६ तत्रैव

शिव, विश्वरुप विष्णू, ब्रम्हदेव व सरस्वती, आदि देवदेवतांच्या आणि काही सुरसुंदरीच्या मूर्ती, शालभंजिका, आणि रामायण महाभारतातील कथानके लक्षवेधक आहेत. ही वास्तुशिल्पे राजाश्रय संपल्यानंतरही यादव सम्राज्याच्या अवनतीनंतर चौदाव्या शतकात अस्तित्वात होती. परंतु मुसलमानांच्या दक्षिणेकडील स्वाऱ्यामुळे मूर्तीकाम जवळजवळ संपुष्टात आले. आणि वास्तुच्या बांधणीत ज्याला प्रामुख्याने हेमाडपंती म्हणता येईल असे ठोकळवजा बांधकाम दिसू लागले.

अशा प्रकारे कला आणि वास्तुकला याच्या क्षेत्रामध्ये इतर राजाप्रमाणे यादव घराण्यातील राजांनीही कलेला चांगलाच राजाश्रय दिलेला होता. त्यामुळे यांच्या काळात म्हणजे यादवांच्या काळात अनेक ठिकाणी मंदिरे आणि शिल्पकलेचा विकास झालेला दिसून येतो. दक्षिण भारताच्या इतिहासातील सातवाहन, वाकाटक, चालुक्य (बदामी), राष्ट्रकुट, कलचुरी (कल्याणी), शिलाहार यादव, चोल, कलचुरी, पांड्य, पल्लव आदि घराणे नाव घेण्यासारखी होऊन गेली सर्वच घराण्यातील लोकांनी किंवा राजांनी आपला इतिहास जिवंत ठेवण्यासाठी अशा महान कलाकृतींना जन्म दिला.

बदामीच्या चालुक्यांनी कर्नाटकराज्य जसे कलेच्या क्षेत्रात प्रतिष्ठित बनवले तसेच सर्वांनी आपआपल्या प्रादेशिकतेत आपल्या कलांना राजाश्रय दिला. बदामीच्या चालुक्य घराण्याकडून अनेकांनी प्रेरणा घेतल्या आणि त्या प्रेरणांनुसार प्रत्येकाला आपले कला आणि स्थापत्यात वर्चस्व असावे वाटू लागले म्हणून मराठवाड्यातही राष्ट्रकुट राजांकडून कैलासासारखी जगप्रसिध्द कलाकृती निर्माण झाली. कल्याणीच्या चालुक्यांकडून धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणीही उत्कृष्ट कलाकृती निर्माण केल्या गेल्या हे तेवढेच सत्य आहे.

## ६.४ दक्षिण भारताच्या इतिहासावर चालुक्यांचा प्रभाव

राष्ट्रकुटां प्रमाणेच दक्षिण भारत आणि मराठवाड्यावर बदामीच्या आणि कल्याणीच्या चालुक्यांनी काही काळ राज्य केले उत्तर भारतात हर्षवर्धन राज्य करीत होता. त्याचवेळी दक्षिण पुलकेशी दुसरा हा पराक्रमी राजा राज्य करीत होता. दक्षिण भारताच्या

इतिहासात चालुक्य वंशाचे स्थान महत्वपूर्ण आहे. चालुक्यवंशाने दक्षिणेत जवळपास २०० वर्षे राज्य केले. चालुक्यांच्या प्रमुख तीन शाखा मानल्या आहेत. बदामीचे पूर्वकालीन पश्चिमी चालुक्य या बदामी च्या चालुक्याने इ.स. ५५० पासून ७५० पर्यंत राज्य केले. "कल्याणीचे उत्तरकालीन दक्षिणी चालुक्य यांनी इ.स. ९५० पासून १२०० पर्यंत राज्य केले."[६७] तसेच वेंगीचे पूर्व चालुक्य यांची राजधानी पिस्टपुरा होती. येथील चालुक्यांनी इ.स. ६०० ते १२०० पर्यंत राज्य केले.

बदामी येथील चालुक्य घराण्याचा पहिला राजा जयसिंह होता. राष्ट्रकुटांचा पराभव करुन याने महाराष्ट्राचा प्रदेश जिंकून घेतला. जयसिंह हा पराक्रमी व लष्करी बाण्याचा होता. जयसिंहानंतर त्याचा पुत्र रणराग हा गादीवर आला. या दोन्ही राजांनी सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला. चालुक्य घराण्याचा पहिला स्वतंत्र वृत्तीचा राजा पुलकेशी पहिला (इ.स. ५३५-५६६) हा होता. विजापूर जिल्ह्यात स्वतंत्रता घोषीत करुन बदामी या ठिकाणी ५४३ मध्ये एक किल्ला बांधला. बदामी राजधानी केली. हा राजा अनेक यज्ञ करणारा तसेच विद्ववानांचा चाहता होता. पुलकेशी पहिल्यानंतर त्याचा पुत्र कीर्तीवर्मन (५६६-५९७) गादीवर आला. याने राज्याचा विस्तार केला. कठारे व नगराळे म्हणतात, "चालुक्य अभिलेखावरुन समजते की कीर्तीवर्मनने कलिंग, मगध, मद्रक, केरळ, गंग, पांड्य, मुशक, चोल, नल, मौर्य आणि कंदब वंशाचा पराभव केला होता. परंतु अनेक इतिहासकाराच्या मते हे मत काल्पनिक असावे."[६८] कीर्तीवर्मनने बहुसुवर्ण व अग्निस्टोम यज्ञ केले होते. राज्याच्या राजधानीत अनेक नवीन मंदिरे आणि इमारती तयार केल्या.

कीर्तीवर्मन पहिला याच्यानंतर त्याचा भाऊ मंगलेश गादीवर आला. (५९७-६१०) याने रनविक्रांत, पुरुषविक्रांत व श्रीपृथ्वीवल्लभ अशा पदव्या धारण केल्या होत्या. महाकुट स्तंभलेखावरुन समजते की, याने कलचुरी वंशाचा शक्तीशाली राजा बुध्दराज याचा पराभव

६७ तत्रैव, पृ.१०५
६८ तत्रैव, पृ.१०६

केला. तसेच गुजरात, खानदेश व माळवा हा प्रदेश कलचुरीकडून जिंकला. असा मोठा प्रदेश याने जिंकला याच्या नंतर गादीवर आलेला पुढचा पराक्रमी राजा म्हणजे पुलकेशी दुसरा (६१०-६४१) होय. पुलकेशी दुसरा हा महान सम्राट होता. याने आपल्या राज्यातील यादवी संपूष्टात आणून शत्रुचा बंदोबस्त केला. तसेच कदंब राजे आणि गंग राजे यांचा पराभव केला. तसेच ऐहोळ येथील प्रशस्तीवरुन पुलकेशी याने हर्षवर्धनचाही पराभव हा वल्लभीच्या प्रश्नावरुन केला. आणि उत्तर भारतातील एका महान सत्तेला हे आव्हान दिले. तसेच कोशल, कलिंग आणि पिष्टपूरच्या राजांचाही पराभव केल. पुढे पल्लवांशी याचा दीर्घकाळ संघर्ष चालला. त्यातच पुलकेशीचा शेवट झाला. बदामी पल्लवांच्या हाती गेली.

पुलकेशी दुसऱ्याचा मुलगा विक्रमादित्य पहिला (६५५-६८१) हा गादीवरआला. याने गंग राजांच्या मदतीने पल्लवांना बदामीतून हुसकावून लावले. तसेच कांचीवर अनेक हल्ले केले. याचा बराच काळ युध्दातच गेला. विक्रमादित्य पहिल्यानंतर विनयादित्य आणि विजयादित्य हे गादीवर आले. विजयादित्याने पट्टदक्कल येथे शिवमंदिर (आधुनिक नाव संगमेश्वर) व लक्ष्मीधर येथे एक जैन मंदिर बाधले. विजयादित्यानंतर त्याचा पुत्र विक्रमादित्य दुसरा गादीवर आला. त्याने इ.स. ७३४-७४५ पर्यंत राज्य केले. याने अरबांचाही पराभव केला होता. विक्रमादित्याने कांचीचा राजा नंदिवर्मनचाही पराभव केला. कांची या पल्लवांच्या राजधानीची नासधूस केली. विक्रमादित्याने पांड्य, चोल, केरळ आणि कलभ्रा यांचाही पराभव केला. विक्रमादित्याची राणी महादेवी लोक महादेवी ही कलचुरी वंशाची राजकुमारी होती तिने पट्टदक्कल येथे शिवमंदिर बांधले. तेच (लोकेश्वर) किंवा विरुपाक्ष नावाने ओळखले जाते. सातवाहनानंतर दक्षिणेवर चालुक्यांनी २०० वर्षे राज्य केले व आपला प्रभाव निर्माण केला.

बदामी चालुक्यांचा संबंध कैलास लेण्याशीही कसा लागतो. याचे वर्णन करताना ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, "वेरुळ लेणीसमुहातील लेणी क्र. २९ (सीता की नहानी) यांची निर्मिती वातापि चालुक्यांच्या राज्यकाळात आणि त्यांच्याच उदार राजाश्रयाने झाली हे आम्ही हे अन्यत्र साधार सिध्द केलेले आहे. कैलास लेणे हे पट्टदक्कल येथील विरुपाक्ष मंदिराची

प्रतिकृती समजली जाते."[६९] तसेच के.व्ही. रमेश म्हणतात, "कैलास, लेणीच्या डाव्या बाजूस असलेल्या यज्ञशालेत सप्तमातृकांच्या मूर्ती आहेत. तेव्हा कैलास लेणे खोदण्याचा प्रारंभ वातापि चालुक्यांच्या काळात झाला असावा असे साधार वाटते."[७०] अशा या महान चालुक्य राजघराण्याला किंवा "वातापि चालुक्य वंशाला किर्तीवर्मा द्वितीय काळात उतरती कळा लागली. शेवटी तो वेडाही झाला."[७१] "राष्ट्रकुट नृपती दंतिदुर्ग याने या संधीचा फायदा उचलला त्याने चालुक्य सत्तेला आव्हान दिले. सन्नति (जि. गुलबर्गा) येथील एका कन्नड शिलालेखात या युध्दाचे पडसाद पडलेले दिसून येतात."[७२] चालुक्यांचा अंतिम पराभव मात्र दंतिदुर्गाचा चुलता कृष्ण प्रथम आकालवर्ष याने केला. अशा या बदामीच्या चालुक्य घराण्याने आपला ठस्सा किंवा आपली मोहर ही दक्षिण भारतावर उमटवली. याचा अभ्यास आपणाला त्यांच्या ऐतिहासिक अभ्यासावरुन समजतो.

राष्ट्रकुटांच्या नंतर परत एकदा आपल्या पूर्वज बदामी चालुक्यांना शोभावा असा इतिहास, कल्याणीच्या चालुक्यांनी घडविला. आणि दक्षिणेवर आपला परत दबदबा निर्माण केला. अ.शं.पाठक म्हणतात, "कल्याणीचे चालुक्य हे या वंशाचे नाव त्यांच्या राजधानीच्या स्थलनामावरुन प्राप्त झाले आहे. कल्याण किंवा कल्याणपूर हे नगर बसव कल्याण नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सरहद्दीवरील हे स्थान कर्नाटक राज्याच्या बिदर जिल्ह्यातील आहे. कल्याणी ऐवजी काही वेळा कल्याणचे चालुक्य अशी नोंद मिळते. ती योग्य ठरते. त्यामुळे कल्याणचे हेच योग्य नामाभिधान होय."[७३] दक्षिण भारताच्या इतिहासात चालुक्य राजवट अनेक दृष्टीने महत्वाची ठरते. या घराण्याच्या दोन शाखा होत्या. त्यापैकी पश्चिमेकडील शाखेला बदामीचे चालुक्य म्हणून ओळखले जाते. तर पूर्वेकडील शाखेला 'कल्याणीचे

---

६९ देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड ३, पृ.१३४
७० Ramesh K.V., Chalukyas of Vatapi, p.२४
७१ Ibid, p.१७५
७२ Ibid,
७३ पाठक अ.शं., पूर्वोक्त, पृ.३६१

चालुक्य' म्हणतात. पश्चिमेकडील बदामीच्या चालुक्यांनी इ.स. ५३५-७४५ अशी दोनशे वर्षे राज्य केले.

तर पुर्वेकडील कल्याणीचे चालुक्य जे मराठवाड्याच्या इतिहासात महत्वाचे मानले जातात. ह्या पूर्वेकडील कल्याणीच्या चालुक्यांचा कालखंड इ.स. ९७४-११९० मानला जातो. पूर्वेकडील कल्याणीच्या राजांना उत्तरकालीन चालुक्य असेही म्हणतात. राष्ट्रकुटांच्या अस्तानंतर चालुक्यांचा पुन्हा उदय झाला. हेच ते उत्तरकालीन चालुक्य म्हणून ओळखतात. कल्याणी चालुक्यांचे प्रमुख कार्यक्षेत्र महाराष्ट्र व कर्नाटकात राहिले. नांदेड जिल्ह्यातच त्यांचे जवळ जवळ ४० शिलालेख सापडले आहेत. तसेच लातूर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातही त्यांची अवशेष आढळून येतात. तडखेडच्या शिलालेखात सोमेश्वराचा उल्लेख आहे. त्याने परमार भोजाचा पराभव केला. तसेच कोकणावर स्वारी केल्याची वर्णने या शिलालेखात आहेत. नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील होट्टलचा चालुक्यकालीन शिलालेखही असाच महत्वपूर्ण पुरावा आहे. विक्रमादित्य सहाव्याचाही शिलालेख नांदेड जिल्ह्यात मिळतो. किंबहुना त्यांच्या कारकीर्दीचेच जास्त शिलालेख आढळले आहेत. थोडक्यात वरील सर्व शिलालेखांवरुन आणि शिल्प व स्थापत्य अवशेषांवरुन उत्तरकालीन चालुक्य घराण्याचा इतिहास हा स्पष्ट होतो.

अ.शं. पाठक म्हणतात, "करनोल येथील कोरीव लेखातील माहितीनुसार चालुक्य राज्यसंस्थापक दुसरा तैलप याने इ.स. ९५६ च्या सुमारास राष्ट्रकुट तिसरा कृष्णाचा मांडलिक म्हणून आपल्या राजकीय जिवनाची सुरुवात केली."[७४] राष्ट्रकुटांच्या ऱ्हासानंतर ९७४ च्या दरम्यान चालुक्य राजा तैलप दुसरा याने राष्ट्रकुटांच्या मान्यखेट परिसरातच आपले स्वतंत्र राज्य घोषित केले. चालुक्याच्या घराण्याचे मुळस्थान कर्नाटकातील 'तार्डवाडी' हे होते. त्यांची भाषा कानडी असल्याने सर्वच शिलालेख कानडी आहेत. तैलप दुसरा या चालुक्य नृपतीने २४ वर्षे राज्य केले आणि या राजसत्तेला स्थैर्य प्राप्त करुन दिले.

---

७४ तत्रैव, पृ.३६३

त्याने बदामीच्या चालुक्यांचा नर्मदेपर्यंतचा संपूर्ण प्रदेश आपल्या प्रभूत्वाखाली आणण्याचा प्रयत्न केला. दक्षिण गुजरातही त्याने जिंकले परमारांशी संघर्ष केला. नेपाळपर्यंत त्याचे सैन्य जाऊन पोहचले. त्याने चेदी, ओरिसा आणि कुंतलदेशही जिंकले होते. कुंतलनरेश ही उपाधी धारण केली होती. ही गोष्ट शिलालेखावरुन स्पष्ट होते. कल्याणीच्या चालुक्याचे राज्य तैलपच्या काळातच चांगले स्थिरावले होते. तैलप दुसऱ्यानंतर सत्याश्रय, दुसरा जयसिंह, पहिला सोमेश्वर, दुसरा सोमेश्वर सहावा विक्रमादित्य तिसरा सोमेश्वर, दुसरा जगदेकमल्ल, तिसरा तैलप, चौथा सोमेश्वर आदि राजे झाले. यापैकी तिसरा सोमेश्वर याचा शिलालेख धर्मापुरी या ठिकणी सापडला आहे. त्यात भूलोकमल्ल असा त्याचा उल्लेख आहे. धर्मापुरी आणि पानगाव ही ठिकाणे उत्तरकालीन चालुक्यांच्या अवशेषांची ठिकाणे आहेत. ती अवशेष चालुक्यांनी निर्माण केली असली तरी आता त्यांची देखभाल कोण करणार म्हणून इतिहासाच्या त्या ठेव्यासाठी सामान्य नागरिक, सरकार आणि अभ्यासक सर्वच घटक जबाबदार असतात. असो अशा कला-स्थापत्याच्या, राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक सर्वच क्षेत्रात चालुक्यांचा दक्षिणेच्या इतिहासात ठस्सा उमटलेला दिसून येतो हे सत्य नाकारता येत नाही.

## ६.५ चालुक्यकाळातील कलेचे वेगळेपण

राष्ट्रकुटाच्या सत्तेचे पतन झाल्यानंतर चालुक्य वंशातील तैलप (इ.स. ९७३-९९७) याने राष्ट्रकुटांचा पराभव करुन आपली सत्ता स्थापन केली. त्यानंतर सत्याश्रय, पहिला सोमेश्वर, दुसरा विक्रमादित्य, तिसरा सोमेश्वर, दुसरा जगदेकमल्ल व तिसरा तैलप यांनी राज्य केले. शेवटी इ.स. ११९० च्या सुमारास कल्याणीच्या चालुक्य सत्तेचे विघटन झाले. सोमनाथ रोडे म्हणतात, "मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात, उस्मानाबाद व आताच्या लातूर जिल्ह्याशी या घराण्याचा अगदी जवळून संबंध होता."[७५] नांदेड जिल्ह्यात चालुक्य काळातील सुमारे ४० शिलालेख उपलब्ध झाले आहेत. आणि मोठ्या प्रमाणात शिल्पावशेषही सापडतात.

---

७५ रोडे सोमनाथ, पूर्वोक्त, पृ.७८

या घराण्याचा राजा सोमेश्वर दुसरा (१०६८-१०७६) हा पराक्रमी राजा होता. कल्याणीच्या चालुक्य घराण्याची कारकीर्द नांदेड परिसराच्या दृष्टीने भाग्याची ठरली आहे. कारण या काळात येथे बरीच मंदिरे उभारली गेली. त्यापैकी होट्टल, मुखेड, खानापूर, बाऱ्हानी, सुगाव, एकलारा, परगी करडखेड, तडखेड, सगरोळी, आदमपूर, संगम इत्यादी ठिकाणच्या कलेबद्दल शिलालेखांतून माहिती मिळते. तर पहिल्या चार-पाच ठिकाणची देवळे आजही तग धरुन उभी आहेत. या परिसरातील कलावंतांनी विष्णूच्या, ब्रम्हदेवाच्या, महिषासूरमर्दिनी, चामुंडा, सूर्य इत्यादीच्या सुरेख मूर्ती याच ठिकाणी निर्माण केल्या. "देवदेवतांच्या मूर्तीबरोबर सुरसुंदरीच्या अनेक लोभस वाण्या मूर्ती येथे आढळतात. कल्याणीच्या चालुक्यांच्या काळात नांदेडचा परिसर कसा कलासमृध्द होता हे देखील लक्षात येते."[७६]

राष्ट्रकुट राजांनी या परिसराला कंधार सारखी राजधानी दिली. तर चालुक्य राजांनी या परिसरातील कलेचा उत्कर्ष साधून येथील लोकांना कलारसिक बनवले चालुक्य राज्यांच्या काळात या परिसरातील अनेक ठिकाणांचा विकास साधला गेला. "चालुक्यांच्या काळात मराठवाड्यात अंबाजोगाई, लातूर, धाराशिव, धर्मापुरी, आदी केंद्रे उदयास आली."[७७] शिल्पसौंदर्याच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास धर्मापुरीची शिल्पे अत्यंत देखीव, सजीव आणि भावपूर्ण वाटतात. या कालखंडात कंधार, अंबाजोगाई आणि धर्मापुरी परिसरात शेकडो मंदिरे निर्माण झाली. आज ती भग्न अवस्थेत जिर्णोध्दाराची प्रतिक्षा करीत आहेत. सोमनाथ रोडे म्हणतात, "मंदिर म्हणून नव्हे तर एका विशिष्ट काळातील स्मारक म्हणून आणि संस्कृतीची जपणूक करणे आपले नैतिक कर्तव्य ठरते."[७८] चालुक्य हे हिंदू धर्मिय असले तरी ते परधर्म संहिष्णू देखील होते. त्यांनी इतर धर्मांनाही आणि पंथांनाही आश्रय दिला. त्यामध्ये प्रामुख्याने आपणाला जैन धर्माचा उल्लेख करता येईल. चालुक्य राजांनी विद्येला आणि कलेला चांगला

---

७६ तत्रैव

७७ तत्रैव, पृ.८०

७८ तत्रैव, पृ.८१

आश्रयच दिला नाही तर त्यानंतर अतोनात प्रेम देखील केले. त्यांच्या आश्रयाखाली अनेक विद्वानांनी आपला नावलौकिक प्राचीन काळात केलेला दिसतो.

मराठवाड्यात अनेक सुरेख मंदिरे त्यांच्या काळात बांधली गेली. अजिंठा लेण्यातील काही कलाकृती चालुक्यांनी केल्या. लोककल्याण हे देखील चालुक्य नरेशांचे ब्रीद राहिलेले आहे. जामखेडकर म्हणतात, "कलापरंपरेतील मनुष्याकृती शिल्पे चांगलीच गुबगुबीत आणि मोठी आहेत. शरीरावयवांचा गुबगुबीतपणा इतका भरीव आहे की, शरीराचा सांगाडा सुचित करणारे अस्थिसंगत स्नायू आणि हाडांचा भाग या मांसल भागाखाली पुरेपूर झाकला गेला आहे परिणामतः गुडघ्याचा भागही किंचित निमुळता फुगवट्याद्वारे दाखविण्यात आला आहे."[७९]

चालुक्यकालीन कलेचे वेगळेपण आपणाला काही पुढील निकषांद्वारे पाहता येते. चालुक्यकालीन मंदिरे ही विशेषतः धर्मापुरी आणि पानगावची भूमिज मंदिरात मोडतात. चालुक्यांच्या मंदिराच्या जंगा भागावर स्त्रियांची शिल्पे मोठ्या प्रमाणात आढळतात, चालुक्यकालीन मनुष्यशिल्प मांसल तसेच गुबगुबीत दिसून येतात. चालुक्यांच्या मूर्ती शिल्पांमध्ये पंचायतन प्रकार विशेषतः जाणवतो. चालुक्य राजांनी परधर्म संहिष्णूता धोरण राबविल्याने आपल्या धर्माप्रमाणेच इतरही धर्माच्या मूर्तीशिल्पांना यांच्या काळात चांगलीच चालना मिळाली. चालुक्यांच्या काळात मंदिरांच्या बाजूला बारवांची देखील निर्मिती दिसून येते. आणि चालुक्यांनी त्यांच्या प्रत्येक कलाकेंद्राच्या ठिकाणी वेदाध्ययन केंद्रे शिक्षणासाठी निर्माण केलेले तत्कालीन साधनांवरुन सिध्द करता येतात. अशा प्रकारे चालुक्य काळातील कलेचे वेगळेपण सामान्य वाचकाच्या दृष्टीस पडल्याशिवाय राहणार नाहीत.

---

७९ जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.२०९

## ६.६ चालुक्यांच्या सांस्कृतिक इतिहासात कला व स्थापत्याची भर

आपल्या भारताची संस्कृती प्राचीन आहे. तसेच त्या त्या संस्कृतीचे प्राचीन अवशेष सुध्दा सर्वत्र भारतभर मिळतात. आज आपण इ.स.पू. ३०० पासूनचा सलग इतिहास म्हणजेच मौर्य काळापासून ते आधुनिक कालापर्यंतचा क्रमवार इतिहास आपणास अवगत आहे. हे कुठल्या आधारावर तर जे त्या त्या संस्कृतीचे द्योतक पुरावशेष आहेत. त्याच आधारावर त्यात मुख्यतः शिलालेख, नानी, मूर्तीशिल्प, मंदिरे, किल्ले, प्राचीन साहित्य इ. पुरावशेषाचा अंतरभाव होता. तसेच इ.स.पू. ५ व्या शतकातील बौध्द-जैन कालखंड आणि त्याच्याही पलिकडचे म्हणजे प्रागैतिहासिक काळापासूनचे प्राचीनतम अवशेष मिळतात.

र.रा. बोरकर म्हणतात, "हा आपल्या भारतीय संस्कृतीचा ठेवा दिवसेंदिवस नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. आणि आम्ही भारतीय एकविसाव्या शतकात प्रवेश करणारे सुज्ञ नागरिक उघड्या डोळ्यांनी बघत आहोत. आपण केवळ असेच मठ्ठपणे पाहात राहणार आहोत काय की त्याकरिता काही उपाय योजना करणार आहोत. या महत्वाच्या प्रश्नांवर विचार करण्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे."[८०] आज आपल्या भारतीय तरुणाचेही रक्त एवढे थंड झालेले आहे की, तो तरुण वर्गही हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. आज खऱ्या अर्थाने तर प्रत्येक तरुणावर सदर बाबींवर विचार करुन पुरावशेष नष्ट होणार नाहीत. त्याकरिता प्रामाणिक प्रयत्न करण्याची वेळ आली आहे. त्यातल्या त्यात काही समाधानाची गोष्ट अशी की, काही उत्साही मंडळींनी ह्याबाबत थोडेफार पाऊल उचललेले दिसते. परंतु त्यांना निश्चित अशी दिशा लाभलेली दिसत नाही. त्याची गरज आहे.

चालुक्यांच्याच सास्कृतिक इतिहासात नव्हे तर प्रत्येक राजवंशाच्या सांस्कृतिक इतिहासात कला आणि स्थापत्य प्रकाराची भर पडलेली आहे. त्यामध्ये मौर्य, सातवाहन, वाकाटक, कुशान, गुप्त, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, चोल, चेर, पांड्य, रजपूत, चंदेल, पल्लव

८० बोरकर र.रा., भातीय संस्कृती - एक सामाजिक जबाबदारी, पृ.१३

आदि मध्ययुगीन राजांनी कलेला आश्रय दिलेला आहे. मग आश्रय दिल्यानंतर हे कला आणि स्थापत्य वाढत गेले. पण अलिकडे याकडे दुर्लक्ष झाले. "भारतात उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत प्राचीन अवशेष विखुरलेले आढळतात."[८१] मंदिर, मशिद, गुंफा, किल्ले, मुर्ति, चित्रे व सुंदर सुंदर बहुमूल्य अशा शिल्पकलांनी भारत गजबजलेला आहे. दक्षिणेतील ऐहोळ, पट्टदक्कल, महाबलीपुरम, कांचीपुरम, नागार्जून कोंडा, अमरावती, तिरुवालगाडू, तजावर, सोमनाथपूरम, म्हैसूर, ओरिसातील रत्नागिरी, भूवनेश्वर, जगन्नाथपुरी, कोणार्क व इतर ठिकाणी मध्य प्रदेशातील सांची, ग्वाल्हेर, शिरपूर, भरहुत, खजुराहो, मांडू, ग्यारसपूर, महाराष्ट्रातील अजिंठा, वेरुळ, औरंगाबाद, नाशिक, भाजा, कार्ले, पितळखोरे, अंबरनाथ, मार्कण्डी, सिन्नर, कोकणातील संगमेश्वर, रेडी, बांदा, खेड, महाड आणि निरनिराळ्या ठिकाणी असलेली किल्ले, गुजरातमधील रंगपूर, लोथल, राजस्थानातील अबूचे जैन मंदिर व विखुरलेली रजपूत शैली, बिहार, बंगाल व ओरिसात तर गावोगावी मनोहारी सुंदर मूर्तीशिल्पांचे दर्शन होते.

"हिंदू (शैव व वैष्णव) बौध्द, जैन धर्माचे अनेक प्रकारचे नर-नारींचे सुंदर मूर्तीशिल्पे मोठ्या प्रमाणात संपूर्ण भारतात विखुरलेली आहेत."[८२] ह्या आपल्या भारताच्या बहुमूल्य धनाचे जतन करण्याची सर्व भारतीयांची जबाबदारी आहे. परंतु दुर्दैवाने आजही ह्या धनाकडे उपेक्षित नजरेने पाहिले जाते. आजही चालुक्यांच्या आणि इतर राजांच्या काळात निर्माण झालेल्या आणि त्यांच्याच सांस्कृतिक इतिहासात भर टाकणाऱ्या या प्राचीन अवशेषांच्या ठिकाणी काय प्रकार चालतात सांगायची लाज देखील वाटते. धर्मापुरीतील जो किल्ला आहे या किल्याच्या आत तटबंदीच्या आत जाऊन लोक शौचालयास बसतात. एवढेच नव्हे तर मंदिराच्याही ठिकाणी मी स्वतः पाहिले आहे की, धर्मापुरी येथील एका मंदिरात लोक आरामासाठी येत त्या ठिकाणी झोप काढत आणि बसल्या ठिकाणी गांजा देखील ओढत होते.

---

८१ तत्रैव
८२ तत्रैव, पृ.१४

एवढेच नव्हे तर अंबाजोगाईच्या बाहेर दोन कि.मी. अंतरावर असलेल्या हत्तीलेण्यांतही काही तरुण मंडळी पत्ते खेळत असलेले चित्र निदर्शनास आले. अशा वाईट प्रवृत्तींना आळा कोण घालणार हाच मुळात प्रश्न उपस्थित होतो.

प्राचीन भारताच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष घेऊन उभी असलेली स्मारके केविलवाणी व दिनवाणी होऊन व्याकूळ नजरेने त्यांचा कोणतरी वाली येईल आणि त्यांना जे वैभव पूर्वी होते ते परत मिळवून देईल अशी आशा बाळगताना दिसतात हे फक्त डोळस इतिहासकारानांच किंवा अभ्यासकांना समजते ते ऐरागबाळ्याचे काम नाही.

तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे

ऐरागबाळ्याचे काम नोहे

या संत उक्तीप्रमाणे चांगला संशोधकच हे कार्य वस्तुनिष्ठ चिकित्सक करु शकतो. यात शंका नाही चालुक्यांच्या सांस्कृतिक इतिहासातही या अवशेषांचा अभ्यास हा केला जातो. महाराष्ट्रातही अशी अनेक ठिकाणे आहेत की, ज्यांचा उल्लेख आपणाला यात करावा लागतो. चालुक्यांच्या सांस्कृतिक इतिहासावर आपण या प्रकरणाच्या सुरुवातीलाच बहुतांशी प्रकाश टाकल्याने यात काही विस्तृत घेण्याची गरज नाही. पण त्यामध्ये कला स्थापत्य हा घटकही तेवढाच महत्वाचा आहे.

प्रभाकर देव म्हणतात, "महाराष्ट्राच्या प्राचीन शिल्पकला वैभवात कल्याणीच्या चालुक्य कला अवशेषांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन कला वैभवाचा हा पैलू अजूनही बराचसा अज्ञातच आहे."[८३] चालुक्यांची ही कला आणि स्थापत्य कुठेतरी प्रकाशात आले पाहिजे यासाठीच हा प्रपंच आणि आपल्या महान घराण्यांचा वारसा आपणच जतन केला पाहिजे आणि त्यांचा तो वैभवशाली इतिहास पुढच्या पिढीला सांगणे आपले तरी कर्तव्य आहे. नांदेड

८३ देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११७

जिल्हा हा तसा प्राचीन काळी चालुक्यांच्या वर्चस्वाखाली होता. या जिल्ह्यातील अनेक गावांत चालुक्य कलेचे अवशेष मिळतात.

या जिल्ह्यातील अनेक गावांच्या ऐतिहासिक सर्वेक्षणातून एक बाब स्पष्ट होते की, येथे उत्तर चालुक्यांची Temple Towns होती. जशी पूर्व चालुक्यांची Temple towns म्हणून बदामी, ऐहोळ आणि पट्टदक्कल ही स्थळे आज पर्यटनस्थळे म्हणून ज्ञात आहेत. तशीच काही अज्ञात ठिकाणे येथेही आढळतील. करडखेड या एकाच गावी इ.स. १०७९, १०८८, ११०२, ११३० आणि ११३३ या वर्षातील शिलालेख सापडले असून ११ व्या आणि १२ व्या शतकातील तेथील अनेक देवळाचे संदर्भ त्यात आढळतात. "चालुक्य आणि होयसळ कला परंपराचा प्रभावही येथे स्पष्ट जाणवतो."[८४] इसवी सनाच्या १३ व्या शतकाच्या शेवटच्या दशकापर्यंत महाराष्ट्रातील हा शिल्पकला विकास अव्याहतपणे अविष्कारीत होत राहिला. देवगिरीच्या यादव नृपतीनीही या कलाकारांना राजाश्रय दिला आणि चालुक्य कला परंपरांचा स्वीकार करणारी आणि तरीही आपले वेगळेपण राखणारी यादव शैली तेथे निर्माण झाली. यादवांच्या मंदिरस्थापत्यशैलीने मंदिर विधानातील क्लिष्टता कमी होत गेली.

के.के. शर्मा म्हणतात, "मंदिर बांधणीची मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली ती उत्तर चालुक्य, शिलाहार व यादवराजांच्या राज्यात. या काळातील मंदिरांना सर्व साधारणपणे 'हेमाडपंथी' मंदिरे असे संबोधिले जाते. मात्र अनेक मंदिरे उत्तर चालुक्य काळातील आहेत हे त्यावरील लेखांवरुन स्पष्ट होते."[८५] चालुक्यांची शैली काही निराळीच आहे. काही लोक तिला चालुक्य शैली असेही म्हणतात. पण धर्मापुरी व पानगावची मंदिरे मात्र भूमिज प्रकाराची आहेत. "चालुक्य शैलीची मंदिरे नाशिक, नांदेड, बीड आणि औरंगाबाद जिल्ह्यात आहेत. सिन्नर, होट्टल, मुखेड, धर्मापुरी, अंभई येथे ती मंदिरे आहेत."[८६]

---

८४ तत्रैव

८५ शर्मा के.के. (संकलक), संदर्भ महाराष्ट्र, खंड-१, पृ.७५

८६ तत्रैव, पृ.७६

या संबंध मंदिरावरुन आणि चालुक्यांचा कलासमृध्द दृष्टिकोनावरुन चालुक्यांचा सांस्कृतिक इतिहास संपन्न झाला. त्यांच्या या सांस्कृतिक इतिहासात कला स्थापत्याची मोलाची भर पडली धर्मापुरी आणि पानगाव परिसरातही चालुक्य राजाचा कला इतिहास प्राचीन काळात नावारुपाला आला होता. याही भागात अनेक मंदिरे व मूर्तीशिल्पे सापडलेले आहेत. एवढेच नव्हे चालुक्यकालीन ऐतिहासिक वास्तुही पहावयास मिळतात. शेवटी आपणाला असेच म्हणता येते की, चालुक्यांच्या वंशातीलच राजांनी कला स्थापत्य विकासाला चालना दिली आणि त्यामुळे याची भर ही सांस्कृतिक इतिहासात पडली असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ :**


१. मोरवंचीकर रा.श्री./व्यास पी.सी., भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत), रेणुका प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै २००३, पृ.३

२. तत्रैव, पृ.१

३. देव शा.भा., पुरातत्व विद्या, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूरसाठी रत्नाकर अनंत कुलकर्णी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, विजय नगर कॉलनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९७६, पृ.८

४. तत्रैव, पृ.११८

५. बेंद्रे वा.सी., महाराष्ट्रेतिहासाची साधने विभाग पहिला, प्रकाशक श्री. वा.वि. भट, कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथ, प्रथमावृत्ती, ऑक्टो. १९६७, पृ.२६४

६. तत्रैव

७. कठारे/नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती, नोव्हें. १९९९, पृ.११२

८. तत्रैव.

९. तत्रैव

१०. तत्रैव

११. तत्रैव, पृ.११३

१२. जामखेडकर अ.प्र., स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य वभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, द्वितीयावृत्ती, २००९, पृ.२०८-२०९

१३. तत्रैव, पृ.२०९

१४. तत्रैव

१५. पाठक अ.शं. (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड I), महाराष्ट्र गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य वभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथम मराठी आवृत्ती, २००२, पृ.६७४

१६. तत्रैव

१७. कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य (खंड-२), पुनम प्रकाशन, कंधार, जि. नांदेड, प्रथमावृत्ती, नोव्हें. २००६, पृ.४२

१८. बोरकर र.रा., धर्मापुरी येथील जैन शिल्प, (पुरातत्वीय शोध), कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, प्रकाशन, प्रथमावृत्ती, फेब्रु. २००४, पृ.१९०

१९. पाठक, अ.शं. (संपा.), पूर्वोक्त, पृ.६३४

२०. तत्रैव, पृ.६३५

२१. तत्रैव

२२. कठारे, नगराळे, पूर्वोक्त, पृ.१२४

२३. तत्रैव, पृ.१२५

२४. तत्रैव

२५. पाठक अ.शं. (संपा), पूर्वोक्त, पृ.६३८.

२६. काळे भगवान, मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, १९८६, पृ.६८

२७. कठारे/नगराळे, पूर्वोक्त, पृ.१३०

२८. तत्रैव, पृ.१३१

२९. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास (१९६० पर्यंत), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून १९९९, पृ.८

३०. तत्रैव, पृ.९

३१. कावडकर के.दे., ऐतिहासिक स्मारके, अवशेष पुरातत्वीय स्थळांच्या रुपाने, (मायबोलीचा मराठवाडा, संपा. श्रीराम पाटील) योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जाने. २००२, पृ.४८

३२. तत्रैव

३३. तत्रैव, पृ.५०

३४. तत्रैव

३५. तत्रैव, पृ.५१

३६. तत्रैव

३७. तत्रैव, पृ.५५

३८. पठाण यु.म., मराठवाड्यातील शिलालेख, (मायबोलीचा मराठवाडा, संपा. श्रीराम पाटील) योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जाने. २००२, पृ.२०

३९. तत्रैव, पृ.२०-२१

४०. तत्रैव, पृ.२१

४१. तत्रैव

४२. कावडकर के.दे., पृ.५६

४३. तत्रैव

४४. कठारे अनिल/साखरे विजया, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा पब्लिकेशन्स, सुंदर नगर, नांदेड, प्रथमावृत्ती, डिसें. २००८, पृ.११२

४५. तत्रैव, पृ.११३

४६. जोशी, पी.जी., प्राचीन भारत, अभय प्रकाशन, नांदेड, पंचमावृत्ती, इ.स. १९९७, पृ.२७१

४७. तत्रैव

४८. तत्रैव, पृ.२७४

४९. तत्रैव

५०. कठारे अनिल, पूर्वोक्त, पृ.३४

५१. तत्रैव, पृ.३५

५२. तत्रैव, पृ.४२

५३. तत्रैव, पृ.४३

५४. जामखेडकर अ.प्र. पूर्वोक्त, पृ.११०

५५. तत्रैव, पृ.१११

५६. देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, (संपा. भगवान काळे) संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, जाने. १९८८, पृ.११३

५७. Sircar D.C. (Ed.), Select Incriptions, Vol.II, Delhi, Motilal Banarasidas, १९८३, p.५१४

५८. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.६१

५९. तत्रैव, पृ.२०८

६०. तत्रैव, पृ.२०९

६१. तत्रैव

६२. तत्रैव, पृ.२१०

६३. पाठक अ.श, पूर्वोक्त, पृ.६८०

६४. कठारे/नगराळे, पूर्वोक्त, पृ.१६२

६५. तत्रैव, पृ.१६३

६६. तत्रैव

६७. तत्रैव, पृ.१०५

६८. तत्रैव, पृ.१०६

६९. देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा, खंड ३, कैलास पब्लिकेशन्स, औरंगागपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै २००१, पृ.१३४

७०. Ramesh K.V., Chalukyas of Vatapi, Agam Kalaprakashan, Delhi, १९८४, p.२४

७१. Ibid, p.१७५

७२. Ibid,

७३. पाठक अ.शं., पूर्वोक्त, पृ.३६१

७४. तत्रैव, पृ.३६३

७५. रोडे सोमनाथ, पूर्वोक्त, पृ.७८

७६. तत्रैव

७७. तत्रैव, पृ.८०

७८. तत्रैव, पृ.८१

७९. जामखेडकर अ.प्र., पूर्वोक्त, पृ.२०९

८०. बोरकर र.रा., भारतीय संस्कृती - एक सामाजिक जबाबदारी, (पुरातत्वीय शोध), कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, प्रकाशन, प्रथमावृत्ती, फेब्रु. २००४,पृ.१३

८१. तत्रैव

८२. तत्रैव, पृ.१४

८३. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.११७

८४. तत्रैव

८५. शर्मा के.के. (संकलक), संदर्भ महाराष्ट्र, खंड-१, इंटेलेक्चुअल बुक ब्युरो प्रकाशन, भोपाळ, २००५, पृ.७५

८६. तत्रैव, पृ.७६

# प्रकरण - ७

# निष्कर्ष व शिफारशी

प्रकरण सातवे

# निष्कर्ष व शिफारशी

आपला भारत देश हा कलेने विविध अंगानी नटलेला आहे. याचा आपण अभ्यास हा मागील प्रकरणांत पाहिला. भारतात महाराष्ट्र आणि त्यातले त्यात मराठवाडा तर विशेष उल्लेखणीय आहे. मराठवाडा परिसर प्राचीन शिल्प-स्थापत्य अवशेषांनी समृध्द आहे. प्राचीन ऐतिहासिक पुराव्यांचा विचार करत असताना मराठवाड्याला वगळून चालतच नाही. आजही अशा अनेक ऐतिहासिक खाणाखुणा जागोजागी सर्व मराठवाडाभर उभ्या आहेत. सातवाहन राजवंशाच्या काळापासून यादव राजवंशाच्या कालखंडापर्यंत या मराठवाड्यात अनेक ठिकाणी ऐतिहासिक शिल्प-स्थापत्य रचना उदयास आल्या.

मराठवाड्यावर प्राचीन काळात सर्वप्रथम राज्य सातवाहनांनी केले. प्रतिष्ठाणनगरी ही त्यांची राजधानी होती. वेरुळच्या कातळातून अखंड कला निर्माण करणारा सर्वश्रेष्ठ कलाकार कोकस हा या प्रतिष्ठानचाच तर या प्रतिष्ठानवर इ.स. पूर्व २३५ पासून इ.स. २२५ असे सुमारे साडेचारशे वर्षे सातवाहनांनी राज्य केले. सातवाहनांच्या नंतर या मराठवाड्यात इ.स. २२५ ते ५५० असे सुमारे तीनशे वर्षे वाकाटकांनी राज्य केले. त्यांच्यानंतर या भागावर बदामीच्या चालुक्यांची सत्ता निर्माण झाली. ती सुमारे दोनशे वर्षे म्हणजे इ.स. ५५० ते ७५० अशी टिकली. ह्यू-एन-त्संग याच काळात मराठवाड्यात आला होता. त्यानंतर येथे राष्ट्रकुटांची सत्ता निर्माण झाली. राष्ट्रकुटांच्या प्रभावी राजवटीनंतर येथे आले कल्याणीचे चालुक्य घराणे. हे साधारणतः १० ते ११ वे शतक नंतर इथे अल्पकाळ सत्ता टिकली ती कलचुरींची.

सर्व राजवंशात सातवाहनांपासून ते यादवापर्यंत मराठवाड्यात धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा असंख्य घडामोडी घडल्या. प्राचीन कलावैभवाची साक्ष देणारे अनेक देवालये व गुहाशिल्पे निर्माण झाली. या सर्व देवालयात बीड जिल्ह्यातील धर्मापुरीची अनेक देवालये आणि लातूर जिल्ह्यातील पानगावची देवालये वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना ठरतात. काळाच्या ओघात मूळ मंदिरांचा जवळ जवळ बराच भाग नष्ट होऊन आज काही भाग हा शिल्लक

असलेला दिसून येतो. चालुक्य राजवटीतील विक्रमादित्य सहावा याचा पुत्र सोमेश्वर तृतीय याने धर्मापुरी नगरी निर्माण केली.या राजाला साहित्याची आवड होती. त्याने 'अभिलाषितार्थ चिंतामणी' (मानसोल्लास) या ग्रंथाची निर्मिती केली होती. या धर्मापुरीत सर्व सोयी होत्या भव्य राजप्रसाद, नृत्यशाळा, तलाव, मनोहारी उद्याने, सुंदर वनराई, उत्तुंग देवालये आणि भव्य बाजारपेठ यांनी ही नगरी सजलेली व गजबजलेली होती.

धर्मापुरी प्रमाणेच चालुक्यकाळात विकास पावलेले धर्मापुरी परिसरातीलच किंवा लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील पानगाव नावाचे ठिकाण आहे. या ठिकाणीही अनेक मंदिरे आहेत. त्यामध्ये विठ्ठल रुक्मिनी मंदिर, पंचकुंड महादेव मंदिर आणि पन्नगेश्वराचे मंदिर. या मंदिराच्या परिसरात कितीतरी शिल्प आपणाला अभ्यासावयास मिळतात. कलेचा सुवर्णमध्य या परिसराने साधलेला आपल्या निदर्शनास येतो. आपल्या सर्व वरील संशोधन कार्यात आपण या परिसराचा चांगला अभ्यास करण्याचा प्रयत्न हा केलेला आहे आणि त्याची मांडणी किंवा स्पष्टीकरण दिलेले आहे. तर आपणाला या सबंध संशोधन कार्यात काही ठोस निष्कर्ष किंवा निरीक्षणे दिसून आलेली आहेत. त्या सर्व निष्कर्षांचा आपण अभ्यास करण्याचा प्रयत्न पुढील प्रमाणे करुयात.

## ७.१ प्रमुख निष्कर्ष -

१. कला ही मानवाला चिरकाल आनंद देते. कलेने भारताचा इतिहास समृध्द झाला आहे. प्राचीन धर्मग्रंथातील एकूण चौसष्ट कलापैकी शिल्पकला एक महत्वाची कला आहे. जी पाहण्यासाठी देशी व विदेशी पर्यटक भारतात येतात. अशाच प्रकारची शिल्पकला बीड जिल्ह्यातील धर्मापुरी व लातूर जिल्ह्यातील पानगाव येथे आहे.

२. धर्मापुरी आणि पानगाव ही शहरे प्राचीन मराठवाड्याच्या इतिहासाशी फारच जवळचा संबंध साधतात या परिसरात अनेक राजवंशांनी राज्य केले पण या

शहरांचा विकास हा कल्याणीच्या चालुक्यांच्याच काळात झाला हे तेथील साधनांवरुन समजते.

३. इतिहास काळातील शिल्पकलेचा जर आपण अभ्यास केला तर तिच्या निर्मितीवरुन असे दिसून येते की, त्या कलेवर कोणत्या तरी धर्मपंथाचा प्रभाव दिसून येतो. अशाच प्रकारे येथील कलेवरही अनेक धर्मपंथांचा प्रभाव दिसून आला.

४. धर्मापुरी आणि पानगाव येथील शिल्पकलेकडे बारकाईने पाहिल्यानंतर प्रत्यक्षदर्शनी असा बोध होतो की, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक जीवन रेखाटलेले दिसून येते.

५. बीड आणि लातूर जिल्ह्यातील असे काही ऐतिहासिक ठिकाणे आहेत की, त्यामध्ये लातूर, खरोसा, पानगाव, धर्मापुरी आणि अंबाजोगाई यांचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो की या ठिकाणच्या शिल्पकलेतून धार्मिक एकात्मतेचा संदेश मिळतो जो की भावी पिढीला मार्गदर्शक ठरेल.

६. भारतात अनेक धर्म व धर्मसंप्रदाय आहेत. प्रत्येकाचे विचार हे भिन्न असतात. त्यामुळे लहान कारणांवरुन देशात दंगली होतात पण या ठिकाणाच्या शिल्पकलेच्या अभ्यासावरुन येथे अनेक धर्म संप्रदायाची शिल्पे एकत्र दिसून आली.

७. मंदिर रचनेच्या बांधकाम तंत्राचा जर अभ्यास केला तर भारतात अनेक बांधकामाचे प्रकार किंवा मंदिरांच्या निरनिराळ्या बांधकामाच्या शैली रुढ झाल्या आहेत. पण या परिसरातील पाहणीवरुन येथील मंदिरे ही भूमिज मंदिर शैलीत उभारलेली दिसून येतात.

८. ऐतिहासिक काळात लेण्या, मंदिरे, विहार, शैलगृहे ही मोठ्या प्रमाणात निर्माण केली गेली. यांच्या मागे केवळ धार्मिक किंवा अध्यात्मिक कारण नव्हते तर व्यापार, शिक्षण आणि भिख्खुंचे निवासस्थान आदि प्रयोजने साध्य झालेली दिसून येतात.

९. इतिहास लिहित असताना दगडांचा आणि कलाकारांचा अभ्यास सहसा कोणी करत नाही. पण तत्कालीन कलाकारांनी आपली संवेदना पणाला लावून जी अजरामर कला निर्माण केली आणि तिच कला शिदोरी ज्या दगडांनी आपल्या उदरात साठवून आपणापर्यंत पोहचवली म्हणून त्यांचे देखील महत्व पटल्याशिवाय राहत नाही.

१०. अशा प्रकारची कला परंपरा कायम ठेवण्यासाठी किंवा जीवंत ठेवण्यासाठी कोणाचा तरी वरदहस्त असावा लागतो. तेव्हाच अशा अमर कलाकृती जन्माला येतात. येथील शिल्पकलेच्या व वास्तुकलेच्या अभ्यासावरुन कल्याणीच्या चालुक्यांनी राजाश्रय दिलेला दिसून आला.

११. धर्मापुरी गावाचे प्राचीन वैभव हे खरोखरच महान होते. याचे वर्णनही ब्रम्हानंद देशपांडे यांनी तेथील शिलालेखांच्या आधारे केलेले आहे. धर्मापुरी हे शहर इंद्राच्या नगरीशी स्पर्धा करीत होते. असे ते म्हणतात. तेथील अवशेषांच्या आधारे हे सत्य वाटते.

१२. धर्मापुरीच्या आर्थिक बाबतीत बोलायचे झाले तर या ठिकाणी आताच्या काळापेक्षा प्राचीन काळात मोठी बाजारपेठ होती ज्यातून मोठा कर मिळत असे. बाहेरील राज्यातून व्यापारी या ठिकाणी येत. या ठिकाणी नाणे निर्माण करण्याची टांकसाळही होती. अरबी प्रवासी सुलेमान यांच्या प्रवास वर्णनावरुनही धर्मापुरीची आर्थिक संपन्नता लक्षात येते.

१३. कल्याणीच्या चालुक्य राजांच्या काळातील किल्ला हा राजकीय इतिहासाची साक्ष देत उभा आहे. किल्यावर मोठ्या प्रमाणात शिल्प कामही दिसून येते. या ठिकाणी अनेक राजघराण्यांनी राज्य केले. यावरुन हा किल्ला एक राजकीय हलचालींचे केंद्र होता असा निष्कर्ष निघतो.

१४. धर्मापुरी या ठिकाणी असलेले तुकाई मंदिर आजही तेथील ब्राम्हण गल्लीत चांगल्या स्थितीत आहे. हे मंदिर चालुक्य राजा जगदेकमल्ल याचा प्रशासक देमरस याने बांधले आहे. याला काही संशोधक हे बहूउद्देशीय सभागृह किंवा शिक्षणाचे केंद्र मानतात. पण ते मंदिर असल्याचे अभ्यासावरुन निदर्शनास आले.

१५. लातूर जिल्ह्यातील पानगाव या ठिकाणी संशोधकांनी फक्त विठ्ठल मंदिराचीच नोंद घेतलेली होती पण या ठिकाणी गेल्यानंतर सर्वेक्षण व निरीक्षणात येथे दुसरे दोन म्हणजे पंचकुंड महादेव मंदिर आणि पन्नगेश्वराचे मंदिर दिसून आले.

१६. शिल्पकला आणि स्थापत्यकला यांचा संबंध हा घनिष्ठ असतो. स्थापत्याविना शिल्पकला व शिल्पांविना स्थापत्यकला ही पोरकी वाटते. म्हणून धर्मापुरीचे केदारेश्वर मंदिर, किल्ला स्थापत्य आणि पानगांवचे विठ्ठल मंदिर यांच्यावर जसा या दोन्ही कलांचा संगम झाला आहे तसा इतर स्थापत्यांवर नाही.

१७. धर्मापुरी या ठिकाणी असलेल्या केदारेश्वराच्या मंदिरावर डॉ. प्रभाकर देव सांगतात, ब्रम्हा, विष्णू, शिव, नृसिंह, वामन, लक्ष्मी, पार्वती, मुरारी कृष्ण, या देवता शिल्पासोबतच नृत्यांगना, अप्सरा, रती, शालभंजिका यातून शिल्पसौंदर्याचा अप्रतिम अविष्कार कलाकारांनी निर्माण केला आहे. या मंदिरांच्या शिल्पवैभवाचा विचार केला तर या ठिकाणी एकूण ६७ शिल्प कोरलेली दिसून येतात.

१८. धर्मापुरीचे केदारेश्वर मंदिर आणि पानगावचे विठ्ठल मंदिर यांच्या व्यतिरिक्त अभ्यासकांना म्हणावे तेवढे माहित नाही. पण अभ्यासाअंती असे कळाले की गावातील अनेक पडझड झालेल्या मंदिरात, वेगवेगळ्या ओठ्यांवर, रस्त्यारस्त्याने एवढेच नव्हे तर शेतीच्या बांधावरही अशी शिल्पावशेष मोठ्या प्रमाणात मिळतात.

१९. केदारेश्वर मंदिर धर्मापुरी (जि. बीड) हे शिवाचे की विष्णूचे यावर विद्वानांत मतभेद वाचण्यात आले. परंतु हे मंदिर सध्याच्या काळाला शिवाचे म्हणून जरी पुजले जात

असले तरी ते चालुक्यांनी वैष्णव मंदिर म्हणूनच निर्माण केले होते असे संशोधनावरुन सिध्द होते.

२०. पानगाव (जि.लातूर) येथील विठ्ठल मंदिराचाही असाच वाद असलेला दिसून येतो. डॉ. कठारे व नगराळे म्हणतात हे मंदिर बाहेरील नंदीमंडपावरुन शिवाचे आहे. पण याही मंदिराचा बारकाईने अभ्यास केल्यास तेही वैष्णवच असल्याचे सिध्द होते.

२१. या परिसरातील मंदिरांचा चिकित्सक अभ्यास केला असता कल्याणीच्या चालुक्यांनी बहुतांशी वैष्णवच मंदिरे निर्माण केली पण त्याचे परिवर्तन होण्यास पुढील यादव घराणे आणि मुस्लिम राज्य कारणीभूत ठरले.

२२. धर्मापुरी येथील शिल्पकलेचा अभ्यास केल्यास या ठिकाणी जैन धर्माचे एक चांगले केंद्र होते असे सिध्द झाले. पण याकडे अनेक अभ्यासकांनी दुर्लक्ष केलेले आहे.

२३. धर्मापुरी या ठिकाणचा किल्ला हा अनेक विद्वानांनी उत्तर मध्ययुगीन काळातील असावा असे मत मांडले पण किल्ल्याच्या अभ्यासावरुन तो प्राचीन असल्याचे समजते. तसेच या परिसरातील तलाव, बारवा, विहिरी हे घटक त्या काळातील उत्तम जलव्यवस्थापनाचे उदाहरण म्हणून अभ्यासता येतात.

२४. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणच्या शिल्पकलेचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास केला असता प्राचीन काळातील अर्थातच कल्याणीच्या चालुक्य काळातील मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाचे ज्ञान होते. म्हणूनच म्हटले जाते की, पुरातत्वीय अवशेष ही इतिहासाची मुळाक्षरे असतात.

२५. कल्याणीच्या चालुक्यांच्या धर्मापुरी आणि पानगाव येथील शिल्पकलेच्या एकंदरीत अभ्यासावरुन त्यांच्या कलेचे वेगळेपण जाणवते. ते म्हणजे मंदिरांच्या जंगा भागावर बहुतांशी स्त्रियांची शिल्पे दिसून आली. चालुक्यकालीन मनुष्य शिल्प मांसल आणि गुबगुबीत दिसून आले. चालुक्यांच्या शिल्पकलेत मुख्यतः पंचायतन

प्रकार जाणवतो आणि चालुक्यांनी परधर्म संहिष्णुतेचे धोरणही कलेच्या क्षेत्रात राबवले.

अशा प्रकारे वरील विवेचनावरुन सबंध संशोधन कार्यात निरीक्षण केल्याच्या नंतरच किंवा अभ्यासावरुनच वरील निष्कर्ष मांडली आहेत. त्याच बरोबर निष्कर्ष झाल्यानंतर काही शिफारशी देणेही आवश्यक वाटते त्यांचा परामर्श पुढील प्रमाणे घेऊया.

## ७.२ प्रमुख शिफारशी

१. धर्मापुरी आणि परिसरातील प्राचीनत्व लक्षात घेता येथे पुरातत्व खात्याकडून एक उत्खननाची मोहिम हाती घेणे गरजेचे वाटते. कारण उत्खननामुळे या परिसराचा किंवा येथील इतिहासाचा सखोल अभ्यास होण्यास मोलाची मदत होईल.

२. या परिसरातील संशोधन होऊन ते ग्रंथरुपात ग्रंथालयातच बंद न राहता अलिकडच्या काळात ज्ञानाचा तिसरा डोळा समजले जाणारे वर्तमानपत्र यांनीही अशा वंचित स्थळांना न्याय देण्यासाठी एखादे पृष्ठ राखून ठेवून मदत करावी.

३. परिसरातील अनेक प्राचीन मंदिरांना किंवा स्मारकांना भेट दिली त्यावेळेला अनेक गैरप्रकार तेथे आढळून आले. त्यामध्ये लोक गांजा ओढतात, पत्ते खेळतात असे अवैध कारणामे बंद करण्यासाठी शासनाने लक्ष पुरविले पाहिजे.

४. धर्मापुरीचे केदारेश्वर मंदिर हे विष्णूचे आहे तसेच पानगावचे विठ्ठल मंदिरही वैष्णवच आहे पण काही अभ्यासक हे शिवाचे मानतात ते चुक आहे. या महत्वाच्या घटकांची नोंद लेखकांनी केली पाहिजे.

५. कल्याणीच्या चालुक्य राजांच्या काळातील धर्मापुरीच्या शिल्पावरुन हिंदू आणि जैन संस्कृती या एकत्र नांदत होत्या ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. तसेच चालुक्यांच्या धर्मसंहिष्णू धोरणाचाही आजच्या शासन चालवणाऱ्यांनी आदर्श घेतला पाहिजे.

६. धर्मापुरी आणि पानगाव या दोन्ही ऐतिहासिक ठिकाणी जे रस्तोरस्ती किंवा शेतातील बांधावरही विखूरलेले इतिहासाचे सारे शिल्पावशेष एकत्र करुन पुरातत्व खात्याने यांचे संग्रहालयात जतन करावे.

७. या परिसरातील मंदिराचे आणि शिल्पकलेचे संरक्षण करण्यासाठी किंवा या ऐतिहासिक वास्तुंची डागडुजी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने योग्य अनुदानाची तरतुद करावी. तरच ही प्राचीन स्मारके भावी पीढीला पहायला मिळतील अन्यथा दिसणार नाहीत.

८. या परिसरातील इतिहासाची स्मारके सुरक्षित रहावित म्हणून पुरातत्व खात्याची नुसती भली मोठी पाटी रोवून चालणार नाही. तर तेथे एका शासकीय आणि पात्र व्यक्तीची नेमणूक होणे अत्यंत गरजेचे वाटते.

९. येथील मंदिरांकडे एका विशिष्ट धर्माची मंदिरे किंवा श्रध्दास्थाने म्हणून दुर्लक्ष न करता आपल्या अखंड भारतीय संस्कृतीची प्राचीन ऐतिहासिक स्मारके म्हणून यांचे जतन करणे हे आपले नैतिक कर्तव्य वाटते.

१०. या परिसरातील शिल्पकलेचे महत्व लक्षात घेता शासनाने या स्थळांना पर्यटन स्थळांचा दर्जा द्यावा असे कोणालाही वाटेल.

११. धर्मापुरी हे प्राचीन काळात हिंदू प्रमाणेच जैन धर्माचेही एक केंद्र होते हे तेथे सापडणाऱ्या जैन अवशेषांवरुन समजते. याचाही अभ्यास संशोधकांनी जाणून घेतला पाहिजे.

१२. धर्मापुरी आणि पानगाव येथील ऐतिहासिक शिल्पकलेचा चिकित्सक अभ्यास करुन अभ्यासकांनी इतर सुप्रसिध्द शिल्पकलेप्रमाणे येथील कलेचाही कला इतिहास रेखाटावा जेणेकरुन हे प्राचीन शिल्पकलेचे दालन इतिहास प्रेमींच्या समोर येईल.

१३. मराठवाड्याच्या किंवा महाराष्ट्राच्याही इतिहासात धर्मापुरी आणि पानगाव या दुर्लक्षित स्थळांना म्हणावा तेवढा न्याय मिळाला नाही. पण धर्मापुरीचे केदारेश्वर

आणि पानगावचे श्रीविठ्ठल मंदिर हे भारतातील चांगल्या मंदिरात स्थान मिळवितात. हे अभ्यासू वर्गाने जाणून घेतले पाहिजे.

१४. येथील काही दुर्मिळ शिल्पांवरुन तत्कालीन शिक्षीत स्त्रीचे दर्शन, ईश्वर आणि भक्त प्रेमाचे दर्शन आणि दिलेले वचन किंवा शब्द पाळण्याचे धाडस आदि मार्गदर्शक तत्वे लक्षात घेतली पाहिजेत.

१५. अलिकडच्या काळातील लोक आपआपल्या संप्रदायामध्ये भेदभाव निर्माण करतात व आपसात भांडतात. पण येथील मंदिरावर असलेले वैष्णव, शैव, सौर, गाणपत्य आणि शक्ती आदि शिल्पे एकतेचा संदेश देतात याचे भान समाजाने ठेवले पाहिजे.

१६. धर्मापुरी या ठिकाणी जे प्राचीन किल्ला स्थापत्य आहे. या किल्ल्याच्या आत लोक शौचालयास जातात. अशा ऐतिहासिक वास्तुंची अशी अवहेलना होऊ नये. याकडे शासनाने प्रकर्षाने लक्ष दिले पाहिजे.

१७. धर्मापुरी आणि परिसरात प्राचीन काळात जे जलव्यवस्थापन होते ते म्हणजे विहिरी, बारवा किंवा परिसरात अनेक ठिकाणी लहान-लहान तलाव निर्माण केलेले होते. यामुळे पाणी साठवले गेले व पाणी पातळी आजही वर असलेली समजते यावरुन आजच्या शासनकर्त्यांनी अशा जलव्यवस्थापनाचा बोध घेतला पाहिजे.

अशा प्रकारे धर्मापुरी आणि पानगाव येथील स्थळांप्रमाणेच सर्वच ऐतिहासिक स्थळांना वरील बऱ्याच शिफारशी लागू पडतील यात शंका नाही. पण या शिफारशी पुर्णत्वास येण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने याकडे मोठ्या वैभवाने तसेच सहानुभूतीने पाहणे गरजेचे आहे. तेव्हाच अशा संसोधनांचा उद्देश साध्य होत असतो. आपल्या संशोधन कार्यामध्ये आपण धर्मापुरी आणि पानगाव परिसरातील ऐतिहासिक शिल्पकलेचा अभ्यास केल्यानंतर वरील प्रकारचे निरीक्षणे किंवा निष्कर्ष काढलेली आहेत आणि आपणाला पडलेल्या प्रश्नांमधून किंवा समस्यांतून बहुतांशी शिफारशीही देण्याचा अटोकाट प्रयत्न केलेला आहे. हे वरील विवेचनावरुन लक्षात घेता येते.

# प्रकरण - ८

# उपसंहार

प्रकरण आठवे

# उपसंहार

वरील संशोधन कार्यामध्ये आपण धर्मापुरी आणि पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचीन काळापासूनच भारताकडे जगाचा पाहण्याचा दृष्टिकोन निराळा असलेला आपणाला दिसून येतो. विभिन्न संस्कृतींना जन्म देणारे राष्ट्र म्हणजे भारत असा याचा गौरव होत असलेला आपणाला दिसून येतो. या भारतामध्ये ज्याप्रमाणे विविध संस्कृती उदयास आल्या त्याचप्रमाणे प्रत्येक संस्कृतीने आपले काही तत्व जपण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. भारतातील या सर्व संस्कृती इतरत्र जरी वेगळ्या वाटत असतील तरी त्या सर्व कलेच्या व्यासपीठावर एकत्र आलेल्या दिसतात.

भारतात प्राचीन काळापासूनच कला व वास्तुकला किंवा स्थापत्यकला मोठ्या प्रमाणात निर्माण होत गेली. आणि कलेच्या क्षेत्रात एक वैभवसंपन्न राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाऊ लागले. भारतामध्ये एकूण ६४ कलांचा उल्लेख केला जातो. त्यामध्येच शिल्पकलेने आपला वेगळा ठसा हा उमटवलेला दिसून येतो. रंग, रेखा, हावभाव आदिंच्या माध्यमातून जसा कलेचा जन्म होत असतो. तसाच कलाकाराने आपल्या प्रचंड अशा जाणीवेतून किंवा संवेदनेतून विशाल अशी डोंगररांगातील कातळे कोरुन अजरामर शिल्पकृती तयार केलेल्या दिसून येतात. याला शेकडो वर्ष उलटून गेली. तरीही ती कला मात्र साकार होत गेली.

प्राचीन काळातील अनेक कला चाहत्यांनी किंवा कलाप्रेमी लोकांनी अशा कलेला मोठा राजाश्रय दिला आणि आर्थिक सहाय्य देऊनही कलाकारांना प्रेरणा दिल्या त्यामुळेया कलेच्या क्षेत्रात मोठीच क्रांती घडून आली. आणि त्यांचा इतिहास, त्यांचे राजकारण, त्यांचे समाजकारण, धर्म, संस्कृती तसेच समाजजीवन या कलाप्रकारातून हळूहळू साकार होत गेले. आणि आपणही आपल्या पूर्वजांच्या वैभवाची साक्ष म्हणून अशा ऐतिहासिक स्थलांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न हा वेळोवेळी करत असतो. यात शंका नाही. कलेच्या क्षेत्रावर प्राचीन

काळापासून मोठ्या प्रमाणात धर्म आणि संस्कृतीचा प्रभाव पडत आलेला आपल्या लक्षात येतो. याचा उल्लेख आपण संशोधन कार्यामध्ये केलेलाच आहे. भारतात विविध संस्कृती निर्माण झाल्या त्यामध्ये बौध्द, जैन आणि हिंदू यांच्याच धर्माचा प्रामुख्याने कलेवर प्रभाव हा पडलेला दिसून येतो.

प्राचीन काळात धर्मसत्तेचा प्रभाव हा राजत्तेवरही असलेला आपणाला वरील अभ्यासावरुन समजते. तसेच भक्तीच्या माध्यमातूनही कला निर्माण झाल्या. अशा या धर्म भावनेतूनही शिल्पकला किंवा स्थापत्यकला विकास पावलेली आपल्या निदर्शनास येते. याच प्रकारातून मौर्य राजवंश, कुशाण, गुप्त, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, पल्लव, चोल, चेर, पांड्य, यादव, होयसळ, कलचुरी, शिलाहार, गंग आदि राजघराण्यांनी अशा कला प्रकाराला मोठाच राजाश्रय दिला आणि आज आपण संशोधन करत आहोत असे कलाप्रकार निर्माण झालेले आपल्या निदर्शनास येतात.

खरे पाहता सिंधू संस्कृतीच्या काळापासूनच कला ही उगम पावलेली आहे. परंतु नंतरच्या काळात कलेने मोठे विशाल स्वरुप धारण केले ही कला मानवाला आत्मिक मानदंड तर देतेच पण तो चिरंतर टिकणारा आनंद देते असेच म्हणावे लागेल. भारतात गुहा, मंदिरे, शैलगृहे, लेण्या, राजवाडे किंवा किल्ले, स्तुप, विहार आदिंची निर्मिती झाली आणि अशा वास्तुंवर शिल्पकला ही साकारत गेली. यामध्ये मंदिरे ही भारताच्या काणाकोपऱ्यात निर्माण केली गेली. त्यांच्या निर्मितीमागचा हेतू काहीही असो पण ती अनेक शैलींनी युक्त अशा प्रकारची निर्माण केली गेली.

अशा शैलींमध्ये नागरशैली, द्रविड शैली, वेसर शैली, हेमाडपंथी शैली, भूमिज शैली, चालुक्य शैली, सोळंकी शैली, पल्लव शैली आदि बांधकाम पध्दती या मंदिरांच्या क्षेत्रात विकास पावल्या याचाही काही अंशी आपण अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. भारताप्रमाणेच महाराष्ट्र आणि मराठवाडी ही कलेच्या बाबतीत संपन्न असलेला दिसून येतो. अशा या महाराष्ट्रात वेरुळ, अजिंठा, नाशिक, कार्ले, भाजे, बेडसा, एलीफंटा, शिऊर, माहूर,

अंबाजोगाई, खरोसा, जिंतूर आदि ठिकाणी लेण्या निर्माण झाल्याने कलेने संपन्न असा हा परिसर झालेला आपल्या लक्षात येतो. मराठवाड्यात अनेक ठिकाणी मदिरे आहेत. त्यामध्ये बीड, अंबाजोगाई, तेर, अन्वा, अंभई, होट्टल, कंधार, परळी, औंढा, चारठाणा, धारासूर, निलंगा तसेच यामध्ये धर्मापुरी आमि पानगाव यांचा उल्लेख हाही प्रामुख्याने करावा लागतो ज्या विषयावर आपण संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिल्पकला आणि स्थापत्यकलेच्या बाबतीत मराठवाडा जसा समृध्द आहे तसेच त्यामध्ये येणारे बीड आणि लातूर हे जिल्हेही तेवढेच महत्वाचे मानावे लागतील. कारण या दोन्ही ऐतिहासिक जिल्ह्यांमध्ये पुष्कळ अशा प्रकारची ऐतिहासिक स्मारके आपणास अभ्यासावयास मिळतात. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये प्राचीन काळी सातवाहन, वाकाटकांबरोबरच, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, परमार, आदि घराण्यांचे राज्य होते आणि या राजघराण्यांच्या काळामध्ये या परिसरात मोठ्या प्रमाणावर कलेची जोपासना झाली असे म्हणता येते.

बीड या ठिकाणी कंकालेश्वराचे प्राचीन काळातील प्रसिध्द असे देवालय आहे. हे मंदिर हेमाडपंती प्रकारात मोडते तसेच या मंदिरांच्या सभोवताली कल्लोळ आहे या मंदिरावरील शिल्पकला ही उत्कृष्ट आहे हे मंदिर पुरातत्व विभागाने संरक्षित करुनही त्याकडे पुरेसे लक्ष पुरविले जात नाही तसेच बीड येथे एक खंडेश्वरी देवीचे मंदिर आहे. याच्या समोरच एक खंडोबाचे छानसे मंदिर आहे. तिथे दोन भव्य दिपमाळा आहेत. त्यांचा उपयोग लोक दसरा, नवरात्र, दिवाळी अशा वेळी रोषणाई करण्यासाठी करतात.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई या ही ठिकाणी शिल्पकलेचे अवशेष मोठ्या प्रमाणात मिळतात. या ठिकाणाला सांस्कृतिक महत्व प्राप्त झालेले आपल्या लक्षात येते. येथे खोलेश्वराचे मंदिर, योगेश्वरी देवीचे मंदिर, चौबारा, गणेश मंदिर तसेच सकलेश्वर मंदिर आदि मंदिरांचा या ठिकाणी अभ्यास करता येतो. त्याचबरोबर ह्या शहराच्या वायव्येस हत्ती लेण्या आहेत. दासोपंताची समाधी आहे तसेच कवी मुकुंदराजाची समाधीही आहे. आदि घटकांनी हे अंबाजोगाई शहर हे प्राचीन काळापासूनच नावारुपाला आलेले आपणाला समजते. अंबाजोगाई

प्रमाणेच चालुक्याचे ठिकाण म्हणून प्रसिध्द असलेले परळी हेही ठिकाण १२ ज्योतिर्लिंगापैकी एक गणले जाते. याठिकाणी मंदिराला तटबंदी असून मंदिराच्या तीन बाजूकडून पायऱ्या आहेत. त्यामध्ये उत्तरेकडील पायऱ्या ह्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या वैद्यनाथ मंदिराचा जिर्णोध्दार हा अहिल्याबाई होळकर यांनी केला आहे. याचप्रमणे धर्मापुरी हेही एक प्रसिध्द असे शिल्पवैभवाचे ठिकाण आहे. याही ठिकाणी अनेक मंदिरे असलेली आपणाला अभ्यासावयास मिळतात.

बीड जिल्ह्याप्रमाणेच लातूर जिल्हाही इतिहास आणि संस्कृतीने समृध्द असा जिल्हा आहे. पूर्वी लातूर जिल्हा हा उस्मानाबादमध्ये तालुका म्हणून मोडत होता. या लातूरचे प्राचीन नाव लट्टालूर असे होते. या ठिकाणी राष्ट्रकुट तसेच चालुक्यांनी राज्य केले. या शहराची स्थापना प्राचीन काळी राष्ट्रकुटांनी केल्याचे दाखले मिळतात. राष्ट्रकुट राजे स्वतःला लट्टालूरपूरवराधिश्वर असे बिरुद लावत असत. या ठिकाणी चालुक्यांच्या काळात अनेक मंदिरे बांधली गेली त्यामध्ये सिध्देश्वर हे लातूर वाशीयांचे ग्रामदैवत, रामलिंगेश्वर, पापविनाश भूतेश्वर, केशवराज मंदिर, अंबाबाई आदि मंदिरे येथे दिसून येतात. तसेच लातूर या ठिकाणी सुरतशहावलीचा दर्गा आहे ज्या निमित्त या ठिकाणी ऊरुस भरतो. तसेच या ठिकाणचे गंजगोलाई मार्केट प्रसिध्द आहे.

लातूर प्रमाणेच या जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण उदगीर हेही ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचे मानले जाते. या ठिकाणी प्रसिध्द असा किल्ला आहे. या किल्याची पायाभरणी ही बदामीच्या चालुक्यांनी केलेली आहे असे इतिहासकार मानतात. पण त्याचे पूर्ण काम हे बहामणी राजांच्या काळात झाले आहे. अशा या किल्यामध्ये उदगीरबाबांची समाधी आहे ज्यांच्यामुळे गावाचे नाव उदगीर पडले याच किल्यामध्ये अनेक ऐतिहासिक वास्तु अभ्यासावयास मिळतात. राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्व पावलेला हा किल्ला आहे.

उदगीर प्रमाणेच लातूर जिल्ह्यात औसा हेही एक ऐतिहासिक ठिकाण आहे. या ठिकाणीही किल्याचे अवशेष सापडतात. तसेच निलंगा या तालुक्याच्या ठिकाणी एक प्रसिध्द

असे निलकंठेश्वराचे मंदिर आहे हे मंदिर चालुक्य राजांच्या काळातील आहे. तर याचा काळ हा बारावे शतक मानला जातो. या मंदिरावर सुंदर अशा प्रकारचे शिल्पांचे कोरीवकाम दिसून येते. याचप्रमाणे खरोसा येथील लेण्याही ऐतिहासिक वारस्याच्या दृष्टिकोनातून महत्वाच्या मानल्या जातात. याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील पानगाव हेही ठिकाण प्राचीन शिल्पकलेच्या दृष्टीने महत्वाचे मानले जाते. या ठिकाणी विठ्ठल रुक्मिनी मंदिर, पंचकुंड महादेव मंदिर तसेच पन्नगेश्वराचे मंदिर अशा वास्तु आहेत. यांचाही अभ्यास आपण आपल्या संशोधन कार्यात करण्याचा प्रयत्न केला आहे.

आपण वरील संशोधन कार्यामध्ये तिसऱ्या प्रकरणात शिल्पकलेचा कला आणि वास्तुशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. शिल्पकलेचा उगम विकास कसा झ ाला वास्तु कशा प्रकारे निर्माण झाल्या आदि घटकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर या महाराष्ट्रातही माणसाचा राहावा फार प्राचीन होता. कारण या महाराष्ट्रातील प्रमुख नदी गोदावरी हीच्या खोऱ्यात वि.ल. धारुरकर म्हणतात अश्मयुगीन अवशेष सापडलेले आहेत. नंतरच्या काळात महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी उत्खनन झाले पण चालुक्य राजांच्या काळातील शहरांचे म्हणावे तेवढे उत्खनन झालेले आढळून येत नाही.

असे असले तरी इतिहासाच्या संशोधकांनी या शिल्पस्थापत्याचा प्रारंभ कसा व कोठे झाला याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. प्रभाकर देव म्हणतात, महाराष्ट्रातील शिल्प स्थापत्य परंपरेचा प्रारंभ होतो. इ.स.पू. २ ऱ्या शतकात पुण्यातील भाजे समुहाच्या रुपाने हे प्राचीनतम कला वैभव साकारले. येथील चैत्य आणि विहार लेणी वैशिष्ट्यपूर्ण ठरावीत डोंगरातील प्रचंड कातळ कोरुन तयार केलेल्या या लेण्यांनी महाराष्ट्रातील लेणी स्थापत्य परंपरेचा प्रारंभ केला. असे म्हणता येते याच्यानंतर अनेक ठिकाणी लेण्या निर्माण होण्यास प्रारंभ झाला.

लेण्यांबरोबरच मंदिर स्थापत्यांचाही प्रारंभ हा झाला आणि देवळे त्यावरील शिल्पे मोठ्या प्रमाणात बहरास आली. प्राचीन महाराष्ट्रातील ही कला साधना डोंगरदऱ्यातून लेणी स्थापत्याच्या रुपात जशी साकारली तशीच ती गावागावातील मंदिरातूनही अविष्कारीत झाली. इ.स.पू. पहिल्या शतकापासून देवतायनाचे उल्लेख शिलालेखांतून आढळतात. परंतु प्रत्यक्ष देऊळ मात्र सापडते ते इ.स.च्या ४ थ्या शतकातले. भारतातील उपलब्ध अशा प्राचीनतम देवळांमध्ये महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातील त्रिविक्रमाचे देवालय विशेष उल्लेखनीय ठरावे. महाराष्ट्रातील मंदिर शिल्प स्तापत्य परंपरेचा प्रारंभ तेर येथील या त्रिविक्रम मंदिरापासून होतो. येथून पुढे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मंदिरे निर्माण होत गेली. चालुक्यांच्या काळामध्येही मंदिर स्थापत्याचा चांगलाच प्रचार व प्रसार झाला. कल्याणीच्या चालुक्यांनी धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी शिल्पाबरोबरच मंदिराचीही उभारणी मोठ्या दिमाखाने केली आहे.

चालुक्य राजांच्या काळातच धर्मापुरी, पानगाव, धाराशिव, लातूर तसेच अंबाजोगाई आदि ठिकाणे किंवा केंद्रे उदयाला आली. शिल्पसौंदर्याच्या दृष्टिकोनातून विचार केला तर धर्मापुरी आमि पानगावची शिल्पे अप्रतिम ठरतात. धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी व परिसरात अनेक वास्तु, मंदिरे, किल्ला, बारव, तलाव, नगररचनेचे अवशेष आदि घटकांचा आपणाला वास्तुकला व स्थापत्यकलेच्या दृष्टिकोनातून सखोल अभ्यास होतो. चालुक्य राजाच्या काळामध्ये लातूर आणि बीड जिल्ह्यात शेकडो वास्तु निर्माण झाल्या याला चालुक्य राजांनी राजाश्रय दिला.

धर्मापुरीच्या नगररचनेचा अभ्यास करताना आपणाला येथील नगररचना साधी सरळ जरी आताच्या काळात दिसत असली तरी प्राचीन काळात १२ व्या शतकात येथील नगररचना वैशिष्ट्यपूर्ण होती असे तेथील अवशेष किंवा पुराव्यावरुन समजून येते. ब्रम्हानंद देशपांडे म्हणतात, अशा या भूलोकमल्लाच्या राज्यात जगप्रसिध्द अशी पुरी धर्मापुरी होती. ती जणू पृथ्वीदेवीच्या ललाटावरील तिलकच होती या नगरीत अनेक तलाव वापी इत्यादी असून ती वनराजींनी हिरवीगार दिसत असे. या नगरीतील प्रासाद इतके उंच होते की, त्यांच्या

शिखरावरील नृत्य करणाऱ्या मयुरांचा घात होऊ नये म्हणून सूर्याला आपला रथ जपून चालवाला लागे अशा अनेक प्रासादांनी मंडीत असलेल्या नगरीत गीत, नृत्य, इ. कार्यक्रम नेहमी चालत व धर्मापुरी ही इंद्राच्या नगरीशी स्पर्धा करीत असे अशा या नगरीची नीट व्यवस्था लावून भूलोकमल्लाने ही नगरी मल्लराजाच्या स्वाधीन केली.

यावरुन आपणाला या ठिकाणी असलेल्या स्थापत्याचाही अभ्यास होण्यास मदत होते. तसेच येथील वैभवाची साक्ष पटते. धर्मापुरीची नगररचना उत्कृष्ट होती तसेच या ठिकाणी राष्ट्रीय स्तरावरील बाजार भरत. गुजरात, मथुरेहून या ठिकाणी व्यापारी येत असत. धर्मापुरीचे मंदिर स्थापत्य व कला तसेच किल्ला स्थापत्य, वेदाध्ययन केंद्र तसेच इतर वास्तुही महत्वाच्या वाटतात. धर्मापुरी आणि पानगाव येथील स्थापत्य व शिल्पकला यांचा घनिष्ठ संबंधही आपण रेखाटण्याचा प्रयत्न केला. येथील कला स्थापत्याने मराठवाड्याच्या इतिहासातही फार मोठी देणगी दिलेली निदर्शनास येते. तसेच चौथ्या प्रकरणात आपण धर्मापुरी आणि पानगावच्या शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. धर्मापुरी व पानगाव ही शहरे उदयाला येण्या अगोदर या परिसरात सातवाहन, वाकाटकांची सत्ता होती राष्ट्रकुटांच्या काळातील ही शहरे असावीत असे ह्यांच्या प्राचीनत्वाच्या खाणाखुणावरुन आपणाला दिसून येते. पण ठोस पुरावे आपल्या हाती न आल्याने आपणाला विधान करणे कठीण आहे. पण चालुक्य राजांच्या काही शिलालेखांवरुन ह्या शहरांची स्थापना चालुक्य काळातच झाली आहे. असे म्हणावे लागते. ह्या गावंच्या ठिकाणी जर उत्खनन केले तर या ठिकाणीही राष्ट्रकुटकालीन काही अवशेष मिळू शकतात.

प्राचीन शिल्प वैभवाला इतिहासात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले दिसून येते. चालुक्य, राष्ट्रकुट, यादव आदि राजघराण्यांनी अशा प्रकारे शिल्पस्थापत्यास राजाश्रय देऊन आपल्या उदात्त कलाकृतीचा अविष्कार घडवून आणलेला आहे. त्यांच्यापैकी चालुक्य राजांच्या कलासक्तीचा उत्कृष्ट अविष्कार म्हणजे धर्मापुरी आणि पानगाव ही शहरे आहेत. असे

आपणाला म्हणता येते. या राजवंशाच्या दिव्य धर्मभक्तीच्या खाणाखुना आपणाला या परिसरात ठायी-ठायी दिसून येतात.

चालुक्य राजांच्या काळातील धर्मापुरी व पानगावची शिल्पकला ही उल्लेखणीय आहे. तिचा सखोल जर अभ्यास केला तर त्याचा आनंद हा निश्चितच संशोधकाला मिळू शकतो. धर्मापुरीच्या केदारेश्वर मंदिरावरील शिल्पकलेचा जर विचार केला तर तेथील ब्रम्हा, विष्णू, नृसिंह, शिव, वामन, लक्ष्मी, पार्वती, नृत्यांगना, अप्सरा, पत्रलेखीका, शालभंजिका, स्त्री आदि शिल्पे सौंदर्याचा अप्रतिम अविष्कार ठरतात. तसेच गावामध्येही अनेक ठिकाणी जी शिल्पस्थापत्य दिसून येतात. त्यांचाही उल्लेख करणे गरजेचे वाटते. मल्लीकार्जून मंदिर, तुकाई देवीचे मंदिर व आदि ठिकाणी कलाकारांनी कलेचे यथोचित दर्शन घडविले आहे. तसेच पानगाव येथील विठ्ठल मंदिरावरील विष्णू, वराह, बौध्द तसेच सुरसुंदरीच्या अप्रतिम मूर्ती मनाला मोहून टाकतात. गावातील इतरत्र अनेक ठिकाणी अशी मूर्तीशिल्पे पहावयास मिळतात. त्याचाही अभ्यास हा महत्वाचा वाटतो. म्हणून आपण वरील सर्व घटकांना उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठवाड्यातील दुर्लभ खजिना म्हणजे धर्मापुरी आणि पानगावची मूर्तीशिल्पे वाटतात. यांचा अभ्यास हा वंचीत राहिला असला तरी आपण संशोधनासाठी हा विषय निवडल्याने याचे दुर्लभत्व आता संपुष्टात येणार आहे. असा विश्वास वाटतो. या परिसरात अनेक दुर्लभ अशा मुर्ती आहेत अशा मूर्तीमध्ये वैष्णव मूर्ती या उल्लेखणीय ठरतात. त्यामध्ये केदारेश्वर मंदिरावरील विष्णू, मुरारीकृष्ण, वामनाचे शिल्प, विदारक नृसिंह शिल्प तसेच पानगाव येथील विष्णू, वराह, बुध्द आदि मूर्ती या वैशिष्ट्य पूर्ण वाटतात.

वैष्णव मूर्तीप्रमाणेच शैव मूर्तीपण या परिसरात मिळतात. त्यामध्ये नटेश्वर, उमामहेश्वर, भैरव तसेच शिवलींगाच्या स्वरुपात या परिसरात मोठ्या प्रमाणात पुजा केली जात होती. म्हणून या भागात शिवलिंग जागोजागी मिळतात किंवा प्राप्त होतात. शैवांप्रमाणेच नंदीच्याही मूर्ती अनेक ठिकाणी मिळतात. तसेच नागबंधाच्याही अनेक ठिकाणी मूर्ती दिसून

येतात. धर्मापुरीतील ज्या दुर्मीळ मूर्तीचा उल्लेख केला जातो त्यामध्ये ब्रम्हदेवाच्या काही मूर्ती या ठिकाणी प्राप्त होतात. ब्रम्हदेवाप्रमाणेच सूर्यप्रतिमाही येथे मिळतात. त्याचप्रमाणे गाणपत्य आणि शक्ती संप्रदायाच्या मूर्ती तर या परिसरात जागोजागी प्राप्त होतात.

वरील सर्व मूर्तीप्रमाणेच सुरसुंदरीच्या मूर्ती तर पाहणाऱ्याचे मन आपणाकडे वेधून घेतात. हे तेवढेच खरे मग अशा सर्व मूर्तीमध्ये दिसून येणारी भिन्नता असल्याने या ठिकाणी वैष्णव, शैव, शक्ती, सौर, गाणपत्य आणि जैन धर्मसंप्रदायाचा प्रभाव असलेला आपणाला येथील मूर्तीशिल्पांच्या सविस्तर अभ्यासाअंती समजणे कठीण जाणार नाही. अनेक संप्रदायाचे ठिकाण व धर्माचे ठिकाण असल्यानेच या गावाचे नाव धर्मपुरी किंवा धर्मापुरी पडले आहे. असे आपणालाही ठामपणे मत मांडता येते. या ठिकाणी अनेक संप्रदायाच्या देवता असूनही त्या ठिकाणचे लोक हे एकत्र सुखाने नांदत असत. याचा आदर्श अलिकडे फुटीरवाद करणाऱ्या लोकांनी घेणे गरजेचे आहे. असे आपणाला या चौथ्या प्रकरणातील संबंध विवेचनावरुन स्पष्ट करण्यास मोलाची मदत होते.

संशोधन अहवालात आपण प्रकरण पाचमध्ये मंदिरांच्या बांधकाम तंत्राचा किंवा शैलीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. मंदिरे ही अनेक धर्माची असतात. त्यामध्ये आपण या ठिकाणी बौध्द, जैन आणि हिंदूचा प्रामुख्याने विचार केला आहे. आणि त्यातल्या त्यात आपल्या विषयाचा मूळ गाभा हिंदू मंदिरे असल्याने त्यांचा अभ्यास या ठिकाणी सविस्तर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंदिरे बांधताना एका विशिष्ट धाटनीत बांधली पाहिजेत त्यांची रचना ही ओबडधोबड न राहता त्यामध्ये व्यवस्थीतपणा असला पाहिजे आणि मंदिर किंवा स्थापत्याचे बांधकाम करण्यासाठी काहीतरी तंत्र असावे लागते. त्याच तंत्रामुळे मंदिराचा टिकाऊपणा, मंदिराची रचना, मंदिराचे सौंदर्य आदि घटक विकसीत झाले यामुळेच अशा बांधकाम तंत्राचा उदय झाला आहे.

भारतात अगोदर गुहा निर्माण झाल्या पर्सीब्राऊन म्हणतो, "भारतात सर्वप्रथम गुहामंदिरे (Rock temple) निर्माण केली गेली" तसेच सर्वप्रथम बौध्द त्याच्यानंतर जैन

आणि नंतर हिंदू गुहा मंदिरे निर्माण केली. असेही म्हणतात. पुढे या गुहामंदिराप्रमाणेच वास्तुमंदिरांचीही निर्मिती करण्यात येऊ लागली. गावागावामध्ये वास्तुमंदिरे मोठ्या प्रमाणात बांधण्यात येऊ लागली. मंदिर बांधकामासाठी दगड, माती आणि चुना यांचा प्रकर्षाने वापर केला जाऊ लागला. तसेच यांच्यासोबतच विटांचाही वापर केलेला आहे. धर्मापुरी व पानगावच्या मंदिरात मात्र दगड व विटा या दोन्हीचाही वापर हा करण्यात आलेला आहे. आणि धर्मापुरीच्या किल्यासाठी दगड, चुना आणि पांढऱ्या मातीचा उपयोग हा करण्यात आला आहे.

मग अशा मंदिराच्या बांधकामासाठी काही शैलींचाही वापर करण्यात आला. त्यामध्ये नागर बांधकाम शैली जीचा प्रभाव हा उत्तर भारतात चांगला दिसून येतो. तसेच द्रविड शैली ही दक्षिण भारतात मंदिरासाठी वापरली गेली आहे. वेसर शैली ही दोन्हीच्या संगमातून अर्थातच मिश्रणातून झाली आहे. म्हणून हिला मिश्र शैली असेही म्हणतात. हेमाडपंती शैली ही हेमाद्री पंडीताच्या नावावर ओळखली जाते. तसेच भूमिज शैलीही विकसित झालेली आपणाला धर्मापुरी आणि पानगाव येथील मंदिरांच्या रचनेवरुन समजते. मंदीराच्या शैली ओळखण्यासाठी मंदिरांच्या शिखरांचा अभ्यास करणे हा घटक महत्वाचा आहे. नागर मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे शिखरावरील आम्लक, द्रविड मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिरावरील गोपूर किंवा ऊरुश्रृंग तसेच ज्यावर नागर आणि द्रविड दोन्हीचा प्रभाव आहे असे वेसर शैलीतील मंदिरे असतात. हेमाडपंती मंदिरात शुष्कसांधी पध्दत असते दगडावर दगड ठेवून हे बांधकाम विना चुना मातीशिवाय उभे केले जाते. तसेच भूमिज प्रकारातील मंदिरे अशी असतात की, त्यावर शिखरे नसतात किंवा ती पडली असली किंवा ती विटांची बांधली जातात.

अशा प्रकारच्या मंदिराच्या शैलींचा अभ्यास हा आपण करण्याचा प्रयत्न केला आहे. धर्मापुरी व पानगाव येथील मंदिरे ही अनेक विद्वानांनी नागर पध्दतीचे किंवा होयसळ शैलीची म्हणून काही जन यांना हेमाडपंतीही म्हणतात. पण अंतिम संशोधनात असे समजते की येथील मंदिरे ही भूमिज प्रकारातच मोडतात, धर्मापुरी या ठिकाणी आताही चांगल्या स्थितीत केदारेश्वर मंदिर मरळसिध्द तसेच तुकाई देवीचे मंदिर आहे. आणि पानगाव येथे विठ्ठल मंदिर

आणि पंचकुंड महादेव मंदिर हे चांगल्या स्थितीत आहेत. आपल्या संशोधनाचा मुळात विषय हा बांधकामाच्या रचना तंत्राचा नव्हता किंवा त्याच्या शैलीचाही नव्हता आपला अभ्यासणीय विषय हा शिल्पकलेचा ऐतिहासिक अभ्यास असा होता पण शिल्पकला ही भिंतीवर किंवा मंदिराच्या वेगवेगळ्या अंगावर किंवा एखाद्या वास्तुवर जेवढी उठून दिसते तेवढी ती स्वतंत्ररितीने आपले सौंदर्य हे फूलवू शकत नाही.

म्हणून शिल्पकलेला आपले सौंदर्य फुलविण्यासाठी स्थापत्य किंवा वास्तुकलेची मदत ही घ्यावीच लागते. म्हणूनच आपण शिल्पकला आणि वास्तुकला यांचा घनिष्ठ संबंध हा घटकही हाताळण्याचा प्रयत्न केलेला धर्मापुरी आणि पानगाव या ठिकाणी आणि परिसरातही या घटकाचा आपणाला प्रकर्षाने वापर केलेला दिसतो. मंदिराची शैली कोणतीही असो पण त्यावर जर शिल्पकला कोरली गेली तर त्या मंदिराचेही सौंदर्य वाढते. म्हणून आपणाला असे म्हणता येते येथे 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' या ओळीचे चिंतन आठवते.

संशोधन कार्यात आपण सहाव्या प्रकरणाचा अभ्यास करत असताना चालुक्यांचा काळ हा इतिहासाच्या दृष्टिकोनातून किती महत्वाचा ठरला होता आणि त्यांच्या काळाने इतिहासाला कशा प्रकारचे योगदान दिले. याचा अभ्यास केला. भारताच्या इतिहासात अनेक राजघराने होऊन गेले त्यांनी आपआपल्या पध्दतीने इतिहासावर आपला ठसा उमटविण्याचे कार्य केलेले आहे. अशा या राजघराण्यांमध्ये चालुक्य राजांनीही आपले वेगळे असे योगदान तर दिलेच पण आपले वेगळे वलयही निर्माण केले. चालुक्यांच्या अनेक शाखा झाल्या त्यामध्ये त्यांनी आपल्या इतिहासाची धागेदोरे आपणाला अभ्यासण्यास ठेवलेली दिसतात.

इतिहासात आपण अनेक राजघराण्यांचा अभ्यास करतो त्यांच्या थोर राजवंशाचे पोवाडे गात असतो. तसेच थोर राजघराणे हे बदामीचे चालुक्य आणि कल्याणीचे चालुक्य होऊन गेले अशा थोरांचाच इतिहास आपण या ठिकाणी अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. कार्लाईल नावाचा एक इतिहासकार किंवा विचारवंत म्हणून गेला "थोर व्यक्तिंची चरित्रे म्हणजे इतिहास होय" यावरुन आपणाला इतिहासात थोरांचे महत्व लक्षात येते. मानव हा जसा

समाजशील प्राणी आहे तसाच तो इतिहासवत्सल प्राणी आहे. इतिहास रुपी आठवणींची साठवण मानवाला सुखःद अशा प्रकारचा अनुभव हा देत असते.

अशाच प्रकारे चालुक्य राजांच्या काळातील इतिहासाच्या ज्या आठवणी आपणासमोर इतिहास बनून उभ्या राहतात त्यापासून आपणाला सुखद अशा प्रकारचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही. दक्षिण भारताच्या इतिहासात अनेक राजघराणे उदय पावली व कालांतराने ती अस्ताला गेली. पण या आपल्या काही आठवणी त्यांनी येथील मातीत जपून ठेवण्याचे काम केले आणि आपणाला त्यांचा आदर्श घालून दिला. त्यांच्या काळातील अनेक अजरामर अशा प्रकारची आठवणीची स्मारके या राष्ट्रात निर्माण झाली त्या स्मारकांचे संरक्षण करणे आपले नैतिक कर्तव्य आहे. आपली ही इतिहासाची प्राचीन स्मारके जर नष्ट झाली तर आपण ती जतन करुन ठेवण्यात अपयशी किंवा अयशस्वी ठरलो तर आपणाला आपली भावी पिढी किंवा येणारी नवीन पिढी असा प्रश्न विचारील की आपल्या राष्ट्राला इतिहास नाही का ? अशा वेळेला नुसते बैलासारखे खाली मान घालण्याव्यतिरिक्त तुमच्याकडे उत्तर उरणार नाही. म्हणून अशा प्राचीन स्मारकांचे जतन होणे ही काळाची गरज आहे. मग अशाच प्रकारची स्मारके किंवा कलाकृती चालुक्यांच्या काळात इतिहासाला मिळालेली एक महान अशा प्रकारची देणगी का ठरु नये असा प्रश्न सुज्ञ अभ्यासकांच्या मनात पडल्याशिवाय रहात नाही. चालुक्यांच्या काळामध्ये इतिहासाला अनेक क्षेत्रात जसे योगदान मिळाले त्यामध्ये त्यांच्या सांस्कृतिक योगदानाचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये साहित्य, कला, धार्मिक स्थिती, स्त्रियांची स्थिती, अलंकार व सौंदर्यप्रसाधने, आहारविहार व पोषाख, शिक्षण आणि मनोरंजनाची साधने आदि घटकांचा अभ्यास केला.

चालुक्य राजांच्या काळातील शिल्पकला ही इतिहासाला कशा प्रकारे आधार राहिली त्यापासून आपणाला चालुक्यांच्या इतिहासालाही कशा प्रकारे प्रकाशात आणता येते आदि घटक या ठिकाणी हाताळण्यासाठी मदत झाली. तसेच चालुक्य राजघराण्याच्या काळात जी अजरामर कलाकृती निर्माण झाली त्यांच्यापासून इतर काही राजघराण्यांनीही प्रेरणा

घेतलेल्या आपणाला अप्रत्यक्षपणे सांगता येते. त्यामध्ये बदामीच्या चालुक्य घराण्यानंतर दक्षिणेत अनेक घराणे उदयाला आले. त्यांचाही या संशोधन कार्यात आपण अभ्यास केला.

दक्षिण भारताच्या इतिहासावर आपले प्रभूत्व किंवा प्रभाव निर्माण करुन चालुक्यांनी आपला वेगळाच ठसा उमटवलेला आहे. चालुक्यांनी आपल्या कलेचे वेगळेपण सिध्द केले आहे. आणि चालुक्यांनी आपल्या सांस्कृतिक इतिहासात मोलाची कला आणि स्थापत्याची भर टाकली आहे. चालुक्य राजांच्या या संबंध आणि आपल्या विषयाला अनुसरुन असणाऱ्या कला स्मारकांचा किंवा शिल्पकलेचा आपण आपल्या संशोधन कार्यात वस्तुनिष्ठपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. चालुक्यांच्या कलेचे महत्व सांगताना या ठिकाणी आपणाला असे म्हणता येईल की त्यांनी निर्माण केलेली शिल्पकला व वास्तुकला ही प्राचीन आणि मध्ययुगीन काळाबरोबरच आधुनिक काळाला निश्चितच मार्गदर्शक ठरु शकते. यात तिळणात्र शंका नाही असे मला वाटते.

# परिशिष्टये

## कल्याणी चालुक्य वंश वृक्ष

विजयादित्य (इ.स. ६९६-७३३)

↓

भीम

↓

तिसरा किर्तीवर्मन

↓

तैलप

↓

तिसरा विक्रमादित्य

↓

दुसरा भीम

↓

अय्य

↓

चौथा विक्रमादित्य

↓

दुसरा तैल (इ.स.९७३-९७)


↓

- सत्याश्रय (इ.स.९९७-१००८)
- यशोवर्मन
  - पाचवा विक्रमादित्य (१००८-१०१४)
  - दुसरा अय्य (१०१४-१०१५)
  - दुसरा जयसिंह जगदेकमल्ल (१०१५-१०४२)
    - पहिला सोमेश्वर आहवलमल्ल (१०४२-१०६८)
      ↓
    - कन्या अवलदेवी


- दुसरा सोमेश्वर
  भुवनैकमल्ल
  (१०६८-१०७६)
- सहावा विक्रमादित्य
  त्रिभुवनमल्ल
  (१०७६-११२७)
  - जयकर्ण
    त्रैलोक्यमल्ल
  - तिसरा सोमेश्वर
    भूलोकमल्ल
    (११२७-११३८)
    - दुसरा जगदेकमल्ल
      (११३८-११५०)
    - तिसरा तैल
      (११५०-५३)
    - तिसरा जगदेकमल्ल
      (११६३-८३)
      - चौथा सोमेश्वर
        त्रिभुवनमल्ल
        (११८३-१२००)

# नकाशे सूची


## भारताचा नकाशा




# महाराष्ट्राचा नकाशा


MAHARASHTRA
District Map
MADHYA PRADESH
GUJARAT
Gulf of Khambhat
CHHATTISGARH
NANDURBAR
Nandurbar
DHULE
Dhule
Jalgaon
JALGAON
AMRAVATI
Amravati
AKOLA
Akola
Nagpur
NAGPUR
Bhandara
BHANDARA
Gondia
GONDIA
Wardha
WARDHA
Buldhana
BULDHANA
WASHIM
Washim
Yavatmal
YAVATMAL
CHANDRAPUR
Chandrapur
Gadchiroli
GADCHIROLI
NASHIK
Nashik
AURANGABAD
Aurangabad
Jalna
JALNA
Hingoli
HINGOLI
Parbhani
PARBHANI
Nanded
THANE
Thane
MUMBAI SUBURBAN
Bandra (East)
AHMADNAGAR
Pune
OSMANABAD
Osmanabad
LATUR
Latur
RAIGAD
Satara
SATARA
SOLAPUR
Solapur
RATNAGIRI
Ratnagiri
ARABIAN SEA
SANGLI
Sangli
Kolhapur
KOLHAPUR
SINDHUDURG
Oros
GOA
KARNATAKA
ANDHRA PRADESH
Map not to Scale
Copyright© 2009 www.mapsofindia.com
LEGEND
State Boundary
District Boundary
State Capital
District Headquarter
N

# लातूर जिल्ह्याचा नकाशा



# बीड जिल्ह्याचा नकाशा


BID
(Maharashtra)
JALNA
N
AURANGABAD
PARBHANI
AHMADNAGAR
DHARASHIV
(Usmanabad)
LATUR
Godavari
Sina
Manjra
Gevrai
Umapur
Amba
Nandur
Balam Yelim
Padli
Rajuri
BID
Rajegaon
Talkher
Majalgaon
Nandalgaon
To Gangakher
Dehithan
Amalner
Pithi
Pali
Wadwani
Sirsala
Parli
Kada
Southada
Patoda
Ashti
Pargaon
Yelamb
Vida
Lahovi
Dharur
Ambajogai
Ujni
Dharmapuri
Chausala
Kaij
Digho
Yusufbadgao
Pangaon
Renapur
Kharola
Map not to scale
Copyright © 2006 Compare Infobase Pvt. Ltd

# कठिण शब्दांचा अर्थ

## (अ)

| | | |
|---|---|---|
| अच्छिद्रभित्ती | - | गर्भगृह व मुखशाला यांच्या भिंतीच्या आतील भाग ज्यावर काहीही नक्षी कोरलेली नसते. |
| अनर्थ | - | कोणक व राहा यांच्यामधील मुखशालेच्या बाबतीत पीठ ते छप्परापर्यंत गेलेला अवयव. |
| अनुराह | - | कोणक व अनर्थ आणि अनर्थ व राहा यांच्यामधला भिंतीचा अरुंद भाग. |
| अमलक | - | चक्री भोपळ्याप्रमाणे शिखराचा सर्वात वरचा अवयव. |
| अमलकी | - | कोणकाच्या विभागातील एक थर. |
| अमृत कलश | - | शिखरावरील सर्वात वरचा अवयव. |
| अलसा कन्या | - | अळसावलेली किंवा खेळकर मुलगी. |
| अलसाबाज किंवा चय | - | कोणाड्याच्या पुढे आलेल्या भिंती. |
| अर्धगर्भक | - | खोबन |
| अष्ठताल | - | चेहऱ्याच्या आठपट उंचीची मूर्ती, देवीची मूर्ती आठ तालाची असते. |

## (आ)

| | | |
|---|---|---|
| आगमा | - | वेलींची उभी नक्षी |
| आड केरी | - | थर विभागातील आडवी नक्षी |
| आलम्ब | - | मण्यांची लोंबत्या हाराची नक्षी |
| आलम्बिका | - | सिंहमुखापासून किंवा कंबरपट्ट्यापासून मण्यांच्या लोंबत्या हाराची नक्षी |
| आवरण देवता | - | गर्भगृहाच्या भिंतीवर मुख्यतः अनर्थावर व मुखशालेच्या भिंतीवर या दुय्यम देवतांच्या मूर्ती असतात. त्यांची प्राणप्रतिष्ठा तसेच पुजा अर्चा केली जात नाही. |

(उ)

| | | |
|---|---|---|
| उत्पला | - | फुललेल्या कमळाची नक्षी |
| उपरथ | - | दोन मुख्य रथांच्या मध्ये असलेला दुय्यम रथ. |
| उरु | - | त्रिकोणाकृती लहान खूर. |

(ऊ)

| | | |
|---|---|---|
| उर्ध्वगर्भिका | - | कोणाड्याच्या वरच्या बाजूला भिंतीवर केलेली नक्षी. |
| ऊर्ध्वपिण्डि | - | देवमूर्तीच्या आसनाचा सर्वात वरचा थर विभाग. |
| ऊर्ध्वबंधना | - | भिंतीच्या वरच्या भागी व शिखराच्या खाली असलेला नक्षीदार पट्ट याला भित्तिबन्धनाही म्हणतात. |

(क)

| | | |
|---|---|---|
| कंठ, कंठस्थान | - | भिंत व घुमटाकार छत यांच्या मधील अंतर्गमन असलेला भाग. |
| कणिका | - | लहान कणी |
| कणी | - | कंगोरा |
| कणीपीठ | - | कणीचा थर विभाग असलेले पीठ |
| कलश | - | कळसाच्या आकाराचा दगडी शिखरावरील सर्वात वरचा भाग |
| कलियुक्ता | - | कळ्यांसह फुलांची नक्षी |
| कलिकावली | - | कळ्यांची रांग |
| कामबन्ध | - | कामलीलात मग्न असलेली रांग |
| कीर्तिमुख | - | वज्रमस्तकाच्या केंद्रस्थानी असलेल्या वर्तुळातील मनुष्याचा चेहरा (सिंहमस्तक) |
| कुचिता | - | उभी पाने रांगेत कोरुन काढलेली नक्षी |
| कुट | - | दोन अवयवांमधील फट |
| कुटिला | - | लांब देठाच्या पानांच्या वेलीची लांब व तरंगाप्रमाणे नक्षी |

| | | |
|---|---|---|
| कुंभ | - | पंचकर्माचा दुसरा थर विभाग, पीठाचा एक प्रकार, खांबावरील कुंभ थर |
| कुंभकेरी | - | कुंभाच्या मुखातून खाली लोंबणाऱ्या पानांची नक्षी |
| कुंभकलश | - | कळसाचा एक प्रकार |
| कुंभ स्तंभ | - | वरती व खाली कुंभ असलेला खांब |
| कुंभिकाबन्ध | - | कुंभांची उभी अथवा आडवी रांग |
| कूर्मपृष्ठ | - | कासवाच्या पाठीप्रमाणे दिसणारा थर विभाग, पीठाचा एक प्रकार |
| कोणक | - | गर्भगृहाच्या बाहेरील स्तंभ |
| कोणिका | - | रथयुक्त देवालयाच्या अधोच्छन्दात कोपऱ्यापाशी असलेली लहानशी कर्णपट्टी |
| कौतूहल | - | दोन प्राण्यांच्या जोडणीने होणारा (विचित्र) प्राणी |
| कौणप | - | पिशाच्च |

**(ख)**

| | | |
|---|---|---|
| खांदि | - | फट, चीर |
| खर्पर | - | कवटी, काहीशी वक्राकार अशी शिळा, छप्पर किंवा अमलक झांकण्यासाठी देवीच्या देवळावरील घुमटाकार |
| खुर | - | पंचकर्माचा सगळ्यात खालचा थर विभाग |

**(ग)**

| | | |
|---|---|---|
| गर्भक | - | शिखर, गर्भगृहाच्या भिंतीच्या वरच्या बंधनापासून बेकिपर्यंतचा भाग याचे तीन प्रकार आहेत रेखा, पिढा व खाकरा |
| गर्भन्यास | - | गर्भगृहाची पायाभरणी |
| गर्भक पट्टी | - | खांदी अथवा फट यावरुन जाणारी लहान पट्टी |
| गर्भयंत्र | - | गर्भगृहाचा अधोच्छंद |

| | | |
|---|---|---|
| गर्भरेखा | - | गर्भगृहाच्या अधोच्छन्धात गर्भगृहाच्या आतल्या भागाची आडवी सीमा दाखविणाऱ्या व लांबीतील भिंतीची बाहेरील सीमा दाखविणाऱ्या रेघा. |
| गर्भशंकर | - | राहाच्या किंवा शिखराच्या पुढच्या भागांत असलेली शंकराची मूर्ती |
| गर्भकसिंह | - | गर्भगृहाच्या शिखराच्या राहाभागाच्या मध्यभागी असलेली सिंहाची मूर्ती |
| गर्भिका | - | राहाच्या कोणाड्याच्या खालचा अवयव - तल गर्भिका व वरचा अवयव उर्ध्वगर्भिका |
| गवाक्ष | - | जाळीदार खिडकी |
| गवाक्ष मण्डप | - | गवाक्षावरील कोरीव काम केलेला भाग |
| गवाक्षिका | - | दगडामध्ये जाळीचे कोरीव काम |
| गुण्डिका | - | मण्यांची नक्षी |
| गुण | - | अनुराह व राहाचा एक प्रकार |
| गुणरेखा | - | परस्पर सापेक्ष खालच्या पातळीवरील समांतर रेषा |
| गुंफण | - | एकमेकांत गुंफलेल्या रांगा |
| गुल्म | - | पानांचा गुच्छ |
| गेलब | - | वेलबुट्टीमध्ये स्त्रीची मूर्ती |

## (च)

| | | |
|---|---|---|
| चंद्रिका | - | मोराच्या पिसावरचा डोळा, त्या आकाराच्या नक्षीला म्हणतात. |
| चंपकदल | - | कुंभाच्या तोंडापासून खाली लोंबणाऱ्या चाफ्याच्या पानाची नक्षी किंवा पंचकर्मावरील खान्दिवरील नक्षी |
| चातुकी | - | डोळे किंवा वडी यांची धावती नक्षी |
| चापशिला | - | जड आडवे दगड (मुखशालेच्या) छप्परावरील दगडांना स्थैर्य देणारे |

| | | |
|---|---|---|
| चाल | - | छप्पराचा अवयव दोन प्रकारचा असतो, पिढा, चाल व लहराचाल |
| चूल | - | शिखा, घुमटाकार छप्पराचा सर्वात वरचा भाग |
| चूलि | - | अनर्थातील कोणाड्याचे वर्तुळाकार छप्पर |

**(छ)**

| | | |
|---|---|---|
| छेद | - | फट, खांच, आकृतीतील आडवी, उभी अथवा तिरपी रेघ |

**(ज)**

| | | |
|---|---|---|
| जलपत्र | - | दरवाजावर पानवनस्पतीची अलंकारणार्थ नक्षी |

**(झ)**

| | | |
|---|---|---|
| झरा, झरावली | - | लोंबत्या थेबांची नक्षी |

**(ड)**

| | | |
|---|---|---|
| डमरुभूमि किंवा डमरुगर्भ | - | डमरुच्या आकाराचा अवयव |
| डोरि | - | आडवी लहान पट्टी |

**(त)**

| | | |
|---|---|---|
| तल | - | पातळी, कुठल्याही वास्तुचा, वास्तुच्या अवयवाचा आधारभूत भाग मजला |
| तलगर्भिका | - | मध्यभागी असलेल्या कोणाड्याच्या खालच्या बाजूला केलेले अलंकरण |
| तलबंधना | - | पंचकर्माच्या वर व भिंतीच्या खालच्या बाजूस असलेला नक्षीचा पट्ट |
| ताल | - | मूर्तीच्या मापाचे एकक, मूर्तीच्या मुखाच्या मापावरुन ठरविलेले |

**(थ)**

| | | |
|---|---|---|
| थियकेरि | - | आडाकेरिप्रमाणे पण उभी नक्षी |

(द)

| | | |
|---|---|---|
| दंति | - | दाताच्या टोकाप्रमाणे बाजूने दिसणारा थर विभाग |
| दंतुरिका | - | दंतूर नक्षी |
| देश | - | कोणताही भाग, अवयव किंवा क्षेत्रे |

(ध)

| | | |
|---|---|---|
| धार | - | आधार, खांब |
| धारिणी शिला | - | चापशिलेच्या खोबणीत ज्या दगडाचे कूस बसवलेले असते असा उभा दगड |

(न)

| | | |
|---|---|---|
| नन्दावर्त | - | देवालयाच्या प्रवेशद्वारापाशी असलेल्या अर्धवर्तूळाकार पायऱ्या |
| नन्दिका मुख | - | लहान वज्रमस्तकाच्या मध्यभागी वक्षभागासह स्त्रीचे मुख |
| नागस्तंभ | - | एक किंवा दोन नागमूर्तीनी लपेटलेला खांब |
| नाटाम्बर | - | गर्भगृहाच्या पुढच्या भागी असलेली नटेशशिवाची मूर्ती |
| नारीबंध | - | स्त्रियांची रांग |
| निशा | - | (मूर्ती करिता) कोनाडा |
| निशागर्भक | - | मोठ्या रेखा प्रकारच्या प्रासादाच्या मागच्या व दोन्ही बाजूस लहान देवालये अशतात त्यांना म्हणतात. |
| निशामूर्ती | - | या लहान देवालयातील मूर्ती |

(प)

| | | |
|---|---|---|
| पंकजा | - | उमललेल्या कमळाचे अलंकरण |
| पंचकर्म | - | देवालयाच्या भिंतीच्या सर्वात खालच्या भागातील पाच थर विभाग |
| पट्ट | - | नक्षीशिवाय असलेला पट्ट किंवा थर |
| पट्टी | - | दगडाचा अरुंद पट्ट |

पद्मपत्र - कमळाच्या पानाप्रमाणे आकार असलेला थर विभाग

पद्मपीठ - छप्परासारखा खालच्या बाजूस चक्राकार असून त्याच्यावर कमळाच्या पानाची नक्षी कोरलेली असते.

परिराहा - राहाच्या बाजूला असलेला अरुंद उभा पट्ट शिखरावर अनुराहाला सलग असतो.

पल्लव - पानांची नक्षी

पाग - भिंतीचा व शिखराचा उभा विभाग, खांब रथाप्रमाणे

पाट - सपाट दगड

पार्श्वदेवता - देवालयातील मुख्य देवमूर्तीशी संबंधीत इतर देवता, राहावरील तीन कोनाड्यांत त्या ठेवलेल्या असतात, त्यांची प्राणप्रतिष्ठा केलेली असून त्यांची पूजा केली जाते.

पिण्डिका किंवा पिण्डि - बैठक, आसन

पीढ - इमारतीच्या अग्रभागातील त्रिकोणाकृती भाग जो उतरता व वक्राकार आकाराचा असतो.

पीढ-चाल - एकावर एक पीढ ठेवून बांधलेले छप्पर

पूर्णदभित्ति - प्रासादाची पायाची भिंत

पोटल - खांबाशिवाय, भिंती व घुमटाकार छप्पर असलेले देवालय

प्रस्थ - रुंदी आडवे माप

प्रस्थबिंदू - आकृतीत, ज्या बिंदूपाशी आडवी रेघ उभ्या रेघेस येऊन मिळते तो बिंदू.

प्रस्थरेखा - आकृतीत आडवी रेघ

प्रान्त रेखा - उभी बाहेरची सीमा दाखविणारी रेघ

(फ)

फुलि - भूमी किंवा तरंगाप्रमाणे अथवा दंतूर पृष्ठभाग उलटा पद्म थर

| | | |
|---|---|---|
| फेणी | - | उलटा पद्म थर |
| फेणी चुलिका | - | फेणींनी बनविलेली चुलिका |

**(ब)**

| | | |
|---|---|---|
| बड | - | खालचा पंचकर्म व वरची बंधना यामधला भिंतीचा भाग |
| बन्ध | - | नक्षीदार पट्ट |
| बन्धना | - | माळेसारखा थरविभाग, कंगोरा, भिंतीवरील एकावर एक ठेवलेले आडवे थर विभाग |
| बल | - | वळी |
| बलि | - | लहान वळी |
| बेकि | - | कंठदेश, देवालयाचा मानेचा भाग, शिखर व अमलक यांच्यामधला भाग |
| बेकि भैरव | - | आमलकाला जणू काही आधार देत आहे अशी बेकिवरील मूर्ती |
| बेकि सिंह | - | बसलेल्या सिंहाची मूर्ती |
| बेढ | - | घुमटाकृती छप्पराच्या खालच्या भिंतीचा उभा भाग |

**(भ)**

| | | |
|---|---|---|
| भंगि | - | शरिराचा बांक |
| भद्रपीठ | - | कैलास व पंचरथ प्रकारच्या देवालयांचा अधोच्छंद या प्रकारचा असतो |
| भूमी | - | जमीन, इमारतीची जागा, इमारतीच्या कुठल्याही अवयवांची बैठक |

**(म)**

| | | |
|---|---|---|
| मकर | - | लहानशी सोंड असलेला मगर, दंतकथेतील प्राणी, वरुन व गंगा यांचे वाहन |
| मकराकृति हरि | - | मकराचे अवयव लावलेले सिंहाचे तोंड, देवालयाच्या पुढच्या बाजूला अलंकरण म्हणून ठेवतात. |

| | | |
|---|---|---|
| मण्डप | - | गर्भगृहाच्या पुढ्यातील मुखशाला किंवा सुच्याकार शिखर असलेले लहान देवालय |
| मणिबिंन्दू | - | कामकलायंत्रातील मध्यबिंदू |
| मध्यबन्धना | - | भिंतीच्या मध्यभागी असलेला नक्षीदार आडवा पट्ट |
| महाविद्या | - | पराशक्तीचे दहा निरनिराळे अवतार |
| मातृका | - | काही देवांच्या शक्ती, या सात किंवा आठ आहेत |
| मुखटा | - | खाकरा प्रकारच्या देवालयाच्या रुंद छप्पराच्या पुढच्या बाजूस घुमटाकार असलेला पुढे आलेला भाग |
| मुद्रका | - | छप्परावरील सर्वात वरची शिला, आमलकावरील पोकळी झाकणारी शिला |
| मूर्तीयंत्र | - | मूर्तीच्या आखणीची आकृती |
| मेघा | - | ढगांप्रमाणे दिसणारी नक्षी |

## (य)

| | | |
|---|---|---|
| यंत्र | - | पुजेसाठी विशिष्ट भौमित्तीक आकृती, मूर्तीच्या आखणीची आकृती |
| यूप | - | यज्ञीय खांब देवीच्या मंदिरावरील लिंगाच्या आकाराचा कळस |

## (र)

| | | |
|---|---|---|
| रतिकेर | - | उभ्या जागेवर पानांच्या नक्षीचे केलेले अलंकरण |
| रत्नगर्भ | - | दगडांचे यंत्र, मूर्ती स्थापताना त्यात खोबन्या करुन वेगवेगळे रत्ने त्यात ठेवले जातात |
| रथ | - | देवालयाचे उभे विभाग, त्रिरथ, पंचरथ असे प्रकार |
| रथक | - | शिखरांवरही लहान लहान शिखरे दाखविणे |
| राजबंध | - | मुखशालेच्या भिंतीवर सर्व बांजूवर कोरलेला नक्षीदार पट्ट, यावर राजाची मिरवणूक, शिकारीचे दृश्य दाखवितात. |

| | | |
|---|---|---|
| रामगायत्री | - | मनुष्याचा चेहरा असलेले गाय |
| राहा | - | आधार, भिंत व शिखरावर उभा, मध्यभागी पुढे आलेला भाग |
| राहागर्भक | - | राहाच्या पुढच्या बाजूस जेथे वज्रमस्तक असते ती जागा |
| राहा सिंह | - | राहापासून पुढे आलेली सिंहाची मूर्ती |

## (ल)

| | | |
|---|---|---|
| लता दंड | - | वेलीचे कांड |
| लक्ष्मीस्थल | - | दरवाजाच्या उत्तरंगावर मध्यभागी नक्षीची मूर्ती असते ती जागा |

## (व)

| | | |
|---|---|---|
| वज्रबिंदू | - | वज्रमस्तकाच्या वर्तुळाच्या खालच्या बाजूचा मध्यबिंदू |
| वज्रमस्तक | - | राहापागाच्या पुढच्या बाजूला असलेले प्रमुख अलंकरण |
| वर्तुला | - | वर्तुळाकृतीत पानांची नक्षी |
| वर्तुलकणी | - | वृत्ताकार कणी |
| वसन्त | - | पाने व वेली यांची नक्षी असलेला आडवा पट्ट |
| विग्रहबन्ध | - | मूर्तीची रांग |
| विमान | - | मंदिराचे शिखर, काही वेळा संपूर्ण देवालय |
| वेध | - | जाडी, खोली काही वेळेला उंची देखील |
| वैताल | - | लांबट गोल शिखर |

## (श)

| | | |
|---|---|---|
| शालारन्ध्र | - | शालेच्या दोन छप्परांमधल्या उभ्या भिंतीच्या जागेत असलेली भोके |
| पागशिखर | - | गर्भगृहाच्या शिखरावरती प्रामुख्याने असलेले लहान शिखर |
| निशा शिखर | - | कोणाड्यावरील लहानसे शिखर |

(स)

| | | |
|---|---|---|
| सगुंफा | - | प्राण्यांसह लतावेलींची नक्षी |
| समभद्रपीठ | - | रत्नसार देवालयाचा अधोच्छन्द या प्रकारचा असतो |
| समभागिक | - | दिलेल्या क्षेत्राचे दोन समान भाग करुन त्यात दोन निरनिराळ्या नक्षी कोरलेल्या असतात. |
| समक्षेत्र पद्मपीठ | - | महामेरु देवालयाचा अधोच्छन्द या प्रकारचा असतो |
| संधिस्थल किंवा स्थान | - | मुखशाला व विमान यांना जोडणारी भिंत |
| सर्वतोभद्र पीठ | - | मंजुश्री देवालयाचा अधोच्छन्द या प्रकरचा असतो |
| सिंहमुख | - | वज्रमस्तावरील किंवा इतर स्थानावरील सिंहाचे तोंड |
| सूत्र | - | माप घेण्यासाठी दोरी, शिल्पविषयक नियम |

(ह)

| | | |
|---|---|---|
| हंस, हंसलता | - | हंसाची रांग |

# संदर्भग्रंथ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची

## अ) प्राथमिक साधने (प्रकाशित व अप्रकाशित)

### I) शिलालेख

- वाकडी शिलालेख : चालुक्य राजा तृतीय सोमेश्वर याची माहिती सांगणारा देवनागरी लिपीत आहे.
- धर्मापुरी शिलालेख : जगदेकमल्ल चालुक्याच्या काळात दामरसाने श्रीकालेश्वराला दान दिलेल्या अग्रहारा संबंधीचा कानडी लिपीत आहे.
- धर्मापुरी शिलालेख : जैन यापनीय संघाला दान दिलेली माहिती देणारा कानडी लिपीत आहे.
- धर्मापुरी शिलालेख : जैन यापनीय संघातील पंडितांना दान दिल्याची माहिती सांगणारा दुसरा कानडी शिलालेख.
- धर्मापुरी शिलालेख : केदारेश्वर मंदिराच्या भिंतीत चालुक्य राजा विक्रमादित्य सहाव्याची माहिती सांगणारा कानडी शिलालेख.
- धर्मापुरी येथील प्राचीन किल्ला स्थापत्य.
- धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिर, मरळसिध्द मंदिर, तुकाई देवीचे मंदिर व इतर भग्नावशेष.
- धर्मापुरी शहर व परिसरातील पुरातत्वीय अवशेष.
- पानगाव येथील विठ्ठल मंदिर, पन्नगेश्वर मंदिर आणि पंचकुंड महादेव मंदिर आदि स्मारके.
- पानगाव शहर व परिसरातील पुरातत्वीय अवशेष.

### II) मराठी ग्रंथ


- कोलते वि.भि. (संपादक), लीळाचरित्र, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९८२.

- कुलकर्णी र.पु. (अनुवादक), शिल्पप्रकाश, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, जाने. २०००.
- गाडगीळ अ.ल., योगेश्वरीचे माहेर श्री क्षेत्र अंबाजोगाई, सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शनमाला, बोरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., मुंबई, १९६०.
- जोगळेकर एस.ए., हाल सातवाहनाची गाथा सप्तशती, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५६.
- देव शा.भा., पुरातत्व विद्या, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूरसाठी रत्नाकर अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे ३०, प्रथमावृत्ती, १९७६.
- देव शा.भा., तेर, मुंबई, पुरातत्व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन.
- फेरिस्ता, गुलशने इब्राहिमी (अनु. डॉ. भ.ग. कुंटे), मुंबई, १९८२.
- रामदाशी वसंतबुवा राधाकृष्ण, नवगण साक्षात्कार, केलोना मुद्रणालय, बीड, १९९९.
- लिंगपुराण, पूर्वार्ध, १७, १५, ९२, मनसुखराय मोर, कलकत्ता संस्करण, १९६०.
- सुत्रधार मंडन विरचित, प्रासाद मंडन (अनु. र.पु. कुलकर्णी) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, २००१.
- सांकलिया ह.धी, भारतीय पुरातत्व - एक समालोचन, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८९.
- सांकलिया ह.धी., महाराष्ट्रातील पुरातत्व (संपा. माटे म.श्री.), मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९७६.

III) **English Books**

- James Burgess, Report on the Buddhist Cave Temples and their Incripitions, Archaeological Survey of Western India, Vol.IV, London, 1883.
- Marshall John, Mohenjodaro and Indus Civilization, Vol.I, London, 1931.
- Marshal John, Annual Report Archaeological Suurvey of India, Delhi, 1927.
- Mackey E., Further Excavation at Mohenjodaro, New Delhi, 1938.
- Ritti & Shelke (Edi.), Incription from Nanded District, Y.M. Nanded, 1968.
- Sircar D.C. (Edi), Select Inscriptions, Vol.II, Delhi, Motilal Banarasidas, 1983.

ब) **दुय्यम साधने**

I) **मराठी ग्रंथ**

- अवलगावकर र.वा., महानुभाव साहित्यातील महाराष्ट्र, (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, जाने. १९८८.
- अग्रवाल वा.श., भारतीय सर्वेक्षण, सारनाथ, दिल्ली, १९९२.
- आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, १९६७.,
- आंबेडकर भि.रा., भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, मुंबई, १९९२.

- आहेर सोमनाथ, गोदातटीची लोककथा (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००६.
- कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य (खंड II) पुनम प्रकाशन, कंधार, प्रथमावृत्ती, नोव्हें. २००६.
- कठारे अनिल, मराठवाड्यातील लेणी, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती नोव्हें. २००१.
- कठारे/नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, नोव्हें. १९९९.
- कठारे अनिल, साखरे विजया, मंदिरे आणि मूर्तिशिल्प, अल्फा पब्लिकेशन्स, सुंदर नगर नांदेड, प्रथनावृत्ती डिसें. २००८.
- कठारे, दळवे, राष्ट्रकुटांची राजघानी कंधार, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, २००५.
- कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, प्रथमावृत्ती, १९५१.
- कसबे रावसाहेब, धर्म-मानवी संस्कृति विकास, प्रकाशन विश्वासराव लोकवाङमय गृह, भूपेश गुप्ता भवन, मुंबई, २००५.
- कावडकर के.डी., ऐतिहासिक स्मारके अवशेष पुरातत्वीय स्थलांच्या रुपाने (संपा. पाटील श्रीराम), मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, माया नगर, औरंगाबाद, जाने., २००२.
- कावडकर के.डी., मराठवाड्यातील किल्ले, (संपा. पाटील श्रीराम), मायबोरीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, माया नगर, औरंगाबाद, जाने., २००२.

- काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, के.एस. अतकरे, कैलास पब्लिकेशन्स, गोकूळवाडी, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९९.
- काळे भगवान, किल्लेधारुर, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, जाने. २००४.
- काळे भगवान (संपा.), मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, १९८६.
- काळे भगवान, संत परंपरा, (संपा. देव प्रभाकर), गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, डिसें. २००६.
- काणे पा.वा. (भारतरत्न) धर्मशास्त्राचा इतिहास (अनु. यशवंत भट), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, १९८०.
- कॉलिंगवूड आर.जी., कलेची मुलतत्वे (अनु. मालसे स.ग., मालसे मि.स.) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, डिसें. २००४.
- कुंटे मोरेश्वर, देवदर्शन, जिल्हा लातूर, मंदिरकोश, प्रकाशन, पुणे.
- कोटीकर सुधीर, मराठवाड्यातील मंदिरे, (संपा. पाटील श्रीराम), मायबोलीचा मराठवाडा, योगेश प्रकाशन, माया नगर, औरंगाबाद, जाने. २००२.
- कोरे बसवराज, दक्षिण गंगेच्या तिरावरील वीरशैव परंपरा - एक चिंतन, (संपा. देव प्रभाकर) गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, डिसें. २००६.

- कोलते वि.भि., महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८७.
- खरे ग.ह., मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३९.
- खरे ग.ह., संशोधकाचा मित्र, भाग पहिला, पुणे, भारत इतिहास संशोधन मंडळ, १९५१.
- गुप्ता पी.एल., गुप्त साम्राज्य, वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन, १९७०.
- गोगटे एस. तगवाले, मानव्यविद्या व ललितकलांचा परिचय. डॉ. राजेंद्र वडनेरे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती, ऑक्टो. २०००.
- गोखले शोभना, प्राचीन धनसंपदा, (संपा. देव प्रभाकर) गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, डिसें. २००६.
- चव्हाण उदाजीराव, खजुराहोची मंदिर शिल्पे, सौ. नंदिनी तु गवळी, नलवडेमाळ प्रतिभानगर पिछाडीस सागरमाळ, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जून १९८२.
- जामखेडकर अ.प्र., स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, द्वितीयावृत्ती, २००९.
- जाधव एस.जी., आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, डिसें. २००५.
- जोशी नि.पु., भारतीय मूर्तिशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९.
- जोशी पी.जी., प्राचीन भारत, अभय प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, १९९७.

- जैन यशपाल, जयपूर - एलोरा येथील ऐतिहासिक लेण्या (संपा. श्रेणिक अन्नदाते) जैन ऐतिहासिक, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, प्रथमावृत्ती, जाने. २००३.
- डिसकळकर द.बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६४.
- ढाकी एम.ए., इंडियन टेंपल्स कॉमर्स इन कर्नाटक - इन्स्क्रिप्शन्स अँड आर्किटेक्चर, न्यू दिल्ली, १९७७.
- ढेरे रा.चि., लज्जागौरी, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, १९८८.
- तुळपुळे शं.गो., (संपा.), प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६३.
- दाभाडे बाळकृष्ण, कला साधना, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६१.
- दिक्षित नी.सी., प्राचीन व मध्ययुगीन भारत (मराठी), नागपूर, पिंपळापूरे अँड कं., १९८७.
- देगलूरकर गो.बं., गोदा खोऱ्यातील लेणी, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, डिसें. २००६.
- देगलूरकर गो.ब., सुरसुंदरी, भारतीय विद्या भवन, पुणे केंद्र, पुणे, २००४.
- देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, जाने. १९८८.
- देव शा.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपटांची वर्णनात्मक सूची, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८४.
- देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा (खंड १), अलकनंदा प्रकाशन, गुरुद्वारामागे, उस्मानापुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, फेब्रु. १९७६.

- देशपांडे ब्रम्हानंद, शोधमुद्रा (खंड ३) के.एस. अतकरे कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै २००१.
- देशमुख रा.नी., आपला लातूर जिल्हा, डी.एन. बंडाळे, कल्पना प्रकाशन, नांदेड, सप्टें. २००८.
- दिक्षित मो.ग. (संपा.), दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, (खंड ४), चि.ग. कर्वे प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, ऑक्टो. १९५१.
- देशपांडे सु.र., भारतीय शिल्प वैभव, मेहता पब्लिकेशन्स हाऊस, पुणे, २००५.
- देशमुख किरण, तीर्थक्षेत्र राहेर, देशमुख धनंजय (संपा.), राहेर श्री लक्ष्मी देवस्थान, २००१.
- धारुरकर वि.ल., गोदाकाठच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृती, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरात्रे, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, डिसें. २००६.
- धोंडगे सुभाष, मराठवाड्यातील प्राचीन जैन तीर्थक्षेत्रे, (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा (खंड १), योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, जाने. २००२.
- पंडित जपेशास्त्री रंगनाथ, महाराष्ट्र संस्कृती आणि मराठी भाषा (संपा. काळे भगवान), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, प्रथमावृत्ती, जाने. १९८८.
- पठाण यु.म., मराठवाड्यातील प्राचीन मराठी शिलालेख, विद्यापीठ औरंगाबाद, १९८९.
- पठाण यु.म., मराठवाडा शिलालेख व इतिहास (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा (खंड १), योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, जाने. २००२.

- पठाण यु.म., संत साहित्य चिंतन, अलमास पठाण, आनंदनगर घाटी, औरंगाबाद, मार्च १९८३.
- पाठक अरुणचंद्र (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड १), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, गोविंद स्वरुप अध्यक्ष, संपादक मंडळ, दर्शनिका, प्रधान सचिव सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती (इंग्रजी), १९६७, मराठी आवृत्ती २००२.
- पाठक अ.शं., बारवस्थापत्य एक आढावा, डॉ. देविसींग चौहाण गोरवग्रंथ,लातूर, १९९८.
- पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई, १९६३.
- बदलवा बा.सी., प्राच्य सिध्दांत अर्थात भारतीय संस्कृतीचा शोध, विद्याभारती प्रकाशन, गीतांजली मार्केट जवळ मेनरोड, लातूर, १९९४.
- बेंद्रे वा.सी., महाराष्ट्रेतिहासाची साधने, विभाग पहिला, प्रकाशक श्री वा.वि. भट, कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथ, प्रथमावृत्ती, ऑक्टो. १९६७.
- बोराडे मा.शा., भाजे व कार्ले लेणी (महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन) भारतीय पुरातत्व विभाग, निर्मिती व वितरण, ग्रेस प्रिंटर्स, पुणे-३०.
- बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, कल्याण शिक्षण संस्था, नागपूर, प्रथमावृत्ती, फेब्रु.२००९.
- भारती संजय, कला मराठवाड्याची (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा (खंड १), योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, जाने. २००२.
- भांडवलकर, हनवते यु.एस., मराठवाड्याच्या इतिहास, अभिजित प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, जून १९९९.

- माडेकर अपर्णा (संकलक), मराठवाड्यासह बीड जिल्हा, अपर्णा प्रकाशन, बीड, आवृत्ती, २००८.
- माढेकर रा.ब. (संपा.), गोदा तटीचे कैलास लेणे (कै. नरहर कुरुंदकर स्मृतीग्रंथ) मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, इसामिया बाजार, हैद्राबाद, नोव्हें. १९८३.
- माटे म.श्री., प्राचीन भारतीय कला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती डिसें. १९७४.
- माटे म.श्री., मध्ययुगीन महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
- माटे म.श्री. प्राचीन कलाभारती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९८.
- मालकर अंजली, संगीत साधना, (संपा. देव प्रभाकर), गोदा खोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक दिनकर व्यंकटेश कोरान्ने, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, डिसें. २००६.
- मार्डीकर एम.एम., भारताचा इतिहास (इ.स. ६९०-१५५०) विद्या बुक प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जून १९९७.
- मिराशी वा.वी., सातवाहन आणि पश्चिमी श्रेत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७९.
- मिराशी वा.वी., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, प्रकाशक रजिस्ट्रार नागपूर, विश्वविद्यालय नागपूर, प्रथमावृत्ती, १९५७.
- मोरे एम.एस., महाराष्ट्रातील बौध्द धर्माचा इतिहास, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २०००.

- मोरवंचीकर, व्यास पी.सी., भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत), रेणुका प्रकाशन, साईकृपा औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै २००३.
- मोरवंचीकर रा.श्री., दक्षिणकाशी पैठण, पुणे, १९८५.
- मोरवंचीकर रा.श्री., महाराष्ट्रातील जैन धर्म, संस्कृती आणि साहित्य, (संपा. श्रेणीक अन्नदाते) जैन ऐतिहासिक, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, प्रथमावृत्ती, जाने. २००३.
- मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९३.
- रसाळ रविंद्र, नांदेड जिल्हा, (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा (खंड १), योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, जाने. २००२.
- रणसुभे सुर्यनारायण, लातूर जिल्हा (संपा. श्रीराम पाटील), मायबोलीचा मराठवाडा (खंड १), योगेश प्रकाशन, मायानगर, औरंगाबाद, जाने. २००२.
- राठोड राजाराम, उदगीर इतिहास आणि स्मारके, प्रकाशक डॉ. ना.य. डोळे प्राचार्य महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, प्रथमावृत्ती, १९६८.
- राव व.दी., प्राचीन भारतीय सांस्कृतिक इतिहास, लोखंडे प्रकाशन, पुणे, १९९०.
- रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास (१९६० पर्यंत), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून १९९९.
- रोडे सोमनाथ, सुतार अमर, धाराशिव येथील जैन लेणी, बाहुबली, अनेकांत शोध पीठ, १९८६.
- लव्हाळे बाळासाहेब, (संकलक), लातूर जिल्हा सामान्य माहिती,
- शास्त्री चित्राव महादेव, प्राचीन भारतीय स्थलकोश, १९६९.

- शर्मा के.के. (संकलक), संदर्भ महाराष्ट्र (खंड १), इंटलेक्च्युअल बुक ब्युरो प्रकाशन, भोपाळ, २००५.
- सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास (इ.स.पू. २३०-१३८१) के.एस. अतकरे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून १९९७.


## II) हिंदी ग्रंथ


- जोशी मुन्शीचंद्र, ऐतिहासिक संदर्भ में शाक्त पंथ, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, १९८९.
- भांडारकर आर.जी., वैष्णव शैव और अन्य धार्मिक मत (अनु. महेश्वर प्रसाद), भारतीय विद्या प्रकाशन, वाराणसी, १९६७.
- श्रीवास्तव ब्रजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशक, द्वितियावृत्ती, १९९०.


## III) English Books


- Bakshi S.R., Advanced History of ancient India, Vol.II, Delhi Anmol Publications, 1995.
- Brown Percy, Indian Architechture, (Buddhist) and (Hindu) Bombay, D.B. Taraporevala & Son, 1971.
- Benerjea J.N., The Development of Hindu Iconography, Calcutta, 1956.
- Barua D.K., Vihars in Ancient India, Calcutta, 1969.
- Champakalakshmi R., Vaisnava Concept in Early Tamilnadu, Journal of Indian History Vol.I, Part III, Dec. 1987.

- Degloorkar G.B., Temple Architecture and Sculpture, Nagpur, 1974.
- Degloorkar G.B., Shaha Viraj, Intellectuals Sandarbh Maharashtra (Compiler, Sharma K.K.), Vol.I, First Published 2004.
- Deo Prabhakar, Temples of Marathwada, Jaipur Publication Scheme, 1993.
- Deva Krishna, Temples of North India, Delhi National Book Trust, 1969.
- Deshmukh B.,S., Iconography of Hindu Temples in Marthwada, Jaipur, Publication Scheme, 1987.
- Gopinathrao T.A., Elements of Hindu Iconography, Vol.II, Part I, Delhi Reprint, 1968.
- Jemes Ferguson and Jemes Burgess, The Cave Temples of India, London, 1880.
- Lain S. Bangdel, The Early Sculpture of Nepal, 1982.
- Mirashi V.V., Studies in Indology, Vol. I-III, Vidarbha Sanshodhana Mandal, Nagpur, 1960.
- Mujumdar R.C. (Edi.), The Age of Imperial Kanauj Bombay, Bhartiya Vidya Bhavan, II, 1964.
- Morwanchikar R.S., The City of the Saints Paithan Through the Ages, Ajenta Publications, Dlehi, 1985.

- Pruthvi Kumar, gupta Temple Architecture, Delhi, 1965.
- Rao K.S., The Times of India, Indus, Valley Script Decephred 2, Sept. 1980.
- Sankliya, The Godavari Politic Industry Deccan College Research Bulletin, 1952.
- Sharan, R., Ancient Indian History Culture and Archaeology, Delhi, Radha Publications, 2002.
- Shah U.P., Studies in Jaina Art, Banaras, 1955.
- Shastri Nilkant, A History of South India, Delhi Oxford University Press, 4th Edi, 1976.
- Sali Chetan, Sali Geeta, Latur (Maharashtra), Intellectuals Sandharbha, Maharashtra (State & District) Chief Compiler, Dr. K.K. Sharma, Vol.II, First Published, 2004.
- Shrinivasan K.R., Temples of South India, National Book Trust, Delhi 1971.
- Shrivastav V.C, Sun-Worship in Ancient India, Allahabad, 1972.
- Sircar D.S., Studies in the Geography of Ancient and Midival India, Motilal Banarasidas, Delhi (Edi.) 1971.
- Smith V.A, Rullers of India, Ashoka, Delhi, S. Chand and Company, Third Reprint, 1970.

- Tripathi R.S., History of Ancient India, Delhi, Motilal Banarasidas, 1967.
- Tylor E.B., Religion in Primitive Culture, New York. 1958.
- Wauchope R.S., Buddhist Cave temples of India, Calcutta, 1933.
- Yazdani, Gulam, The Early History of the Deccan, Vol.I & II, Oxford University Press, London, 1960.


**IV) दैनिके**


- कुलकर्णी व्ही.एस., उदगीरचा भूईकोट किल्ला भूईसपाट होण्याच्या मार्गावर, दैनिक लोकमत, मंगळवार, २८ जूलै २००९.
- केतकर कुमार (संपा.), दैनिक लोकसत्ता, पुष्करणी व जलकुंडे, गाथा ज्ञानाची, मंगळवार १५ डिसें. २००९.
- दिक्षित सुबोध, उगम वास्तुशास्त्राचा, दैनिक सकाळ, गुरुवार पुरवणी, ६ ऑगस्ट २००९.
- देशमुख किरण, मराठवाड्यातील गणेश प्रतिमा, दैनिक सकाळ, १९ सप्टे. १९९९.
- पठाण यु.म., मराठवाड्याचा मिटलेला इतिहास, मराठवाडी माणसं पुस्तकातील लेख, दैनिक लोकमत, २० सप्टे. २००८.
- पठाण यु.म., स्मृतिस्थळ, दैनिक लोकसत्ता, रविवार ८ मार्च २००९.
- बेल्हेकर अभिजित, सातवाहनाचे तेर, दैनिक लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, १३ सप्टे. २००९.


**V) मासिके व विशेषांक**


- ठोसर हरिहर, प्रतिष्ठाण, सप्टे.-डिसे. १९७९.

- देशमुख भगवान, मूर्तिकलेचे माहेरघर - धर्मापुरी (संपा. रोडे सोमनाथ) मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, निवडक शोधनिबंध, खंड ३, फेब्रु. १९९९.
- देशमुख किरण, सौंदर्य व तत्वज्ञानाचा समन्वय म्हणजे सुरसुंदरी (समीक्षण), संशोधक, सप्टे., २००५.
- पांचाळ ज्ञानेश्वर (संपा.), २४ वी राज्यस्तरीय मराठवाडा इतिहास परिषद, अंबाजोगाई, प्रकाशक, प्राचार्य डॉ. गणपत राठोड, जाने. २००५.
- पोहनेरकर न.शे., प्रतिष्ठाण, ऑक्टो. १९९०.
- पोहनेरकर न.शे, मराठ्वाड्याची प्राचीन सौभाग्यलेणी बीड, प्रतिष्ठाण, सप्टे. १९७०.
- रोडे सोमनाथ (संपा.), मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, निवडक शोधनिबंध, खंड ३, प्रकाशक, सचिव इतिहास परिषद द्वारा प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड फेब्रु. १९९९.
- हेबाळकर शरद, पाठक अरुणचंद्र, खोलनायकाचे अंबे - अर्थात यादवकालीन अंबाजोगाई, ७ वे इतिहास अधिवेशन, १९८६.
- ठोसर हरिहर, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जुलै-सप्टे १९९०, (संपा. देव प्रभाकर) गोदाखोरे इतिहास आणि संस्कृती, प्रकाशक, दिनकर व्यंकटेश, कोरात्रे, समर्थनगर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००६.

## VI) वार्षिके

- जोशी सु.ग. (संपा.) मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, मराठवाडा संशोधन मंडळाकरिता, शिरुरताजबंद, १९७४.
- जोशी रा.वि., मराठवाड्यातील अश्मयुगीन संस्कृती, मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक, शिरुरताजबंद, १९७६.
- देव प्रभाकर, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक अंक, १९७५.
- देशमुख किरण, मराठवाड्यातील मध्ययुगीन सूर्य प्रतिमा, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, नागपूर, १९८५.
- पाठक अ.शं., मराराष्ट्रातील बारव स्थापत्य, मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर, २००१.

## VII) गॅझेटिअर्स

- जामखेकर अ.प्र., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ (खंड १ भाग २), स्थापत्य व कला (प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ) (संपा. पाठक अ.शं.), मुंबई दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, २००९.
- पाठक अरुणचंद्र (संपा.), इतिहास प्राचीन काळ (खंड १) महाराष्ट्र राज्य गॅझ ेटिअर, गोविंद स्वरुप अध्यक्ष, संपादक मंडळ, दर्शनिका, प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती (इंग्रजी), १९६७, मराठी आवृत्ती २००२.
- बीड जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६०.

## VIII) प्रकाशित व अप्रकाशित शोधप्रबंध

- अक्कोळे सुभाषचंद्र, प्राचीन मराठी, जैन साहित्य, प्रकाशित शोध प्रबंध प्रकाशक, शामकान्त बनहट्टी सुविचार प्रकाशन मंडळ, धनतोली, नागपूर-पुणे, प्रथमावृत्ती, १९६८.
- कुलकर्णी बी.जी., बीड जिल्ह्यातील मध्ययुगीन मंदिर कला-स्थापत्य एक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, २००६.
- कंधारे वि.शा., बीड एक सांस्कृतिक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, मार्च २००६.
- दळवे अरुण, राष्ट्रकुटकालीन कंधार, अप्रकाशित शोधप्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, २००४.
- पवार शि.सो., मराठवाड्यातील किल्ले - एक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, २००८.
- राठोड पी.सी., उदगीर एक सांस्कृतिक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद, १९८७.
- वाघमारे सं.ज्ञा., राष्ट्रकुटकालीन मराठवाडा (इ.स. ७५३-९७३), अप्रकाशित शोधप्रबंध, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड, जाने. २००६.

## IX) शब्दकोश - संस्कृती कोश

- जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश (खंड २), पुणे, १९८५.
- जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी शब्दकोश, (खंड १२), मुंबई, १९९५.

# छायाचित्रे



केदारेश्वर मंदिरातील शिवलिंग
(धर्मापुरी)

केदारेश्वर मंदिरातील समपाद
ब्रम्हदेव






केदारेश्वराच्या गर्भगृहाचे तोरण



मल्लिकार्जून मंदिराच्या
उत्तरेकडील बारव



मल्लिकार्जून मंदिराच्या सभामंडपातील
यज्ञकुंड




मल्लिकार्जून मंदिराच्या
गर्भगृहाचे प्रवेशद्वार



मल्लिकार्जून मंदिरावरील
भैरव



मल्लिकार्जून मंदिरावरील समपाद
बलराम



वाकडी येथील शिलालेख
(देवनागरी)

प्रत्यक्ष दर्शनी शिलालेख






खंडीत तीर्थकराची मूर्ती

जैन तीर्थकर चंद्रप्रभू






मल्हारी शिल्प



सरस्वती गणेशासहीत सप्त मातृका



पुजा करणारी स्त्री




किल्ल्यातील दगडी भांडे




किल्ल्यातील वैशिष्टपूर्ण विहीर

किल्ल्याचा आंतर्भाग




किल्ल्याच्या आंतर्भागावरील
शिल्प






विहिरीत उतरण्याचा मार्ग

किल्ल्यातील शस्त्रागार



किल्ल्यातील अजितनाथाचा
आयागपट्टा





किल्ल्याच्या बाह्यभागावरील अजितनाथ

किल्ल्यातील प्राणी शिल्प



किल्ल्यावरील कोरीव काम





किल्ल्याची तटबंदी

नागशिल्प



धर्मापुरीतील मूर्तीशिल्प
ठेवलेला ओटा






सुखासनात बसलेली पार्वती

सुपार्श्वनाथाच्या समपद मूर्ती




तुकाई देवीचे मंदिर (धर्मापुरी)





तुकाई मंदिराचे प्रवेशद्वार

स्तंभावरील अतिभंग नटराज




स्तंभावरील नागशिल्प






वैष्णव शिल्प व गंगायमुना

तुकाई देवीचा संभामंडप



अतिभंग अवस्थेत तुकाई देवी






पन्नगेश्वराचे शिवलिंग (पानगाव)

मल्हारी पानगाव



पंचकुंड मंदिरातील शिवलिंग






नागशिल्प पानगाव

पानगावची कलात्मक विहीर





विहीरीतील देवकोष्ठातील
उमामहेश्वर



विठ्ठल मंदिरावरील गजथर



विठ्ठल मंदिरावरील अलसा


विठ्ठल मंदिरावरील
डालमलिका






विठ्ठल मंदिरावरील शुकसारिका

विठ्ठल मंदिराच्या उत्तरेकडील
मकरमुख



पदमासनातील वराह अवतार





अलसा



मातृमूर्ती



पदमासनातील योग नारायण



विना वादीका



मर्कट चेष्टा

विठ्ठल मंदिराची दक्षिण बाजू






मातृमूर्ती

चामरधारीनी




जया सुरसुंदरी






मंदिरातील आसनव्यवस्था

सभामंडपातील पद्म




विठ्ठल मंदिरावरील कोरीव काम






डालमलिका व मर्कट चेष्टा

विठ्ठल मंदिराचा मुख मंडप



सभामंडपातील स्तंभ






अंतराळातील देवकोष्टातील विष्णूमूर्ती

गर्भगृहाचे द्वार



गाभाऱ्यातील  विठ्ठल रुक्मीनी





केदारेश्वर मंदिर (धर्मापुरी)

केदारेश्वराजवळील शिलालेख



वामन अवताराचे उत्कृष्ट
शिल्प





पत्र लेखिका

दुर्मिळ शिवमूर्ती



मर्कट चेष्टा





बासरी वादक

विदारक नृसिंह





भैरव मूर्ती



शुकसारिका



ब्रम्हदेव

वराह अवतार





देवकोष्ठातील विष्णू व इतर शिल्प

समपद विष्णूमूर्ती



कालभैरव






भैरव मूर्ती

दर्पणा




केदारेश्वरावरील उत्कृष्ट
शिल्प





गजथर

देवकोष्ठातील गणेश मूर्ती



भारवाहक





वैष्णव शिल्प

मल्लिकार्जून मंदिराची मागची बाजू

